ब्रिजमोहन हेडा अनुवादित

# दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास



-मोहनदास करमचंद गांधी

लोकव्रत प्रकाशन

# दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास

**मो. क. गांधी**

अनुवाद

**ब्रिजमोहन हेडा**

**प्रकाशक**

सौजन्य: लोकव्रत प्रकाशन, पुणे

# प्रकाशकाचे निवेदन

गांधीजींच्या आत्मकथेनंतर त्यांच्या ज्या पुस्तकाचा क्रम लागेल ते महत्त्वपूर्ण पुस्तक म्हणजे दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्राहाचा इतिहास. आत्मकथेप्रमाणेच सत्याग्रहाचा हा इतिहास त्यांनी गुजरातीत लिहिला होता. या पुस्तकाचे केवळ इतकेच महत्त्व नाही. या पुस्तकात गांधीजींच्या चारित्र्यघडणीतील सर्वात महत्त्वाच्या भागाच्या काळाचा तसेच सत्याग्रहाच्या शोधाच्या काळाचा त्यांच्या स्वतःच्या लेखणीतून उतरलेला इतिहास आपल्याला पाहायला मिळतो. गांधीजींच्या जीवनात जेव्हा केव्हा आत्मसंशोधन करून चिंतन करायची वेळ यायची तेव्हा ते दक्षिण आफ्रिकेतील आपल्या जीवनातील अनुभवांची आठवण करायचे. या पुस्तकात इतका महत्त्वाचा इतिहास भरलेला आहे. आत्मकथेप्रमाणेच हा इतिहासही ‘नवजीवन’ मधून साप्ताहिक मालिकेच्या स्वरूपात आणि नंतर पुस्तकाच्या रूपात प्रकाशित झाला होता.

श्री वालजीभाईंनी या पुस्तकाचा इंग्रजीत अनुवाद केला आहे. हा अनुवाद करत असताना त्यांनी ‘इंडियन ओपिनियन’च्या जुन्या फाईली पाहून अनेक महत्त्वाचे तपशील तपासले होते, आणि असे करत असताना त्यांना जिथेकुठे मुळात बदल वा दुरुस्ती करावीशी वाटली तिथे ती त्यांनी इंग्रजी अनुवादात केली होती. तो इंग्रजी अनुवाद गांधीजींनी स्वतः पाहिला होता. त्या अनुवादात करण्यात आलेले बदल या अनुवादातही कायम ठेवण्यात आले आहेत.

या इतिहासातील विशेष महत्त्वाच्या तारखा अखेरीस परिशिष्ट म्हणून दिल्या तर अभ्यासकांना त्याचा उपयोग होईल असे वाटल्याने त्या तारखा परिशिष्ट १ मध्ये दिल्या आहेत.

अजून एका गोष्टीकडे वाचकांचे लक्ष वेधणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटते. स्व. श्री.रावजीभाई मणिभाई पटेल सत्याग्राहाच्या या लढाईतील एक सैनिक होते.त्यांनी त्या वेळच्या आठवणी आपल्या ‘गांधीजीकी साधना’ या पुस्तकात लिहिल्या आहेत. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यातील एका गोष्टीचा उल्लेख केला आहे. या पुस्तकातील ३१७ - १८ पृष्ठावरील घटनेशी तिचा संबंध आहे. पूज्य कस्तुरबा गांधी या लढ्यात कशा सामील झाल्या हे त्यात सांगितले आहे. वर उल्लेखिलेल्या पुस्तकात त्यांनी असे लिहिले आहे -

"या नवीन आवृत्तीत पूज्य बांच्या मृत्यूनंतर एक प्रश्न उपस्थित झाला. त्याबाबतीत स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

"दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या अंतिम लढ्यात बांनी सामील व्हावे म्हणून बापूजूंनी जो प्रयत्न केला त्याचे वर्णन मी 'शुभ आरंभ' या प्रकरणात केले आहे. त्यासंबंधी इथे थोडेसे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. 'दक्षिण आफ्रिकाके सत्याग्रहका इतिहास'मध्ये मात्र बापूजींनी यासंबंधात थोडे वेगळ्या पद्धतीने लिहिले आहे. ते लिहितात, "सत्याग्रहात जेव्हा स्त्रियांना सामील करण्याचा विचार करण्यात आला तेव्हा सर्वात आधी छगनलाल गांधी यांची पत्नी काशीबेन आणि मगनलाल गांधी यांची पत्नी संतोकबेन यांच्याशी मी बोललो व त्याकरिता त्यांना तयार केले. त्यानंतर बा त्यात सामील झाली." परंतु 'गांधीजीकी साधना' या पुस्तकाची प्रकरणे ते पुस्तक प्रकाशित होण्यापूर्वी मी गांधीजींसमोर वाचली. त्या वेळी बापूजींच्या आठवणीतील एका चुकीकडे मी त्यांचे लक्ष वेधले आणि माझेच म्हणणे बरोबर असल्याबद्दल मी त्यांची खात्री पटवली. बापूजीसुद्धा विचारात पडले. बाच्या साक्षीच्याआधारे योग्य तो निर्णय घेता येईल असे त्यांना वाटले. बाला बोलावून आम्हा दोघांचेही म्हणणे बापूजींनी बासमोर मांडले. बा म्हणाल्या "रावजीभाईंचे सगळे म्हणणे बरोबर आहे. हा सगळा घटनाक्रम मला इतका चांगला आठवतो की जणू काय तो कालच घडला असे वाटते." यावर बापू म्हणाले, "मग माझीच चूक झाली. दक्षिण आफ्रिकेचा इतिहास"च्यापुढील आवृत्तीत ही चूक दुरुस्त करावी लागेल."

वाचकांच्या लक्षात येईल की या प्रसंगाविषयिषयी 'गांधीजीकी साधना' नावाच्या पुस्तकातील 'शुभ आरंभ' नावाच्या प्रकरणात मी जे काही लिहिले आहे ते गांधीजींनी 'दक्षिण आफ्रिकेतील इतिहास'मध्ये जे लिहिले त्यापेक्षा वेगळे आहे. श्री रावजीभाईंच्या त्या प्रकरणातील संबंधित भाग या पुस्तकात शेवटी परिशिष्ट २ मध्ये उद्धृत केला आहे. या आधारावर या पुस्तकाच्या नवीन आवृत्तीत दुरुस्ती करण्याचा विचार गांधीजींनी केला होता. परंतु त्यांच्या जिवंतपणी असे करणे शक्य झाले नाही. यामुळे या गोष्टीचा उल्लेख परिशिष्टात करण्यावरच आम्ही स्वतःला सीमीत ठेवले आहे. वाचकांना आमची विनंती आहे की या ग्रंथातील वरील गोष्टीचे वर्णन वाचताना श्री रावजीभाईंनी यासंबंधी परिशिष्ट २ मध्ये केलेले चित्रणही लक्षात घ्यावे.

गांधीजींचे जीवनकार्य आणि सत्याग्रहाच्या शोधाच्या दृष्टीने महत्त्वाचा असणारा हा ग्रंथ हिंदीत प्रकाशित करताना आम्हाला आनंद होतो. आशा आहे की विद्यालये आणि महाविद्यालये तसेच सामान्य वाचक यांच्याकडूनही या ग्रंथाचे स्वागत होईल आणि साहित्यिक दृष्टीनेही या ग्रंथाचे मोल लोकांना कळेल.

१५ जानेवारी १९६८

# प्रास्ताविक

## १

दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींचा सत्याग्रहाचा लढा आठ वर्षे चालला. सत्याग्रह या शब्दाचा शोधही याच लढ्याच्या संदर्भात लागला आणि याच लढ्यात या शब्दाचा प्रयोग करण्यात आला. बऱ्याच काळापासून या लढ्याचा इतिहास स्वतः लिहून काढण्याची माझी इच्छा होती. यातील काही गोष्टी तर केवळ मीच लिहू शकत होतो. कोणती गोष्ट कोणत्या हेतूने करण्यात आली होती हे तर लढ्याचे संचालन करणालाच माहीत असू शकते. आणि राजकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात हा प्रयोग पहिल्यांदाच दक्षिण आफ्रिकेत करण्यात आला होता. यामुळे सत्याग्रहाच्या सिद्धांताच्या विकासाबद्दल लोकांना कळणे आवश्यक आहे असे कोणत्याही काळात मान्य करण्यात येईल.

परंतु या वेळी तर हिंदुस्तानात सत्याग्रहाचे विशाल क्षेत्र चोहोकडे पसरलेले आहे. वीरमगावच्या जकातीच्या लहानशा लढ्यापासून तर हिंदुस्तानात सत्याग्रहाचा अनिवार्य क्रम सुरू झाला आहे. वीरमगावच्या जकातीचे निमित्त होते वढवाण येथील सच्चरित्र परोपकारी शिंपी मोतीलाल. विलायतेतून परतल्यानंतर मी १९१५ साली काठेवाडला (सौराष्ट्र) चाललो होतो. मी रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यात बसलो होतो. वढवाण येथे तो शिंपी माझ्याकडे आपल्या लहानशा तुकडीसह आला. वीरमगावसंबंधी थोडेसे बोलल्यानंतर तो म्हणाला -

"या दु:खावर तुम्ही काही उपाय शोधून काढा. तुम्ही काठेवाडमध्ये जन्म घेतला आहे. इथे तुम्ही तो सार्थकी लावा." त्यांच्या डोळ्यात करार आणि दु:ख दोन्ही होते.

मी विचारले, "तुम्हा लोकांची तुरुंगात जायची तयारी आहे?" लगेच उत्तर मिळाले, "फासावर चढण्याचीसुद्धा आमची तयारी आहे."

मी म्हणालो, "माझ्याकरिता तर तुमचे तुरुंगात जाणे पुरेसे आहे. परंतु लक्षात ठेवा विश्वासघात होऊ देऊ नका."

मी राजकोटला पोहोचलो. तिथे मी यासंबंधी अधिक माहिती मिळवली. शासनाबरोबर पत्रव्यवहार सुरू केला. बगसरा वगैरे ठिकाणी दिलेल्या भाषणातून लोकांना सत्याग्रहाकरिता तयार राहण्याची सूचना केली. सरकारच्या निष्ठावंत गुप्त पोलिसांनी ही माहिती शासनदरबारी पोहोचवली. हे काम करणाऱ्या व्यक्तीने शासनाच्या सेवेबरोबरच राष्ट्रसेवाही केली. अखेरीस लॉर्ड चेम्सफर्ड यांच्याशी माझी चर्चा झाली आणि त्यांनी दिलेले वचन पाळले. इतरांनीही यासबंधात प्रयत्न केले होते हे मला माहीत आहे. परंतु माझी खात्री आहे की यातील सत्याग्रहाची संभावना लक्षात घेतल्यानंतरच शासनाने वीरमगावची जकात रद्द केली होती.

वीरमगावच्या जकातीच्या लढ्यानंतर गिरमिट्या (ॲग्रिमेंट- गिरमिट) मजुरांसंबंधीचा कायदा (इंडियन इमिग्रेशन ॲक्ट) येतो. हा कायदा रद्द व्हावा म्हणून अनेक प्रयत्न करण्यात आले होते. या लढाईसंबंधी चांगलेच मोठे आंदोलन झाले होते. गिरमिट्या मजुरांची प्रथा बंद व्हावी म्हणून मुंबईत सभा झाली होती. ही प्रथा बंद होण्याकरिता तिच्यात ३१ मे १९१७ ही तारीख निश्चित करण्यात आली होती. ही तारीख कशी ठरवण्यात आली याचा इतिहास मी इथे देऊ शकत नाही. गिरमिट्या मजुरांचा कायदा बंद करवण्याकरिता पहिले शिष्टमंडळ महिलांचे गेले होते. त्यात प्रमुख प्रयत्न कोणाचे होते हे सांगणे मात्र आवश्यक आहे. ही खटपट चिरस्मरणीय भगिनी जीजी पिटिट यांनी केली होती. त्या लढ्यातसुद्धा केवळ सत्याग्रहाच्या तयारीनेच विजय मिळाला होता.परंतु या ठिकाणी सार्वजनिक आंदोलन करण्याची गरज निर्माण झाली होती हे या वेळचे अंतर लक्षात ठेवणे आवश्यक आहे. वीरमगावची जकात रद्द करण्यापेक्षा गिरमिट्या मजुरांची प्रथा रद्द करण्याला किती तरी महत्त्व होते. रौलट कायद्यानंतर चुका करण्यात लॉर्ड चेम्सफर्ड यांनी कोणताच कसूर शिल्लक ठेवला नव्हता. असे असतानाही आज मला वाटते की ते एक सुज्ञ आणि समंजस व्हाईसराय होते. नागरी अधिकाऱ्यांच्या पंजातून अखेरीस कोणत्या व्हाईसरायची सुटका होऊ शकली आहे?

तिसरा लढा चंपारणचा होता. त्याचा तपशीलवार इतिहास राजेंद्र बाबूंनी लिहिला आहे. त्याकरिता सत्याग्रह करावा लागला होता. केवळ तयारी पुरेशी ठरली नाही. परंतु विरोधी पक्षाचा स्वार्थ किती तरी मोठा होता. चंपारणच्या लोकांनी त्या वेळी खूप शांतता ठेवली होती ही त्यातील उल्लेखनीय

गोष्ट आहे. सर्व नेत्यांनी मन, वचन आणि कायेने शांतता ठेवली होती याचा मी साक्षीदार आहे. यामुळे चंपारणवरील शतकांचे अरिष्ट सहा महिन्यात दूर झाले.

चौथी लढाई होती अहमदाबादमधील गिरणी मजुरांची. त्याचा इतिहास गुजरातला माहीत नसेल तर अजून कोणाला माहीत असेल? त्या लढ्यात मजुरांनी किती शांतता ठेवली? नेत्यांबद्दल मी बापडा काय सांगू शकतो? तरीही तो विजय मी दोषपूर्ण समजतो कारण मजुरांच्या इभ्रतीकरिता मी त्या वेळी उपवास केला होता. तो गिरणी मालकांवर दडपण आणणारा होता. गिरणीमालकांत आणि माझ्यात स्नेहभाव असल्यामुळे त्या उपवासाचा प्रभाव गिरणीमालकावर न पडणे अशक्य होते. असे असले तरी त्या लढ्यातून मिळालेला धडा स्पष्ट आहे. मजूर शांतपणे आपल्या अटींवर कायम राहिले असते तर त्यांनी मालकांचे मन जिंकले असते. परंतु ते गिरणी मालकांचे मन जिंकू शकले नाही कारण काया, वाचा आणि मनाने ते शांत होते असे म्हणता येऊ शकत नाही. परंतु या लढ्यात निदान ते शरीराने शांत राहिले ही गोष्टसुद्धा फार मोठी गणली जाईल.

पाचवा लढा खेड्याचा होता. सर्व पुढाऱ्यांनी तिथे सत्याचे रक्षण केले असे तर मी म्हणू शकत नाही. शांततेचे रक्षण नक्कीच झाले, परंतु शेतकऱ्यांची शांतता अहमदाबादच्या मजुरांप्रमाणे काही प्रमाणात कायिकच होती. यामुळे लोकांच्या इभ्रतीचे आणि प्रतिष्ठेचे रक्षण झाले. खेडाने शांततेचा धडा पूर्णपणे गिरवला नव्हता. अहमदाबादच्या मजुरांना शांततेचा अर्थ पूर्णपणे कळला नव्हता. यामुळे रौलट कायद्याच्या वेळी लोकांना त्रास सहन करावा वागला. मला हिमालयासारख्या चुकीची कबुली द्यावी लागली आणि उपवासही करावा लागला, तसेच इतरांना उपवास करायला लावावा लागला.

सहावा लढा होता रौलट कायद्याविषयी, त्यात आमच्यामधील दोष बाहेर दिसून पडले, परंतु आमचा मूलाधार खरा होता. आम्ही सर्व दोषांचा स्वीकार केला, त्याकरिता प्रायश्चित्तही घेतले. रौलट कायद्याची अंलबजावणी कधीही होऊ शकली नाही आणि अखेरीस तो कायदा रद्द करण्यात आला. या लढ्याने आम्हाला फार मोठा धडा शिकवला.

सातवी लढाई खलिस्तानची, पंजाबमधील अत्याचाराची आणि स्वराज्याची. हा लढा आजही सुरूच आहे. माझा दृढविश्वास आहे की यात एक जरी सत्याग्रही अखेरपर्यंत टिकाव धरून राहिला तरी आमचा विजय निश्चित आहे.

परंतु आज जी लढाई सुरू आहे ती महाभारतासारखी आहे. इच्छा नसतानाही हिची तयारी कशी झाली हे वर मी क्रमशः सांगितलेच आहे. वीरमगावच्या लढाईनंतरसुद्धा मला अजूनही अनेक लढे द्यावे लागतील याची त्या वेळी मला कल्पना नव्हती. आणि विरमगावच्या लढ्याबद्दलही दक्षिण आफ्रिकेत मला काहीही कल्पना नव्हती. सत्याग्रहाचे वैशिष्ट हेच आहे. तो स्वतःच आपल्याकडे चालत येत असतो. त्याचा शोध घेत आपल्याला कुठे जावे लागत नसते. सत्याग्रहाच्या मूळ सिद्धांतातच हा गुण दडलेला आहे. ज्यात कोणतेच गुपित नाही, ज्यात कोणत्याही प्रकारची चलाखीची गोष्ट नाही आणि ज्यात कोणत्याही प्रकारच्या असत्याला वाव असू शकत नाही असे धर्मयुद्ध आपल्याकडे स्वतःहोऊन चालत येत असतात आणि धर्मीची (धर्मपरायण माणसाची) त्याकरिता नेहमीच तयारी असते. ज्या युद्धाची योजना आधीपासून आखावी लागते ते धर्मयुद्धच नसते. धर्मयुद्धाची योजना करणारा आणि ते चालवणारा ईश्वरच असतो. असे युद्ध ईश्वराच्या नावावरच चालवले जाऊ शकते आणि जेव्हा सत्याग्रहीला कुठूनही आधार मिळण्याची अपेक्षा नसते, तो पूर्णपणे निर्बल होतो आणि त्याच्या चोहोकडे घोर अंधकार पसरतो तेव्हाच ईश्वर त्याच्या मदतीकरिता येतो. निर्बलाला रामच आधार देत असतो.

या सत्याचा अनुभव आम्हाला अजून यायचा आहे. यामुळे दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासाची मदत होईल असे मला वाटते.

वर्तमान लढ्यात आजपर्यंत आपल्याला जे जे अनुभव आले जवळपास त्यासारखेच अनुभव दक्षिण आफ्रिकेत आले असल्याचे वाचकांना दिसून येईल. दक्षिण आफ्रिकेच्या सत्याग्रहाचा इतिहास आपल्याला हेही सांगेल की अजूनपर्यंत निराश होण्यासारखे या लढ्यामध्ये काहीही कारण घडलेले नाही. आपण आपल्या योजनेवर निर्धाराने उभे राहणे एवढीच गोष्ट विजयाकरिता पुरेशी आहे.

ही प्रस्तावना मी जुहूमध्ये लिहितो आहे. या इतिहासाची पहिली तीस प्रकरणे मी येरवडा जेलमध्ये लिहिली होती. मी सांगत होतो आणि भाई इंदुलाल याज्ञिक लिहीत हते. उर्वरित प्रकरणे मी लिहू शकेन अशी आहेत. तुरुंगात आधाराकरिता कोणतेही संदर्भग्रंथ नव्हते. इथेही अशा प्रकारची पुस्तके गोळा करण्याची माझी इच्छा नाही. तपशीलवार इतिहास लिहिण्याकरिता ना तर माझ्याजवळ वेळ आहे आणि ना मला तशी इच्छा आहे आणि ना तसा उत्साह आहे. सध्याच्या आपल्या लढ्यात मदत व्हावी म्हणून सवड असलेल्या एखाद्या साहित्यिकाने दक्षिण आफ्रिकेच्या सत्याग्रहाचा तपशीलवार इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला तर त्याला त्याकरिता मार्गदर्शन व्हावे हा हा इतिहास लिहिण्यामागे माझा उद्देश आहे. मी जरी हे पुस्तक कोणत्याही आधाराशिवाय लिहीत असलो तरी यातील एकसुद्धा अशी घटना नाही की जी बरोबर नाही वा जिच्यात अतिशयोक्ती आहे.

जुहू,

बुधवार, संवत १९८०, फाल्गुन वद्य १३.

२ एप्रिल १९२४

## २

वाचकांना माहीतच आहे की उपवास आणि इतर कारणांमळे दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास मी पुढे लिहू शकलो नव्हतो. 'नवजीवन'च्या या अंकापासून मी परत हा इतिहास लिहिण्याकरिता सुरुवात करतो आहे. कोणत्याही अडथळ्याशिवाय आता मी तो पूर्ण करू शकेन अशी आशा आहे.

या आठवणींनी माझ्या लक्षात येते की आपल्या आजच्या परिस्थितीत अशी एकही गोष्ट नाही की जिचा लहान प्रमाणात मला दक्षिण आफ्रिकेत अनुभव आला नसेल. सत्याग्रहाच्या सुरुवातीला हाच उत्साह, हेच ऐक्य आणि हाच आग्रह मला तिथे पाहायला मिळाला होता. मधल्या काळात हेच नैराश्य, हीच अरुची, आपसातील भांडणे व हेवेदावे आणि मग मुठभर लोकांमध्ये अविचल श्रद्धा, निर्धार, त्याग आणि सहिष्णुतेचे दर्शन होत होते. अशाच प्रकारच्या कल्पनीय वा

अकल्पनीय अडचणी तिथेही आडव्या आल्या होत्या.  हिंदुस्तानातील लढ्याचा शेवटचा काळ अजून यायचा आहे. त्याच्या शेवटच्या काळात मी त्याच परिस्थितीची कल्पना करतो आहे जिचा अनुभव मी दक्षिण आफ्रिकेत घेतला होता. दक्षिण आफ्रिकेतील लढ्याचा भाग आता वाचक परत पाहतील. त्या वेळी न मागता कशी मदत मिळाली, हिंदुस्तानींमध्ये अकस्मात उत्साहाचा कसा संचार झाला आणि अखेरीस त्या लढाईत हिंदुस्तानींचा कसा संपूर्ण विजय झाला हे दाखवण्यात येईल.

माझा दृढविश्वास आहे की जसे दक्षिण आफ्रिकेत घडले होते तसेच इथेही घडेल कारण तपश्चर्येवर, सत्यावर, अहिंसेवर माझी अढळ आणि अविचल श्रद्धा आहे. माझा अक्षरशहः विश्वास आहे की सत्याचे पालन करणाऱ्या माणसासमोर सर्व जगातील संपत्ती येऊन उभी राहते आणि त्याला ईश्वरी साक्षात्कार होतो. अहिंसेच्या जवळपासही वैरभावना उभी राहू शकत नाही हे वचनही मला अक्षरशहः खरे वाटते. जे लोक दुःख सहन करतात त्यांच्याकरिता या जगात असंभव काहीही नसते या सूत्राचा मी उपासक आहे. किती तरी सेवकांमध्ये मला या तिन्ही गोष्टींमध्ये सुमेळ आणि समन्वय झालेला आढळतो. अशी साधना कधीही निष्फळ होऊ शकत नाही असा माझा निरपवाद अनुभव आहे.

परंतु कोणी म्हणू शकेल की दक्षिण आफ्रिकेत मिळालेल्या विजयाचा अर्थ तर इतकाच आहे की तेथील हिंदुस्तानी जिथे होते तिथेच आहेत. हाच दक्षिण आफ्रिकेचा अनुभव आहे असे म्हणणारा अडाणी ठरवला जाईल. दक्षिण आफ्रिकेच्या सत्याग्रहाची लढाई लढली गेली नसती तर आज केवळ दक्षिण आफ्रिकेतूनच नाही तर संपूर्ण ब्रिटिश वसाहतींमधून हिंदुस्तानींचा ठावठिकाणा राहिला नसता आणि आज त्यांची विचारपूस करणाराही कोणी दिसला नसता. परंतु हे उत्तर पुरेसे समाधानकारक मानले जाणार नाही. सत्याग्रह जर केलाच गेला नसता आणि शक्य तोवर समजावून भागवण्यावर समाधान मानून घेण्यात आले असते तर दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्तानींची आज जशी परिस्थिती झालेली दिसते तशी दिसली नसती असा तर्क करता येऊ शकतो. या तर्काला फारसा अर्थ नसला तरी केवळ तर्क आणि अनुमान यांचाच उपयोग होणार असेल तर कोणाचा तर्क बरोबर आणि कोणाचा चूक हे सांगणे कठीण होत असते. अनुमान करण्याचा

प्रत्येकाला अधिकार असतो. परंतु ज्या शस्त्राने एखादी गोष्ट मिळवता येऊ शकते त्याच शस्त्राने तिचे रक्षणही करता येऊ शकते ही अशी गोष्ट आहे की जिचे उत्तर दिले जाऊ शकत शकत नाही.

काबे (लुटारूंनी) अर्जुन लुटियो वही धनुष वही बाण

ज्या अर्जुनाने शंकराला पराभूत केले, ज्याने कौरवांचे पूर्णपणे गर्वहरण केले तो अर्जुन जेव्हा कृष्णाच्या सारथ्यापासून वंचित होतो तेव्हा लुटारूंच्या एका टोळीला आपल्या गांडिवाच्या मदतीने तो हरवू शकला नाही! हीच गोष्ट दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींना लागू होते. अजूनही ते लढा देत आहेत. परंतु ज्या सत्याग्रहाच्या बळावर ते विजयी झाले ते शस्त्र जर त्यांनी गमावले तर अंतिम लढाईत ते पराभूत होतील. सत्याग्रह त्यांचा सारथी होता, आणि तोच सारथी त्यांना लढाईत मदत करू शकतो.

मो. क. गांधी

नवजीवन, ५ जुलै १९२५

# अनुवादकाचे दोन शब्द

दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या इतिहासाच्या अनुवादाचे काम श्री तुलसीदासजी सोमैय्या यांनी माझ्याकडे सोपवले होते. माझ्याकडे हे काम सोपवून श्री सोमैय्याजी आणि नवजीवन प्रकाशन यांनी मला उपकृतच केले. सत्याकरिता, न्यायाकरिता कसे लढायचे याचा वस्तुपाठच या पुस्तकातून मिळतो. न्याय्य हक्काकरिता लढताना कोणती पथ्ये पाळली पाहिजे, सत्याग्रह केव्हा आणि कोणत्या सीमेपर्यंत करता येऊ शकतो, सत्याग्रह करताना घ्यावयाची काळजी याच्या अनुभवाने परिपक्व झालेले ज्ञान यातून मिळते. या विषयावरील एक प्रकारे ही गीताच आहे. गांधीजींची घडण बहुतांशाने इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकेतच झाली होती. त्यातही त्यांच्यातील लढाऊ गांधी आपल्याला दक्षिण आफ्रिकेनेच दिला. ही घडण कशी झाली याचे दर्शनही आपल्याला याच ग्रंथातून होते. यामुळे गांधीजींच्या आत्मकथेइतकेच, किंबहुना काही बाबतीत त्यापेक्षाही अधिक महत्त्व या ग्रंथाला द्यावे लागते. हे पुस्तक अन्यायाविरोधी लढा कसा द्यावा याचे पाठ्यपुस्तकच आहे असे म्हटले तर वावगे होऊ नये. या अनुवादाच्या निमित्ताने या ग्रंथाचा अजून खोलवर अभ्यास करण्याची संधी मला मिळाली. परंतु गांधीजींचे कोणतेही पुस्तक केवळ अभ्यासाकरिता नसते. त्यानुसार वर्तनाची अपेक्षा असते. या बाबतीत माझ्या दुबळेपणाची मला प्रकर्षाने जाणीव होते.

गांधीजींनी प्रस्तावनेत लिहिले आहे की “सवड असलेल्या एखाद्या साहित्यिकाने जर दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा तपशीलवार इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला तर त्याला मदत व्हावी एवढाच हा इतिहास लिहिण्यामागील माझा हेतू आहे.” गांधीजीचे स्वीय सचिव आणि त्यांच्या कार्याला जीवन अर्पण करणारे श्री प्यारेलाल यांनी ‘On the Threshhold of Satyagrah’ आणि ‘Birth of Satyagrah’ या पुस्तकांमधून तो इतिहास लिहिला आहे आणि ‘सत्याग्रहाच्या उंबरठ्यावर’ (प्रकाशित) तसेच ‘जन्म सत्याग्राहाचा’ (अप्रकाशित) या नावाने मला त्यांचाही अनुवाद करण्याचे भाग्य लाभले याचा मला अभिमान वाटतो.

वाचकांनी कृपाकरून या अनुवादाच्या मर्यादा लक्षात घ्याव्या. एका बादलीतील पाणी दुसऱ्या बादलीत टाकण्यासारखे अनुवादाचे काम असते. असे करताना कितीही प्रयत्न केला तरी पहिल्या बादलीत किंचित का होईना पाणी राहूनच जात असते. काही सांडतेसुद्धा. यामुळे कुठे शंका आली तर वाचकांनी मूळ पाहणे हे केव्हाही सुरक्षितपणाचे होईल.

श्री शिरीष कुळकर्णी यांनी लोकव्रत प्रकाशनतर्फे दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह प्रकाशित करण्याची जबाबदारी घेतली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

**ब्रिजमोहन हेडा**

brijmohanheda@gmail.com

सॅन होजे. अमेरिका

# अनुक्रमणिका


प्रकाशकाचे निवेदन

प्रास्ताविक

१. भुगोल

२. इतिहास

३. दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्तानींचे आगमन

४. अडचणींचे सिंहावलोकन १

५. अडचणींचे सिंहावलोकन २

६. हिंदुस्तानींनी काय केले? १

७ हिंदुस्तानींनी काय केले? २

८. हिंदुस्तानींनी काय केले? ३

९. बोअरयुद्ध

१०. युद्धानंतर

११. सौजन्याचा मोबदला - खुनी कायदा

१२. सत्याग्रहाचा जन्म

१३. सत्याग्रह विरुद्ध पॅसिव्ह रेझिस्टन्स (शांततापूर्ण प्रतिकार)

१४, इंग्लंडमध्ये प्रतिनिधीमंडळ

१५. कूटनीती अथवा क्षणिक हर्ष

१६. अहमद महमद काछलिया

१७. पहिली फूट

१८. पहिला सत्याग्रही कैदी

१९. 'इंडियन ओपिनियन'

२०. अटकसत्र

२१. पहिली तडजोड

२२. तडजोडीला विरोध आणि माझ्यावर हल्ला

२३. गोरे सहाय्यक

२४.अजून अंतर्गत अडचणी

**द्वितीय खंड**

१. जनरल स्मट्स यांच्याकडून विश्वासधात (?)

२. लढ्याची पुनरावृत्ती

३. स्वतःहोऊन घेतलेल्या परवान्यांची होळी

४. समाजावर नवीन मुद्दे उपस्थित करण्याचा आरोप

५. सोराबजी शापुरजी अडाजाणिया

६. सेठ दाऊद महम्मद इत्यादींचा लढ्यात प्रवेश

७. हद्दपारी

८. दुसरे प्रतिनिधिमंडळ

९. टॉलस्टॉय फॉर्म - १

१०. टॉलस्टॉय फार्म - २

११. टॉलस्टॉय फार्म - ३

१२. गोखले यांचा दौरा - १

१३. गोखले यांचा दौरा - २

१४. वचनभंग

१५. विवाहाला जेव्हा विवाह म्हणून मान्यता राहत नाही

१६. तुरुंगात स्त्रिया

१७. मजुरांची रीघ

१८. मालकाशी भेट आणि त्यानंतर

१९. ट्रान्सवालमध्ये प्रवेश - १

२०. ट्रान्सवालमध्ये प्रवेश - ३

२१. सर्व लोक तुरुंगात

२२. कसोटी -

२३, शेवटाची सुरुवात

२४. तात्पुरती तडजोड

२५. लढाईचा शेवट

उपसंहार

परिशिष्ट १

परिशिष्ट २

सूची

# दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास

## खंड पहिला

# १. भूगोल

आफ्रिका जगातील मोठ्यातमोठ्या खंडातील एक आहे. हिंदुस्तानही एखाद्या महाखंडासारखा देश मानला जातो. परंतु आफ्रिकेच्या भूभागात हिंदुस्तानसारखे ४-५ देश तयार होऊ शकतात. दक्षिण आफ्रिका आफ्रिकेच्या अगदी दक्षिणेला आहे. दक्षिण आफ्रिकेचा मोठा भाग हिंदमहासागराने वेढलेला असल्यामुळे हिंदुस्तानप्रमाणे आफ्रिकाही एखाद्या द्वीपकल्पाप्रमाणेच आहे. सामान्यपणे असे समजले जाते की आफ्रिकेत जास्तीतजास्त उकडत असते आणि एका दृष्टीने ते खरेही आहे. भूमध्यरेषा आफ्रिकेच्या मधून जाते. आणि त्या रेषेच्या आजूबाजूच्या देशात जो उकाडा असतो त्याची कल्पनाही हिंदुस्तानातील लोक करू शकत नाही. हिंदुस्तानच्या अगदी दक्षिणेकडील भागात ज्या उकाड्याचा अनुभव आपल्याला येतो त्याने आपल्याला भूमध्यरेषेच्या प्रदेशातील उकाड्याची थोडीशी कल्पना येऊ शकते. परंतु दक्षिण आफ्रिकेत असे काही नाही कारण तो प्रदेश भूमध्येरेषेपासून फार दूर आहे. यामुळे तेथील बहुतेक प्रदेशातील हवामान इतके सुंदर आणि समशितोष्ण आहे की तिथे युरोपमधील जमाती आरामात वसू शकतात. उलट हिंदुस्तानात वसणे त्यांच्याकरिता जवळपास अशक्य आहे. शिवाय दक्षिण आफ्रिकेत तिबेट आणि काश्मीरसारखे उंच प्रदेश जरी असले तरी ते काश्मीरप्रमाणे १० ते १४ हजार फूट उंच नाहीत. यामुळे तेथील हवामान कोरडे आणि सहन करता येण्याइतके थंड असते. यामुळे दक्षिण आफ्रिकेतील काही भाग क्षयरोग्यांकरिता अतिशय आरोग्यदायी मानला जातो. अशा भागातील एक भाग आफ्रिकेतील सुवर्णनगरी जोहानिसबर्ग आहे. भूमीच्या ज्या भागावर जोहानिसबर्ग वसला आहे तो आजपासून पन्नास वर्षांपूर्वी विराण आणि वाळलेल्या गवताने भरलेला ओसाड प्रदेश होता. परंतु जेव्हा तिथे सोन्याच्या खाणींचा शोध लागला तेव्हा जणू काय जादूच्या प्रभावाने भराभर घरे बांधली जाऊ लागली आणि आज तिथे मोठमोठ्या विशाल इमारती उभ्या राहिलेल्या आहेत. तेथील श्रीमंत लोकांनी स्वतःचे पैसे खर्च करून दक्षिण आफ्रिकेच्या सुपीक भागातून आणि युरोपमधून एकेक झाड पंधरा पंधरा रुपये देऊन मागवले आणि इथे

लावले. मागील इतिहास माहीत नसणारंना असेच वाटेल की ही झाडे इथे प्राचीन काळापासून आहेत.

इथे दक्षिण आफ्रिकेतील सर्व भागांचे वर्णन करण्याची माझी इच्छा नाही. ज्या भागांशी आपला संबंध आहे त्याच भागाचे थोडे वर्णन करण्याची माझी इच्छा आहे. दक्षिण आफ्रिकेत दोन सत्ता आहेत - (१) ब्रिटिश (२) पोर्चुगीज. पोर्चुगीज भागाला 'डेलागोआ बे' असे म्हणतात.हिंदुस्तानातून जाणाऱ्या जहाजांना दक्षिँण आफ्रिकेतील लागणारे हे पहिले बंदर आहे. तेथून दक्षिणेकडे पुढे गेलो तर पहिली ब्रिटिश वसाहत नाताल लागते. त्याच्या बंदराला 'पोर्ट नाताल' असे म्हणतात. परंतु आपण त्याला डरबन म्हणून ओळखतो. आणि दक्षिण आफ्रिकेतही सामान्यपणे त्याला डरबन म्हणूनच ओळखतात. नातालमधील ते सर्वात मोठे शहर आहे. पिटर मारिट्झबर्ग नातालची राजधानी आहे. ते डरबनपासून ६० मैल आतल्या भागात समुद्रसपाटीपासून २,००० फुटांवर वसलेले आहे. डरबनचे हवामान काही प्रमाणात मुंबईच्या हवामानासारखे समजले जाईल. तेथील हवामानात मुंबईपेक्षा जास्त गारवा आहे. नाताल सोडून थोडे पुढे गेलो तर ट्रान्सवाल लागते. टान्सवालची भूमी जगातील कोणत्याही भागापेक्षा जास्त सोने देते. काहीच वर्षांपूर्वी त्यातून जगातील सर्वात मोठा हिरा निघाला. या सर्वात मोठ्या हिऱ्याचे नाव खाण मालक क्विनन यांच्या नावावरून ठेवण्यात आले आहे. या हिऱ्याचे वजन ३,००० कॅरट म्हणजे एक पूर्णांक एकतृतियांश एवोर्डुपईज पौंड आहे. उलट कोहिनूर हिऱ्याचे वजन १०० कॅरट आणि रशियातील राजमुकुटातील 'ऑलेफ' या हिऱ्याचे वजन २०० कॅरट आहे.

जोहानिसबर्ग जरी सुवर्णपुरी असले आणि त्याच्याजवळ हिऱ्याच्या खाणी असल्या तरी ते टान्सवालची राजधानी नाही. ट्रान्सवालची राजधानी प्रिटोरिया आहे. ते जोहानिसबर्गपासून ३६ मैल अंतरावर आहे. तिथे बहुतांश शासक आणि राजकीय लोकांशी संबंधित लोकच राहत असतात. यामुळे प्रिटोरिया येथील वातावरण शांतच असते असे म्हणता येईल. उलट जोहानिसबर्गचे वातावरण अतिशय अशांत समजले जाईल. ज्याप्रमाणे हिंदुस्तानातील एखाद्या खेड्यातून वा लहानशा शहरातून एखादा माणूस धावपळ, घाईगडबड आणि अशांतता यांनी

भरलेल्या मुंबईच्या वातावरणात गेला तर त्याचा जीव जसा घाबरेल तशीच अवस्था प्रिटोरियाचा माणूस जर जोहानिसबर्ग येथे गेला तर त्याची होईल. जोहानिसबर्ग येथील नागरिक चालत नसतात तर जणू काय धावत असतात असे म्हटले तर फारशी अतिशयोक्ती होणार नाही. कोणाजवळ कोणाकडे जायला वेळच नसतो. कमीतकमी वेळात जास्तीतजास्त संपत्ती कशी मिळवता येईल यातच सर्व मग्न असतात! ट्रान्सवाल सोडून आपण अधिक आतल्या पश्चिमेकडील भागात गेलो तर ऑरेंज फ्री स्टेट किंवा ऑरेंजियाचे राज्य लागते. त्याच्या राजधानीचे नाव ब्लूमफौन्टन आहे. ते अतिशय शांत आणि लहानसे शहर आहे. ऑरेंजियात ट्रान्सवालप्रमाणे सोन्याच्या आणि हिऱ्याच्या खाणी नाहीत. त्या राज्यात आपण रेल्वेने काही तास प्रवास केला तर आपण केप कॉलनीच्या सीमेवर पोहोचतो. केप कॉलनी दक्षिण आफ्रिकेतील सगळ्यात मोठे राज्य आहे. त्याच्या राजधानीला केप टाऊन म्हणतात. ते केप कॉलनीतील सगळ्यात मोठे बंदर आहे. ते केप ऑफ गुड होप या भूशिरावर स्थित आहे. पोचुगालचा राजा जॉन याने त्याचे हे नाव ठेवले होते, कारण वास्को डी गामाने त्याचा शोध लावल्यानंतर आपल्या प्रजेला हिंदुस्तानात पोहोचण्याचा नवीन आणि सोपा मार्ग सापडू शकेल अशी आशा त्या राजाला वाटत होती. त्या काळात समुद्री मोहिमेचे अंतिम ध्येय हिंदुस्तान गणले जात असे.

या चार प्रमुख ब्रिटिश वसाहतींशिवाय ब्रिटिशांच्या 'संरक्षणात' असे काही प्रदेश आहेत की जिथे युरोपीय लोकांच्या आगमनापूर्वी दक्षिण आफ्रिकेतील मूळ निवासी राहत होते.

दक्षिण आफ्रिकेचा मुख्य उद्योग शेतीच समजला जाईल. शेतीकरिता तो देश उत्तम आहे. त्याचे काही भाग तर अतिशय सुपीक आणि सुंदर आहेत. धान्यामध्ये अधिकाधिक आणि सहजपणे पिकणारे धान्य मका आहे. आणि दक्षिण आफ्रिकेतील मूळ हबशी लोकांचे मुख्य अन्न मकाच आहे. काही भागात गहूही पिकतो. फळांकरिता तर दक्षिण आफ्रिका फार प्रसिद्ध आहे. नातालमध्ये अनेक जातीची अतिशय सुंदर व सरस केळी, पपया, अननस पिकतात व या फळांचे पीकही इतक्या भरपूर प्रमाणात येते की गरीबात गरीब माणसाला ती मिळू शकतात. नाताल आणि इतर वसाहतींमध्ये नारिंगी, संत्री, पीच, आणि जरदाळू इतक्या भरपूर प्रमाणात पिकतात

की हजारो लोकांना थोड्याश्या मेहनतीवर गावांमध्ये ही फळे मिळू शकतात. केप कॉलनी तर द्राक्षे आणि प्लम (मोठ्या बोरासारखे एक फळ) यांचीच भूमी आहे. तिथल्यासारखी रसाळ द्राक्षे इतरत्र क्वचितच मिळतील. हंगामात त्यांची किंमत इतकी कमी असते की गरीब माणूसही ती पोटभर द्राक्षे खाऊ शकतो. आणि जिथे हिंदुस्तानींची वस्ती असेल तिथे आंब्याची झाडे नसतील असे होणे तर शक्यच नाही. हिंदुस्तानींनी दक्षिण आफ्रिकेत आंब्याची झाडे लावली. परिणामी आज दक्षिण आफ्रिकेत आंबे खायला मिळू शकतात. त्याच्या काही जाती नक्कीच मुंबईच्या हापूस, पायरी सारख्या जातींशी स्पर्धा करू शकतात. त्या सुपीक जमिनीत भाजीपालाही भरपूर होतो आणि असेही म्हणता येईल की रसिक हिंदुस्तानींनी तिथे सर्व प्रकारच्या भाज्या निर्माण केल्या आहेत.

गुरेढोरेसुद्धा तिथे मोठ्या प्रमाणात आहेत. तिथले गायीबैल हिंदुस्तानातील गायीबैलांपेक्षा अधिक भरदार आणि ताकदवान आहेत. गोरक्षणाचा दावा करणाऱ्या हिंदुस्तानात हिंदुस्तानींप्रमाणेच असंख्य गायीबैलांना दुर्बल आणि अशक्त पाहून मी लज्जित झालो आणि माझे अंतःकरण आक्रंदन करू लागले. डोळे उघडे ठेवून दक्षिण आफ्रिकेत मी चोहोकडे हिंडलो आहे आणि तिथे कधी दुर्बल गायीबैल पाहिल्याचे मला आठवत नाही असे म्हणता येेईल..

निसर्गाने या भूमीला किती तरी देणग्या दिल्या आहेत. त्याचप्रमाणे या भूमीला सृष्टीसौंदर्याने सुशोभित करण्याकरिता त्याने कोणताही कसूर ठेवलेला नाही. डरबनचे दृश्य फार सुंदर गणले जाते. परंतु केप कॉलनी त्यापेक्षा किती तरी सुंदर आहे. केप टाऊन ना तर अधिक उंच आणि ना अतिशय खाली अशा टेबल मौन्टन नावाच्या डोगराच्या तळाशी वसलेले आहे. दक्षिण आफ्रिकेची पूजा करणारी एक विदुषी महिला या डोंगराविषयी आपल्या कवितेत लिहिते की ज्या अलौकिकतेचा अनुभव मला टेबल मौन्टनवर आला तसा कोणत्याच पर्वतावर मला आलेला नाही. या चित्रणात अतिशयोक्ती असू शकते, तशी ती आहे हेही मला मान्य आहे. परंतु या विदुषी महिलेची एक गोष्ट मला पटली. ती म्हणते की टेबल मौन्टन केप टाऊनच्या मित्रासारखे काम करते. फार उंच नसल्यामुळे तो डोंगर भयंकर वाटत नाही. लोकांना दुरूनच त्याची पूजा

करावी लागत नाही, उलटपक्षी पर्वतावर घर बांधून ते तिथे राहू शकतात. आणि अगदी समुद्रकिनाऱ्यावर असल्याने समुद्र आपल्या स्वच्छ पाण्याने त्याची पादपूजा करत असतो आणि त्याचे चरणामृत पीत असतो. लहान मुले, म्हातारे, स्त्रिया आणि पुरुष हे सर्व न घाबरता त्या डोंगरदऱ्यांमध्ये हिंडू शकतात आणि हजारो नागरिकांच्या आवाजाचा त्या डोंगरामध्ये गुंजारव सुरू असतो. विशाल वृक्ष आणि सुगंधित रंगीबेरंगी फुले संपूर्ण पर्वताला इतके काही सुशोभित करत असतात, असा काही त्याचा शृंगार करत असतात की त्याचे ते सौंदर्य आणि तो श्रृंगार पाहत हिंडत असताना कधी तृप्तीच होत नाही.

दक्षिण आफ्रिकेत इतक्या मोठ्या नद्या नाहीत की ज्यांची तुलना गंगायमुनेबरोबर करता येईल. ज्या काही नद्या तिथे आहेत त्या आपल्याकडील नद्यांच्या तुलनेत लहान आहेत. त्या देशात अनेक ठिकाणी नद्यांचे पाणी पोहोचतच नाही. उंच प्रदेशात कालव्यांच्या आधारानेसुद्धा पाणी कसे पोहोचवता येऊ शकेल? आणि जिथे सागरासारख्या विशाल नद्या नसतील तिथे कालवेसुद्धा कसे असू शकतील? दक्षिण आफ्रिकेत जिथे जिथे नैसर्गिक पाण्याचे दुर्भिक्ष आहे तिथे तिथे खोल विहिरी खोदतात आणि त्यातून शेतीला पाणी देता येईल इतके पाणी पवनचक्क्या आणि वाफेचे एंजिन यांच्याद्वारे ओढून घेतले जाते. शेतीला तिथे शासनाकडून भरपूर मदत मिळते. शेतकऱ्याला सल्ला देण्याकरिता व त्याचे मार्गदर्शन करण्याकरिता सरकार आपल्या कृषिशास्त्रज्ञांना त्यांच्याजवळ पाठवते. अनेक ठिकाणी सरकार शेतकऱ्यांच्या हिताकरिता शेतीवर अनेक प्रयोग करते, नमुनेदार फार्म चालवते. शेतकऱ्यांना चांगली गुरेढोरे आणि चांगले बीबियाणे देते. अशाच प्रकारे शेतीभोवती लोखंडी तारेचे कुंपण घालण्याकरिताही सरकार शेतकऱ्यांना मदत करते. दक्षिण आफ्रिका भूमध्य रेषेच्या दक्षिणेला आहे आणि हिंदुस्तान त्या रेषेच्या उत्तरेला आहे. यामुळे तेथील वातावरणाचा क्रम हिंदुस्तानच्या उलट आहे. तेथील ऋतूसुद्धा हिंदुस्तानच्या उलट असतात. उदाहरणार्थ आपल्याकडे जेव्हा हिवाळा असतो तेव्हा तिथे उन्हाळा असतो. पावसाचा तिथे काही निश्चित नियम आहे असे म्हणता येऊ शकत नाही. कोणत्याही वेळी तिथे पाऊस येऊ शकतो. तिथे सामान्यपणे वीस इंचांपेक्षा जास्त पाऊस होत नाही.

# २. इतिहास

आफ्रिकेच्या भूगोलावर दृष्टी टाकत असताना पहिल्या प्रकरणात आम्ही ज्या भौगोलिक विभागांची चर्चा केली ते प्राचीन काळापासून चालत आले आहेत असा समज वाचकांनी करून घेऊ नये. अत्यंत प्राचीन काळात दक्षिण आफ्रिकेत कोणते लोक राहत असतील हे निश्चितपणे सांगता येत नाही. युरोपातील लोक ज्या वेळी दक्षिण आफ्रिकेत येऊन वसले त्यावेळी तिथे हबशी राहत होते. असा समज आहे की अमेरिकेत ज्या वेळी गुलामगिरीच्या अत्याचाराचा जोर होता त्या वेळी काही हबशी पळून आले आणि दक्षिण आफ्रिकेत वसले. हे लोक झुलू, स्वाजो, बसूटो, बेकवाना इत्यादी वेगवेगळ्या जातीच्या नावांनी ओळखले जातात.

त्यांच्या भाषाही वेगवेगळ्या आहेत. हे हबशीच दक्षिण आफ्रिकेचे मूळ निवासी मानले जातात. परंतु दक्षिण आफ्रिका इतका मोठा देश आहे की आज तिथे हबशी लोकांची जी संख्या आहे त्याच्या २० किंवा ३० पट लोक तिथे सहजपणे सामावले जाऊ शकतात. डरबनहून केप टाऊनला रेल्वेने जाण्याकरिता जवळपास १८०० मैल प्रवास करावा लागतो. समुद्राच्या मार्गानेसुद्धा या दोन शहरांमधील अंतर १,००० मैलांपेक्षा कमी नाही. पहिल्या प्रकरणात सांगितलेल्या वसाहतींचे एकूण क्षेत्रफळ ४,७३,००० वर्गमैल आहे.

या विशाल भूभागात १९१४ साली हबशी लोकांची संख्या सुमारे ५० लाख होती. हबशींमधील झुलू जातीचे लोक सर्वात जास्त धिप्पाड आणि सुंदर आहेत असे म्हणता येईल. सुंदर या विशेषणाचा मी जाणूनबुजून उपयोग केला आहे. गोरी कातडी आणि धारदार नाक हे सौंदर्याचे लक्षण आहे असे आपण समजतो. हा अंधविश्वास जर आपण थोडा वेळ दूर ठेवला तर झुलूंना घडवण्यात ब्रह्मदेवाने काही कसर ठेवली आहे असे आपल्याला वाटणार नाही. स्त्रिया आणि पुरुष दोघेही उंचपुरे आणि उंचीच्या प्रमाणात रुंद छातीचे आहेत. त्यांच्या संपूर्ण शरीराचे स्नायू बांधेसूद आणि फार बळकट असतात. त्यांच्या पोटऱ्या आणि बाहू नेहमी मांसल आणि गोलाकार असलेले दिसतात. कोणतीही स्त्री अथवा पुरुष वाकून वा कुबड काढून चालताना क्वचितच दिसेल. त्यांचे ओठ नक्कीच मोठे आणि जाड असतात. परंतु ते संपूर्ण शरीराच्या प्रमाणात असतात. यामुळे मी

तर म्हणेन की ते किंचितही बेडौल वाटत नाहीत. त्यांचे डोळे गोल आणि तेजस्वी आहेत. नाक चापट आणि मोठ्या चेहऱ्याला शोभून दिसेल इतके मोठे असते. आणि त्यांच्या डोक्यावरील कुरळे केस त्यांच्या शिसमसारख्या काळ्या आणि चमकदार कातडीवर अजूनच शोभून दिसतात. आपण जर एखाद्या झुलूला विचारले की दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या जमातींमध्ये सर्वात सुंदर जमात कोणती आहे तर तो निश्चितच आपल्या जमातीकरिता तो दावा करील, आणि त्याचा हा दावा मला किंचितही चुकीचा वाटणार नाही. आज युरोपमध्ये सॅन्डोसारखे मल्ल आपल्या शिष्यांच्या भुजा, हात, इत्यादी अवयवांच्या विकासाकरिता जो प्रयत्न करतात तसा कोणताच प्रयत्न न करता निसर्गतःच या जातीचे अवयव मजबूत आणि सुडौल दिसतात. भूमध्यरेषेजवळ राहणारांची कातडी काळी असणे हा जणू निसर्गनियमच आहे, आणि निसर्ग जे काही घडवतो ते सुंदरच असले पाहिजे असे जर आपण मान्य करू तर सौंदर्याबद्दलच्या आपल्या संकुचित आणि एकपक्षी विचारांपासून आपल्याला मुक्ती मिळेल. एवढेच नाही तर हिंदुस्तानात आपली कातडी थोडीशी काळी असल्यामुळे आपल्याला जी लाज वा घृणा वाटते तिच्यापासूनसुद्धा आपण मुक्त होऊ.

हे हबशी गवत, मातीपासून बनवलेल्या कुब्यात (झोपडीत) राहतात. प्रत्येक कुब्याला एकच गोल भिंत असते. तिच्यावर गवताचे छप्पर असते. कुब्याच्या आत जो खांब असतो त्याचा या छपराला आधार दिलेला असतो. कुब्याला एक ठेंगणे दार असते. वाकूनच त्यातून आत शिरता येते. याच दारातून कुब्यात हवा येत असते. या  दाराला क्वचितच पल्ले असतात. आपल्याप्रमाणेच ते लोक कुब्याच्या भिंती आणि अंगण माती व घोड्याच्या लिदीने वा शेणाने सारवतात. असे म्हणतात की या लोकांना कोणतीही चौकोनी वस्तु बनवता येत नाही. त्यांनी आपल्या डोळ्यांना केवळ गोल वस्तूच पाहण्याकरिता आणि बनवण्याकरिता शिकवले आहे. निसर्ग भूमितीतील सरळ रेषा आणि सरळ आकृती बनवत नसतो. आणि निसर्गाच्या या निरागस मुलांचे ज्ञान निसर्ग व त्याचा अनुभव यांच्यावरच आधारित आहे.

मातीच्या या महालाला अनुसरूनच त्यांचे सामानसुमान असते. युरोपीय संस्कृतीने दक्षिण आफ्रिकेत प्रवेश करण्यापूर्वी तेथील हबशी लोक अंथरूणपांघरूण आणि कपडेलत्ते यांच्याकरिता

चामड्याचा उपयोग करत असत. खुर्ची, टेबल, पेटी वगैरे वस्तू ठेवण्याकरिता त्या महालात जागाही नसायची. आणि आजही या वस्तू त्या महालात ठेवण्याकरिता नसतात असे बऱ्याच प्रमाणात म्हणता येऊ शकते. आता त्यांनी आपल्या घरात कांबळ्यांचा उपयोग सुरू केला आहे. ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेपूर्वी हबशी स्त्रीपुरुष बऱ्याच प्रमाणात नग्नावस्थेतच फिरत असत. आजही गावांमध्ये पुष्कळसे लोक याच अवस्थेत राहतात. ते आपली गुप्तांगे एका चामड्याने झाकतात. काही लोक तर असेसुद्धा करत नाहीत. परंतु वाचकांनी याचा अर्थ असा करू नये की ते आपल्या इंद्रियांना नियंत्रणात ठेवू शकत नाहीत. फार मोठा समुदाय एखाद्या प्रथेनुसार जेव्हा चालतो तेव्हा दुसऱ्या समाजाला त्या प्रथा जरी अनुचित वाटत असल्या तरी पहिल्या समुदायाच्या दृष्टीने त्या प्रथा निर्दोष असणे अशक्य नाही. या हबशी लोकांना एकमेकांकडे पाहत बसायला वेळच नसतो. शुकदेव जेव्हा नग्नावस्थेत आंघोळ करणाऱ्या स्त्रियांमधून गेले तेव्हा ना त्यांच्या मनात कोणता विकार निर्माण झाला आणि ना त्या निर्व्याज स्त्रियांच्या मनात कोणत्याही प्रकारचा क्षोभ निर्माण झाला आणि ना त्यांना लाजल्यासारखे वाटले असे भागवतकार सांगतात. आणि या वर्णनात मला काही अशक्यप्राय वाटत नाही. हिंदुस्तानात आज अशा प्रसंगी कोणताही माणूस इतक्या निरागसपणे आणि निर्विकारपणे असा अनुभव घेऊ शकत नाही. ही गोष्ट मानवजातीच्या प्रयत्नाची मर्यादा सांगत नाही तर आपल्या स्वतःच्या दुर्दैवाचे आणि पतनाचे दर्शन घडवते. आपण ज्या हबशींना जंगली समजतो ते आपल्या अहंकारामुळे. वास्तवात आपण समजतो तसे ते जंगली नाहीत..हे हबशी जेव्हा शहरात येतात तेव्हा त्यांच्या स्त्रियांकरिता गुडघ्यापासून तर छातीपर्यंतचा भाग झाकणे अनिवार्य आहे असा कायदा करण्यात आला आहे. या नियमामुळे इच्छा नसतानाही त्या स्त्रियांना अशा प्रकारचे कपडे आपल्या शरीराभोवती गुंडाळावे लागतात. यामुळे दक्षिण आफ्रिकेत या मापाच्या कपड्यांचा खूप खप होतो आणि दरवर्षी लाखो चादरी आणि कांबळी युरोपमधून आयात होतात. पुरुषांकरिता कमरेपासून गुडघ्यापर्यंतचा भाग झाकणे अनिवार्य आहे. यामुळे तर युरोपियनांचे उतरलेले कपडे घालण्याची प्रथा त्यांच्यात पडली. जे लोक असे करत नाहीत ते नाडी असलेल्या चड्ड्या घालतात. हे सर्व युरोपमधून तिथे आयात होते.

या हबशी लोकांचा मुख्य आहार मका आहे. मिळाले तर ते मांसही खातात. सुदैवाने त्यांना मसाल्यांची आणि तिखटाची अगदीच ओळख नाही. त्यांच्या अन्नात मसाले घातले वा त्या अन्नाला हळदीचा थोडा जरी रंग आला तरी त्यांच्या कपाळावर आठ्या पडतील. आणि ज्या लोकांना पूर्णपणे जंगली समजले जाते ते तर अशा अन्नाला स्पर्शही करणार नाही. मक्याचे दाणे जसेच्या तसे उकळून, त्यात थोडेसे मीठ घालून एका वेळी एक पौंड मका खाणे कोणत्याही सामान्य झुलूकरिता नवलाची गोष्ट समजली जात नाही. मक्याचे पीठ दळून व त्याची लापशी करून ती खाणे या लोकांना आवडते. जेव्हा केव्हा मास मिळते तेव्हा ते कच्चे वा शिजवून - उकडून वा विस्तवावर भाजून केवळ मिठाबरोबर खातात. कोणत्याही प्राण्याचे मास खाण्यात त्यांना वावगे वाटत नाही.

त्यांच्या भाषांची नावे जमातीवरच असतात. लिहिण्याची कला त्यांना गोऱ्यांनीच शिकवली आहे. हबशी वर्णमालेसारखी कोणतीही गोष्ट नाही. आता बायबलसारखी पुस्तके रोमन लिपीत छापली गेली आहेत. झुलू भाषा अतिशय मधुर आणि गोड आहे. तिचे बहुतेक शब्द 'आ'कारांत आहेत. यामुळे भाषेचा नाद कानांना गोड आणि हळूवार वाटतो. त्यांच्या शब्दांमध्ये अर्थ आणि काव्य दोन्ही असतात असे मी ऐकले आणि वाचले आहे. ज्या थोड्याश्या शब्दांचे मला सहजगत्या ज्ञान झाले त्यावरून माझे हे भाषाविषयक मत योग्य आहे असे मला वाटते. ज्या शहरांची आणि वसाहतींची मी नावे दिली आहेत त्या सर्वांची काव्यमय आणि गोड हबशी नावेही आहेत. ही नावे आठवत नसल्यामुळे ती मी इथे देऊ शकलो नाही.

ख्रिश्चन धर्मगुरुंच्या मताप्रमाणे हबशी लोकांचा कोणताच धर्म नव्हता आणि आजही नाही. परंतु आपण जर धर्माचा विशाल आणि व्यापक अर्थ घेतला तर हबशी अशा अलौकिक शक्तीला मानतात आणि तिची पूजा करतात की जी त्यांना कळत नाही. या शक्तीला ते घाबरतातही. शरीराच्या नाशाबरोबर माणसाचा पूर्णपणे नाश होत नाही याचेही त्यांना भान आहे. नीती हाच धर्माचा आधार आहे असे जर आपण समजत असू तर हबशी लोकांचा नैतिकतेवर विश्वास असल्यामुळे त्यांना धार्मिक म्हणता येऊ शकते. खऱ्या आणि खोट्याची त्यांना पूर्ण कल्पना आहे.

आपल्या स्वाभाविक स्थितीत ते लोक सत्याचे जितके पालन करतात तितके गोरे आणि/वा आपण करतो की नाही याबद्दल शंकाच आहे. त्यांच्यात मंदिर वा मंदिरासारखे स्थान नसते. इतर जमातींप्रमाणे त्यांच्यातही अंधविश्वास असल्याचे आढळते.

वाचकांना हे कळले तर आश्चर्य वाटेल की कोणत्याही शारीरिक शक्तीच्या बाबतीत जगातील कोणत्याही जमातीपेक्षा उणी न पडणारी ही जमात इतकी भित्री आहे की गोरे मूल जरी दिसले तरी ती त्याला घाबरते. एखाद्या माणसाने हबशीवर जर पिस्तुल रोखले तर एक तर तो तिथून पळून जाईल वा तो इतका गर्भगळित होऊन जाईल की त्याच्याकडून कोणतीही हालचाल होणार नाही. याचे कारण तर आहेच. मूठभर गोरे येऊन इतक्या मोठ्या जंगली जमातीला ताब्यात ठेवू शकतात ही नक्कीच काही तरी जादू असली पाहिजे असे त्यांच्या मनात ठसले आहे. या लोकांना भाल्यांचा आणि तीरकामठ्यांचा उपयोग करणे चांगले माहीत होते. परंतु ही शस्त्रे त्यांच्यापासून हिसकावून घेण्यात आली आहेत आणि बंदूक मात्र ना त्यांनी कधी पाहिली होती आणि ना चालवली होती. ज्या बंदुकीला कधी आगपेटीची काडीही लावावी लागत नाही, हाताचे बोट हलवण्याशिवाय इतर कोणतीही हालचाल करावी लागत नाही त्या बंदुकीतून जाळ कसा निघतो आणि जाळ कसा लागतो हेच त्यांना कळत नाही. यामुळे बंदूक चालवणाऱ्या माणसाला हबशी नेहमी घाबरत असतो. बंदुकीच्या या गोळ्यांनी अनेक निर्दोष आणि निराधार हबशी लोकांचे बळी घेतले असल्याचे त्यांनी आणि त्यांच्या आईवडिलांनी अनुभवले आहे. परंतु त्यांच्यापैकी अनेकांना आजसुद्धा याचे कारण माहीत नाही.

या जमातीत हळूहळू 'संस्कृती'चा प्रवेश होऊ लागला आहे. एकीकडे चांगले ख्रिश्चन धर्मगुरू आपल्या बुद्धीप्रमाणे आणि समजाप्रमाणे येशूचा संदेश या लोकांपर्यंत पोहोचवत आहेत. ते हबशी लोकांकरिता शाळा उघडतात आणि त्यांना सामान्य अक्षरज्ञान देतात. त्यांच्या प्रयत्नांमुळे काही चारित्र्यसंपन्न हबशीही निर्माण झाले आहेत परंतु अक्षरज्ञानाच्या अभावामुळे आणि संस्कृतीची ओळख नसल्यामुळे आजपर्यंत जे बहुतेक हबशी अनेक प्रकारच्या अनीतीपासून मुक्त होते ते आज ढोंगी आणि पाखंडी झाले आहेत. संस्कृतीच्या संपर्कात आलेल्या हबशींमधून क्वचितच

कोणी मद्यपानाच्या व्यसनापासून सुटला असेल. आणि त्याच्या ताकदवान शरीरात जेव्हा दारूचा प्रवेश होतो तेव्हा त्याला वेड लागल्यासारखे होते व करू नये ते तो करतो. दोन आणि दोन मिळून ज्याप्रमाणे चार होतात त्याचप्रमाणे सांस्कृतिक वाढीबरोबर गरजांची वाढही अपरिहार्य असते. हबशींच्या गरजा वाढवण्याकरिता म्हणा किंवा त्यांना श्रमाचे मूल्य शिकवण्याकरिता म्हणा त्यांच्यावर दरडोई कर (पोल टॅक्स) आणि कुबाकर (झोपडी कर) लावण्यात आला नसता तर शेतांवर राहणारी ही जमात पृथ्वीच्या गर्भातील सोने आणि हिरे काढण्याकरिता कधीही जमिनीत खोलवर उतरली नसती आणि ते सोने आणि हिरे जमिनीच्या गर्भातच पडून राहिले असते. तसेच हा कर लावला गेला नसता तर युरोपियांना दक्षिण आफ्रिकेत नोकर मिळणे कठीण गेले असते. परिणामी खाणींमध्ये काम करणाऱ्या हबशी लोकांना अन्य रोगांबरोबर क्षयरोगसुद्धा होतो. त्याला 'माईनर्स थायसिस' म्हणतात. हा रोग जीवघेणा असतो. त्याच्या पंजात सापडलेल्या माणसाची क्वचितच सुटका होते. असे हजारो हबशी आपल्या मुलाबाळांपासून दूर राहिले तर ते किती संयम पाळू शकतील याची कल्पना वाचक सहजपणे करू शकलील. यामुळे उपदंशासारखे जे रोग पसरतात त्यांनाही हे लोक बळी पडतात. दक्षिण आफ्रिकेतील विचारशील गोरेही या गंभीर प्रश्नाचा विचार करू लागले आहेत. एकूण पाहता या समाजावर संस्कृतीचा चांगला प्रभाव पडला आहे असा दावा क्वचितच करता येईल असे हे गोरेही मान्य करू लागले आहेत. उलटपक्षी या जमातीवर पडलेला कुप्रभाव कोणालाही दिसू शकेल.

अशी जमात राहत असलेल्या या देशात आजपासून जवळपास ४०० वर्षांपूर्वी डच लोकांनी आपली छावणी टाकली. हे लोक गुलाम तर बाळगतच असत. आपल्या मलायी गुलामांना घेऊन जावा वसाहतीतून काही डच लोक दक्षिण आफ्रिकेच्या या भागातही म्हणजे केप कॉलनीत पोहोचले. हे मलायी लोक मुसलमान आहेत. त्यांच्यात जसे डच लोकांचे रक्त आहे तसेच ड़चांचे काही गुणही आहेत. ते संपूर्ण दक्षिण आफ्रिकेत वेगवेगळ्या ठिकाणी पसरलेले दिसतात. परंतु त्यांचे मुख्य केंद्र केप कॉलनीच समजली जाईल. आज त्यांच्यातील काही मलायी गोऱ्यांची नोकरी करतात तर दुसरे काही स्वतंत्र व्यवसाय करतात. मलायी स्त्रिया अतिशय हुशार आणि उद्यमी असतात. त्यांची राहणी बहुधा साफसफाईची असते. स्त्रिया धोब्याचे व शिवणाचे काम फार

चांगले करू शकतात. पुरुष काही लहानसहान व्यापार करतात. बहुतेक एक्का किवां टांगा चालवून आपले पोट भरतात. काहींनी उच्च इंग्रजी शिक्षणही घेतले आहे. त्यांच्यातील एक डॉ. अब्दुल रहमान केप टाऊनमध्ये प्रसिद्ध आहेत. ते केप टाऊनच्या जुन्या विधिमंडळातही पोहोचले होते. नवीन घटनेनुसार मुख्य विधिमंडळात पोहोचण्याचा त्यांचा हा अधिकार काढून घेण्यात आला आहे.

डच लोकांचे वर्णन करता करता प्रसंगोपात मध्येच मलायी लोकांचे थोडे वर्णन आले. परंतु डच लोक कसे पुढे गेले हे आता आपण पाहू. डच लोक जितके शूर आणि लढवैय्ये होते आणि आजही आहेत तितकेच ते चांगले शेतकरीही होते आणि आजही आहेत. आपल्या आजूबाजूचा प्रदेश शेतीकरिता फार चांगला असल्याचे त्यांना लक्षात आले. दक्षिण आफ्रिकेतील मूळ निवासी वर्षात फार कमी कष्ट करून आपले पोट भरतात हेही त्यांनी पाहिले. त्यांनी विचार केला - या लोकांकडून मेहनत का करवून घेऊ नये? डचांजवळ त्यांची स्वतःची कला होती, बंदुका होत्या आणि इतर प्राण्याप्रमाणे माणसालाही कसे ताब्यात ठेवावे हे त्यांना माहीत होते. असे जरी केले तरी आपण धर्माविरुद्ध काहीही करत नाही अशीही त्यांची मान्यता होती. यामुळे आपल्या कामाबद्दल यत्किंचितही संशय निर्माण न होऊ देता त्यांनी हबशी लोकांच्या कष्टावर शेती वगैरे करायला सुरुवात केली.

आपला विस्तार करण्याकरिता डच लोक ज्याप्रमाणे जगातील चांगल्या भागाच्या शोधात होते त्याचप्रमाणे इंग्रजही चांगल्या भागाच्या शोधात होते. हळूहळू इंग्रज दक्षिण आफ्रिकेत आले. इंग्रज आणि डच हे दोघेही एकाच वंशाच्या शाखेचे. दोघांचा स्वभावही एक सारखाच. एकाच कुंभाराने घडवलेली भांडी जेव्हा एका ठिकाणी गोळा होतात तेव्हा त्यांच्यातील काही भांडी एकमेकांवर आदळून ती फुटत असतात. अशाच प्रकारे हातपाय पसरत असताना आणि हळूहळू हबशी लोकांना वश करत असताना या दोन जमातींची आपसात टक्कर झाली. दोघांमध्ये भांडणे झाली आणि युद्धही झाले. मजुबाच्या पर्वतराईत इंग्रजांचा पराभही झाला. मजुबाची ही जखम इंग्रजांना सतत सलत राहिली होती. हळूहळू पिकून तिने एका गळूचे रूप धारण केले आणि तो

गळू जगप्रसिद्ध बोअर युद्धात फुटला. हे युद्ध १८९९ ते १९०२पर्यंत सुरू होते. आणि जनरल क्रोजेला लॉर्ड रॉबर्ट्सने पराभूत केले तेव्हा महाराणी व्हिक्टोरिया यांनी त्यांना तार केली - "मजुबाचा बदला आम्ही घेतला." परंतु या दोघांध्ये जेव्हा पहिली चकमक उडाली (बोअर युद्धाची) तेव्हा डचांमधील बहुतांश लोक इंग्रजांची नाममात्र सत्ता स्वीकारण्यालाही तयार नसल्यामुळे ते दक्षिण आफ्रिकेच्या अंतर्भागात निघून गेले. यामुळे ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेट यांचा जन्म झाला.

हेच डच लोक दक्षिण आफ्रिकेत "बोअर" या नावाने ओळखले जातात. मूल ज्याप्रमाणे आपल्या आईला चिकटलेले असते त्याचप्रमाणे आपल्या भाषेला चिकटून राहून बोअरांनी तिला सुरक्षित ठेवले. आपल्या स्वातंत्र्याशी आपल्या भाषेचा जवळचा संबंध आहे ही गोष्ट त्यांच्या हाडीमासी खिळलेली आहे. या भाषेने असे रूप धारण केले आहे की जे येथील लोकांना सोयीस्कर होईल. बोअर लोक हॉलंडबरोबर आपला निकटचा संबंध ठेवू शकले नाही. यामुळे संस्कृतपासून निघालेल्या प्राकृत भाषेप्रमाणे डचपासून निघालेली अपभ्रंश भाषा ते बोलू लागले. परंतु आपल्या मुलांवर भाषांचे अनावश्यक ओझे टाकण्याची त्यांची इच्छा नसल्यामुळे या अपभ्रंश भाषेला त्यांनी मुख्य भाषेचे रूप दिले आहे आणि ती 'टाल' म्हणून ओळखली जाते. याच भाषेत तिथली पुस्तके लिहिली जातात. मुलांना याच भाषेत शिक्षण दिले जाते आणि विधिमंडळात बोअर सदस्य आपले भाषणसुद्धा याच 'टाल' भाषेत करतात. संघराज्याच्या (युनियन) स्थापनेनंतर संपूर्ण दक्षिण आफ्रिकेत दोन्ही भाषांना - टालमध्ये रुपांतरित झालेली डच भाषा आणि इंग्रजी भाषा - समान दर्जा आहे. सरकारी राजपत्र आणि विधिमंडळाचे कामकाज या दोन्ही भाषांत पोहोचण्यापर्यंत ही समानता पोहोचलेली आहे.

बोअर लोक सरळसाधे, भोळे आणि धर्मपरायण वृत्तीचे आहेत. ते आपल्या विशाल शेतांमध्ये राहतात. तेथील शेतांच्या क्षेत्रफळाची आपण कल्पना करू शकत नाही. आपल्या शेतकऱ्यांचे शेत दोनतीन बिघे क्षेत्रफळाचे असते. याहूनही लहान शेत आपल्याकडे असू शकतात. परंतु तेथील शेताचा अर्थ आहे एका शेतकऱ्याजवळ शेकडो वा हजारो बिघे जमीन. इतकी मोठी

शेती एकदम वहितीत आणावी असा मोहही या शेतकऱ्याला नसतो. कोणी या बाबतीत त्याच्याशी युक्तिवाद करण्याचा प्रयत्न केला तर ते म्हणतात, "आम्ही जरी ही जमीन पडीत पडू दिलेली असली तरी काही हरकत नाही. उद्या आमची मुले ही शेती वहितीत आणतील."

प्रत्येक बोअर युद्धकलेत प्रवीण असतो. हे लोक आपसात कितीही भांडले तरी त्यांना आपले स्वातंत्र्य इतके प्रिय आहे की जेव्हा केव्हा त्यांच्यावर आक्रमण होते तेव्हा सर्व बोअर तयार होतात आणि योद्ध्याप्रमाणे मोठ्या शौर्याने लढतात. त्यांना फार मोठ्या तालमीची वा कवायतीची गरज नसते कारण युद्ध करण्याचा गुण बो्अर जातीत जणू काय उपजतच आहे. जनरल स्मट्स, जनरल डी वेट आणि जनरल हर्जोग हे तिघेही मोठे वकील आणि शेतकरी होते आणि तितकेच मोठे योद्धेही होते. जनरल बोथाजवळ ९,००० एकराचे शेत होते. शेतीच्या सर्व खाचाखोचा त्यांना माहीत होत्या. ते जेव्हा तडजोडीची बोलणी करण्याकरिता युरोपमध्ये गेले तेव्हा बकऱ्यांची परीक्षा करणारा त्यांच्यासारखा दुसरा कोणी नसेल असे त्यांच्याबद्दल सांगण्यात येत असे. हेच जनरल बोथा प्रेसिडेन्ट क्रुगरच्या जागी आले होते. त्यांचे इंग्रजीचे ज्ञानही फार चांगले होते. असे असतानाही ते जेव्हा ब्रिटिश सम्राट आणि मंत्रिमंडळाला भेटले तेव्हा त्यांनी आपल्या मातृभाषेतच बोलणी करणे पसंत केले. त्यांचे असे वागणे उचित नव्हते असे कोण म्हणू शकेल? इंग्रजी भाषेचे आपले ज्ञान दाखवण्याकरिता चूक करण्याचा धोका ते कसा काय पत्करू शकत होते? इंग्रजीतील चपखल शब्द शोधण्याकरिता आपली विचारधारा भंग करण्याचा प्रयत्न त्यांनी का करावा? ब्रिटिश मंत्रिमंडळाने अनाहूतपणे एखाद्या अपरिचित म्हणीचा वा वाक्प्रचाराचा उपयोग केला व त्याचा अर्थ न कळल्यामुळे घाबरून आपल्या कार्याला हानी पोहोचेल अशी चूक त्यांनी का करावी?

ज्याप्रमाणे बोअर पुरुष शूरवीर आणि साधेसरळ आहेत त्याचप्रमाणे बोअर स्त्रियाही शूरवीर व साध्यासरळ आहेत. बोअर पुरुषांनी बोअर युद्धात आपले रक्त सांडले होते. हा त्याग ते आपल्या स्त्रियांच्या धैर्यामुळेच करू शकले होते. बोअर स्त्रियांना ना तर आपल्या वैधव्याची भीती होती ना भविष्याची.

मी वर सांगितलेच आहे की बोअर लोक धर्मपरायण आहेत, ख्रिश्चन आहेत. परंतु त्यांचा येशूच्या नव्या करारावर विश्वास आहे असे काही म्हणता येऊ शकत नाही. आणि खरे सांगायचे तर युरोपचासुद्धा नव्या करारावर विश्वास आहे असे कुठे म्हणता येऊ शकते? युरोपचा जरी नव्या कराराचा दावा असला तरी फार कमी युरोपीय लोकांना येशूचा शांतीधर्म कळतो आणि ते त्याचे पालन करतात. परंतु बोअर लोकांना नव्या कराराची ओळख नाममात्रच असते असेही म्हणता येईल. जुना करार ते श्रद्धा आणि भक्तिभावाने वाचतात. आणि त्यात लिहिलेली युद्धाची वर्णने मुखोद्गत करतात. मुसाच्या "दाताच्या बदल्यात दात आणि डोळयाच्या बदलात डोळा" यावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे, आणि त्यांच्या विश्वासाप्रमाणेच त्यांचा व्यवहार आहे.

आपल्या स्वातंत्र्याकरिता मोठ्यात मोठे दुःख सहन करावे लागले तरी ते सहन केले पाहिजे असा आपल्या धर्माचा आदेश आहे यावर बोअर स्त्रियांचा विश्वास होता. यामुळे त्यांनी सर्व आपत्तींना आणि संकटांना धैर्याने आणि आनंदाने तोंड दिले. बोअर स्त्रियांना नमवण्याच्या आणि त्यांचा तेजोभंग करण्याच्या प्रयत्नात लॉर्ड किचनर यांनी कोणताच कसूर ठेवला नव्हता. त्यांना वेगवेगळ्या छावण्यात बंदिस्त करण्यात आले होते. तिथे त्यांना अतोनात अडचणी सहन कराव्या लागल्या. खाण्यापिण्याचीही तिथे ददात होती. कडाक्याची थंडी आणि कडक उन्हाचा तडाखा हे सर्व त्यांना सहन करावे लागले. केव्हा केव्हा दारू पिऊन उन्मत्त झालेला सैनिक विषयवासनेने बेभान आणि उन्मत्त होऊन त्या स्त्रियांवर हल्लाही करायचे. या छावण्यांमध्ये इतरही अनेक प्रकारचे उपद्रव निर्माण होत असत. तरीही त्या बहाद्दूर बोअर स्त्रिया वाकल्या नाही. अखेरीस एडवर्ड राजाने स्वतःच लॉर्ड किचनरला लिहिले, "हे सर्व मला सहन करवत नाही. बोअरांना पकडण्याचा जर हाच एकमेव उपाय असेल तर त्याऐवजी कोणत्याही अटीवर तह करणे मी पसंत करीन. हे युद्ध तुम्ही लवकर संपवा."

या सर्व दुःखद घटनांची आणि यातनांची माहिती इंग्लंडमध्ये पोहोचली तेव्हा ब्रिटिशांचे अंतःकरणही दुःखाने भरून आले. बोअरांच्या शौर्याने इंग्रज आश्चर्यचकित झाले. संपूर्ण जगात आपले साम्राज्य स्थापणाऱ्या ब्रिटिश सत्तेचा इतक्या कमी संख्येतील बोअरांनी केलेला प्रखर

प्रतिकार इंग्रजांना बोचत होता. परंतु या छावण्यांमध्ये बंद करण्यात आलेल्या बोअर स्त्रियांचा दु:खाचा असह्य आर्तनाद त्या स्त्रियांकडून नाही, बोअर पुरुषांकडून नाही तर दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या काही थोड्याशा उदार इंग्रज स्त्रीपुरुषांच्या माध्यमातून जेव्हा इंग्लंडमध्ये पोहोचला तेव्हा इंग्रजांनाही पश्चात्ताप होऊ लागला. ब्रिटिश जनतेचे मानस स्वर्गीय सर कॅम्पबेल-बॅनरमन यांनी ओळखले आणि त्यांनी बोअरयुद्धाविरुद्ध गर्जना केली. या युद्धात इंग्लंडचा पराभव कर अशी स्वर्गीय टेड यांनी ईश्वराला जाहीर प्रार्थना केली आणि लोकांनाही तशी प्रार्थना करण्याकरिता सांगितले. हे दृश्य चमत्कारिक होते. शौर्याने सहन केलेल्या यातना दगडासारख्या हृदयालाही पाझर फोडतात. अशा प्रकारच्या दु:खाचा हाच महिमा आहे आणि यातच सत्याग्रहाची किल्ली आहे.

यामुळेच फ्रिनिखचा तह झाला आणि दक्षिण आफ्रिकेतील चारही वसाहती एका शासन व्यवस्थेखाली आल्या. वृत्तपत्र वाचणाऱ्या प्रत्येक हिंदुस्तानी वाचकाला जरी या तहासंबंधी माहिती असेल तरी एकदोन गोष्टी अशा आहेत की ज्याची कल्पना अनेकांना क्वचितच असू शकेल. फ्रिनिक्सचा तह होताच दक्षिण आफ्रिकेतील चारही वसाहती एकदम एक झाल्या असे नाही. प्रत्येक वसाहतीचे वेगळे विधिमंडळ होते. आणि प्रत्येक वसाहतीतील मंत्रिमंडळ तेथील विधिमंडळाला पूर्णपणे जबाबदार नव्हते. ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेटची कार्यपद्धती ही क्राऊन कॉलनीच्या पद्धतीसारखी होती. अशा संकुचित अधिकाराने जनरल बोथा वा जनरल स्मट्स यांचे समाधान कधीही होऊ शकत नव्हते. तरीही लॉर्ड मिल्नर यांनी वराशिवाय वरात काढायचे ठरवले. जनरल बोथा आणि जनरल स्मट्स विधिमंडळापासून दूर राहिले. त्यांनी असहकार केला. शासनाबरोबर कोणताही संबंध ठेवायला त्यांनी नकार दिला. “संपूर्ण जबाबदारीचे ओझे केवळ आपल्याच खांद्यावर आहे असे जनरल बोथांनी समजू नये, त्यांच्याशिवाय देश चालू शकतो” असे तिखट विधान भाषण करत असताना लॉर्ड मिल्नर यांनी केले होते.

हातचे काहीही राखून न ठेवता बोअरांचे शौर्य, त्यांचे स्वातंत्र्यप्रेम आणि त्यांचे आत्मबलिदान यासंबंधी मी लिहिले. परंतु अशा संकटकाळात त्यांच्यात मतभेद नव्हते वा त्यांच्यात दुबळ्या प्रवृत्तीचे लोक नव्हते असा वाचकांचा समज करून देण्याची माझी इच्छा नाही. थोडक्यात समाधान मानेल असे लोक बोअरांमध्येही निर्माण करण्यात लॉर्ड मिल्नर यशस्वी झाले होते. आणि या गटाच्या मदतीने आपण विधिमंडळाचे काम यशस्वीपणे चालवू शकू असेही त्यांना वाटत होते. कोणताही नाटककार प्रमुख पात्रांशिवाय आपले नाटक यशस्वीपणे रंगभूमीवर सादर करू शकत नाही. असे असताना या जगाच्या कठीण रंगभूमीवर राजकारण करणारा कोणताही पुरुष प्रमुख पात्रांना सोडून आपले नाटक यशस्वी करू पाहील तर त्याची गणना वेड्यातच होईल. आणि लॉर्ड मिल्नर यांची अगदी हीच अवस्था झाली होती. असेही म्हणतात की त्यांनी जनरल बोथा यांना धमकीही दिली होती. परंतु ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेटचा कारभार जनरल बोथांशिवाय चालवणे इतके कठीण होते की लॉर्ड मिल्नर आपल्या बागेत चिंतातुर आणि व्याकूळ मनःस्थितीत बसलेले दिसायचे! फ्रिनिखनच्या संधीचा मला जो अर्थ जाणवला त्याप्रमाणे बोअरांना ताबडतोब अंतर्गत शासनाचा अधिकार मिळणार होता असे जनरल बोथा यांनी स्पष्टपणे सांगितले. त्यांनी असेही सांगितले की असे नसते तर या करारावर मी कधीही सही केली नसती. लॉर्ड मिल्नर आपल्या उत्तरात म्हणाले की जनरल बोथांना मी असे कोणतेही आश्वासन दिले नव्हते, मी त्यांना इतकेच सांगितले होते की जसजशी बोअर प्रजा विश्वासपात्र असल्याचे सिद्ध होत जाईल तसतसे त्यांना क्रमशः अधिक स्वातंत्र्य मिळत जाईल. आता या दोघांमध्ये न्याय कोणी करावा? एखाद्या पंचाद्वारे न्याय करायचे म्हटले तर जनरल बोथा यांनी ती गोष्ट का मान्य करावी? त्या वेळी इंग्लंडच्या साम्राज्य सरकारने जो निवाडा केला तो खरोखरच त्यांची प्रतिष्ठा वाढवणारा होता. त्यांनी मान्य केले की समोरचा पक्ष, विशेषतः दुर्बल पक्ष तहाचा जो अर्थ लावील तोच बलवन पक्षाने मान्य केला पाहिजे. न्यायाच्या आणि सत्याच्या दृष्टीने तोच अर्थ नेहमी खरा असला पाहिजे. माझ्या म्हणण्याचा माझ्या मनात कोणताही जरी अर्थ असला तरी ते वाचणाराच्या वा ऐकणाराच्या मनावर जो ठसा उमटेल तोच मी लिहिलेल्या लेखाचा वा माझ्या वचनाचा अर्थ आहे असे मी मान्य केले पाहिजे. व्यवहारात अनेकदा आपण या सुवर्णनियमाचे पालन करत नाही. यामुळेच अनेकदा

आपली भांडणे होतात आणि सत्याच्या नावावर अर्धसत्याचा, म्हणजेच खरे सांगायचे तर व्यवहारात दीड असत्याचा उपयोग केला जातो.

अशा प्रकारे सत्याचा, या उदाहरणात जनरल बोथांचा, संपूर्ण विजय झाला. असे झाल्यानंतरच त्यांनी आपल्या हातात कारभार घेतला. यामुळेच चारही वसाहती एक झाल्या आणि दक्षिण आफ्रिकेला संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले. युनियन जॅक त्यांचा ध्वज आहे आणि नकाशात त्या प्रदेशाचा रंग लाल दाखवला जातो. असे असले तरीही दक्षिण आफ्रिका पूर्णपणे स्वतंत्र आहे असे म्हणण्यात कोणतीही अतिशयोक्ती होणार नाही. दक्षिण आफ्रिकेच्या संमतीशिवाय दक्षिण आफ्रिकेडून ब्रिटिश सरकार एक पैसाही घेऊ शकत नाही. तसेच दक्षिण आफ्रिकेला ब्रिटिश ध्वज काढून टाकायचा असेल आणि साम्राज्यापासून वेगळे व्हायचे असेल तर तसे करण्यापासून त्याला कोणीही अडवू शकत नाही असे ब्रिटिश मंत्रिमंडळानेसुद्धा कबूल केले आहे. असे असूनही दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांनी हे पाऊल उचलले नाही याकरिता काही प्रबळ कारणे आहेत. एक तर बोअर प्रजेचे पुढारी चतुर आणि सुज्ञ आहेत. दक्षिण आफ्रिकेची कोणत्याही प्रकारे हानी होणार नाही अशा प्रकारे ब्रिटिश साम्राज्याबरोबर संबंध ठेवण्यात वा अशा प्रकारची भागीदारी करण्यात काही अनुचित आहे असे त्यांना वाटत नाही. परंतु याशिवाय दुसरे एक व्यावहारिक कारणही आहे. ते हे की नातालमध्ये इंग्रजांची संख्या अधिक आहे. केप कॉलनीतही इंग्रजांची संख्या बरीच आहे. परंतु बोअरांपेक्षा जास्त नाही. आणि जोहानिसबर्गमध्ये केवळ इंग्रजांचेच प्राधान्य आहे. अशा अवस्थेत बोअर जमातीच्या लोकांनी संपूर्ण दक्षिण आफ्रिकेत स्वंतत्र प्रजासत्ताक निर्माण करण्याचा जर प्रयत्न केला तर घरातच लढाई वा गृहयुद्ध भडकण्याची शक्यता होती. यामुळेच आज दक्षिण आफ्रिका ब्रिटनची वसाहत मानली जाते.

दक्षिण आफ्रिकेच्या संघराज्याची घटना कशा प्रकारे तयार करण्यात आली ही गोष्टसुद्धा समजून घेण्यासारखी आहे. चारही विधिमंडळांच्या प्रतिनिधींनी एकमताने घटनेचा मसुदा तयार केला आणि ब्रिटिश संसदेला ती घटना शब्दश: मान्य करावी लागली. ब्रिटिश संसदेच्या एका सदस्याने घटनेच्या मसुद्यातील व्याकरणाच्या चुकीकडे सभागृहाचे लक्ष वेधले आणि असे दोषपूर्ण शब्द

घटनेतून काढून टाकले पाहिजे असे सांगितले. परंतु दिवंगत हेन्‍री कॅम्पबेल बॅनरमन त्या सदस्याची सूचना फेटाळत म्हणाले की राज्याचे शासन शुद्ध व्याकरणाने चालत नसते. ही घटना ब्रिटिश मंत्रिमंडळ आणि दक्षिण आफ्रिकेच्या मंत्र्यांनी सल्लामसलत करून तयार केली आहे. यामुळे हिच्यात व्याकरणाची चूकसुद्धा दुरुस्त करण्याचा अधिकार ब्रिटिश संसदेला देण्यात आलेला नाही. परिणामी घटनेचे जे स्वरूप होते त्याच स्वरूपात हाऊस ऑफ कॉमन्स आणि हाऊस ऑफ लॉर्ड्सने त्या घटनेला मान्यता दिली.

यासंबंधात एक तिसरी गोष्टही लक्षात ठेवण्यासारखी आहे. संघराज्याच्या घटनेत अशी काही कलमे आहेत की जी तटस्थ वाचकाला निरर्थक वाटू शकतील. त्यांच्यामुळे खर्चही फार वाढला आहे. ही गोष्ट घटनाकारांच्या लक्षात आलेली नव्हती असे नाही. परंतु त्या लोकांचा उद्देश सर्वांगपरिपूर्ण घटना तयार करण्याचा नव्हता तर तडजोड करून एकमताने घटना तयार करण्याचा होता. यामुळे आताही संघराज्याच्या चार राजधान्या मानल्या जातात. याचे कारण कोणताही भाग आपल्या भागातील राजधानीचे महत्त्व कमी होऊ द्यायला तयार नव्हता. चारही वसाहतींची विधिमंडळे वेगवेगळी ठेवण्यात आली आहेत. चारही वसाहतींकरिता राज्यपालासारखा कोणी पदाधिकारी तर असलाच पाहिजे. यामुळे चार प्रांतिक अधिकारीही मान्य करण्यात आले आहेत. चार स्थानिक विधिमंडळे, चार प्रांतिक अधिकारी आणि चार प्रांतिक शासक या गोष्टी अजस्तनाप्रमाणे केवळ निरुपयोगी आणि अवडंबर वाढवणाऱ्या असतील याची सर्वांनाच कल्पना होती. परंतु दक्षिण आफ्रिकेचे शासन चालवणारे लोक एवढ्यामुळे घाबरणारे कुठे होते? या व्यवस्थेत अवडंबर जरी असला तरी व त्यामुळे खर्च वाढणार असला तरी चारही वसाहतींचे ऐक्य अधिक वांछनीय होते. यामुळे दक्षिण आफ्रिकेच्या राजनितिज्ञांनी बाहेरच्या जगाच्या टीकेची पर्वा न करता स्वतःला जे योग्य वाटले ते केले आणि ब्रिटिश संसदेला आपले म्हणणे मान्य करायला लावले.

अशा रीतीने दक्षिण आफ्रिकेचा हा संक्षिप्त इतिहास वाचकांच्या माहितीकरिता इथे सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे. याशिवाय सत्याग्रहाच्या महान संग्रामाचे रहस्य समजावून सांगता येणे शक्य

नाही असे मला वाटते. मूळ विषयाकडे वळण्यापूर्वी दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्तानी कसे आले आणि सत्याग्राहाची सुरुवात होण्यापूर्वी त्यांनी आपल्यासमोरील अडचणींना आणि संकटांना कसे तोंड दिले हे आता आपल्याला पाहायचे आहे.

# ३. दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्तानींचे आगमन

नातालमध्ये येऊन इंग्रज कसे वसले हे आपण मागील प्रकरणात पाहिले आहे. तिथे त्यांनी झुलूंकडून काही अधिकार आणि सवलती मिळवल्या. नातालमध्ये ऊस, चहा, आणि कॉफीचे फार चांगले पीक काढता येऊ शकते हे त्यांना तर्काने कळले होते. मोठ्या प्रमाणात ही पिके घेण्याकरिता हजारो मजुरांची गरज होती. अशा प्रकारच्या मदतीशिवाय शेदीडशे इंग्रज कुटुंब ही पिके घेऊ शकत नव्हती. याकरिता काम करावे म्हणून त्यांनी हबशी लोकांना लालूचही दाखवली आणि धमकावलेसुद्धा. परंतु आता गुलामगिरीचा कायदा रद्द झालेला असल्यामुळे यात यश मिळण्याइतकी बळजबरी ते हबशींवर करू शकत नव्हते. हबशींना फार मेहनत करण्याची सवय नसते. सहा महिन्याच्या साध्या मेहनतीने ते आपले पोट सहजपणे भरू शकत होते. असे असताना एखाद्या मालकाबरोबर दीर्घ मुदतीकरिता त्यांनी स्वतःला का बांधून घ्यावे? परंतु जोपर्यंत स्थायी मजूर मिळू शकत नव्हते तोपर्यंत इंग्रजाना आपले इप्सित साध्य करता येऊ शकत नव्हते. यामुळे त्यांनी हिंदुस्तान सरकारबरोबर पत्रव्यवहार सुरू केला आणि मजुरांच्या पुरवठ्याकरिता हिंदुस्तानची मदत मागितली. हिंदुस्तान सरकारने नातालची मागणी मान्य केली व परिणामी हिंदुस्तानी मजुरांनी भरलेले पहिले जहाज १६ नोव्हेंबर १८६०ला नातालमध्ये पोहोचले. दक्षिण आफ्रिकेच्या सत्याग्रहाच्या इतिहासात ही तारीख महत्त्वाची गणली जाईल. असे घडले नसते तर दक्षिण आफ्रिकेत ना तर हिंदुस्तानींचा प्रवेश झाला असता ना तिथे सत्याग्रहाचा लढा दिला गेला असता. आणि तशा परिस्थितीत ना हा इतिहास लिहिण्याची आवश्यकताही पडली असती.

माझ्या मते ही मागणी मान्य करताना हिंदुस्तान सरकारने पुरेसा विचार केला नव्हता. हिंदुस्तानातील इंग्रज अधिकारी कळतनकळत दक्षिण आफ्रिकेतील आपल्या भावंडांकडून झाले. हे खरे आहे की करारनाम्यात मजुरांच्या संरक्षणाकरिता अधिकातअधिक अटी आणि त्यांच्या खाण्यापिण्याची सर्वसामान्य काळजी घेतली जाण्याची तरतूद करण्यात आली होती. परंतु अशा प्रकारे दूरवरच्या देशात जाणाऱ्या अशिक्षित मजुरावर जर काही दुःख कोसळले वा संकट आले तर त्यातून त्याने कशी सुटका करून घ्यावी याची या करारात काहीही तरतूद करण्यात आलेली

नव्हती. आणि हिंदुस्तानी मजुरांच्या धर्माचे काय होणार वा ते आपल्या नीतिमत्तेचे रक्षण कसे करणार याचा तर त्यात मुळीच विचार करण्यात आला नव्हता. कायद्याने जरी गुलामगिरी नष्ट करण्यात आलेली होती तरी मालकांच्या अंतःकरणात इतरांना गुलाम करण्याचा जो मोह होता तो अजून नष्ट झालेला नव्हता. याचाही हिंदुस्तानातील इंग्रज अधिकाऱ्यांनी विचार केलेला नव्हता. हे मजूर दूरवरच्या देशात जाऊन विशिष्ट कालावधीकरिता जवळपास गुलाम बनतील ही गोष्ट अधिकाऱ्यांना कळायला पाहिजे होती. मजुरांच्या या स्थितीचा अभ्यास करणारे सर विल्यम हंटर यांनी त्यांच्या परिस्थितीचे वर्णन करताना दोन शब्दांचा वा असे म्हणा की दोन शब्दसमूहांचा उपयोग केला होता. नातालमधील हिंदुस्तानी मजुरांसंबंधी त्यांनी एकदा लिहिले होते की ते 'अर्धगुलामीच्या' अवस्थेत राहत असतात. दुसऱ्या एका पत्रात त्यांनी लिहिले आहे की "नातालच्या हिंदुस्तानींची स्थिती गुलामगिरीच्या अवस्थेत पोहोचलेली आहे." आणि नातालच्या कमिशनसमोर साक्ष देताना सर्वात मोठे वकील श्री एस्कंब यांनीही ही गोष्ट मान्य केली होती. अशा प्रकारचे अनेक पुरावे नातालच्या प्रमुख युरोपियांच्या मुखातून निघालेल्या शब्दांच्या उदाहरणातून देता येऊ शकतात आणि हिंदुस्तान सरकारसमोर सादर करण्यात आलेल्या याविषयीच्या अर्जामध्ये त्यातील बहुतेक पुरावे एकत्र करण्यात आले आहेत. परंतु जे घडायचे होते तेच घडले. जे जहाज हिंदुस्तानींना नातालला घेऊन गेले त्याच जहाजाने नातालमध्ये सत्याग्रहाचे बीजही नेले होते.

नातालशी संबंधित हिंदुस्तानी दलालांनी या मजुरांची कशी फसवणूक केली, दलालांच्या भूलथापात येऊन ते लोक नातालला कसे गेले, नातालमध्ये पोहोचल्यानंतर त्यांचे डोळे कसे उघडले, डोळे उघडल्यानंतरही हे लोक नातालमध्ये का राहिले, तिथे गेल्यानंतर त्यांनी धर्माची आणि नीतीची सर्व बंधने कशी तोडून टाकली वा कशी तुटली गेली, या दुर्दैवी मजुरांमध्ये स्त्री आणि वेश्या यांच्यामधील भेद कसा नाहीसा झाला ही सर्व कहाणी या लहानशा पुस्तकात लिहिली जाऊच शकत नाही. हे हिंदुस्तानी मजूर नातालमध्ये ॲग्रिमेन्टवर (करारावर) गेलेले मजूर म्हणून ओळखले जात होते. यामुळे ते स्वतःला गिरमिटे म्हणू लागले. यामुळे आम्ही ॲग्रिमेन्टला गिरमिट म्हणू आणि त्या आधारावर गेलेल्या मजुरांना गिरमिट्ये म्हणू.

नातालमध्ये गिरमिट्ये मजूर जाण्याची बातमी जेव्हा मॉरिशसमध्ये पोहोचली तेव्हा अशा मजुरांशी संबंध ठेवणाऱ्या हिंदुस्तानी व्यापाऱ्यांना नातालमध्ये जाण्याचा मोह होऊ लागला. हिंदुस्तान आणि नाताल यांच्यामध्ये मॉरिशस पडते. मॉरिशस द्विपामध्ये हजारो हिंदुस्तानी मजूर आणि व्यापारी राहतात. त्यांतील एक व्यापारी मरहूम अबुबकर आमद यांनी नातालमध्ये आपली पेढी उघडण्याचा विचार केला. हिंदुस्तानी व्यापाऱ्यांमध्ये काय काय करण्याची क्षमता आहे याची नातालमधील इंग्रजांनाही कल्पना नव्हती आणि त्याची त्यांना फिकीरही नव्हती. इंग्रजांनी गिरमिट्यांच्या मदतीने चहा, कॉफी, ऊस वगैरे भरपूर नफा देणारी पीके घेतली. ऊसापासून साखर तयार केली आणि नवल वाटावे इतक्या कमी वेळात या तिन्ही गोष्टी ते दक्षिण आफ्रिकेला पुरवू लागले. त्यांनी इतकी संपत्ती मिळवली की आपल्याकरिता त्यांनी मोठमोठे इमले उभारले आणि जंगलचे मंगल केले. अशा वेळी सेठ अबूबकरसारखा सरळ आणि प्रामाणिक माणूस त्यांच्यामध्ये येऊन वसला तरी ती गोष्ट त्यांना खटकली नाही. इतकेच नाही तर भागीदार म्हणून एक इंग्रज त्यांच्या पेढीत सामील झाला. अबुबकर सेठ यांनी व्यापार चालवला, जमीन खरेदी केली. त्यांच्या फार मोठ्या कमाईच्या अफवा हिंदुस्तानातील त्यांच्या जन्मगावात म्हणजे पोरबंदरात आणि आजूबाजूच्याच्या प्रदेशात पसरल्या. यामुळे इतर मेमनही नातालमध्ये पोहोचले. त्यांच्या मागोमाग सुरतचे बोहरेही नातालमध्ये गेले. यामुळे गुजरात आणि काठेवाडमधील मुनीमही नातालमध्ये पोहोचले.

अशा प्रकारे नातालमध्ये दोन प्रकारचे हिंदुस्तानी झाले - (१) स्वतंत्र व्यापारी आणि त्यांचा नोकरवर्ग, (२) गिरमिट्ये हिंदुस्तानी. कायद्याप्रमाणे गिरमिट्यांच्या मुलांवर जरी मजुरी करण्याचे बंधन नव्हते तरीही या कायद्यातील काही कठोर कलमांचा त्यांच्यावरही परिणाम झालाच. गुलामांच्या संततीवर गुलामीचा डाग पडल्याशिवाय कसा राहील? हे गिरमिट्ये मजूर पाच वर्षांच्या करारावर नातालला जायचे. पाच वर्षांनंतर त्यांच्यावर मजुरी करण्याचे बंधन नसायचे. करार पूर्ण झाल्यानंतर स्वतंत्र मजुरी वा व्यापार करण्याचा आणि नाताळचे कायम रहिवासी होण्याचा त्यांना अधिकार होता. काही लोकांनी या अधिकाराचा उपयोग केला आणि ते नातालमध्ये वसले.जे हिंदुस्तानी अशा प्रकारे नातालमध्ये राहिले त्यांना 'फ्री इंडियन्स' (मुक्त हिंदुस्तानी) या नावाने

संबोधले जायचे. आपण त्यांना गिरमिटमुक्त वा संक्षेपात मुक्त हिंदुस्तानी म्हणू. हा भेद समजून घेणे आवश्यक आहे, कारण जे अधिकार पूर्ण स्वतंत्र हिंदुस्तानींना, ज्यांचे वर्णन वर आलेले आहे, उपभोगायला मिळत होते ते सर्व अधिकार गिरमिट मुक्त हिंदुस्तानींना नव्हते. उदाहरणार्थ या लोकांना एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जायचे असले तर त्याकरिता त्यांना परवाना घेणे बंधनकारक आहे असा नियम होता. त्यांनी लग्न केले आणि त्या लग्नाला कायदेशीर मान्यता मिळावी अशी त्यांची इच्छा असल्यास त्यांना त्या विवाहाची नोंदणी गिरमिट्या सुरक्षा नियमानुसार करणे आवश्यक होते. याशिवायही त्यांच्यावर इतर काही कडक निर्बंध होते.

ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेटमध्ये १८८० ते १८९०च्या दरम्यान बोअरांची प्रजासत्ताक राज्ये होती. प्रजासत्ताक राज्याचा अर्थसुद्धा इथे स्पष्ट करणे आवश्यक आहे. इथे प्रजासत्ताक राज्याचा अर्थ गौरसत्ताक राज्य असा आहे. हबशी प्रजेचा त्याबरोबर कोणताही संबंध असूच शकत नव्हता. हिंदुस्तानी व्यापाऱ्यांच्या लक्षात आले की आपण केवळ गिरमिटमुक्त हिंदुस्तानींबरोबरच नाही तर हबशी लोकांबरोबरही व्यापार करू शकतो. हिंदुस्तानी व्यापारी हबशी लोकांकरिता फार सोयीचे ठरले. गोऱ्या व्यापाऱ्यांना हबशी अतिशय घाबरत असत. गोऱ्या व्यापाऱ्यांना हबशींबरोबर व्यापार करण्याची इच्छा तर होती परंतु ते हबशींबरोबर गोड बोलतील अशी अपेक्षा हबशी ग्राहक करू शकत नव्हते. हबशी ग्राहकाला आपल्या पैशाचा पूर्ण मोबदला मिळाला तर ते त्याचे अहोभाग्य समजायचे. परंतु काही लोकांना असेही कटू अनुभव आले की चार शिलींगची वस्तू खरेदी करण्याकरिता त्यांनी एक पौंड गल्ल्यावर ठेवला असता १६ शिलींग परत न करता गोऱ्या व्यापाऱ्याने चारच शिलिंग परत केले वा काहीही परत केले नाही! हबशी ग्राहकाने अधिक पैसे मागितले वा हिशोबातील चूक दाखवली तर बदल्यात त्याला घाणेरड्या शिव्या मिळायच्या. इतक्यावरच त्याची सुटका झाली तर ते त्याचे महद्भाग्यच समजायचे. उलट काही वेळा तर घाणेरड्या शिव्यांबरोबर त्या इंग्रज व्यापाऱ्याचे ठोसे वा लाथाही त्याला खाव्या लागायच्या. सर्व इंग्रज व्यापारी हबशी लोकांबरोबर असाच व्यवहार करायचे असा हे सांगण्यामागील माझा मुळीच हेतू नाही. परंतु इतके नक्कीच सांगता येऊ शकते की अशी उदाहरणे बऱ्याच प्रमाणात पाहण्यात येत असत. याउलट हिंदुस्तानी व्यापारी हबशी लोकांबरोबर गोड भाषेत तर बोलायचेच शिवाय ते

त्याच्याशी विनोदही करायचे. हबशी ग्राहक भोळे होते व दुकानात येऊन वस्तू हातात घेऊन ती कशी आहे हे पाहण्याची त्यांची इच्छा असायची. हिंदुस्तानी व्यापारी हे सर्व सहन करायचे. हे खरे आहे की ते परमार्थाच्या दृष्टीने असे करत नव्हते. यामागे त्यांचा स्वार्थाचाच उद्देश असायचा. संधी सापडली तर हिंदुस्तानी व्यापारीही हबशी ग्राहकाला फसवल्याशिवाय राहत नसत. परंतु हिंदुस्तानी व्यापाऱ्यांचा हा लाघवीपणा आकर्षणाचा विषय होता. याशिवाय हबशी ग्राहक हिंदुस्तानी व्यापाऱ्यांना मुळीच घाबरत नसत. उलट हिंदुस्तानी व्यापाऱ्याने हबशी ग्राहकाची फसवणूक केली आणि ती त्याच्या लक्षात आली तर त्याच्या हातून हिंदुस्तानी व्यापाऱ्याला मारही खावा लागल्याची उदाहरणे आहेत. आणि त्यांच्या शिव्या तर हिंदुस्तानी व्यापाऱ्यांनी अनेकदा ऐकल्या आहेत. अशा प्रकारे हबशी आणि हिदुस्तानी यांच्या या संबंधात घाबरण्याची पाळी बहुधा हिंदुस्तानींवरच यायची. अखेरीस परिणाम असा झाला की हिंदुस्तानी व्यापाऱ्यांना हबशी लोकांची ग्राहकी फार फायदेशीर वाटली. आणि हबशी तर संपूर्ण दक्षिण आफ्रिकेत पसरलेले होते.

ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेटमध्येही बोअर लोकांबरोबर व्यापार करता येऊ शकतो हे हिंदुस्तानी व्यापाऱ्यांच्या लक्षात आले. बोअर लोक सरळसाधे आणि अवडंबरविरहित असतात. हिंदुस्तानी व्यापाऱ्याचे ग्राहक होण्यात त्यांना लाज वाटणार नाही असा विचार करून काही हिंदुस्तानी व्यापाऱ्यांनी ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेटच्या दिशेने प्रयाण केले. तिथे जाऊन त्यांनी दुकाने उघडली. त्या काळात तिथे रेल्वेची सोय नव्हती. यामुळे व्यापारात भरपूर नफा मिळू शकत होता. हिंदुस्तानी व्यापाऱ्यांची कल्पना खरी ठरली. त्यांना बोअरांची आणि हबशींची फार मोठी ग्राहकी मिळू लागली. आता राहिली होती केप कॉलनी. तिथेही काही हिंदुस्तानी जाऊन पोहोचले आणि ते चांगली कमाई करू लागले. अशा प्रकारे या चारही राज्यांमध्ये हिंदुस्तानी थोड्याथोड्या प्रमाणात विभागले गेले आहेत.

या वेळी दक्षिण आफ्रिकेत पूर्ण स्वतंत्र हिंदुस्तानींची संख्या ४०-५० हजार आहे तर मुलेबाळे मिळून गिरमिट्ये हिंदुस्तानींची संख्या एक लाख आहे.

# ४. अडचणींचे सिंहावलोकन - १

**नाताल**

नातालच्या गोऱ्या मालकांना केवळ गुलामांची गरज होती. गिरमिटचा अवधी संपल्यानंतर स्वतंत्र होणारे आणि काही प्रमाणात त्यांच्याशी स्पर्धा करू शकतील असे मजूर त्यांना परवडण्यासारखे नव्हते. हिंदुस्तानात शेतीच्या व्यवसायात वा अन्य व्यवसायात यश न आल्यामुळे हे गिरमिट्ये मजूर नातालमध्ये गेले होते. परंतु शेती कशी करतात वा शेतीची वा जमिनीची काय किंमत आहे याचे मुळीच ज्ञान वा कल्पना नसण्याइतके ते अडाणी नव्हते. नातालमध्ये केवळ भाजीपाला पिकवला तरी त्यापासून चांगली कमाई होऊ शकते आणि जमिनीचा एक लहानसा तुकडा जर घेतला तर मग अजूनच चांगली कमाई करता येऊ शकते हे त्यांच्या लक्षात आले. यामुळे बहुतेक गिरमिटे करारातून मुक्त झाल्यानंतर कोणता ना कोणता लहानसहान धंदा करू लागले. यामुळे एकूण पाहता नातालच्या रहिवाशांचा लाभच झाला होता. योग्य शेतकऱ्यांच्या अभावामुळे जो भाजीपाला आधी निर्माण होत नव्हता असा विविध प्रकारचा भाजीपाला तिथे निर्माण होऊ लागला. ज्या भाज्या आधी कमी प्रमाणात निर्माण होत होत्या त्या आता मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ लागल्या. यामुळे भाज्यांचे भाव एकदम उतरले. परंतु ही गोष्ट श्रीमंत गोऱ्यांना आवडली नाही. आतापर्यंत ज्याला ते एकाधिकार समजत होते त्यात आता भागीदार निर्माण होऊ लागले हे त्यांना आवडले नाही. यामुळे या गरीब गिरमिटमुक्त लोकांच्या विरोधात नातालमध्ये एक आंदोलन सुरू झाले. एकीकडे हे गोरे लोक अधिकाधिक मजुरांची मागणी करत होते. हिंदुस्तानातून जितके गिरमिट यायचे ते सर्व नातालमध्ये खपायचे. असे असतानाही आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे लोक गिरमिटमधून मुक्त होणाऱ्या हिंदुस्तानी मजुरांवर विविध प्रकारचे प्रतिबंध घालावे म्हणून आंदोलन करत होते. हिंदुस्तानींच्या हुशारीचा आणि कठोर मेहनतीचा हाच मोबदला होता!

या आंदोलनाने अनेक रूप  धारण केले. गोऱ्यांच्या एका वर्गाने मागणी केली की गिरमिटमुक्त मजुरांना हिंदुस्तानात परत पाठवले पाहिजे आणि नवीन येणाऱ्या गिरमिट्यांकरिता नवीन

कराराचा मसुदा तयार करण्यात आला पाहिजे. नवीन येणाऱ्या मजुरांनी गिरमिटचा अवधी संपल्यानंतर एक तर परत जायला पाहिजे वा गिरमिट्ये म्हणून परत काम करायला पाहिजे अशी अट त्या मसुद्यात टाकण्यात यावी अशी या गोऱ्या वर्गाची मागणी होती. गिरमिटमधून मुक्त झालेले मजूर परत गिरमटमध्ये भरती होणार नसतील व परतही जाणार नसतील तर त्यांच्याकडून जबर दरडोई कर (पोल टॅक्स) घेतला पाहिजे असे दुसऱ्या वर्गाचे म्हणणे होते. या दोन्ही वर्गांचे उद्दिष्ट एकच होते - काहीही करून गिरमिट्यांना स्वतंत्र माणूस म्हणून दक्षिण आफ्रिकेत राहू देणे अशक्य करणे. आंदोलकांची तक्रार इतकी वाढली की शेवटी सरकारला एक आयोग नेमावा लागला. दोन्ही वर्गांची मागणी अगदी अनुचित होती आणि गिरमिटमुक्त मजुरांचे अस्तित्व संपूर्ण नाताळकरिता लाभदायक होते. यामुळे आयोगासमोर जे काही पुरावे आले ते सर्व या दोन्ही वर्गांच्या विरोधात असल्यामुळे विरोधकांच्या दृष्टीने या आंदोलनाचा काहीही लाभ झाला नाही. परंतु आग विझवल्यानंतर तिच्या काही खाणाखुणा ज्याप्रमाणे शिल्लक राहतात त्याप्रमाणे या आंदोलनाचाही नाताल सरकारवर थोडापार परिणाम नक्कीच झाला. वेगळे काही होणे शक्य तरी कसे होते? नातालचे गोरे सरकार तेथील धनिक वर्गाचे समर्थक होते. त्याने हिंदुस्तान सरकारबरोबर यासंबंधी पत्रव्यवहार सुरू केला आणि आंदोलकांनी केलेल्या सूचना त्यांच्यासमोर ठेवल्या. परंतु गिरमिटे कायम गुलामगिरीच्या पाशात अडकून राहतील अशा सूचना हिंदुस्तान सरकार तरी एकाएकी कसे काय मान्य करणार होते? गिरमिटच्या माध्यमातून हिंदुस्तानींना इतक्या लांबवर पाठवण्याचे एक कारण वा निमित्त म्हणा असे सांगण्यात येत होते की गिरमिट पूर्ण झाल्यानंतर ते तिथे आपला विकास करू शकतील व परिणामी ते आपली आर्थिक स्थिती सुधारू शकतील. नाताल क्राऊन कॉलनी म्हणजे साम्राज्याची वसाहत असल्यामुळे वसाहतीचे कार्यालय नातालच्या शासनाकरिता पूर्णपणे जबाबदार आहे असे समजले जात होते. यामुळे या कार्यालयाकडूनही आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्याची अपेक्षा नाताल करू शकत नव्हता. या आणि अन्य कारणांमुळे नातालमध्ये जबाबदार शासनाकरिता आंदोलन सुरू झाले. जबाबदार शासनाची ही व्यवस्था नातालला १८९३साली मिळाली. आता नातालला आपल्या शक्तीची जाणीव होऊ लागली. नातालला हव्या असलेल्या मागण्या पुर्ण करण्याच्या मार्गात आता वसाहत

कार्यालयाची अडचण वाटत नव्हती. नातालच्या या नवीन म्हणजे जबाबदार सरकारने हिंदुस्तान सरकारशी विचारविनिमय करण्याकरिता आपले प्रतिनिधी हिंदुस्तानात पाठवले. प्रत्येक गिरमिटमुक्त स्वतंत्र हिंदुस्तानीवर दरडोई २५ पौंड (३७५ रुपये) वार्षिक कर लावण्यात यावा अशी त्यांची मागणी होती. याचा अर्थ असा होता की कोणताही हिंदुस्तानी मजूर असा कर भरू शकत नव्हता आणि त्यामुळे स्वतंत्र माणूस म्हणून तो नातालमध्ये राहू शकणार नव्हता. हिंदुस्तानचे तत्कालीन व्हाईसराय लॉर्ड एल्गिन यांना २५ पौंड रक्कम फार जास्त वाटली आणि अखेरीस त्यांनी दरडोई ३ पौंड कर कबूल केला. गिरमिट्यांच्या कमाईच्या दृष्टीने हा ३ पौंड कर त्यांच्या सहा महिन्यांच्या कमाई इतका होत होता. हा कर केवळ मजुरांवर लावण्यात आला नव्हता तर त्याच्या पत्नीवर, १३ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलींवर आणि १६ वा अधिक वय असलेल्या मुलांवरही लावण्यात आला होता. बायको आणि दोन मुले नाहीत असा मजूर क्वचितच असावा. याचा अर्थ असा झाला की प्रत्येक मजुराला दरवर्षी १२ पौंड कर भरावा लागणार होता. मजुरांकरिता हा कर किती त्रासदायक झाला होता याचे वर्णन करता येणे शक्य नाही. केवळ अनुभवी व्यक्तीलाच वा ज्याने हे क्लेश आपल्या डोळ्यांनी पाहिले आहेत त्यालाच यातील वेदना काही प्रमाणात कळू शकतात. नाताल सरकारच्या या पावलाविरुद्ध हिंदुस्तानींनी खूप लढा दिला होता. ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्तान सरकार यांना अर्ज पाठवण्यात आले, परंतु २५ वरून तीन पौंड कर होण्यापेक्षा त्याचा अधिक लाभ झाला नाही. गिरमिट्या मजुरांना या बाबतीत स्वतःला काय कळू शकत होते वा ते यासंबंधी काय म्हणणार होते? देशप्रेमाने म्हणा वा परमार्थ भावनेने प्रेरित होऊन म्हणा हे आंदोलन हिंदुस्तानी व्यापाऱ्यांनीच चालवले होते.

जो व्यवहार गिरमिट्या मजुरांबरोबर करण्यात आला तोच व्यवहार स्वतंत्र हिंदुस्तानींबरोबरही करण्यात आला. नातालच्या गोऱ्या व्यापाऱ्यांनी स्वतंत्र हिंदुस्तानींच्या विरोधातही प्रामुख्याने जवळपास अशाच कारणाकरिता आंदोलन सुरू केले. हिंदुस्तानी व्यापाऱ्यांनी नातालमध्ये चांगला जम बसवला होता. त्यांनी शहराच्या चांगल्या चांगल्या भागात घरे, जमिनी वगैरे अचल संपत्ती विकत घेतली होती. जसजशी गिरमिटमुक्त हिंदुस्तानींची संख्या वाढत गेली तसतसा त्यांच्या गरजेच्या वस्तुंचा खपही वाढत गेला. हिंदुस्तानातून हजारो पोती तांदूळ मागवला जायचा व

त्याच्या विक्रीपासून हिंदुस्तानी व्यापाऱ्यांना चांगला फायदा व्हायचा. हा व्यापार प्रामुख्याने हिंदुस्तानींच्या ताब्यात होता. याचबरोबर हबशींबरोबरच्या व्यापारातही त्यांनी फार मोठा वाटा मिळवला होता. ही गोष्ट लहान गोऱ्या व्यापाऱ्यांना सहन झाली नाही. या हिंदुस्तानी व्यापाऱ्यांना काही इंग्रजांनी सांगितले की कायद्याप्रमाणे तुम्हालाही विधिमंडळात जाण्याचा आणि त्याकरिता प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार आहे. यामुळे काही हिंदुस्तानींनी आपली नावेही मतदारसूचीत नोंदवली. ही गोष्ट नातालच्या राजकीय क्षेत्रातील गोऱ्यांना सहन होण्यासारखी नव्हती. अशा प्रकारे हिंदुस्तानींची परिस्थिती नातालमध्ये जर मजबूत होऊ लागली व त्यांची प्रतिष्ठा वाढू लागली तर आपला इथे फार दिवस टिकाव लागू शकणार नाही या काळजीने गोऱ्यांना घेरले. यापुढे एकही नवा स्वतंत्र हिंदुस्तानी मतदार होणार नाही असा हिंदुस्तानींच्या संबंधात कायदा करणे हे नातालच्या जबाबदार सरकारचे पहिले पाऊल ठरले. सन १८९४ मध्ये या विषयीचे पहिले विधेयक नाताल विधिमंडळात आले. हिंदुस्तानींना हिंदुस्तानी असल्यामुळे मतदान अधिकारापासून वंचित करण्याचा सिद्धांत मान्य करण्यात आला होता. नातालच्या रंगभेदाच्या आधारावर हिंदुस्तानींबद्दल बनवण्यात आलेला हा पहिला कायदा होता. हिंदुस्तानी जनतेने याचा विरोध केला. एका रात्रीतून अर्ज तयार झाला. त्यावर चारशे लोकांच्या सह्या होत्या. वर अर्ज पोहोचताच नातालच्या विधिमंडळाला धक्काच बसला. परंतु विधेयक मंजूर झालेच. त्या वेळी लॉर्ड रिपन वसाहत मंत्री होते. त्यांच्याजवळ हिंदुस्तानींचा जो अर्ज गेला त्यावर दहा हजार सह्या होत्या. दहा हजार सह्यांचा अर्थ होता नातालमधील जवळपास सर्व हिंदुस्तानींच्या सह्या. लॉर्ड रिपन यांनी नाताल विधिमंडळाच्या ठरावाला मान्यता दिली नाही, आणि ब्रिटिश साम्राज्य कायद्यात रंगभेद मान्य करू शकत नाही असे सांगितले. हिंदुस्तानींचा हा विजय किती महत्त्वपूर्ण होता याची कल्पना वाचकांना पुढे गेल्यानंतर अधिक चांगल्या प्रकारे येईल. याचे उत्तर म्हणून नातालच्या विधिमंडळात एक नवीन विधेयक सादर करण्यात आले. त्यातून रंगभेद काढून टाकण्यात आलेला असला तरी त्याचा रोख अप्रत्यक्षपणे हिंदुस्तानींवरच होता. हिंदुस्तानी लोकांनी त्याच्या विरोधातही लढा दिला होता, परंतु त्यात त्यांना यश आले नाही. हे नवे विधेयक द्व्यर्थी होते. त्याचा अर्थ स्पष्ट करून घेण्याकरिता समाजातील लोकांची इच्छा असती तर ते सर्वोच्च

न्यायालयापर्यंत भांडू शकले असते. परंतु असे करणे त्यांना योग्य वाटले नाही. प्रिव्ही कौन्सिलपर्यंत भांडण न नेण्याचा त्यांचा निर्णय योग्यच होता असे मला आजही वाटते. कायद्यात रंगभेद न शिरू देणे हीही काही साधी गोष्ट नव्हती.

परंतु नातालच्या गोऱ्या मालकांचे व नाताल सरकारचे एवढ्याने समाधान झाले नाही. नातालमध्ये राजकीय जम बसू न देण्यापासून हिंदुस्तानींना अडवणे हे त्यांच्याकरिता आवश्यक पाऊल होते. परंतु त्यांचा खरा रोख होता हिंदुस्तानींच्या व्यापारावर आणि त्यांच्या आगमनावर. तीस कोटी लोकसंख्येचा हिंदुस्तानसारखा देश जर नातालच्या दिशेने येऊ लागला तर नातालच्या गोऱ्यांचे काय झाले असते? ते तर समुद्रातच वाहून गेले असते! ४ लाख हबशी, ४० लाख गोरे, ६० हजार गिरमिट्ये मजूर, १० हजार गिरमिटमुक्त हिंदुस्तानी आणि १० हजार स्वतंत्र हिंदुस्तानी हे गोऱ्यांच्या भीतीकरिता काही कारण तर नव्हते, परंतु घाबरलेल्या माणसाला युक्तिवादाने वा उदाहरणांनी समजावून सांगता येऊ शकत नाही. हिंदुस्तानच्या लाचार अवस्थेची वा रीतिरिवाजाची त्यांना माहिती नव्हती. यामुळे आपण जसे साहसी आणि शक्तिशाली आहो तसेच हिंदुस्तानीही असतील असा भ्रम त्यांच्या मनात होता. यामुळे त्यांनी केवळ त्रैराशिकाचे गणित केल्याबद्दल त्यांना दोष कसा देता येईल? हिंदुस्तानच्या करोडो लोकसंख्येच्या तुलनेत आपली लहानशी संख्या पाहून त्यांनी भयभीत होणे स्वाभाविक होते. ते काहीही असले तरी हिंदुस्तानींना मतदानासंबंधीच्या लढ्यात मिळालेल्या विजयामुळे नातालच्या विधिमंडळाने जे दोन कायदे मंजूर केले त्यातही नातालला रंगभेद दूर ठेवावा लागला. आणि गर्भित भाषेचा उपयोग करून त्याला आपला हेतू तडीस न्यावा लागला. यामुळे विरोध करणाऱ्या हिंदुस्तानींची अब्रू काही प्रमाणात वाचली. याही वेळी हिंदुस्तानी समाजाने जरी जबरदस्त लढा दिला होता तरी दोन्ही विधिधिमंडळात कायदे मंजूर झालेच. एका कायद्याने हिंदुस्तानींच्या व्यापारावर जबरदस्त अंकुश लावण्यात आला तर दुसऱ्या कायद्याद्वारे नातालमध्ये हिंदुस्तानींच्या प्रवेशावर. पहिल्या कायद्याचा आशय असा होता की कायद्याने नेंमलेल्या अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय कोणालाही व्यापाराचा परवाना मिळू शकणार नाही. परंतु व्यवहारात कोणताही गोरा अधिकाऱ्याकडे जाऊन व्यापार परवाना मिळवू शकत होता. उलट हिंदुस्तानींना मात्र मोठ्या मुश्किलीने तो परवाना मिळू शकत होता. या

कामाकरिता हिंदुस्तानींना वकीलही करावा लागायचा आणि इतर खर्चही करावा लागायचा. यामुळे दुबळ्या प्रवृत्तीचे हिंदुस्तानी परवान्याशिवायच राहायचे. दुसऱ्या कायद्याची मुख्य अट अशी होती की जो हिंदुस्तानी युरोपच्या कोणत्या तरी भाषेत नातालमधील प्रवेशाकरिता अर्ज लिहू शकेल त्यालाच नातालमध्ये प्रवेश करता येईल. यामुळे करोडो हिंदुस्तानींकरिता नातालचे दार पूर्णपणे बंद झाले. कळत नकळत नाताल सरकारवर अन्याय होऊ नये म्हणून इथे हेही सांगणे आवश्यक आहे की हा कायदा मंजूर होण्यापूर्वी जो हिंदुस्तानी नातालमध्ये तीन वर्ष राहिलेला असेल आणि तो जर नाताल सोडून हिंदुस्तानात वा अन्य कोणत्या देशात गेला असेल आणि तिथून नातालमध्ये परतण्याची त्याची इच्छा असेल तर युरोपच्या कोणत्याही भाषेचे ज्ञान नसतानाही तो बायको आणि अज्ञान मुलांबरोबर नातालमध्ये प्रवेश करू शकत होता.

याशिवाय नातालच्या गिरमिट्या हिंदुस्तानींवर आणि स्वतंत्र हिंदुस्तानींवर इतरही कायदेशीर आणि कायद्याबाहेरील बंधने घालण्यात आलेली होती. परंतु त्यात वाचकांना शिरायला लावणे मला आवश्यक वाटत नाही. हे पुस्तक समजण्याकरिता जितक्या गोष्टी आवश्यक वाटतात तितक्याच इथे सांगण्याचा माझा विचार आहे. दक्षिण आफ्रिकेच्या प्रत्येक वसाहतीत वसलेल्या हिंदुस्तानींच्या परिस्थितीचा इतिहास विस्तारपूर्वक लिहिता येणे शक्य आहे. परंतु इतिहास सांगणे हा या पुस्तकाचा उद्देश नाही.

# ५. अडचणींचे सिंहावलोकन - २

## ट्रान्सवाल आणि इतर वसाहती

नाताल तसेच दक्षिण आफ्रिकेतील इतर वसाहतींमध्येही हिंदुस्तानींबद्दलची नाराजी १८८० पासूनच कमीअधिक प्रमाणात वाढत चालली होती. केप कॉलनीशिवाय इतर वसाहतींमधील गोऱ्यांचेही एकच मत होते - मजूर म्हणून हिंदुस्तानी फार चांगले आहेत, परंतु स्वतंत्र हिंदुस्तानींच्या आगमनामुळे एकूण पाहता दक्षिण आफ्रिकेची हानीच होणार आहे. ही गोष्ट त्यांच्या मनात एखाद्या स्वयंसिद्ध सिद्धान्ताप्रामाणे ठसली होती. ट्रान्सवाल प्रजासत्ताक राज्य होते. आम्ही ब्रिटिश प्रजा आहो असे तेथील राष्ट्राध्यक्षासमोर म्हणणे हास्यास्पदच होते. हिंदुस्तानींना एखादी तक्रार करायची असल्यास ते प्रिटोरिया येथील ब्रिटिश राजदुताकडेच करू शकत असत. आश्चर्याची गोष्ट तर अशी आहे की असे असतानाही ब्रिटिश साम्राज्यापासून ट्रान्सवाल जेव्हा वेगळे होते तेव्हा हिंदुस्तानींनाा ब्रिटिश राजदूत जी मदत करत असायचा ती ट्रान्सवाल ब्रिटिश साम्राज्याचा भाग झाल्यानंतर अगदी थांबली. ज्या वेळी लॉर्ड मोर्ले हिंदुस्तानमंत्री होते त्या वेळी ट्रान्सवालमधील हिंदुस्तानींची बाजू मांडण्याकरिता एक प्रतिनिधीमंडळ त्यांच्याकडे गेले होते. त्या वेळी लॉर्ड मोर्ले त्यांच्याजवळ स्पष्टपणे म्हणाले होते, “तुम्हाला माहीतच आहे की जबाबदार शासनपद्धती असलेल्या वसाहतीवर साम्राज्याचे फार कमी नियंत्रण असते. स्वतंत्र राज्यांना साम्राज्यसरकार युद्धाची धमकी देऊ शकते, त्याच्याबरोबर युद्धही करू शकते, परंतु वसाहतींबरोबर केवळ सल्लामसलतच करता येऊ शकते. साम्राज्य सरकारचे त्यांच्याशी रेशमी धाग्याने संबंध बांधले गेलेले आहेत. थोडासाही ओढला तरी हा धागा तुटू शकतो. त्यांच्यावर बळजबरी तर मुळीच करता येत नाही. हं, केवळ युक्तिवादाने जे काही करता येणे शक्य होईल ते सर्व मी करीन या गोष्टीवर तुम्ही विश्वास ठेवा.” ट्रान्सवालविरुद्ध जेव्हा युद्ध घोषित करण्यात आले तेव्हा लॉर्ड लॅन्सडाऊन, लॉर्ड सेलबोर्न वगैरे ब्रिटिश अधिकारी म्हणाले होते की ट्रान्सवालबरोबरच्या युद्धाच्या विविध कारणांमधील एक कारण तेथील हिंदुस्तानींची दुःखद परिस्थितीसुद्धा आहे.

ट्रान्सवालच्या हिंदुस्तानींचे दुःख काय होते ते आता आपण पाहू या. ट्रान्सवालमध्ये हिंदुस्तानी अगदी पहिल्यांदा १८८१ साली गेले होते. मरहूम सेठ अबुबकर यांनी ट्रान्सवालची राजधानी प्रिटोरिया येथे दुकान उघडले आणि तेथील एका मुख्य मोहल्ल्यात जमीनही विकत घेतली. यानंतर एकानंतर एक असे इतर हिंदुस्तानी व्यापारीही तिथे पोहोचले. त्यांचा व्यापार जोरात चालू लागला. यामुळे गोऱ्या व्यापाऱ्यांना त्यांच्याबद्दल मत्सर वाटू लागला. वृत्तपत्रांमधून हिंदुस्तानींच्या विरोधात पत्र, लेख वगैरे लिहिले जाऊ लागले आणि हिंदुस्तानींना ट्रान्सवालबाहेर काढण्यात यावे आणि त्यांचा व्यापार बंद करण्यात यावा अशी विधिमंडळात मागणी करण्यात आली. ट्रान्सवालसारख्या एकदम नवीन देशात गोऱ्यांच्या धनतृष्णेला कोणतीही सीमा नव्हती. नीतिअनीतीमधील भेद त्यांना क्वचितच कळायचा. विधिमंडळाकडे त्यांनी जे अर्ज केले त्यात अशी विधाने करण्यात आली होती - "या लोकांना (हिंदुस्तानी व्यापाऱ्यांना) मानवसंस्कतीची काहीही माहिती नाही. दुर्वतनामुळे होणाऱ्या रोगामुळे हे लोक सडलेले आहेत. प्रत्येक स्त्रीला ते आपली शिकार समजतात. स्त्रियांना आत्माच नसतो असा यांचा विश्वास आहे." या चार वाक्यांमध्ये चार खोट्या गोष्टी भरलेल्या आहेत. अशी अनेक उदाहरणे सादर करता येऊ शकतील. जसे हे गोरे होते तसेच विधिमंडळातील त्यांचे प्रतिनिधीही होते. आपल्या विरोधात कसे अन्यायपूर्ण आणि विचित्र आंदोलन सुरू आहे हे आपल्या व्यापाऱ्यांना कसे कळावे? वृत्तपत्रे तर ते वाचत नव्हते. गोऱ्यांचा वृत्तपत्रीय प्रचार आणि त्यांनी केलेले अर्ज यांचा प्रभाव विधिमंडळावर पडला आणि तिथे एक विधेयक सादर करण्यात आले. ही गोष्ट जेव्हा अग्रणी हिंदुस्तानींना कळली तेव्हा त्यांना धक्काच बसला. ते अध्यक्ष क्रुगर यांच्याकडे गेले. अध्यक्षांनी हिंदुस्तानींना आपल्या घरात प्रवेशसुद्धा करू दिला नाही. घराच्या अंगणातच त्यांना उभे करण्यात आले आणि त्यांचे थोडेबहुत ऐकल्यानंतर अध्यक्ष क्रुगर म्हणाले, "तुम्ही इस्माईलचे वंशज आहा. यामुळे इसाच्या वंशजांची सेवा करण्याकरिताच तुमचा जन्म झाला आहे. आम्ही इसाचे वंशज आहो असे समजले जाते. यामुळे आमची बरोबरी करणारे समान अधिकार तुम्हाला मिळूच शकत नाहीत. जे काही अधिकार आम्ही तुम्हाला देऊ त्यावरच तुम्ही समाधान मानले पाहिजे." अध्यक्षांच्या या उत्तरात राग वा द्वेष होता असे आम्ही म्हणू शकत नाही. अध्यक्ष क्रुगर यांना अशीच शिकवण मिळालेली

होती. बायबलच्या जुन्या करारात लिहिलेल्या गोष्टी त्यांना लहानपणापासूनच शिकवण्यात आलेल्या होत्या आणि त्या त्यांनी श्रद्धापूर्वक स्वीकारल्या होत्या. आणि माणसाचा जशा विश्वास असेल तेच त्याने स्पष्टपणे सांगितले तर त्याला दोष कसा देता येईल? परंतु अशा अज्ञानाचा दुष्परिणामसुद्धा होतच असतो. यामुळे १८८५ साली विधिमंडळात एक कायदा घाईगडबडीने मंजूर करण्यात आला. जणू काय हजारो हिंदुस्तानी ट्रान्सवालला लुटण्याकरिता बसलेले होते अशा प्रकारे हा कायदा मंजूर करण्यात आला! हिंदुस्तानविरोधी या कायद्याच्या विरोधात ब्रिटिश राजदुताला पाऊल उचलावे लागले. हे प्रकरण वसाहतमंत्र्यापर्यंत पोहोचले. या कायद्याप्रमाणे व्यापार करण्याकरिता येणाऱ्या हिंदुस्तानीने २५ पौंड देऊन आपले नाव नोंदवणे आवश्यक होते. ट्रान्सवालमध्ये कोणत्याही हिंदुस्तानीला एक इंचसुद्धा जमीन विकत घेण्याचा अधिकार नव्हता. आणि मतदार तर तो होऊच शकत नव्हता. हे सर्व इतके अयोग्य आणि अन्यायपूर्ण होते की ट्रान्सवाल सरकार युक्तिवादाने याचे समर्थन करूच शकत नव्हते. ट्रान्सवाल सरकार आणि ब्रिटिश सरकार यांच्यात एक करार झालेला होता. त्याला 'लंडन कन्व्हेन्शन' म्हणत असत. त्यातील १४व्या कलमाचा संबंध ब्रिटिश प्रजेच्या सुरक्षेशी होता. त्या कलमाचा आधार घेऊन साम्राज्य सरकारने या कायद्याला विरोध केला. ट्रान्सवाल सरकारचे म्हणणे होते की आम्ही जो कायदा मंजूर केला तो मंजूर करण्याकरिता साम्राज्य सरकारने आधीच गर्भित संमती दिलेली आहे.

अशा प्रकारे ब्रिटिश सरकार आणि ट्रान्सवाल सरकार यांच्यात भांडण झाल्यानंतर हा मुद्दा पंचांसमोर ठेवण्यात आला. पंचांचा निर्णय गुळमुळीत होता. त्याने दोन्ही सरकारांना खुष करण्याचा प्रयत्न केला. परिणामी या बाबतीतही हिंदुस्तानींना हानी सहन करावी लागली. लाभ जर म्हणता येईल तर तो इतकाच झाला की अधिक हानी होण्याऐवजी हिंदुस्तानींना कमी हानी पत्करावी लागली. पंचांच्या वरील निर्णयाप्रमाणे १८८६च्या कायद्यात सुधारणा झाली. त्या कायद्यानुसार २५ पौंडाऐवजी ३ पौंड कर घेण्याचा निर्णय झाला, आणि जमीन खरेदी करता येऊ शकत नसण्याचा जो कडक नियम होता तो रद्द होऊन त्याऐवजी हिंदुस्तानी लोक ट्रांसवाल सरकारने ठरवून दिलेल्या मोहल्ल्यात वा भागातच जमीन विकत घेऊ शकतील अशी तरतूद करण्यात आली होती. या कलमाची अंमलबजावणीसुद्धा सरकारने प्रामाणिकपणे केली नाही.

अशा भागातही सरकारने हिंदुस्तानींना जमीन विकत घेण्याचे अधिकार दिले नाही. हिंदुस्तानींची वस्ती असलेले प्रत्येक शहरातील हे भाग शहरापासून फार दूर आणि घाणेरड्या ठिकाणी होते. तिथे पाण्याची आणि प्रकाशाची किमान सोय असायची. संडासांच्या सफाईची हीच अवस्था होती. यामुळे आम्ही हिंदुस्तानी ट्रान्सवालमध्ये पंचम वर्गाचे झालो होतो. या मोहल्ल्यांमध्ये आणि हिंदुस्तानातील महारवाड्यांमध्ये कोणतेच अंतर नव्हते असे म्हणता येऊ शकते. भंगी, चांभार वा महारमांग यांना स्पर्श केल्यामुळे वा त्यांच्याजवळ राहिल्यामुळे आपल्याला विटाळ होतो असे ज्याप्रमाणे हिंदू समजतात त्याचप्रमाणे हिंदुस्तानींच्या स्पर्शामुळे आपल्याला विटाळ होतो असे ट्रान्सवालमधील गोरे समजतात. याशिवाय हिंदुस्तानी याच मोहल्ल्यात वा भागातच व्यापार करू शकतात असा अर्थसुद्धा १८८५च्या कायदा क्रमांक ३चा लावला. हा अर्थ बरोबर आहे की नाही हे ठरवण्याची जबाबदारी पंचांनी ट्रान्सवालच्या न्यायालयावर सोडली होती. यामुळे ट्रान्सवालमध्ये हिंदुस्तानी व्यापाऱ्यांची फार विचित्र अवस्था झाली. या सर्व घडामोडीनंतरही कुठे सल्लामसलत करून, कुठे न्यायालयात प्रकरण नेऊन तर कुठे आपल्या प्रभावाचा थोडाबहुत उपयोग करून हिंदुस्तानी व्यापाऱ्यांनी आपली परिस्थिती काही प्रमाणात सांभाळून ठेवली. बोअर युद्ध सुरू झाले तेव्हा येथील हिंदुस्तानींची परिस्थिती अशी दुःखद आणि विचित्र होती.

आता आपण ऑरेंज फ्री स्टेटमधील हिंदुस्तानींची परिस्थिती कशी होती ते पाहू. इथे मोठ्या मुश्किलिने हिंदुस्तानींची दहापंधरा दुकाने उघडत नाही तोच गोऱ्यांनी हिंदुस्तानींच्या विरोधात जोरदार आंदोलन सुरू केले. तेथील विधिमंडळाने सावधगिरीने काम करत तेथील हिंदुस्तांनींना मुळापासून हाकलून लावले. त्याने एक कायदा मंजूर केला आणि प्रत्येक हिंदुस्तानी व्यापाऱ्याला नाममात्र नुकसानभरपाई देऊन तेथून काढून टाकले. त्या कायद्याप्रमणे कोणताही हिंदुस्तानी व्यापारी जमीनमालक म्हणून वा शेतकरी म्हणून ऑरेंज फ्री स्टेटमध्ये राहूच शकत नव्हता. आणि मतदार तर तो कोणत्याही अवस्थेत होऊ शकत नव्हता. खास परवानगी घेऊन तो मजूर म्हणून वा हॉटेलमधील वेटर म्हणून इथे राहू शकत होता! अशी परवानगीसुद्धा प्रत्येक अर्जदाराला मिळत नसे. याचा परिणाम असा झाला की एखाद्या प्रतिष्ठित हिंदुस्तानीला दोनचार दिवस जरी ऑरेंज

फ्री स्टेटमध्ये राहायचे असले तरी तो तसे मोठ्या मुश्किलीने करू शकत असे. बोअर युद्ध सुरू झाले तेव्हा जवळपास ४० वेटरशिवाय एकही हिंदुस्तानी तिथे नव्हता.

केप कॉलनीतही हिंदुस्तानींच्या विरोधात वृत्तपत्रांमधून थोडेबहुत आंदोलन सुरूच असायचे. उदाहरणार्थ हिंदुस्तानी मुले सरकारी शाळांवगैरेंमध्ये जाऊ शकत नव्हती. हिंदुस्तानी प्रवाशांना हॉटेल वगैरेमध्ये जागा क्वचितच मिळायची. अशा प्रकारे केप कॉलनीतसुद्धा हिंदुस्तानींबरोबर अपमानास्पद व्यवहार होत असे. परंतु व्यापार वा जमिनीच्या संबंधात हिंदुस्तानींना कोणत्याही प्रकारची अडचण सहन करावी लागली नाही.

केप कॉलनीत अशी परिस्थिती का होती याचे कारण मी इथे सांगितले पाहिजे. केप टाऊन आणि केप कॉलनीमध्ये प्रामुख्याने मलायी लोकांची संख्या फार मोठी होती. मलायी लोक मुसलमान होते. यामुळे हिंदुस्तानी मुसलमानांबरोबर लवकरच त्यांचे संबंध जुळणे स्वाभाविक होते. याशिवाय काही हिंदुस्तानी मुसलमानांनी मलायी स्त्रियांबरोबर वैवाहिक संबंधही जोडले होते. मलायी लोकांच्या विरोधात केप सरकार कोणताही कायदा तयार करू शकत नव्हते. केप कॉलनी त्यांची जन्मभूमी होती. आणि त्यांची भाषाही डच होती. या लोकांबरोबरच ते आधीपासून राहिले होते. यामुळे राहण्यावागण्यात मलायी लोकांनी त्यांचे बरेचसे अनुकरण केले होते. या सर्व कारणांमुळे केप कॉलनीत किमान रंगद्वेष होता.

शिवाय केप कॉलनी सगळ्यात जुनी वसाहत असल्यामुळे तसेच ती दक्षिण आफ्रिकेचे शैक्षणिक आणि सांस्कृतिक केंद्र होती. इथे समंजस, विनयशील आणि उदार मनाच्या गोऱ्यांनीही जन्म घेतला होता. माझे तर मत आहे की जगात असे एकही ठिकाण नाही की जिथे योग्य संधी मिळाल्यानंतर आणि चांगले शिक्षण आणि संस्कार मिळाल्यानंतर उत्तमोत्तम मानवपुष्प फुलणार नाही. हीच गोष्ट जमातीसंबंधीही म्हणता येईल. सौभाग्य की दक्षिण आफ्रिकेत प्रत्येक ठिकाणी मी असे मानवपुष्प पाहिले आहेत. परंतु केप कॉलनीत अशा लोकांची संख्या फार जास्त होती. त्यात सर्वात प्रसिद्ध आणि विद्वान होते मेरिमन. दक्षिण आफ्रिकेचे ग्लॅडस्टन म्हणून ते परिचित होते. १८७२ साली दक्षिण आफ्रिकेला जबाबदार सरकार मिळाले. तेव्हापासून प्रत्येक

मंत्रिमंडळात ते सदस्य राहिले होते. १९१०मध्ये दक्षिण आफ्रिकेचे जेव्हा संघराज्य निर्माण झाले तेव्हा ते त्याच्या अखेरच्या मंत्रिमंडळाचे प्रधानमंत्री होते. अजून दोन कुटुंब होते - संपूर्ण श्राईनर कुटुंब आणि मोल्टीनो कुटुंब. हे दोन्ही कुटुंब  मेरीमनच्या जरी बरोबरीत येत नव्हते तरी ते दुसऱ्या क्रमांकावर नक्कीच होते. सर जॉन मोल्टिनो १८७२च्या मंत्रिमंडळात पहिले प्रधानमंत्री होते. श्री डब्ल्यू. पी श्राईनर एक प्रसिद्ध अधिवक्ता होते. काही काळ ते महाधिवक्ताही राहिले होते. त्यांची प्रतिभासंपन्न बहीण ऑलीव्ह श्राईनर दक्षिण आफ्रिकेतील एक लोकप्रिय महिला होती आणि जिथे जिथे इंग्रजी भाषा बोलली जाते तिथे तिथे त्या विदुषी म्हणून प्रसिद्ध होत्या. सर्व माणसांवर त्यांचे अपार प्रेम होते. त्यांच्या डोळ्यातून केव्हाही असीम प्रेमाचा वर्षाव होताना दिसायचा. त्यांनी 'ड्रीम्स' नावाचे पुस्तक लिहिल्यापासून ड्रीम्सच्या लेखिका म्हणून त्या प्रसिद्ध झाल्या. त्यांच्यात इतका जास्त साधेपणा भरलेला होता की एका विख्यात कुटुंबातील विदुषी महिला असूनही त्या स्वतःच्या हाताने घरातील भांडी स्वच्छ करत असत. सर्वश्री मेरिमन, श्राईनर आणि मोल्टिनो या सर्वांनी नेहमीच हबशी लोकांची बाजू घेतली होती. जेव्हाकेव्हा हबशी लोकांच्या अधिकारावर गोऱ्याचे आक्रमण व्हायचे तेव्हा तेव्हा हे तिन्ही कुटुब त्यांची जोरदार बाजू घ्यायचे आणि त्यांचा बचाव करायचे. त्यांचे हे प्रेम हिंदुस्तानींकडेही वळायचे हे खरे असले तरी ते हबशी आणि हिंदुस्तानी यांच्यात भेद करायचे. त्यांचे म्हणणे होते की दक्षिण आफ्रिकेत गोरे येऊन वसले त्याच्या किती तरी आधीपासून हबशींचे इथे वास्तव्य होते. आणि यामुळे हबशींचे स्वाभाविक अधिकार गोरे हिरावून घेऊ शकत नाही. परंतु प्रतिस्पर्धेच्या भीतीने भारतीयांकरिता काही न्याय्य कायदे तयार करण्यात आले तर ती अन्याय्य गोष्ट म्हणता येणार नाही. असे असले तरी त्यांना हिंदुस्तानींबद्दलही सहानुभूती वाटायची. स्वर्गीय गोपाळ कृष्ण गोखले जेव्हा दक्षिण आफ्रिकेत आले होते त्या वेळी त्यांच्या सन्मानार्थ दक्षिण आफ्रिकेत जी पहिली सभा आयोजित करण्यात आली होती तिचे अध्यक्ष श्री श्राईनर होते. श्री मेरीमन हेही गोखल्यांशी अतिशय जिव्हाळ्याने आणि विनयाने बोलले होते, आणि त्यांनी हिंदुस्तानींबद्दलची आपली सहानुभूती व्यक्त केली होती. केप टाऊनच्या वृत्तपत्रांमध्येही इतर वसाहतींच्या तुलनेने फार कमी पक्षपात होता. हिंदुस्तानींच्या विरोधात ते इतके नव्हते.

श्री मेरीमन आणि श्री श्रीईडर यांच्याबद्दल मी जे काही लिहिले तसे इतर युरोपियांबद्दलही लिहिता येऊ शकेल. इथे तर उदाहरण म्हणून काही प्रसिद्ध नावे दिली आहेत. हे खरे आहे की अशा कारणामुळे केप कॉलनीमध्ये इतर वसाहतींच्या तुलनेत नेहमीच भेदभाव कमी राहिला आहे. तरीही हिंदुस्तानींविरुद्ध जे वारे दक्षिण आफ्रिकेच्या इतर वसाहतींमध्ये सतत वाहत होते त्याचा वास केप कॉलनीतील वाऱ्याला लागल्याशिवाय कसा राहू शकत होता? यामुळे तिथेही नातालप्रमाणेच हिंदुस्तानींच्या प्रवेशावर आणि व्यापारावर निर्बंध आणणारे 'इमिग्रेशन रजिस्ट्रेशन ॲक्ट' आणि 'डिसर्ल लायसन्सेस ॲक्ट' हे कायदे मंजूर करण्यात आले.

यामुळे असे म्हणते येऊ शकते की दक्षिण आफ्रिकेचे जे दार हिंदुस्तानींकरिता सताड उघडे होते ते बोअर युद्धाच्या वेळी जवळपास बंद झाले होते. ट्रान्सवालमधील हिंदुस्तानींच्या प्रवेशावर लागलेल्या तीन पौंड शुल्काशिवाय इतर कोणतेच नियंत्रण नव्हते. परंतु जेव्हा नाताल आणि केप कलनीचे बंदर हिंदुस्तानींकरिता बंद झाले तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या आतील भागातील ट्रांसवालमध्ये जाण्याकरिता हिंदुस्तानी कुठे उतरू शकणार होते? पोर्चुगीज बंदर डेलागोआ बे इथे उतरून ते ट्रान्सवालला जाऊ शकत होते. परंतु तिथेही कमीअधिक प्रमाणात ब्रिटिश वसाहतीचे अनुकरण करण्यात आले होते. यामुळे इतकेच सांगता येऊ शकते की अनेक अडचणी सहन करून आणि लाच देऊन एखाददुसरा हिंदुस्तानी ट्रान्सवालमध्ये पोहोचू शकत होता.

# ६. हिंदुस्तानींनी काय केले? - १

हिंदुस्तानींच्या स्थितीबद्दल विचार करत असताना आपल्यावर होणाऱ्या आक्रमणाचा हिंदुस्तानींनी कसा प्रतिकार केला हे मागील प्रकरणात आपण पाहिले. परंतु सत्याग्रहाच्या निर्मितीची चांगल्या प्रकारे कल्पना करून देण्याकरिता हिंदुस्तानी जनतेने आपल्या सुरक्षेकरिता कोणकोणते प्रयत्न केले हे सांगणारे एक वेगळे प्रकरण देणे जरुरीचे आहे.

सन १८९३पर्यंत दक्षिण आफ्रिकेत शिकलेल्या आणि दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींच्या हिताकरिता लढू शकणाऱ्या हिंदुस्तानींची संख्या फार कमी होती. इंग्रजी येणाऱ्या हिंदुस्तानींमध्ये प्रामुख्याने कारकून होते. आपल्या कामाच्या गरजा पूर्ण करण्याइतके इंग्रजीचे ज्ञान त्यांना होते, परंतु ते अर्ज तयार करू शकत नव्हते. याशिवाय त्यांना आपला सगळा वेळ मालकाला द्यावा लागत होता. इंग्रजी शिक्षण घेतलेला दुसरा असा वर्ग होता की जो दक्षिण आफ्रिकेतच जन्मलेला होता. यांच्यातील बहुतेक गिरमिट्यांचे वंशज होते आणि थोडीशी पात्रता आल्याबरोबर यांच्यातील बहुतेक लोक न्यायालयांमध्ये दुभाष्याची सरकारी नोकरी स्वीकारायचे. यामुळे हिंदुस्तानींबद्दल सहानुभूती व्यक्त करण्यापलीकडे ते काहीही करू शकत नव्हते. हीच त्यांची मोठ्यातमोठी सेवा होती.

याशिवाय गिरमिट्या मजुरांचा आणि गिरमिटमुक्त मजुरांचा वर्ग प्रामुख्याने उत्तर प्रदेश आणि मद्रास राज्यातून आला होता. आपण हेही पाहिले आहे की स्वतंत्र हिंदुस्तानींमध्ये प्रामुख्याने मुसलमान व्यापारी आणि हिंदू मुनीम वा मेहता होते. याशिवाय काही पारसी व्यापारी आणि कारकूनही होते. परंतु संपूर्ण दक्षिण आफ्रिकेत पारसी लोकांची संख्या ३० वा ४०च्या वर नव्हती. स्वतंत्र व्यापाऱ्यांमध्ये चौथा घटक सिंधी व्यापाऱ्यांचा होता. संपूर्ण दक्षिण आफ्रिकेत २०० वा थोडे अधिक सिंधी असावे. असे म्हणता येऊ शकते की हिंदुस्तानबाहेर ते जिथेकुठे जाऊन वसले तिथेतिथे त्यांचा व्यापार सारख्याच पद्धतीचा होता. फॅन्सी गुड्समध्ये विशेषतः चंदन आणि हस्तिदंताच्या तऱ्हेतऱ्हेच्या पेट्या आणि अशाच घरगुती गोष्टी ते विकत असतात आणि त्यांचे ग्राहक बहुधा गोरे लोकच असत.

गिरमिट्या मजुरांना गोरे लोक कुली म्हणून हाक मारत असत. कुलीचा अर्थ आहे ओझे वाहणारा मजूर. हे नाव दक्षिण आफ्रिकेत इतके प्रचलित झाले आहे की गिरमिट्यांनाही स्वतःला कुली म्हणवून घेण्यात संकोच वाटत नाही! आणि नंतर हे नाव सर्व हिंदुस्तानींना लावण्यात येऊ लागले. हिंदुस्तानी वकील आणि हिंदुस्तानी व्यापारी यांना शेकडो गोरे 'कुली वकील' आणि 'कुली व्यापारी' म्हणायचे! या विशेषणाचा प्रयोग करण्यात काही चूक आहे असे गोऱ्यांना जाणवत नव्हते. आणि बहुतेक गोरे लोक केवळ तिरस्कार व्यक्त करण्याकरिता 'कुली' या शब्दाचा प्रयोग करायचे. यामुळे गिरमिट्यांपेक्षा आपण वेगळे आहो हे दाखवण्याचा प्रयत्न स्वतंत्र हिंदुस्तानी करायचे. या कारणामुळे आणि आपण हिंदुस्तानातून जी कारणे स्वतःबरोबर घेऊन जातो त्या कारणांमुळे स्वतंत्र हिंदुस्तानींचा वर्ग आणि गिरमिट्यांचा आणि गिरमिटमुक्त हिंदुस्तानींचा वर्ग यांच्यात दक्षिण आफ्रिकेत भेद निर्माण झाला होता.

हा दुःखसागर मागे हटवण्याचे काम स्वतंत्र हिंदुस्तानी वर्गाने आणि प्रामुख्याने मुसलमान व्यापाऱ्यांनी आपल्या हाती घेतले होते. परंतु गिरमिट्ये मजूर आणि गिरमिटमुक्त मजूर त्यांचे सरळसरळ सहकार्य घेण्याचे जाणूनबुजून टाळण्यात आले. शक्य आहे की असे सहकार्य घेण्याची कल्पना त्या वेळी कोणाला सुचलीसुद्धा नसेल, आणि जरी सुचली असेल तरी या वर्गाला सामील केल्यामुळे काम बिघडण्याची टांगती तलवार त्यांच्या डोक्यावर राहिली असावी. याशिवाय मुख्य आक्रमण हिंदुस्तानी व्यापाऱ्यांवर होत असल्याच्या समजामुळेही ही संकुचितता आली असावी. अशा प्रकारच्या अडचणी असताना, इंग्रजीचे ज्ञान नसताना आणि हिंदुस्तानात सार्वजनिक कामाचा अनुभव नसतानाही असे म्हणता येऊ शकते की स्वतंत्र हिंदुस्तानींच्या या वर्गाने आपल्यावरील संकटाचा चांगल्या प्रकारे सामना केला. त्यांनी गोऱ्या वकिलांची आणि बॅरिस्टरांची मदत घेतली, अर्ज तयार केले आणि पाठवले. केव्हाकेव्हा शासनाकडे शिष्टमंडळही पाठवले. आणि जेव्हा जेव्हा शक्य झाले आणि सुचले तेव्हा तेव्हा अन्यायाचा विरोधही केला. १८९३पर्यंत ही स्थिती राहिली.

हे पुस्तक समजण्याकरिता वाचकांना काही तारखा लक्षात ठेवाव्या लागतील. या पुस्तकातील प्रमुख घटना त्यांच्या तारखांसह परिशिष्टात देण्यात आल्या आहेत. वेळोवेळी त्यांच्यावर दृष्टिक्षेप टाकला तर सत्याग्रहाचा लढा आणि त्याचे स्वरूप समजून घेण्याकरिता मदत होईल. सन १८९३पर्यंत ऑरेंज फ्री स्टेटमध्ये हिंदुस्तानींचे अस्तित्व संपुष्टात आले होते. ट्रान्सवालमध्ये १८८५च्या कायदा क्रमांक ३ची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न सुरू होता. गिरमिटे मजूरच वसाहतीत राहू शकतील आणि उरलेल्या हिंदुस्तानींना काढून टाकता येईल अशी पावले नातालमध्ये उचलण्याबद्दल विचार सुरू होता, आणि या ध्येपूर्तीच्या दृष्टीने जबाबदार शासनाचा अधिकार मिळवण्यात आला होता.

दक्षिण आफ्रिकेत जाण्याकरिता १८९३मध्ये मी हिंदुस्तान सोडला होता. गिरमिट्यांच्या इतिहासाची मला काहीही माहिती नव्हती. केवळ स्वार्थबुद्धीनेच मी तिथे गेलो होतो. दादा अब्दुल्ला यांच्या नावावर पोरबंदरच्या मेमन लोकांनी डरबन येथे एक प्रसिद्ध पेढी सुरू केली होती. तितकीच प्रसिद्ध पेढी त्यांचे प्रतिस्पर्धी आणि पोरबंदरचे मेमन तैय्यब हाजी खान खानमहमद यांची प्रिटोरिया येथे होती. दुर्दैवाने या प्रतिस्पर्ध्यांमध्ये एक खटला सुरू होता दादा अब्दुल्ला यांच्या भागीदाराने, जो पोरबंदर येथे होता, विचार केला की माझ्यासारखा नवखा वकील जर दक्षिण आफ्रिकेत गेला तर त्यांच्या खटल्यात थोडी जास्त मदत होईल. माझ्यासारखा पूर्णपणे नवशिक्या आणि अडाणी वकील खटला बिघडवू शकेल अशी थोडीशीही भीती त्यांना वाटली नाही. न्यायालयात जाऊन मला खटल्यात भाग घ्यायचा नव्हता हे याचे कारण होते. त्यांनी नेमलेल्या ख्यातनाम वकिलांना आणि बॅरिस्टरांना मला केवळ खटला समजून सांगायचा होता. म्हणजे मला दुभाष्याचे तेवढे काम करायचे होते. नवनवीन अनुभव घेण्याची मला हौस होती. प्रवासही मला आवडायचा. बॅरिस्टर म्हणून माझ्याकडे खटला घेऊन येणाऱ्या दलालांना पैसे देणे मला विषाप्रमाणे वाटायचे. काठेवाडमधील कारस्थानांचा आणि कावेबाजपणाचा मला वीट आला होता. आणि एका वर्षाच्या करारावरच मला दक्षिण आफ्रिकेत जायचे होते. हा प्रस्ताव मान्य करायला काहीही हरकत नाही असे मला वाटले. आणि माझ्या जाण्यायेण्याचा आणि तिथे राहण्याचा खर्च दादा अब्दुल्ला करणार असल्यामुळे यात गमावण्यासारखे तर माझ्याकडे काहीही

नव्हते. शिवाय ते १०५ पौंड फीसुद्धा देणार होते. हे सर्व बोलणे माझ्या स्वर्गीय मोठ्या भावाशी झाले. ते मला वडिलासारखे होते. त्यांच्याकरित जे योग्य होते ते माझ्याकरिताही योग्य होते. त्यांना मी दक्षिण आफ्रिकेत जाण्याची कल्पना पटली. यामुळे मी मे १८९३ मध्ये डरबन येथे पोहोचलो.

बॅरिस्टर! मग त्याची शान काय विचारायची! आपल्या रुबाबानुसार फ्रॉककोट, नेकटाय वगैरे पोषाख करून मोठ्या रुबाबात जहाजातून मी डरबन बंदरावर उतरलो. परंतु तिथे उतरताच माझे डोळे उघडले. दादा अब्दुल्लांच्या भागीदाराशी पोरबंदरमध्ये जेव्हा माझे बोलणे झाले होते तेव्हा त्यांनी नातालचे जे वर्णन केले होते त्याच्या अगदी उलट दृश्य मला तिथे पाहायला मिळाले. यात त्यांचा काहीही दोष नव्हता. याकरिता त्यांचा भोळेपणा, साधेपणा आणि वास्तव परिस्थितीचे अज्ञान कारण होते. नातालमध्ये हिंदुस्तानींना जो त्रास सहन करावा लागतो याची त्यांना काहीही कल्पना नव्हती. आणि गोऱ्यांचे जे अतिशय अपमानास्पद वागणे होते ते त्यांना अपमानास्पद वाटत नव्हते. आमच्याबरोबर गोऱ्यांची वर्तणूक अतिशय असभ्यपणाची आणि अपमानास्पद असते हे माझ्या पहिल्याच दिवशी लक्षात आले होते.

नातालमध्ये उतरल्यानंतर पंधरा दिवसांमध्येच मला आलेला कटू अनुभव म्हणजे आगगाडीत मला सहन कराव्या लागलेल्या त्रासाचे, म्हणजे रस्त्यात खावा लागलेला मार हॉटेलमध्ये जागा मिळवणे जवळपास अशक्य होणे या सर्वांचे वर्णन मी इथे करणार नाही. मी इतकेच सांगेन की हे सर्व अनुभव माझ्या हाडामासात भिनलेले आहेत. मी तिथे केवळ एकाच खटल्याकरिता गेलो होतो. त्यात माझी दृष्टी स्वार्थाची आणि कुतुहलाची होती. यामुळे त्या एका वर्षात आलेल्या दुःखाचा मी केवळ साक्षी राहिलो होतो. तिथूनच माझ्या कर्तव्याची सुरुवात झाली. माझ्याकरिता स्वार्थाच्या दृष्टीने दक्षिण आफ्रिकेला काहीही महत्त्व नव्हते. जिथे अपमान आणि तिरस्कार असेल तिथे पैसा कमावण्यात वा प्रवास करण्यात मला कोणतेही स्वारस्य वाटत नव्हते. उलट असे करणे मला अगदीच पसंत नव्हते. मी धर्मसंकटात सापडलो. माझ्यासमोर दोन मार्ग मोकळे होते. एक होता हिंदुस्तानात ज्या परिस्थितीचे मला ज्ञान नव्हते त्या परिस्थितीचे ज्ञान दक्षिण आफ्रिकेत आल्यानंतर झाल्यामुळे सेठ अब्दुल्ला यांच्याबरोबर झालेल्या करारातून मुक्त होऊन हिंदुस्तानात

परतणे. दुसरा होता, वाटेल त्या अडचणी आल्या तरी त्या सहन करून हाती घेतलेले काम पूर्ण करणे. कडाक्याच्या थंडीत मारित्झबर्ग स्टेशनवर पोलिसांचे धक्के खाऊन, प्रवास थांबवून आणि रेल्वेतून उतरून मी प्रतिक्षालयात बसलो होतो. माझे सामान कुठे आहे याचीसुद्धा मला काहीही कल्पना नव्हती. कोणाला विचारण्याचा धीर होत नव्हता. परत अपमान झाला तर? परत मार खावा लागला तर? अशा परिस्थितीत थंडीने कुडकुडत असताना झोप तरी कशी येईल? मनात विचारचक्र सुरू झाले. विचार करता करता फार रात्र झाली होती. त्या वेळी मी विचार केला, “येथून पळून जाणे भ्याडपणा होईल. हाती घेतलेले काम मी पूर्ण केलेच पाहिजे. व्यक्तिगत अपमान सहन करून आणि मार खावा लागला तर तोसुद्धा सहन करून आपण प्रिटोरिया येथे पोहोचायलाच पाहिजे.” प्रिटोरिया माझ्याकरिता केंद्र होते. ते माझे कर्तव्यस्थळ होते. तिथेच दादा अब्दुल्लांवरील खटला सुरू होता. आपले काम करत असताना हिंदुस्तानींचे काही दुःख कमी करता येत असेल तर ते करायचे असे मी ठरवले. या निर्धारानंतर मला थोडे बरे वाटले. थोडा जोरही आला. परंतु मला झोप मात्र येऊ शकली नाही.

सकाळ होताच मी दादा अब्दुल्लांच्या पेढीला, रेल्वेच्या महा व्यवस्थापकाला तार केली. दोन्ही ठिकाणावरून मला तारेचे उत्तर मिळाले. दादा अब्दुल्लांनी आणि त्या वेळी नातालमध्ये असलेले पेढीचे भागीदार सेठ अब्दुल्ला हाजी आदम झवेरींनी कठोर पावले उचलली. वेगवेगळ्या ठिकाणच्या आपल्या हिंदुस्तानी दलालांना माझी काळजी घेण्याकरिता त्यांनी तारा केल्या. ते महाव्यवस्थापकालाही (जनरल मॅनेजर) भेटले. स्थानिक दलालांना केलेल्या तारेमुळे मारित्झबर्गचे हिंदुस्तानी व्यापारी मला भेटले. त्यांनी मला धीर दिला आणि सांगितले की तुमच्यासारखे अनुभव आम्हालाही येत असतात. परंतु आम्हाला अशा अनुभवांची सवय झालेली असल्यामुळे आम्ही त्याची पर्वा करत नाही. व्यापार करणे आणि भावुक मन ठेवणे या दोन्ही गोष्टी सोबत सोबत कशा चालू शकतील? यामुळे पैशाबरोबर अपमान झाला तर पैसा आणि अपमान दोन्ही पेटीत ठेवायचा सिद्धांत आम्ही स्वीकारला आहे! त्याच स्टेशनवर मुख्य दारातून हिंदुस्तानींना येण्याला मज्जाव, तिकिट मिळण्यात येणाऱ्या अडचणी वगैरे अडचणींचे वर्णनही त्या व्यापाऱ्यांनी माझ्याजवळ केले. त्या रात्री आलेल्या आगगाडीने मी प्रिटोरियाकरिता रवाना

झालो. मी केलेला निर्धार खरा आहे की खोटा याची परीक्षा अंतर्यामी प्रभूने पुरेपूर पाहिली. प्रिटोरियाला पोहोचेपर्यंत मला अधिक अपमान आणि अधिक मार सहन करावा लागला. परंतु या सर्वांमुळे माझा निर्धार अधिकच दृढ झाला.

अशा प्रकारे मला अचानक दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींच्या दुःखद परिस्थितीचा चांगलाच अनुभव आला. संधी सापडताच प्रिटोरियातील हिंदुस्तानींशी यासंबंधात मी चर्चा करत असे. सर्व परिस्थिती त्यांना समजावून सांगत असे. परंतु याहून अधिक मी काहीही केले नाही. दादा अब्दुल्ला यांच्या खटल्यावर लक्ष ठेवणे आणि दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींचे दुःख दूर करण्याचा प्रयत्न करणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी होऊ शकत नाही असे मला वाटले. या दोन्ही गोष्टी सोबतसोबत करणे म्हणजे दोन्ही काम बिघडवणे ही गोष्ट माझ्या लक्षात आली. हे सर्व करताकरता १८९४ उजाडले. खटलाही संपला मी डरबनला परतलो. हिंदुस्तानात जाण्याची मी तयारी केली. दादा अब्दुल्लांनी माझ्याकरिता एक निरोपसमारंभही ठेवला. तिथे कोणी तरी माझ्या हाती 'नाताल मर्क्युरी' ठेवला. त्या वृत्तपत्रात नाताल विधिमंडळाच्या कामकाजाचा विस्तृत अहवाल छापला होता. त्यात 'हिंदुस्तानींचा मताधिकार' (इंडियन फ्रेन्चाईज) या शीर्षकाखाली काही ओळी मी वाचल्या. विधिमंडळाचे सदस्य निवडण्याच्या अधिकारापासून हिंदुस्तानींना वंचित करण्याबद्दल स्थानिक सरकार लवकरच एक विधेयक सादर करणार होते. हिंदुस्तानींचे सर्व अधिकार हिरावून घेण्याची ही सुरुवात आहे. हे माझ्या लक्षात आले. विधिमंडळातील भाषणांमधूनच सरकारचा हेतू स्पष्ट दिसून पडत होता. समारोहात आलेल्या सेठ मंडळींना आणि इतरांना मी तो अहवाल वाचून दाखवला आणि शक्य तितका त्याचा अर्थ समजावून सांगितला. याबद्दलच्या सर्व तथ्यांची मला माहिती नव्हती. या आक्रमणाला तोंड देण्याकरिता जबरदस्त लढा द्यायला पाहिजे हे मी त्यांना समजावून सांगितले. त्यांनी माझे म्हणणे कबूल केले. परंतु असा लढा देण्याबद्दलची आपली असमर्थता सांगून मला तिथेच राहण्याचा आग्रह केला. हा लढा संपेपर्यंत म्हणजे एक दोन महिने नातालमध्ये राहण्याचे मी कबूल केले. त्याच रात्री विधिमंडळाला पाठवण्याकरिता मी एक अर्ज तयार केला. विधेयकाचे पुढील वाचन स्थगित करावे अशी तारही मी सरकारला केली. लगेच एक समिती नेमण्यात आली. सेठ अब्दुल्ला हाजी आदम यांना

समितीचे अध्यक्ष बनवण्यात आले. वरील तार त्यांच्याच नावाने पाठवण्यात आली. विधेयकाचे वाचन दोन दिवसांकरिता स्थगित करण्यात आले. दक्षिण आफ्रिकेच्या विधिमंडळातून तो अर्ज नातालच्या विधिमंडळाकडे पाठवण्यात आला. हिंदुस्तानींचा तो पहिला अर्ज होता. त्याचा बराच परिणाम झाला. परंतु विधिमंडळात विधेयक मंजूर करण्यात आले. त्याचा शेवट कसा झाला हे मी चौथ्या प्रकरणात सांगितलेच आहे. अशा प्रकारचा लढा देण्याचा दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींचा हा पहिला अनुभव होता. यामुळे त्यांच्यात खूप उत्साह निर्माण झालेला होता. दररोज सभा व्हायच्या. सभांमध्ये दररोज अधिकाधिक लोक सहभागी व्हायचे. या कामाकरिता जितका पैसा पाहिजे होता त्याहून अधिक पैसा गोळा झाला. नकला करणे, सह्या घेणे वगैरे कामाकरिता अनेक स्वयंसेवक मिळायचे. पैसे न घेता स्वतःच्या खर्चाने ते काम करायचे. या लढ्यात गिरमिटमुक्त हिंदुस्तानीही उत्साहाने सामील झाले. ते सर्व इंग्रजी येणारे आणि सुंदर अक्षर लिहिणारे तरुण होते. त्यांनी नकला करण्याचे आणि इतर कामे रात्रंदिवस मोठ्या उत्साहाने केली. एका महिन्याच्या आत लॉर्ड रिपन यांना दहा हजार सह्यांचा अर्ज पाठवण्यात आला आणि माझे तात्कालिक काम संपले.

आता घरी परतण्याकरिता मी सर्वांना निरोप मागितला. परंतु या लढ्यात हिंदुस्तानींना इतका रस वाटू लागला की ते मला परतूच देत नव्हते. ते म्हणाले, "आम्हाला मुळापासून उखडून टाकण्याचा नाताल सरकारचा हा पहिला प्रयत्न आहे असे तुम्हीच आम्हाला समजावून सांगत असता. आपल्या अर्जाचे वसाहत मंत्र्यांकडून कोणते उत्तर येते हे कोणाला माहीत? आमचा उत्साह तर तुम्ही पाहिलाच आहे. काम करण्याकरिता आम्ही तयार आहो. तशी आमची इच्छाही आहे. आमच्याजवळ पैसाही आहे. परंतु कोणी मार्गदर्शक नसेल तर आतापर्यंत जे केले त्यावर पाणी फिरेल. यामुळे इथे राहणे तुमचे कर्तव्य आहे असे आम्हाला वाटते. " हिंदुस्तानींच्या रक्षणाकरिता एखादी संस्था तयार झाली तर बरे होईल. परंतु मी कुठे राहणार आणि कसा राहणार? त्यांनी मला पगार देण्याविषयी सुचवले. परंतु पगार घेण्याचे मी साफ नाकारले. सार्वजनिक कार्य मोठाले पगार घेऊन करता येत नसतात. आणि मी तर या आंदोलनाची पायाभरणी करणार होतो. त्या वेळेच्या माझ्या कल्पनेप्रमाणे मला वाटत होते की बॅरिस्टरला शोभा देईल आणि हिंदस्तानींची

प्रतिष्ठा वाढवील अशा इतमामाने मी राहिलो पाहिजे. परंतु याचा अर्थ होता मोठा खर्च. एकीकडे हिंदुस्तानींची सेवा करण्याऱ्या संस्थेच्या कामाकरिता लोकांवर दडपण आणून त्यांच्याकडून पैसे घेणे आणि संस्थेचे काम वाढवणे आणि दुसरीकडे माझ्या स्वतःच्या उपजीविकेकरिता त्याच संस्थेवर अवलंबून राहणे यात परस्पर विरोध होता. असे केल्यामुळे काम करण्याचे माझे सामर्थ्यही कमी झाले असते. या आणि अशाच इतर कारणामुळे सार्वजनिक कामाकरिता पैसा - “पगार” घेण्याला मी साफ नकार दिला. परंतु मी त्यांना सुचवले की तुमच्यातील प्रमुख व्यापाऱ्यांनी जर आपल्या वकिलीचे काम मला दिले व त्याकरिता मला आगाऊ रिटेनर (बॅरिस्टरला किंवा वकिलाला गुंतवून ठेवण्याकरिता दिलेला बयाणा) दिला तर मी इथे राहण्याकरिता तयार आहे. तुम्ही एक वर्षाचा रिटेनर द्यायला पाहिजे. एक वर्ष आपण परस्परांचा अनुभव घेऊ या. तुम्ही तुमच्या कामाचा आढावा घ्या, आणि पटले तर हे काम असेच पुढे सुरू राहू द्या.” माझ्या या सूचनेचे सर्वांनी स्वागत केले.

नातालच्या सर्वोच्च न्यायालयात वकिलीची सनद घेण्याकरिता मी अर्ज केला. नातालच्या लॉ सोसायटीने म्हणजेच वकील मंडळींनी त्या प्रस्तावाला विरोध केला. त्यांचे म्हणणे होते की नातालच्या कायद्याच्या अर्थानुसार कोणत्याही काळ्या वा गव्हाळ रंगाच्या माणसाला वकिलीची सनद देता येऊ शकत नाही. हा त्यांचा एकमेव युक्तिवाद होता. माझ्या अर्जाचे वकील दिवंगत श्री एस्कंब होते. ते महाधिवक्ता होते. आणि नंतर नातालचे प्रधानमंत्री झाले होते. वकील मंडळीच्या प्रमुख बॅरिस्टरने वकिलीच्या सनदेचा अर्ज कोणतेही शुल्क न घेता सादर करावा अशी प्रथा दीर्घ काळापासून सुरू होती. या प्रथेनुसार श्री एस्कंब यांनी माझा अर्ज सादर करण्याचे कबूल केले. ते दादा अब्दुल्लांचे मोठे वकीलही होते. वकील मंडळीचा युक्तिवाद सर्वोच्च न्यायालयाने अमान्य केला आणि माझा अर्ज स्वीकारला. अशा प्रकारे वकील मंडळीचा विरोध माझ्या प्रसिद्धीकरिता दुसऱ्यांदा कारणीभूत ठरला. दक्षिण आफ्रिकेच्या वकील मंडळीची तेथील वृत्तपत्रांनी टर उडवली आणि काहींनी माझे अभिनंदन केले.

सेठ अब्दुल्ला हाजी आदमजी यांच्या अध्यक्षतेखाली एक अस्थायी समिती नेमली होती. तिला आता स्थायी रूप देण्यात आले. हिंदुस्तानी राष्ट्रीय कॉंग्रेसच्या एकाही सभेत मी भाग घेतलेला नव्हता. परंतु तिच्याबद्दल ऐकले मात्र होते. हिंदुस्तानचे पितामह श्री दादाभाई नौरोजींचे मी दर्शन घेतले होते.मी त्यांची पूजा करत असे. यामुळे मी हिंदुस्तानी राष्ट्रीय कॉंग्रेसचाही भक्त झालो होतो. या कॉंग्रेसचे नाव लोकप्रिय करावे अशी भावनाही माझ्या मनात होती. माझ्यासारखा अननुभवी तरुण नवीन नाव काय शोधणार होता! चुक होण्याची धास्तीही मनात होती. यामुळे आपल्या संस्थेला 'नाताल इंडियन कॉंग्रेस' हे नाव द्यावे असा सल्ला मी स्थायी समितीला दिला. हिंदुस्तान राष्ट्रीय कॉंग्रेसबद्दलचे अर्धवट ज्ञान अर्धवट स्वरूपात मी नातालच्या हिंदुस्तानींसमोर ठेवले. अखेरीस १८९४च्या मे वा जून महिन्यात 'नाताल इंडियन कॉंग्रेस'ची स्थापना झाली. हिंदुस्तानी कॉंग्रेस आणि नाताल इंडियन कॉंग्रेस यांच्यात भेद हा होता की नाताल कॉंग्रेस वर्षातून ३६५ दिवस काम करायची आणि कमीतकमी ३ पौंड वर्गणी देणारेच तिचे सभासद होऊ शकत असत. कोणी अधिक रक्कम दिली तर तिचाही स्वीकार केला जाई. जास्त घेण्याकरिताही बराच आग्रह असायचा. वार्षिक २४ पौंड देणारेही पाचसात सदस्य निघाले. १२ पौंड देणारांची संख्याही बरीच मोठी होती. एका महिन्यात नाताल कॉंग्रेसचे जवळपास ३०० सदस्य झाले. त्यात हिंदू, मुसलमान, पारसी, ख्रिश्चन असे सर्व धर्मांचे, सर्व प्रांतांचे, म्हणजे नातालमध्ये ज्या ज्या प्रांतांचे लोक होते त्या सगळ्या प्रांतांचे लोक. मोठमोठे व्यापारी आपल्या वाहनात बसून दूरदूरच्या नवीन सदस्यांची नोंदणी करण्याकरिता जायचे. मागताक्षणीच सर्व लोक वर्गणी देत नसत. त्यांना समजून सांगावे लागायचे. अशा प्रकारे लोकांना समजावून सांगण्यात एक प्रकारचे राजकीय प्रशिक्षण मिळायचे आणि लोकांना परिस्थितीची जाणीवही व्हायची. याशिवाय महिन्यात एकदा तरी नाताल कॉंग्रेसची सभा व्हायचीच. तिच्यात त्या महिन्याच्या पैपैशाचा हिशोब सांगण्यात येत असे. आणि सदस्य तो मंजूर करत असत. त्या महिन्यात घडलेल्या सर्व घटनाही सांगितल्या जायच्या आणि इतिवृत्तात त्यांची नोंद घेतली जाई. सभासद विविध प्रश्न विचारायचे. नवीन विषय आणि नवीन काम याच्याविषयी विचारविनिमय होत असे. या सर्वांचा असा फायदा व्हायचा की जे लोक अशा सभेत कधी बोलत नसत तेही बोलू लागले. भाषणेसुद्धा व्यवस्थित आणि नीटनेटकी करावी

लागायची. हा सर्व एक नवीन अनुभव होता. हिंदुस्तानी लोकांनी यात खूप रस घेतला. लॉर्ड रिपन यांनी नातालचे विधेयक फेटाळून लावले असल्याची एवढ्यातच बातमी आली. यामुळे लोकांच्या आनंदात आणि विश्वासात निश्चितच भर पडली.

ज्याप्रमाणे बाहेरचे आंदोलन सुरू होते त्याचप्रमाणे हिंदुस्तानी समाजात सुधारणा करण्याकरिताही आंदोलन सुरू होते. हिंदुस्तानींच्या राहणीमानाबद्दल संपूर्ण दक्षिण आफ्रिकेतील गोरे जोरदार आंदोलन करत असायचे. हिंदुस्तानी फार घाणेरडे आहेत, फार कंजूष आहेत, ज्या ठिकाणी ते व्यापार करतात तिथेच ते राहतात, त्यांची घरे घाणेरडी असतात आणि त्यात वारा आणि प्रकाश खेळत नाही, ते स्वतःच्या सुखाकरिताही पैसा खर्च करत नााहीत असा त्यांचा हिंदुस्तानी लोकांवर आरोप असायचा. आणि शिवाय त्यांचे म्हणणे होते की अशा कंजूष आणि घाणेरड्या हिंदुस्तानींशी गोरे कशी काय स्पर्धा करू शकतील? यामुळे घरांच्या साफसफाईकरिता, घर आणि दुकान वेगवेगळे ठेवण्याबद्दल, कपडे नीटनेटके ठेवण्याबद्दल आणि मोठ्या व्यापाऱ्यांना शोभेल अशी राहणी स्वीकारण्याबद्दल नाताल कॉंग्रेसच्या सभेत भाषणे होत, वादविवाद व्हायचे आणि सूचनाही दिल्या जायच्या. ही सर्व कार्यवाही मातृभाषेतच (गुजरातीतच) होत असे.

या सर्व गोष्टींमुळे लोकांना स्वाभाविक रूपात किती व्यावहारिक शिक्षण मिळत असेल? नाताल कॉंग्रेसच्या अंतर्गत गिरमिटमुक्त हिंदुस्तानींच्या मुलांकरिता म्हणजेच नातालमध्येच जन्मलेल्या इंग्रजी बोलणाऱ्या हिंदुस्तानी तरुणांच्या सोयीकरिता एका शिक्षणमंडळाचीही (नाताल इंडियन एज्युकेशन असोसिएसन) स्थापना करण्यात आली. तिची वर्गणी नाममात्र ठेवण्यात आली होती. या संस्थेचा मुख्य उद्देश या तरुणांना एकत्र करणे, हिंदुस्तानींबद्दल त्यांच्या मनात प्रेम निर्माण करणे आणि त्यांना हिंदुस्तानचे सामान्यज्ञान देणे हा होता. स्वतंत्र हिंदुस्तानी व्यापारी त्यांना आपलीच माणसे समजतात हे त्या तरुणांना सांगणे आणि या व्यापाऱ्यांबद्दल त्यांच्या मनात आदरभाव उत्पन्न करणे हे संस्थेचे दुसरे उद्दिष्ट होते. नाताल कॉंग्रेसजवळ आपला खर्च भागवल्यानंतरही बराच पैसा शिल्लक पडलेला होता. या रकमेतून जमीन विकत घेण्यात आली. तिच्यापासून कॉंग्रेसला अजूनही उत्पन्न मिळते आहे.

हे सर्व इतक्या विस्ताराने मी जाणूनबुजून सांगितले आहे. वरील गोष्टी सविस्तर कळल्याशिवाय स्वाभाविक रूपात सत्याग्रहाचा जन्म कसा झाला आणि हिंदुस्तानी समाज त्याकरिता कसा तयार झाला हे वाचकांना पूर्णपणे कळू शकणार नाही. नाताल कॉंग्रेसवर कसकशी संकटे आली, सरकारी अधिकाऱ्यांनी तिच्यावर कशा प्रकारे आक्रमण केले व त्यापासून तिने आपला कसा बचाव केला हा आणि वाचकांना कळणे आवश्यक असलेला दुसरा इतिहासही मला सोडून द्यावा लागलेला आहे. परंतु एक गोष्ट इथे सांगणे आवश्यक आहे. हिंदुस्तानी समाज नेहमीच अतिशयोक्तीपासून दूर राहिला. समाजाच्या उणिवा आणि दोष दाखवण्याचा नेहमीच प्रयत्न केला जात असे. गोऱ्यांच्या युक्तिवादात जितके सत्य असायचे ते सर्व तात्काळ मान्य केले जात असे आणि स्वातंत्र्य आणि स्वाभिमानाचे रक्षण करून गोऱ्यांशी सहकार्य करण्याची जी कोणती संधी मिळायची तिचे स्वागत केले जाई. तसेच तिथल्या वर्तमानपत्रांमधून हिंदुस्तानी समाजावार जी टीका केली जाई तिचे उत्तरही त्यांच्याकडे पोहोचवण्यात येत असे.

नातालमध्ये जशी नाताल इंडियन कॉंग्रेस होती तशीच ट्रान्सवालमध्ये हिंदुस्तानींची एक संस्था होती. ट्रान्सवालची ही संस्था नाताल इंडियन कॉंग्रेसपासून अगदी वेगळी होती. या दोघींच्या घटनंमध्येही काही फरक होता. परंतु आता मी या चर्चेत पडणार नाही. अशीच एक संस्था केपटाऊनमध्येही होती आणि तिची घटना ट्रान्सवाल आणि नातालच्या संस्थेपेक्षा वेगळी होती. असे असले तरी या तिन्ही संस्थांचे काम जवळपास सारखेच होते असे मानता येऊ शकते.

१८९४चे वर्ष संपले. नाताल कॉंग्रेसचे वर्षसुद्धा १८९५च्या मध्यात पूर्ण झाले. वकील म्हणून मी केलेले काम माझ्या अशिलांना पसंत पडले. यामुळे नातालमधील माझ्या मुक्कामाचा अवधीही वाढला. हिंदुस्तानी समाजाची परवानगी घेऊन १८९६ साली सहा महिन्यांकरिता मी हिंदुस्तानात आलो. परंतु सहा महिने पूर्ण होण्याच्या आतच नातालहून तार आली आणि मला लगेच नातालला परतावे लागले. १८९६-९७च्या घटनांची चर्चा आपण वेगळ्या प्रकरणात करू.

## ७. हिंदुस्तानींनी काय केले? - २

अशा प्रकारे नाताल इंडियन कॉंग्रेसचे कार्य स्थिरावले व संस्थेचा पायाही भक्कम झाला. मी जवळपास अडीच वर्षे नातालमध्ये राहिलो आणि या काळात मी प्रामुख्याने राजकीय कार्य केले. आता मी विचार केला की मला जर दक्षिण आफ्रिकेत बराच काळ राहायचे असेल तर माझ्या कुटुंबियांना दक्षिण आफ्रिकेत आणणे जरुरीचे आहे. हिंदुस्तानचा एक लहानसा प्रवास करून येण्याचीही मला इच्छा झाली. हिंदुस्तानात असताना हिंदुस्तानी पुढाऱ्यांना नातालची आणि दक्षिण आफ्रिकेच्या अन्य वसाहतींची थोडक्यात कल्पना द्यावी अशीही मनात इच्छा होती. कॉंग्रेसने मला सहा महिन्याची सुटी दिली होती. आणि माझ्या जागी प्रसिद्ध व्यापारी मरहूम आदमजी मियाखान तिच्या सचिवपदी नियुक्त झाले. त्यांनी अतिशय कौशल्याने कॉंग्रेसचे काम चालवले. त्यांना इंग्रजी चांगल्या प्रकारे कळत होती आणि अनुभवाने त्यांनी कामापुरत्या इंग्रजीच्या ज्ञानात चांगलीच भर घातली होती. त्यांचा गुजरातीचा अभ्यास सामान्य होता. त्यांचा व्यापार प्रामुख्याने हबशी लोकांमध्ये सुरू असायचा. यामुळे झुलू भाषा आणि हबशींचे रीतीरिवाज यांचे त्यांना चांगले ज्ञान झाले होते. त्यांचा स्वभाव गोड आणि मनमिळावू होता. आवश्यक तितकेच ते बोलायचे. हे सर्व लिहिण्याचा इतकाच हेतू आहे की जबाबदारीचे पद सांभाळण्याकरिता जितकी गरज इंग्रजीच्या ज्ञानाची असते त्यापेक्षा किती तरी जास्त आवश्यकता खरेपणा, शांतता, सहनशीलता, निर्धार, समयसूचकता, साहस आणि व्यावहारिक बुद्धीची असते. ज्या माणसात या सुंदर आणि उदात्त गुणांचा अभाव असेल त्याच्यात उच्च कोटीची विद्वत्ता जरी असली तरी सामाजिक कार्यात त्याचे काहीही मोल नसते.

१८९६च्या मध्यात मी हिंदुस्तानात परतलो. मी कलकत्ताच्या मार्गाने आलो कारण त्या काळात नातालहून हिंदुस्तानात येण्याकरिता कलकत्त्याला जाणारे जहाज सहज मिळायचे. गिरमिट्ये मजूर कलकत्त्याहून किंवा मद्रासवरून जहाजात बसायचे. कलकत्त्याहून मुंबईला जात असताना रस्त्यात माझी ट्रेन चुकली. यामुळे एक दिवस मला अलाहाबादला थांबावे लागले. तिथूनच मी माझे काम सुरू केले. 'पायोनिअर' या वृत्तपत्राचे श्री चेजनी यांना मी भेटलो. ते

माझ्याशी सौजन्याने बोलले. परंतु आपली सहानुभूती वसाहतीतील गोऱ्यांकडून असल्याचे त्यांनी मला सौजन्यपूर्वक आणि स्पष्टपणे सांगितले. परंतु मी जर काही लिहिले तर ते वाचण्याचे आणि त्यावर टिपणी करण्याचे आश्वासन त्यांनी मला दिले. माझ्याकरिता इतके पुरेसे होते.

हिंदुस्तानात असताना दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींच्या परिस्थितीवर प्रकाश टाकणारी एक पुस्तिका मी लिहिली. तिच्यावर जवळपास सर्व हिंदुस्तानी वृत्तपत्रांनी संपादकीय टिपण्या लिहिल्या. तिच्या दोन आवृत्त्या काढाव्या लागल्या. त्या पुस्तिकेच्या ५,००० प्रती देशातील विविध भागात पाठवल्या. याच वेळी मी हिंदुस्तानी नेत्यांच्या भेटी घेतल्या. मुंबईत सर फिरोजशहा मेहता, न्यायमूर्ती बद्रूद्दिन तैय्यबजी, महादेव गोविंद रानडे आदी, पुण्यात लोकमान्य टिळक आणि त्यांची मंडळी, प्राध्यापक भांडारकर, गोपाळ कृष्ण गोखले आणि त्यांची मंडळी इत्यादींना मी भेटलो. मुंबईहून सुरुवात करून मी पुण्यात आणि मद्रासमध्ये भाषणेही दिली. या सर्व विस्तारात मी इथे शिरू इच्छित नाही.

परंतु आपल्या विषयाशी कोणताही संबंध नसला तरी पुण्यातील एक पवित्र आठवण सांगण्याचा मोह मी आवरू शकत नाही. तेथील सार्वजनिक सभा लोकमान्य टिळकांच्या हाती होती आणि स्वर्गीय गोखले यांचा संबंध डेक्कन सभेशी होता. सर्वात आधी मी टिळक महाराजांना भेटलो. पुण्यात सभा घेण्याविषयी जेव्हा मी त्यांना सांगितले तेव्हा त्यांनी विचारले, “तुम्ही गोपाळरावाना भेटलात? त्यांना ओळखता?”

मी सांगितले, “अजून मी त्यांना भेटलो नाही. केवळ नावानेच मी त्यांना ओळखतो. परंतु त्यांची भेट घेण्याचा माझा उद्देश आहे.”

लोकमान्य, “तुम्हाला हिंदुस्तानच्या राजकारणाची माहिती नाही असे दिसते.”

मी म्हणालो, “इंग्लंडमधून शिक्षण घेऊन परतल्यानंतर मी हिंदुस्तानात फार कमी काळ राहिलो, आणि त्या वेळीसुद्धा मी राजकारणाच्या विषयापासून फार दूर होतो. हे काम माझ्या आवाक्यातील नाही असे मला वाटत होते.”

लोकमान्य - "मग तुम्हाला थोडी माहिती सांगावी लागेल. पुण्यात दोन पक्ष आहेत. एक सार्वजनिक सभेचा आणि दुसरा डेक्कन सभेचा."

मी म्हणालो, "याबद्दल मला थोडीशी कल्पना आहे."

लोकमान्य - "इथे सभा घेणे सोपे आहे. परंतु तुम्हाला तुमचा प्रश्न सर्वांसमोर ठेवायचा आहे आणि सर्वांची मदत घ्यायची आहे असे दिसते. ही गोष्ट मला आवडली. परंतु सार्वजनिक सभेचा कोणी तुमच्या सभेचा अध्यक्ष झाला तर डेक्कन सभेचा एकही सदस्य त्या सभेला येणार नाही. यामुळे तुम्ही एखादा तटस्थ अध्यक्ष शोधला पाहिजे. मी याबाबतीत केवळ सूचना करू शकतो. माझ्याकडून दुसरी कोणतीही मदत होऊ शकणार नाही. तुम्ही प्राध्यापक भांडारकरांना ओळखता? ओळखत नसाल तरी त्यांच्याकडे जा. ते तटस्थ म्हणून गणले जातात. ते राजकारणात भागसुद्धा घेत नाहीत. परंतु तुमच्या सभेचे अध्यक्ष होण्याकरिता तुम्ही कदाचित त्यांचे मन वळवू शकाल. श्री गोखले यांच्याशी बोला. त्यांचाही सल्ला घ्या. शक्य आहे की तेसुद्धा तुम्हाला माझ्यासारखाच सल्ला देतील. प्राध्यापक भांडारकरांसारखा सज्जन माणूस जर तुमच्या सभेचा अध्यक्ष झाला तर मला खात्री आहे की सभा यशस्वी होण्याचे काम दोन्ही पक्ष आपल्या हाती घेतील. या बाबतीत आमच्याकडून तर तुम्हाला पूर्ण मदत मिळेल."

लोकमान्यांचा हा सल्ला घेतल्यानंतर मी गोखल्यांकडे गेलो. या पहिल्या भेटीतच त्यांनी माझे अंतःकरण कसे जिंकले ते मी अन्यत्र लिहिलेच आहे. जिज्ञासू वाचकांनी 'यंग इंडिया' अथवा 'नवजीवन'ची (२८ जुलै १९२१) फाईल त्याकरिता वाचली पाहिजे. लोकमान्यांचा सल्ला गोखल्यांना पसंत पडला. मी लगेच प्रा. भांडारकर यांच्याकडे गेलो. त्या वयोवृद्ध विद्वानाचे मी दर्शन घेतले. नातालमधील हिंदुस्तानींची कहाणी लक्षपूर्वक ऐकल्यानंतर ते म्हणाले, "तुम्ही पाहतच आहा की मी सार्वजनिक जीवनात क्वचितच भाग घेत असतो. आता मी म्हातारा झालो आहे. तरीही तुमच्या गोष्टींनी मी प्रभावित झालो आहे. सर्व पक्षांची मदत घेण्याचा तुमचा विचार मला पसंत आहे. तुम्ही तरुण आहा आणि हिंदुस्तानच्या राजकीय परिस्थितीशी तुम्ही परिचित नाही. यामुळे मी तुमचा प्रस्ताव स्वीकारला असल्याचे दोन्ही पक्षांना सांगा. त्यांच्यातील कोणी

मला जेव्हा सूचना देईल तेव्हा मी हजर होईन." आणि पुण्यात सुंदर सभा झाली. दोन्ही पक्षाचे पुढारी तिच्यात हजर राहिले.आणि दोन्ही पक्षाच्या पुढाऱ्यांनी तिच्यात भाषणेही दिली.

त्यानंतर मी मद्रासला गेलो. तिथे जस्टिस सुब्रमण्यम ऐय्यर, श्री पी. आनंदचार्लू, 'हिंदू' वृत्तपत्रांचे संपादक जी. सुब्रमण्यम, 'मद्रास स्टॅन्डर्ड'चे संपादक श्री परमेश्वरन पिल्ले, प्रख्यात वकील श्री भाष्यम ऐय्यंगार, श्री नॉर्टन वगैरेंनाही मी भेटलो. तिथे एक मोठी सभा झाली. तिथून मी कलकत्त्याला गेलो. तिथे मी सुरेंद्रनाथ बॅनर्जी, महाराज ज्योतिंद्र मोहन टागोर, 'इंग्लिशमन'चे संपादक श्री सॉन्डर्स आणि इतर काहींना भेटलो. कलकत्त्यात सभेची तयारी सुरू होती. एवढ्यात नोव्हेंबर १८९६मध्ये मला नातालची तार मिळाली - "लगेच परता." माझ्या लक्षात आले की हिंदुस्तानींच्या विरोधात तिथे कोणते ना कोणते नवीन आंदोलन सुरू झाले असावे. यामुळे कलकत्त्याचे काम पूर्ण न करताच मी परतलो आणि मुंबईहून मिळणाऱ्या पहिल्याच जहाजात माझ्या कुटुंबियांबरोबर चढलो. हे जहाज दादा अब्दुल्ला यांच्या पेढीने विकत घेतले होते. त्यांच्या अनेक उपक्रमांमधील एक उपक्रम जहाज चालवण्याचा होता. हा उपक्रम त्यांनी पहिल्यांदाच सुरू केला होता. या जहाजाचे नाव 'कुरलॅन्ड' होते. माझे तिकीट 'कुरलॅन्ड'चे होते. हे जहाज रवाना झाल्यानंतर त्याच दिवशी लगेच पर्शियन कंपनीचे एक जहाज 'नादरी'सुद्धा मुंबईहून नातालकरिता रवाना झाले. दोन्ही जहाजांमध्ये दक्षिण आफ्रिकेला जाणारे जवळपास ८०० प्रवासी असावे.

दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींच्या परिस्थितीबद्दल हिंदुस्तानात मी जे आंदोलन केले होते त्याला फार महत्त्व होते. हिंदुस्तानातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांनी त्याची दखल घेतली आणि रुटरने त्यासंबंधी अनेक तारा विलायतेत पाठवल्या. विलायतेत पोहोचलेल्या तारांच्या आधारावर रुटरच्या प्रतिनिधिने एक संक्षिप्त तार दक्षिण आफ्रिकेत पाठवली. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध हिंदुस्तानात मी जे काही म्हणालो होतो त्याला त्या तारेत अतिशयोक्त रूप देण्यात आले होते. अशी अतिशयोक्ती अनेकदा आपण पाहत असतो. अशा प्रकारची अतिशयोक्ती अनेकदा जाणीवपूर्वक करण्यात येत नसते. कामात व्यस्त असलेले लोक, ज्यांचे आधीपासून स्वतःचे काही

पूर्वग्रह आणि ठाम विचार असतात, ते एखादी गोष्ट वरवर वाचतात व नंतर त्याची गोळाबेरीज करून त्यापासून एक सारांश तयार करतात. त्यांनी केलेल्या या सारांशात केव्हा केव्हा त्यांचा कल्पनाविलासही उतरतो. मग त्यांनी तयार केलेल्या सारांशाचा विविध ठिकाणी वेगवेगळा अर्थ लावला जातो. हे सर्व अनाहूतपणे घडत असते. सार्वजनिक कार्याशी जुळलेला हा धोका आहे. आणि तीच त्याची मर्यादाही आहे. हिंदुस्तानात असताना मी नातालच्या गोऱ्यावर टीका केली होती, त्यांच्यावर आरोप केले होते. गिरमिट्यावर लावण्यात आलेल्या ३ पौंड कराची मी अतिशय कठोर शब्दांत निंदा केली होती. बालासुंदरम (मूळ गुजरातीत इथे याचे नाव सुब्रमण्यम देण्यात आले आहे. ते चूक वाटते. आत्मकथेत बालसुंदरम नाव आहे. तेच बरोबर आहे.) नावाच्या एका निर्दोष गिरमिट्यावर त्याच्या मालकाने हल्ला केला. त्यामुळे त्याच्या शरीरावर ज्या जखमा झाल्या होत्या त्या मी माझ्या डोळ्यांनी पाहिल्या होत्या. त्याचा सर्व खटला माझ्याकडे होता. बालसुंदरमच्या यातनांचे चित्रण माझ्या शक्तीनुसार मी पुष्कळ चांगले करू शकलो होतो. माझ्या भाषणाचा सार सांगणारा रुटरचा अर्धसत्य वृत्तांत जेव्हा नातालच्या गोऱ्यांनी वाचला तेव्हा त्यांचा आगडोंब उसळला. विशेष तर हे आहे की नातालमध्ये असताना याविषयी मी जे लिहिले होते व बोललो होतो ते हिंदुस्तानात मी जे लिहिले वा बोललो त्यापेक्षा किती तरी तिखट आणि विस्तृत होते. हिंदुस्तानात मी अशी एकही गोष्ट सांगितली नव्हती की जिच्यात किंचितही अतिशयोक्ती असेल. परंतु एखाद्या घटनेचे वर्णन जेव्हा आपण अपरिचित व्यक्तीसमोर करतो तेव्हा जेवढा अर्थ आपण त्या अपरिचित व्यक्तीला सांगतो तेव्हा अपिरचित वाचक वा श्रोता आपण सांगतो त्यापेक्षा जास्त अर्थ घेत असतो हे मी माझ्या अनुभवाने सांगू शकतो. यामुळे हिदुस्तानात मी नातालचे चित्रण काही प्रमाणात सौम्य केले होते. परंतु नातालमध्ये मी जे काही लिहत असे ते फार कमी गोरे वाचायचे.आणि त्याची पर्वा तर फारच कमी गोरे करायचे. हिंदुस्तानात मी लिहिलेल्या वा बोललेल्या शब्दांचा यापेक्षा वेगळाच परिणाम होऊ शकला असता आणि झालाही. रुटरचा साररूपी अहवाल तर हजारो गोरे वाचायचे. शिवाय जो विषय तारेमुळे दखल घेण्यासारखा वाटतो त्या विषयाला वास्तवात जितके महत्त्व असते त्यापेक्षा किती तरी जास्त महत्त्व मिळते. नातालच्या गोऱ्यांना वाटले की माझ्या कामाचा हिंदुस्तानातील लोकांवर तितकाच प्रभाव पडला असावा

जितका त्यांना जाणवला होता, आणि यामुळे कदाचित गिरमिट प्रथाच बंद पडेल व शेकडो गोऱ्या मालकांचे नुकसान होईल. याशिवाय हिंदुस्तानातील लोकांसमोर नातालच्या लोकांची बदनामी झाली असेही त्यांना वाटले.

अशा प्रकारे नातालचे गोरे आधीच माझ्यावर चिडलेले होते. 'कुरलॅन्ड'वरून माझ्या कुटुंबासह मी नातालला परततो आहे आणि त्या जहाजात माझ्याशिवाय तीनचारशे हिंदुस्तानी प्रवासी असल्याचेही त्यांनी त्याच मनःस्थितीत ऐकले. आणि या जहाजाबरोबर येत असलेल्या 'नादरी' जहाजातही तेवढेच प्रवासी असल्याचेही त्यांना कळले. या बातमीने आगीत तेल ओतण्याचे काम केले. नातालमध्ये गोऱ्यांच्या मोठ्या मोठ्या सभा झाल्या. जवळपास सर्व गोऱ्या पुढाऱ्यांनी त्यांत भाग घेतला. सभांमध्ये माझ्यावर आणि सामान्यपणे हिंदुस्तानी प्रवाशांवर कठोर टीका करण्यात आली. कुरलॅन्ड आणि नादरीच्या आगमनाला नातालवर होणाऱ्या आक्रमणाचे रूप देण्यात आले. सभेत बोलणाऱ्या लोकांनी असा अर्थ लावला की या दोन्ही जहाजावरील ८०० प्रवाशांना मीच नाताळमध्ये आणतो आहे. तसेच सभेतील लोकांच्या मनात असेही भरवण्यात आले की स्वतंत्र हिंदुस्तानींनी नाताल भरून टाकण्याकरिता मी उचललेले हे पहिले पाऊल आहे. दोन्ही जहाजावरील प्रवाशांना आणि मला नातालच्या भूमीवर उतरू द्यायचे नाही असेही सभेत ठरवण्यात आले की नाताल सरकार जर या प्रवाशांना उतरण्यापासून अडवणार नसेल तर या सभेत नेमण्यात आलेल्या गोऱ्यांच्या समितीने कायदा आपल्या हातात घ्यावा आणि आपल्या बळावर प्रवाशांना उतरण्यापासून अडवावे! दोन्ही जहाज एकाच दिवशी नातालच्या डरबन बंदरात पोहोचले.

वाचकांना आठवतच असेल की हिंदुस्तानात प्लेगचे अगदी पहिले दर्शन १८९६ साली झाले होते. आम्हाला हिंदुस्तानात परतायला लावण्याचा नाताल सरकारला कायदेशीर कोणताही अधिकार नव्हता. या वेळेपर्यंत इमिग्रेशन रेस्ट्रिक्शन ॲक्ट (प्रतिबंधात्मक प्रवेश कायदा) अस्तित्वात आलेला नव्हता. नाताल सरकारची संपूर्ण सहानुभूती गोऱ्यांनी नेमलेल्या वरील समितीकडून होती. नाताल सरकारचे एक मंत्री दिवंगत श्री एस्कंब त्या समितीत पूर्ण भाग घ्यायचे. समितीला

भडकवण्याचे कामही तेच करायचे. एखाद्या जहाजावर संसर्गजन्य रोगाचा उपद्रव असेल तर त्या जहाजाला विशिष्ट मुदतीकरिता क्वारंटाईनमध्ये ठेवण्यात यावे असा प्रत्येक बंदरात नियम असतो. याचा अर्थ जहाजाबरोबरचा संपर्क तोडणे आणि प्रवाशांना उतरण्याकरिता आणि जहाजावरील माल उतरवू देण्याकरिता मनाई करणे. असा प्रतिबंध आरोग्याच्या नियमानुसार आणि बंदराच्या आरोग्याधिकाऱ्याच्या परवानगीनेच लावता येऊ शकतो. नाताल सरकारने प्रतिबंध लावण्याच्या या अधिकाराचा उपयोग वा असे म्हणा की दुरुपयोग केला आणि जहाजावरील यात्रेकरूंना कोणताही संसर्गजन्य रोग नसताना दोन्ही जहाजांना २३ दिवसांकरिता डरबनच्या प्रवेश मार्गावर अडकवून ठेवले. मध्यंतरीच्या काळात गोऱ्यांच्या समितीचे काम सुरूच होते. दादा अब्दुल्ला कुरलॅन्डचे मालक होते. आणि नादरीचे एजंटही होते. त्यांना समितीने खूप धमक्या दिल्या. दोन्ही जहाज हिंदुस्तानात परत नेण्याकरिता काही गोऱ्यांनी त्यांना प्रलोभनही दाखवले, आणि जहाज परत नेले नाही तर त्यांच्या व्यापारावर गदा आणण्याची भीतीही दाखवली. परंतु पेढीचे भागीदार भित्रे नव्हते. धमकी देणाऱ्या गोऱ्यांना त्यांनी सुनावले, "आमचा सर्व व्यापार बुडाला, आम्ही धुळीस मिळालो तरी आम्ही अखेरपर्यंत लढू. परंतु घाबरून असहाय प्रवाशांना परत पाठवण्याचा अपराध आम्ही करणार नाही. लक्षात ठेवा की तुम्हाला जसा तुमच्या देशाचा अभिमान आहे तसाच आम्हालाही आमच्या देशाचा अभिमान आहे." या पेढीचे जुने वकील श्री एफ. ए. लॉटनही साहसी आणि बहाद्दूर होते.

योगायोगाने याच काळात दिवंगत श्री मनसुखलाल हिरालाल नाझर (सुरतचे कायस्थ आणि दिवंगत नानीबाई हरिदास यांचा भाचा ) दक्षिण आफ्रिकेत पोहोचले. मी त्यांना ओळखत नव्हतो. त्यांच्या जाण्याची मला काहीही कल्पना नव्हती. नादरी आणि कुरलॅन्डमधील प्रवाशांना दक्षिण आफ्रिकेत आणण्यात माझा मुळीच हात नव्हता हे मी सांगण्याची बहुधा आवश्यकता नसावी. त्यातील अनेक लोक दक्षिण आफ्रिकेचे आधीचेच रहिवासी होते. आणि बहुतेक लोक ट्रांसवालला जाण्याकरिता या जहाजात चढले होते. गोऱ्यांच्या समितीने या प्रवाशांकरिता धमकीने भरलेले निरोप पाठवले. कप्तानाने ते निरोप प्रवाशांना वाचून दाखवले. त्यात स्पष्टपणे लिहिले होते - "नातालचे गोरे अतिशय चिडलेले आहेत. ते असे चिडलेले असताना जर प्रवासी उतरले तर

समितीचे लोक एकेका हिंदुस्तानीला उचलून समुद्रात फेकून देतील." धमकीने भरलेल्या या संदेशाचा अनुवाद करून "कुरलॅन्डच्या" प्रवाशांना मी सांगितला. "नादरी"च्या प्रवाशांना तेथील इंग्रजी समजणाऱ्या प्रवाशांनी अनुवाद करून सांगितला. दोन्ही जहाजांवरील प्रवाशांनी परतायला साफ नकार दिला. त्यांनी असेही सांगितले की "बहुतेक प्रवाशांना ट्रान्सवालला जायचे आहे. जे नातालमध्ये उतरणार आहेत त्यांतील बहुतेक नातालचे जुने रहिवासी आहेत. ते काहीही असले तरी आमच्यापैकी प्रत्येक हिंदुस्तानीला नातालमध्ये उतरण्याचा कायदेशीर अधिकार आहे. आणि आमचा हा अधिकार सिद्ध करण्याकरिता कोणत्याही परिस्थितीत आम्ही नातालमध्ये उतरू."

नाताल सरकारही थकले होते. अनुचित आणि अन्याय्य प्रतिबंध किती दिवस लावता येणे शक्य होते? २३ दिवस पूर्ण झाले. परंतु ना तर दादा अब्दुल्ला वाकले ना प्रवासी. २३ दिवसांनंतर प्रतिबंध उठवण्यात आला आणि जहाजाला बंदरात येण्याची परवानगी मिळाली. मध्यंतरीच्या काळात श्री एस्कंब यांनी उत्तेजित झालेल्या समितीला शांत केले. सभा घेऊन नातालच्या गोऱ्यांना त्यांनी सांगितले, "डरबनमध्ये युरोपियांनी ऐक्याचे आणि धैर्याचे सुुंदर दर्शन घडवले आहे. तुमच्याकडून झाले तितके तुम्ही केले आहे. सरकारनेही तुम्हाला मदत केली. त्यांनी हिंदुस्तानींना २३ दिवस अडवून ठेवले. तुम्ही तुमच्या भावनेचे आणि उत्साहाचे जे दर्शन घडवले ते पुरेसे आहे. याचा इंग्लंडच्या साम्राज्य सरकारवर चांगला परिणाम होईल. तुमच्या कामामुळे नाताल सरकारचे काम सोपे झाले आहे. आता जर शक्तिप्रदर्शन करून हिंदुस्तानी प्रवाशांच्या उतरण्यावर तुम्ही अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर तुम्ही आपल्या कामाचे आणि तुमचे स्वतःचेही नुकसान कराल. नाताल सरकारची स्थिती तुम्ही अवघड कराल. असे करूनसुद्धा हिंदुस्तानींना अडवण्यात तुम्हाला यश येणार नाही. या प्रवाशांचा तर काहीच अपराध नाही. त्यांच्यात स्त्रिया आणि मुलेही आहेत. मुंबईत ते जेव्हा जहाजात चढले तेव्हा त्यांना तुमच्या भावनेची काहीही कल्पना नव्हती. यामुळे आता तुम्ही इथून निघून जायला पाहिजे. आणि प्रवाशांच्या उतरण्यात यत्किंचितही अडथळा आणायला नको. परंतु मी तुम्हाला इतके वचन देतो की भविष्यात इथे येणाऱ्या हिंदुस्तानींवर प्रतिबंध आणायचा अधिकार नाताल सरकार विधिमंडळाकडून मिळवील." इथे मी श्री एस्कंब यांच्या भाषणाचा केवळ सारांशच दिला आहे. श्री एस्कंब यांच्या

भाषणाने त्यांचा श्रोतृसमुदाय नक्कीच नाराज झाला. परंतु तरीही त्यांच्या आवाहनानंतर गोरे निघून गेले आणि दोन्ही जहाज बंदरात पोहोचले.

दिवसाच्या वेळी मी जहाजातून उतरू नये असा निरोप श्री एस्कंब यांनी माझ्याकरिता पाठवला. मला घेण्याकरिता संध्याकाळी ते बंदराच्या सुपरिटेंडन्टला पाठवणार होते. त्यांच्याबरोबरच मी घरी जाणार होतो. परंतु माझे कुटुंब कोणत्याही क्षणी उतरु शकत होते. हा काही कायदेशीर हुकूम नव्हता. मला उतरू न देण्याबद्दल जहाजाच्या कप्तानाला केवळ सल्ला देण्यात आला होता आणि माझ्या डोक्यावर लटकत असलेल्या धोक्याबद्दल मला सूचीतही करण्यात आले होते. कप्तान मला बळजबरीने अडवू शकत नव्हता. परंतु ही सूचना मान्य केली पाहिजे असे मला वाटले. माझ्या मुलांना मी स्वतःच्या घरी न पाठवता डरबनचे प्रसिद्ध व्यापारी आणि माझे जुने अशील आणि मित्र पारसी रुस्तमजी यांच्या घरी पाठवले आणि मी तुम्हाला तिथेच भेटेन असे त्यांना सांगितले. प्रवासी उतरल्यानंतर दादा अब्दुल्लांचे वकील आणि माझे मित्र श्री लॉटन जहाजावर मला भेटायला आले. त्यांनी मला विचारले, “तुम्ही अजून का उतरला नाही?” मी त्यांना एस्कंब यांच्या पत्रातील मजकूर सांगितला. ते म्हणाले, “मला तरी सायंकाळपर्यंत वाट पाहणे आणि चोराप्रमाणे शहरात शिरणे पसंत नाही. तुम्हाला जर भीती वाटत नसेल तर आताच तुम्ही माझ्याबरोबर चला. जणू काय काही घडलेच नाही अशा प्रकारे आपण शहरात जाऊ या.” मी म्हणालो, “मला वाटत नाही की मी कोणत्याही प्रकारे घाबरलो आहे. श्री एस्कंब यांच्या पत्रातील सूचना मान्य करायची की नाही हा माझ्यासमोर शिष्टाचारासंबंधीचा प्रश्न आहे. तसेच जहाजाच्या कप्तानावर जबाबादारी आहे की काय याचाही थोडा विचार केला पाहिजे.” श्री लॉटन हसून म्हणाले, “श्री एस्कंब यांनी तुमच्याकरिता असे काय केले आहे की त्यांनी दिलेल्या सल्ल्यावर तुम्ही थोडासाही विचार केला पाहिजे असे तुम्हाला वाटते? याशिवाय त्यांनी दिलेल्या सल्ल्यात केवळ माणुसकीच आहे आणि अजून काही रहस्य दडलेले नाही असा विश्वास बाळगण्याचे तुमच्याजवळ कोणते सबळ कारण आहे? शहरात काय झाले आहे आणि त्यात या महाशयांचा किती हात आहे हे तुमच्यापेक्षा मला जास्त माहीत आहे. (मी मध्येच मान हलवली.) आणि आपण जरी असे समजलो की श्री एस्कंब यांनी दिलेल्या या सल्ल्यामागे माणुसकीच आहे तरीही माझे

मत आहे की त्यांच्या सल्ल्यानुसार वागल्यामुळे तुमच्या प्रतिष्ठेला धक्का लागेल. यामुळे तुम्ही आताच माझ्याबरोबर चलावे असा माझा तुम्हाला सल्ला आहे. कप्तान आपलाच माणूस असल्यामुळे त्याची जबाबदारी आपलीही जबाबदारी आहे. त्याला विचारणारे केवळ दादा अब्दुल्लाच असू शकतात. याबद्दल त्यांना काय वाटेल हे मला माहीत आहे. त्यांनी या लढ्यात फार मोठे शौर्य दाखवले आहे." मी म्हणालो, "ठीक आहे, आपण चलू या. मला कोणतीही तयारी करायची नाही. केवळ माझी पगडीच मला डोक्यावर ठेवायची आहे. कप्तानाला सांगू आणि आपण निघू." आम्ही कप्तानची परवानगी घेतली.

श्री लॉटन डरबनचे फार जुने आणि प्रसिद्ध वकील होते. हिंदुस्तानात जाण्यापूर्वीच माझे त्यांच्याशी घनिष्ट संबंध स्थापित झालेले होते. माझ्या कठीण खटल्यांमध्ये मी त्यांचीच मदत घेत असे आणि अनेकदा मोठा वकील म्हणूनही त्यांनाच ठेवत असे. ते साहसी आणि शरीराने धिप्पाड होते.

आमचा रस्ता डरबनमधील सर्वात मोठ्या मोहल्ल्यातून जात होता. आम्ही रवाना झालो त्या वेळी सायंकाळचे चार वा साडेचार वाजलेले असतील. आकाश थोडेसे ढगाळ होते. परंतु सूर्य झाकण्याकरिता ते पुरेसे होते. रुस्तमजींच्या घरी पोहोचण्याकरिता कमीतकमी एक तासाचा तो रस्ता होता. आम्ही जहाजातून उतरत नाही तोच काही गोऱ्या मुलांनी आम्हाला पाहिले. त्यांच्यात वयस्कर असा एकही माणूस नव्हता. सामान्यपणे बंदरावर जितकी माणसे असतात तितकीच माणसे तिथे दिसत होती. माझ्या पद्धतीची पगडी घालणारा तिथे केवळ मीच होतो. यामुळे मुलांनी मला ताबडतोब ओळखले. ते "गांधी", "गांधी", "त्याला मारा", "त्याला पकडा" असे ओरडत आमच्याकडे आले. काही मुले खडे, दगडही फेकू लागले. आता काही मोठी माणसेही त्यांच्यात येऊन मिसळली. हळूहळू आक्रमकांची गर्दी वाढू लागली. पायी चालण्यात धोका आहे असे श्री लॉटन यांना वाटले. यामुळे त्यांनी रिक्षा बोलावला. रिक्षाचा अर्थ आहे माणसाने ओढायची लहानशी गाडी. मी तर रिक्षात कधीच बसलो नव्हतो. ज्या वाहनात माणूस बसतो आणि माणूस ते वाहन ओढतो अशा वाहनात बसण्याची मला घृणा वाटायची हे त्याचे कारण होते. तरीही त्या वेळी मला वाटले की आज रिक्षात बसणे माझे कर्तव्य आहे. परंतु ईश्वराला ज्या माणसाला

वाचवायचे असते तो जरी खाली पडू पाहील तरी तो त्याला खाली पडू देत नाही असा अनुभव मला माझ्या जीवनात पाचसहा कठीण प्रसंगी आला आहे. त्या कठीण प्रसंगी माझे अधःपतन झाले नाही याचे श्रेय तर मी मुळीच घेऊ शकत नाही. दक्षिण आफ्रिकेत रिक्षा ओढणारे हबशीच असतात. गोऱ्या मुलांनी आणि त्यांच्यात सामील झालेल्या मोठ्या माणसांनी रिक्षावाल्याला धमकी दिली की तू जर या माणसाला रिक्षात बसवशील तर तुलाही मारू आणि तुझा रिक्षाही तोडून टाकू. यामुळे रिक्षावाला “खा” (नाही) म्हणून पळाला आणि मी रिक्षात बसू शकलो नाही.

आता आमच्यासमोर पायी चालण्याशिवाय कोणताच मार्ग उरला नव्हता. जसजसे आम्ही पुढे जाऊ लागलो तसतशी गोऱ्यांची गर्दी वाढतच चालली होती. वेस्ट स्ट्रीट या हमरस्त्यावर आम्ही दोघेही पोहोचेपर्यंत गर्दीत लहानमोठे शेकडो लोक गोळा झाले होते. एका ताकदवान गोऱ्याने श्री लॉटन यांना उचलून माझ्यापासून दूर केले. यामुळे माझ्याजवळ पोहोचण्याच्या परिस्थितीत ते नव्हते. माझ्यावर शिव्यांचा आणि दगडांचा वा त्यांच्या हाती जे काही पोहोचेल त्याचा वर्षाव होऊ लागला. माझ्या डोक्यावरील पगडी खाली पाडण्यात आली. एवढ्यातच एक मोठा धट्टाकट्टा गोरा माझ्याजवळ आला. आधी तर त्याने मला जोरात एक थापड मारली आणि नंतर एक लाथ मारली. घेरी येऊन मी खाली पडणारच होतो तेवढ्यात जवळच्या एका घराच्या अंगणातील जाळी माझ्या हाती लागली. तिथे मी थोडा दम घेतला. चक्कर कमी झाल्यानंतर पुढे चालू लागलो. जिवंतपणी मुक्कामावर पोहोचण्याची आशा मी जवळपास सोडून दिली होती. तरीही मला इतके चांगले आठवते की त्या वेळी मला मारणारे गोरे दोषी आहेत असे मला वाटत नव्हते.

अशा अडचणीच्या अवस्थेत मी रस्त्यातून जात होतो, तेवढ्यात डरबनच्या पोलीस सुपरिडेन्डन्टची बायको माझ्या समोरून निघाली. आम्ही एकमेकांना चांगले ओळखत होतो. ती एक शूर महिला होती. तेव्हा आकाशात ढग गोळा झालेले होते व सूर्यही बुडू लागलेला होता. तरीही त्या महिलेने माझ्या बचावाकरिता आपली छत्री उघडली. आणि माझ्या बाजूबाजूने ती चालू लागली. ते लोक कोणा महिलेचा अपमान आणि त्यातही डरबनच्या लोकप्रिय जुन्या पोलीस सुपरिन्टेंडन्टच्या बायकोचा अपमान तर करूच शकत नव्हते. तिला कोणत्याही प्रकारची

इजासुद्धा ते पोहोचवू शकत नव्हते. यामुळे तिला टाळून माझ्यावर जो हल्ला व्हायचा त्याचे स्वरूप फार मामुली होते. एवढ्यात माझ्यावर सुरू असलेल्या हल्ल्याची बातमी पोलीस सुपरिटेन्डन्टला कळली. त्यांनी माझ्या संरक्षणाकरिता पोलीस पाठवले. त्यांनी येऊन माझ्याभोवती घेराव घातला. आमचा रस्ता पोलीस स्टेशनपासून जात होता. आम्ही जेव्हा तिथे पोहोचलो तेव्हा पोलीस सुपरिटेन्डन्ट आमची वाट पाहत तिथे उभे असलेले दिसले. त्यांनी मला पोलीस ठाण्याच्या आत जाण्याचा सल्ला दिला. मी त्यांचे आभार मानले पण ठाण्यात जायला नकार दिला. मी म्हणालो, "कोणत्याही अवस्थेत मी माझ्या मुक्कामी पोहोचणे आवश्यक आहे. डरबनच्या लोकांच्या न्यायीपणावर आणि माझ्या सत्यावर माझा विश्वास आहे. माझ्या संरक्षणाकरिता तुम्ही पोलीस पाठवले याकरिता मी तुमचा आभारी आहे. श्रीमती अलेक्झॅन्डर यांनी मला वाचवले."

तेथून मी कोणत्याही त्रासाशिवाय सहीसलामत रुस्तुमजींच्या घरी पोहोचलो. त्यांच्या घरी पोहोचता पोहोचता जवळपास सायंकाळ झाली होती. कुरलॅंड जहाजाचे डॉक्टर दाजी बरोसर रुस्तमजींच्या घरीच होते. त्यांनी माझा इलाज सुरू केला. माझे घाव तपासून पाहिले. घाव जास्त नव्हते. एक गुप्त मार लागला होता. त्याच्याच फार वेदना होत होत्या. परंतु शांततेने आराम करायचा अधिकार मला अजून मिळायचा होता. रुस्तमजी सेठ यांच्या घराजवळ हजारो लोक गोळा झाले होते. रात्र झालेली असल्यामुळे त्यांच्यात लुच्चेलफंगे लोकही सामील झाले होते. गांधीला तुम्ही आमच्या स्वाधीन केले नाही तर त्याच्याबरोबर आम्ही तुमचे दुकानही जाळून टाकू असा निरोप रुस्तमजी सेठना त्यांनी पाठवला. परंतु रुस्तमजी कोणाच्या धमकीने घाबरून जातील असे हिंदुस्तानी नव्हते. या गोष्टीचा पत्ता लागताच पोलीस सुपरिन्टेंडटनी गुप्त पोलीस पाठवले आणि ते स्वतःही त्या गर्दीत घुसले. त्यांनी एक बाक मागवला आणि त्यावर चढून ते उभे राहिले. रुस्तमजींच्या घराचे दार तोडून कोणी आत शिरू नये म्हणून लोकांशी गप्पागोष्टी करण्याच्या निमित्ताने त्यांनी त्या दाराचा ताबा घेतला. तिथे पोहोचताच त्यांनी एका कर्मचाऱ्याला हिंदुस्तानी व्यापाऱ्यासारखे दिसावे म्हणून हिंदुस्तानी पोषाख करून चेहरा रंगवायला सांगितले. आणि त्याबरोबर मला भेटून पुढील निरोप सांगायचा हुकूम दिला - "तुम्हाला जर तुमच्या मित्राचो, त्याच्याकडे आलेल्या पाहुण्यांचा जीव वाचवावयाचा असेल, त्यांच्या मालाचे आणि कुटुंबाचे रक्षण

व्हावे अशा इच्छा असेल तर तुम्ही हिंदुस्तानी पोलिसाचा पोषाख करून पारसी रुस्तमजींच्या गोदामातून माझ्या माणसाबरोबर गुपचुप निघून जायला पाहिजे. या बोळीच्या कोपऱ्यावर तुमच्याकरिता गाडी तयार ठेवण्यात आली आहे तुम्हाला आणि इतरांना वाचवण्याचा माझ्याजवळ केवळ हाच उपाय आहे. जमाव इतका उत्तेजित झाला आहे की त्याला नियंत्रणात आणण्याकरिता माझ्याजवळ दुसरे कोणतेही साधन नाही. तुम्ही जर इथून लवकर निसटला नाही तर हे घर जमीनदोस्त केले जाईल. इतकेच नाही तर तुम्ही इथे राहिल्यामुळे किती प्राणाहनी आणि मालमत्तेची हानी होईल हेही मी सांगू शकत नाही."

परिस्थितीचे गांभीर्य ताबडतोब माझ्या लक्षात आले. मी लगेच हिंदुस्तानी शिपायाचा पोषाख केला आणि रुस्तमजींच्या घरातून बाहेर पडलो. तो पोलीस अधिकारी आणि मी सुखरूप ठाण्यात पोहोचलो. मध्यंतरीच्या काळात पोलीस अधीक्षक श्री अलेक्झॅन्डर प्रासंगिक गाण्यांनी आणि गोष्टींनी जनतेचे मनोरंजन करत होते. मी पोलीसठाण्यात पोहोचलो असल्याचा निरोप मिळाल्यानंतर गंभीर होऊन जमावाला त्यांनी विचारले -

"तुम्हा लोकांना काय हवे आहे?"

"आम्हाला गांधी हवा आहे."

"गांधीला घेऊन तुम्ही काय कराल?"

"आम्ही त्याची होळी करू. त्याने आमच्याबद्दल खूप खोटेनाटे सांगितले आहे. नातालमध्ये त्याला हजारो हिंदुस्तानींना घुसवायचे आहे."

"परंतु गांधी बाहेर निघाला नाही तर तुम्ही काय कराल?"

"मग आम्ही हे घर जाळून टाकू."

"या घरात तर गांधीची मुले आणि बायकोही आहे. इतर स्त्रीपुरुषही आहेत. स्त्रियांना आणि मुलांना जाळताना तुम्हाला लाज वाटणार नाही?"

"हा तुमचा दोष असेल. असे करण्याकरिता तुम्ही आम्हाला लाचार करत आहा. इतर कोणालाही इजा पोहोचवावी अशी आमची इच्छा नाही. गांधी आमच्या ताब्यात द्या. बस तेवढ्याने आमचे समाधान होईल. गुन्हेगाराला तुम्ही आमच्या ताब्यात देणार नाही आणि त्याला पकडल्यामुळे इतरांचे नुकसान होईल त्याची जबाबदारी तुम्ही आमच्यावर टाकाल हा कुठला न्याय?"

पोलीस अधीक्षक स्मित करत जमावाला म्हणाले, "गांधी तर तुमच्यातून सुरक्षितपणे दुसऱ्या ठिकाणी पोहोचला आहे."

खळखळून हसत लोक ओरडू लागले, "हे खोटे आहे! हे सपशेल खोटे आहे!"

श्री अलेक्झॅन्डर त्यांना म्हणाले, "तुमचा जर तुमच्या म्हाताऱ्या पोलीस अधीक्षकावर विश्वास नसेल तर तुम्ही तुमच्या तीनचार माणसांची एक समिती तयार करा. अजून कोणीही घरात घुसणार नाही असे वचन तुम्ही मला दिले पाहिजे. गांधी जर घरात सापडला नाही तर तुम्ही सर्वांनी शांतपणे आपापल्या घरी निघून जायला पाहिजे. उत्तेजित होऊन आज तुम्ही पोलीस अधिकाऱ्याचा अधिकार मान्य केला नाही. यामुळे पोलिसांची नाही तर तुमची बदनामी झाली आहे. यामुळे पोलिसांना तुमच्याशी डाव खेळावा लागला. त्यांनी तुमच्यासमोरून तुमची शिकार पळवली आणि तुम्हा सर्वांची हार झाली याकरिता तुम्ही पोलिसांना दोष देऊ शकणार नाही. ज्या पोलिसाला तुम्ही निवडले आहे त्याने आपले कर्तव्य पार पाडले आहे."

पोलीस अधीक्षकांनी हे सर्व इतक्या गोड शब्दांत, इतक्या विनोदी पद्धतीने आणि इतक्या दृढतेने सांगितले असल्यामुळे जमावाला त्यांनी जे वचन मागितले होते ते जमावाने त्यांना दिले. जमावाने समिती तयार केली आणि तिने घराचा कानाकोपरा तपासून पाहिला आणि बाहेर येऊन सांगितले, "अधीक्षकांचे म्हणणे खरे आहे. त्यांनी आपल्याला हरवले." सर्व लोकांची निराशा झाली. परंतु त्यांनी आपले वचन पाळले. सर्व आपापल्या घरी निघून गेले. तो दिवस १३ जानेवारी १८९३ होता. प्रवाशांवरील प्रतिबंध दूर होताच डरबनच्या वृत्तपत्राचा एक वार्ताहर त्याच दिवशी सकाळी माझ्याकडे आला होता आणि सर्व काही मला विचारून गेला होता. माझ्यावर करण्यात आलेल्या सगळ्या आरोपांचे पूर्ण स्पष्टीकरण देणे माझ्याकरिता सोपी गोष्ट होती. हिंदुस्तानात मी किंचितही

अतिशयोक्ती केली नव्हती हे सर्व उदाहरणे देऊन मी त्या वार्ताहराजवळ सिद्ध केले. जे काही मी केले ते माझे कर्तव्य होते. माझ्या कर्तव्याचे पालन मी केले नसते तर मानवजातीत गणना करण्यालायकही मी राहिलो नसतो. या सर्व गोष्टी डरबनच्या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झाल्या आणि सुज्ञ आणि समंजस लोकांनी आपली चूक कबूल केली. वृत्तपत्रांनी नातालच्या लोकांकडून आपली सहानुभूती व्यक्त केली, परंतु त्याचबरोबर त्यांना माझ्या कामाचेही पूर्णपणे समर्थन केले. यामुळे माझी प्रतिष्ठा वाढली आणि माझ्याबरोबर हिंदुस्तानी समाजाचीही. गरीब हिंदुस्तानीसुद्धा लाचार आणि नामर्द नसतो आणि हिंदुस्तानी व्यापारी व्यापाराची पर्वा न करता स्वाभिमानाकरिता आणि देशाकरिता लढू शकतो ही गोष्ट युरोपीय लोकांसमोर सिद्ध झाली.

यात समाजाला फार त्रास सहन करावा लागला. दादा अब्दुल्लांना तर फार मोठा तोटा सहन करावा लागला. परंतु माझे मत आहे की यामुळेसुद्धा समाजाचा अखेरीस फायदाच झाला. समाजालाही आपल्या शक्तीचा थोडा अंदाज आला व त्याचा आत्मविश्वास वाढला. मलाही अधिक अनुभव आला आणि अधिक शिकायला मिळाले. आज मी जेव्हा त्या दिवसाचा विचार करतो तेव्हा ईश्वर मला सत्याग्रहाकरिता तयार करत होता असे मला वाटते.

नातालच्या घटनांचा इंग्लंडमध्येही परिणाम झाला. ज्या गोऱ्यांनी माझ्यावर हल्ला केला होता त्यांच्यावर खटला भरण्यात यावा, मला न्याय मिळावा अशी चेम्बरलेन यांनी नाताल सरकारला तार केली. श्री एस्कंब त्या वेळी नाताल सरकारचे महाधिवक्ता होता. त्यांनी मला बोलावले आणि चेम्बरलेन यांच्या तारेबद्दल  सांगितले. गोऱ्यांनी माझ्यावर केलेल्या हल्ल्यात मला झालेल्या दुखापतीबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला, आणि धोक्यातून वाचल्याबद्दल त्यांनी आनंदही व्यक्त केला. ते असेही म्हणाले, “तुम्हाला वा तुमच्या समाजाच्या कोणत्याही माणसाला दुखापत व्हावी अशी माझी अगदीच इच्छा नव्हती. युरोपियांच्या आक्रमणामुळे तुम्हाला दुखापत होण्याची मला भीती वाटत होती. यामुळेच जहाजातून दिवसा न उतरता रात्री उतरा अशी मी तुम्हाला सूचना पाठवली होती. परंतु ती तुम्हाला पटली नाही. तुम्ही श्री लॉटन यांचा सल्ला मान्य केला याबद्दल मी तुम्हाला किंचितही दोष देत नाही. तुम्हाला जे योग्य वाटले ते करण्याचा तुम्हाला पूर्ण अधिकार

होता. श्री चेम्बरलेन यांच्या मागणीशी नाताल सरकार पूर्णपणे सहमत आहे. अपराध्यांना शिक्षा झाली पाहिजे अशी आमचीही इच्छा आहे. आक्रमण करणारांपैकी तुम्ही कोणाला ओळखू शकाल?"

मी उत्तर दिले, "शक्य आहे की एकदोन माणसांना मी ओळखूही शकेन. परंतु माझ्यावर झालेल्या या हल्ल्यासंबंधी कोणाच्याही विरोधात मला न्यायालयात तक्रार करायची नाही असे मी माझ्या मनात आधीच ठरवले आहे ही गोष्ट पुढे जाण्याआधीच मी तुम्हाला सांगितली पाहिजे. हल्ला करणाऱ्या लोकांचा तर यात मला मुळीच दोष दिसत नाही. त्यांना जी काही माहिती मिळाली ती त्यांच्या नेत्यांकडून मिळाली. ती खरी की खोटी याचा शोध घेईपर्यंत ते गप्प बसून राहू शकत नव्हते. माझ्याबद्दल जे ऐकले ते सर्व जर त्यांना खरे वाटले असेल तर त्यांचे उत्तेजित होणे आणि आवेशात येऊन जे करायला नको होते ते करणे स्वाभाविकच होते. यात मी त्या लोकांचा दोष मानत नाही. उत्तेजित झालेला जमाव न्याय मिळवण्याकरिता अशाच प्रकारे प्रयत्न करत असतो. या बाबतीत जर कोणाचा दोष असेल तर तो यासंबंधात नेमण्यात आलेल्या समितीचा आहे, तुमचा आहे, आणि म्हणून नाताल सरकारचा आहे. रुटरने कशीही तार केली असली तरी तुम्हाला माहीत होते की मी इथे येतो आहे. यामुळे हिंदुस्तानातील माझ्या कामासंबंधी तुम्हा लोकांच्या मनात ज्या कोणत्या शंका निर्माण झाल्या होत्या त्यासंबंधी मला विचारणे तुमचे कर्तव्य होते. माझे उत्तर ऐकल्यानंतर तुम्हाला जे योग्य वाटले असते ते तुम्ही करू शकला असता. आता माझ्यावर जो हल्ला झाला त्याबद्दल मी तुमच्यावर वा समितीवर खटला तर भरू शकत नाही. आणि खटला चालवणे शक्य असले तरी असा न्याय मला न्यायालयाकडून मिळवण्याची इच्छा नाही. नातालच्या गोऱ्यांच्या अधिकाराच्या रक्षणार्थ तुम्हाला जी पावले उचलावीशी वाटली ती तुम्ही उचलली. हा राजकीय विषय आहे आणि मला राजकीय क्षेत्रातच तुमच्याशी झगडावे लागेल आणि तुम्हाला आणि नातालच्या गोऱ्यांना दाखवून द्यावे लागेल की ब्रिटिश साम्राज्याचा एक मोठा भाग म्हणून हिंदुस्तानी समाज गोऱ्यांना कोणत्याही प्रकारची हानी न पोहोचवता आपल्या अधिकाराचे आणि स्वाभिमानाचे रक्षण करू इच्छितो."

श्री. एस्कंब म्हणाले, “तुम्ही जे काही म्हणता ते मी समजू शकतो, आणि ते मला आवडलेही. तुमच्यावर हल्ला करणारांवर खटला भरण्याची तुमची इच्छा नाही हे ऐकण्याची माझी तयारी नव्हती. आणि त्यांच्यावर खटला चालवण्याची जरी तुमची इच्छा असती तरी मी नाराज झालो नसतो. परंतु खटला न चालवण्याचा तुमचा निर्णय आता तुम्ही मला सांगितलेला असल्यामुळे तुमचा निर्णय योग्य आहे असे सांगताना मला संकोच वाटत नाही. इतकेच नाही तर यामुळे तुम्ही तुमच्या समाजाची अधिक सेवा कराल. याचबरोबर मी तुम्हाला हेही सांगितले पाहिजे की यामुळे नाताल सरकारला तुम्ही अडचणीतून वाचवाल. तुमची इच्छा असेल तर आम्ही आक्रमकांना अटक वगैरेही करू. परंतु यामुळे गोरे अधिकच भडकतील आणि तऱ्हेतऱ्हेची टीका होईल हे तुम्हाला सांगण्याची आवश्यकता नाही. आणि हे कोणतेही सरकार पसंत करू शकत नाही. परंतु खटला न भरण्याचा तुमचा निर्णय अंतिम असेल तर तुमचे हे विचार व्यक्त करणारे पत्र तुम्ही मला लिहून दिले पाहिजे. चेम्बरलेन यांना केवळ आपल्या चर्चेचा गोषवारा पाठवून मी माझ्या सरकारचा बचाव करू शकत नाही. तुमच्या पत्राचा आशयच मी चेम्बरलेन यांच्याकडे पाठवायला पाहिजे. परंतु असे पत्र तुम्ही आताच्या आता लिहून द्या असे मी म्हणणार नाही. तुमच्या मित्रांशी यासंबंधात तुम्ही विचारविनिमय करा. मि. लॉटन यांचाही सल्ला घ्या. हे सर्व केल्यानंतरही तुम्ही तुमच्या विचारांवर जर ठाम असाल तरच तुम्ही मला वरील आशयाचे पत्र लिहून द्या. परंतु तुमच्यावर आक्रमण करणारांवर खटला न भरण्याची जबाबदारी तुम्हाला तुमच्या शिरावर घ्यावी लागेल इतके मात्र मी तुम्हाला सांगतो. असे झाले तरच मी तुमच्या पत्राचा उपयोग करू शकेन.”

मी त्यांना म्हणालो, “या घटनेच्या संबंधात तुम्ही मला बोलावले असल्याची मला कल्पना नव्हती. या संबंधात ना मी कोणाशी विचारविनिमय केला आहे, ना करण्याची इच्छा आहे. मी जेव्हा श्री लॉटन यांच्याबरोबर जहाजावरून उतरण्याचा निर्णय घेतला तेव्हाच माझ्या मनात मी ठरवले होते की गोऱ्यांनी मला कितीही त्रास दिला तरी मी त्याचे वाईट वाटून घेणार नाही. यामुळे आक्रमण करणारांवर खटला भरण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. माझ्याकरिता हा धार्मिक प्रश्न आहे. आणि तुमच्याप्रमाणेच माझे मत आहे की असे केल्यामुळे केवळ माझ्या समाजाचीच सेवा होणार नाही

तर त्यामुळे माझा स्वतःचाही लाभ होईल. यामुळे सर्व जबाबदारी माझ्या शिरावर घेत मी तुम्हाला आताच पत्र लिहून देऊ इच्छितो."

आणि श्री एस्कंब यांच्याकडून कोरा कागद मागून मी तिथेच पत्र लिहिले आणि ते त्यांना दिले.

# ८. हिंदुस्तानींनी काय केले? - ३

## इंग्लंडमधील कार्य

मागील प्रकरणामध्ये वाचकांनी पाहिलेच आहे की हिंदुस्तानी समाजाने आपली स्थिती सुधारण्याकरिता काही प्रयत्न केले आणि आपली प्रतिष्ठा वाढवली. ज्या प्रकारे हिंदुस्तानींनी दक्षिण आफ्रिकेत आपला सर्वांगीण विकासाचा यथाशक्ती प्रयत्न केला त्याचप्रमाणे हिंदुस्तानातून आणि इंग्लंडमधून जितकी मदत मिळू शकेल तितकी मिळवण्याचाही प्रयत्न केला. हिंदुस्तानातील कार्याबद्दल मी आधीच लिहिले आहे. आता इंग्लंडमधून मदत मिळवण्याकरिता काय करण्यात आले हे सांगितले पाहिजे. सगळ्यात आधी हिंदुस्तान राष्ट्रीय कॉंग्रेसने स्थापिलेल्या ब्रिटिश समितीशी संबंध जोडणे आवश्यक होते. याकरिता हिंदुस्तानचे पितामह दादाभाई नौरोजी आणि ब्रिटिश समितीचे अध्यक्ष सर विल्यम वेडरबर्न यांना सर्व घटनांची माहिती देणारी साप्ताहिक पत्रे लिहिली जात असत. आणि जेव्हा केव्हा अर्ज वगैरेंच्या नकला पाठवण्याची वेळ यायची तेव्हा समितीच्या डाकखर्चात आणि सामान्य खर्चात मदत व्हावी म्हणून १० पौंड पाठवण्यात येत असत.

इथे मी दादाभाईंची एक आठवण सांगेन. दादाभाई ब्रिटिश समितीचे अध्यक्ष नव्हते. तरी आम्हाला वाटले की त्यांच्याद्वारेच समितीला पैसे पाठवणे योग्य राहील, आणि आमच्यातर्फे त्यांनी ते पैसे समितीला द्यावे. परंतु पहिल्यांदाच आम्ही पाठवलेले पैसे आणि पत्र त्यांनी परत केले आणि ते सरळ सर विल्यम वेडरबर्न यानाच पाठवा असे सुचवले. दादाभाईंचे म्हणणे होते की माझ्याकडून जी मदत करता येणे शक्य असेल ती तर मी करेनच, परंतु समितीची प्रतिष्ठा सर विल्यम वेडरबर्न यांच्यामार्फत काम करूनच वाढेल. दादाभाई इतके वृद्ध झालेले असतानाही पत्रव्यवहाराच्या बाबतीत अतिशय नियमित होते हेही माझ्या लक्षात आले. त्यांना अधिक काही लिहायचे नसले तर पत्राची पोच ते परतीच्या टपालाने नक्कीच पाठवायचे आणि त्यात प्रोत्साहनाची एक ओळ अवश्य असायची. अशी पत्रे ते स्वतः लिहित आणि त्यांची नक्कल आपल्या टिशूपेपर बुकात करून ठेवत.

मागील प्रकरणात मी सांगितलेच आहे की आम्ही आमच्या संस्थेचे नाव ‘कॉंग्रेस’ ठेवले होते. परंतु आमच्या संस्थेचा प्रश्न कोणत्याही एखाद्या संस्थेचा प्रश्न व्हावा अशी आमची कधीही इच्छा नसायची, यामुळे दादाभाईंना कळेल अशा प्रकारे आमचा पत्रव्यवहार इतर लोकांबरोबरसुद्धा चालत असे. त्यात दोन सज्जन माणसांचा अंतर्भाव होतो. एक सर मंचरजी भावनगरी आणि दुसरे सर विल्यम हंटर. सर मंचरजी भावनगरी त्या वेळी ब्रिटिश संसदेचे सभासद होते. त्यांच्याकडून आम्हाला चांगली मदत होत असे. ते नेहमीच आम्हाला महत्त्वपूर्ण सूचना द्यायचे. परंतु दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींचा प्रश्न सर्वात आधी समजून घेणारे आणि त्याकरिता मदत करणारे जर कोणी असेल तर ते सर विल्यम हंटर होते. ते ‘टाईम्स’चे हिंदुस्तान विभागाचे संपादक होते. आम्ही दक्षिण आफ्रिकेच्या परिस्थितीबद्दल त्यांना पहिले पत्र लिहिले तेव्हापासून त्या विभागात ते हिंदुस्तानींच्या प्रश्नांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा करू लागले आणि आमच्या ध्येयाच्या समर्थनार्थ ते अनेकांना पत्रेही लिहायचे. जेव्हा एखादा महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित व्हायचा तेव्हा दर आठवड्याला आम्हाला त्यांचे पत्र मिळायचेच. त्यांचे जे पहिले उत्तर आले होते त्यात त्यांनी लिहिले होते, “तुम्ही सांगितलेली परिस्थिती वाचून मला फार दुःख झाले. तुम्ही विनयाने, शांततापूर्वक आणि कोणत्याही प्रकारची अतिशयोक्ती न करता लढा देत आहा. या प्रश्नात माझी संपूर्ण सहानुभूती तुमच्याकडून आहे. तुम्हाला न्याय मिळावा म्हणून माझ्या शक्तीबरहुकूम मला जे काही करता येणे शक्य असेल ते व्यक्तिगत आणि सामाजिक स्वरूपात मी करेन. माझी खात्री आहे की या विषयात तुम्ही तसूभरही मागे सरकू शकत नाही. तुमची मागणीच अशी आहे की कोणताही माणूस त्यात कमीअधिक करावे असे सुचवू शकत नाही.” ‘टाईम्स’मध्ये जो पहिला लेख त्यांनी लिहिला होता त्यातही आपल्या पत्रातील हेच शब्द त्यांनी उद्धृत केले होते. आमच्या प्रश्नासंबंधी अखेरपर्यंत त्यांचे हेच धोरण राहिले. मृत्यूच्या काही वेळेपूर्वीच दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींविषयी एका लेखमालेची रूपरेषा त्यांनी तयार केली होती असे लेडी हंटर यांनी एका पत्रात लिहिले होते.

श्री मनसुखलाल नाझर यांचे नाव मी मागील प्रकरणात दिले आहे. हिंदुस्तानींचा प्रश्न अधिक चांगल्या प्रकारे समजावून सांगण्याकरिता समाजाने त्यांना इंग्लंडला पाठवले होते. सर्व पक्षांना

आपल्या सोबत ठेवून काम करावे अशी सूचना त्यांना देण्यात आली होती. इंग्लंडमधील आपल्या मुक्कामाच्या काळात ते सतत दिवंगत विल्यम हंटर, मंचरजी भावनगरी आणि हिंदुस्तान राष्ट्रीय कॉंग्रेसची ब्रिटिश समिती यांच्या संपर्कात असायचे. हिंदुस्तानी नागरी सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी, हिंदुस्तान मंत्र्यांचे कार्यालय यांच्याही संपर्कात ते असायचे. अशा प्रकारे त्यांच्या आवाक्यातील एकही मार्ग त्यांनी सोडला नव्हता. या सर्व गोष्टींमुळे साम्राज्य सरकारच्या दृष्टीत हिंदुस्तानबाहेर राहणाऱ्या हिंदुस्तानींच्या प्रश्नाला सर्वाधिक प्राधान्य मिळाले, आणि त्याचा बरावाईट परिणाम इतर देशांमधील सरकारांवरही झाला. ज्या ज्या वसाहतीत हिंदुस्तानी वसलेले होते त्या त्या वसाहतीत आपल्या परिस्थितीच्या महत्त्वाबद्दल ते जागृत झाले आणि तिथे राहणाऱ्या युरोपियांना त्या धोक्याची जाणीव जाणीव झाली जो धोका हिंदुस्तानीं लोकांमुळे वसाहतीतील युरोपियांच्या प्रभुत्वाला निर्माण होऊ शकत होता.

# ९. बोअरयुद्ध

बोअरयुद्धाच्या वेळी दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींची स्थिती कशी होती हे ज्या वाचकांनी मागील प्रकरणे लक्षपूर्वक वाचली असतील त्यांच्या लक्षात आलेच असेल. आपल्या परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून त्या वेळेपर्यंत त्यांनी कोणकोणते प्रयत्न केले होते याचे वर्णनही वर आलेले आहे.

सोन्याच्या खाणमालकाबरोबर झालेल्या गुप्त खलबतानुसार १८९९मध्ये डॉ. जेमिसन यांनी जोहानिसबर्गवर हल्ला केला. जोहानिसबर्गवर विजय मिळवल्यानंतरच बोअर सरकारला या हल्ल्यासंबंधी कळेल असे दोघांनाही वाटत होते. परंतु अशा अपेक्षा करणारे डॉ. जेमिसन आणि त्यांचे मित्र यांनी फार मोठी चूक केली होती. आपले कारस्थान जरी पूर्णपणे उघडकीस आले तरी ऱ्होडेशियात प्रशिक्षण घेतलेल्या नेमबाजांसमोर अडाणी बोअर शेतकरी काहीही करू शकणार असे समजण्यात त्यांनी दुसरी चूक केली. जोहानिसबर्गमधील बहुतेक लोक आपले स्वागत करतील असे गृहीत धरण्यातही त्यांनी चूक केली होती. त्या सज्जन डॉक्टरची ही अपेक्षाही पूर्ण होऊ शकली नाही. प्रेसिडेंट क्रुगर यांना या सर्व गोष्टींचा पत्ता लागलेला होता. त्यांनी अत्यंत शांतपणे, कुशलतापूर्वक आणि गुप्तपणे डॉ. जेमिसन यांना तोंड देण्याची तयारी केली होती. यामुळे डॉ. जेमिसन जोहानिसबर्गला पोहोचण्याआधीच बोअर सैन्याने आपल्या गोळ्यांनी त्यांचे स्वागत केले. सैन्याच्या या माऱ्यासमोर डॉ. जेमिसनची तुकडी टिकूच शकत नव्हती. जोहानिसबर्गमध्ये सरकारविरुद्ध कुणालाही बंड करता येऊ नये म्हणूनही राष्ट्राध्यक्ष क्रुगरनी पूर्ण तयारी केली होती. यामुळे शहरामधील लोकांमधूनसुद्धा कोणालाही डोके वर काढण्याचा धीर झाला नाही. राष्ट्राध्यक्ष क्रुगर यांच्या या कारवाईमुळे जोहानिसबर्गमधील सर्व करोडपती स्तब्ध झाले. राष्ट्राध्यक्ष क्रुगर यांच्या या सुंदर पूर्वतयारीमुळे हल्ला परतवण्याकरिता खर्चही कमी आला आणि प्राणहानी किमान झाली.

डॉ. जेमिसन आणि त्यांचे सर्व मित्र - सोन्याच्या खाणीचे मालक - पकडले गेले आणि त्यांच्यावर ताबडतोब खटला भरण्यात आला. काही लोकांना फाशीची शिक्षा झाली. या

अपराध्यांमध्ये बहुतेक करोडपती होते. परंतु त्यांनी दिवसाढवळ्या हल्ला करण्याचे साहस केलेले असल्यामुळे साम्राज्य सरकार त्यांच्याकरिता काहीही करू शकले नाही. राष्ट्राध्यक्ष क्रुगर यांचे महत्त्व एकदम वाढले. राष्ट्राध्यक्ष क्रुगर यांची दयाभावना जागृत व्हावी म्हणून वसाहतमंत्री चेम्बरलेन यांनी दीन शब्दांत तार केली आणि त्या करोडपतीचा प्राण वाचावा म्हणून दयेची भीक मागितली. राष्ट्राध्यक्ष क्रुगर आपला डाव खेळण्यात फार कुशल होते. दक्षिण आफ्रिकेतील कोणतीही शक्ती आपल्या हातातील राजसत्ता हिसकावून घेऊ शकते अशी भीती त्यांना मुळीच नव्हती.डॉ. जेमिसन आणि त्यांच्या मित्रांनी त्यांच्या दृष्टीने अतिशय कौशल्याने तो कट रचला होता, परंतु राष्ट्राध्यक्ष क्रुगर यांच्या दृष्टीने ते बालीशपणाचे कृत्य होते. यामुळे त्यांनी चेम्बरलेन यांच्या नम्र प्रार्थनेचा स्वीकार केला कोणालाही फाशी न देता सोडून दिले.

परंतु मळमळीबरोबर वर आलेले अन्न किती काळ पोटात टिकून राहू शकते? ते बाहेर निघणारच. जेमिसन यांचा हल्ला हे गंभीर रोगाचे लक्षण होते हे राष्ट्राध्यक्ष क्रुगर यांनाही माहीत होते. जोहानिसबर्गचे करोडपती आपल्यावरील कलंक न धुणे अशक्य होते. याशिवाय ज्या सुधारणांकरिता डॉ. जेमिसन यांनी हल्ल्याची योजना आखली होती त्यातील एकही सुधारणा आतापर्यंत झाली नव्हती. यामुळे जोहानिसबर्गचे शेतकरी शांत राहण्याची शक्यता मुळीच नव्हती. त्यांच्या मागण्याबद्दल आफ्रिकेतील ब्रिटिश उच्चायुक्त यांची पूर्ण सहानुभूती होती. त्याचबरोबर राष्ट्राध्यक्ष क्रुगर यांनी डॉ. जेमिसन आणि इतर करोडपती यांच्याबद्दल जे महान औदार्य दाखवले होते त्याबद्दल चेम्बरलेन यांनीसुद्धा स्तुती केली आणि त्यांचे लक्ष सुधारणांकडे वेधले. याशिवाय हे भांडण मिटूच शकत नाही असे सर्वांचे मत होते. खाणमालकांच्या मागण्या अशा काही होत्या की त्यांची परिणती अखेरीस बोअराचे प्रभुत्व संपुष्टात येण्यात झाली असती. याचा अंतिम परिणाम युद्धच असेल याची दोन्ही पक्षांना जाणीव होती. यामुळे दोन्ही पक्ष युद्धाची तयारी करत होते. त्या वेळेची दोघांचीही शाब्दिक चकमक पाहण्यासारखी होती. राष्ट्राध्यक्ष क्रुगर जेव्हा अधिक शस्त्रे किंवा युद्धसामुग्री मागवायचे तेव्हा तेव्हा इंग्रज सरकारलाही दक्षिण आफ्रिकेत थोडे सैन्य आणणे भाग पडेल अशी धमकी ब्रिटिश उच्चायुक्त त्यांना देत असत. ब्रिटिश सैन्य

जेव्हा दक्षिण आफ्रिकेत यायचे तेव्हा तुम्ही युद्धाची तयारी करत आहा असा टोमणा राष्ट्राध्यक्ष क्रुगर मारायचे.

तयारी पूर्ण झाल्यानंतर गप्प बसून राहणे म्हणजे स्वतःहोऊन इंग्रजांसमोर शरणागती पत्करण्यासारखे होईल असे क्रुगर यांना वाटले. ब्रिटिश साम्राज्याजवळ पैशाचा आणि पाशवी शक्तीचा अपरंपार साठा होता. हळूहळू तयारी करत आणि खाणमालकांच्या तक्रारी दूर करण्याकरिता राष्ट्राध्यक्ष क्रुगर यांना समजावत ब्रिटिश साम्राज्य भरपूर कालापहरण करू शकत होते, आणि राष्ट्राध्यक्ष क्रुगर खाणमालकांच्या तक्रारी दूर करतच नसल्यामुळे आम्हाला युद्ध करणे भाग पडले असे ते जगाला दाखवू शकले असते. अशा प्रकारे ब्रिटिशांनी युद्धाची इतकी जोरदार तयारी केली असती की राष्ट्राध्यक्ष क्रुगर यांना ब्रिटिशांना तोंड देणेच शक्य झाले नसते आणि विवश होऊन दीनवाणेपणाने ब्रितिटिशांच्या अटी स्वीकारणे त्यांना भाग पडले असते. ज्या समाजातील स्त्रियासुद्धा ठरल्यानंतर युद्धात भाग घेऊ शकतात, ज्या प्रजेमध्ये राष्ट्रीय स्वातंत्र्याला धार्मिक भावनेइतकेच महत्त्वाचे स्थान असते ती जनता चक्रवर्ती राजाच्या शक्तिसामर्थ्यासमोरही हीनदीन होऊ शकत नाही. आणि बोअर जनता खरोखरच अशी शूर होती.

ऑरेंज फ्री स्टेटबरोबर राष्ट्राध्यक्ष क्रुगर यांनी आधीच सामंजस्य करार केला होता. या दोन्ही बोअर राज्यांचे धोरण आणि कार्यपद्धती एकच होती. ब्रिटिशांच्या मागण्या पूर्णपणे मान्य करण्याची राष्ट्राध्यक्ष क्रुगर यांची मुळीच इच्छा नव्हती. खाण मालकांचे पूर्ण समाधान होईल या सीमेपर्यंत त्यांच्या मागण्यासुद्धा मान्य करण्याची त्यांची तयारी नव्हती. यामुळे युद्ध अपरिहार्य आहे असे त्यांना वाटत होते. असे असताना युद्धाला अजून विलंब करणे म्हणजे युद्धाची तयारी करण्याकरिता ब्रिटिश साम्राज्याला अधिक वेळ देणे असा अर्थ होईल असे दोन्ही राष्ट्रांना वाटले. यामुळे राष्ट्राध्यक्ष क्रुगर यांनी आपले अंतिम विचार आणि अंतिम मागण्या मिल्नर यांना सांगितल्या. याचबरोबर ट्रांसवाल आणि ऑरेंज फ्री स्टेट यांच्या सीमांवर सैन्य तैनात केले. याची परिणती युद्धाशिवाय अजून कशात होऊच शकत नव्हती. ब्रिटिश साम्राज्यासारखे चक्रवर्ती साम्राज्य अशा धमकीसमोर नमणे अशक्य होते. राष्ट्राध्यक्ष क्रुगर यांच्या निर्वाणीच्या संदेशाची

मुदत संपली आणि बोअर सैन्याने विद्युत गतीने पुढे कूच केले. त्यांनी लेडीस्मिथ, किम्बर्ली आणि माफेकिंग यांना वेढा घातला. अशा प्रकारे १८९९ साली या महान युद्धाची सुरुवात झाली. वाचकांना हे तर माहीतच आहे की या युद्धाच्या कारणात म्हणजे ब्रिटिशांच्या मागण्यातील एक कारण बो्अर राज्यातील हिंदुस्तानींची दुर्दशा हे होते.

आता या प्रसंगी आपण काय केले पाहिजे असा मोठाच प्रश्न दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींसमोर उभा राहिला. बोअरांची सर्व पुरुषमंडळी युद्धात निघून गेली होती. वकिलांनी वकिली सोडली, शेतकऱ्यांनी शेती सोडली, व्यापाऱ्यांनी व्यापार सोडला आणि नोकरांनी नोकरी सोडली. इंग्रजांच्या बाजूने बोअरांइतके जरी नाही तरी केप कॉलनी, नाताल, ऱ्होडेशिया, येथील लोक मोठ्या संख्येत स्वयंसेवक म्हणून युद्धात दाखल झाले. ज्या न्यायालयात मी वकिली करत होतो तिथे आता मला फार कमी वकील दिसू लागले. अनेक मोठे वकील युद्धकार्यात जुंपले होते. हिंदुस्तानींवर जे आक्षेप घेतले जात असत त्यातील एक आक्षेप होता, “हे लोक दक्षिण आफ्रिकेत केवळ पैसा गोळा करण्याकरिता येत असतात, हे आमच्यावर (इंग्रजांवर) केवळ ओझे झालेले आहेत. ज्याप्रमाणे कसर लाकडात शिरते आणि पोखरून पोखरून त्याला अगदी पोकळ करून टाकते त्याप्रमाणे हे हिंदुस्तानीसुद्धा आमचे काळीज कुरतडण्याकरिता आणि खाण्याकरिता इथे आलेले आहेत. देशावर जरी आक्रमण होत असेल, आमच्या घराची लूट होण्याचा जरी प्रसंग आला तरीही हे हिंदुस्तानी आम्हाला किंचितही मदत करणार नाहीत. त्या वेळी शत्रूंपासून आम्हाला केवळ स्वतःलाचा वाचवावे लागणार नाही तर यांनाही वाचवण्याचे काम करावे लागेल.” या आक्षेपाचा आम्ही गंभीरपणे विचार केला. या आक्षेपात काहीही तथ्य नाही, तो निराधार आहे हे सिद्ध करण्याची ही चांगली संधी चालून आली आहे असे आम्हाला वाटले. काही लोकांनी पुढील विचारही व्यक्त केले :

“इंग्रज आणि बोअर हे दोघेही आपल्याला सारखाच त्रास देतात. ट्रान्सवालमध्ये आपल्या जो त्रास सहन करावा लागतो तो नाताल आणि केप कॉलनीत सहन करावा लागत नाही असे काही नाही. अंतर केवळ दु:खाच्या प्रमाणात आहे. आणि आपल्याला तर गुलाम म्हणूनच संबोधण्यात येत

असते. बोअरांचा एक लहानसा समाज आपल्या अस्तित्वाकरिता इंग्रजांविरुद्ध लढतो आहे हे आम्हाला माहीत आहे. हे माहीत असतानाही आम्ही त्यांच्या नाशाकरिता कसे कारणीभूत ठरू शकतो? आणि अखेरीस व्यावहारिक दृष्टीने जरी पाहायचे असेल तरी बोअरांचा या युद्धात निश्चितपणे पराभव होणार आहे असे भाकीत कोणीच करू शकत नाही. त्यांचा जर युद्धात विजय झाला तर ते आमचा बदला घेतल्याशिवाय राहतील?"

हा युक्तिवाद जोरदार भाषेत मांडणारा एक पक्ष आमच्यात होता. मला स्वतःलाही हा युक्तिवाद समजू शकत होता आणि त्याला आवश्यक ते महत्त्वही मी देत होतो. तरीही मला तो पटला नाही. माझ्या मनात आणि लोकांसमोर मी त्याचे खंडन अशा प्रकारे केले :

"दक्षिण आफ्रिकेतील आपले अस्तित्व ब्रिटिश प्रजा म्हणूनच आहे. प्रत्येक अर्जात ब्रिटिश प्रजा म्हणूनच आपण अधिकाराची मागणी केली आहे. ब्रिटिश प्रजा असण्याचा आपल्याला अभिमान वाटत आला आहे आणि आमच्या शासकांनीही आपला बचाव ब्रिटिश प्रजा म्हणूनच केला आहे. आपली आणि इंग्रजांची घरेदारे नष्ट होण्याची वेळ आली असतानाही दक्षिण आफ्रिकेत इंग्रज आपल्याला त्रास देतात असे म्हणून आपण हातातहात घालून गप्प बसून तमाशा पाहत राहिलो तर ही गोष्ट आपल्या माणूसपणाला शोभून दिसणार नाही. एवढेच नाही तर या मनोवृत्तीमुळे आमच्या दुःखात अजून भर पडेल. जो आक्षेप आपल्याला चुकीचा वाटतो तो चुकीचा आहे हे सिद्ध करण्याकरिता अनायसे आपल्याला ही संधी मिळाली आहे. ती हातातून निसटून जाऊ देण्याचा अर्थ होईल आपण स्वतः तो आक्षेप मान्य करणे. त्यानंतर जर आपल्याला अधिक त्रास सहन करावा लागला, इंग्रजांनी आपल्याला अधिक हिणवले आणि त्यांनी आमची घृणा केली तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीही राहणार नाही. तशा अवस्थेत तो आपलाच दोष मानला जाईल. इंग्रजांनी आपल्यावर जितके दोषारोप केले आहेत ते सर्व निराधार आहेत, त्याबद्दल बोलण्यासारखे काहीही नाही असे म्हणणे स्वतःची फसवणूक करणे होईल. हे खरे आहे की ब्रिटिश साम्राज्यात आपण गुलामासारखे आहो, परंतु ब्रिटिश साम्राज्यात राहून ही गुलामगिरी दूर करण्याचा आजपर्यंत आपला उद्देश राहिला आहे. हिंदुस्तानातील सर्व पुढारी हेच करून राहिले

आहेत. आपणसुद्धा हेच करत आहो. आणि ब्रिटिश साम्राज्याचे सदस्य म्हणूनच आपल्याला आपले स्वातंत्र्य आणि प्रगती या दोन्ही गोष्टी साध्य करायच्या असतील तर त्याकरिता ही सुवर्णसंधी आहे. बोअरांची बाजू ही न्यायाची बाजू आहे असे बऱ्याच प्रमाणात म्हणता येऊ शकते. परंतु एखाद्या राज्याच्या शासनव्यवस्थेत राहून प्रजेतील प्रत्येक व्यक्ती आपल्या विचारानुसार आचरण करू शकत नाही. राज्याचा अधिकारी वर्ग जी काही कामे करतो ती सर्व उचित असतात असे नााही. असे असतानाही प्रजा जोपर्यंत अशा राज्याचा स्वीकार करते तोपर्यंत त्या राज्याच्या कार्याचे समर्थन करणे आणि त्याकरिता राज्याला मदत करणे प्रजेचे कर्तव्य असते.

''याशिवाय प्रजेचा एखादा भाग राज्याच्या वा शासनाच्या एखाद्या कार्याला धार्मिक दृष्टीने अनीतीपूर्ण समजत असेल तर त्या कार्यात विघ्न निर्माण करण्याआधी त्या राज्याला अनीतीपूर्ण कार्यापासून वाचवण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. आपण असे काहीही केलेले नाही. आपल्यासमोर असे धर्मसंकट उभे राहिलेले नाही आणि अशा कोणत्याही 'व्यापक कारणामुळे आम्ही या युद्धात भाग घेऊ इच्छित नाही असे ना तर कोणी म्हणाले आहे ना कोणाची अशी मान्यता आहे. यामुळे प्रजा म्हणून युद्धाच्या गुणदोषाचा विचार न करता सुरू असलेल्या युद्धाला यथाशक्ती मदत करणे हाच आपला सामान्य धर्म आहे. अखेरीस बोअर राज्याचा विजय झाला, आणि त्यांचा पराभवच होईल असे निश्चितपणे सांगण्यासारखे आपल्याजवळ कोणतेही कारण नाही, तर आपली अवस्था फुफाट्यातून निघून आगीत पडल्यासारखी होईल व मग ते आपला मनसोक्त बदला घेतील असे मानणे वा असा विश्वास ठेवणे हे शूर बोअरांवर तसेच आपल्या स्वतःवरही अन्याय करण्यासारखे होईल. हे तर केवळ आपल्या भ्याडपणाचे चिन्ह समजले जाईल. असा विचार मनात येऊ देणे हे सुद्धा आपल्या प्रामाणिकपणाला बट्टा लावण्यासारखे होईल. इंग्रजांचा पराभव झाला तर आपले काय होईल असा कोणी इंग्रज विचार करतो काय? रणांगणात जाणारा कोणताही माणूस माणूसपण गमावल्याशिवाय असा विचार करूच शकत नाही."

असा युक्तिवाद मी १८९९ साली केला होता आणि आजसुद्धा त्यात कोणताही बदल करण्याची मला आवश्यकता वाटत नाही. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की त्या वेळी ब्रिटिश साम्राज्याबद्दल मला जो मोह होता आणि ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वातंत्र्याची जी आशा माझ्या मनात होती ती आशा आजही कायम असती तर आजही अक्षरशः हाच युक्तिवाद मी केला असता आणि तशीच परिस्थिती हिंदुस्तानात असती तर हिंदुस्तानातही मी केला असता. या युक्तिवादाच्या विरोधी युक्तिवाद दक्षिण आफ्रिकेत आणि इंग्लंडमध्येही मी एकले आहेत. तरीही हे माझे विचार बदलण्याकरिता मला कोणतेही कारण दिसत नाही. मला माहीत आहे की माझ्या आजच्या विचारांचा प्रस्तुत विचारांशी काहीही संबंध नाही. परंतु वरील भेद सांगण्याची दोन प्रमुख कारणे आहेत. हे पुस्तक घाईघाईने वाचणारे वाचक ते शांतपणे व लक्षपूर्वक वाचतील अशी अपेक्षा वाचकांकडून करण्याचा मला कोणताही अधिकार नाही हे याचे कारण आहे. माझ्या आजच्या कामाशी वरील विचारांचा मेळ घालणे अशा वाचकांना कठीण जाईल. दुसरे कारण असे आहे की त्या विचारसरणीतही सत्याचा आग्रह आहे. आम्ही जसे आत आहो तसेच बाहेर दिसलो पाहिजे व त्याप्रमाणे व्यवहार केला पाहिजे ही धार्मिक आचरणाची शेवटची नाही तर पहिली पायरी आहे. या पायरीशिवाय धार्मिक जीवनाचा इमला उभा करणे अशक्य आहे.

आता आपण आपल्या इतिहासाकडे वळू या.

माझा वरील युक्तिवाद अनेक लोकांना पसंत पडला. माझा एकट्याचाच असा युक्तिवाद होता असे वाचकांनी समजू नये. या युक्तिवादाआधीही युद्धात भाग घेणारे हिंदुस्तानी होते. परंतु तेव्हा एक व्यावहारिक प्रश्न निर्माण झाला. - युद्धाच्या या भयंकर तुफानात हिंदुस्तानींचा दुर्बल आवाज कोण ऐकेल? हिंदुस्तानींनी केलेल्या मदतीच्या प्रस्तावाला किती महत्त्व दिले जाईल? शस्त्र तर आमच्यापैकी कोणीही हाती घेतलेले नव्हते. युद्धात सैनिकांकडून शस्त्रसंचालनाच्या कामाव्यतिरिक्त इतर कामाकरिता प्रशिक्षण आवश्यक असते. एका तालावर कूच करणे, आपले सामान स्वतः घेऊन चालणे या गोष्टीसुद्धा आमच्याकरिता कठीण होत्या. याशिवाय गोऱ्यांनी आम्हा सर्वांना कुलीच मानले असते. त्यांनी आमचा अपमानही केला असता. आमच्याकडे

तिरस्कृत नजरेने पाहिले असते. हे सर्व कसे सहन केले जावे? आणि आम्ही सैन्यात भरती होण्याची जरी मागणी केली तरी ती मागणी कशी मान्य करवून घ्यावी? या प्रश्नाचा विचारविनिमय केल्यानंतर आम्ही या निर्णयावर आलो की आमचा प्रस्ताव स्वीकारला जावा म्हणून आम्ही प्रयत्न केला पाहिजे. कामाचा अनुभवच आम्हाला अधिक काम करायला शिकवील. आमच्यात इच्छा असेल तर सेवा करण्याची शक्ती ईश्वर देईल. मिळालेले काम कसे पूर्ण करायचे याची काळजी आपण करता कामा नये. यथाशक्ती प्रशिक्षण घेतले पाहिजे आणि एकदा सेवाधर्माचा निर्धार केल्यानंतर मानापमानाचा विचारच सोडून दिला पाहिजे, आणि जरी अपमान झाला तरी तो सहन करून सेवा केली पाहिजे.

आमच्या मागण्या मान्य करवून घेण्याकरिता आम्हाला फार मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. त्याचा इतिहास रसाळ आहे, पण तो देण्याचे हे स्थान नाही. यामुळे इथे मी इतकेच सांगतो की आमच्यातील प्रमुख लोकांनी जखमी आणि आजारी लोकांची सेवा करण्याचे प्रशिक्षण घेतले. आमच्या शारीरिक क्षमतेबद्दल डॉक्टरकडून प्रमाणपत्र घेतले आणि एक पत्र लिहून युद्धात सहभागी होण्याकरिता परवानगी मागणारे पत्र शासनाकडे पाठवले. आमच्या या पत्राचा आणि आम्ही केलेल्या आग्रहाचा फार चांगला प्रभाव पडला. पत्राचे उत्तर देताना सरकारने आमचे आभार मानले, परंतु या वेळी तुमची मागणी स्वीकारता येत नाही असे सांगितले. मध्यंतरीच्या काळात बोअरांची ताकद वाढली. एखाद्या भयानक पुराच्या लोंढ्याप्रमाणे त्यांचे आक्रमण झाले आणि नातालच्या राजधानीपर्यंत बोअर पोहोचण्याचा धोका निर्माण झाला. चोहोकडे जखमी आणि मृत सैनिकांचे ढीग पडलेले होते. आमची मागणी मान्य व्हावी म्हणून आमचे प्रयत्न सुरूच होते. अखेरीस ॲम्ब्युलन्स कोअर (सुश्रुषा पथक) म्हणून आमच्या सेवेचा स्वीकार करण्यात आला. रुगणालयातील संडास साफ करण्याच्या वा झाडझूड करण्याच्या कामाकरितासुद्धा आमची तयारी आहे असे आम्ही लिहिले होते. यामुळे शुश्रुषापथकात भरती होण्याचे काम आम्हाला स्वागतार्ह वाटणे स्वाभाविक होते. आमचा प्रस्ताव स्वतंत्र आणि गिरमिटमुक्त हिंदुस्तानीबद्दलच होता. परंतु गिरमिट्या हिंदुस्तानींनाही त्यात सामील करणे उचित राहील असे आम्ही सुचवले. त्या वेळी सरकारला जास्तीतजास्त लोकांची आवश्यकता होती. यामुळे गिरमिट्या मजुरांच्या

मालकांनाही गिरमिट्यांना शुश्रूषापथकात सामील होऊ द्या अशी विनंती शासनातर्फे करण्यात आली. यामुळे ११०० हिंदुस्तानींचे एक भव्य पथक डरबनहून युद्धाच्या मोर्चावर जाण्याकरिता निघाले. निघताना श्री एस्कंब, जे वाचकांना परिचित आहेत आणि जे गोऱ्या स्वयंसेवकांचे प्रमुख होते, यांनी आमचे आभार मानले आणि आम्हाला आशीर्वादही दिले.

इंग्रजी वृत्तपत्रांना हे सर्व एखाद्या चमत्काराप्रमाणेच वाटले. हिंदुस्तानी लोक या युद्धात भाग घेतील अशी त्यांची मुळीच अपेक्षा नव्हती. एका इंग्रजाचे तिथल्या एका प्रमुख दैनिकात हिंदुस्तानींची स्तुती करणारी एक कविता लिहिली. तिच्या धृपदाच्या ओळीचा आशय असा होता: "अखेरीस आम्ही एकाच साम्राज्याची मुले आहो."

या पथकात जवळपास ३०० ते ४०० गिरमिटमुक्त हिंदुस्तानी असावे. स्वतंत्र हिंदुस्तानींच्या प्रयत्नामुळे ते भरती झाले होते. त्यातील ३७ जणांना नेता समजण्यात येत होते कारण त्यांच्या सह्यांनी हा प्रस्ताव मांडण्यात आला होता आणि इतरांना गोळा करणारेही तेच होते. या पुढाऱ्यांमध्ये बॅरिस्टरही होते आणि मुनीमही होते. बाकी लोकांमध्ये राज वा सुतारासारखे कारागीर आणि सामान्य मजूर वगैरे होते. त्यात हिंदू, मुसलमान, मद्रासी आणि उत्तर हिंदुस्तानी असे सर्व धर्मांचे आणि सर्व प्रांतातील लोक होते. शुश्रूषापथकात व्यापारी वर्गातील कोणीही नव्हता असेही म्हणता येऊ शकते. परंतु व्यापाऱ्यांनी आर्थिक दृष्टीने बरीच मदत केली. अशा पथकातील लोकांना सैनिकी भत्ता मिळत असे, परंतु त्यांच्या इतरही गरजा असतात. त्या गरजा पूर्ण झाल्या तर छावणीतील कठोर जीवनप्रणालीतही थोडे बरे वाटते. अशा गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी हिंदुस्तानी व्यापाऱ्यांनी आपल्या शिरावर घेतली. याशिवाय ज्या जखमी सैनिकांची सेवाशुश्रूषा करावी लागत असे त्यांच्याकरिताही मिठाई, सिगारेट वगैरे वस्तू उपलब्ध करून देण्यात व्यापाऱ्यांनी चांगली मदत केली. जेव्हा केव्हा आम्ही शहराजवळ छावणी टाकलेली असायची तेव्हा तेव्हा तेथील व्यापारी अशा गरजा पूर्ण करण्याकरिता पूर्णपणे प्रयत्नशील असायचे.

या शुश्रूषापथकात जे गिरमिट्ये सामील झाले होते त्यांच्याबरोबर त्यांच्या त्यांच्या खटल्यातील इंग्रज प्रमुखांनाही पाठवण्यात आले होते. परंतु आम्हा सर्वांची कामे तर सारखीच होती. सर्वांना सोबत राहावे लागायचे. यामुळे गिरमिट्ये फार खुश झाले. ती संपूर्ण व्यवस्था स्वाभाविकपणेच आमच्या हाती आली. यामुळे ते संपूर्ण शुश्रूषापथक हिंदुस्तानीच मानले गेले. त्याच्या कामाचे यश हिंदुस्तानी समाजालाच मिळाले. खरे सांगायचे तर गिरमिट्यांना या पथकात सामील करून घेण्याचे श्रेय समाज घेऊ शकत नाही. ते श्रेय तर त्यांचे गोरे मालकच घेऊ शकतात. परंतु यात काही शंका नाही की हे पथक तयार झाल्यानंतर त्याच्या सुव्यवस्थेचे श्रेय मात्र स्वतंत्र हिंदुस्तानींकडे म्हणजे हिंदुस्तानी समाजाकडेच जाऊ शकते. आणि जनरल बुलरनी आपल्या खलित्यामध्ये ही गोष्ट मान्य केली आहे.

आजारी तसेच जखमी लोकांची शुश्रूषा करण्याचे प्रशिक्षण देणारे डॉ. बूथही आमच्याबरोबर होते. ते एक सज्जन पाद्री होते आणि हिंदुस्तानी ख्रिश्चनांमध्ये ते काम करत असत. ते सर्वांत मिसळायचे. वर मी ज्या सदतीस पुढाऱ्यांचा उल्लेख केला आहे त्यांच्यातील बहुतेक लोक त्यांचे शिष्य होते. हिंदुस्तानींच्या शुश्रूषापथकाप्रमाणेच युरोपियांचेही एक शुश्रुषापथक तयार करण्यात आले होते, आणि या दोन्ही पथकांना एकाच ठिकाणी काम करावे लागायचे. युद्धात काम करण्याचा सरकारसमोर ठेवलेला आमचा प्रस्ताव बिनशर्त होता. परंतु तोफा आणि बंदुकांच्या टप्प्यात आम्हाला काम करावे लागणार नाही असे स्वीकृतीपत्रात आम्हाला सांगण्यात आले होते. याचा अर्थ असा होता की रणांगणात जखमी झालेल्या सैनिकांना सैन्याबरोबर. असलेल्या स्थायी शुश्रूषापथकाने सैन्याच्या पुष्कळच मागे आणून सोडावे आणि मग त्याची जबाबदारी आम्ही घ्यावी. लेडीस्मिथ येथे बोअर सैन्याच्या वेढ्यात अडकलेल्या जनरल व्हाईट यांना सोडवण्याचा जनरल बुलर निकराचा प्रयत्न करणार असल्यामुळे आणि त्या प्रयत्नात स्थायी शुश्रूषापथक काळजी घेऊ शकेल त्याहून जास्त सैनिक जखमी होण्याची शक्यता असल्यामुळे गोऱ्यांचे आणि आम्हा हिंदुस्तानींचे एक शुश्रुषापथक तयार करण्यात आले होते. युद्ध अशा प्रदेशात सुरू होते की रणभूमी आणि केंद्रीय रुग्णालय यांना जोडणाऱ्या सडकाही नव्हत्या. यामुळे जखमी

सैनिकांना घोडागाडी वगैरेत घालून रुग्णालयात नेणे अशक्य होते. केंद्रीय रुग्णालय नेहमी एखाद्या रेल्वेस्टेशनजवळ आणि युद्धभूमीपासून ७-८मैल लांब अंतरावर ठेवण्यात येत असे.

लवकरच आम्हाला काम करण्याची संधी मिळाली. आणि ते काम आमच्या अपेक्षेपेक्षा कठीण होते. जखमींना उचलून ७-८मैल अंतरावर नेणे आमच्याकरिता सामान्य गोष्ट होती. परंतु केव्हा केव्हा आम्हाला घायाळ सैनिकांना २५-२५ मैल अंतरावर न्यावे लागायचे. मार्गात त्यांना औषध द्यावे लागायचे. कूच करताना सकाळी ८ वाजता सुरुवात व्हायची आणि ५ वाजेपर्यंत केंद्रीय रुग्णालयात पोहोचणे आवश्यक असायचे. हे काम नक्कीच फार कठीण होते. घायाळ सैनिकांना उचलून २५ मैल अंतरावर नेण्याचे काम एकदाच करावे लागले. याशिवाय युद्धाच्या सुरुवातीला पराभवावर पराभव स्वीकारावे लागले आणि फार मोठ्या प्रमाणात सैनिक जखमी झाले. यामुळे आम्हाला तोफांच्या आणि बंदुकीच्या माऱ्याच्या टप्प्यात न नेण्याचा विचार अधिकाऱ्यांना सोडून द्यावा लागला. जेव्हा अशी वेळ आली तेव्हा आम्हाला सांगण्यात आले की "तुमच्याशी झालेल्या कराराप्रमाणे तुम्हाला आम्ही अशा धोक्याच्या ठिकाणी नेऊ शकत नाही की जिथे तुमच्यावर गोळीबार होऊ शकेल. यामुळे तुम्हाला धोका पत्करायचा नसेल तर जनरल बुलरची तुमच्यावर बळजबरी करण्याची मुळीच इच्छा नाही. परंतु तुम्ही स्वेच्छेने हा धोका पत्करण्याकरिता तयार असाल तर सरकार निश्चितच तुमचे आभार मानील." धोका पत्करण्याकरिता आम्ही तयारच होतो. धोक्याच्या ठिकाणापासून दूर राहणे आम्हाला मुळीच पसंत नव्हते. यामुळे आम्ही सगळ्यांनी त्या संधीचे स्वागत केले. परंतु ना तर आमच्यापैकी कोणाला गोळी लागली ना दुसरी कोणती इजा झाली.

आमच्या पथकाला अनेक सुखद अनुभव आले. परंतु ते सर्व सांगण्याचे हे स्थळ नाही. परंतु तरीही इतके सांगितले पाहिजे की आमच्या या पथकात अडाणी समजले जाणारे गिरमिट्ये मजूरसुद्धा होते. युरोपियांच्या अस्थायी शुश्रुषापथकाच्या सदस्यांना गोऱ्या सैनिकांच्या संपर्कात वारंवार यावे लागायचे. परंतु गोरे आमच्याशी रुक्ष व्यवहार करतात वा आमचा अपमान करतात असे आमच्यापैकी कोणालाही वाटले नाही. गोऱ्यांच्या अस्थायी पथकात दक्षिण आफ्रिकेतील गोरे

होते. युद्धाआधी त्यांनी हिंदुस्तानविरोधी आंदोलनात भाग घेतला होता. परंतु संकटप्रसंगी हिंदुस्तानी आपले दुःख विसरून मदतीकरिता धावून आल्याचे पाहून त्यांचे अंतःकरणही विरघळले. जनरल बुलरच्या खलित्यामध्ये आमच्या कार्याची प्रशंसा करण्यात आली होती हे आधीच सांगितले आहे. आमच्या सुश्रुषापथकातील ३७ लोकांना शौर्यपदके देण्यात आली होती.

लेडीस्मिथला वेढ्यातून मुक्त करण्याचे जनरल बुलरचे काम जेव्हा संपले, म्हणजे जवळपास दोन महिन्यात, तेव्हा आमच्या आणि गोऱ्यांच्या पथकाला रजा देण्यात आली. तसे पाहता त्यानंतरही बराच काळ युद्ध सुरू होते. परत लढाईत सामील होण्याची आमची तयारी होती आणि अशीच परत जर जोरदार कारवाई करण्याची वेळ आली तर तुमचे सहकार्य नक्कीच घेतले जाईल असे आम्हाला रजा देणाऱ्या आदेशात सांगण्यात आले होते.

दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींनी बोअर युद्धात जो भाग घेतला होता तो तुलनात्मक दृष्टीने फार नगण्य गणला जाईल. त्यांना मुळीच प्राणहानी पत्करावी लागली नाही असे म्हणणेसुद्धा चूक होणार नाही. परंतु तरीही मदत करण्याच्या शुद्ध हेतूचा परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. आणि कोणी अपेक्षा न करताही जेव्हा अशी मदत मिळते तेव्हा त्या मदतीचे मोल दुप्पट वाटते. बोअर युद्धाच्या वेळी हिंदुस्तानींबद्दल इंग्रजांच्या मनात अशीच सुंदर भावना होती.

हे प्रकरण पूर्ण करण्यापूर्वी सांगण्यासारखा एक प्रसंग मी सांगितलाच पाहिजे. लेडीस्मिथ येथील वेढ्यात सापडलेल्या लोकांमध्ये इंग्रजांबरोबर एखाददुसरा हिंदुस्तानीही होता. त्यातील काही व्यापारी होते आणि इतर सर्व गिरमिट्ये मजूर होते. ते एक तर रेल्वेत काम करायचे वा इंग्रजांच्या घरात नोकरी करायचे. त्यातील एक गिरमिट्या होता परभुसिंग. वेढ्यात सापडलेल्या प्रत्येक माणसाला लेडीस्मिथच्या सरकारी अधिकाऱ्यांनी कोणते ना कोणते काम दिलेले होते. एक अतिशय जोखमीचे आणि तितकेच महत्त्वाचे काम कुली म्हणवल्या जाणाऱ्या परभुसिंगच्या हाती होते. त्या तोफेच्या गोळ्याच्या वर्षावांनी लेडीस्मिथमधील अनेक घरांचा नाश झाला होता. काही लोक मेलेसुद्धा होते. लेडीस्मिथजवळील टेकडीवर पोमपोम नावाची तोफ ठेवली होती. तिच्यातून सुटलेला गोळा लेडिस्मिथवर येऊन पडायला १-२ मिनिट लागायचे वेढ्यात सापडलेल्या लोकांना

इतक्या कमी वेळेची जरी सूचना मिळाली तरी तितक्या वेळात काही ना काही उपाययोजना करून ते आपला जीव वाचवू शकायचे. परभुसिंगला एका झाडाखाली बसावे लागायचे. तोफेचा मारा सुरू असेपर्यंत तो झाडाखाली बसून राहायचा. टेकडीवरील तोफेकडे पाहता राहायचे आणि तोफेतून निघणारी ज्वाला दिसू लागताच तो घंडी वाजवायचा. त्या घंटीची प्राणघातक सूचना मिळताच लेडीस्मिथचे नागरिक आपापल्या सुरक्षित जागी लपायचे. मांजरीला पाहून उंदिर जसा बिळात लपून आपला जीव वाचवतो तसे ते आपला जीव वाचवायचे.

परभूसिगच्या या अमूल्य सेवेची प्रशंसा करत लेडीस्मिथचा सेनाधिकारी म्हणाला होता की “परभुसिंगने इतक्या निष्ठेने काम केले की घंटा वाजवण्यात त्याने एकदाही चूक केली नाही.” परभुसिंगवर सतत मृत्यूची तलवार टांगलेली असायची हे सांगण्याची आवश्यकता नाही. त्याच्या बहाद्दुरीची कहाणी केवळ नाताळमध्येच प्रसिद्ध झाली नाही तर ती हिंदुस्तानचे व्हाईसराय लॉर्ड कर्झन यांच्या कानावरही गेली. त्यांनी परभुसिंगकरिता एक रेशमी अंगरखा पाठवला आणि कारण सांगून तो अधिकात अधिक प्रसिद्धीबरोबर द्यावा असे नाताल सरकारला लिहिले. हे काम डरबनच्या महापौरांकडे सोपवण्यात आले होते. त्यांनी डरबनच्या टाऊनहॉलच्या कौन्सिल चेम्बरमध्ये आमसभा बोलावून परभुसिंगला तो अंगरखा भेट दिला. हे उदाहरण आपल्याला दोन गोष्टी शिकवते. - (१) कोणत्याही माणसाला कमी प्रतीचा वा तुच्छ मानायला नको. (२) अतिशय भित्रा माणूस प्रसंग आला तर शूर होऊ शकतो.

# १०. युद्धानंतर

बोअर युद्धाचा सर्वात महत्त्वाचा भाग सन १९०० साली संपुष्टात आला. लेडीस्मिथ, किम्बर्ली आणि माफेकिंगची बोअर सैन्यापासून मुक्तता झाली. जनरल क्रोजे मॅफेकिंगमध्ये पराभूत झाले होते, ब्रिटिश वसाहतीचा संपूर्ण भाग परत ब्रिटिशांच्या ताब्यात आला. ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेट लॉर्ड किचनरनी काबीज केले होते. आता केवळ गनिमीयुद्ध शिल्लक होते.

दक्षिण आफ्रिकेतील माझे काम संपले असे आता मला वाटले. एका वर्षाऐवजी सहा वर्षे मी इथे राहिलो होतो. कामकाजाची रूपरेषा चांगल्या प्रकारे तयार झाली होती. तरीही हिंदुस्तानी जनतेच्या परवानगीशिवाय मी जाऊ शकत नव्हतो. हिंदुस्तानात जाऊन तिथे जनसेवा करण्याची माझी इच्छा आहे आहे असे मी माझ्या सहकाऱ्यांना सांगितले. दक्षिण आफ्रिकेत स्वार्थाऐवजी सेवाधर्माचा धडा मी शिकलो होतो. सेवाधर्माचीच मला ओढ लागलेली होती. श्री मनसुखलाल नाझर दक्षिण आफ्रिकेतच होते. श्री खानही तिथे होते. काही हिंदुस्तानी इंग्लंडमध्ये जाऊन बॅरिस्टर होऊन परतले होते. असे असल्यामुळे दक्षिण आफ्रिकेतून माझे परतणे कोणत्याही दृष्टीने अनुचित ठरू शकत नव्हते. हा सर्व युक्तिवाद मी माझ्या साथीदारांसमोर मांडला. तरीही एका अटीवरच मला हिंदुस्तानात परतण्याची परवानगी मिळाली. ती म्हणजे दक्षिण आफ्रिकेत कोणतेही आकस्मिक संकट उभे राहिले आणि समाजाला माझ्या उपस्थितीची गरज वाटली तर समाज मला कोणत्याही क्षणी परत बोलावू शकतो, आणि मला ताबडतोब दक्षिण आफ्रिकेत परतावे लागेल. ही अट कबूल करून मी परतलो.

मी मुंबईत बॅरिस्टरी करण्याचा निर्णय घेतला. श्री गोखले यांच्या सल्ल्यानुसार आणि मार्गदर्शनांतर्गत सार्वजनिक कार्य करणे हा माझा हेतू होता. दुसरा हेतू होता सार्वजनिक कार्य करताना चरितार्थाकरिता कमाई करणे. यामुळे मी एक चेम्बर (खोली) भाड्याने घेतली. माझी वकिलीही थोडी चालू लागली. दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींबरोबर माझे इतके घनिष्ट संबंध जुळले होते की तिथून परतलेले अशीलच मला इतके काम द्यायचे की त्यामुळे माझा चरितार्थ भागत असे. परंतु माझ्या नशिबी स्वस्थ आणि शांत जीवन लिहिलेलेच नव्हते. मुश्किलीने मी

मुंबईत तीनचार महिने राहिलो असेन तोच दक्षिण आफ्रिकेतून तातडीची तार आली. - "येथील परिस्थिती भयानक आहे. श्री चेम्बरलेन काही वेळेतच येतील. तुमची उपस्थिती आवश्यक आहे."

मी मुंबईचे ऑफिस आणि घर गुंडाळले आणि पहिल्या जहाजाने दक्षिण आफ्रिकेकरिता रवाना झालो. १९०२ संपत आले होते. १९०१च्या अखेरीस मी हिंदुस्तानात परतलो होतो. १९०२च्या मार्च एप्रिलमध्ये मी ऑफिस उघडले होते. तारेतून तेथील संपूर्ण परिस्थितीचे आकलन होऊ शकत नव्हते. परंतु ट्रान्सवालमध्येच काही अडचण उद्भवली असेल असा अंदाज मी केला. चारसहा महिन्यात मी परतू शकेन असे वाटत असल्यामुळे माझे कुटुंब मी माझ्याबरोबर नेले नव्हते. परंतु डरबन येथे पोहोचल्यानंतर सर्व गोष्टी ऐकून मी थक्कच झालो. बोअर युद्धानंतर दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्तानींच्या परिस्थितीत बरीच सुधारणा होईल असे आमच्यापैकी अनेकांना वाटत होते. कमीतकमी ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेटमध्ये तरी काही अडचण येऊ नये अशी आमची अपेक्षा होती. बोअर युद्ध सुरू झाले तेव्हा या युद्धाचे एक कारण बोअरांकडून हिंदुस्तानींशी केला जाणारा दुर्व्यवहार आहे असे लॉर्ड लॅन्सडाऊन, लॉर्ड सेल्बर्न आणि ब्रिटनचे इतर अधिकारी म्हणत असत. ट्रान्सवाल जर ब्रिटिश वसाहत झाले तर तेथील हिंदुस्तानींचे सर्व दुःख दूर होतील असे प्रिटोरिया येथील ब्रिटिश एजंटसुद्धा माझ्यासमोर अनेकदा म्हणाले होते. राजसत्ता बदलताच ट्रान्सवालचे जुने कायदे हिंदुस्तानींवर कोणत्याही अवस्थेत लागू केले जाणार नाही असा विश्वास गोऱ्यांच्याही मनात होता. ही गोष्ट लोकांच्या मनात इतकी काही रुजली होती की जमिनीचा लिलाव करणारे जे कर्मचारी हिंदुस्तानींनी लावलेली बोली युद्धापूर्वी कधीही स्वीकारत नव्हते ती आता स्वीकारू लागले. अशा प्रकारे बऱ्याचशा हिंदुस्तानींनी लिलावामध्ये जमिनी विकत घेतल्या. परंतु ते आपल्या दस्तावेजाची नोंदणी करण्याकरिता जेव्हा तहसील कार्यालयात गेले तेव्हा तहसीलमधील अधिकाऱ्याने १८८५च्या कायदा क्रमांक तीनचा हवाला देत जमिनीची नोदणी करण्याकरिता नकार दिला! मी डरबन बंदरात उतरलो तेव्हा हे सर्व माझ्या कानावर घालण्यात आले. मला ट्रान्सवालला जावे लागणार असे हिंदुस्तानी पुढाऱ्यांनी मला सांगितले. परंतु आधी श्री चेम्बरलेन डरबनला येणार आहेत. येथील हिंदुस्तानींची परिस्थितीसुद्धा त्यांना कळणे जरुरीचे आहे. येथील काम पूर्ण करून तुम्ही ट्रान्सवालला जा असे ते म्हणाले.

नातालमध्ये हिंदुस्तानींचे एक प्रतिनिधीमंडळ श्री चेम्बरलेन यांना भेटले. त्यांनी प्रतिनिधी मंडळाचे सर्व म्हणणे शांततापूर्वक आणि धैर्याने ऐकून घेतले आणि नातालच्या मंत्रिमंडळाशी हिंदुस्तानींच्या संपूर्ण परिस्थितीची चर्चा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. नातालमध्ये बोअर युद्धापूर्वी जे कायदे मंजूर करण्यात आले होते त्यांच्यात लगेच सुधारणा होईल अशी अपेक्षा मी तरी केली नव्हती. या कायद्यांची चर्चा मी मागील प्रकरणात केली आहे.

बोअर युद्धापूर्वी कोणताही हिंदुस्तानी ट्रान्सवालमध्ये जाऊ शकत होता हे तर वाचकांना माहीतच आहे. परंतु आता ती स्थिती नसल्याचे मला आढळले. त्या वेळचा प्रतिबंध गोरे आणि हिंदुस्तानी यांच्यावर सारखाच लागू होता. ट्रानसवालची अजूनही अशी अवस्था होती की युद्ध संपल्यानंतरही सर्व दुकाने उघडली नव्हती. दुकानांमधील माल बोअर सरकारने हडप केला होता. यामुळे बऱ्याच मोठ्या प्रमाणात लोक जर ट्रान्सवालमध्ये शिरले तर सर्वांना अन्नवस्त्रसुद्धा मिळू शकणार नसल्यामुळे लावण्यात आलेला प्रतिबंध काही काळाकरिता असेल तर हरकत नाही असे मला मनातून वाटत होते. परंतु गोऱ्यांच्या आणि हिंदुस्तानींच्या ट्रान्सवालमधील प्रवेशाकरिता जो परवाना घ्यावा लागायचा तो देण्याच्या पद्धतीत फरक होता. आणि हा फरकच शंकेकरिता आणि भीतीकरिता कारणीभूत ठरला. परवाने देणारी कार्यालये दक्षिण आफ्रिकेच्या वेगवेगळ्या बंदरांमध्ये उघडण्यात आली होती. गोऱ्यांना मागताच परवाने मिळू शकत होते, परंतु हिंदुस्तानींकरिता ट्रान्सवालमध्ये एक आशियायी विभाग उघडण्यात आला होता. हिंदुस्तानी आधी त्या विभागाच्या अधिकाऱ्याकडे अर्ज करायचे. तो अर्ज मंजूर झाल्यानंतर डरबन वा इतर बंदरामधून परवाना मिळू शकायचा. मलासुद्धा जर असा अर्ज करावा लागणार असेल तर चेम्बरलेननी ट्रान्सवाल सोडण्यापूर्वीच मला तो परवाना मिळू शकेल अशी अपेक्षा करता येऊ शकत नव्हती. तसा परवाना मिळवून ट्रान्सवासचे रहिवासी माझ्याकडे तो पाठवू शकत नव्हते. ही गोष्ट त्यांच्या शक्तीपलीकडील होती. डरबनमधील माझ्या ओळखीमुळे मला परवाना मिळेल असे त्यांनी गृहीत धरले होते. परवाने देणाऱ्या अधिकाऱ्याला तर मी ओळखत नव्हतो, परंतु डरबनच्या पोलीस अधिक्षकाला मी ओळखत होतो. यामुळे त्यांना बरोबर नेऊन मी डरबनच्या

त्या अधिकाऱ्याशी ओळख करून घेतली. सन १८९३ साली मी ट्रान्सवालमध्ये एक वर्ष राहिलो होतो हे सांगून मी परवाना घेतला आणि प्रिटोरियाला पोहोचलो.

प्रिटोरियात मला वेगळेच वातावरण आढळले. आशियायी विभाग एक भयानक विभाग आहे आणि तो केवळ हिंदुस्तानींना दाबून टाकण्याकरिता अस्तित्वात आला आहे हे माझ्या लक्षात आले. त्यात नेमण्यात आलेले अधिकारी बोअर युद्धाच्या वेळी सैन्याबरोबर हिंदुस्तानातून दक्षिण आफ्रिकेत आले होते आणि नशीब काढण्याकरिता दक्षिण आफ्रिकेत राहिले होते. त्यातील काही अधिकारी लाच घ्यायचे. अशा दोन अधिकाऱ्यांवर लाच घेतल्याबद्दल खटलाही भरण्यात आला होता. पंचांनी त्यांना निर्दोष घोषित करून जरी सोडून दिले होते तरी त्यांनी लाच घेतल्याबद्दल कोणताही संशय न राहिल्यामुळे त्यांना नोकरीतून काढून टाकण्यात आले होते. पक्षपातीपणाला तर काही सीमाच नव्हती. आणि कुठे जर असा नवीन विभाग उघडण्यात येत असेल आणि तो प्रचलित अधिकाऱ्यावर अंकुश ठेवण्याकरिता उघडण्यात आला असेल तर आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याकरिता आणि अंकुश लावण्याचे आपले कर्तव्य चांगल्या प्रकारे पाडत आहो हे दाखवण्याचा त्या विभागाचा सतत प्रयत्न असतो. यामुळे नवनवीन युक्त्या शोधण्याच्या प्रयत्नात तो विभाग सतत असतो. आशियायी विभागासंबंधी अगदी असेच घडले होते.

माझ्या कामाची मला परत नव्याने सुरुवात करावी लागेल असे माझ्या लक्षात आले. मी ट्रान्सवालमध्ये कसा आलो हे लगेच आशियायी विभागाला कळले नाही. मला विचारण्याचा त्यांना एकदम धीर झाला नाही. मी चोरून प्रवेश करणार नाही इतका विश्वास त्यांना नक्कीच असावा असे मला वाटते. मी परवाना कसा मिळवला याची माहिती त्यांनी आडवळणाने मिळवली. प्रिटोरिया येथील हिंदुस्तानींच्या मंडळानेसुद्धा चेम्बरलेन यांच्याकडे जाण्याची तयारी केली होती. त्यांच्यासमोर सादर करावयाचा अर्ज मीच तयार केला होता. परंतु आशियायी विभागाने मला चेम्बरलेनकडे जाऊ दिले नाही. अशा परिस्थितीत आपणही चेम्बरलेनला भेटायला जाऊ नये असे हिंदुस्तानी प्रतिनिधी मंडळाला वाटले. परंतु मला त्यांचा हा विचार पटला नाही. माझा जो अपमान झाला आहे तो मी विसरलो आहे आणि तुम्हीसुद्धा त्या अपमानाची पर्वा करू नका असा सल्ला

मी त्यांना दिला. अर्ज तर तयार होताच. मी त्यांना म्हणालो की तो चेम्बरलेन यांना आपले निवेदन ऐकवणे आवश्यक आहे. त्या वेळी हिंदुस्तानी बॅरिस्टर जॉर्ज गॉडफ्रे तिथे उपस्थित होते. चेम्बरलेनसमोर अर्ज वाचण्याकरिता त्यांना तयार करण्यात आले. हिंदुस्तानी प्रतिनिधीमंडळ चेम्बरलेन यांना भेटायला गेले. तिथे माझा विषय निघाला. श्री चेम्बरलेन म्हणाले, “श्री. गांधींना मी डरबन येथे भेटलो आहे. ट्रान्सवालची गोष्ट ट्रान्सवालच्या लोकांच्या तोंडूनच ऐकावी म्हणून मी त्यांना भेटायला नकार दिला.” माझ्या दृष्टीने हे उत्तर आगीत तेल ओतण्यासारखे होते. श्री चेम्बरलेन आशियायी विभागाने शिकवलेले बोलत होते. जे वातावरण हिंदुस्तानात पसरले होते तेच वातावरण आशियायी विभागाने ट्रान्सवालमध्ये पसरवले. गुजराती (वा हिंदुस्तानी) लोकांना माहीतच असेल की हिंदुस्तानातील इंग्रज अधिकारी मुंबईत राहणाऱ्या माणसाला चंपारणमध्ये परदेशी समजतात. याच न्यायाने डरबनमध्ये राहणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला ट्रान्सवालमधील हिंदुस्तानींच्या परिस्थितीचे ज्ञान कसे काय असू शकते असे आशियायी विभागाने चेम्बरलेन यांना समजावले, मी ट्रान्सवालमध्ये राहिलेलो होतो आणि जरी राहिलेलो नसतो तरी ट्रान्सवालच्या परिस्थितीशी पूर्णपणे परिचित होतो हे त्या अधिकाऱ्याला कुठे माहीत होते? प्रश्न केवळ एकच होता - “ट्रान्सवालच्या परिस्थितीशी अरिचित कोण होता?” मला थेट हिंदुस्तानातून बोलावून या प्रश्नाचे उत्तर हिंदुस्तानी समजाने दिलेले होते. सत्ताधाऱ्यासमोर बुद्धीवर आधारित उत्तराचा परिणाम होत नसतो ही काही नवीन गोष्ट नाही. त्या वेळी श्री चेम्बरलेन स्थानिक ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या इतके प्रभावाखाली होते आणि तेथील गोऱ्यांना संतुष्ट करण्याकरिता इतके उत्सुक होते की त्यांच्याकडून न्याय मिळण्याची अपेक्षा अगदीच करता येत नव्हती वा अगदीच कमी अपेक्षा करता येऊ शकत होती. तरीही चुकून का होईना, वा स्वाभिमानाच्या भावनेला लागलेल्या धक्क्यामुळे न्याय मिळवण्याची एकही संधी सोडता कामा नये केवळ इतका विचार करून हिंदुस्तानी प्रतिनिधिमंडळ चेम्बरलेन यांना भेटायला गेले होते.

परंतु माझ्यासमोर १८९४पेक्षाही कठीण परिस्थिती निर्माण झाली होती. चेम्बरलेननी दक्षिण आफ्रिका सोडताच मी हिंदुस्तानात परतू शकेन असे मला वाटत होते. दुसरीकडे दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्तानींची गंभीर अवस्था दिसत असतानाही जनसेवा करण्याकरिता अहंकार भावनेने मी जर

हिंदुस्तानात निघून गेलो तर सेवाधर्माचे दक्षिण आफ्रिकेत मला जे ओझरते दर्शन झाले होते त्याला धक्का लागला असता. समाजाला घेरणारे हे संकटाचे वादळ जोपर्यंत विरून जात नाही, वा अधिक भयाण होऊन ते हिंदुस्तानी समाजावर तुटून पडून त्याचा सर्वनाश करत नाही तोपर्यंत मी दक्षिण आफ्रिकेतच थांबलो पाहिजे. असे करत असताना मला आयुष्यभर जरी दक्षिण आफ्रिकेत राहावे लागले तरी हरकत नाही असा विचार मी केला. समाजातील नेत्यांबरोबर यासंबंधी मी चर्चा केली आणि १८९४प्रमाणेच या वेळीसुद्धा वकिलीच्या बळावर चरितार्थ चालवण्याचा निश्चय मी त्यांना सांगितला. समाजातील लोकांना तर हेच पाहिजे होते.

ट्रान्सवालमध्ये वकिली करण्याकरिता मी लगेच अर्ज केला. नातालप्रमाणेच येथील वकीलवर्गही माझ्या अर्जाला विरोध करील अशी भीती मला वाटत होती. परंतु ही भीती निराधार ठरली. मला वकिलीची सनद मिळाली आणि जोहानिसबर्गमध्ये मी ऑफिस उघडले. ट्रान्सवालमध्ये सगळ्यात जास्त हिंदुस्तानी जोहानिसबर्गमध्ये राहत होते. यामुळे माझ्या उपजीविकेच्या आणि सार्वजनिक सेवेच्या दृष्टीने जोहानिसबर्ग हेच ठिकाण माझ्याकरिता सर्वात अनुकूल होते. आशियायी विभागाच्या कुजट वासाचा आणि भ्रष्टाचाराचा मला दररोज अनुभव येत होता, आणि ट्रान्सवाल येथील हिंदुस्तानी मंंडळाची (ट्रान्सवाल इंडियन असोसिएशन) सर्व शक्ती ही घाण दूर करण्यातच खर्च होत होती. १८९४चा कायदा रद्द करायला लावण्याची गोष्ट आता दुरस्थ ताऱ्याप्रमाणे झाली होती. आम्हाला बुडवण्याकरिता आशियायी विभागाच्या पुराचा जो प्रचंड लोंढा आमच्याकडे येत होता आणि त्यापासून आमचा स्वतःचा बचाव करणे हेच आमचे तात्कालिक ध्येय ठरले होते. हिंदुस्तानी प्रतिनिधी मंडळाने लॉर्ड मिल्नर, तिथे आलेले लॉर्ड सेल्बर्न, ट्रान्सवालचे लेफ्टनंट गव्हर्नर सर ऑर्थर लॉली, जे नंतर मद्रास राज्याचे राज्यपाल झाले होते, यांची भेट घेतली आणि त्यांच्यासमोर आमच्या तक्रारी मांडल्या. अनेकदा मी एकटाच सरकारी अधिकाऱ्यांना भेटत असे. इथे तिथे आम्हाला एखादी सवलत मिळत असे परंतु ती फाटलेल्या आभाळाला ठिगळ लावण्याच्या प्रयत्नासारखी असायची. एखाद्या लुटारूने आपली सर्व संपत्ती लुबाडावी आणि नंतर आपल्या रडण्याभेकण्यामुळे किंचित सहानुभूती दाखवून थोडीशी संपत्ती जर परत केली तर आपले जसे समाधान होईल तसेच समाधान आम्हाला व्हायचे. आमच्या या आंदोलनामुळे ज्या

अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्यात आल्याचे मी आधीच वर लिहिले आहे त्याच्यावर खटला भरण्यात आला होता. हिंदुस्तानींच्या प्रवेशासंबंधी जी भीती मी वर सांगितली ती खरी ठरली. गोऱ्यांकरिता ट्रान्सवालमध्ये येण्याकरिता परवान्याची गरज संपली, परंतु हिंदुस्तानींकरिता परवान्यांचे बंधन तसेच कायम राहिले. ट्रान्सवालच्या भूतपूर्व सरकारने जितका कठोर कायदा केला होता  तितकी त्याची कठोर अंमलबजावणी होत नव्हती. ही परिस्थिती बोअर सरकारच्या औदार्यामुळे वा माणुसकीमुळे नाही तर प्रशासन विभागाच्या दुर्लक्षामुळे निर्माण झाली होती. आणि त्या विभागाचे अधिकारी सज्जन जरी असले तरी त्यांना आपले सौजन्य दाखवण्याची संधी जशी बोअर राज्यात मिळत होती तशी ब्रिटिश राज्यात मिळत नव्हती. ब्रिटिश शासनव्यवस्था जुनी असल्यामुळे ती अधिक दृढ आणि व्यवस्थित झाली होती आणि अशा शासनव्यवस्थेत अधिकाऱ्यांना यंत्राप्रमाणे काम करावे लागत असते. त्या लोकांच्या काम करण्याच्या स्वातंत्र्यावर एकावर एक अंकुश लागलेले असतात. यामुळे ब्रिटिश संविधानात शासनव्यवस्था उदार असेल तरच तिचा अधिकाधिक लाभ प्रजेला मिळू शकतो. आणि ती व्यवस्था कंजूष आणि अत्याचारी असेल तर त्या व्यवस्थेत प्रजेला दडपशाहीचा पुरेपूर अनुभव येतो. अगदी याउलट परिस्थिती ट्रान्सवालच्या भूतपूर्व शासनव्यवस्थेत होती. अशा व्यवस्थेत उदार कायद्यांचा लाभ मिळण्याचा वा न मिळण्याचा आधार सरकारी विभागाच्या बहुतांश अधिकाऱ्यांवर अवंलंबून असतो. ट्रान्सवालमध्ये जेव्हा ब्रिटिश सत्ता स्थापन झाली तेव्हा याच न्यायाने हिंदुस्तानींशी संबंधित जे कायदे होते त्यांची अंमलबजावणी दिवसेदिवस अजून कठोर झाल्याशिवाय राहूच शकत नव्हती. यामुळे जुने कायदे रद्द करण्याचा उद्देश बाजूला ठेवावा लागला आणि असलेल्या कायद्यांची अंमलबजावणी सैल कशी करायला लावायची याकडेच हिंदुस्तानींना प्रामुख्याने लक्ष द्यावे लागले.

लवकर म्हणा वा उशिरा एका सिद्धांताची चर्चा आपल्याला करावीच लागेल, आणि याच ठिकाणी ती चर्चा केली तर हिंदुस्तानींचा दृष्टिकोन आणि पुढे निर्माण झालेली परिस्तर्ती या गोष्टी समजून घेणे सोपे होईल. ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेटमध्ये ब्रिटिश ध्वज फडकू लागल्यानंतर लगेच लॉर्ड मिल्नर यांनी एक समिती नियुक्त केली. या समितीचे काम दोन्ही राज्यांच्या कायद्याची तपासणी करून प्रजेच्या स्वातंत्र्यावर अंकुश लावणाऱ्या वा ब्रिटिश संविधानाच्या भावनेच्या

विरोधी असलेल्या कायद्यांची सूची तयार करणे होते. या तपासणीत हिंदुस्तानींच्या स्वातंत्र्यावर अंकुश लावणाऱ्या कायद्यांचा सहज समावेश करता येऊ शकला असता. परंतु ही चौकशीसमिती नेमण्यामागे मिल्नरचा हेतू हिंदुस्तानींचे दुःख दूर करण्याचा नव्हता, तर इंग्रजांचे दुःख दूर करण्याचा होता. परोक्ष रूपाने इंग्रजांच्या मार्गात अडथळे आणणारे कायदे लवकरात लवकर रद्द करणे हा त्याचा उद्देश होता. या समितीचा अहवाल फार कमी वेळेत तयार झाला आणि असे म्हणता येईल की इंग्रजांच्या विरोधात जाणारे कायदे एकाच हुकुमाने रद्द झाले.

त्याच समितीने हिंदुस्तानींच्या विरोधात जाणाऱ्या कायद्यांचीसुद्धा सूची तयार केली व ते सर्व कायदे एका एका पुस्तकात छापण्यात आले आणि आशियायी विभाग त्यांचा उपयोग म्हणा वा दुरुपयोग म्हणा करू लागला.

हिंदुस्तानींविरोधी कायद्यांची रचना त्या कायद्यांमध्ये हिंदुस्तानींचे नाव न टाकता ते सर्वांना लागू होतील अशा प्रकारे करता आली असती आणि त्यांची अंमलबजावणी करायची की नाही हा निर्णय अधिकाऱ्यांवर सोडता आला असता. किंवा या कायद्याची शब्दरचना अशा प्रकारे करता आली असती की जणू काय ते कायदे सर्वांकरिता आहेत असे असे ध्वनित व्हावे परंतु त्यांचा रोख मात्र हिंदुस्तानींच्या विरोधातच असावा. असे कायदे केल्यामुळे कायदे करणारांचा हेतू सफल झाला असता आणि ते सर्वांकरिता आहेत असे म्हणता आले असते. तसेच त्यांच्या अंमलबजावणीने कुणीही अपमानित झाले नसते. कालांतराने हिंदुस्तानीविरोधी भावना जर कमी झाली तर कायद्यात कोणताही बदल न करता कायद्यांच्या केवळ उदारतापूर्वक अंमलबजावणीने ज्या हिंदुस्तानी समाजाच्या विरोधात ते कायदे करण्यात आले होते .त्या समाजाला सुटकेचा श्वास घेता आला असता. ज्याप्रमाणे दुसऱ्या प्रकारच्या कायद्यांना मी सर्वांकरिता असलेले कायदे वा सार्वत्रिक स्वरूपाचे कायदे म्हटलेले आहे त्याचप्रमाणे पहिल्या प्रकारच्या कायद्यांना एकपक्षीय वा जातीय कायदा म्हणता येऊ शकते. दक्षिण आफ्रिकेत त्यांना रंगभेदाचे कायदे म्हणतात कारण काळ्या वा गव्हाळ रंगाच्या कातडीच्या प्रजेवर गोऱ्यांच्या तुलनेत अधिक अंकुश लावण्यात येतात. यालाच 'कलर बार' वा रंगभेद वा रंगद्वेष म्हणतात. प्रचलित कायद्यांमधीलच एक

उदाहरण आपण घेऊ या. वाचकांना आठवत असेल की नातालमध्ये मताधिकारासंबंधी जो कायदा संमत झाला होता आणि नंतर साम्राज्य सरकारकडून जो फेटाळण्यात आला होता त्यात एक कलम असे होते की भविष्यात कोणत्याही आशियायी माणसाला मताधिकार राहणार नाही. आता असा कायदा जर बदलवून घ्यायचा असेल तर लोकमत इतके शिक्षित असले पाहिजे की बहुतांश लोक केवळ आशियायींच्या विरोधात नसून भागणार नाही तर त्यांच्या मनात आशियायींबद्दल मैत्रीभावही असला पाहिजे. कधी काळी अशी सुसंधी मिळाली तरच रंगभेदाचा कलंक मिटवता येऊ शकेल. हे उदाहरण आहे एकपक्षीय वा रंगभेद करणाऱ्या कायद्याचे. नातालचा वरील कायदा नष्ट होऊन जो कायदा मंजूर झाला त्यातील रंगभेदाचा विखार दूर करण्यात आला होता आणि तो सार्वजनिक केला होता. आणि तरीही त्यामुळे पहिल्या कायद्याचा हेतू जवळपास साध्य झाला. या दुसऱ्या कायद्याच्या एका कलमाचा आशय असा आहे - "ज्या देशातील लोकांना संसदेचे प्रतिनिधी निवडण्याचा (पार्लमेंटरी फ्रेंचाईज) अधिकार नसेल त्या देशातील नागरिकांना नातालमध्ये मतदान अधिकार राहणार नाही." या कलमात कुठेही हिंदुस्तानींचे वा आशियायी लोकांचे नाव आलेले नाही. हिंदुस्तानात इंग्लंडसारखा मताधिकार आहे की नाही याबद्दल कायदेपंडितात मतभेद असू शकत होते. आपण युक्तिवादाकरिता जरी असे मान्य केले की हिंदुस्तानात त्या वेळी म्हणजे १८९४ साली असा मताधिकार नव्हता आणि आजही नाही आणि तरीही नातालमध्ये नातालमधील मतदारांचे नाव नोंदवणाऱ्या अधिकाऱ्याने जरी हिंदुस्तानींची नावे नोंदवली तरी त्याने कायद्याविरुद्ध काम केले असे कोणीही एकाएकी म्हणू शकणार नाही. सामान्यपणे लोकांच्या हक्काचे रक्षण होईल अशा प्रकारे तर्क करायचा असतो. यामुळे जोपर्यंत तत्कालीन सरकारची इच्छा असेल तोपर्यंत तो अधिकारी वरील कायदा अस्तित्वात असतानाही हिंदुस्तानींच्या आणि इतर लोकांच्या नावाची नोंदणी मतदारसूचीत करू शकतो, आणि कालांतराने गोऱ्यांची हिंदुस्तानींबद्दलची घृणा कमी झाली आणि सरकार हिंदुस्तानींविरुद्ध कायदे करू शकत नसेल तर कायद्यात कोणत्याही प्रकारचा बदल केल्याशिवायही हिंदुस्तानींची नावे मतदारसूचीत नोंदवता येऊ शकतील. सार्वत्रिक स्वरूपाच्या कायद्याचे हेच वैशिष्ट्य असते. दक्षिण आफ्रिकेतील ज्या इतर कायद्यांचा उल्लेख मी मागील

प्रकरणात केला आहे त्यातूनही अशा प्रकारची उदाहरणे देता येऊ शकतील. यामुळे एकपक्षीय कायदे किमान करणे हीच शहाणपणाची राजनीती होईल. आणि भेदभाव करणारे कायदे जर अगदीच केले नाही तर ती फारच चांगली गोष्ट होईल. एकदा कायदा संमत झाल्यानंतर त्यात बदल करणे फार कठीण असते. लोकमत बरेच शिक्षित असते तेव्हाच बनलेले कायदे रद्द करता येऊ शकतात. ज्या लोकशाहीत सतत कायद्यांमध्ये बदल होत असतात त्या लोकशाहीला सुदृढ लोकशाही म्हणता येऊ शकत नाही.

ट्रान्सवालमधील आशियायीविरोधी कायद्यांमध्ये किती विष भरलेले होते याचा अंदाज आता आपल्याला चांगला करता येऊ शकतो. हे सर्व कायदे एकपक्षीय होते. त्या कायद्यांप्रमाणे आशियायी लोक मत देऊ शकत नव्हते. सरकारने ठरवलेल्या मोहल्ल्याबाहेरील जमिनीचे ते मालक होऊ शकत नव्हते. ते कायदे रद्द होईपर्यंत अधिकारीवर्ग हिंदुस्तानींना अगदीच मदत करू शकत नव्हता. ते कायदे सार्वजनिक नव्हते. यामुळेच लॉर्ड मिल्नरनी नियुक्त केलेली चौकशीसमिती इतर कायद्यांपासून त्या कायद्यांना वेगळे काढू शकली. परंतु ते जर सार्वजनिक कायदे असते तर इतर कायद्यांसोबत ते कायदेसुद्धा, ज्यात आशियायी लोकांचे नाव तर नव्हते पण त्यांचा उपयोग आशियायी लोकांच्या विरोधातच केला जात होता, रद्द झाले असते. मग "आम्ही काय करावे, आम्ही लाचार आहो, जोपर्यंत नवीन विधिमंडळ हे कायदे रद्द करत नाही तोपर्यंत त्यांची अंमलबजावणी करणे आम्हाला भाग आहे" असे अधिकारीवर्ग कधीही म्हणू शकला नसता.

हे कायदे अंमलबजावणीकरिताच जेव्हा आशियायी विभागाच्या हाती आले तेव्हा त्याने पूर्ण शक्तीनिशी त्या कायद्यांचा अंमल सुरू केला. एवढेच नाही तर त्याने असेही सुचवले की हे कायदे अंमलबजावणी करण्यासारखे आहेत असे जर सरकारला वाटत असेल तर आणि आशियायी लोकांच्या बाजूने त्यात मुद्दाम म्हणा की नकळत काही पळवाटा शिल्लक राहिल्या असतील तर त्या ताबतोब बंद करण्याचा अधिकार सरकारने आपल्याकडे घेतला पाहिजे. हा युक्तिवाद साधा आणि सरळ वाटतो. हे कायदे वाईट असतील तर सरकारने रद्द केले पाहिजे, आणि जर ते योग्य

असतील तर त्यातील दोष दूर केले पाहिजे. मंत्रिमंडळाने या कायद्यांचा अंमल करण्याचे धोरण अवलंबिले. हिंदुस्तानी समाजाने बोअर युद्धात इंग्रजांबरोबर उभे राहून आपल्या प्राणाची बाजी लावली होती. ट्रान्सवालमधील ब्रिटिश राजदूत हिंदुस्तानींच्या अधिकारांकरिता भांडले होते. परंतु ही घटना जुन्या शासनांतर्गत झाली होती. स्थानिक अनुभवानंतर ब्रिटिश अधिकाऱ्यांना आता वाटू लागले की बोअरांचा हिंदुस्तानींबरोबरचा दुर्व्यवहार हेही बोअर युद्धाचे कारण आहे असे जे घोषित करण्यात आले होते ती कृती स्थानिक परिस्थितीची कल्पना नसलेल्या शासकांद्वारे दूरदृष्टीचा उपयोग न करता करण्यात आलेली केवळ एक घोषणा होती. बोअर राज्यामध्ये हिंदुस्तानीविरोधी जे कायदे करण्यात आले होते ते पुरेसे नव्हते आणि सुव्यवस्थितही नव्हते. हिंदुस्तानी लोक जर ट्रान्सवालमध्ये वाटेल तेव्हा प्रवेश करू शकत असतील आणि हवे त्या ठिकाणी व्यापार करू शकणार असतील तर इंग्रज व्यापाऱ्यांचे फार मोठे नुकसान होईल. या आणि अशा प्रकारच्या वातावरणाने गोऱ्यांना आणि त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मंत्रिमंडळाला पूर्णपणे भारून टाकले होते. गोऱ्यांना कमीतकमी वेळात जास्तीत जास्त संपत्ती गोळा करायची होती. अशात हिंदुस्तानी लोक जर त्यांच्या कमाईत भागीदार झाले तर त्यांना ते कसे मान्य व्हावे? यातच पाखंडी तत्त्वज्ञानाची भर पडली. दक्षिण आफ्रिकेतील बुद्धिमान लोकांना केवळ स्वार्थापोटी करण्यात आलेला युक्तिवाद पसंत नव्हता. अन्याय करत असतानाही माणूस अशा काही युक्तिवादाच्या शोधात असतो की जो त्याला उचित वाटतो. दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांच्या बुद्धीने हेच केले. जनरल स्मट्स आणि इतरांनी केलेले युक्तिवाद असे होते -

“दक्षिण आफ्रिका पाश्चात्य संस्कृतीचा प्रतिनिधी आहे. हिंदुस्तान पौर्वात्य संस्कृतीचे केंद्र आहे. या दोन संस्कृतींचा समन्वय होऊ शकतो असे तत्त्वज्ञानी, विचारवंत लोक मान्य करत नाही. यामुळे दोन प्रतिस्पर्धी संस्कृतींचे पालन करणाऱ्या प्रजेचा परस्परांबरोबर संबंध आला तर त्याची परिणती स्फोटातच होईल. दोघांचा संघर्ष अपरिहार्य आहे. पश्चिम साधेपणाच्या विरोधात आहे, तर पूर्वेचे लोक साधेपणाला फार महत्त्व देतात.अशा परिस्थितीत या दोघांचा मेळ कसा घालता येऊ शकतो? या दोन संस्कृतींमधून कोणती संस्कृती चांगली हे पाहणे राजकारणी वा व्यावहारिक लोकांचे काम नाही. पाश्चात्य संस्कृती चांगली असो वा नसो, पाश्चत्य लोक त्याच संस्कतीला

चिकटून राहू इच्छितात. या संस्कृतीच्या रक्षणाकरिता पश्चिमेच्या लोकांनी अथांग परिश्रम केले आहेत, त्याकरिता रक्ताच्या नद्या वाहिलेल्या आहेत, विविध प्रकारचे दुःख सहन केले आहे. यामुळे पश्चिमेतील लोकांना या वेळी दुसरा मार्ग सुचू शकत नाही. या दृष्टीने विचार केला तर हा प्रश्न ना तर हिंदुस्तानींचा आहे ना युरोपियांचा आहे, ना व्यापारातील मत्सराचा आहे ना वर्णद्वेषाचा आहे. हा प्रश्न केवळ आपल्या संस्कृतीचे रक्षण करण्याचा म्हणजेच स्वरक्षणाचे सर्वोच्च अधिकार उपभोगण्याचा आणि त्याच्याशी संबंधित कर्तव्यपालनाचा आहे. युरोपियांना हुसकावण्याकरिता हिंदुस्तानींचे दोष काढण्यात काही वक्त्यांना मजा वाटत असली तरी राजकीय दृष्टीने विचार करणाऱ्या लोकांचे हेच म्हणणे आहे की दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्तानी लोकांचे गुणच त्यांच्या दोषासारखे झाले आहेत. हिंदुस्तानींचा साधेपणा, दीर्घकाळ धीराने मेहनत करण्याचा त्यांचा स्वभाव, त्यांचा काटकसरीपणा, त्यांची परलोकपरायणता, सहनशीलता इत्यादी गुणांमुळेच ते दक्षिण आफ्रिकेत अप्रिय झाले आहेत. पश्चिमेचे लोक साहसी, अधीर, भौतिक गरजात वाढ करणारे आणि त्यांच्या पूर्ततेत मग्न असणारे आहेत. ते खाण्यापिण्याचे शौकीन आहेत, शारीरिक श्रम टाळण्याकरिता ते आतुर असतात आणि ते उधळे आहेत. यामुळे पौर्वात्य संस्कृतीचे हजारो प्रतिनिधी दक्षिण आफ्रिकेत येऊन राहिले तर आपल्याला मागे फिरणे भाग पडेल अशी भीती त्यांना सतत वाटत असते. दक्षिण आफ्रिकेत राहणारे पाश्चात्य लोक आत्महत्या करण्याकरिता कधीही तयार होणार नाहीत, आणि या प्रजेचे समर्थक, त्यांचे पुढारी त्यांना कधीही अशा संकटात पडू देणार नाहीत.”

इथे मी सांगितलेला युक्तिवाद तितक्याच निष्पक्ष भावाने मांडला आहे जितका तो दक्षिण आफ्रिकेत चांगले चारित्र्यसंपन्न गोरे मांडतात. या तत्त्वज्ञानाला मी तरी तत्त्वज्ञानाचे पाखंड म्हणून संबोधले आहे. परंतु यातून मला असे सुचवायचे नाही की यात काहीच तथ्य नाही. व्यावहारिक दृष्टीने म्हणजे स्वार्थाच्या दृष्टीने तर त्यात बराच काही खरेपणा आहे. परंतु तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने त्यात केवळ पाखंड आणि ढोंग आहे. तटस्थ बुद्धीचा कोणताही माणूस हा युक्तिवाद मान्य करणार नाही असे निदान माझ्या अल्पबुद्धीला वाटते. कोणताही सुधारक आपल्या संस्कृतीला अशा लाचार परिस्थितीत ठेवणार नही ज्या प्रकारे वरील तत्त्वज्ञान मांडणाऱ्या लोकांनी आपल्या

संस्कृतीला ठेवले आहे. जोपर्यंत मला माहीत आहे पूर्वेच्या कोणत्याही तत्त्वज्ञाला अशी भीती वाटत नाही की पश्चिमेचे लोक स्वेच्छेने आपल्या संपर्कात आले तर पूर्वेची संस्कृती वाळूप्रमाणे पाश्चात्य संस्कृतीच्या पुरात वाहून जाईल. पुर्वेच्या संस्कृतीला पाश्चत्य संस्कृतीच्या समागमाची भीती वाटत नाही. एवढेच नाही तर ती अशा समागमाचे स्वागतच करत असते असे मला पूर्वेच्या तत्त्वज्ञानाचे जे काही ज्ञान आहे त्यावरून तरी वाटत असते. पूर्वेकडे याच्या उलट उदाहरणे जरी आढळली तरी त्यामुळे मी सांगितलेल्या सिद्धांताला धक्का लागत नाही, कारण माझ्या सिद्धांताची पुष्टी करणारी अनेक उदाहरणे देता येऊ शकतात. ते काहीही असले तरी पश्चिमेच्या तत्त्वज्ञांचा दावा आहे की पश्चिमेच्या संस्कृतीचा मूळ सिद्धांत सर्वोच्च पाशवी शक्तीवर अवलंबून आहे. याच कारणामुळे त्या संस्कृतीचे समर्थक पाशवी शक्तीच्या रक्षणार्थ आपला जास्तीतजास्त वेळ खर्च करत असतात. एवढेच नाही तर जे लोक आपल्या गरजा वाढवणार नाहीत त्यांचा अखेरीस नाशच होणार आहे असाही त्यांचा सिद्धांत आहे. या सिद्धांताचे अनुसरण करूनच पश्चिमेच्या लोकांनी दक्षिण आफ्रिकेत वसाहत केली आहे आणि आपल्यापेक्षा किती तरी पट असलेल्या हबशी लोकांवर स्वामित्व प्रस्थापित केले आहे. असे असताना हिंदुस्तानच्या गरीब प्रजेची तिला कोणती भीती असू शकते? आणि पौर्वात्य संस्कृतीच्या दृष्टीने त्या लोकांना भीतीचे काहीही कारण नाही याचा उत्तम पुरावा हा आहे की हिंदुस्तानी लोक दक्षिण आफ्रिकेत केवळ मजूर म्हणूनच नेहमीकरिता राहिले असते तर हिंदुस्तानींच्या तेथील वास्तव्यावर गोऱ्यांनी कधीही आक्षेप घेतला नसता आणि त्यांच्या विरोधात आंदोलनही केले नसते.

यामुळे व्यापार आणि रंग ही दोन कारणेच शिल्लक राहतात. हजारो गोऱ्यांनी लिहिले आहे आणि मान्य केले आहे की हिंदुस्तानींचा व्यापार लहान लहान इंग्रज व्यापाऱ्यांना हानी पोहेचवतो. आणि गव्हाळी रंगाच्या लोकांबद्दलचा घृणाभाव गोऱ्यांच्या अंगागात अगदी खोलवर मुरलेला आहे. संयुक्त राज्य अमेरिकेच्या कायद्यात तर सर्व नागरिकांना समान अधिकार देण्यात आलेले आहेत. परंतु तिथेही पाश्चात्य संस्कृती पूर्णपणे आत्मसात केलेला आणि पश्चिमी उच्च शिक्षण घेतलेला बुकर टी. वाशिंग्टनसारखा अतिशय चारित्र्यसंपन्न ख्रिश्चन माणूस प्रेसिडेंट रुझवेल्ट यांच्या दरबारात जाऊ शकला नाही आणि आजही जाऊ शकत नाही. अमेरिकेतील

हबशींनी पाश्चात्य संस्कृतीचा स्वीकार केला आहे आणि त्यांनी ख्रिश्चन धर्माचाही स्वीकार केला आहे. परंतु त्यांची काळी कातडी त्याचा अपराध समजला जातो. आणि संयुक्त राज्य अमेरिकेत जर त्यांची सामाजिक दृष्टीने घृणा केली जाते आणि त्यांना तिरस्कृताप्रमाणे वागवले जाते. तसेच दक्षिण अमेरिकी राज्यांमध्ये काळ्यांनी अपराध केल्याची जरी शंका असली तरी त्यांना जिवंत जाळून टाकतात. शिक्षा देण्याच्या या प्रकाराचे दक्षिण अमेरिकेत एक विशेष नावसुद्धा आहे. तो शब्द आहे 'लिंच लॉ'. हे नाव लिंच या माणसावरून पडले. त्यानेच ही शिक्षापद्धती सुरू केली.

यामुळे तात्त्विक समजल्या जाणाऱ्या वरील युक्तिवादात फारसा अर्थ नाही हे वाचकांच्या लक्षात आलेच असेल. परंतु वाचकांनी याचा असाही अर्थ करू नये की वरील युक्तिवाद करणाऱ्या सर्व गोऱ्यांचा या युक्तिवादावर विश्वास नसतानाही ते हा युक्तिवाद करतात. त्यांच्यातील अनेकांना मनापासून वाटते की हा युक्तिवाद तत्त्वाच्या दृष्टीने अगदी बरोबर आहे. आपण त्यांच्या परिस्थितीत असतो तर कदाचित आपणही त्यांच्यासारखाच युक्तिवाद केला असता हेसुद्धा अगदी शक्य आहे. अशाच काही कारणांमुळे 'बुद्धी कर्मानुसारिणी' असा वाक्प्रचार पडला आहे. आपल्याला जशी अंतःप्रवृत्ती होते तसाच युक्तिवाद आपल्याला सुचतो, आणि युक्तिवाद जेव्हा इतरांच्या गळी उतरत नाही तेव्हा आपल्याला वाईट वाटते. आपला धीर सुटतो आणि अखेरीस आपला संताप होतो असा अनुभव कोणाला येत नाही?

या प्रश्नाच्या इतक्या खोलवर मी जाणूनबुजून गेलो आहे आणि या प्रश्नाचा मी इतका उहापोह केला आहे. वाचकांनी वेगवेगळे दृष्टिकोन समजावून घ्यावे आणि ज्यांनी आजपर्यंत असे केले नसेल त्यांनीही अशा दृष्टिकोनांकडे आदराने पाहण्याची आणि ते समजून घेण्याची सवय लावावी अशी माझी इच्छा आहे. सत्याग्रहाचे रहस्य समजून घेण्याकरिता आणि विशेषतः सत्याग्रहाचा प्रयोग करण्याकरिता उदारपणा आणि सहनशीलता फार आवश्यक असते. याशिवाय सत्याग्रह शक्यच नाही. हे पुस्तक मी केवळ लिहिण्याच्या दृष्टीने लिहून राहिलेलो नाही. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा एक पैलू वाचकांसमोर ठेवावा केवळ इतकाच उद्देश हे पुस्तक लिहिण्यामागे नाही. ज्या सत्याग्रहाकरिता मी जगतो आहे, जगण्याची इच्छा आहे आणि ज्याच्याकरिता वेळ आली

तर मरणही पत्करावे अशी माझी तेवढीच तीव्र इच्छा आहे त्या सत्याग्रहाचा जन्म कसा झाला आणि त्याचा सर्वप्रथम सामाजिक प्रयोग कसा केला गेला हे हिंदुस्तानातील जनतेला कळावे आणि त्यातील जेवढा भाग तिला आकळेल तितक्या भागानुसार तिने आचरण करावे याकरिता मी हे पुस्तक लिहिले आहे.

आता आपण परत आपल्या कथानकाकडे वळू या. ट्रान्सवालमध्ये नवीन येणाऱ्या हिंदुस्तानींना अडवण्यात यावे आणि तिथे राहत असलेल्या पूर्वीच्या लोकांची परिस्थिती इतकी अवघड करून टाकावी की घाबरून त्यांनी ट्रान्सवाल सोडून निघून जावे, आणि तरीही ते जाणार नसतील तर त्यांनी केवळ मजूर म्हणूनच ट्रान्सवालमध्ये काम करावे असा निर्णय ब्रिटिश शासकांनी घेतला असल्याचे वाचकांच्या लक्षात आलेलेच असेल. हिंदुस्तानींना आम्ही केवळ लाकुडतोडे आणि पाणक्ये म्हणूनच ठेवू शकतो असे दक्षिण आफ्रिकेतील काही महान राजकीय पुरुषांनी म्हटलेले आहे. याआधी ज्या आशियायी विभागाबद्दल आणि त्यात काम करणाऱ्या हिंदुस्तानात राहिलेल्या लोकांबद्दल मी जे लिहिले होते त्यात विभक्त जबाबदारीचे शोधक आणि प्रचारक म्हणून प्रसिद्धीस आलेले लॉयनल कर्टिस यांचाही समावेश आहे. कुलीन कुटुंबातील तरुण, १९०५-६साली तर ते तरुणच होते, लॉयनल कर्टिस हे मिल्नरचे विश्वासपात्र व्यक्ती होते. प्रत्येक गोष्ट वैज्ञानिक पद्धतीने करण्याचा त्यांचा दावा होता. परंतु ते मोठमोठ्या चुका करू शकत होते. आपल्या अशाच चुकीमुळे त्यांनी जोहानिसबर्ग नगरपालिकेला १४०० पौंडांनी खड्ड्यात घातले होते. नवीन हिंदुस्तानींना ट्रान्सवालमध्ये येण्यापासून अडवायचे असेल तर दक्षिण आफ्रिकेत आधीपासून राहत असलेल्या आधीच्या हिंदुस्तानींच्या नावांची अशा प्रकारे नोंदणी करावी की एका हिंदुस्तानीच्या ठिकाणी दुसऱ्या हिंदुस्तानीला दक्षिण आफ्रिकेत प्रवेशच करता येणार नाही, आणि त्याने प्रवेश केलाच तर लगेच तो पकडला जाईल अशा प्रकारे पहिले पाऊल उचलण्यात यावे अशी सूचना कर्टिस यांनी केली. ट्रान्सवालमध्ये ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यानंतर हिंदुस्तानींना जे परवाने देण्यात येत असत त्यावर एक तर हिंदुस्तानीची सही घेतली जात असे वा त्याला सही करता येत नसेल तर आंगठ्याचा ठसा घेतला जात असे. यानंतर कोणत्या तरी अधिकाऱ्याने सुचवले की परवान्यावर हिंदुस्तानीचा फोटोसुद्धा असला पाहिजे. अशा प्रकारे सही, आंगठा आणि

फोटो अशा तिन्ही गोष्टी परवान्याकरिता कायम झाल्या. याकरिता कोणताही कायदा करण्याची आवश्यकता वाटली नाही. यामुळे समाजातील लोकांना याबद्दलची ताबडतोब कल्पनासुद्धा येऊ शकली नाही हळूहळूच त्यांना या नवीन गोष्टीची माहिती कळली. समाजातर्फे त्यांनी सत्ताधाऱ्यांकडे अर्जसुद्धा पाठवले. अधिकाऱ्यांचे म्हणणे होते की कोणत्याही प्रकारे एकाही हिंदुस्तानीचा ट्रान्सवालमध्ये प्रवेश होणे आम्हाला मान्य नाही. यामुळे सर्व हिंदुस्तानींजवळ एकसारखे परवाने असले पाहिजे आणि त्यात इतकी काही माहिती असली पाहिजे की त्या परवान्याच्या बळावर केवळ परवानेधारकालाच ट्रान्सवालमध्ये प्रवेश करता येईल, दुसऱ्या कोणालाही नाही. असे परवाने घेतलेच पाहिजे असा कोणताही कायदा नाही, परंतु जोपर्यंत शांततारक्षणाचा कायदा (पीस प्रिझर्वेशन ऑर्डिनन्स) आहे तोपर्यंत अधिकारी आपल्याला नक्कीच परवाने मागू शकतात असा सल्ला मी समाजाला दिला. ज्याप्रमाणे हिंदुस्तानात हिंदुस्तान सुरक्षा कायदा - 'डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट' - होता त्याचप्रमाणे दक्षिण आफ्रिकेत "शांतता रक्षण कायदा? होता. ज्याप्रमाणे प्रजेचा छळ करण्याकरिता हिंदुस्तानात दीर्घकाळ 'डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट' सुरू ठेवण्यात आला होता त्याचप्रमाणे दक्षिण आफ्रिकेत गरज संपल्यानंतरही केवळ हिंदुस्तानींना छळण्याच्या उद्देशाने गोऱ्यातर्फे तो दीर्घकाळ सुरू ठेवण्यात आला होता. गोऱ्यांवर शांततारक्षण कायद्याची कोणतीही अंमलबजावणी होत नव्हती असे म्हटले तर त्यात कोणतीही चूक होणार नाही. आता परवाने घेणे आवश्यक असेल तर परवान्यावर परवानेधारकाची ओळख पटेल अशी काही तरी खूण असलीच पाहिजे. यामुळे ज्या हिंदुस्तानींना सही करता येत नव्हती त्यांच्या अंगठ्याचा ठसा परवान्यावर असणे योग्यच होते. कोणत्याही दोन माणसाच्या हाताच्या बोटावरील रेषा सारख्या नसतात असे पोलिसांनी शोधून काढले आहे. त्यांनी बोटाची आकृती आणि रेषांच्या संख्येचे वर्गीकरण केले. या विज्ञानात तज्ज्ञ असलेला माणूस अंगठ्यांचे दोन ठसे पाहून ते ठसे  एकाच माणसाच्या बोटाचे आहेत आहेत की दोन हे एकदोन मिनिटातच सांगू शकतो. परंतु फोटो देण्याची गोष्ट मला मुळीच पसंत नव्हती. आणि मुसलमानाच्या दृष्टीने तर फोटो देण्यात धार्मिक आपत्ती होती. अखेरीस हिंदुस्तानी समाज आणि सरकार यांच्यात झालेल्या चर्चेतून पुढील निष्कर्ष निघाला - प्रत्येक हिंदुस्तानीने आपला जुना

परवाना परत करावा आणि त्याऐवजी नवीन परवाना घ्यावा ही गोष्ट हिंदुस्तानींनी मान्य केली. खरे म्हणजे कायद्याप्रमाणे ही गोष्ट मुळीच बंधनकारक नव्हती. परंतु आपल्यावर यापुढे नवीन निर्बंध लावले जाणार नाहीत तसेच फसवणुकीच्या आधारावर एकाही हिंदुस्तानीला आपण ट्रान्सवालमध्ये आणू इच्छित नाही हे संबंधित लोकांना दाखवण्याकरिता आणि नवीन येणाऱ्या हिंदुस्तानींना सतावण्याकरिता शांतता रक्षण कायद्याचा उपयोग केला जाणार नाही अशा अपेक्षेने हिंदुस्तानींनी ही गोष्ट मान्य केली होती. याप्रमाणे जवळपास सर्व हिंदुस्तानींनी परवाने घेतले होते असेही म्हणता येईल. ही काही सामान्य गोष्ट म्हणता येणार नाही. कायद्याच्या दृष्टीने जे काम करणे हिंदुस्तानींकरिता मुळीच अनिवार्य नव्हते ते काम त्याने संपूर्ण ऐक्यभावनेने फार कमी अवधीत करून दाखवले. हे समाजाच्या प्रामाणिकपणाचे, व्यवहारकौशल्याचे, चांगुलपणाचे, बुद्धिमत्तेचे आणि नम्रतेचे चिन्ह होते. ट्रान्सवालच्या कोणत्याही कायद्याचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करण्याचा आपला हेतू नाही हेही यातून हिंदुस्तानी समाजाने दाखवून दिले. हिंदुस्तानींचा विश्वास होता की जो समाज शासनाशी इतक्या सौजन्याने व्यवहार करतो, त्या समाजाबरोबर सरकारही चांगला व्यवहार करील, त्याच्याशी आदराने वागेल आणि त्याला अधिकारही देईल. या सौजन्याच्या मोबदल्यात ट्रान्सवाल सरकारने कसे वर्तन केले हे आपण पुढील प्रकरणात पाहू.

# ११. सौजन्याचा मोबदला - खुनी कायदा

जुने परवाने परत करून नवीन परवाने घेण्याचे काम पूर्ण होताहोताच आपण सन १९०६मध्ये पोहोचतो. १९०३मध्ये मी ट्रान्सवालमध्ये दुसऱ्यांदा प्रवेश केला होता. त्या वर्षाच्या जवळपास मध्यावधीत मी जोहानिसबर्गमध्ये माझे ऑफिस उघडले होते. अशा प्रकारे आशियायी विभागाच्या आक्रमणाला तोंड देण्यातच दोन वर्षे उलटली. परवान्यांचे प्रकरण आटोपताच सरकारचे पूर्ण समाधान होईल आणि हिंदुस्तानी समाजाला शांतपणे श्वास घेण्याकरिता थोडी उसंत मिळेल असे मला वाटत होते. परंतु समाजाच्या नशिबात शांतता लिहिलेलीच नव्हती. लॉयनल कर्टिस यांची ओळख मी मागील प्रकरणात करून दिलेली आहे. हिंदुस्तानींनी केवळ परवाने घेतल्याने गोऱ्यांची उद्दिष्टपूर्ती होऊ शकत नाही असे त्यांना वाटले. महान काम परस्परांच्या संमतीने होणे त्यांच्याकरिता पुरेसे नव्हते. अशा कामामागे कायद्याची शक्ती असली तरच ते योग्य असतात आणि तेव्हाच त्यांच्यामागील सिद्धांताचे रक्षण होते असे त्यांचे मत होते. श्री कर्टिसची इच्छा होती की हिंदुस्तानींवर नियंत्रण ठेवण्याकरिता असे काही तरी काम केले पाहिजे की त्याचा प्रभाव संपूर्ण दक्षिण आफ्रिकेवर पडेल, आणि अखेरीस इतर वसाहतींनाही आपले अनुकरण करावेसे वाटेल. दक्षिण आफ्रिकेचे एक जरी दार हिंदुस्तानींकरिता उघडे राहिले तर ट्रान्सवाल पूर्णपणे सुरक्षित आहे असे म्हणता येणार नाही असे त्यांचे मत होते. याशिवाय ट्रान्सवाल सरकार आणि हिंदुस्तानी यांच्यांत झालेला करार ही हिंदुस्तानी समाजाची प्रतिष्ठा वाढवणारा आहे असेही त्यांना वाटत होते. हिंदुस्तानींची प्रतिष्ठा वाढवणे हा काही त्यांचा उद्देश नव्हता. हिंदुस्तानींच्या संमतीची त्यांना पर्वा नव्हती. हिंदुस्तानींवर बाह्य अंकुश लावून कायद्याच्या दहशतीने हिंदुस्तानी समाजाला थरथर कापायला लावणे हा त्यांचा उद्देश होता. यामुळे त्यांनी आशियायी कायद्याचा मसुदा तयार केला आणि या मसुद्याप्रमाणे जोपर्यंत कायदा तयार करण्यात येत नाही तोपर्यंत हिंदुस्तानी लोक ट्रान्सवालमध्ये लपूनछपून येतच राहतील आणि त्यांना परत बाहेर काढण्याकरिता सध्याच्या कायद्यात कोणतीही उपाययोजना नाही असे त्यांनी सरकारला सांगितले. श्री कर्टिस यांचा हा

युक्तिवाद आणि त्यांनी तयार केलेला मसुदा ट्रान्सवाल सरकारला पसंत पडला आणि त्या मसुद्यानुसार तयार करण्यात आलेले विधेयक ट्रान्सवाल सरकारच्या राजपत्रात प्रसिद्ध झाले.

या विधेयकाची सविस्तर चर्चा करण्यापूर्वी एका महत्त्वपूर्ण घटनेचे इथे वर्णन करणे आवश्यक आहे. सत्याग्रह आंदोलनाचा मी प्रेरक असल्यामुळे वाचकांनी माझ्या जीवनातील घटना चांगल्या प्रकारे समजून घेणे आवश्यक आहे. हिंदुस्तानींवर अंकुश लावण्याचा हा प्रयत्न ज्या दिवसांत ट्रान्सवालमध्ये सुरू होता त्याच काळात हबशी लोकांनी नातालमध्ये बंडाला सुरुवात केली. त्या स्फोटाला बंड म्हणता येईल की नाही याबद्दल मला शंका होती आणि आजही आहे. असे असले तरी नातालमध्ये या गोष्टीचा उल्लेख बंड म्हणूनच करण्यात येत असतो. बोअर युद्धाप्रमाणेच हे बंड शमवण्याकरिता या वेळीसुद्धा किती तरी गोरे स्वयंसेवक म्हणून सैन्यात भरती झाले होते. मीसुद्धा स्वतःला नातालचा रहिवासी समजत होतो. यामुळे या युद्धातही शक्य तितकी मदत केली पाहिजे असे मला वाटले. जखमींची सेवाशुश्रुषा करणारे पथक (स्ट्रेच बेअरर कार्प्स) तयार करण्याची अनुमती मला देण्यात यावी असे हिंदुस्तानी समाजाची परवानगी घेऊन मी नाताल सरकारला लिहिले. माझा प्रस्ताव सरकारने मान्य केला. यामुळे मी जोहानिसबर्ग येथील घर सोडले मुलाबाळांना नातालमधील फिनिक्स आश्रमात पाठवले. तिथून 'इंडियन ओपिनियन' नावाचे साप्ताहिक चालवले जात होते, आणि माझे सहकारी तिथे राहत होते. हे सेवाकार्य फार दिवस चालणार नाही हे मला माहीत असल्यामुळे मी ऑफिस बंद केले नव्हते.

२० - २५ माणसांचे एक लहानसे पथक तयार करून मी नातालच्या सैन्यात दाखल झालो. या लहानशा पथकातसुद्धा सर्व जातींचे आणि सर्व प्रांतांचे लोक होते. या पथकाने एक महिना सेवाशुश्रूषेचे काम केले. आमच्यावर सोपवण्यात आलेल्या या कामाकरिता मी नेहमीच ईश्वराचे आभार मानत आलो आहे. बंडात जखमी झालेल्या हबशींना आम्ही उचलले नसते तर ते तिथेच विव्हळत पडून राहिले असते हे अनुभवांती माझ्या लक्षात आले. या घायाळ लोकांची मलमपट्टी करण्याकरिता एकही गोरा मदतीकरिता येत नसे. ज्या सर्जनच्या हाताखाली आम्ही हे काम करत होतो त्यांचे नाव डॉ. सावेज असे होते. ते अतिशय दयाळू होते. जखमींना उचलून दवाखान्यात

नेल्यानंतर खरे म्हणजे आमची जबाबदारी संपत असे. परंतु जी कोणती कामे आमच्यावर सोपवण्यात येतील ती सर्व आमच्याच क्षेत्रातील आहेत असे समजायचे असे ठरवूनच आम्ही युद्धात समील झालो होते. तो सज्जन आणि दयाळू डॉक्टर आम्हाला म्हणाला की यांची देखभाल करू शकेल असा एकही गोरा मला आढळत नाही. हे काम करावेच लागेल असे एकाही गोऱ्याला सांगण्याचा मला अधिकार नाही. यामुळे तुम्ही लोक जर परोपकाराचे काम कराल तर मी तुमचा आभारी होईन. खुश होऊन झुलूंच्या सेवासुश्रुषेचे काम आम्ही आमच्याकडे घेतले. काही हबशींवर पाचपाच, सातसात दिवसांपासून मलमपट्टी करण्यात आली नव्हती. यामुळे त्यांच्या जखमांतून वास येऊ लागला होता. त्या जखमा स्वच्छ करून त्यांची मलमपट्टी करण्याचे काम आम्ही आमच्याकडे घेतले आणि ते काम आम्हाला आवडलेसुद्धा. बिचारे हबशी आमच्याबरोबर बोलू तर शकत नव्हते, परंतु त्यांच्या हावभावांमधून आणि डोळ्यांमधून दिसणारी कृतज्ञता आम्हाला कळू शकत होती आणि त्यांच्या मदतीकरिता पाठवण्यात आलेले जणू आम्ही दूतच आहो असे ते समजत होते. हे काम फार कठीण होते. केव्हा केव्हा तर आम्हाला दिवसाला चाळीस मैल मजल मारावी लागायची.

एका महिन्यात आमचे हे काम संपले. आम्ही केलेल्या कामामुळे अधिकाऱ्यांचे समाधान झाले. राज्यपालांनी आम्हाला धन्यवाद देणारे आणि आभार मानणारे पत्रही लिहिले. आणि आमच्या पथकातील प्रत्येक सदस्याला एकेक पदक देण्यात आले. आणि ते याच प्रसंगाकरिता तयार करण्यात आले होते. या पथकाचे तीन सार्जंट गुजराती होते. त्यांची नावे आहेत - श्री उमियाशंकर शेलत, श्री सुरेंद्रनाथ मेढ आणि श्री हरिशंकर जोशी. हे तिघेही चांगले धष्टपुष्ट होते आणि त्यांनी मेहनतही चांगलीच केली होती. इतर हिंदुस्तानींची नावे मला या वेळी आठवत नाहीत. परंतु त्यांच्यात एक पठाण होता इतके मात्र मला चांगल्या प्रकारे आठवते. आम्ही लोक त्या पठाणाइतकेच ओझे उचलू शकत होतो आणि त्याच्याबरोबर कूचही करू शकत होतो ही गोष्ट त्याला आश्चर्यजनक वाटत असे. माझ्या मनात फिरत असलेले विचार या पथकाबरोबर काम करता करता परिपक्व झाले. एक विचार होता आपल्या जीवनात सेवाधर्माला महत्त्वाचे स्थान देणाऱ्या माणसाने ब्रह्मचर्याचे पालन अवश्य केले पाहिजे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे सेवाधर्माचे

पालन करणाऱ्या माणसाने नेहमीकरिता गरिबीचा स्वीकार केला पाहिजे. सेवाधर्माचे पालन करत असताना संकोचाची परिस्थिती निर्माण होईल अथवा सेवाधर्माच्या कामात किंचितसुद्धा अडथळा निर्माण होईल असे कोणतेही काम सेवाधर्माचे व्रत घेतलेल्या माणसाने करता कामा नये.

या पथकात काम करत असतानाच जसे जमेल तसे लवकरात लवकर ट्रान्सवालमध्ये परत या अशा आशयाची पत्रे आणि तारा मला येत होत्या. यामुळे शुश्रुषा पथकाचे काम संपताच फिनिक्स येथील मित्रांची भेट घेऊन मी जोहानिसबर्ग येथे पोहोचलो. तिथे माझ्या ऑफिसमध्ये मी वर सांगितलेल्या विधेयकाचा मसुदा वाचला. विधेयकाचा मसुदा असलेले २२ ऑगस्ट १९९६ ला प्रकाशित झालेले ते राजपत्र मी माझ्या कार्यालयातून घरी घेऊन गेलो. माझ्या घराजवळ एक लहानशी टेकडी होती. माझ्या एका मित्राबरोबर मी त्या टेकडीवर गेलो आणि इंडियन ओपिनियनकरिता विधेयकाचे गुजरातीत भाषांतर करू लागलो. त्या विधेयकाची कलमे मी जसजसा वाचत गेलो तसतसा माझा थरकाप उडत गेला. हिंदुस्तानींबद्दलची घृणा आणि द्वेष याशिवाय त्यात मला दुसरे काहीही आढळू शकले नाही. मला वाटू लागले की हे विधेयक जर मंजूर झाले आणि हिंदुस्तानींनी भेकडाप्रमाणे जर हा कायदा मान्य केला तर दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानी समाजाचा सर्वनाश झाल्याशिवाय राहणार नाही. हिंदुस्तानी समाजाकरिता हा जीवनमरणाचा प्रश्न आहे असे माझ्या लक्षात आले. अर्जविनंत्या करून समाजाचे ध्येय साध्य होणार नसेल तरी त्याने हातात हात घालून गप्प बसून राहता कामा नये हेही माझ्या ध्यानात आले. या खुनी कायद्याला शरण जाण्यापेक्षा समाजाने जर मरण पत्करले तर ते अधिक चांगले होईल परंतु मरायचे कसे? हिंदुस्तानी समाजाने असा कोणता धोका पत्करला पाहिजे वा पत्करण्याचे साहस केले पाहिजे की जो पत्करल्यानंतर यश वा मृत्यू याशिवाय दुसरा कोणताही मार्ग त्याच्यासमोर शिल्लक राहणार नाही? माझ्यासमोर एक अशी भिंत उभी राहिली होती की जिच्या पलीकडे जाण्याचा मला कोणताही मार्ग सुचत नव्हता. ज्या विधेयकाने मला इतके हादरवून टाकले होते त्याची संपूर्ण माहिती वाचकांना असली पाहिजे. त्याचा सार पुढे देत आहे-

ट्रान्सवालमध्ये राहण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक हिंदुस्तानी पुरुषाने, स्त्रीने,आणि ८ वा अधिक वय असलेल्या मुलामुलीने आशियायी विभागाच्या कार्यालयात आपले नाव नोंदवून परवाना घेतला पाहिजे. हा परवाना घेत असताना त्याने आपला आधीचा परवाना कार्यालयात परत केला पाहिजे. अर्जात प्रत्येक हिंदुस्तानीने आपले नाव, पत्ता, जात, वय वगैरे सर्व माहिती भरली पाहिजे. शिवाय अर्जदाराने आपल्या सर्व बोटांचे आणि अगठ्यांचे ठसे दिले पाहिजे. निश्चित मुदतीत जो माणूस अशा प्रकारे अर्ज करणार नाही त्याचा ट्रान्सवालमध्ये राहण्याचा अधिकार नाहीसा होईल. अर्ज न करणे हा कायद्याप्रमाणे अपराध समजला जाईल. या अपराधाकरिता दंड वा तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकणार होती आणि न्यायालयाला जर योग्य वाटले तर ते संबंधित व्यक्तीला देशातून बाहेर काढण्याची शिक्षाही करू शकत होते. मुलांचा अर्ज आईवडिलांनी द्यायला हवा आणि अंगठ्याच्या ठशाकरिता अधिकाऱ्याकडे नेण्याची जबाबदारीसुद्धा आईवडिलांची असेल. आईवडिलांनी जर या जबाबदारीचे पालन केले नाही तर १६ वर्षाचे वय झाल्यानंतर मुलाने स्वतः या जबाबदारीचे पालन केले पाहिजे. आणि त्याने जर या जबाबदारीचे पालन केले नाही तर अशा अपराधाकरिता जी शिक्षा आईवडिलांना होऊ शकते तीच शिक्षा १६ वर्षांच्या युवकालाही होऊ शकते. अर्जदाराला दिलेला परवाना कोणताही पोलीस अधिकारी केव्हाही मागू शकत होता आणि तो दाखवणे अनिवार्य होते. हा परवाना न दाखवणे अपराध समजला जाणार होता. आणि त्याकरिता न्यायालय दंडाची वा तुरुंगवासाची शिक्षा करू शकणार होते. या परवान्याची मागणी रस्त्यावरून चालणाऱ्या माणसाकडूनही करता येऊ शकणार होती. परवाना तपासण्याकरिता पोलीस अधिकाऱ्याला लोकांच्या घरात शिरण्याचा अधिकार होता. बाहेरच्या ठिकाणावरून ट्रान्सवालमध्ये येणाऱ्या प्रत्येक हिंदुस्तानी स्त्रीपुरुषाला अधिकाऱ्यासमोर सादर करावा लागणार होता. सायकल ठेवण्याची परवानगी घेण्याकरिता वा व्यापाराचा परवाना मागण्याकरिता वा इतर काही कारणाकरिता जरी सरकारी कार्यालयात हिंदुस्तानी गेला तरी अधिकारी त्याला परवाना मागू शकत होता. कोणत्याही सरकारी कार्यलयात त्या कार्यालयाशी संबंधित कामकाजाकरिता हिंदुस्तानीला जायचे असले तर तेथील अधिकारी त्या हिंदुस्तानीची प्रार्थना ऐकण्यापूर्वी त्याला परवाना मागू शकत होता. तो परवाना अधिकाऱ्यासमोर सादर

करण्याला नकार देणे अथवा परवाना ठेवणाऱ्या माणसाने परंवान्यासंबंधीची कोणतीही माहिती अधिकाऱ्याला सांगण्याला नकार देणे हा शिक्षापात्र अपराध होता न्यायालय त्याला कारावासाची वा दंडाची शिक्षा करू शकत होते. जोपर्यंत मला माहीत आहे अशा प्रकारचा कायदा जगातील कोणत्याही भागात स्वतंत्र माणसाकरिता करण्यात आलेला नसावा. मला माहीत आहे की नातालच्या गिरमिट्या हिंदुस्तानींकरिता तयार करण्यात आलेले कायदे फार कठोर आहेत. परंतु त्या बिचाऱ्यांना स्वतंत्र मानवप्राणीच समजले जात नाही! तरीही असे म्हणता येऊ शकते की वरील विधेयकाच्या तुलनेत नातालमध्ये त्या लोकांकरिता तयार करण्यात आलेले कायदे इतके कठोर नाहीत आणि तो कायदा तोडला गेला तर त्याकरिता होणारी शिक्षाही या विधेयकात सांगितलेल्या शिक्षेसमोर काहीही नाही. या विधेयकाप्रमाणे लाखोंचा व्यापार करणाऱ्या एखाद्या व्यापाऱ्यालासुद्धा हद्दपारीची शिक्षा होऊ शकत होती. म्हणजेच या विधेयकातील कलमाचा भंग केला तर त्याची आर्थिक स्थिती पूर्णपणे रसातळाला जाऊ शकणार होती. आणि संयमी वाचकांना पुढे गेल्यानंतर आढळून येईल की या विधेयकातील काही कलमांचा भंग केल्यामुळे हिंदुस्तानींना हद्दपारीची शिक्षा सुनावण्यात आली होती. हिंदुस्तानात जयरामपेशा समाजातातील लोकांकरिता काही कडक कायदे आहेत. या विधेयकाची तुलना त्या कायद्याशी सहज होऊ शकेल, आणि त्या कायद्यापेक्षा हे विधेयक कमी कठोर आहे असे म्हणता येणार नाही. या विधेयकात हाताच्या दहाही बोटांचे ठसे घेण्याची जी तरतूद होती ती तर दक्षिण आफ्रिकेत अगदीच नवीन गोष्ट होती. यासंबंधित काही साहित्य वाचले पाहिजे असे वाटल्यामुळे एक पोलिस अधिकारी श्री हेन्री यांचे ‘फिंगर इंप्रेशन’ या नावाचे पुस्तक मी वाचले. अशा प्रकारे दहाही बोटांचे ठसे गुन्हेगाराचे घेत असतात असे मी त्या पुस्तकात वाचले. यामुळे बळजबरीने हिंदुस्तानीच्या दहाही बोटांची ठसे घेण्याची पद्धत मला भयानक वाटली. स्त्रिया आणि सोळा वर्षांच्या आतील मुलांच्या परवान्याची पद्धतही या विधेयकात नवीनच निर्माण करण्यात येत होती.

दुसऱ्या दिवशी प्रमुख हिंदुस्तानींना गोळा करून मी त्यांना हे विधेयक शब्दंशब्द समजावून सांगितले. यामुळे त्या लोकांवरही विधेयकाचा तोच परिणाम झाला जो माझ्यावर झाला होता. त्यांतील एक मित्र तर आवेशात म्हणाले, “माझ्या बायकोला जो माणूस परवाना मागायला येईल

त्याला मी तिथल्यातिथे गोळीने उडवून टाकीन. त्यानंतर माझे जे काही व्हायचे असेल ते होऊ दे." मी त्यांना शांत केले. नंतर सर्वांना म्हणालो, "हे संकट फार गंभीर आहे. हे विधेयक जर मंजूर झाले आणि आपण त्याचा स्वीकार केला तर संपूर्ण दक्षिण आफ्रिकेत या विधेयकाचे अनुकरण केले जाईल. दक्षिण आफ्रिकेतील आपले अस्तित्व मिटवणे हाच या विधेयकाचा एकमेव हेतू आहे असे मला दिसते. या दिशेने उचलण्यात आलेले विधेयकरूपी हे पहिले पाऊल काही शेवटचे नाही. आमचा अनन्वित छळ करून दक्षिण आफ्रिकेतून आम्हाला पळवून लावण्याकरिता "टाकण्यात आलेले हे पहिले पाऊल आहे. यामुळे आपली जबाबदारी ट्रान्सवालमध्ये वसलेल्या १० - १५ हजार हिंदुस्तानींपर्यंतच सीमीत नाही. तर दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या संपूर्ण हिंदुस्तानी समाजाच्या सुरक्षिततेची आपल्यावर जबाबदारी आहे. आणि या विधेयकाचा गूढार्थ जर आपण नीट समजून घेतला तर संपूर्ण हिंदुस्तानची प्रतिष्ठा वाचवण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन पडते कारण या विधेयकामुळे केवळ आमचाच अपमान होत नाही तर संपूर्ण हिंदुस्तानचा अपमान होतो. अपमानाचा अर्थ आहे माणसाचा स्वाभिमान नष्ट करणे. अशा प्रकारच्या कायद्यांकरिता आपण पात्र आहो असे कोणीही म्हणू शकत नाही. आपण निर्दोष आहो आणि एका निर्दोष हिंदुस्तानीचा अपमान जेव्हा होतो तेव्हा संपूर्ण हिंदुस्तानचा अपमान होतो. यामुळे अशा कठीण प्रसंगी आपण जर उतावीळपणे वागू, धीर सोडू वा संतापू तर असे केल्याने आपण आपला बचाव करू शकणार नाही. परंतु शांततापूर्वक आपण जर आपल्या सुरक्षिततेचा उपाय शोधू व योग्य वेळी त्याप्रमाणे वागू, एक होऊन राहू व अपमानाचा विरोध केल्यामुळे जी कोणती दुःखे आपल्याला सहन करावी लागतील ती सहन करण्याची जर आपण तयारी ठेवू तर ईश्वर जरूर आपली मदत करील असा माझा विश्वास आहे." एक सार्वजनिक सभा घेऊन आणि त्यात काही प्रस्ताव मांडून ते मंजूर करण्यात यावे असे तिथे ठरले. याकरिता यहुदी लोकांचे एक नाट्यगृह भाड्याने घेण्यात आले आणि तिथे ती सभा घेण्यात आली.

या प्रकरणाच्या मथळ्यात या विधेयकाचा उल्लेख 'खुनी कायदा' असा का करण्यात आला हे आता वाचकांच्या लक्षात येईल. परंतु दक्षिण आफ्रिकेत या कायद्याला लोक खुनी कायदा म्हणूनच ओळखू लागले होते.

# १२. सत्याग्रहाचा जन्म

यहुदी लोकांच्या त्या नाट्यगृहात ११ सेप्टेंबर १९०६ला हिंदुस्तानींची सभा झाली. ट्रान्सवालमधील वेगवेगळ्या शहरांमधील प्रतिनिधींना सभेकरिता बोलावण्यात आले होते. परंतु सभेकरिता मी जे प्रस्ताव तयार केले होते त्याचा संपूर्ण अर्थ त्या वेळी मलाही कळला नव्हता हे मी कबूल केले पाहिजे. ते प्रस्ताव मंजूर केल्यामुळे काय परिणाम होतील याचीही त्यावेळी मी कल्पना करू शकलो नव्हतो. सभा झाली. नाट्यगृहात पाय ठेवायलाही जागा शिल्लक नव्हती. आपल्याला काही नवीन काम करायचे आहे, काही तरी नवीन घडणार आहे ही भावना मला सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होती. ट्रान्सवालच्या ब्रिटिश इंडियन असोसिएशनचे अध्यक्ष श्री अब्दुल गनी हे सभापतीपदावर विराजमान होते. ट्रान्सवालमध्ये फार पूर्वीपासून राहत असलेल्या हिंदुस्तानींमधील ते एक होते. महमद कासम कमरुद्दिन या प्रसिद्ध पेढीचे ते भागीदार होते व त्या पेढीच्या जोहानिसबर्ग शाखेचे ते व्यवस्थापक होते. सभेत जे काही ठराव मंजूर करण्याता आले होते त्यात खरा ठराव एकच होता. - "या विधेयकाच्या विरोधात सर्व प्रयत्न केल्यानंतरही हे विधेयक जरी विधिमंडळात मंजूर झाले तरी हिंदुस्तानींनी त्याला शरण जाऊ नये, आणि असे केल्यामुळे जी काही दुःखे सहन करावी लागतील ती सर्व धैर्याने सहन करावी,"

हा ठराव मी सभेला चांगल्या प्रकारे समजावून सांगितला. सभेने माझे बोलणे शांतपणे ऐकून घेतले. सभेचे सर्व काम हिंदीत वा गुजरातीत चालले. यामुळे सभेत काय सुरू आहे हे कोणालाही न कळणे अशक्य होते. हिंदी न समजणाऱ्या तमिळ वा तेलगू बांधवांना ती भाषा समजणाऱ्या लोकांनी सभेत काय सुरू आहे ते समजावून सांगितले. नियमाप्रमाणे सभेसमोर प्रस्ताव मांडण्यात आला. अनेक वक्त्यांनी त्याचे समर्थनही केले. त्यात एक वक्ता हाजी हबीब होते. तेसुद्धा दक्षिण आफ्रिकेतील फार जुने अनुभवी रहिवासी होते. त्यांचे भाषण अत्यंत प्रभावशाली झाले. आवेशात येऊन ते इथवर बोलून गेले की "हा प्रस्ताव आपण खुदाला साक्षी ठेवून मंजूर केला पाहिजे. नामर्द होऊन कोणत्याही परिस्थितीत आपण त्यासमोर मान तुकवायला

नको. यामुळे मी खुदाची शपथ घेऊन सांगतो की मी या कायद्याला कधीही शरण जाणार नाही. या सभेतील सर्व उपस्थितांनीसुद्धा तशी शपथ घ्यावी असा सल्ला मी देईन."

या प्रस्तावाच्या समर्थनातही इतर लोकांची कडक आणि प्रभावी भाषणे झाली. सेठ हाजी बोलता बोलता जेव्हा शपथेच्या मुद्द्यावर आले तेव्हा मी चपापलो आणि सावध झालो. तेव्हाच मला माझ्या जबाबदारीची आणि समाजाच्या जबाबदारीची पूर्ण जाणीव झाली. आजपर्यंत समाजाने अनेक प्रस्ताव मंजूर केले होते. अधिक विचारविनिमयानंतर काही प्रस्तावात बदलही करण्यात आले होते. प्रस्ताव मंजूर करणाऱ्या लोकांनीच त्या प्रस्तावानुसार वर्तन केले नाही असेही प्रसंग काही प्रकरणी आले होते. मंजूर केलेल्या प्रस्तावात बदल करणे, प्रस्ताव मंजूर करणाऱ्या लोकांनी प्रस्तावाच्या अंमलबजावणीच्या वेळी माघार घेणे असे अनुभव सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना नेहमीच सगळीकडे येत असतात. ही सर्वसामान्य गोष्ट आहे. तात्त्विक दृष्टीने विचार केला असता साधा निश्चय आणि ईश्वराचे नाव घेऊन केलेली प्रतिज्ञा यांच्यात कोणतेही अंतर असू नये. बुद्धिमान माणूस जेव्हा विचारपूर्वक एखादा निश्चय करतो तेव्हा तो आपल्या निश्चयापासून कधीही ढळत नाही. त्याच्या दृष्टीने त्या निश्चयाचे तितकेच महत्त्व असते जितके ईश्वराच्या नावाने घेतलेल्या प्रतिज्ञेचे. परंतु जग तत्त्वाच्या आधारावर चालत नाही. ईश्वरसाक्षीने घेतलेली प्रतिज्ञा आणि सामान्य निश्चय यांत महासागराइतके अंतर आहे असे ते मानत असते. एखादा सामान्य निश्चय बदलवण्यात तो निश्चय बदलवणाराला लाज वाटत नाही. परंतु ईश्वराला साक्ष ठेवून प्रतिज्ञा करणारा माणूस जेव्हा प्रतिज्ञाभंग करतो तेव्हा केवळ त्यालाच लाज वाटत नाही तर समाजसुद्धा त्याचा धिक्कार करतो व त्याला पापी समजतो. या गोष्टीने मानवी मनात इतके घर केले आहे की शपथेवर एखादी गोष्ट सांगणारा खोटे बोलत असल्याचे सिद्ध झाले तर कायद्याच्या दृष्टीनेही त्याला अपराधी समजले जाते व त्याला कठोर शिक्षा करण्यात येते.

माझ्या मनावर अशा विचारांचा पगडा होता. गंभीर प्रतिज्ञांचा मला अनुभव होता आणि त्यांच्या गोड फळांचा आस्वादही मी माझ्या जीवनात घेतलेला होता. यामुळे सेठ हबीब यांच्या शपथेच्या सूचनेने मी चपापलो. त्या प्रस्तावाच्या परिणामांची कल्पना मला एका क्षणात आली. बावरलेल्या

या स्थितीतच माझ्यात उत्साहाचा संचार झाला. मी जरी त्या सभेत प्रतिज्ञा घेण्याकरिता वा इतरांना प्रतिज्ञा द्यायला गेलो नव्हतो तरी सेठ हाजी यांचा प्रस्ताव मला खूप आवडला. त्याचबरोबर मला असेही वाटले की सभेत आलेल्या सर्व लोकांना सर्व परिणामांची कल्पना देऊन प्रतिज्ञेचा संपूर्ण अर्थ समजावून सांगणे आवश्यक आहे आणि त्यानंतरही ते प्रतिज्ञा घेत असतील तर त्याचे स्वागत केले पाहिजे. आणि जर ते प्रतिज्ञा घेत नसतील तर हिंदुस्तानी समाज अजून संघर्षाकरिता तयार नाही असे समजायला पाहिजे. यामुळे सेठ हाजी हबीब यांच्या शब्दांमागील गूढार्थ समजावून सांगण्याची मला परवानगी द्यावी अशी मी अध्यक्षांना विनंती केली. मला परवानगी मिळाली आणि मी उभा झालो. लोकांना मी ज्या प्रकारे समजावले होते ते आज मला जसे आठवते तसे सांगतो. -

"या सभेला मी समजावून सांगू इच्छितो की आजपर्यंत आपण जे प्रस्ताव ज्या पद्धतीने मंजूर केले त्या प्रस्तावांमध्ये आणि ते प्रस्ताव मंजूर करण्याच्या पद्धतींमध्ये आणि या प्रस्तावात आणि हा प्रस्ताव मंजूर करण्याच्या पद्धतीत फार मोठे अंतर आहे. हा प्रस्ताव अतिशय गंभीर आहे कारण याच्या संपूर्ण अंमलबजावणीवर दक्षिण आफ्रिकेतील आपले अस्तित्व अवलंबून आहे. हा प्रस्ताव मंजूर करण्याची जी पद्धत आपल्या मित्राने सुचवली आहे ती जशी गंभीर आहे तशीच नवीनसुद्धा आहे. या पद्धतीने हा प्रस्ताव मंजूर करवून घेण्याकरिता मी स्वतःसुद्धा इथे आलो नव्हतो. याचे संपूर्ण श्रेय सेठ हाजी हबीब यांनाच मिळायला पाहिजे आणि याच्या जबाबदारीचे ओझेसुद्धा त्यांच्याच शिरावर आहे. याकरिता मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांची सूचना मला फार आवडली. परंतु तुम्ही जर त्यांची सूचना स्वीकाराल तर त्यांच्या जबाबदारीत तुम्हीसुद्धा भागीदार व्हाल. ही जबाबदारी काय आहे हे तुम्ही समजावून घ्यायला पाहिजे, आणि समाजाचा सेवक आणि सल्लागार म्हणून ही जबाबदारी तुम्हाला पूर्णपणे समजावून सांगणे माझे कर्तव्य आहे.

"जगाचे नियंत्रण करणाऱ्या एकाच परमेश्वराला आपण सर्व मानणारे आहो. मग मुसलमान त्याला खुदा म्हणो की हिंदू त्याला ईश्वर म्हणो. परंतु त्याचे स्वरूप एकच आहे. त्या ईश्वराला साक्षी ठेवून वा त्याला आपल्यामध्ये ठेवून आपण जर प्रतिज्ञा करणार असू वा शपथ घेत असू तर ती सामान्य

गोष्ट असणार नाही. अशी प्रतिज्ञा घेतल्यानंतर आपण जर त्या प्रतिज्ञेवर कायम राहिलो नाही, तिचा भंग केला तर आपण समाजाचे, जगाचे आणि ईश्वराचे अपराधी ठरू. जो माणूस सावधपणे, शुद्ध बुद्धीने प्रतिज्ञा करतो आणि नंतर तिचा भंग करतो तो माणूस आपले माणूसपण हरवून बसतो. आणि ज्याप्रमाणे पारा चढवलेले तांब्याचे नाणे रुपया नसते, आणि त्यावर पारा चढवलेला आहे हे कळताच त्याची जगात काहीही किंमत राहत नाही आणि ते खोटे नाणे बाळगणाऱ्या माणसाला शिक्षा होऊ शकते त्याचप्रमाणे खोटी शपथ घेणाऱ्या माणसाचीही कोणतीच किंमत शिल्लक राहत नाही आणि इहलोकात आणि परलोकातही तो शिक्षेकरिता पात्र ठरतो. सेठ हाजी हबीब अशाच प्रकारची गंभीर शपथ घेण्याकरिता तुम्हाला सुचवत आहेत. या सभेत असा एकही माणूस नाही की जो लहान मुलगा आहे वा अडाणी आहे. तुम्ही सर्व प्रौढ आणि अनुभवी आहा. तुम्ही सर्वांनी जग पाहिलेले आहे, आणि तुमच्यापैकी अनेक लोक समाजाचे प्रतिनिधी आहेत. आणि तुमच्यापैकी अनेकांनी कमीअधिक प्रमाणात जबाबदारीची कामे पार पाडलेली आहेत. यामुळे 'मला प्रतिज्ञेचा अर्थ कळला नव्हता' असे म्हणून एकही माणूस या प्रतिज्ञेतून सुटका करून घेऊ शकणार नाही.

"मला माहीत आहे की कोणत्या तरी अतिशय महत्त्वाच्या विशेष प्रसंगी माणूस प्रतिज्ञा करतो वा व्रत घेत असतो, आणि घ्यायलाही पाहिजे असते. चालताफिरता प्रतिज्ञा करणारा माणूस आपल्या प्रतिज्ञेबद्दल गंभीर राहू शकत नाही. परंतु दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानी समाजाच्या सामाजिक जीवनात प्रतिज्ञा घेण्यायोग्य जर कोणत्या योग्य प्रसंगाची मी कल्पना करू शकत असेन तर तो हा प्रसंग आहे असे मी निश्चितपणे म्हणू शकतो. असे पाऊल भीतभीत आणि सावधगिरीने टाकण्यातच शहाणपणा असतो. परंतु सावधगिरी आणि भीती यांनाही एक सीमा असते. त्या सीमेपर्यंत आता आपण पोहोचलो आहो. सरकारने सभ्यतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. त्याने आमच्या चोहोबाजूंनी वणवा पेटवला आहे. अशा प्रसंगीसुद्धा आपण जर आपले सर्व काही पणाला लावले नाही आणि हातात हात घालून विचार करत मख्खपणे बसून राहिलो तर आपण अपात्र आणि भित्रे असल्याचे सिद्ध होईल. यामुळे हा प्रसंग प्रतिज्ञा करण्यालायक वा शपथ घेण्यालायक आहे याबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नाही. परंतु अशी प्रतिज्ञा करण्याची वा

शपथ घेण्याची आपल्यामध्ये शक्ती आहे की नाही याचा विचार प्रत्येक हिंदुस्तानीने स्वतः केला पाहिजे. असे ठराव बहुमताने मंजूर केले जात नसतात. जितके लोक शपथ घेतील तितक्या लोकांकरिताच हा ठराव बंधनकारक असेल. अशा शपथा देखाव्याकरिता घेतल्या जात नसतात. स्थानिक सरकारवर, साम्राज्य सरकारवर आणि हिंदुस्तान सरकारवर त्याचा काय परिणाम होईल याचा कोणीही विचार करण्याची आवश्यकता नाही. प्रत्येकाने आपल्या हृदयावर हात ठेवून आपल्या अंतःकरणाचा शोध घेतला पाहिजे. आणि असे केल्यानंतर आपल्यामध्ये शपथ घेण्याची शक्ती आहे असे ज्याचे हृदय सांगत असेल त्यानेच शपथ घेतली पाहिजे. आणि असे केले तरच त्याची शपथ फलदायी होईल.

"आता दोन शब्द याच्या परिणामाविषयीही सांगतो. उत्तम परिणामाची अपेक्षा केली तर असे म्हणता येईल की हिंदुस्तानी समाजातील बरेचसे लोक जर ही शपथ घेऊ शकले तर आणि शपथ घेणारे लोक आपल्या शपथेवर अढळ राहिले तर कदाचित हे विधेयक मंजूरही होणार नाही, आणि जर ते मंजूर झालेच तरी लगेच ते रद्द केले जाईल, शक्य आहे की विधेयकाला विरोध करण्याची आपण शपथ घेतलेली असल्यामुळे आपल्याला फार क्लेश सहन करावे लागणार नाहीत. परंतु शपथ घेणाऱ्या व्यक्तीचा धर्म जसा एकीकडे श्रद्धापूर्वक आशा ठेवण्याचा असतो तसाच दुसरीकडे कोणतीही अपेक्षा न करता शपथेचे पालन करण्याची तयारी ठेवण्याचा असतो. यामुळे आपल्या लढ्याचे जे कटूहूनकटू परिणाम होऊ शकतील त्याचे चित्र मी तुमच्यासमोर रेखाटू इच्छितो. कल्पना करू की या सभेतील प्रत्येक उपस्थिताने शपथ घेतली आहे. आपली संख्या अधिकात अधिक तीन हजारांची असेल. हेही शक्य आहे की उरलेल्या १०,००० हिंदुस्तानींपैकी कोणीही शपथ घेतली नाही. सुरुवातीला आमच्यावर लोक हसतील, आणि त्याचबरोबर हेही शक्य आहे की शपथ घेणारांमधील काही वा बरेचसे लोक आपल्या पहिल्या कसोटीच्या प्रसंगानंतरच हातपाय गाळतील. शक्य आहे की आपल्याला तुरुंगात जावे लागेल, तुरुंगात जाऊन अपमानित व्हावे लागेल. तिथे आपल्याला भूक, थंडी, ऊन्ह यांचासुद्धा त्रास सहन करावा लागेल. कठोर श्रमसुद्धा करावे लागू शकतात. शक्य आहे की तुरुंगात उद्धट जमादाराचा आपल्याला मारही खावा लागू शकेल. आपल्याला दंड होऊ शकतो, आणि त्याच्या वसुलीकरिता आपल्या मालाचा

लिलावही केला जाऊ शकतो. लढ्यात फार कमी लोक राहिले तर आज जरी आपण श्रीमंत असलो तरी उद्या आपल्यावर कंगालीची वेळही येऊ शकते. आपल्याला हद्दपारही केले जाऊ शकते. आणि उपासमारीमुळे व तुरुंगातील छळामुळे आपल्यापैकी काही लोक आजारी पडू शकतील आणि मरूही शकतील. यामुळे ज्या कोणत्या दु:खाची आपण कल्पना करू शकतो ती सर्व दु:खे भोगण्याची आपल्यावर वेळ येऊ शकते हे समजूनच ही शपथ घेणे हाच शहाणपणा आहे. या लढ्याचा अंत केव्हा आणि कसा होईल असे जर मला कोणी विचारले तर मी म्हणेन की संपूर्ण समाज जर या अग्निदिव्यातून पार पडेल तर या लढ्याचा निर्णय लवकरात लवकर होईल. परंतु आपल्यापैकी बहुतेक लोक जर या संकटाच्या वादळात डळमळले तर हा लढा दीर्घकाळ चालू शकतो. असे असले तरीही इतके मात्र मी निश्चितपणे सांगण्याचे धाडस करू शकतो की मूठभर लोक जरी आपली प्रतिज्ञा जिवंत ठेवणारे असतील तरी आपल्या विजयातच या लढ्याचा अंत होऊ शकतो.

आता मी माझ्या जबाबदारीबद्दल दोन शब्द सांगतो. एकीकडे मी जसा तुम्हाला प्रतिज्ञा करण्यातील धोके दाखवतो आहे तसाच दुसरीकडे मी तुम्हाला प्रतिज्ञा करण्याकरिता प्रेरितसुद्धा करतो आहे. आणि असे करत असताना मला माझ्या जबाबदारीची पूर्ण जाणीव आहे. हेही शक्य आहे की आजच्या आवेशाच्या वातावरणात वा रागाच्या भरात उपस्थितांमधून बरेच जण प्रतिज्ञा घेण्याकरिता तयार होतील, परंतु नंतर संकट आल्यानंतर तुमच्यातील अनेक लोक गळतील आणि शेवटी मूठभर लोकच अग्निदिव्याचा सामना करण्याकरिता शिल्लक राहतील. अशा परिस्थितीतही माझ्यासारख्या माणसाकरिता एकच मार्ग शिल्लक असेल. आणि तो म्हणजे 'मरण जरी आले तरी या कायद्याला शरण न जाणे'. कल्पना करा की अशी वेळ आली आहे. असे होण्याची किंचितही शक्यता नाही, आणि तरीही आपण गृहीत घरू या की सर्वांनी प्रतिज्ञाभंग केला आणि शेवटी अखेरीस मीच एकटा शिल्लक रहिलो तरीही मी प्रतिज्ञाभंग करणार नाही असा माझा विश्वास आहे. हे सांगण्यामागील माझा हेतू तुम्ही सर्व समजून घ्या. ही अहंकाराची गोष्ट नाही तर या व्यासपीठावर बसलेल्या लोकांना सावध करण्याची आहे. माझे उदाहरण देऊन मी नेत्यांना सांगू इच्छितो की एकटे राहिल्यानंतरही आपल्या प्रतिज्ञेवर अढळ राहण्याचे सामर्थ्य वा

धैर्य जर तुमच्यात नसेल तर तुम्ही प्रतिज्ञा घेऊ नका. इतकेच नाही तर प्रतिज्ञा घेण्यापूर्वी अशा लोकांनी या प्रस्तावाचे समर्थन न करता त्याला विरोध केला पाहिजे असा प्रस्ताव आपण लोकांसमोर मांडला पाहिजे. आपण सर्व मिळून जरी ही प्रतिज्ञा करत असलो तरी त्याचा असा अर्थ कोणीही घेऊ नये की आपल्यामधील एखाद्याने वा बऱ्याच लोकांनी जर प्रतिज्ञाभंग केला तर उरलेले लोक आपोआपच प्रतिज्ञेच्या बंधनातून मुक्त होतील. प्रत्येकाने आपापली जबाबदारी समजून घेऊनच स्वतंत्रपणे प्रतिज्ञा घेतली पाहिजे, आणि असे समजून प्रतिज्ञा घेतली पाहिजे की कोणी काहीही जरी केले तरी मी मात्र माझ्या प्रतिज्ञेचे मरेपर्यंत पालन करीन."

इतके बोलून मी बसलो. संपूर्ण शांतता ठेवून लोकांनी माझा एकेक शब्द ऐकला. समाजातील इतर नेतागणही बोलले. प्रत्येकाने आपल्या स्वतःच्या आणि श्रोत्यांच्या जबाबदारीची चर्चा केली. यानंतर सभापती उभे राहिले. त्यांनीही सर्व परिस्थिती स्पष्ट केली.अखेरीस सर्व सभेने उभे राहून, हात उंच करून ईश्वराला साक्षी ठेवून प्रतिज्ञा केली - "हे विधेयक मंजूर होऊन जरी त्याने कायद्याचे रूप घेतले तरी आम्ही त्याला शरण जाणार नाही." हे दृश्य मी कधीही विसरू शकत नाही. लोकांच्या उत्साहाला सीमा नव्हती. दुसऱ्याच दिवशी त्या नाट्यगहात काही तरी अपघात झाला आणि ते संपूर्ण नाट्यगृह आगीत जळून भस्मसात झाले. ते नाट्यगृह जळाल्याची बातमी घेऊन तिसऱ्या दिवशी माझ्याकडे लोक आले आणि ते नाट्यगृह जसे जळाले तसेच हे विधेयकही जळून भस्मसात होईल असे म्हणून ते जमातीला धन्यवाद देऊ लागले. अशा चिन्हांचा माझ्यावर कोणताही परिणाम होत नसल्यामुळे मी त्याकडे लक्ष दिले नाही. मी या घटनेचा उल्लेख लोकांमधील शौर्य आणि श्रद्धेची भावना कशी चेतवली गेली होती हे सांगण्याकरिता केला आहे. हिंदुस्तानी समाजाच्या शौर्याची आणि श्रद्धेची अनेक उदाहरणे वाचकांना पुढील प्रकरणांमध्ये आढळतील.

वरील महान सभेनंतर कार्यकर्ते गप्प बसलेले नव्हते. जागोजागी सभा घेण्यात आल्या आणि प्रत्येक सभेत एकमताने प्रतिज्ञा घेण्यात आली. आता इंडियन ओपिनियनमध्ये खुनी कायदा हाच चर्चेचा मुख्य विषय झाला होता. याचबरोबर स्थानिक सरकारची भेट घेण्याकरिताही पावले

टाकण्यात आली. एक प्रतिनिधिमंडळ वसाहत मंत्री डंकन यांना भेटायला गेले आणि इतर गोष्टींबरोबर समाजाने घेतलेल्या प्रतिज्ञेचीही गोष्ट त्यांना सांगितली. प्रतिनिधिमंडळातील एक सदस्य सेठ हबीब त्यांना म्हणाले, “माझ्या बायकोचे ठसे घेण्याकरिता जर कोणी येईल तर मी माझ्या रागावर किंचितही नियंत्रण ठेवू शकणार नाही. मी त्याला जीवानिशी मारून टाकीन आणि स्वतःही मरून जाईन.” वसाहतमंत्री काही वेळ तर हाजी हबीब यांच्या चेहऱ्याकडे पाहतच राहिले. मग म्हणाले, “हा कायदा स्त्रियांना लागू करायचा की करू नये याचा सरकार विचार करते आहे. आणि स्त्रियांसंबंधीची या कायद्यातील कलम मागे घेण्यात येतील इतकी तर मी तुम्हाला आताच खात्री देऊ शकतो. याबद्दलच्या तुमच्या भावना सरकारच्या लक्षात आल्या आहेत आणि ते त्यांचा मान राखू इच्छिते. परंतु जोपर्यंत इतर कलमांचा संबंध आहे त्यासंबंधात सरकारचे धोरण दृढ राहणार आहे असे खेदाने मला तुम्हाला सांगावे लागते. जनरल बोथांची इच्छा आहे की पूर्ण विचार करून तुम्ही हा कायदा मान्य केला पाहिजे. गोऱ्यांच्या अस्तित्वाकरिता हा कायदा जरुरीचा आहे असे सरकारचे मत आहे. कायद्याचे उद्दिष्ट कायम ठेवून या विधेयकाच्या तपशिलासंबंधी तुम्हाला जर काही सूचना करायच्या असतील तर सरकार त्यावर नक्कीच विचार करील. यामुळे तुम्ही हा कायदा स्वीकारावा आणि तपशीलासंबंधी तुमच्या काही सूचना असतील तर त्या सरकारसमोर ठेवाव्या असा प्रतिनिधीमंडळाला माझा सल्ला आहे. यातच तुमचे हित आहे.” वसाहत मंत्र्यासमोर प्रतिनिधीमंडळाने जो युक्तिवाद मांडला तो सर्व मागील प्रकरणात आलेला असल्यामुळे तो मी इथे देत नाही. वसाहतमंत्र्यांसमोर तो युक्तिवाद मांडला जात असताना त्यात केवळ भाषेचेच अंतर होते, संपूर्ण युक्तिवाद तोच होता. तुमच्या सल्ल्यानंतरही एकही हिंदुस्तानी हा कायदा मान्य करणार नाही आणि स्त्रियांना या कायद्याच्या कक्षेपासून दूर ठेवण्याच्या सरकारच्या हेतूबद्दल आम्ही आपले आभारी आहो असे म्हणून प्रतिनिधिमंडळाने वसाहत मंत्र्यांचा निरोप घेतला. हिंदुस्तानी जनतेच्या आंदोलनामुळे या खुनी कायद्यातून स्त्रियांना मुक्त ठेवण्याचा सरकारने विचार केला होता की अधिक विचारविमर्श केल्यानंतर श्री कर्टिस यांची वैज्ञानिक पद्धती व्यावहारिक दृष्टीने योग्य नाही असे वाटल्यामुळे सरकारने स्वतंत्रपणे तो निर्णय घेतला होता हे सांगणे कठीण होते. हिंदुस्तानींच्या आंदोलनामुळे नाही तर स्वतंत्रपणे आम्ही या निर्णयावर

पोहोचलो असा सरकारचा दावा होता. ते काहीही असले तरी आपल्या आंदोलनामुळेच असे घडले असा हिंदुस्तानींनी काकतालीय न्यायाने आपला समज करून घेतला होता, आणि यामुळे लढण्याचा त्यांचा उत्साह अजूनच दुणावला होता. जनतेच्या या निर्धाराला वा आंदोलनाला काय नाव द्यावे याची आम्हा कोणाला काहीही कल्पना नव्हती. त्या वेळी आंदोलनाला मी 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' हे नाव दिले होते. त्या वेळी 'पॅसिव्ह रेझिस्टन्स'चा पूर्ण अर्थ मलाही कळलेला नव्हता. कोणत्या तरी नवीन तत्त्वाचा जन्म झाला आहे इतकेच मला जाणवत होते. आमचा लढा जसजसा पुढे जाऊ लागला तसतसा 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' या नावामुळे गोंधळ निर्माण होऊ लागला, आणि या महान लढ्याला इंग्रजी नाव देण्याची मला लाज वाटू लागली. शिवाय हे शब्द असे होते की ते सहजपणे जनतेच्या तोंडी बसू शकत नव्हते. यामुळे जो कोणी या आंदोलनाकरिता उत्तम शब्द शोधून काढील त्याच्याकरिता एक लहानसे बक्षीस देण्याची घोषणा 'इंडियन ओपिनियन'मधून जाहीर करण्यात आली. काही नावे माझ्याकडे आली. 'इंडियन ओपिनियन'मधून या आंदोलनाच्या अर्थाची चांगलीच चर्चा झालेली होती. यामुळे नाव शोधण्याकरिता जी माहिती आवश्यक असते ती सर्व स्पर्धकांकरिता उपलब्ध होती. श्री मगनलाल गांधींनीही या स्पर्धेत भाग घेतला होता. त्यांनी 'सदाग्रह' हे नाव सुचवले.हे नाव निवडण्याचे कारण सांगताना त्यांनी लिहिले होते की हिंदुस्तानींचे हे आंदोलन महान आग्रह आहे, आणि हा महान आग्रह सद म्हणजे शुभ आहे. यामुळे मी हे नाव निवडले आहे. त्यांच्या युक्तिवादाचा सारांश इथे मी थोडक्यात सांगितला आहे. हे नाव मला आवडले. परंतु या नावात जी गोष्ट असावी असे मला वाटत होते ती नव्हती. यामुळे मी दचा त करून त्याला य जोडला व सत्याग्रह हे नाव तयार केले.सत्यात शांततेचा समावेश होतो असे गृहीत धरून आणि कोणत्याही गोष्टीचा आग्रह केल्याने तिच्यात शक्ती निर्माण होत असल्यामुळे हिंदुस्तानींच्या या आंदोलनाचे नाव सत्याग्रह म्हणजे सत्य आणि शांततेमुळे निर्माण होणारी शक्ती असे ठेवण्यात आले व याच नावाने या आंदोलनाचा परिचय करून देण्यात आला. तेव्हापासून या आंदोलनाकरिता 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' या नावाचा उपयोग बंद करण्यात आला. इंग्रजी लेखांमधूनसुद्धा तो शब्द वगळण्यात येऊ लागला व त्याऐवजी सत्याग्रह वा त्या अर्थाच्या वेगळ्या शब्दाचा प्रयोग करण्यात येऊ लागला. अशा प्रकारे जी गोष्ट सत्याग्रह या नावाने

ओळखली जाऊ लागली त्या गोष्टीचा आणि सत्याग्रह या नावाचा जन्म झाला. आपला हा इतिहास पुढे नेण्याआधी सत्याग्रह आणि 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' यांच्यामधील भेद समजून घेणे आवश्यक आहे. यामुळे पुढील प्रकरणात आपण तो भेद समजून घेऊ.

## १३. सत्याग्रह विरुद्ध 'पॅसिव्ह रेझिस्टन्स'

हिंदुस्तानींचे आंदोलन जसजसे पुढे जाऊ लागले तसतसे इंग्रजही त्यात रस घेऊ लागले. ट्रान्सवालमधील इंग्रजी वृत्तपत्रे बहुधा खुनी कायद्याच्या बाजूने जरी लिहीत असली, आणि हिंदुस्तानींना गोऱ्यांचा जो विरोध होता त्याचे समर्थन करत असली तरी एखाद्या प्रसिद्ध हिंदुस्तानीने त्या वृत्तपत्राकरिता काही लिहिले तर ते ती वृत्तपत्रे आनंदाने ते प्रकाशित करत असत. हिंदुस्तानींनी सरकारकडे पाठवलेले अर्जही ते पूर्णपणे छापायचे व जर ते शक्य झाले नाही तर निदान त्याचा सारांश तरी द्यायचे. हिंदुस्तानींच्या मोठ्या सभेत केव्हा केव्हा ते आपला प्रतिनिधीसुद्धा पाठवायचे आणि तसे केले नाही तर आम्ही पाठवलेला वृत्तांत ते छापायचे.

वृत्तपत्रांची ही सौजन्यपूर्ण वागणूक समाजाकरिता फार हितकारक ठरली. आमचे आंदोलन पुढे सरकू लागल्यानंतर काही गोरेही त्यात रस घेऊ लागले होते. अशा अग्रगण्य पुढाऱ्यांमध्ये श्री हॉस्किन हे एक लक्षाधीशही होते. आधीपासूनच त्यांच्या मनात रंगभेद नव्हता. परंतु समाजाने आंदोलन सुरू केल्यानंतर हिंदुस्तानींच्या प्रश्नात ते अधिक रस घेऊ लागले. जर्मिन्स्टन हे जोहानिसबर्गच्या उपनगरासारखे एक शहर आहे. तेथील गोऱ्यांनी माझे भाषण ऐकण्याची इच्छा व्यक्त केली. त्याकरिता एक सभा आयोजित करण्यात आली  श्री हॉस्किन तिचे अध्यक्ष झाले आणि मी तिच्यात भाषण केले. हिंदुस्तानींच्या आंदोलनाचा आणि माझा परिचय करून देत श्री हॉस्किन म्हणाले, "न्याय मिळवण्याचे इतर सर्व प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर ट्रान्सवालमधील हिंदुस्तानींनी 'पॅसिव्ह रेझिस्टन्स'चा आधार घेतला. त्यांना मतदानाचा अधिकार नाही. त्यांची संख्या कमी आहे. ते कमजोर आहेत. त्यांच्याजवळ शस्त्र नाहीत. यामुळे त्यांनी दुर्बलांचे शस्त्र 'पॅसिव्ह रेझिस्टन्स'चा अंगिकार केला आहे." त्यांचे हे म्हणणे ऐकून मला धक्काच बसला, आणि जे भाषण करण्याकरिता मी सभेत गेलो होतो त्याने दुसरेच रूप घेतले. श्री हॉस्किन यांच्या मुद्द्यांना विरोध करत मी तिथे 'पॅसिव्ह रेझिस्टन्स'ला 'सोल फोर्स' म्हणजे 'आत्मशक्ती' हे नाव दिले. 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' या शब्दाच्या उपयोगाने भयंकर गैरसमज होऊ शकतो हे त्या सभेत

माझ्या लक्षात आले. त्या सभेत मी जो युक्तिवाद केला त्याचा थोडा अधिक विस्तार करून 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' आणि आत्मबल यांच्यातील अंतर स्पष्ट करून सांगण्याचा मी प्रयत्न केला.

'पॅसिव्ह रेझिस्टन्स' या शब्दांचा इंग्रजीत सर्वात आधी कोणी आणि केव्हा उपयोग केला हे मला अगदीच आठवत नाही. परंतु इंग्रजांमधील अल्पसंख्य लोकांना जेव्हा एखादा कायदा पसंत पडत नाही तेव्हा ते अल्पसंख्य लोक त्या कायद्याविरुद्ध बंड करण्याऐवजी कायद्याला शरण न जाण्याचे सौम्य पाऊल उचलतात आणि त्यापासून होणारा त्रास शांतपणे (पॅसिव्ह) सहन करण्याचा निर्णय घेतात. काही वर्षांपूर्वी ब्रिटिश संसदेने शिक्षणविषयक कायदा (एज्युकेशनल ऍक्ट) मंजूर केला होता. त्या वेळी इंग्लंडमधील नॉन कन्फर्मिस्ट ख्रिश्चन संप्रदायाच्या लोकांनी डॉ. क्लिफर्ड यांच्या नेतृत्वाखाली 'पॅसिव्ह रेझिस्टन्स'चा मार्ग अवलंबिला होता. इंग्लंडमधील स्त्रियांनी मताधिकाराकरिता जे जाहीर आंदोलन केले होते तेसुद्धा 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' म्हणूनच ओळखले जात होते. ही दोन्ही आंदोलने लक्षात घेऊन गोऱ्यांच्या सभेत श्री हॉस्किन म्हणाले होते की 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' अशा लोकांचे शस्त्र आहे की ज्यांना मताधिकार नाही वा जे दुर्बल आहेत. डॉ. क्लिफर्ड यांच्या संप्रदायातील लोकांना मताधिकार होता. परंतु ब्रिटिश संसदेत त्यांची संख्या कमी असल्यामुळे शिक्षणविषयक कायद्याची मंजुरी ते अडवू शकत नव्हते. संख्येच्या दृष्टीने तो पक्ष अर्थातच दुर्बल होता. नॉन कन्फर्मिस्ट पक्षाचा शस्त्रांच्या उपयोगाला विरोध नव्हता. परंतु अशा कामात शस्त्रांचा उपयोग केल्याने यश मिळेल असे त्यांना वाटत नव्हते. यशिवाय दरवेळी एकेका गोष्टीविरुद्ध बंड पुकारून अधिकार मिळवण्याची पद्धती कोणत्याही सुव्यवस्थित राज्यपद्धतीत चालू शकत नाही. याशिवाय शस्त्रांचा उपयोग करणे शक्य जरी असते तरी डॉ. क्लिफर्ड यांच्या पक्षातील काही लोकांचा शस्त्रांच्या उपयोगाला विरोध होता. इंग्लंडमधील स्त्रियांच्या आंदोलनाच्या वेळी स्त्रियांना मताधिकार नव्हता, आणि शारीरिक बलाच्या दृष्टीनेही त्या दुर्बल होत्या. यामुळे हे दुसरे उदाहरणही श्री हॉस्किन यांच्या युक्तिवादानुसारच होते. स्त्रियांच्या मताधिकाराच्या आंदोलनात स्त्रियांनी शस्त्रत्याग केलेला नव्हता, इतकेच नाही तर स्त्रियांच्या एका गटाने घरांना आगी लावल्या होत्या आणि पुरुषांना मारहाणही केली होती. एखाद्या दिवशी एखाद्या माणसाचा खून करण्याचा त्यांचा हेतू असेल असे मला वाटत नाही. परंतु लोकांना मारहाण

करण्याचा आणि त्यांना त्रास देण्याचा त्यांचा हेतू नक्कीच होता. परंतु दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींच्या आंदोलनात कोणत्याही ठिकाणी आणि कोणत्याही परिस्थितीत शस्त्रांना स्थान नव्हते. आणि जसजसे आपण पुढे जाऊ लागलो तसतसे भयानक दुःखे सहन करावी लागत असतानाही हिंदुस्तानींनी शारीरिक शक्तीचा उपयोग केला नव्हता हे वाचकांच्या लक्षात येईल. तसेच शारीरिक शक्तीचा उपयोग करण्याच्या परिस्थितीत असतानाही त्यांनी शस्त्रांचा उपयोग केला नव्हता. याशिवाय हिंदुस्तानींना मताधिकार नव्हता आणि ते दुर्बल होते या दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत. परंतु सत्याग्रह आंदोलनाच्या संघटनेशी या दोन्ही गोष्टींचा संबंध नाही. हिंदुस्तानींमध्ये मताधिकाराची वा शस्त्रांची शक्ती जरी असती तरी त्यांनी सत्याग्रहच केला असता असे सांगण्याचा माझा इथे हेतू नाही. मताधिकाराची शक्ती त्यांच्याजवळ असती तर कदाचित सत्याग्रहाची वेळच आली नसती. त्यांच्याजवळ जर शस्त्रबळ असते तर विरोधकांनी विचारपूर्वक पाऊल उचलले असते. यामुळे शस्त्रबळ असणारांवर सत्याग्रहाची वेळ क्वचितच येत असते ही गोष्टसुद्धा कळण्यासारखी आहे. माझ्या म्हणण्याचा अर्थ इतकाच आहे की हिंदुस्तानी जनतेच्या आंदोलनाची तयारी करत असताना माझ्यासमोर शस्त्रांचा उपयोग करण्याचा वा न करण्याचा प्रश्नच निर्माण झाला नाही हे मी निश्चितपणे सांगू शकतो. सत्याग्रह केवळ आत्मशक्ती आहे, आणि शस्त्रशक्तीचा वा शारिरिक सामर्थ्याचा वा पाशवी शक्तीचा जितक्या प्रमाणात प्रयत्न वा विचार असतो तितक्याच प्रमाणात आत्मशक्तीचा उपयोग कमी प्रमाणात होत असतो. माझ्या समजाप्रमाणे या दोन्ही शक्ती परस्पर विरोधी आहेत. आणि हा विचार सत्याग्रह आंदोलनाच्या जन्माच्या वेळीसुद्धा माझ्या मनात पक्का रुजलेला होता.

परंतु हा विचार बरोबर की चूक याचा इथे विचार करण्याची आपल्याला आवश्यकता नाही. आपल्याला तर केवळ पॅसिव्ह रेझिस्टन्स आणि सत्याग्रह यांच्यातील भेद समजून घ्यायचा आहे. या शक्तींमध्ये मूलभूत अंतर आहे हे आपण पाहिले आहे. स्वतःला पॅसिव्ह रेझिस्टन्ट समजणारांनी अथवा सत्याग्रही समजणारांनी हा भेद चांगल्या प्रकारे समजून घेतल्याशिवाय या गोष्टी एकच आहेत असा जर समज करून घेतला तर यामुळे दोन्हींवर अन्याय होईल आणि त्याचे परिणामही हानिकारक होतील. आम्ही स्वतःच दक्षिण आफ्रिकेत पॅसिव्ह रेझिस्टन्स या शब्दाचा उपयोग करत

होतो. यामुळे मताधिकाराकरिता लढणाऱ्या ब्रिटिश स्त्रियांच्या शौर्याचा आणि बलिदानाचा आमच्यावर आरोप करून आमची प्रशंसा करणारे बरेच होते. परंतु त्या स्त्रियांप्रमाणे आम्हीही लोकां ंच्या जीवनाची वा वित्तहानीची फिकिर न करणारे लोक आहो असे बहुतेक लोक समजत होते. आणि श्री हॉस्किनसारख्या उदार आणि शुद्ध मनाचे गृहस्थसुद्धा आम्हाला दुर्बल समजत होते. विचारांमध्ये इतकी ताकद असते की माणूस जसा विचार करतो तसाच तो कालांतराने होतो. आपण दुर्बल आहो असे समजून जर आपण पॅसिव्ह रेझिस्टन्सचा उयोग करू लागलो तर आपण कधीही शक्तिशाली होणार नाही आणि संधी मिळताच दुर्बलांच्या त्या शस्त्राचा आपण त्याग करू. याउलट जर आपण सत्याग्रही असू आणि स्वतःला बलवान समजून सत्याग्रहाच्या शस्त्राचा उपयोग करू तर त्याचे निश्चितच दोन परिणाम होऊ शकतील. शक्तीच्या विचाराचे संवर्धन करता करता दिवसेंदिवस आपण बलवान होत जातो, आणि जसजशी आपली शक्ती वाढत जाते तसतसा त्या शक्तीचा त्याग करण्याचा विचारही आपल्या मनाला स्पर्शू शकत नाही. याशिवाय पॅसिव्ह रेझिस्टन्समध्ये प्रेमाला कुठेही स्थान नसते तर सत्याग्रहात वैरभावनेला कोणतेही स्थान नसते, इतकेच नाही तर सत्याग्रहात वैरभावना धर्मविरोधी मानली जाते. पॅसिव्ह रेझिस्टन्समध्ये संधी मिळाली तर शस्त्राचा उपयोग करता येऊ शकतो. सत्याग्रहात कितीही चांगली संधी मिळाली तरी शस्त्रास्त्रांचा उपयोग त्याज्य असतो. पॅसिव्ह रेझिस्टन्सला शस्त्राच्या उपयोगाची पूर्वतयारी समजली जाते तर सत्याग्रहाचा अशा प्रकारे कधीही उपयोग करता येऊ शकत नाही, तो पूर्णपणे त्याज्य असतो. पॅसिव्ह रेझिस्टन्स शस्त्रबळावर चालू शकतो तर सत्याग्रह शस्त्रबळाच्या पूर्णपणे विरोधी आहे. या दोघांचा समन्वय कधी होऊच शकत नाही. म्हणजेच सत्याग्रह आणि पॅसिव्ह रेझिस्टन्स एकमेकांबरोबर कधीही राहू शकत नाही. सत्याग्रहाचा उपयोग आपल्या प्रिय व्यक्तीच्या विरोधातही करता येऊ शकतो आणि होतही असतो. उलट पॅसिव्ह रेझिस्टन्सचा उपयोग आपल्या प्रिय व्यक्तीच्या विरोधात कधीही करता येणे शक्य नसते. आपल्या प्रिय व्यक्तीला आपण शत्रू समजलो तरच तिच्या विरोधात पॅसिव्ह रेझिस्टन्सचा उपयोग होऊ शकतो. पॅसिव्ह रेझिस्टन्समध्ये विरोधकांना दुःख देण्याची, त्यांना त्रास देण्याची कल्पना नेहमी असते, आणि त्यांना दुःख देत असताना आपल्याला त्रास झाला तर तो सहन करण्याचीही पॅसिव्ह रेझिस्टन्स करणाराची तयारी

असते. उलटपक्षी सत्याग्रहात दु:ख देण्याचा विचारही नसतो. त्यात तर स्वतः दु:ख विकत घेऊन, स्वतः दु:ख सहन करून विरोधकाला जिंकण्याचा विचार असतो.

या दोन शक्तींमध्ये मुख्य अंतर हे आहे. पॅसिव्ह रेझिस्टन्ससंबंधी वर मी जे गुण म्हणा वा दोष म्हणा सांगितलेले आहेत त्या सर्वांचा प्रत्येक पॅसिव्ह रेझिस्टन्सच्या वेळी अनुभव येईलच असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नाही. परंतु पॅसिव्ह रेझिस्टन्सच्या अनेक उदाहरणांमध्ये हे दोष आढळतात असे दाखवून देता येऊ शकते. वाचकांना मी हेही सांगितले पाहिजे की अनेक ख्रिश्चन येशू ख्रिस्ताला पॅसिव्ह रेझिस्टन्सचा आदी नेता मानतात. परंतु येशू ख्रिस्ताच्या बाबतीत पॅसिव्ह रेझिस्टन्सचा अर्थ सत्याग्रह असाच घेण्यात आला पाहिजे. अशा अर्थाची पॅसिव्ह रेझिस्टन्सची उदाहरणे जगात फारशी आढळणार नाहीत. टॉलस्टॉयनी रशियातील दुखोबारचे जे उदाहरण उद्धृत केले आहे ते अशाच पॅसिव्ह रेझिस्टन्सचे म्हणजे सत्याग्रहाचे उदाहरण आहे. येशू ख्रिस्तानंतर जो अनन्वित छळ हजारो ख्रिश्चन लोकांनी सहन केला त्याकरिता किती तरी काळापर्यंत पॅसिव्ह रेझिस्टन्स या शब्दाचा उपयोग होत नव्हता. यामुळे त्या लोकांची जितकी काही पवित्र उदाहरणे आढळतात त्या सर्वांना मी सत्याग्रह हेच नाव देईन. आणि आपण जर त्या उदाहरणांना पॅसिव्ह रेझिस्टन्सची उदाहरणे समजणार असू तर मग सत्याग्रह आणि पॅसिव्ह रेझिस्टन्स यांच्यात काही भेदच राहणार नाही. इंग्रजी भाषेत पॅसिव्ह रेझिस्टन्सचा जो अर्थ ध्वनित होतो त्यापासून सत्याग्रहाची कल्पना वेगळी आहे हे वाचकांच्या लक्षात आणून देणे हाच या प्रकरणाचा हेतू आहे.

पॅसिव्ह रेझिस्टन्स करणारांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये केवळ इतक्याकरिता पॅसिव्ह रेझिस्टन्सची लक्षणे सांगत असताना वरील सावधगिरीची सूचना दिली आहे. अशाच प्रकारे सत्याग्रहाची लक्षणे सांगत असताना हे सांगणेही आवश्यक आहे की जे लोक स्वतःला सत्याग्रही म्हणवतात त्यांच्याबद्दल मी असा दावा करू शकत नाही की त्यांच्यात मी वर सांगितलेली सर्व लक्षणे विद्यमान आहेत. अनेक सत्याग्रहींना तर मी वर सांगितलेल्या गुणांचा परिचयसुद्धा नाही याची मला कल्पना नाही असे नाही. अनेकांचा असा समज आहे की सत्याग्रह

हे दुर्बलांचे शस्त्र आहे. शस्त्रबळाने करावयाच्या संघर्षाची पूर्वतयारीकरिता सत्याग्रह आहे असे मी अनेकांच्या तोंडून ऐकले आहे. सत्याग्रहींमध्ये कोणते गुण आढळतात हे सांगण्याचा माझा प्रयत्न नसून सत्याग्रहाच्या कल्पनेत कोणता गूढ अर्थ भरलेला आहे आणि त्यानुसार सत्याग्रहीने कसे असायला पाहिजे हेही सांगण्याचा माझा प्रयत्न आहे. ज्या शक्तीचा उपयोग करायला ट्रान्सवालच्या रहिवाशांनी सुरुवात केली होती त्या शक्तीचे स्वरूप लोकांना स्पष्ट करून सांगणे, पॅसिव्ह रेझिस्टन्स व ती शक्ती एकच आहेत असा भ्रम लोकांना होऊ नये म्हणून व त्याबद्दल लोकांना सावध करण्याकरिता त्या शक्तीची अभिव्यक्ती होईल असा नवीन शब्द शोधणे कशा प्रकारे भाग पडले हे सांगणे या प्रकरणाचा हेतू होता.

# १४. इंग्लंडमध्ये प्रतिनिधीमंडळ

ट्रान्सवालमधील खुनी कायद्याला विरोध करण्याकरिता स्थानिक सरकारसमोर अर्जविनंत्या करण्याची जी काही पाऊले उचलणे आवश्यक होते ती सर्व उचलण्यात आली होती. ट्रान्सवालच्या विधिमंडळाने विधेयकातील स्त्रियांसंबंधीचे कलम वगळले होते. परंतु उरलेले विधेयक राजपत्रातून जवळपास जसेच्या तसेच प्रकाशित करण्यात आले होते. परंतु त्या वेळी जमातीत फार मोठे शौर्य होते आणि तेवढेच मतैक्य आणि ऐक्यही होते. यामुळे कोणीही निराश झाले नाही. या संबंधात जी कोणती वैधानिक उपाययोजना करता येणे शक्य असेल ती सर्व केली पाहिजे या विचारावर आम्ही सर्व अढळ होतो. त्या वेळी ट्रान्सवाल क्राऊन कॉलनी साम्राज्याची वसाहत होते. अशी वसाहत की जिच्या कायद्यांकरिता, प्रशासन इत्यादींकरिता साम्राज्य सरकार जबाबदार आहे असे समजले जात होते. यामुळे साम्राज्य सरकारच्या वसाहतीच्या विधिमंडळांनी मंजूर केलेल्या कायद्याला ब्रिटिश सम्राटाच्या केवळ नाममात्र संमतीची नाही तर खरोखरीच्या संमतीची आवश्यकता होती. अनेकदा तर ब्रिटिश घटनेच्या विरोधात असलेल्या कायद्यांना आपल्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार सम्राट नकारसुद्धा देऊ शकत असत. याउलट जबाबदार शासनपद्धतीच्या वसाहतीत विधिमंडळ जो कायदा मंजूर करते त्या कायद्याकरिता सम्राटांची संमती केवळ औपचारिकता म्हणून घेतली जाते जमातीचे प्रतिमंडळ जर विलायतेत जाणार असेल  तर जमातीने आपली जबाबदारी चांगल्या प्रकारे समजून घेतली पाहिजे हे सांगण्याची जबाबदारी माझ्यावरच होती. यामुळे आमच्या संघटनेसमोर मी तीन प्रस्ताव मांडले. ते असे - ज्यू लोकांच्या नाट्यगृहात जरी आम्ही प्रतिज्ञा घेतल्या होत्या तरी मध्यंतरीच्या काळात लोकांच्या मनात जर काही शंकांनी घर केले असेल तर ते कळावे म्हणून परत एकदा आम्ही हिंदुस्तानींकडून प्रतिज्ञा मिळवल्या पाहिजे. या सूचनेच्या समर्थनार्थ माझा एक तर्क असा होता की प्रतिनिधीमंडळ जर इंग्लंडला जाणार असेल तर त्याने निर्भय होऊन जायला पाहिजे, आणि इंग्लंडच्या वसाहतमंत्र्यांना हिंदुस्तानमंत्र्याला निर्भिडपणे हिंदुस्तानी जनतेचा निर्धार सांगितला पाहिजे. मी केलेली दुसरी सूचना अशी होती की प्रतिनिधीमंडळ जाण्यापूर्वीच त्याच्या खर्चावगैरेची पूर्ण

व्यवस्था व्हायला पाहिजे. प्रतिनिधीमंडळाचे कमीतकमी प्रतिनिधी गेले पाहिजे अशी माझी तिसरी सूचना होती. प्रतिनिधिमंडळात अधिक लोक असले तर अधिक काम होईल हा जनतेचा गैरसमज दूर व्हावा म्हणून मी ही तिसरी सूचना केली होती. प्रतिनिधिमंडळातील लोकांनी स्वतःच्या सन्मानार्थ नाही तर लोकसेवेकरिता जायला पाहिजे या विचाराला महत्त्व देण्याचा आणि खर्चात बचत करण्याचा हेतूही या सूचनेमागे होता. माझ्या या तिन्ही सूचना मान्य करण्यात आल्या. लोकांच्या सह्या घेण्यात आल्या. अनेक लोकांनी प्रतिज्ञेवर सह्या केल्या. परंतु या वेळी माझ्या लक्षात आले की ज्या लोकांनी नाट्यगृहात तोंडी प्रतिज्ञा केली होती त्यांच्यातील काही लोक या वेळी सही करण्याकरिता मागेपुढे पाहू लागले होते. एकदा प्रतिज्ञा केली की मग शंभरदा जरी तिचा पुनरुच्चार करावा लागला तरी माणसाने मागेपुढे पाहता कामा नये. परंतु तरीही समजूनउमजून घेतलेल्या प्रतिज्ञेनंतरही तिच्याबद्दल शिथिलपणा दाखवणारे काही लोक आढळत असतात असा अनुभव कोणाला येत नाही? प्रतिनिधीमंडळाच्या खर्चाकरिता आमच्या अपेक्षेप्रमाणे पैसे गोळा झाले, परंतु प्रतिनिधीमंडळाच्या निवडीसंबंधी सर्वात मोठी अडचण निर्माण झाली. माझे नाव तर प्रतिनिधीमंडळात होतेच. परंतु माझ्याबरोबर कोणी जावे याचा निर्णय घेण्यात समितीने फार वेळ लावला. किती तरी रात्री चर्चेतच गेल्या. संघटनांत वा संघात ज्या वाईट सवयी आढळतात त्यांचा त्या वेळी आम्हाला पुरेपूर अनुभव आला. काही लोक म्हणू लागले की मी एकटाच गेलो तर सगळ्यांचे समाधान होईल. परंतु असे करायला मी स्पष्ट नकार दिला. सामान्यपणे असे म्हणता येऊ शकते की दक्षिण आफ्रिकेत हिंदूमुसलमानांचा प्रश्न नव्हता. परंतु दोन्ही जमातीत अगदीच मतभेद नव्हते असा दावाही मी करू शकत नाही. या मतभेदाने कधीही विषारी रूप धारण केले नाही याकरिता काही प्रमाणात तेथील परिस्थिती कारणीभूत होती असेही समजता येऊ शकते. परंतु याचे निश्चित आणि खरे कारण हेच आहे की हिंदुस्तानी समाजाच्या पुढाऱ्यांनी अंतःकरणापासून आणि शुद्ध मनाने काम केले आणि समाजाला चांगल्या पद्धतीने मार्गदर्शन केले. माझ्याबरोबर एक तरी मुसलमान सदस्य असला पाहिजे आणि प्रतिनिधीमंडळात केवळ दोनच सदस्य असले पाहिजे असा सल्ला मी दिला. परंतु मी सर्व समाजांचा प्रतिनिधी असल्यामुळे हिंदूंचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य प्रतिनिधीमंडळात

असलाच पाहिजे असे हिंदूंचे म्हणणे होते. लगेच काही लोकांचे म्हणणे पडले की प्रतिनिधीमंडळात एक कोकणी आणि एक मेमन मुसलमानांचा प्रतिनिधीही असायला पाहिजे. तसेच हिंदूंमधीलही पाटीदार, अनाविल आणि अशाच प्रकारे इतर जातींचाही एकेक प्रतिनिधी प्रतिनिधीमंडळात असला पाहिजे असेही लोकांचे म्हणणे पडले. परंतु अखेरीस सर्व लोकांची समजूत घातली गेली आणि श्री वजीर अली आणि मी अशा आम्हा दोघांचीच प्रतिनिधीमंडळाकरिता निवड झाली.

हाजी वजीर अली अर्ध मलायी होते असे म्हणता येऊ शकते. त्यांचे वडील हिंदुस्तानी मुसलमान होते तर आई मलायी. त्यांची मातृभाषा डच होती असे आपण म्हणू शकतो. परंतु त्यांनी इंग्रजी शिक्षणही चांगल्या प्रकारे घेतले होते आणि इंग्रजी आणि डच या दोन्ही भाषा त्यांना चांगल्या प्रकारे बोलता येत होत्या. इंग्रजीत भाषण करत असतानासुद्धा त्यांना कुठेही अडखळावे लागत नव्हते. वृत्तपत्रांना पत्र लिहिण्याची कलासुद्धा त्यांनी चांगल्या प्रकारे अवगत केली होती. ते ट्रान्सवाल येथील ब्रिटिश इंडियन असोसिएशनचे सदस्य होते आणि दीर्घ काळापासून सार्वजनिक जीवनात भाग घेत होते. हिंदुस्तानीसुद्धा ते अस्खलितपणे बोलू शकत असत. मलायी स्त्रीशी त्यांचा विवाह झाला होता, आणि त्यांना पुष्कळ मुलांचे पितृत्व लाभले होते.

विलायतेत पोहोचताच आम्ही दोघेही आमच्या कामाला लागलो. हिंदुस्तान मंत्र्यांना द्यावयाचा अर्ज तर आम्ही जहाजातच तयार करून टाकला होता. इंग्लंडमध्ये पोहोचताच आम्ही तो छापून घेतला. त्या वेळी लॉर्ड एल्गिन वसाहतमंत्री होते आणि लॉर्ड मोर्ले हिंदुस्तानमंत्री. हिंदुस्तानचे भिष्मपितामह दादाभाई नौरोजी यांना आम्ही दोघेही भेटलो. त्यांच्या माध्यमातून नंतर आम्ही हिंदुस्तान राष्ट्रीय कॉंग्रेसच्या ब्रिटिश समितीला भेटलो. त्यांना आम्ही आमची केस समजावून सांगितली आणि सर्व पक्षांबरोबर राहून काम करण्याची आमची इच्छा असल्याचेही आम्ही त्यांना सांगितले. दादाभाईंनी तर आम्हाला हाच सल्ला दिला होता. अशाच प्रकारे आम्ही मंचरजी भावनगरी यांनाही भेटलो. त्यांनीही आम्हाला बरीच मदत केली. लॉर्ड एल्गिन यांना भेटायला जाणाऱ्या प्रतिनिधीमंडळाचा नेता एखादा तटस्थ आणि विख्यात ऍंग्लो इंडियन असला तर बरे

राहील असा त्या दोघांचाही सल्ला होता. याकरिता सर मंचरजींनी काही नावेही सुचवली होती. त्यात सर लेपेल ग्रिफिथ यांचेही नाव होते. त्या वेळी सर विल्यम हंटर जिवंत नव्हते हे मी वाचकांना सांगायला पाहिजे. त्यांना दक्षिण आफ्रिकेची चांगली कल्पना असल्यामुळे त्यांनीच प्रतिनिधीमंडळाचे नेतृत्व केले असते. अथवा उमराव (लॉर्ड्स) सभेच्या एखाद्या प्रभावशाली महान नेत्याला शोधून त्याला प्रतिनिधीमंडळाचे नेतृत्व दिले असते.

आम्ही दोघेही सर लेपेल ग्रिफिथ यांना भेटलो. हिंदुस्तानात सुरू असलेल्या राजकीय आंदोलनाच्या ते विरोधात होते. परंतु आमच्या या प्रश्नात त्यांनी चांगलाच रस घेतला, आणि त्यांनी केवळ सौजन्य म्हणून नाही तर न्यायाच्या दृष्टीनेच आमच्या कामकाजात भाग घेण्याला मंजुरी दिली. त्यांनी सर्व कागदपत्रे वाचली आणि आमचा प्रश्न चांगल्या प्रकारे समजून घेतला. आम्ही इतर ऍंग्लो इंडियनांनाही भेटलो. ब्रिटिश संसदेच्या सदस्यांना आणि शक्य असेल अशा महत्त्वाच्या व्यक्तींनाही आम्ही भेटलो. आमच्या प्रतिनिधीमंडळाने लॉर्ड एल्गिन यांची भेट घेतली. त्यांनी आमचे सर्व म्हणणे लक्षपूर्वक ऐकून घेतले, आपली सहानुभूती व्यक्त केली आणि आपल्या अडचणीही सांगितल्या, आणि त्याचबरोबर माझ्याकडून जे काही करणे शक्य असेल ते मी करीन असे आश्वासनही दिले. हे प्रतिनिधीमंडळ लॉर्ड मोर्ले यांनाही भेटले. त्यांनीसुद्धा आमच्या प्रकरणाबद्दल सहानुभूती व्यक्त केली. त्यांच्या उद्गाराचा सार मी वर दिलेलाच आहे. सर विल्यम वेडरबर्न यांच्या प्रयत्नांमुळे हिंदुस्तानच्या राजकीय कारभाराशी संबंध असलेल्या ब्रिटिश लोकसभेच्या सदस्यांची एक सभा लोकसभेच्या दिवाणखान्यात झाली. त्यांच्यासमोरही आम्ही आमच्या समस्या यथाशक्ती मांडल्या. त्या वेळी आयरिश पक्षाचे पुढारी श्री रेडमंड होते. यामुळे आम्ही त्यांना विशेषेकरून भेटायला गेलो. थोडक्यात सांगायचे तर लोकसभेतील वेगवेगळया पक्षाच्या ज्या ज्या लोकांना आम्हाला भटणे शक्य होते त्या सर्वांना आम्ही भेटलो. हिंदुस्तान राष्ट्रीय कॉंग्रेसच्या ब्रिटिश समितीची तर आम्हाला मदत होत असायचीच. परंतु तेथील रितीरिवाजाप्रमाणे तिच्यात विशिष्ट पक्षाचे विशिष्ट लोकच सहभागी होत असत. तिच्यात सहभागी न होणारे अनेक लोकही असे होते की ज्यांची आम्हाला मदत होत होती. या सर्वांना एका ठिकाणी एकत्र आणून कामाला लावता आले तर अधिक चांगले काम होऊ शकेल असे आम्हाला वाटले. यामुळे एक

स्थायी समिती निर्माण करण्याचा आम्ही निर्णय घेतला. आमचा हा विचार सर्व पक्षातील लोकांना आवडला. प्रत्येक सभेची भिस्त ही त्या पक्षाच्या चिटणिसावर अवलंबून असते. चिटणिस असा असला पाहिजे की त्याचा त्या संस्थेच्या ध्येयावर आणि उद्दिष्टांवर तर पूर्ण विश्वास असलाच पाहिजे शिवाय त्याच्यात संस्थेच्या कामाकरिता पूर्ण वेळ देण्याची शक्ती आणि पात्रता असली पाहिजे.श्री एल. डब्ल्यू रिच यांच्यामध्ये हे सर्व गुण होते. ते दक्षिण आफ्रिकेतील होते आणि त्यांनी माझ्या ऑफिसमध्ये कामही केलेले होते. या वेळी लंडनमध्ये ते बॅरिस्टरीचे शिक्षण घेत होते. शिवाय हे काम करण्याची त्यांची इच्छासुद्धा होती. यामुळे “साऊथ आफ्रिका ब्रिटिश इंडिया समिती” तयार करण्याचे धाष्ट्र्य आम्ही केले.

प्रत्येक शुभ कार्याची सुरुवात जेवणावळीने करावी अशी इंग्लंड आणि अनेक पाश्चात्य देशांमध्ये प्रथा आहे. माझ्या मते ती चूक आहे. इंग्लंडचे प्रधानमंत्री मॅन्शन हाऊस नावाच्या व्यापाराच्या एका महान केंद्रामधून दरवर्षी ९ नोव्हेंबरला सर्व जगाचे लक्ष वेधले जाईल असे भाषण करत असतात. त्या भाषणातून ते आपला वार्षिक कार्यक्रम आणि भविष्याविषयीचा आपला अंदाज सांगत असतात. लंडनच्या लॉर्ड मेयरकडून मंत्रिमंडळाला आणि इतरांना त्या वेळच्या भोजनाचे निमंत्रण दिले जात असते. जेवणानंतर दारूच्या बाटल्या उघडल्या जातात आणि यजमान आणि निमंत्रितांचे आरोग्य चिंतत मद्यपान केले जात असते. आणि ज्या वेळी हे शुभ वा अशुभ (आपापल्या दृष्टीने) काम सुरू असते त्याच वेळी भाषणेही सुरू असतात. त्यातच ब्रिटिश सम्राटाच्या मंत्रिमंडळाचा टोस्टचाही (आरोग्यासंबंधी शुभचिंतन) समावेश करण्यात येत असतो. या टोस्टच्या प्रत्युत्तरार्थ प्रधानमंत्र्याचे वर सांगितलेले महत्त्वाचे भाषण होत असते. ज्याप्रमाणे सार्वजनिक चर्चेकरिता भोजनाचे निमंत्रण देण्याची तिथे प्रथा आहे त्याचप्रमाणे वैयक्तिक वा खाजगी चर्चा करायची असली तर त्याकरिताही जेवणाचे निमंत्रण देण्याची तिथे प्रथा आहे. आणि केव्हा केव्हा तर जेवण सुरू असतानासुद्धा अथवा जेवण झाल्यानंतर चर्चेच्या मुख्य मुद्द्याची सुरुवात होत असते. आम्हालासुद्धा या प्रथेनुसार एकदाच नाही तर अनेकदा वागावे लागले होते. परंतु आमच्यापैकी कोणीही अखाद्य वा अपेय वस्तुचे सेवन केले असा याचा अर्थ वाचकांनी करू नये. या प्रथेनुसार एका दिवशी आम्ही दुपारच्या जेवणाची जवळपास शंभर निमंत्रणे पाठवली

असावी. या जेवणाचा हेतू आभार प्रदर्शन, सर्वांचा निरोप घेणे आणि समितीची स्थापना करणे हा होता. या भोजनसमारंभातही जेवणानंतर प्रथेनुसार भाषणे झाली आणि स्थायी समितीची स्थापनाही झाली. या कार्यक्रमामुळे आमच्या आंदोलनाला अधिक प्रसिद्धी मिळाली.

अशा प्रकारे जवळपास सात आठवड्यांचा काळ इंग्लंडमध्ये घालवून आम्ही दक्षिण आफ्रिकेत परतलो. मदिरा येथे पोहोचल्यानंतर आम्हाला रिच यांची तार मिळाली - "ट्रान्सवालचा आशियाविषयक कायदा रद्द करावा अशी शिफारस ब्रिटिश मंत्रिमंडळाने सम्राटांकडे केली असल्याची घोषणा लॉर्ड एल्गिन यांनी केली आहे." आमच्या हर्षाला पारावार उरला नाही. मदिरा येथून कोपटाऊनला पोहोचण्याकरिता १४-१५ दिवस लागतात. हे दिवस आम्ही अतिशय आनंदात घालवले आणि समाजाची इतर दुःखे दूर करण्याविषयी शेखचिल्लीप्रमाणे आम्ही स्वप्ने पाहू लागलो. परंतु दैवगती काही वेगळीच होती. आमच्या या स्वप्नांचा कसा चुराडा झाला हे आपण पुढील प्रकरणात पाहणार आहो.

परंतु हे प्रकरण पूर्ण करण्यापूर्वी एकदोन पवित्र आठवणी मी सांगितल्या पाहिजे. इतके मी सांगितलेच पाहिजे की इंग्लंडमध्ये आम्ही एक क्षणही वाया घालवला नाही. मोठ्या संख्येत परिपत्रके पाठवण्याचे काम एका हाताने होऊ शकत नसल्यामुळे बाहेरची मदत घेणे आमच्याकरिता आवश्यक होते. पैसे खर्च करून अशी मदत भरपूर मिळू शकत होती. परंतु माझ्या चाळीस वर्षांच्या अनुभवाने मी सांगू शकतो की स्वयंसेवकांच्या शुद्ध मदतीशिवाय अशी मदत फळू शकत नाही. भाग्य की अशी शुद्ध मदत आम्हाला मिळू शकली. इथे शिकणारे किती तरी हिंदुस्तानी तरुण आमच्या अवतिभवती असायचे आणि त्यांच्यातील किती तरी तरुण बक्षिसाची वा नावाची अपेक्षा न करता आम्हाला मदत करायचे. तिकिटे चिकटवण्याचे, पत्रपेटीत पत्र टाकण्याचे असे कोणतेही काम आपल्या प्रतिष्ठेनुरूप नाही असे म्हणून स्वयंसेवकांनी ते करायला नाकारल्याचा एकही प्रसंग मला आठवत नाही. परंतु या सर्वांवर ताण करणारा एक इंग्रज मित्र सिमंड्स होता. सर्वात आधी मी त्याला दक्षिण आफ्रिकेत भेटलो होतो आणि तो हिंदुस्तानात राहिलेला होता. इंग्रजीत एक म्हण आहे, "जो देवाला प्रिय असतो त्याला देव लवकर बोलावून

घेतो.” या परदु:खभंजक तरुणालाही यमदूत ऐन तारुण्यात घेऊन गेला होता. परदु:खभंजक या विशेषणाकरिता एक कारण आहे. हा सज्जन तरुण जेव्हा मुंबईत होता त्या वेळी म्हणजे १८८७ साली प्लेगच्या रोग्यांमध्ये न घाबरता हिंडतफिरत असे आणि मदत करत असे. संसर्गजन्य रुग्णांची मदत करत असताना त्याला मरणाची किंचितही भीती वाटत नसे. त्याच्यात वंशद्वेषाचा वा वर्णद्वेषाचा लवलेषही नव्हता. अत्यंत स्वतंत्र वृत्तीचा तो माणूस होता. सत्य नेहमी अल्पसंख्याकांच्या बाजूनेच असते या तत्त्वावर त्याचा विश्वास होता. या सिद्धांतामुळे जोहानिसबर्गमध्ये तो माझ्याकडे ओढला गेला होता. अनेकदा विनोदात तो मला म्हणाला होता की बहुमताच्या हाती सत्यसुद्धा असत्याचे रूप घेत असल्यामुळे तुमचा पक्ष मोठा झाला तर तुमच्याी माझे मुळीच पटणार नाही हे तुम्ही लक्षात ठेवा. त्याचे वाचन फार विस्तृत होते. जोहानिसबर्गचे एक करोडपती लॉर्ड फेरर यांचा तो विश्वसनीय स्वीयसचिव होता. लघुलेखनात तो निष्णात होता. आम्ही इंग्लंडमध्ये असताना तो अचानक येऊन धडकला होता. त्याच्या मुक्कामाच्या ठिकाणाची मला काहीही कल्पना नव्हती. परंतु आम्ही सार्वजनिक काम करणारे लोक असल्यामुळे वर्तमानपत्रांमधून आमची जाहीरात झालेली होती. त्याआधारे सिमंड्सने आम्हाला शोधून काढले आणि त्याने आम्हाला यथाशक्ती मदत करण्याची तयारी दाखवली. तो म्हणाला, “तुम्ही मला चपराश्याचे जरी काम दिले तरी मी तेसुद्धा करीन. आणि तुम्हाला लघुलिपिकाची गरज असेल तर माझ्यासारखा लघुलिपिक तुम्हाला शोधून सापडू शकणार नाही हे तर तुम्हाला माहीतच आहे.” आम्हाला दोन्ही प्रकारच्या मदतीची गरज होती. आणि या तरुण इंग्रजाने रात्रंदिवस आमच्याकरिता भरपूर मेहनत केली असे जर मी म्हणालो तर त्यात मुळीच अतिशयोक्ती होणार नाही. रात्रीच्या बाराएक वाजेपर्यंत तो टाईप करत असायचा. निरोप घेऊन जाण्याचे आणि पोस्टात पत्र टाकण्याचे कामही तोच करत असे. त्याची मासिक कमाई जवळपास ४५ पौंड होती हे मला माहीत होते. परंतु तो सर्व पैसा तो मित्रांच्या मदतीकरिता खर्च करून टाकत असे आणि हे सर्व तो हसतहसत करत असे. त्या वेळी त्याचे वय ३० वर्ष असावे. परंतु त्या वेळी तो अविवाहित होता आणि आयुष्यभर अविवाहित राहण्याची त्याची इच्छा होती. पारिश्रमिक म्हणून काही पैसे घेण्याचा मी त्याला आग्रह केला परंतु त्याने स्पष्ट शब्दात नकार दिला. तो

म्हणाला होता, “मी जर या सेवेचा पैसा घेतला तर मी धर्मभ्रष्ट होईन.” मला आठवते की अखेरच्या रात्री सामानाची बांधाबांध करताना व सर्व कामाचा निपटारा करत असताना रात्रीचे तीन वाजले होते. सिमंड्ससुद्धा आमच्याबरोबर तीन वाजेपर्यंत जागा होता. दुसऱ्या दिवशी आम्हाला जहाजात बसवल्यानंतर त्याने आमचा निरोप घेतला होता. तो वियोग अतिशय दुःखद होता. परोपकारावर केवळ गव्हाळी रंगाच्या लोकांचाच अधिकार नाही हा अनुभव मला अनेकदा आला आहे.

सार्वजनिक कार्य करणाऱ्या तरुणांच्या हिताकरिता मी इथे हेही सांगितले पाहिजे की प्रतिनिधीमंडळाच्या खर्चाचा हिशोब ठेवण्याचे काम आम्ही इतके काटेकोरपणे करत होतो की जहाजावर सोडावाटरची बाटली जरी आम्ही विकत घेतली असेल व तिची पावती मिळाली असेल तर तीसुद्धा आम्ही जपून ठेवत असू. अशाच प्रकारे तारांच्या पावत्यासुद्धा आम्ही सांभाळून ठेवल्या होत्या. तपशीलवार लिहिलेल्या खर्चात इतर खर्चाची एकही नोंद केली असल्याचे मला आठवत नाही. अशा प्रकारचे कोणतेही खाते आम्ही आमच्या हिशोबाच्या वहीत ठेवलेच नव्हते. ‘आठवत नाही’ असे म्हणण्याचे कारण इतकेच की दिवसाच्या अखेरीस दोनचार शिलिंगचा खर्च आठवत नसल्यामुळे कदाचित आम्ही तशी नोंद केलेली असूसुद्धा शकेल. यामुळे अपवाद म्हणून मी ‘आठवत नाही’ शब्दाचा प्रयोग केला आहे.

या जीवनात एक गोष्ट मला स्पष्टपणे कळली आहे. जेव्हापासून आपण सज्ञान होतो तेव्हापासूनच आपण विश्वस्त वा जबाबदार माणूस होतो. जोपर्यंत आईवडिलांसोबत राहतो तोपर्यंत आपण त्यांना त्यांच्या पैशाचा हिशोब दिलाच पाहिजे. आपल्यावर विश्वास ठेवून त्यांनी आपल्याला हिशोब मागितला नाही इतक्या कारणामुळे आपली जबाबदारीतून सुटका होत नाही. जेव्हा आपण स्वतंत्र गृहस्थ होतो तेव्हा आपल्यावर पत्नी आणि मुलांची जबाबदारी येते. आपल्या कमाईचे आपण एकटेच मालक नसतो. आपल्या कुटुंबातील लोकांचाही तिच्यावर हक्क असतो. त्यांच्याकरिता आपण पैपैचा हिशोब ठेवला पाहिजे. असे असताना सार्वजनिक जीवनाबद्दल काय सांगावे? माझ्या लक्षात आले आहे की स्वयंसेवकांना एक सवय जडत असते. त्यांना असे वाटत

असते की आपल्यावर कधीही कोणालाही अविश्वास करण्याचा अधिकार नसल्यामुळे आपल्यावर जे काम सोपवण्यात येते वा जो पैसा आपल्या हाती देण्यात येतो त्याचा हिशोब देण्याकरिता आपण कोणालाही बांधलेलो नाही. ही गोष्ट अडाणीपणाची परिसीमाच म्हणावी लागेल. हिशोब ठेवण्याच्या गोष्टीचा विश्वासाशी वा अविश्वासाशी कोणताही संबंध नाही. हिशोब ठेवणे हे सुद्धा स्वतंत्र कर्तव्य आहे. त्याशिवाय आपले काम अशुद्ध अथवा मलीन आहे असे आपण समजायला पाहिजे. आणि ज्या संस्थेचे आपण स्वयंसेवक असतो त्या संस्थेच्या नेत्याच्या अथवा प्रमुख कार्यकर्त्याच्या खोट्या शिष्टाचाराच्या कल्पनेमुळे वा भीतीमुळे ते नेते आपल्याला आपल्यावर सोपवलेल्या कामाचा वा आपल्याला दिलेल्या पैशाचा हिशोब मागत नसतील तर तेसुद्धा तितकेच दोषी ठरतील. कामाचा वा पैशाचा हिशोब ठेवण्याची जबाबदारी जितकी पगारी सेवकावर असते त्यापेक्षा किती तरी अधिक जबाबदारी स्वयंसेवकाची असते कारण त्याने ते काम स्वतःचेच मानलेले असते. ही फार महत्त्वाची गोष्ट आहे, परंतु मला माहीत आहे की अनेक संस्थांमध्ये याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. यामुळेच या गोष्टीला या प्रकरणात इतकी जागा देण्याचे धैर्य मी केले आहे.

# १५. कूटनिति की क्षणिक आनंद

केप टाऊन येथे जहाजातून उतरल्यानंतर आणि त्यानंतर जोहानिसबर्ग येथे पोहोचल्यानंतर आमच्या लक्षात आले की मदिरेत आम्हाला मिळालेली तार आम्हाला जितकी महत्त्वाची वाटली होती तितकी ती महत्त्वाची नव्हती. तार पाठवण्यात श्री रिच यांची काहीही चूक नव्हती. आशियायी कायद्यासंबंधी त्यांनी जे काही एकले होते तेच त्यांनी तारेतून कळवले होते. आम्ही आधीच सांगितले आहे की - अर्थात १९०६ साली - ट्रान्सवाल साम्राज्याची एक वसाहत होती. अशा वसाहतींचे राजदूत आपापल्या वसाहतीची माहिती वसाहतमंत्र्याला देण्याकरिता नेहमी इंग्लंडमध्येच राहत असत. ट्रान्सवालचे राजदूत रिचर्ड सॉलोमन होते. ते दक्षिण आफ्रिकेतील एक प्रसिद्ध वकील होते. लॉर्ड एल्गिन यांनी खुनी कायदा फेटाळण्याचा निर्णय रिचर्ड सॉलोमन यांच्याशी विचारविनिमय करूनच घेतला होता. १ जानेवारी १९०७ पासून ट्रान्सवालला जबाबदार शासनपद्धतीचे अधिकार मिळणार होते. यामुळे लॉर्ड एल्गिन यांनी रिचर्ड सॉलोमन यांना आश्वासत सांगितले की “जबाबदार शासनपद्धतीचे अधिकार मिळाल्यानंतर हाच कायदा ट्रान्सवालचे विधिमंडळ मंजूर करणार असेल तर साम्राज्य सरकार हा कायदा नामंजूर करणार नाही. परंतु जोपर्यंत ट्रान्सवाल साम्राज्याची वसाहत असेल तोपर्यंत रंगभेद करणाऱ्या अशा कायद्यांकरिता साम्राज्य सरकार जबाबदार धरले जाईल आणि साम्राज्य सरकारच्या घटनेत रंगभेदाला स्थान नाही. यामुळे या तत्त्वाचे पालन करण्याकरिता सध्या तरी हा कायदा फेटाळण्याचाच सल्ला मला सम्राटांना द्यावा लागेल.”

अशा प्रकारे केवळ नावाकरिता खुनी कायदा रद्द होणार असेल आणि त्याचबरोबर ट्रान्सवालमधील गोऱ्यांचे कामही भागणार असेल तर त्याकरिता रिचर्ड सॉलोमन यांचा कोणता आक्षेप असू शकत होते? या कूटनीतीला मी ”वाकडी नीती” म्हणतो. परंतु खरे सांगायचे तर याकरिता याहून तीक्ष्ण शब्दाचा जरी उपयोग केला तरी या नीतीच्या प्रवर्तकावर काही अन्याय होईल असे म्हणता येणार नाही याची मला खात्री आहे. साम्राज्याच्या वसाहतीकरिता साम्राज्य सरकार सरळ जबाबदार असते. त्यांच्या घटनेत रंगभेद आणि जातिभेद यांना कोणतेही स्थान

नाही. या दोन्ही गोष्टी अतिशय चांगल्या आहेत. जबाबदार शासनपद्धतीचे अधिकार असणाऱ्या शासनव्यवस्थेने तयार केलेले कायदे साम्राज्य सरकार एकाएकी रद्द करू शकत नाही ही गोष्ट समजण्यासारखी आहे. परंतु वसाहतीच्या राजदुताबरोबर गुप्त चर्चा करणे, आणि त्यांना साम्राज्य सरकारच्या घटनेच्या भावनाविरोधी कायदा रद्द करण्याचे आधीच आश्वासन देऊन ठेवणे याला या गोष्टीमुळे ज्या लोकांचे अधिकार हिरावून घेतले जाणार होते त्या लोकांची फसवणूक करणे असे म्हणता येणार नाही काय? खरे सांगायचे तर लॉर्ड एल्गिन यांनी अशा प्रकारचे आश्वासन देऊन ट्रान्सवालमधील हिंदुस्तानींच्या विरोधात आपले आंदोलन सुरू ठेवण्याकरिता तेथील गोऱ्यांना प्रोत्साहनच दिले होते. जर असेच करायचे होते तर त्यांनी तसे हिंदुस्तानी प्रतिनिधीमंडळाला सरळ सरळ सांगायला पाहिजे होते. खरे पाहता जबाबदार शासनपद्धतीच्या शासनाकरिताही ब्रिटिश साम्राज्य सरकारच जबाबदार असते. ब्रिटिश घटनेची मूलभूत तत्त्वे जबाबदार शासनपद्धती असलेल्या वसाहतींनासद्धा मान्य करावी लागत असतात. उदाहरणार्थ जबाबदार शासन असलेली कोणतीही वसाहत आपल्या वसाहतीत कायद्याने बंद करण्यात आलेली गुलामगिरी पुनरुज्जिवित  करू शकत नाही. खुनी कायदा अनुचित आहे या कारणाने जर लॉर्ड एल्गिन यांनी तो रद्द केला असेल - असे समजूनच ते तो कायदा रद्द करू शकत होते - तर सर रिचर्ड सॉलोमन यांना बोलावून त्यांना खाजगीत पुढीलप्रमाणे स्पष्टपणे सांगायला पाहिजे होते - "जबाबदार शासन मिळाल्यानंतरही ट्रान्सवाल सरकारला अशा प्रकारचा कायदा करता येणार नही, आणि असा कायदा करणारच असाल तर ट्रान्सवालला जबाबदार शासनपद्धती सोपवायची की नाही याचा साम्राज्य सरकारला फेरविचार करावा लागेल आणि ट्रान्सवाल सरकारला असा कायदा करायचाच असेल तर हिंदुस्तानींचे अधिकार पुर्णपणे सुरक्षित ठेवूनच असा कायदा करता येईल." असे न करता लॉर्ड एल्गिन यांनी हिंदुस्तानींची बाजू घेण्याचे ढोंग केले आणि आतून ट्रान्सवाल सरकारची बाजू घेतली आणि जो कायदा त्यांनी स्वतःच रद्द केला होता तो कायदा परत मंजूर करण्याचा सल्ला त्यांनी ट्रान्सवाल सरकारला दिला. अशा वाकड्या कूटनीतीचे राजकारणातील हे पहिलेच उदाहरण नाही. ब्रिटिश साम्राज्याचा सामान्य अभ्यासकसुद्धा अशी उदाहरणे केवळ आठवणीच्या बळावर सांगू शकेल.

यामुळे जोहानिसबर्गमध्ये आम्ही एकच गोष्ट ऐकत होतो - "लॉर्ड एल्गिन आणि साम्राज्य सरकारने आम्हाला धोका दिला." मदिरेला आम्हाला जितका आनंद झाला तितकीच आमची निराशा दक्षिण आफ्रिकेत पोहचल्यानंतर झाली होती. परंतु या वाकडेपणामुळे हिंदुस्तानींचा उत्साह उलट दुप्पट झाला. सर्व लोक म्हणू लागले, "आता आम्ही काळजी कशाला करायची? आम्हाला कुठे आता साम्राज्य सरकारच्या बळावर लढायचे आहे? आम्हाला तर आमच्या आणि ज्याच्या नावाने आम्ही शपथ घेतली त्याच्या बळावर लढायचे आहे. आणि आम्ही जर खरे असू तर वाकडी नीतीसुद्धा सरळ होईल."

ट्रान्सवालमध्ये जबाबदार सरकार स्थापन झाले. नवीन विधिमंडळातील पहिले विधेयक अर्थसंकल्पासंबंधी होते. आणि दुसरे विधेयक खुनी कायद्यासंबंधी म्हणजे आशियायी लोकांसंबंधी. एकदोन शब्दांचा बदल वगळता ते विधेयक पुर्वीसारखेच होते, व ते तसेच मंजूर करण्यात आले होते. विधेयकाच्या एका कलमात तारीख देण्यात आली होती. ती बदलवणे तर भागच होते. यामुळे केवळ त्या तारखेत बदल करण्यात आला आणि २५ मार्च १९०७च्या बैठकीत ते विधेयक मंजूर करण्यात आले. या शाब्दिक परिवर्तनाशी कायद्याच्या कठोरपणाशी काहीही संबंध नव्हता. तो कायदा तर पूर्वीप्रमाणेच होता. यामुळे कायदा नामंजूर होण्याची घटना स्वप्नवत ठरली. हिंदुस्तानी समाजाने अर्जविनंत्या करण्याचे काम पार पाडले खरे परंतु त्यांच्या पिपाणीचा आवाज कोण ऐकणार होता? हा कायदा अंमलात येत असल्याची आणि ३१ जुलैआधी हिंदुस्तानींनी अर्ज करावा अशी घोषणा १ जुलै १९०७ला करण्यात आली. हिंदुस्तानी समाजावर उपकार करण्याकरिता काही हा मध्यंतरीचा इतक्या दिवसांचा कालावधी ठेवण्यात आला नव्हता. याचे कारण वेगळेच होते. या कायद्याकरिता नियमाप्रमाणे साम्राज्य सरकारच्या मंजुरीची आवश्यकता होती. याकरिता काही वेळ तर लागणार, होता. यामुळे ट्रान्सवाल सरकारने कायद्याची अंलबजावणी करण्याकरिता सोयीचे व्हावे म्हणून हा ४-५ महिन्याचा अवधी घेतला होता.

# १६. अहमद मुहमद काछलिया

आमचे प्रतिनिधामंडळ जेव्हा इंग्लंडला जात होते तेव्हा दक्षिण आफ्रिकेत राहत असलेल्या एका इंग्रज यात्रेकरूने माझ्या तोंडून इंग्लंडला जाण्याचे कारण खुनी कायदा आहे असे ऐकले होते. तेव्हा तो एकदम म्हणाला, “तर तुम्ही कुत्र्याचा पट्टा गळ्यात अडकवून घ्यायला मनाई करत आहा!” त्या इंग्रजाने ट्रान्सवालच्या परवान्याची तुलना कुत्र्याच्या पट्ट्याशी केली होती. त्याने हे शब्द पट्ट्याबद्दलचा आनंद आणि हिंदुस्तानींबद्दलचा तिरस्कार म्हणून वापरले होते की हिंदुस्तानींबद्दल सहानुभूती व्यक्त करण्याकरिता वापरले होते याचा निर्णय ना मी त्या वेळी करू शकलो होतो ना त्या घटनेचा उल्लेख करताना या वेळी करू शकतो. कोणत्याही माणसाच्या शब्दांचा अर्थ आपण अशा प्रकारे करता कामा नये की त्या माणसावर आपल्याकडून अन्याय होईल. या सुविचारानुसार वागत मी असे समजतो की त्या इंग्रजाने आपली सहानुभूती व्यक्त करण्याकरिता व वस्तुस्थितीचे चित्रण करण्याकरिता ते शब्द उच्चारले होते. एकीकडे ट्रान्सवाल सरकार हिंदुस्तानींच्या गळ्यात हा पट्टा अडकवण्याची तयारी करत होते तर दुसरीकडे काहीही झाले तरी हा पट्टा गळ्यात अडकवू द्यायचा नाही या निश्चयावर अढळ राहायचे आणि ट्रान्सवाल सरकारच्या वाकड्या नीतीशी कसा लढा द्यायचा याचा विचार ट्रान्सवालमधील हिंदुस्तानी समाज करत होता. इंग्लंड आणि हिंदुस्तानमधील मित्रांना पत्रे लिहिण्याचे काम सुरूच होते. परंतु सत्याग्रहाचा लढा बाह्य औपचारिकतेवर फार कमी आधारित असतो. सत्याग्रहाच्या लढ्यात आंतरिक उपचारच रामबाण उपायाप्रमाणे उपयोगी सिद्ध होत असतात. यामुळे समाजाचे सर्व अवयव ताजे आणि सक्रिय राहावे म्हणून उपाययोजना शोधण्यातच समजाच्या नेत्यांचा वेळ जात होता.

सत्याग्रहाच्या आंदोलनाकरिता कोणत्या संघटनेचा उपयोग करावा असा प्रश्न समाजासमोर उभा राहिला. ट्रान्सवाल ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या सदस्यांची संख्या सगळ्यात जास्त होती. तिच्या स्थापनेच्या वेळी सत्याग्रहाचा जन्मसुद्धा झालेला नव्हता. त्या संघटनेला एका नाही तर अनेक कायद्यांविरुद्ध लढा द्यावा लागला होता, आणि पुढेही द्यावा

लागणार होता. कायद्याच्या विरोधात झगडण्याशिवाय तिला सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांमधील विविध कामे पार पाडावी लागायची. याशिवाय त्या संघटनेच्या सर्व सदस्यांनी खुनी कायद्याला विरोध करण्याची प्रतिज्ञासुद्धा घेतलेली नव्हती. त्याचबरोबर त्या संघटनेसंबंधी बाहेरील धोक्याचाही आम्हाला विचार करावा लागत होता. सत्याग्रहाचा लढा राजद्रोह आहे असे ट्रान्सवाल सरकारने घोषित केले तर? अशा परिस्थितीत सत्याग्रहात नसलेल्या, परंतु त्या संस्थेत काम करत असलेल्या सदस्यांचे काय होईल? सत्याग्रह सुरू होण्यापूर्वी ज्या लोकांनी त्या संस्थेला पैसा दिला होता त्या पैशाचे काय होईल? या सर्व गोष्टींचा विचार करणे जरुरीचे होते. अखेरीस जे लोक अश्रद्धेमुळे, शक्ती नसल्यामुळे अथवा इतर कोणत्याही कारणामुळे जरी सत्याग्रहात सामील होऊ शकत नसतील तरी त्यांच्याबद्दलची कोणतीही द्वेषभावना न ठेवता पूर्वीप्रमाणेच त्यांच्याशी प्रेमाने वागणे सुरू ठेवायचे, त्यात कोणत्याही प्रकारे अंतर पडू द्यायचे नाही आणि सत्याग्रह सोडून इतर कामांमध्ये त्याच्या खांद्याला खांदा लावून काम करायचे असा दृढ निर्धार सत्याग्रहींनी केलेला होता.

या सर्व प्रश्नांवर विचारविनिमय केल्यानंतर सध्याच्या कोणत्याही संघटनेच्या नावावर सत्याग्रह आंदोलन चालवू नये असा निर्णय संपूर्ण समाजाने घेतला. इतर संस्थांनी सत्याग्रहाला यथाशक्ती पाठिंबा द्यावा आणि सत्याग्रहाशिवाय शक्य असेल त्या इतर मार्गांनी विरोध करावा असेही ठरले. यामुळे सत्याग्रहींनी ‘पॅसिव्ह रेझिस्टन्स असोसिएशन’ची वा ‘सत्याग्रही मंडळ’ची स्थापना केली. या इंग्रजी नावावरून वाचकांच्या लक्षात येईल की ज्या वेळी हे मंडळ अस्तित्वात आले त्या वेळी सत्याग्रह या नावाचा शोध लागलेला नव्हता. जसजसा काळ जाऊ लागला तसतसे लक्षात येऊ लागले की या नवीन मंडळाच्या स्थापनेमुळे हिंदुस्तानी समाजाचा लाभच झाला होता, आणि तसे करण्यात आले नसते तर सत्याग्रह आंदोलनाचे कदाचित नुकसानच झाले असते. या नवीन संघटनेचेही लोक मोठ्या संख्येत सदस्य झाले आणि समाजाने मोठ्या मनाने त्याला पैसाही दिला. पैशाच्या अभावी कोणतेही आंदोलन केव्हाही कोलमडून पडू शकत नाही अथवा त्याचे कामही थांबू शकत नाही वा ते कधी निस्तेज होऊ शकत नाही हे मला अनुभवाने शिकवले आहे. याचा अर्थ असा नाही की जगातील कोणतेही आंदोलन पैशाशिवाय चालू शकते. परंतु इतके मात्र

नक्कीच खरे आहे की ज्या आंदोलनाचे संचालक खरे आणि प्रामाणिक असतात त्यांच्याकरिता पैसा आपोआप चालून येतो. याउलट मला असाही अनुभव आला आहे की जेव्हा एखाद्या आंदोलनावर पैशाचा पूर येतो तेव्हा त्या आंदोलनाची अधोगती सुरू होते. यामुळे मी एकच सिद्धांत तयार केला आहे. तो असा - कोणत्याही सार्वजनिक संस्थेने भांडवल गोळा करून त्याच्या व्याजावर संस्था चालवणे पाप आहे असे म्हणण्याचा मला धीर होत नसला तरी इतके तर मी निश्चितच म्हणेन की असे करणे अनुचित आहे. सार्वजनिक संस्थेचे भाडवल जनताच असते. जनतेची जोपर्यंत इच्छा असेल तोपर्यंत अशी संस्था चालली पाहिजे. भांडवल गोळा करून त्याच्या व्याजावर चालणारी संस्था सार्वजनिक राहत नाही. व्याजावर चालणाऱ्या अनेक धार्मिक वा सामाजिक संस्थांमध्ये किती घाण भरलेली आहे त्याची चर्चा करण्याचे हे ठिकाण नाही. ही तर जवळपास स्वयंसिद्ध गोष्ट आहे.

परंतु आपण आपल्या मूळ विषयाकडे परत वळू या. लहानसहान फाटे फोडण्याचा आणि छिद्रान्वेषण करण्याचा एकाधिकार काही केवळ वकिलांचाच आणि इंग्रजी शिक्षण घेतलेल्यांचाच नाही. दक्षिण आफ्रिकेतील अडाणी आणि अशिक्षित लोकसुद्धा अतिशय बारिकसारिक शंका उपस्थित करू शकत असत हे मी पाहिलेले आहे. काही लोकांचा युक्तिवाद होता की पहिल्यांदा तयार करण्यात आलेला खुनी कायदा आम्ही नाकारलेला असल्यामुळे यहुदी लोकांच्या नाट्यगृहात आम्ही केलेली प्रतिज्ञा पूर्ण झालेली आहे. जे लोक प्रतिज्ञेसंबंधात कमजोर वा शिथिल झालेले होते त्यांनी या युक्तिवादाचा आधार घेतला. या युक्तिवादात काहीच तथ्य नव्हते असे तर म्हणता येऊ शकत नाही. परंतु जे लोक खुनी कायद्याला केवळ कायदा म्हणून विरोध करत नव्हते तर त्या कायद्यामागे दडलेल्या गुप्त तत्त्वाला विरोध करत होते त्यांच्यावर या युक्तिवादाचा काहीही परिणाम झाला नाही. असे असतानाही केवळ सुरक्षिततेचा उपाय म्हणून, समाजात अधिक जागृती यावी म्हणून आणि लोकांमध्ये जर दुबळेपणा आला असेल तर तो किती प्रमाणात आहे हे कळावे म्हणून परत एकदा प्रतिज्ञा घ्यायला लावणे आवश्यक आहे असे मला वाटले. यामुळे ठीकठिकाणी सभा घेऊन लोकांना परिस्थिती समजावून सांगण्यात आली आणि परत प्रतिज्ञा

घ्यायला लावण्यात आल्या. लोकांच्या उत्साहात काही उणीव निर्माण झाल्याचे कुठेही आढळले नाही.

इतक्यात जुलै महिन्याचा शेवट जवळ येऊ लागला होता. जुलैच्या अखेरच्या तारखेला ट्रान्सवालच्या राजधानीत म्हणजे प्रिटोरियात हिंदुस्तानींची एक विशाल सभा घेण्याचा आम्ही निर्णय घेतला. इतर शहरांमधील प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले होते. प्रिटोरिया येथील मशिदीसमोरील मोकळ्या मैदानात सभा आयोजित करण्यात आली होती. सत्याग्रह सुरू झाल्यानंतर लोक इतक्या मोठ्या संख्येत सभांना येऊ लागले होते की एखाद्या घरात सभा घेणे शक्य नव्हते. संपूर्ण ट्रान्सवालमध्ये हिंदुस्तानींची संख्या १३,००० पेक्षा जास्त नव्हती. यातून १०,००० लोक तर जोहानिसबर्ग आणि प्रिटोरिया येथेच राहत होते. इतक्या लोकसंख्येतून एखाद्या सभेत ५-६ हजार लोक उपस्थित राहत असतील तर जगाच्या कोणत्याही भागात ही संख्या मोठी आणि समाधानकारक समजली जाईल. सार्वजनिक सत्याग्रहाचा लढा इतर कोणत्याही अटीवर लढला जाऊ शकणार नाही. सत्याग्रहींची स्वतःची शक्तीच ज्या लढ्याचा आधार असतो त्यात जर लढ्यासंबंधीचे सार्वजनिक प्रशिक्षण देण्यात आले नाही तर लढा चालूच शकत नाही. यामुळे इतक्या मोठ्या संख्येत लोक उपस्थित राहिल्याचे आम्हाला आश्चर्य वाटले नाही. पैसा खर्च होऊ नये आणि जागेअभावी लोकांना परत जावे लागू नये म्हणून सार्वजनिक सभा मोकळ्या मैदानातच घ्यावी असा निर्णय आम्ही आधीच घेतलेला होता. इथे या गोष्टीचाही उल्लेख केला पाहिजे की या सर्व सभा अतिशय शांत वातावरणात व्हायच्या. येणारे सर्व काही अतिशय लक्षपूर्वक ऐकायचे. एखादा सभेच्या टोकाला असला आणि त्याला भाषण ऐकू येत नसले तर तो मोठ्याने बोलायला सांगायचा, अशा सभेत खुर्च्यांची व्यवस्था होत नसायची हे वाचकांना वेगळे सांगायची आवश्यकता नसावी. व्यासपिठावर दोनचार खुर्च्या अथवा स्टूल ठेवण्यात येत असत.

प्रिटोरियाच्या या सभेचे अध्यक्ष होते ब्रिटिश इंडिया असोसिएशनचे हंगामी अध्यक्ष युसूफ इस्माईल मिया. खुनी कायद्याप्रमाणे परवाने घेण्याची वेळ येत चालली होती. यामुळे हिंदुस्तानी लोक जसे खूप उत्साहात असूनही चिंताक्रांत होते तसेच जनरल बोथा यांच्याजवळ सर्व शक्ती

असूनही ते चिंताक्रांत होते. एका संपूर्ण समाजाला बळजबरीने नमायला लावणे कुणालाही चांगले वाटू शकत नव्हते. यामुळे बोथांनी सर विल्यम हॉस्किन यांना आम्हाला समजावण्याकरिता पाठवले. हॉस्कीन यांची ओळख मी तेराव्या प्रकरणात करून दिलेली आहे. सभेने त्यांचे हार्दिक स्वागत केले. आपल्या भाषणात ते म्हणाले, "तुम्हा सर्वांना माहीतच आहे की मी तुमचा मित्र आहे. माझी सहानुभूती तुमच्याकडून आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही. माझ्यात शक्ती असती तर मी तुमच्या सगळ्या मागण्या मान्य करायला लावल्या असत्या. परंतु येथील सर्वसाधारण गोऱ्यांबद्दल मी तुम्हाला सावध केले पाहिजेच असे नाही. आज मी तुमच्यासमोर जनरल बोथा यांच्या सांगण्याप्रमाणे आलो आहे. या सभेत येऊन त्यांनी दिलेला निरोप मी तुम्हाला सांगावा असे त्यांनी मला सांगितले आहे. हिंदुस्तानी समाजाबद्दल त्यांच्या मनात आदर आहे. समाजाच्या भावना त्यांना कळतात. परंतु त्यांचे म्हणणे आहे की 'मी लाचार आहे. ट्रान्सवालचे सर्व गोरे अशा कायद्याची मागणी करत आहेत. मला स्वतःलाही अशा कायद्याची आवश्यकता वाटते. हिंदुस्तानी समाजाला ट्रान्सवालची शक्ती माहीत आहे. साम्राज्य सरकारने या कायद्याचे समर्थन केले आहे. हिंदुस्तानींना जे काही करता येणे शक्य होते ते सर्व त्यांनी केले आहे आणि त्यांनी आपली प्रतिष्ठा राखली आहे. परंतु समाजाच्या विरोधाला यश आलेले नसल्यामुळे आणि कायदा मंजूर झालेला असल्यामुळे समाजाने आपली निष्ठा आणि शांतिप्रियता दाखवून दिली पाहिजे. या कायद्याप्रमाणे ज्या काही तरतुदी करण्यात आल्या आहेत त्यात लहानसहान बदल करायचा असेल तर जनरल बोथा तुमचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतील.'" अशा प्रकारे जनरल बोथांचा निरोप सांगितल्यानंतर श्री हॉस्किन म्हणाले, "माझासुद्धा तुम्हाला सल्ला आहे की जनरल बोथांचे म्हणणे तुम्ही मान्य करावे. सरकार या कायद्याबद्दल ठाम आहे हे मला माहीत आहे. त्याला विरोध करण्याचा अर्थ होईल भिंतीवर डोके आपटणे. सरकारला विरोध केल्यामुळे तुमच्या समाजावर विनाकारण दुःख भोगण्याची वेळ येऊ नये आणि तुमचा सर्वनाश होऊ नये अशी माझी इच्छा आहे." या भाषणाचा शब्दशः अनुवाद करून मी तो सभेला सांगितला. माझ्याकडून मी सभेला सावध केले. टाळ्यांच्या कडकडाटात श्री हॉस्किन यांनी सभेचा निरोप घेतला.

आता सभेत हिंदुस्तानींची भाषणे सुरू झाली. या प्रकरणाचा आणि खरे सांगायचे तर इतिहासाच्या खऱ्या नायकाचा परिचय मी आताच करून दिला पाहिजे. सभेत ज्या वक्त्यांची भाषणे झाली त्यात मरहूम अहमद मुहम्मद काछलियाही होते. मी त्यांना माझे अशील आणि दुभाष्या म्हणून ओळखत होतो. अजूनपर्यंत ते सार्वजनिक कार्यात प्रामुख्याने भाग घेत नव्हते. त्यांना इंग्रजीचे कामापुरते ज्ञान होते, परंतु अनुभवाने त्यांनी हे ज्ञान इतके वाढवले होते की ते जेव्हा आपल्या मित्रांना वकिलाकडे घेऊन जायचे तेव्हा ते दुभाष्याचे काम स्वतःच करायचे. परंतु दुभाष्याचे काम हा काही त्यांचा व्यवसाय नव्हता. एक मित्र म्हणूनच ते ते काम करायचे. त्यांचा व्यवसाय आधी कापडाच्या फेरीवाल्याचा होता आणि नंतर आपल्या भावाच्या भागीदारीत ते लहान प्रमाणात व्यापार करू लागले. त्यांचा जन्म सुरत जिल्ह्यात झाला होता आणि ते सुरती मेमन होते. त्या समाजात त्यांची चांगली प्रतिष्ठा होती. त्यांचे गुजरातीचे ज्ञान मर्यादित होते. परंतु अनुभवाने त्यांनी ते भरपूर वाढवले होते. त्यांची बुद्धी इतकी तीक्ष्ण होती की कोणतीही गोष्ट त्यांना सहजपणे कळायची. खटल्यातील अडचणी आपल्या पद्धतीने ते अशा काही सोडवायचे की ते पाहून मी अनेकदा आश्चर्यचकित होत असे. वकिलाबरोबर कायद्यासंबंधी वाद घालण्यातही ते मागे हटत नसत आणि अनेकदा वकिलांनासुद्धा त्यांच्या युक्तिवादावर विचार करावा लागायचा.

शौर्य आणि एकनिष्ठा यांच्याबाबतीत त्यांच्यापुढे जाऊ शकेल असा दक्षिण आफ्रिकेत वा हिंदुस्तानात मला कोणीही आढळला नाही. समाजाच्या हिताकरिता त्यांनी आपले सर्व काही अर्पण करून टाकले होते. जेव्हा केव्हा मी त्यांच्या संपर्कात येत असे तेव्हा ते एकवचनी असल्याचे मला आढळून येत असे. ते कट्टर मुसलमान होते. सुरती मेमन लोकांच्या मशिदीत ते एक विश्वस्तही होते. परंतु त्याचबरोबर हिंदू आणि मुसलमान या दोन्ही वर्गांबद्दल त्यांच्या मनात समभावही होता. धर्मांधतेमुळे वा इतर कोणत्याही अनुचित कारणामुळे त्यांनी मुसलमानांचा पक्ष घेतल्याचा एकही प्रसंग मला आठवत नाही. पूर्णपणे निर्भय आणि निष्पक्ष असल्यामुळे हिंदूंना आणि मुसलमानांना त्यांचे त्यांचे दोष सांगण्यात ते कधीही मागेपुढे पाहत नसत. त्यांचा साधेपणा आणि निगर्वीपणा अनुकरणीय होता. त्यांच्याबरोबरच्या अनेक वर्षांच्या परिचयानंतर मला वाटते की त्यांच्यासारखा दुसरा माणूस हिंदुस्तानला मिळणे दुर्लभ आहे.

प्रिटोरियांच्या सभेत बोलणारांमध्ये हा नरपुंगवही होता. त्यांनी फार लहान भाषण केले. ते म्हणाले, “प्रत्येक हिंदुस्तानीला या खुनी कायद्याची माहिती आहे. आपणा सर्वांना त्याचा अर्थ कळतो. श्री हॉस्किन यांचे भाषण मी लक्षपूर्वक ऐकले. तुम्ही सर्वांनीही ते ऐकले आहे. त्या भाषणाचा माझ्यावर एकच परिणाम झाला. शपथेसंबंधीचा माझा निर्धार अजूनच दृढ झाला. ट्रान्सवाल सरकार किती शक्तिशाली आहे ते आपल्याला माहीत आहे. परंतु या खुनी कायद्याच्या भीतीपेक्षा ते अजून कोणती मोठी भीती आपल्याला दाखवणार आहेत? ते आपल्याला तुरुंगात टाकतील, आपली संपत्ती जप्त करून ती विकून टाकतील, आपल्याला हद्दपार करतील वा फासावर चढवतील. हे सर्व आपण हसतहसत सहन करू शकतो. परंतु हा खुनी कायदा कधीही सहन करू शकत नाही.” हे सर्व बोलता बोलता मुहमद काछलिया फार उत्तेजित झाले होते. त्यांचा चेहरा लाल झाला होता. त्यांच्या गळ्याच्या आणि कपाळावरील रेषा रक्तदाब वाढल्यामुळे फुगल्या होत्या. त्यांचे शरीर कापत होते. आपल्या उजव्या हाताची बोटे गळ्यावरून फिरवत फिरवत त्यांनी केली प्रतिज्ञा केली, “मी खुदाची शपथ घेऊन सांगतो की मी प्राणांची बाजी लावीन, परंतु या खुनी कायद्याला कधीही शरण जाणार नाही. आणि सभेनेही असाच निर्णय घ्यावा अशी माझी इच्छा आहे.” इतके बोलून ते बसले. त्यांनी जेव्हा आपल्या गळ्यावरून उजवी बोटे फिरवली तेव्हा काही लोक हसले होते. मला आठवते की मीही त्यात सामील झालो होतो. जितकी हिंमत काछलियांनी आपल्या शब्दांमधून दाखवली होती तितकीच ते आपल्या कामातून दाखवतील की नाही याबद्दल मला थोडी शंका होती. या शंकेबद्दल मी जेव्हा विचार करतो तेव्हा आणि आताही मला त्याबद्दल लाज वाटते. त्या महान संग्रामात ज्या लोकांनी आपल्या प्रतिज्ञेचे अक्षरशः पालन केले त्या सर्वामध्ये काछलिया सेठ नेहमी पुढे राहायचे. त्यांनी रंग बदलल्याचे मला कधीही आढळले नाही.

त्यांच्या या भाषणाचे सभेने टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. मी जितका काछलिया सेठना ओळखत होतो त्यापेक्षा इतर सदस्य त्यांना किती तरी जास्त ओळखत होते. कारण लक्तरात दबलेल्या या हिऱ्याची त्यांना व्यक्तिगत ओळख होती. त्यांना माहीत होते की काछलिया जे ठरवतो तेच करतो. सभेत इतरांचीही जोरदार भाषणे झाली. मी काछलिया सेठ यांचेच भाषण निवडले कारण ते भाषण काछलिया सेठच्या पुढील कार्याच्या भविष्यवाणीप्रमाणे ठरले. जोरदार भाषण

करणारे अनेक लोक आपल्या प्रतिज्ञेवर टिकू शकले नव्हते. समाजाची सेवा करताकरता या पुरुषसिंहाचा मृत्यू सन १८१८मध्ये म्हणजे सत्याग्रहाची लढाई संपल्यानंतर ४ वर्षांनी झाला. काछलिया सेठची एक आठवण इतर कोणत्याही ठिकाणी देता येणे शक्य होणार नाही. यामुळे ती इथेच देतो. वाचक टॉलस्टॉय फार्मबद्दल पुढे वाचतील. त्या फार्मवर सत्याग्रहींचे अनेक कुटुंब राहत होते. समाजाच्या लोकांसमोर उदाहरण ठेवण्याकरिता आणि आपल्या मुलांना साधेपणाची शिकवण देण्याकरिता काछलिया सेठनी आपल्या मुलांना टॉलस्टॉय फार्मवर शिक्षणाकरिता पाठवले होते असेही म्हणता येऊ शकते. काछलिया यांच्या मुलाचे नाव अली होते. त्या वेळी तो १०-१२ वर्षांचा होता. अली स्वभावाने नम्र, सत्यवादी आणि सरळ मुलगा होता. काछलिया सेठच्या आधी परंतु सत्याग्रहाची लढाई संपल्यानंतर खुदाने त्यालाही आपल्या दरबारात बोलावून घेतले. तो जर जिवंत असता तर तोही आपल्या वडिलांना साजेसा पुत्र झाला असता असा माझा विश्वास आहे.

# १७. पहिली फूट

१९०७ सालची एक जुलै आली. परवाने देणारी सरकारी कार्यालये उघडली. प्रत्येक कार्यालयासमोर पिकेटिंग करण्यात यावे अथवा कार्यालयाच्या मार्गावर स्वयंसेवक ठेवावे आणि त्यांनी तिथे जाणाऱ्या हिंदुस्तानींना तिथे ठेवण्यात आलेल्या सापळ्यात अडकण्यापासून सावध करावे असा समाजाचा आदेश होता. सर्व सत्याग्रहींनी एकच चिन्ह लावायचे होते. प्रत्येक स्वयंसेवकाला पुढील सूचना देण्यात आल्या होत्या - परवाने घेण्याकरिता आशियायी कार्यालयात जाणाऱ्या प्रत्येक हिंदुस्तानीला त्याचे नाव विचारावे त्याने जरी नाव सांगितले नाही तरी त्याच्याशी कोणतेही असभ्यपणाचे वर्तन करू नये. खुनी कायद्याला शरण गेल्यामुळे होणाऱ्या हानीच्या माहितीचे परिपत्रक त्याला द्यावे, त्यात काय लिहिले आहे हे त्याला समजावून सांगावे आणि पोलिसांबरोबरही सभ्यतेचे वर्तन करावे. पोलिसांनी मारले वा गोळी मारली तरी ती गोष्ट शांतपणे सहन करावी, आणि सहन होत नसेल तर तिथून निघून जावे. पोलिसांनी अटक केली तर चुपचाप अटक करू द्यावी. जोहानिसबर्गमध्ये असे काही घडले तर त्याची सूचना मला देण्यात यावी व इतरत्र काही घडले तर त्याची सूचना त्या त्या ठिकाणच्या चिटणिसाला द्यावी आणि त्याने दिलेल्या सूचनेप्रमाणे काम करावे. पहारेकऱ्यांच्या तुकडीचा एक नायक असायचा. नायकाच्या आदेशाप्रमाणे संबंधित पहारेकऱ्याच्या तुकडीला चालावे लागायचे.

समाजाला असा अनुभव पहिल्यांदा आला होता. १२ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या सर्व लोकांना पहारेकरी म्हणून पसंत करण्यात येत असे. यामुळे १२ ते १८ वर्ष वय असलेले अनेक स्वयंसेवकही भरती झाले. परंतु स्थानिक कार्यकर्त्यांशी ओळख नसलेल्या कोणाचीही स्वयंसेवक म्हणून भरती केली जात नसे. इतकी सगळी सावधगिरी बाळगल्यानंतरही प्रत्येक सभेत लोकांना सांगण्यात येत असे की तुम्हाला जर परवाना घेण्याची इच्छाच असेल, परंतु पहारेकऱ्याची तुम्हाला भीती वाटत असेल तर नायक तुम्हाला एक स्वयंसेवक देईल व तो तुम्हाला कार्यालयात घेऊन जाईल आणि तेथील काम पूर्ण झाल्यानंतर तेथून तुम्हाला तो परत घेऊन येईल. काही लोकांनी या सुविधेचा लाभही घेतला होता.

स्वयंसेवकांनी आपले काम असीम उत्साहाने आणि मन लावून केले. कर्तव्यपालनात ते सदैव जागृत आणि तत्पर असायचे. सामान्यपणे असे म्हणता येऊ शकते की पोलिसांनी स्वयंसेवकांना फारसा त्रास दिला नाही. आणि केव्हा केव्हा पोलिसांनी जरी त्रास दिला तरी ते तो गुपचुप सहन करायचे. या कामात स्वयंसेवकांनी हास्यरसाचाही अंतर्भाव केला होता. केव्हा केव्हा पोलीसही त्यात सामील व्हायचे. आपला वेळ घालवण्याकरिता स्वयंसेवक अनेक चुटके शोधायचे. एकदा रस्ता अडवण्याचा आरोप ठेवून रहदारीच्या कायद्याप्रमाणे स्वयंसेवकांना अटक करण्यात आली होती. तेथील सत्याग्रहात असहकाराचा समावेश करण्यात आलेला नसल्यामुळे न्यायालयात आपला बचाव करण्याला मनाई नव्हती. परंतु समाजातर्फे वकील ठेवून समाजाच्या खर्चाने बचाव केला जाणार नाही अशी अट ठेवण्यात आली होती. अटक करण्यात आलेल्या स्वयंसेवकांना न्यायालयाने निर्दोष ठरवून सोडून दिले होते. यामुळे स्वयंसेवकांचा उत्साह अजूनच वाढला होता.

अशा रीतीने सार्वजनिक रीतीने परवाने घेऊ इच्छिणाऱ्या हिंदुस्तानींबरोबर कोणत्याही प्रकारचा अशिष्टपणाचा व्यवहार केला जात नसे वा त्याच्यावर बळजबरी केली जात नसे. परंतु मी हे कबूल केले पाहिजे की सत्याग्रहाच्या लढाईच्या अनुषंगाने अशीही एक टोळी तयार झाली होती की जी स्वयंसेवक न होता गुप्तपणे परवाने घेऊ इच्छिणाऱ्या लोकांना मारहाणीची वा इतर प्रकारे नुकसान पोहोचवण्याची धमकी द्यायची. ही अतिशय दु:खद गोष्ट होती. या गोष्टीची कल्पना येताच ती थांबवण्याकरिता अतिशय कठोर पावले उचलण्यात आली होती. परिणामी धमकी देण्याचा प्रकार जरी जवळपास बंद झाला तरी तो मुळापासून बंद झालेला नव्हता. धमक्यांचा परिणाम वातावरणात राहिला आणि तितक्याच प्रमाणात सत्याग्रहाच्या लढ्याची हानी झाली असल्याचे आम्हाला आढळले. ज्या हिंदुस्तानींना भीती वाटत होती त्यांनी ताबडतोब सरकारकडून संरक्षण मागितले आणि ते त्यांना मिळालेसुद्धा. अशा प्रकारे समाजात विष पसरले आणि जे लोक दुबळे होते ते अजूनच दुबळे झाले. दुबळ्या लोकांची प्रवृत्ती नेहमीच सूड घेण्याची असते. यामुळे लोकांच्या मनातील जहर अजूनच वाढले.

समाजातील लोकांवर या धमक्यांचा फारच कमी परिणाम झाला. परंतु लोकमताच्या दडपणाचा आणि स्वयंसेवकांच्या उपस्थितीमुळे आपले नाव समाजातील लोकांना कळण्याच्या शक्यतेचा लोकांच्या मनावर फार प्रभाव पडला. खुनी कायद्यासमोर वाकणे चांगले आहे असे सांगणारा एकही हिंदुस्तानी मला आढळला नाही. जे लोक परवाना काढण्याकरिता गेले होते ते दु:ख वा हानी सहन करण्याच्या असमर्थतेमुळे गेले होते. यामुळे त्यांना फार लाज वाटत होती. एकीकडे लाज आणि दुसरीकडे व्यापारात नुकसान होण्याची मोठ्या व्यापाऱ्याना वाटत असलेली भीती या दोन अडचणींमधून मार्ग काढण्याचा उपायही हिंदुस्तानी व्यापाऱ्यांनी शोधून काढला. एका खाजगी घरात आशियायी विभागाच्या अधिकाऱ्याने परवाने देण्याचे काम करावे अशी व्यवस्था आशियायी विभागाशी संधान बांधून त्यांनी केली. अशा प्रकारे परवाने घेतल्यामुळे आपण खुनी कायद्याला शरण गेल्याचे लोकांना काही काळ तरी कळणार नाही आणि आपण स्वत:च पुढारी असल्यामुळे आपले पाहून इतर लोकही या कायद्याला शरण जातील असे त्यांना वाटत होते. यामुळे अजून काही झाले नाही तरी त्यांच्या मनावरील लाजेचे ओझे कमी होऊ शकणार होते. नंतर जरी त्यांचे पितळ उघडे पडणार असले तरी त्यांना त्याची काळजी नव्हती.

परंतु स्वयंसेवक इतके जागृत होते की समाजाला त्यांच्याकडून एकेक हकिगत कळत असे. आशियायी कार्यालयातही कोणी ना कोणी असा राहत असे की जो सत्याग्रहींना सर्व सांगायचा. इतर काही लोक दुबळे होते हे जरी खरे असले तरी त्यांच्या पुढाऱ्यांनी खुनी कायद्याला शरण जावे ही गोष्ट त्यांना सहन होत नव्हती. आपले पुढारी दृढ राहिले तर आपणही दृढ राहू शकू अशी सद्भावना ठेवून ते आपल्या नेत्याच्या अध:पतनाची सूचना सत्याग्रहींना द्यायचे. अशा प्रकारे एका रात्री अमुक अमुक लोक अमुक एका दुकानात परवाने घेणार आहेत अशी माहिती मिळाली. आधी तर समाजाने अशा प्रकारच्या लोकांना समजावण्याचा प्रयत्न केला. त्या दुकानावर पिकेटिंगही केले. परंतु माणून आपला दुबळेपणा किती काळ दाबून ठेवू शकतो? रात्री दहा अकरा वाजता काही काही हिंदुस्तानी लोकांनी वर सांगितल्याप्रमाणे परवाने घेतले. यामुळे एका सुरात वाजणाऱ्या बासरीला तडा गेला. दुसऱ्या दिवशी समाजाने त्यांची नावे प्रकाशित केली. परंतु माणसाच्या लाजेलाही एक सीमा असते. स्वार्थ जेव्हा माणसामोर येऊन उभा राहतो तेव्हा ती

लाज टिकत नाही आणि मग तो माणूस सरळ मार्गावरून भरकटतो. या फुटीचा लाभ घेऊन जवळपास ५०० हिंदुस्तानींनी परवाने घेतले. परवाने देण्याचे काम काही दिवस खाजगी घरात चालले. परंतु जसजसे लाजेचे दडपण कमी होत गेले तसतसे लोक उघडपणेसुद्धा परवाने घेण्याकरिता जाऊ लागले.

## १८. पहिला सत्याग्रही कैदी

भरपूर प्रयत्न केल्यानंतरही आशियायी विभागाला ५००हून जास्त नावे मिळू शकली नाही. यामुळे कोणाला ना कोणाला अटक केलीच पाहिजे या निर्णयावर आशियायी विभाग आला. वाचकांना जर्मिन्स्टनचा परिचय आहे. तिथे बरेच हिंदुस्तानी राहायचे. त्यात एक रामसुंदर पंडितही होता. तो दिसायला सुंदर आणि वाचाळही होता. त्याला काही संस्कृत श्लोक पाठ होते. उत्तर हिंदुस्तानी असल्यामुळे त्याला तुलसीदासच्या दोह्यांची आणि चौपाईची माहिती होती. आणि पंडित या नामाभिधानामुळे लोकांमध्ये त्याला थोडीफार प्रतिष्ठाही होती. त्याने ठीकठिकाणी भाषणे केली. त्याच्या भाषणांमध्ये खूप जोष असायचा. जर्मिन्स्टनच्या काही विघ्नसंतोषी हिंदुस्तानींनी आशियायी विभागाला सांगितले की रामसुंदरदासला जर अटक केली तर जर्मिन्स्टन येथील बरेचसे हिंदुस्तानी परवाने घेतील. रामसुंदरदासला अटक करण्याच्या मोह त्या कार्यालयाच्या अधिकाऱ्याला आवरता आला नाही. रामसुंदरदास पंडितला अटक करण्यात आली. अशा प्रकारचा हा पहिलाच खटला असल्यामुळे सरकार आणि हिंदुस्तानी समाज या दोघांतही फार खळबळ माजलेली होती. ज्या रामसुंदरदासला कालपरवापर्यंत केवळ जर्मिन्स्टनच ओळखत होते त्याला एका क्षणात सर्व दक्षिण आफ्रिका ओळखू लागला. ज्याप्रमाणे एखाद्या महापुरुषावर खटला चालावा व त्याकडे सर्वांचे लक्ष वेधले जावे त्याचप्रमाणे सर्वांचे लक्ष रामसुंदरदासकडे लागलेले होते. सरकारवर शांततारक्षणाची कोणतीही जबाबदारी नव्हती परंतु तरीही शासनाने ती काळजी घेतली. न्यायालयानेसुद्धा रामसुंदरदासकडे सामान्य अपराधी म्हणून न पाहता हिंदुस्तानी समाजाचा प्रतिनिधी म्हणून पाहिले व त्याच्याशी आदरपूर्वक व्यवहार केला. उत्कंठित हिंदुस्तानी लोकांनी न्यायालय खच्च भरून गेलेले होते. रामसुंदर दास पंडितला एक महिन्याच्या साध्या कैदेची शिक्षा झाली. त्याला जोहानिसबर्ग येथील तुरुंगात ठेवण्यात आले. तिथे युरोपियांच्या कक्षात त्याला एक खोली देण्यात आली. कोणत्याही अडचणीशिवाय लोक त्याला भेटू शकायचे. त्याला बाहेरून जेवण मागवण्याची सुविधा देण्यात आली आणि समाजातर्फे त्याला नेहमीच उत्तम जेवण तयार करून पाठवण्यात येत असे. त्याची प्रत्येक इच्छा पूर्ण केली जात

असे. ज्या दिवशी त्याला शिक्षा झाली तो दिवस समाजाने मोठ्या धामधुमीने पाळला. रामसुंदरदास तुरुंगात गेल्यामुळे समाजातील एकही माणूस हताश तर झालाच नाही, उलट त्यामुळे संपूर्ण समाजाचा उत्साह वाढला. शेकडो हिंदुस्तानी तुरुंगात जाण्याकरिता तयार झाले. आशियायी विभागाची अपेक्षा पूर्ण होऊ शकली नाही. जर्मिन्स्टनचे हिंदुस्तानीसुद्धा परवाना घेण्याकरिता गेले नाही. अधिकाऱ्यांच्या वरील पावलांमुळे समाजाचा फायदाच झाला. रामसुंदरदास पंडितची सुटका झाली. त्याला वाजतगाजत त्या ठिकाणी नेण्यात आले जिथे सभा घेतली जाणार होती. सभेत उत्साहवर्धक भाषणे झाली. रामसुंदरला फुलांच्या हारांनी झाकून टाकण्यात आले. स्वयंसेवकांनी त्याच्या सन्मानार्थ एक मेजवानी दिली. आणि आम्हीसुद्धा तुरुंगात गेलो असतो तर किती बरे झाले असते असा विचार करून अनेक हिंदुस्तानी रामसुंदरचा गोड हेवा करू लागले.

परंतु रामसुंदरदास नकली नाणे निघाला. त्याची ताकद खोट्या सतीप्रमाणेच होती. एकाएकी अटक करण्यात आल्यामुळे रामसुंदरदास एका महिन्याच्या कारावासापासून तर वाचूच शकत नव्हता. आणि तुरुंगातही त्याचा जो साहेबी थाट होता तसा थाटमाठ त्याने बाहेर कधीही पाहिला नव्हता. असे असले तरी इकडेतिकडे भटकणाऱ्या स्वच्छंदी आणि व्यसनी माणसाला तुरुंगात जरी विविध प्रकारचे जेवण मिळत असले तरीही तेथील एकांतवास त्याला सहन होत नाही. हीच परिस्थिती रामसुंदरदासची झाली. समाजातील लोकांकडून आणि तुरुंगातील अधिकाऱ्यांकडून इतका सन्मान मिळाल्यानंतरही त्याला तुरुंग डाचू लागला आणि ट्रान्सवाल सरकार आणि सत्याग्रह या दोघांनाही नमस्कार करून एका रात्रीतून तो गायब झाला. प्रत्येक समाजात काही चतुर लोक तर असतातच. आणि जसे ते समाजात असतात तसेच ते प्रत्येक आंदोलनात असतात. त्यांना रामसुंदरची नखशिखांत माहिती होती. परंतु रामसुंदरमुळेही समाजाचा फायदा होऊ शकतो असे समजून रामसुंदरचे पितळ उघड होण्यापूर्वी त्याचा इतिहास मला कळू दिला नव्हता. नंतर मला कळले की रामसुंदर कराराची मुदत संपण्यापूर्वीच पळालेला गिरमिट्या मजूर होता. तो करारबद्ध असल्याची गोष्ट मी इथे घृणेने लिहून राहिलो नाही. गिरमिट्या असण्यात काहीही दोष नसतो. वाचकांच्या शेवटी लक्षात येईल की सत्याग्रहाच्या आंदोलनाला

सुशोभित करणारे अखेरीस तर गिरमिट्ये मजूरच होते. हा लढा जिंकण्यात त्यांचा हातभार सर्वात मोठा होता. परंतु गिरमिट पूर्ण होण्यापूर्वीच पळून येणे हा रामसुंदरचा दोष होता.

परंतु रामसुंदरचा दोष दाखवण्याकरिता मी हा सगळा इतिहास इथे लिहिलेला नसून या घटनेमागील गूढार्थ वाचकांना कळावा म्हणून हा इतिहास मी इथे वाचकांना सांगितला आहे. प्रत्येक शुद्ध आंदोलनात शुद्ध माणसांचीच भरती करणे हे त्या आंदोलनाच्या नेत्यांचे कर्तव्य असते. परंतु मोठ्यातमोठी सावधगिरी बाळगल्यानंतरही अशुद्ध माणसांना शुद्ध आंदोलनाबाहेर ठेवता येत नाही. परंतु तरीही संचालक निर्भय आणि खरे असले तर अशुद्ध लोकांनी न कळत जरी शुद्ध आंदोलनात प्रवेश केला तरी आंदोलनाची अंतिमतः हानी होऊ शकत नाही. रामसुंदरचे खरे रूप उघड झाल्यानंतर समाजाच्या लोकांमध्ये त्याची काहीही किंमत राहिली नव्हती. त्या बिचाऱ्याच्या नावातून पंडित मिटले आणि तो केवळ रामसुंदरच राहिला. समाज त्याला विसरला, परंतु त्याच्यामुळे लढ्याची शक्ती वाढली होती. सत्याग्रहाकरिता त्याने जी शिक्षा भोगली होती ती वाया गेली नव्हती. तो तुरुंगात गेल्यामुळे लढ्याची जी ताकद वाढली ती टिकून राहिली. त्याचे उदाहरण पाहून इतर दुबळे बांधव सत्याग्रहाच्या लढाईपासून आपोआपच दूर झाले. अशा प्रकारच्या दुबळेपणाची इतरही काही उदाहरणे समोर आली. परंतु त्यांचा नावनिशीवार इतिहास इथे देण्याची माझी इच्छा नाही. तो दिल्याने कोणताही लाभ होणार नाही. समाजाची शक्ती आणि ज्या काही समाजाच्या उणिवा असतील त्या वाचकांच्या नजरेतून सुटू नये म्हणून इतके सांगणे आवश्यक आहे की रामसुंदर काही एकटाच रामसुंदर नव्हता. परंतु इतके मात्र सांगता येईल की रामसुंदरांच्या जमातीने समाजाच्या लढ्याचा फायदाच केला.

वाचकांनी रामसुंदरला दोष देऊ नये. या जगात सर्वच माणसे अपूर्ण असतात. एखाद्याचा दोष जेव्हा आपल्यासमोर येतो तेव्हा त्याचा दोष दाखवण्याकरिता विशेषेकरून आपण त्याच्याकडे बोट दाखवतो. परंतु खरे म्हणजे ही आपली चूक असते. रामसुंदर जाणूनबुजून दुबळा झाला नव्हता. माणूस आपला स्वभाव बदलू शकतो. त्यावर पूर्णपणे नियंत्रण ठेवू शकतो. परंतु तो तो स्वभाव समूळ नाहीसा करू शकत नाही. विश्वनिर्मात्या ईश्वराने माणसाला इतके स्वातंत्र्य

दिलेलेच नाही. वाघ जर आपल्या कातडीवरील रंगाचे पट्टे बदलवू शकेल तरच माणूस आपला स्वभाव बदलवू शकेल. पळून गेल्यानंतर रामसुंदरला आपल्या कृत्याचा किती पश्चात्ताप झाला असेल हे कोणाला माहीत असू शकेल?.किंवा त्याचे पळून जाणे हेच तर पश्चात्तापाचे द्योतक नसेल?.तो जर निर्लज्ज असता तर त्याला पळून जाण्याची काय गरज होती? परवाना घेऊन आणि खुनी कायदा स्वीकारून तो नेहमीकरिता तुरुंगाबाहेर राहू शकला असता. इतकेच नाही तर आशियायी विभागाचा दलाल बनून तो लोकांना भुलवू शकला असता आणि सरकारचा तो प्रिय माणूसही होऊ शकला असता. हे सर्व न करता समाजासमोर लाजिरवाणे होण्याऐवजी त्याने तोंड लपवले. आणि असे करूनसुद्धा त्याने हिंदुस्तानी समाजाची सेवाच केली असा उदारपणे त्याच्या पलायनाचा अर्थ आपण का करू नये?.

# १९. 'इंडियन ओपिनियन'

वाचकासमोर मी सत्याग्रहाच्या लढाईतील बाह्य आणि अंतर्गत अशी सर्व साधने ठेवू इच्छितो. यामुळे दक्षिण आफ्रिकेतून आजही प्रकाशित होत असलेल्या 'इंडियन ओपिनियन' नावाच्या साप्ताहिकाची ओळख करून देणे आवश्यक आहे. दक्षिण आफ्रिकेत सर्वप्रथम हिंदुस्तानी छापखाना सुरू करण्याचे श्रेय मदनजीत व्यावहारिक या सज्जन गुजराती गृहस्थाकडे जाते. तो छापखाना काही काळ अतिशय अडचणीत चालल्यानंतर त्यांनी एक वृत्तपत्र काढण्याचा विचार केला. याबाबतीत त्यांनी मनसुखलाल नाझरचा आणि माझा सल्ला घेतला. वृत्तपत्र डरबन येथून काढण्यात आले. श्री मनसुखलाल नाझर त्याचे बिनपगारी संपादक झाले. वृत्तपत्राला सुरुवातीपासून तोटा येऊ लागला. अखेरीस त्यात काम करणारांना भागीदार वा भागीदारक्षम बनवून आणि एक शेत विकत घेऊन त्या शेतात वृत्तपत्रात काम करणारांना वसवण्याचे आणि तेथून वृत्तपत्र चालवण्याचे ठरले. हे शेत डरबनपासून १३ मैल अंतरावरील एका सुंदर टेकडीवर आहे. त्याच्यापासून सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन ३ मैल अंतरावर आहे आणि त्याचे नाव फिनिक्स आहे. वृत्तपत्राचे नाव सुरुवातीपासूनच 'इंडियन ओपिनियन' ठेवण्यात आले. एके काळी ते इंग्रजी, गुजराती, तमिळ आणि हिंदी भाषेतून प्रकाशित होत होते. तमिळ आणि हिंदीचे ओझे अधिक वाटू लागल्यामुळे, शेतावर राहू शकतील असे तमिळ आणि हिंदी लेखक न मिळाल्यामुळे आणि या दोन भाषांमधील लेखांवर अंकुश न राहिल्यामुळे हे दोन विभाग बंद करण्यात आले आणि इंग्रजी आणि गुजराती हे दोन विभागच सुरू ठेवण्यात आले. सत्याग्रहाची लढाई सुरू झाली तेव्हा या दोन भाषांमधूनच 'इंडियन ओपिनियन' निघत होते. शेतावर राहून संस्थेत काम करणाऱ्या लोकांमध्ये गुजाराती, हिंदी भाषिक, तमिळ आणि इंग्रज सर्व होते. श्री मनसुखलाल नाझर यांच्या अकाली मृत्यूनंतर एक इंग्रज मित्र हर्बर्ट किचन 'इंडियन ओपिनियन'चे संपादक झाले. त्यांच्यानंतर हेन्री पोलाक यांनी दीर्घ काळ 'इंडियन ओपिनियन'च्या संपादकाचे काम केले. माझ्या आणि पोलाक यांच्या तुरुंगवासाच्या काळात सज्जन धर्मगुरू दिवंगत जोसेफ डोक यांनी संपादकाचे काम केले. या वृत्तपत्राद्वारे समाजातील लोकांना दर आठवड्याच्या सगळ्या

बातम्यांची चांगल्या प्रकारे चांगली माहिती करून दिली जात असे. साप्ताहिकातील इंग्रजी विभागाद्वारे गुजराती कळत नसलेल्या हिंदुस्तानींनासुद्धा थोडेबहुत सत्याग्रहाचे प्रशिक्षण मिळत असे. आणि हिंदुस्तान, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकेतील इंग्रजांकरिता तर ‘इंडियन ओपिनियन’ एका साप्ताहिकाची गरज भागवत असे. माझा विश्वास आहे की ज्या लढ्याचा मुख्य आधार आंतरिक शक्ती असते ती लढाई वृत्तपत्रांच्या मदतीशिवायही लढता येऊ शकते. परंतु याचबरोबर माझा असाही अनुभव आहे की ‘इंडियन ओपिनियन’ असल्यामुळे आम्हाला अनेक सोयी उपलब्ध झाल्या. समाजाला सहजपणे सत्याग्रहाचे प्रशिक्षण देता येऊ शकले आणि जगात जिथे जिथे हिंदुस्तानी राहत होते तिथे तिथे सत्याग्रहाच्या बातम्या पोहोचवता आल्या. इतर कोणत्याही साधनांनी कदाचित असे करता आले नसते. इतके तर निश्चितच सांगता येऊ शकते की सत्याग्रहाच्या लढाईतील साधनांमध्ये ‘इंडियन ओपिनियन’ एक प्रमुख आणि प्रभावी साधन होते.

ज्याप्रमाणे लढाईच्या दिवसात आणि लढाईच्या अनुभवामुळे समाजात अनेक परिवर्तन झाले त्याचप्रमाणे ‘इंडियन ओपिनियन’मुळेही झाले. आधी या वृत्तपत्रात जाहीराती घेण्यात येत असत. छापखान्यात छपाईकरिता बाहेरचे फुटकळ कामही घेण्यात येत असे. या दोन कामांकरिता आमच्यातील चांगल्यात चांगल्या दोन लोकांना लावावे लागत असल्याचे माझ्या लक्षात आले. जाहीराती घ्यायच्या तर कोणत्या जाहिराती घ्याव्या आणि कोणत्या नाही याचा निर्णय घेताना धर्मसंकट उभे राहत असे. याशिवाय एखादी जाहीरात घेऊ नये असे वाटत असेल, परंतु जाहीरात देणारी व्यक्ती जर समाजातील अग्रगण्य व्यक्ती असेल तर तिला वाईट वाटेल या भीतीने न घेण्यासारख्या जाहीरातीही आम्हाला घ्याव्या लागत असत. जाहीराती मिळवण्यात आणि त्या प्रकाशित झाल्यानंतर त्यांची बिले वसूल करण्यात आमच्यातील चांगल्यात चांगल्या लोकांची शक्ती खर्च होत असे, आणि जाहीरातदारांची विनवणी करावी लागायची ती वेगळीच. त्याचबरोबर असाही विचार मनात आला की पैसा कमावण्याकरिता नाही तर समाजाची सेवा करण्याकरिता वृत्तपत्र चालवायचे असेल तर ती सेवा बळजबरीने करण्यात येऊ नये. समाजाची इच्छा असेल तरच आपण त्याची सेवा केली पाहिजे. आणि समाजातील अनेक लोक वर्गणीदार होऊन त्या वृत्तपत्राच्या खर्चाचा भार सहन करत असतील तरच त्यातून समाजाची इच्छा कळू शकते.

याशिवाय आम्ही असाही विचार केला की वृत्तपत्र चालवण्याकरिता, त्याचा मासिक खर्च काढण्याकरिता काही व्यापाऱ्यांना सेवाभाव म्हणून जाहीराती देण्याकरिता समजावण्यापेक्षा समाजातील सर्वसामान्य लोकांना 'इंडियन ओपिनियन' विकत घेण्याचे कर्तव्य समजावून सांगितले तर ही गोष्ट ज्यांना लालूच दाखवायची आणि ज्यांना लालूच वाटावी त्या दोघांकरिताही किती सुंदर शिक्षणाची होईल? या सर्व गोष्टींचा आम्ही विचारविनिमय केला आणि त्यावर लगेच अंमलबजावणीही केली. याचा परिणाम असा झाला की जे कार्यकर्ते जाहीरात विभागाच्या झंझटीत फसलेले असायचे ते वृत्तपत्र सुंदर बनवण्याच्या कामाला लागले. समाजाच्या लगेच लक्षात आले की 'इंडियन ओपिनियन'ची मालकी आणि ते चालवण्याची जबाबदारी आपली आहे. यामुळे आम्ही सर्व कार्यकर्ते निश्चिंत झालो. समाज वृत्तपत्राची मागणी करेपर्यंतच पूर्ण मेहनत करून ते काढण्याची जबाबदारी आमच्यावर राहिली. कोणत्याही हिंदुस्तानीचा हात धरून 'तू इंडियन ओपिनियन' घे असे सांगण्याची आता आम्हाला लाज वाटत नसे. उलट ते आमचे कर्तव्य आहे असे आम्हाला वाटू लागले. 'इंडियन ओपिनियन'च्या आंतरिक शक्तीत आणि त्याच्या स्वरूपातही बदल झाला आणि ते वृत्तपत्र एक महाशक्ती झाले. त्याची ग्राहकसंख्या १२०० ते १५०० असायची. ती दिवसेंदिवस वाढू लागली. त्याची वार्षिक वर्गणी आम्हाला वाढवावी लागली होती. आणि तरीही सत्याग्रहाची लढाई जेव्हा पराकोटीला पोहोचली तेव्हा त्याच्या वर्गणीदारांची संख्या जवळपास ३५०० पर्यंत पोहोचली होती. 'इंडियन ओपिनियन'च्या वाचकांची संख्या २०,००० मानता येऊ शकते. इतक्या वाचकांमध्ये त्याचा खप ३,००० पर्यंत पोहोचणे ही आश्चर्यजनक बाबच म्हणावी लागेल. समाजाला 'इंडियन ओपिनियन' इतक्या प्रमाणात आपला वाटू लागला होता की ठरलेल्या वेळी त्याच्या प्रती जर जोहानिसबर्गला पोहोचल्या नाही तर माझ्यावर तक्रारींचा पाऊस पडू लागायचा. सामान्यपणे रविवारी सकाळी 'इंडियन ओपिनियन' जोहानिसबर्गला पोहोचत असे. मला माहीत आहे की 'इंडियन ओपिनियन' जोहानिसबर्गला पोहोचल्यानंतर बरेचसे हिंदुस्तानी त्यातील संपूर्ण गुजराती मजकूर वाचून काढण्याचे पहिले काम करायचे. तो मजकूर एक हिंदुस्तानी वाचायचा आणि दहापंधरा माणसे त्याच्या आजूबाजुला बसून

तो ऐकायचे. आपण पडलो गरीब. यामुळे काही लोक भागीदारीत 'इंडियन ओपिनियन' विकत घ्यायचे

ज्याप्रमाणे जाहीराती घेणे बंद करण्यात आले त्याचप्रमाणे छापखान्यात बाहेरचे फुटकळ काम घेणेही बंद करण्यात आले. ते काम न घेण्यामागील कारणेही जवळपास तशीच होती जशी जाहीराती न घेण्यामागे होती. ही कामे घेणे बंद केल्यामुळे जुळाऱ्याचा जो वेळ वाचला त्याचा उपयोग छापखान्याद्वारे इतर पुस्तके प्रकाशित करण्याकरिता झाला. आणि पुस्तके करण्यामागील आमचा हेतू पैसे कमावणे नाही हे समाजाला माहीत होते. ती पुस्तकेही लढ्याच्या मदतीकरिताच प्रकाशित करण्यात येत असल्यामुळे त्यांचीसुद्धा चांगली विक्री होऊ लागली.

# २०. अटकसत्र

रामसुंदरला करण्यात आलेली अटक शासनाकरिता फायदेशीर झाली नाही हे आपण पाहिले आहे. दुसरीकडे समाजाचा उत्साह वाढत चालला असल्याचेही अधिकाऱ्यांना दिसत होते. आशियायी विभागातील अधिकारी 'इंडियन ओपिनियन'अतिशय काळजीपूर्वक वाचायचे. समाजाच्या लढ्यासंबंधीची कोणतीही गोष्ट गुप्त ठेवली जात नसे. समाजाची दुर्बलता वा समाजाची शक्ती याची ज्या कोणाला माहिती हवी असायची - मग तो शत्रू असो की मित्र की अजून कोणी तटस्थ असो - त्याला ती 'इंडियन ओपिनियन'मधून मिळू शकत असे. ज्या लढाईत कोणतेही चुकीचे काम करायचे नसते, जिच्यात चलाखी वा लुच्चेपणाला कोणतेही स्थान नसते आणि जिच्यात आपल्या शक्तीच्या बळावरच विजय मिळवता येऊ शकतो तिच्यात गुप्ततेला कोणतेही स्थान असूच शकत नाही ही गोष्ट कार्यकर्त्यांच्या आधीपासूनच लक्षात आलेली असायची. दुबळेपणाचा रोग दूर करायचा असेल तर दुबळेपणाची चिकित्सा करून तो उघड करण्यातच समाजाचा लाभ असतो. 'इंडियन ओपिनियन' याच धोरणाने चालत असल्याचे जेव्हा आशियायी विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहिले तेव्हा त्यांच्याकरिता तो हिंदुस्तानी समाजाच्या तत्कालीन इतिहासाचा आरसा झाला. आणि यामुळेच हिंदुस्तानी समाजाच्या काही विशेष पुढाऱ्यांना अटक करण्यात येत नाही तोपर्यंत हिंदुस्तानींचा लढाईतील उत्साह कमी करता येऊ शकणार नाही असे असे त्यांना वाटू लागले. परिणामी डिसेंबर १९०७मध्ये काही पुढाऱ्यांना न्यायालयात हजर राहण्याची सूचना मिळाली. अशा प्रकारची सूचना देण्यात अधिकाऱ्यांनी सौजन्य दाखवले होते ही गोष्ट मान्य केली पाहिजे. त्यांची इच्छा असती तर वारंट काढून ते तेव्हाच नेत्यांची धरपकड करू शकत होते. परंतु असे करण्याऐवजी सूचना देऊन अधिकाऱ्यांनी सौजन्य तर दाखवले होतेच शिवाय समाजाच्या लोकांची अटक करवून घेण्याची तयारी असल्याबद्दलचा विश्वासही त्यांनी दाखवला होता. नियोजित दिवशी म्हणजे शनिवार, २८ डिसेंबर १९०७ला जे पुढारी न्यायालयात हजर होते त्यांना पुढील प्रकारच्या नोटिसीचे उत्तर द्यायचे होते. - "कायद्याप्रमाणे तुम्ही लोकांनी परवाने घ्यायला पाहिजे होते. असे असूनही तुम्ही ते घेतलेले

नाहीत. यामुळे विशिष्ट मुदतीत तुम्ही ट्रान्सवालच्या सीमेबाहेर जावे असा आदेश तुम्हाला देण्यात येत आहे."

या नेत्यांमधील एका गृहस्थाचे नाव क्विन होते. जोहानिसबर्गमध्ये राहणाऱ्या चिनी लोकांचे ते पुढारी होते. जोहानिसबर्गमध्ये तीनचारशे चिनी राहत होते. ते सर्व व्यापार करायचे वा लहानमोठ्या शेतीचे काम करायचे. हिंदुस्तान शेतीकरिता प्रसिद्ध देश आहे. परंतु माझा विश्वास आहे की चिनी लोकांनी ज्या प्रमाणात शेतीचा विकास केला आहे त्या प्रमाणात हिंदुस्तानने केलेला नाही. अमेरिका वगैरे देशांमध्ये आधुनिक शेतीत जी प्रगती झाली तिचे तर वर्णनसुद्धा करता येणे शक्य नाही. असे असले तरी पाश्चात्य देशातील शेती अजून प्रयोगावस्थेत आहे असे मी समजतो. परंतु चीन तर आपल्यासारखा प्राचीन देश आहे, आणि तिथे पुरातन काळापासून शेतीचा विकास करण्यात आला आहे. यामुळे चीन आणि हिंदुस्तान यांच्या तुलनेतून आपण काही शिकू शकतो. जोहानिसबर्गमधील चिनी लोकांची शेती पाहून आणि त्यांच्या गोष्टी ऐकून मला वाटते की चिनी लोकांचे ज्ञान आणि त्यांचा उद्यमीपणा आमच्यापेक्षा किती तरी जास्त आहे. जी जमीन पडीत आहे असे समजून आपण तिच्यातून काहीही पीक घेत नाही त्याच जमिनीच्या मातीचे सूक्ष्म ज्ञान असल्यामुळे चिनी लोक तिथे उत्तम पीक घेतात.

या चतुर जमातीकरिताही खुनी कायदा लागू होणार होता. यामुळे हिंदुस्तानींच्या लढाईत सामील होणे योग्य राहील असे चिनी लोकांनाही वाटले. असे असतानाही दोन्ही समाजांचे कामकाज सुरुवातीपासून तर शेवटपर्यंत वेगवेगळे राहिले होते. दोन्ही जमाती आपापल्या साधनांद्वारे गोऱ्या जमातीशी लढत होत्या. याचा चांगला परिणाम असा झाला. की जोपर्यंत दोन्ही जमाती टिकून राहिल्या तोपर्यंत दोघांचाही लाभ झाला, आणि जेव्हा एका जमातीने माघार घेतली तेव्हा दुसऱ्या जमातीचे कोणतेही नुकसान झाले नाही, खाली पडण्याचा तर प्रश्नच निर्माण होत नाही. अखेरीस बहुतेक चिनी हारले कारण त्यांच्या पुढाऱ्याने त्यांना धोका दिला होता. चिनी लोकांचा नेता खुनी कायद्याला शरण गेला नाही हे जरी खरे असले तरी चिनी संघाच्या पैश्याअडक्याचा हिशोब न देताच तो पळून गेला अशी बातमी कोणी तरी मला दिली. कोणत्याही लढाईत नेत्याअभावी

अनुयायांनी टिकून राहणे फार कठीण होत असते, आणि नेत्यामध्ये जेव्हा काही काळेबेरे आढळते तेव्हा तर अनुयायांमध्ये दुप्पट निराशा पसरते. परंतु धरपकड जेव्हा सुरू झाली तेव्हा चिनी लोक फार उत्साहात होते. त्यांच्यापैकी क्वचितच कोणी परवाने घेतले असावे. यामुळे ज्याप्रमाणे हिंदुस्तानींची धरपकड करण्यात आली त्याचप्रमाणे चिनी लोकांचा पुढारी म्हणून श्री क्विन यांनाही अटक करण्यात आली. श्री क्विन यांनी काही काळ तरी फार चांगले काम केले असेही म्हणता येऊ शकते.

हिंदुस्तानींच्या ज्या पुढाऱ्यांना अटक करण्यात आली होती त्यांच्यातील ज्या लोकांचा परिचय मी करून देऊ इच्छितो ते आहेत श्री थंबी नायडू. थंबी नायडू तमिळ होते. त्यांचा जन्म मॉरिशसमध्ये झाला होता. त्यांचे आईवडील उपजिविकेकरिता मद्रास प्रांतातून मॉरिशसला गेले होते. थंबी नायडू सामान्य व्यापारी होते असे म्हणता येऊ शकते. त्यांना कोणतेही शालेय शिक्षण मिळाले नव्हते. परंतु त्यांचे अनुभवज्ञान फार उच्च होते. व्याकरणाच्या दृष्टीने त्यांच्या इंग्रजी भाषेत जरी दोष असला तरी ते चांगल्या प्रकारे इंग्रजी भाषा बोलू आणि लिहू शकत असत. तमिळ भाषेचे ज्ञानही त्यांनी अनुभवाने मिळवले होते. हिंदुस्तानीसुद्धा त्यांना चांगल्या प्रकारे कळायची व ती ते बोलू शकत असत. तेलगूचेही त्यांना चांगले ज्ञान होते, परंतु हिंदी आणि तेलगू लिपी मात्र त्यांना कळत नसे. मॉरिशसच्या भाषेला क्रिओल म्हणतात. ती फ्रेंच भाषेची अपभ्रंश आहे असे म्हणतात. त्या भाषेचेही त्यांना चांगल्या प्रकारचे ज्ञान होते. दक्षिण हिंदुस्तानातील लोकांना इतक्या सगळ्या भाषांचे ज्ञान असणे ही काही अपवादात्मक गोष्ट नाही. दश्रिण आफ्रिकेत शेकडो हिंदुस्तानींना या सर्व भाषांचे ज्ञान असलेले आढळून येईल. याशिवाय त्यांना हबशी लोकांच्या भाषेचेही ज्ञान असते. या सर्व भाषांचे ज्ञान त्यांना आपसुखच मिळू शकते व ते ते मिळवतही असतात. माझ्या मते तरी याचे कारण एखाद्या विदेशी भाषेचे शिक्षण जरी घेतले तरी त्यांचा मेंदू थकत नाही हेच आहे. त्यांची बुद्धी तीक्ष्ण असते आणि या सर्व भाषा बोलणाऱ्या लोकांबरोबर व्यवहार केल्यामुळे ते या विविध भाषांचे ज्ञान मिळवू शकतात. यामुळे त्यांच्या मेंदूला त्रास तर होत नाहीच, उलट अशा प्रकारच्या बौद्धिक व्यायामामुळे त्यांच्या बुद्धीला अजूनच धार चढते. हीच गोष्ट थंबी नायडू यांच्याबद्दलही खरी होती. त्यांची बुद्धी अतिशय तीव्र होती. नवीन प्रश्नाचे त्यांना फार लवकर

आकलन होत असे. त्यांचा हजरजबाबीपणा सर्वांना आकर्षित करायचा. हिंदुस्तान त्यांनी कधी पाहिला नव्हता, तरी हिंदुस्तानवर त्यांचे असीम प्रेम होते. स्वदेशाभिमान त्यांच्या रोमारोमात भिनलेला होता. त्यांचा निर्धार त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे अंकित झालेला दिसायचा. त्यांचा बांधा मजबूत होता आणि शरीर कसलेले होते. श्रम करताना ते कधीही थकत नसत. एखाद्या सभेत खुर्चीवर बसून सभेचे नेतृत्व करायचे असेल तर ते कामही ते चांगल्या प्रकारे पार पाडू शकत असत. हमरस्त्यावरून ओझे उचलून नेत असताना थंबी नायडूंना कधीही लाज वाटली नाही. मेहनत करताना ते रात्र आणि दिवस असा भेदभाव करत नसत. आणि हिंदुस्तानी समाजाकरिता सर्वस्व अर्पण करण्याच्या शर्यतीत ते कोणापेक्षाही कमी पडू शकत नव्हते. थंबी नायडू जर आवश्यकतेपेक्षा अधिक साहसी नसते आणि स्वभावाने संतापी नसते तर आज त्यांच्यासारखा वीर पुरुष काछलियांच्या अनुपस्थितीत ट्रान्सवालमध्ये समाजाचे नेतृत्व सहजपणे करू शकला असता. ट्रन्सवालमध्ये सत्याग्रहाची लढाई सुरू झाली तेव्हा त्यांच्या क्रोधाचा विपरीत परिणाम होऊ शकला नव्हता, आणि त्यांचे अंगभूत गुण रत्नाप्रमाणे चमकत राहिले. परंतु नंतर मला कळले की त्यांचा क्रोध आणि साहस हे त्यांचे मुख्य शत्रू झाले, आणि त्यांनी त्यांचे सर्व गुण झाकून टाकले. ते काहीही असले तरी दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या लढ्याच्या इतिहासात थंबी नायडूंचे नाव पहिल्या पंक्तितच राहील.

आम्हा सगळ्यांना न्यायालयात एकाच वेळी हजर राहायचे होते. परंतु सर्वांचे खटले वेगवेगळे चालवण्यात आले होते. न्यायाधीशांनी काही लोकांना ४८ तासात तर काही लोकांना ७ वा १४ दिवसात ट्रान्सवाल सोडण्याचा आदेश दिला. या आदेशाची मुदत १० जानेवारी १९०८ला संपत होती. त्याच दिवशी शिक्षा ऐकण्याकरिता न्यायालयात हजर राहण्याचा आदेश आम्हाला देण्यात आला.

आमच्यापैकी कोणालाही स्वतःचा बचाव करायचा नव्हता. कायद्याप्रमाणे परवाने न घेतल्यामुळे निश्चित अवधीत ट्रान्सवाल सोडण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता. त्याचा आम्ही सविनय अनादर केला होता. तो अपराध आम्हा सर्वांना कबूल करायचा होता. न्यायालयात एक लहानसे

वक्तव्य देण्याची परवानगी मी मागितली. मी अशा प्रकारचे वक्तव्य दिले - "माझ्या खटल्यात आणि माझ्यानंतर येणाऱ्या खटल्यांमध्ये भेद करण्यात आला पाहिजे. मला आताआता प्रिटोरियाहून बातमी कळली आहे की माझ्या देशबांधवांना तीन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा आणि मोठा दंड झाला आहे आणि दंड न भरल्यास अजून तीन वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. त्या लोकांनी जर अपराध केला असेल तर मी त्यांच्यापेक्षा किती तरी मोठा अपराध केला आहे. यामुळे न्यायाधीश महोदय, आपल्याला माझी प्रार्थना आहे की आपण मला कठोराहून कठोर शिक्षा करावी."

परंतु न्यायाधीश महोदयांनी माझ्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही आणि मला दोन महिन्यांची साध्या कैदेची शिक्षा केली. ज्या न्यायालयात वकील म्हणून मी शेकडो वेळा उभा राहिलो होतो आणि वकील मंडळीमध्ये उठतबसत होतो त्याच न्यायालयात आज मी आरोपीच्या कठड्यात उभा आहे हा विचार त्या वेळी मला नक्कीच थोडा विचित्र वाटला. परंतु इतके मात्र मला निश्चितच आठवते की वकील मंडळींच्या सभेत बसण्यात मला ज्या सन्मानाची आणि प्रतिष्ठेची जाणीव होत असावी त्यापेक्षा आरोपीच्या कठड्यात उभा असताना मला अधिक सन्मान आणि प्रतिष्ठा जाणवली. कठड्यात शिरत असताना मला किंचितही लाज वाटल्याचे आठवत नाही. शेकडो हिंदुस्तानी बांधव, वकील मित्र इत्यादींसमोर मी न्यायालयात उभा होतो. शिक्षा होताच तुरुंगात नेण्यापूर्वी कैद्यांना ज्या ठिकाणी ठेवतात त्या ठिकाणाकडे एक शिपाई मला घेऊन गेला.

त्या वेळी माझ्या आजूबाजूचे वातावरण सामसूम असल्याचे मला आढळले. कैद्यांच्या बसण्याकरिता तिथे बाक ठेवलेला होता. तिथे बसण्याकरिता सांगून पोलीस अधिकारी दार बंद करून निघून गेला. इथे मी थोडासा घाबरलो हे खरे. मी खोलवर विचार करू लागलो. कुठे माझे घरदार, कुठे माझी बॅरिस्टरी आणि कुठे या सार्वजनिक सभा! ते सर्व आता स्वप्नवत झाले होते आणि आता कैदी म्हणून मी इथे बसलो होतो. दोन महिन्यात काय होणार होते? दोन महिन्यांची पूर्ण शिक्षा मला भोगावी लागणार होती? समाजातील लोक मोठ्या संख्येत तुरुंगात गेले तर मला दोन महिन्याची शिक्षासुद्धा भोगावी लागणार नाही. परंतु त्यांनी जर तुरुंग भरण्याची हिंमत

दाखवली नाही तर दोन महिन्यांचा हा काळ किती दीर्घ वाटेल? हे सर्व विचार लिहिण्यात मला जितका वेळ लागला त्याच्या शतांशही वेळ ते सर्व विचार मनात यायला लागला नाही. हे विचार मनात येताच मला लाज वाटू लागली. किती मोठा मिथ्याभिमान हा! तुरुंगाला महाल समजा असे मी लोकांना सांगितले होते. खुनी कायद्याला विरोध केल्यामुळे जे काही दुःख भोगावे लागेल ते सुख समजा आणि खुनी कायद्याचा विरोध करत असताना आपल्याला आपली संपत्ती आणि प्राण जरी अर्पावे लागले तरी ती गोष्ट आनंदाची मानली पाहिजे असे मी लोकांना सत्याग्रह आंदोलनात सांगत असे. हा विचार मनात येताच माझा निर्धार पक्का झाला आणि माझ्या मूर्खपणावर मी हसू लागलो. व्यावहारिक दृष्टीने मी विचार करू लागलो. इतर मित्रांना कशी शिक्षा होईल? त्यांनाही माझ्याबरोबर ठेवण्यात येईल काय? अशा प्रकारच्या विचारचक्रात मी गुंतलेलो असतानाच दार उघडले आणि पोलीस अधिकाऱ्याने त्याच्या मागोमागे येण्याचा हुकूम दिला. मी जेव्हा त्याच्या मागेमागे चालू लागलो तेव्हा त्याने मला पुढे केले आणि तो मागेमागे चालू लागला. तो मला तुरुंगाच्या पिंजरा गाडीजवळ घेऊन गेला आणि म्हणाला, “यात बस.” बसल्यानंतर मला जोहानिसबर्ग तुरुंगात नेण्यात आले.

तुरुंगात पोहोचल्यानंतर मला माझे कपडे काढायला लावले. तुरुंगात कैद्यांना नग्न करतात हे मला माहीत होते. सत्याग्रही म्हणून आपले हे कर्तव्य आहे असे आम्ही सर्वांनी मानले आणि तुरुंगाचे नियम जोपर्यंत अपमान करणारे वा धर्मविरोधी नसतील तोपर्यंत त्यांचे पालन केले पाहिजे. तिथे मला जे कपडे घालण्याकरिता दिले होते ते फार घाणेरडे होते. ते कपडे घालणे मला मुळीच आवडले नाही. ते कपडे घालताना आणि तसे करण्याकरिता मनाला समजावताना मला फार दुःख झाले. परंतु तुरुंगात थोडीफार घाण तर सहन करावीच लागेल असे समजून मी मनावर नियंत्रण ठेवले. माझे नाव, पत्ता लिहिल्यानंतर मला एका कोठडीत नेण्यात आले. काही काळ मी तिथे राहिलो. त्यानंतर माझ्याबरोबरचे लोकही हसतबोलत तिथे आले. माझ्यानंतर तिथे इतर खटल्यांची कशी सुनावणी साली आणि त्यात काय काय झाले ते सर्व त्यांनी मला सांगितले. माझा खटला संपल्यानंतर काळे झेंडे हातात घेऊन काही हिंदुस्तानींनी मिरवणूक काढली असल्याचे मला कळले. काही लोक क्षुब्धही झाले होते. मिरवणूक अडवून पोलिसांनी दोनचार लोकांना

मारलेही होते. आम्हा सर्वांना एकाच तुरुंगात आणि एकाच कोठडीत ठेवल्याचे पाहून आम्ही खुश झालो.

सायंकाळी सहा वाजता आमच्या कोठडीचे दार बंद करण्यात आले. दक्षिण आफ्रिकेत तुरुंगाच्या दाराला लोखंडी सळ्या नसतात. भिंतीच्या अगदी वर लोखंडाची जाळी लावलेला एक झरोखा असतो. यामुळे दार बंद केल्यानंतर एखाद्या तिजोरीत बंद केल्यासारखे आम्हाला वाटले. वाचकांना आढळून येईल की तुरुगाधिकाऱ्यांनी जसा आदरसत्कार रामसुंदरदासचा केला होता तसा आमचा केला नव्हता. यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही. रामसुंदर पहिला सत्याग्रही होता. यामुळे त्याच्याशी कसा व्यवहार करावा याचा तुरुंगाधिकाऱ्यांनी विचारच केला नसेल. आमची संख्या फार मोठी होती आणि अजूनही इतरांना पकडण्याचा सरकारचा विचार होता. यामुळे आम्हाला हबशी लोकांच्या कक्षात ठेवण्यात आले होते. दक्षिण आफ्रिकेत कैद्यांचे दोनच विभाग असतात. गोरे आणि काळे म्हणजे हबशी. आणि हिंदुस्तानींची गणना हबशी लोकांमध्ये होते. माझ्या सहकाऱ्यांनाही माझ्याप्रमाणेच दोन महिन्यांची साध्या कैदेची शिक्षा झाली होती.

साधी कैद झालेल्या लोकांना आपले कपडे घालण्याचा अधिकार असतो असे दुसऱ्या दिवशी आम्हाला कळले. आणि त्यांना ते कपडे घालायचे नसले तर साधी कैद झालेल्या लोकांकरिता जे विशेष कपडे असतात ते त्यांना दिले जातात. तुरुंगात घरचे कपडे वापरणे अनुचित होईल आणि तुरुंगातील कपडे घालण्यातच आपली शोभा आहे असे आम्हाला वाटले. आम्ही आमचा हा निर्णय तुरुंगाधिकाऱ्याला सांगितला. यामुळे साध्या कैदेतील हबशी लोकांचा पोषाख आम्हाला देण्यात आला. परंतु दक्षिण आफ्रिकेच्या तुरुंगात शेकडोंच्या संख्येत साधे कैदी नसतातच मुळी. यामुळे साध्या कैदेची शिक्षा झालेले शेकडोंच्या संख्येत जेव्हा इतर हिंदुस्तानी लोक येऊ लागले तेव्हा साध्या कैदेच्या लोकांकरिता असलेले कपडे कमी पडू लागले! कपड्यासंबंधात आम्हाला कोणतेच भांडण करायचे नव्हते. यामुळे कठोर कैदेची शिक्षा झालेल्या लोकांकरिता जे कपडे असतात ते घालण्यात आम्ही कोणतेच आढेवेढे घेतले नाही. नंतर आलेल्या काही कैद्यांनी असे

कपडे घालण्याऐवजी घरचे कपडे घालणे पसंत केले. मला ही गोष्ट आवडली नाही, परंतु अशा बाबतीत आग्रह धरणे मला योग्य वाटले नाही.

दुसऱ्या की तिसऱ्या दिवसानंतर सत्याग्रही कैदी मोठ्या संख्येत येऊ लागले. त्यांनी आपणहोऊन अटक करून घेतली होती. त्यांच्यातील बरेचसे फेरीवाले होते. दक्षिण आफ्रिकेत प्रत्येक फेरीवाल्याला, मग तो गोरा असो की काळा, परवाना घ्यावा लागत असतो, तो परवाना सतत आपल्याजवळ ठेवावा लागत असतो आणि पोलिसांनी मागणी केली की तो दाखवावा लागत असतो. जवळपास दररोजच कोणता ना कोणता पोलीस परवाना मागायला यायचा आणि तो न दाखवणाराला अटक करायचा. आम्ही तुरुंगात गेल्यानंतर तुरुंग कैद्यांनी भरून टाकायचा जमातीने निश्चय केला. फेरीवाले लोक याबाबतीत सर्वात पुढे राहिले. त्यांच्याकरिता अटक करवून घेणे सोपेही होते. त्यांना केवळ परवाना दाखवायला नकार द्यायचा होता. यानंतर त्यांना अटक होणे निश्चित असायचे. अशा प्रकारे अटक करवून घेणाऱ्या सत्याग्रहींची संख्या एक महिन्यात शंभरपेक्षा जास्त झाली. आणि थोडेबहुत कैदी तर रोजच यायचे. ते दररोजच्या बातम्या आपल्याबरोबर आणायचे. यामुळे वृत्तपत्रांशिवायच आम्हाला सर्व बातम्या कळायच्या. जेव्हा मोठ्या संख्येत सत्याग्रहीना अटक होऊ लागली तेव्हा एक तर न्यायाधीशांचा धीर सुटला असावा अथवा आम्हाला वाटत होते त्याप्रमाणे अटक झालेल्या सत्याग्रहींना साध्या कैदेची शिक्षा न करता सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्याकरिता सरकारने सूचना दिल्या असाव्या. ते काहीही असले तरी सर्वांना सक्तमजुरीची शिक्षा होऊ लागली. आजही मला असे वाटते की समाजाचा अंदाज बरोबर असावा. कारण सुरुवातीला ज्याला साध्या कैदेची शिक्षा झाली होती त्याची जर सुटका झाली आणि त्यानंतर त्याच लढ्यात न्यायालयाने त्याला सक्त मजुरीच्या कैदेची शिक्षा केली होती. हीच गोष्ट समाजाने दिलेल्या इतर लढ्यांनाही लागू आहे. ट्रान्सवाल वा नातालच्या कोणत्याही न्यायालयात सगळ्या स्त्रीपुरुष सत्याग्रहींना सक्तमजुरीचीच शिक्षा केली जात असे, साध्या कैदेची शिक्षा कोणालाही करण्यात आली नाही. सर्व न्यायाधीशांना एकाच प्रकारचा आदेश न मिळताही ते जर सर्वांना सारखीच शिक्षा असतील तर तो चमत्कारच म्हणावा लागेल.

जोहानिसबर्गच्या तुरुंगात साध्या कैदेची शिक्षा झालेल्या कैद्यांना सकाळच्या वेळी न्याहरीकरिता मक्याची पिठाची लापशी वा कांजी मिळायची. तिच्यात मीठ टाकत नसत. परंतु प्रत्येक कैद्याला कांजीत टाकण्याकरिता थोडेसे मीठ वेगळे मिळत असे. दुपारी बारा वाजता चार अंस भात, वरून मीठ आणि भातात टाकण्याकरिता एक अंस तूप आणि चार अंस डबलरोटी मिळत असे. सायंकाळी मक्याच्या पिठाची कांजी, तिच्याबरोबर थोडीशी भाजी. आणि भाजीतही प्रामुख्याने बटाट्याची भाजी दिली जायची. बटाटे लहान असले तर दोन आणि मोठे असले तर एक बटाटा दिला जाई. इतक्या जेवणाने कोणाचेही पोट भरत नसे. भात चोपडा आणि आसट असायचा. तुरुंगाच्या डॉक्टरकडे आम्ही थोडी मसाल्याची मागणी केली आणि हिंदुस्तानातील तुरुंगात कैद्यांना मसाले मिळत असल्याचेही सांगितले. डॉक्टरने उत्तर दिले, “हा हिंदुस्तान नाही. कैद्यांकरिता चव नसते. यामुळे मसाला मिळू शकत नाही.” आम्ही डाळीची मागणी केली आणि सांगितले की जेवणात स्नायू पुष्ट होतील असे काहीही नाही. यावर डॉक्टरने उत्तर दिले, “कैद्याने डॉक्टरप्रमाणे युक्तिवाद करू नये. तुम्हाला स्नायुपोषक जेवण दिले जाते कारण आठवड्यातून दोनदा तुम्हाला मक्याऐवजी उकडलेले वाटाणे दिले जातात.” आठवड्या किंवा पंधरवाड्यात माणसाला वेगवेगळ्या वेळी वेगवेगळे सत्त्व असलेले अन्न खाऊ घातले आणि त्यापासून माणसाचे शरीर आवश्यक सत्त्व शोषून घेऊ शकत असेल तर डॉक्टरचा हा तर्क बरोबर होता असे म्हणता येईल. खरे सांगायचे तर आमच्या सोयीकडे लक्ष पुरवण्याची डॉक्टरची मुळीच इच्छा नव्हती. तुरुंगाधिकाऱ्याने आमच्या मागणीप्रमाणे आमचे जेवण आम्हाला स्वतःला बनवू देण्याची परवानगी दिली. आमचा स्वयंपाक तयार करण्याकरिता आम्ही थंबी नायडूंची निवड केली. आमच्या स्वयंपाकासंबंधी त्यांना अनेकदा तुरुंगाधिकाऱ्याशी भांडावे लागत असे. वजनाप्रमाणे भाजी कमी दिली गेली तर पूर्ण वजनाइतक्या भाजीची ते मागणी करायचे. इतर वस्तूंबद्दलही असेच व्हायचे. भाजीच्या दिवशी, जी आठवड्यातून दोनदा मिळत असे, आम्ही दोन वेळा स्वयंपाक करत असू. इतर दिवशी केवळ एकदाच. इतर पदार्थ तयार करण्याची परवानगी असल्यामुळे आम्ही केवळ एकदाच स्वयंपाक करत असू. स्वयंपाकाचे काम आमच्या हाती आल्यापासून काहीशा समाधानाने आम्ही जेवण करू लागलो.

परंतु तुरुंगातील आमचा मुक्काम शांततापूर्वक आणि आनंदात घालवण्याचा आमचा निर्धार होता. अशा प्रकारच्या गैरसोयींमुळे कोणाच्याही निर्धारात व्यत्यय येऊ शकला नाही. या सोयी मिळवण्याच्या यशापयशाचा आमच्यावर कोणताही परिणाम होणार नव्हता. सत्याग्रही कैद्यांची संख्या वाढतावाढता दीडशेच्या वर गेली. आम्ही सर्व साध्या कैदेची शिक्षा झालेले कैदी होतो. यामुळे आमची कोठडी वगेरे साफ करण्याशिवाय आम्हाला दुसरे काम नसायचे. यामुळे तुरुंगाधिकाऱ्याला मी कोणते तरी काम मागितले. तो म्हणाला, “मी जर तुम्हाला काम दिले तर तो माझा अपराध समजला जाईल. यामुळे मी लाचार आहे. परंतु तुमची कोठडी स्वच्छ ठेवण्याकरिता तुम्ही हवा तितका वेळ घेऊ शकता.” यामुळे आम्ही कवायत सारख्या कसरतीची मागणी केली. सक्तमजुरीची शिक्षा झालेल्या हबशी कैद्याकडून  कवायत करून घेतली जात असल्याचे आम्ही पाहिले होते. पर्यवेक्षक उत्तरात म्हणाला,  “तुमच्या रखवालदाराला वेळ मिळत असेल व तो तुमच्याकडून कवायत करून घ्यायला तयार असेल तर मी विरोध करणार नाही. परंतु असे करण्याकरिता मी त्याच्यावर जबरदस्ती करू शकत नाही. त्याला फार काम करावे लागते आणि तुम्ही लोक मोठ्या संख्येत असल्यामुळे त्याचे काम अजूनच वाढले आहे.” आमचा रखवालदार फार सज्जन माणूस होता. त्याला केवळ पर्यवेक्षकाची परवानगी पाहिजे होती. तो दररोज सकाळी मोठ्या उत्साहाने आमच्याकडून कवायत करवून घेऊ लागला. आमच्या कोठडीच्या लहानशा अंगणातच आम्ही तालीम करू शकत होतो. याकरिता आम्हाला चोहोबाजूला चक्कर मारावी लागायची. तो सज्जन रखवालदार आम्हाला जे काही शिकवायचा त्याप्रमाणे तालीम करून घेण्याचे काम आमचा एक पठाण सहकारी नबाबखान करायचा. तालीममधील इंग्रजी शब्दांचा त्याने केलेला उर्दू उच्चार ऐकून सर्व खूप हसायचे. “स्टॅन्ड ऍट ईज”चा तो ‘टडलिस’ असा उच्चार करायचा. तो कोणता शब्द उच्चारतो आहे हे काही दिवस तर आम्हाला कळलेच नव्हते. नंतर आमच्या लक्षात आले की तो हिंदुस्तानी नाही तर नबाबखानी उच्चार होता.

# २१. पहिली तडजोड

अशा प्रकारे जवळपास १५ दिवस आम्ही तुरुंगात राहिलो असू. तेवढ्यात बाहेरून येणारे लोक सरकारबरोबर तडजोडीच्या काही गोष्टी सुरू असल्याच्या बातम्या घेऊन येऊ लागले. दोनतीन दिवसांनंतर जोहानिसबर्ग येथील 'ट्रान्सवाल लिडर' या दैनिकाचे संपादक श्री अल्बर्ट कार्टराईट मला भेटायला तुरुंगात आले. त्या काळात जोहानिसबर्गहून निघणाऱ्या सर्व दैनिकांची मालकी कोणत्या ना कोणत्या सोन्याच्या खाणमालकाकडे होती. त्यांचा स्वार्थ गुंतलेला नसेल अशा कोणत्याही प्रश्नावर संपादक आपले स्वतंत्र विचार स्पष्टपणे व्यक्त करू शकत असे. या वृत्तपत्राचे संपादक विद्वान आणि प्रख्यात व्यक्तींमधूनच निवडले जात. उदाहरणार्थ 'द डेली स्टार'चे संपादक एके काळी लॉर्ड मिल्नर यांचे स्वीय सचिव राहिलेले होते. आणि नंतर ते 'द टाईम्स'चे संपादक श्री बकल यांचे स्थान घेण्याकरिता लंडनला गेले होते. श्री अल्बर्ट कार्टराईट सुयोग्य तर होतेच शिवाय ते उदार मनाचे होते. आपल्या अग्रलेखांमधूनही ते बहुधा हिंदुस्तानींची बाजू घ्यायचे. त्यांच्यात आणि माझ्यात गाढ मैत्री झाली होती. आणि मी तुरुंगात गेल्यानंतर ते जनरल स्मट्सना भेटले होते. मध्यस्थ म्हणून काम करण्याकरिता जनरल स्मट्सनी त्यांच्या मध्यस्थीला मान्यता दिली होती. हिंदुस्तानी समाजाच्या नेत्यांनाही ते भेटले होते. नेत्यांनी त्यांना एकच उत्तर दिले - "कायद्यातील बारकावे आम्हाला कळू शकत नाहीत. गांधी तुरुंगात असताना आम्ही तडजोडीची बोलणी करणे शक्यच नाही. सरकारबरोबर तडजोड करण्याची आमची इच्छा आहे हे खरे आहे. परंतु आमचे लोक तुरुंगात असताना तुम्हाला तडजोडीची बोलणी करायची असतील तर तुम्हाला गांधींना तुरुंगात भेटावे लागेल. ते जे काही करतील ते आम्हाला मान्य असेल."

अशा प्रकारे श्री कार्टराईच मला भेटायला आले. जनरल स्मट्स यांनी तयार केलेला वा त्यांना पसंत असलेला तडजोडीचा एक खर्डाही त्यांनी आपल्याबरोबर आणला होता. तडजोडीच्या त्या खर्ड्याची भाषा अस्पष्ट होती. तो खर्डा मला पसंत नव्हता. परंतु तरीही एक बदल करण्याच्या अटीवर मी त्याच्यावर सही करण्याकरिता जरी तयार होतो तरी बाहेरच्या

हिंदुस्तानींच्या परवानगीशिवाय आणि तुरुंगातील सहकाऱ्यांचे मत घेतल्याशिवाय मी सही करू शकणार नाही असे मी कार्टराईटना सांगितले.

कराराचा तो खर्डा काहीसा असा होता - "परवाने बदलवून घेण्याचे काम हिंदुस्तानींच्या मर्जीवर अवलंबून ठेवावे. हे काम कायंद्यांतर्गत करता येऊ शकत नाही. परवान्याचे प्रारूप हिंदुस्तानींशी विचारविनिमय करून ठरवण्यात येईल. आणि बहुतांश हिंदुस्तानींनी स्वतःहोऊन परवाने घेतले तर सरकार खुनी कायदा रद्द करील आणि हिंदुस्तानींनी स्वतःहोऊन घेतलेल्या परवान्यांना कायदेशीर मान्यता देण्याकरिता नवीन कायदा करील." तडजोडीच्या या खर्ड्यात खुनी कायदा रद्द करण्याबद्दलचा स्पष्ट उल्लेख नव्हता. यामुळे ही गोष्ट स्पष्ट करण्याकरिता जेवढा बदल करणे आवश्यक होते तेवढा बदल मी सुचवला.

श्री अल्बर्ट कार्टराईटना इतकासा बदल करणेही आवडले नाही. ते म्हणाले, "कराराचे हे स्वरूप अंतिम आहे असे जनरल स्मट्स समजतात. मला स्वतःलाही हा पसंत आहे. परंतु तुम्ही सर्वांनी स्वतःहोऊन परवाने घेतले तर खुनी कायदा रद्द होईल असे मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो."

यावर मी म्हणालो, "तडजोड होवो वा न होवो, परंतु तुमच्या सहानुभूतीकरिता आणि मदतीकरिता आम्ही नेहमीच तुमचे ऋणी राहू. मला खर्ड्यात कोणताही अनावश्यक बदल नको आहे. ज्या भाषेमुळे सरकारची प्रतिष्ठा वाचेल त्या भाषेला मी विरोध करणार नाही. परंतु जिथे मला स्वतःलाच अर्थाबद्दल शंका वाटते तिथे मी बदल सुचवलाच पाहिजे. आणि अखेरीस जर तडजोड व्हायचीच असेल तर दोन्ही पक्षांना खर्ड्यामध्ये बदल करण्याचा अधिकार असलाच पाहिजे. 'कराराचा हा खर्डा अंतिम आहे' असे म्हणून जनरल स्मट्सनी आमच्या छातीवर पिस्तुल रोखायला नको. खुनी कायद्याच्या रूपाने आमच्यावर आधीच एक पिस्तुल रोखण्यात आलेले असताना या दुसऱ्या पिस्तुलाचा आमच्यावर काय परिणाम होणार आहे? "

माझ्या या युक्तिवादाला श्री कार्टराईट यांना विरोध करता आला नाही. खर्ड्यात बदल करण्याची सूचना जनरल स्मट्ससमोर मांडण्याचे त्यांनी कबूल केले.

तुरुंगातील माझ्या सहकाऱ्यांबरोबर मी विचारविनिमय केला. त्यांनाही खर्ड्याची भाषा आवडली नाही. परंतु मी सुचवलेला बदल जनरल स्मट्सनी मान्य केला तर सरकारबरोबर तडजोड करण्याकरिता त्यांची संमती होती. योग्य तडजोड होत असेल तर आमच्या संमतीची वाट न पाहता तडजोड करावी असा निरोप तुरुंगात नवीन आलेल्या कैद्यांनी बाहेरून आणला होता. त्या खर्ड्यावर मी, श्री क्विन, आणि थंबी नायडूंनी सह्या केल्या आणि आम्हा तिघांच्या सह्या असलेला तो खर्डा श्री कार्टराईट यांना दिला.

दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी म्हणजे ३० जानेवारी १९०८ला जोहानिसबर्ग पोलीस अधीक्षक मला जनरल स्मट्स यांच्याकडे घेऊन गेले. आम्हा दोघांमध्ये खूप गप्पागोष्टी झाल्या. श्री कार्टराईट यांच्याबरोबर जनरल स्मट्सचे जे बोलणे झाले होते तेही त्यांनी मला सांगितले. मी तुरुंगात गेल्यानंतरही हिंदुस्तानी समाज आपल्या प्रतिज्ञेवर टिकून राहिला याबद्दल त्यांनी माझे अभिनंदन केले, आणि म्हणाले, "माझ्या मनात तुम्हा लोकांबद्दल घृणा राहूच शकत नाही. तुम्हाला माहीतच आहे की मीसुद्धा बॅरिस्टर आहे. माझ्या काळात काही हिंदुस्तानीही माझ्याबरोबर शिकत होते. मला केवळ माझे कर्तव्य पार पाडायचे आहे. या कायद्याकरिता गोऱ्यांची मागणी आहे. आणि तुम्ही मान्य कराल की या कायद्याची मागणी करणारे बहुसंख्य लोक बोअर नसून गोरे आहेत. तुम्ही खर्ड्यामध्ये जो बदल सुचवला आहे तो मला मान्य आहे. जनरल बोथांबरोबरही यासंबंधात माझे बोलणे झाले आहे. आणि तुमच्यातील अधिकांश लोक जर स्वतःहोऊन परवाने घेतील तर मी आशियायी कायदा रद्द करीन असे मी तुम्हाला आश्वासन देतो. स्वतःहोऊन घेतलेल्या परवान्याला कायदेशीर रूप देण्याकरिता मी जे प्रारूप तयार करीन त्याचा मसुदा तुमच्याकडे पाठवीन. हा लढा परत सुरू व्हावा अशी माझी इच्छा नाही. मी तुमच्या भावनांचा आदर करतो."

अशा प्रकारे आमचे बोलणे झाल्यानंतर जनरल स्मट्स उठले. मी त्यांना विचारले, "आता मी कुठे जायचे आहे? आणि इतर सत्याग्रही कैद्यांचे काय?"

तेव्हा जनरल स्मट्स हसतहसत म्हणाले, "तुम्ही तर आतापासूनच मुक्त आहा. आणि तुमच्या सहकाऱ्यांना सोडण्याचा फोन मी उद्या करतो. परंतु तुम्ही लोकांनी फारशा सभा घेऊ नये असा माझा तुम्हाला सल्ला आहे. तुम्ही असे कराल तर त्यामुळे माझी परिस्थिती विचित्र होईल."

मी म्हणालो, “केवळ हौसेकरिता मी एकही सभा घेणार नाही. सरकारबरोबर तडजोड कशी झाली, तिचे स्वरूप काय आहे आणि तडजोड केल्यामुळे हिंदुस्तानींची जबाबदारी किती वाढली आहे या सर्व गोष्टी तर समाजातील लोकांना समजावून सांगाव्याच लागतील.”

जनरल स्मट्स म्हणाले, “अशा सभा तर तुम्ही हव्या तितक्या घेऊ शकता. माझा बोलण्याचा अर्थ तुम्हाला कळला इतके पुरेसे आहे.”

त्या वेळी सायंकाळचे जवळपास ५ वाजले होते. माझ्याजवळ एक पैसाही नव्हता. जनरल स्मट्सच्या सचिवांनी मला जोहानिसबर्गला जाण्याकरिता पैसे दिले. प्रिटोरियातील हिंदुस्तानींसमोर थांबून त्यांच्यासमोर तडजोड घोषित करण्याची आवश्यकता नव्हती. समाजाचे सर्व पुढारी जोहानिसबर्गमध्ये होते. आमचे मुख्य सचिवही तिथेच होते. जोहानिसबर्गला जाणारी एकच ट्रेन शिल्लक होती. मी ती पकडली.

# २२. तडजोडीला विरोध आणि माझ्यावर हल्ला

जवळपास रात्रीच्या नऊ वाजता मी जोहानिसबर्गला पोहोचलो. मी सरळ अध्यक्ष युसूफ मिया यांच्या घरी गेलो. मला प्रिटोरिया येथे नेल्याचे त्यांना कळले होते. ते माझी वाटच पाहत होते. परंतु मी एकटाच आलेलो पाहून सर्वांना आश्चर्यही वाटले आणि आनंदही झाला. जितक्या लोकांना बोलावणे शक्य असेल तितक्यांना बोलावून एक सभा घेण्याची सूचना मी केली. युसूफ मिया आणि इतरांनाही माझी सूचना आवडली. बहुतेक लोक एकाच मोहल्ल्यात राहत असल्यामुळे सर्वांना सभेची सूचना देणे कठीण नव्हते. अध्यक्षांचे घर मशिदीजवळच होते, आणि आमच्या सभा सामान्यपणे मशिदीच्या पटांगणातच होत असत. यामुळे सभेची विशेष व्यवस्था करण्याची गरज नव्हती. व्यासपीठावर उजेड असावा म्हणून केवळ एका गॅसबत्तीची व्यवस्था करायची होती. रात्रीच्या सुमारे ११-१२वाजता सभेची सुरुवात झाली. वेळ फार कमी असूनही जवळपास १,००० लोक सभेल आले होते.

सभेच्या आधी हजर असलेल्या पुढाऱ्यांना मी कराराच्या अटी समजावून सांगितल्या होत्या. काही पुढाऱ्यांनी कराराला विरोध केला. परंतु माझे संपूर्ण म्हणणे ऐकून घेतल्यानंतर सर्वानी कराराला संमती दिली. परंतु एक शंका सर्वांच्या मनात होती. - जनरल स्मट्सनी विश्वासघात केला तर? खुनी कायद्याची अंमलबजावणी कदाचित होणारही नाही, परंतु एखाद्या तलवारीप्रमाणे आपल्या डोक्यावर तो लटकत राहिला तर? अशा अवस्थेत परवाने घेऊन स्वतःचे हात कापून टाकण्याचा अर्थ होईल आपल्याजवळ त्या कायद्याला विरोध करण्याकरिता जे महान शस्त्र आहे त्याचा स्वतःहोऊन त्याग करणे. हे तर जाणूनबुजून शत्रूच्या सापळ्यात अडकणे होईल. आधी खुनी कायदा रद्द करणे आणि मग आम्ही स्वतःहोऊन परवाने घेणे ही खरी तडजोड झाली असती. हा युक्तिवाद मला योग्य वाटला. युक्तिवाद करणाराच्या धैर्याचे आणि त्याच्या तीक्ष्ण बुद्धीचे मला कौतुक वाटले आणि सत्याग्रही असेच असले पाहिजे असे मला वाटले.

समाजातील पुढाऱ्यांच्या या आक्षेपासंबंधी मी म्हणालो, “तुमचा युक्तिवाद अतिशय चांगला आहे. त्यावर गंभीरपणे विचार केला पाहिजे. खुनी कायदा रद्द केल्यानंतर आपण

स्वतःहोऊन परवाने घेणे याहून अधिक चांगली गोष्ट कोणती असू शकते? परंतु याला मी तडजोडीचे चिन्ह समजणार नाही. तडजोडीचा अर्थ हा असतो की जिथे तत्त्वांबद्दल मतभेद नसतो तिथे दोन्ही पक्षांनी परस्परांना भरपूर सूट आणि सवलती देणे. आपला सिद्धांत आहे की एरव्ही जे काम करायला कोणतीही हरकत वाटत नाही ते कामसुद्धा खुनी कायद्याला शरण जाऊन आपण करणार नाही. या तत्त्वावर आपल्याला अढळ राहायचे आहे. दुसरीकडे ट्रान्सवालमध्ये हिंदुस्तानींचा बेकायदेशीर प्रवेश बंद व्हावा म्हणून ज्या ओळखपत्राची अदलाबदल करता येणार नाही अशी ओळखपत्रे स्वतःहोऊन सर्व हिंदुस्तानींनी घ्यावी आणि अशा प्रकारे गोऱ्यांच्या मनातील धास्ती दूर करून त्यांना निश्चिंत करावे हा सरकारचा सिद्धांत आहे. सरकार या तत्त्वाचा त्याग कधीही करू शकत नाही. सरकारचा हा सिद्धांत आपल्याला मान्य असल्याचे आपण आपल्या आचरणातून दाखवले आहे. यामुळे या सिद्धांताला विरोध करावा असे जरी आपल्याला वाटत असेल तरी जोपर्यंत काही नवीन कारण उपस्थित होत नाही तोपर्यंत आपण या सिद्धांताच्या विरोधात लढू शकत नाही. आपला सत्याग्रहाचा लढा हा सिद्धांत अमान्य करण्याकरिता नाही तर खुनी कायद्याला विरोध करण्याकरिता आहे. यामुळे आपण जर आता आपल्यामध्ये निर्माण झालेल्या सामाजिक शक्तीचा उपयोग नवीन गोष्ट मिळवण्याकरिता करू लागलो तर त्यामुळे सत्याग्रही म्हणून आपल्या सत्याग्रहाला बट्टा लागेल. यामुळे खरे सांगायचे तर आपण या तत्त्वाचा विरोध करू शकत नाही.

"खुनी कायदा रद्द होण्याआधीच परवाने घेऊन आपले हात कापून आपण निःशस्त्र का व्हावे या युक्तिवादाचा आपण विचार करू या. याचे उत्तर तर फार सरळ आहे. सत्याग्रही नेहमीच भीतीला चार हात दूर ठेवत असतो. यामुळे विरोधकावर विश्वास ठेवायला तो कधीही घाबरत नाही. सत्याग्रही आपली नाव विश्वासाच्या बळावर वल्हवत असल्यामुळे वीस वेळा जरी विश्वासघात झाला तरी एकविसाव्या वेळी विश्वास ठेवण्याची त्याची तयारी असते. विरोधकावर विश्वास ठेवल्यामुळे सत्याग्रही आपले हात कापून घेतो असे समजणे म्हणजे सत्याग्रहाचा सिद्धांत न समजण्यासारखे आहे.

"कल्पना करा की आपण नवीन परवाने घेतले आणि त्यानंतर सरकार आपला विश्वासघात करते आणि खुनी कायदा रद्द करत नाही. असे झाले तर त्या वेळी आपण सत्याग्रह करणार नाही काय? असे परवाने घेतल्यानंतरही ते योग्य वेळी दाखवायला आपण नकार दिला तर त्या परवान्याची किंमत काय राहील? आपण असे केले तर जे हजारो हिंदुस्तानी बेकायदेशीरपणे ट्रान्सवालमध्ये घुसतात त्यांच्यात आणि आपल्यात सरकार कसा भेद करू शकेल? यामुळे कायदा असो वा नसो आमच्या सहकार्याशिवाय सरकार आपल्यावर अंकुश ठेवू शकत नाही. कायद्याचा अर्थ इतकाच आहे की सरकार आपल्यावर जे नियंत्रण ठेवू इच्छिते ते आपण मान्य केले नाही तर आपल्याला शिक्षा होऊ शकते. आणि सामान्यपणे शिक्षेच्या भीतीने माणूस नियंत्रण स्वीकारत असतो. परंतु सत्याग्रही या सामान्य नियमाचे उल्लंघन करतो. आणि त्याने जरी या नियंत्रणाचा स्वीकार केला तरी तो तसे कायद्याच्या भीतीने करत नाही तर शासकीय नियंत्रणामुळे लोककल्याण होईल या भावनेने तो स्वेच्छापूर्वक असे करत असतो. आणि या नवीन परवान्याबद्दलही आज आपली हीच स्थिती आहे. मोठ्यातमोठा विश्वासघात करूनही सरकार ही परिस्थिती बदलवू शकत नाही. जोपर्यंत आपल्या हाती सत्याग्रहाचे शस्त्र आहे तोपर्यंत आपण स्वतंत्र आणि निर्भय आहो.

"आणि कोणी जर मला असे सांगेल की आज समाजात जे बळ संचारलेले आहे ते परत येणार नाही तर त्याला सत्याग्रह कळत नाही असेच मी म्हणेन. त्याच्या म्हणण्याचा अर्थ होईल आज जी सत्याग्रहाची शक्ती दिसते ती खरी नाही तर एखाद्या उन्मादासारखी क्षणिक आहे. आणि हे जर खरे असेल जर मग आपल्याला जिंकण्याचा मुळीच अधिकार नाही. आणि जरी आपण जिंकलो तरी जिंकलेली बाजू आपण परत गमावून बसू. कल्पना करा सरकार खुनी कायदा रद्द करते, त्यानंतर आपण स्वतःहोऊन परवाने घेतो आणि असेही समजा की सरकार तोच खुनी कायदा परत मंजूर करते आणि हिंदुस्तानींवर परवाने घेण्याकरिता सक्ती करते. त्या वेळी असे करण्यापासून सरकारला कोण अडवू शकते? आणि आज जर आपल्याला आपल्या शक्तीविषयी शंका असेल तर त्या वेळीही आपली अशीच दुर्दशा होईल. यामुळे या समेटाकडे कोणत्याही दृष्टीने जरी पाहिले तरी यामुळे समाजाचे कोणतेही नुकसान होणार नाही, उलट लाभच होईल असे

म्हणता येऊ शकते. मला तर असेही वाटते की आपला नम्रपणा आणि न्यायबुद्धी पाहिल्यानंतर विरोधकही आपला विरोध सोडून देतील वा कमी करतील."

अशा प्रकारे त्या सभेत ज्या एक दोन लोकांनी समेटाला विरोध केला त्यांचे मी पूर्णपणे समाधान करू शकलो. परंतु जो धमाका मध्यरात्रीच्या सभेनंतर फुटणार होता त्याची मी स्वप्नातही कल्पना केली नव्हती. सभेत आलेल्या सर्व लोकांना मी समेटाच्या अटी सांगितल्या आणि म्हणालो-

"या समेटामुळे आपल्या समाजाची जबाबदारी फार वाढली आहे. आपण धोक्याने वा चुकीच्या पद्धतीने हिंदुस्तानींना ट्रान्सवालमध्ये घुसवू इच्छित नाही हे दाखवण्याकरिता आपल्याला स्वेच्छापूर्वक परवाने घ्यावे लागतील. कोणी जर परवाना घेणार नसेल तर त्याला आता तरी कोणतीही शिक्षा होणार नाही. परंतु परवाने न घेण्याचा अर्थ होईल आपल्या समाजाला समेट मान्य नाही. यामुळे आपण सर्व लोकांनी हात उचलून या समेटाचे स्वागत करणे आवश्यक आहे. माझीही अशीच इच्छा आहे. परंतु याचा अर्थ होईल सभेत हात उंच करणारे सर्व लोक नवीन परवाने मिळण्याची व्यवस्था होताच नवीन परवाने घेऊ लागतील. हात उंच करण्याचा हाच अर्थ होईल असे मला वाटते. आणि आजपर्यंत ज्याप्रमाणे परवाने न घेण्याची गोष्ट लोकांना समजावून सांगण्याकरिता तुमच्यातील अनेक लोक स्वयंसेवक झाला होता त्याचप्रमाणे आता परवाने घेण्याची गोष्ट समजावून सांगण्याकरिताही तुम्हाला स्वयंसेवक व्हावे लागेल. आपण जेव्हा आपले कर्तव्य पूर्णपणे पार पाडू तेव्हाच आपण खरोखरी विजयाच्या फळाचा आस्वाद घेऊ शकू."

मी भाषण संपवल्याबरोबर एक पठाण मित्र (मीर आलम) उभा राहिला आणि त्याने माझ्यावर प्रश्नांची सरबत्ती सुरू केली - "या समेटानुसार आम्हाला हाताच्या दहाही बोटांचे ठसे द्यावे लागतील काय?"

"होय अथवा नाहीही. सर्व लोकांनी दहाही बोटांचे ठसे दिले पाहिजे असा माझा तरी सल्ला आहे. परंतु ज्याचा या गोष्टीकरिता धार्मिक विरोध असेल वा ज्यांना दहाही बोटांचे ठसे देण्यात अपमान वाटतो त्यांनी ठसे दिले नाही तरी चालेल."

"तुम्ही स्वतः काय करणार आहा?"

"मी दहाही बोटांचे ठसे देण्याचे ठरवले आहे. मी ठसे दिले नाही आणि इतरांना ठसे देण्याकरिता सांगू लागलो तर ते विचित्रपणाचे होईल. माझ्याकडून असे होणे कधीही शक्य नाही."

"दहा बोटांच्या ठशांबद्दल तुम्ही बरेच काही लिहीत होता. बोटांचे ठसे केवळ गुन्हेगार जमातीच्या लोकांचेच घेत असतात आणि समाजाचा हा लढा दहा बोटांच्या ठशाचा लढा आहे ही गोष्ट तुम्हीच सांगत होता. हे सर्व आज कुठे गेले?"

"दहा बोटांच्या ठशांसंबंधी पूर्वी मी ज्या ज्या गोष्टी लिहिल्या होत्या त्याबद्दल आजही माझे म्हणणे आहे की दहाही बोटांचे ठसे गुन्हेगार जमातींकडूनच घेतले जात असतात. खुनी कायद्यांतर्गत बोटांचे ठसे तर दूरच, सही करणेसुद्धा पाप आहे असे मी आधीही सांगितले होते आणि आजही सांगतो. दहा बोटांच्या ठशांवर मी फार जोर दिला ही गोष्टही खरी आहे, आणि असा जोर देण्यात मी काहीही चूक केली नव्हती असा माझा विश्वास आहे. खुनी कायद्यातील या लहानसहान गोष्टींची अंमलबजावणी आपण करत आलो आहो . त्यांच्यावर भर देऊन समाजाला समजावून सांगण्यापेक्षा दहा बोटांच्या नवीन गोष्टीवर भर देऊन समाजाला समजावून सांगणे सोपे होते. आणि समाजाला ही गोष्ट फार लवकर कळली असेही मला आढळले.

"परंतु आजची परिस्थिती वेगळी आहे. जी गोष्ट कालपर्यंत अपराध होती ती आज बदललेल्या परिस्थितीत सौजन्याची आणि खानदानीपणाचे चिन्ह झाली आहे हे मी जोर देऊन सांगू इच्छितो.सलाम करण्याकरिता जर बळजबरी करण्यात आली आणि मी सलाम केला तर मी तुमच्या, लोकांच्याआणि स्वतःच्या नजरेतून खाली पडेन. परंतु मी तुम्हाला भाऊ वा माणूस म्हणून स्वतःहोऊन सलाम करत असेन तर त्यातून माझा नम्रपणा आणि कुलीनपणा व्यक्त होईल. आणि खुदाच्या दरबारातही माझे ते कृत्य चांगले म्हणूनच गणले जाईल. याच आधारावर मी समाजाला दहाही बोटांचे ठसे देण्याचा सल्ला देतो आहे."

"आम्ही ऐकले आहे की तुम्ही समाजाला धोका दिला आहे आणि १५,००० पौंड घेऊन समाजाला जनरल स्मट्स यांच्या हाती विकून टाकले आहे. ना तर आम्ही दहा बोटांचे ठसे देऊ ना

कुणाला देऊ देऊ. खुदाची शपथ घेऊन मी सांगतो की जो माणूस ठसे देण्याकरिता आशियायी विभागाच्या कार्यालयात सगळ्यात आधी जाईल त्याला मी जिवानिशी मारून टाकीन."

मी म्हणालो, "या पठाण मित्राच्या भावना मी समजू शकतो. लाच घेऊन मी समजाला विकू शकतो यावर समजातील कोणताही माणूस विश्वास ठेवणार नाही याबद्दल मला खात्री आहे. ज्या लोकांनी दहाही बोटांचे ठसे न देण्याची शपथ घेतली आहे त्यांना ठसे देण्याकरिता कोणीही बाध्य करू शकणार नाही याची कल्पना मला आधीपासूनच होती. आणि ज्या पठाणांची वा इतर लोकांची बोटांचे ठसे दिल्याशिवाय परवाने घेण्याची इच्छा असेल त्यांना तशा प्रकारे परवाने मिळावे म्हणून मी मदत करीन. दहाही बोटांचे ठसे दिल्याशिवायच त्यांना परवाने मिळू शकतील असा विश्वास मला आहे.

"परंतु मी कबूल केले पाहिजे की जिवानिशी मारून टाकण्याची धमकी मला पसंत नाही. कोणाला मारून टाकण्याची शपथ देवाच्या नावावर घेता येऊ शकत नाही अशीही माझी मान्यता आहे. यामुळे मी असेच समजतो की या मित्राने रागाच्या भरात क्षणिक आवेगात जिवानिशी मारून टाकण्याची शपथ घेतली आहे. परंतु हा मित्र शपथेनुसार वागो अथवा न वागो, तडजोड करणारी एक मुख्य व्यक्ती म्हणून, समाजाता सेवक म्हणून सर्वात आधी बोटांचे ठसे देणे माझे कर्तव्य आहे. आणि ईश्वराजवळ मी प्रार्थना करीन की त्याने हे काम मलाच सर्वात आधी करू द्यावे. मरण तर प्रत्येकाच्याच नशिबी लिहिलेले असते. रोगाने वा अशाच कोणत्या कारणाने मरण्यापेक्षा कोणत्या तरी भावंडाच्या हाताने मरण्याचे दुःख मला होऊच शकत नाही. त्या वेळीही मी किंचितही क्रोध केला नाही वा मारणाराबद्दल मी मनात द्वेषभाव बाळगला नाही तर मला माहीत आहे की त्यामुळे माझे तर भवितव्य सुधारेलच शिवाय मी निर्दोष असल्याचेही मला मारणाराच्या लक्षात येईल."

वरील प्रश्न मला का विचारण्यात आले याचे कारण समजून घेणे जरुरीचे आहे. जे हिंदुस्तानी खुनी कायद्याला शरण गेले होते त्यांच्याबद्दल कोणताही वैरभाव ठेवण्यात आला नव्हता. परंतु त्यांच्या या कामाच्या विरोधात स्पष्ट आणि कठोर शब्दांत बरेच काही बोलण्यात

आले होते आणि 'इंडियन ओपिनियन'मध्येही बरेच काही लिहिले गेले होते. यामुळे कायद्याला शरण जाणारांचे जीवन नक्कीच दुःखी झाले होते. समाजातील इतके जास्त लोक आपल्या प्रतिज्ञेवर अढळ राहतील आणि सरकारलाही समेट करण्याकरिता भाग पडेल अशी ताकद ते दाखवतील असा विचारच त्यांनी कधी केला नव्हता. परंतु दीडशेपेक्षा जास्त सत्याग्रही जेव्हा तुरुंगात गेले आणि सरकार आणि समाजाच्या नेत्यामध्ये बोलणी सुरू झाली तेव्हा कायद्याला शरण जाणारांनासुद्धा वाईट वाटले. त्यांच्यात असेही काही लोक होते की ज्यांना तडजोड होऊ नये असे वाटत होते, आणि तडजोड झालीच तर ती तुटावी अशी इच्छा ते करत होते.

ट्रान्सवालमध्ये फार कमी पठाण राहत होते. मला असे वाटते की पन्नासेक लोकांपेक्षा त्यांची संख्या जास्त नसावी. त्यांच्यातील अनेक पठाण बोअर युद्धाच्या वेळी सैनिक म्हणून आले होते. आणि ज्याप्रमाणे युद्धाच्या वेळी आलेल्या गोऱ्यांनी तिथेच वास्तव्य केले होते त्याचप्रमाणे सैनिक म्हणून आलेल्या काही पठाणांनीही तिथेच वास्तव्य केले होते. पठाण स्वभावाने अतिशय चांगले असतात. बहाद्दूर तर ते असतातच. मारणे आणि मरणे ही त्यांच्याकरिता अतिशय सामान्य गोष्ट असते. त्यांना जर कोणाचा राग आला तर ते त्याला मारतात. त्यांच्या भाषेत ते त्यांची पाठ नरम करतात. आणि केव्हा केव्हा तर ते त्याला ठारही मारतात. आणि असे करत असताना ते अगदी निष्पक्षपाती असतात. सख्ख्या भावाबरोबरही ते असाच व्यवहार करतात. ट्रान्सवालमध्ये पठाणाचा समाज इतका लहान असूनही त्यांच्यात भांडणे झाली की ही मारपीट व्हायचीच. त्यातही जेव्हा कोणी पठाण दुसऱ्या पठाणाचा विश्वासघात करायचा तेव्हा तर त्यांना आपल्या रागावर नियंत्रण ठेवणे मुळीच शक्य होत नसे. अशा वेळी न्याय मिळवण्याकरिता मारपीट करणे हाच त्यांचा कायदा असतो. पठाणांचा हा समुदायही सत्याग्रह आंदोलनात भाग घेत होता. त्यांच्यापैकी एकही पठाण खुनी कायद्याला शरण गेला नव्हता. त्यांची दिशाभूल करणे सोपे होते. दहा बोटांच्या ठशाच्या बाबतीत त्यांचा गैरसमज करून त्यांची दिशाभूल करणे मुळीच कठीण नव्हते. मी जर लाच घेतली नसेल तर मी त्यांना दहा बोटांचे ठसे देण्याकरिता का सांगतो? इतकीशी सूचकता पठाणांच्या मनात शंका निर्माण करण्याकरिता पुरेशी असते.

याशिवाय एक दुसरा पक्षही ट्रान्सवालमध्ये होता. त्या पक्षात असे हिंदुस्तानी होते की जे परवाने न घेता वा खोट्या परवान्याच्या आधारावर ट्रान्सवालमध्ये लपूनछपून घुसले होते वा लोकांना घुसवत होते. सरकारबरोबर समेट होऊ नये यातच या लोकांचा स्वार्थ होता. जोपर्यंत समाजाचा सरकारबरोबर लढा सुरू राहणार होता तोपर्यंत कोणालाही परवाने दाखवावे लागणार नसल्यामुळे हा पक्ष बिनधास्त होऊन आपला व्यापार सुरू ठेवू शकत होता आणि समाजाचा लढा सुरू असेपर्यंत त्याकरिता तुरुंगात जाण्याचीही त्यांना भीती नव्हती. यामुळे ही लढाई जितकी लांब चालेल तितकाच या पक्षाचा फायदा होणार होता. यामुळे हे लोकसुद्धा पठाणांना भडकवू शकत होते. पठाण एकाएकी का भडकले हे आता वाचकांच्या लक्षात येऊ शकेल.

परंतु मध्यारात्रीच्या या उपहासात्मक भडीमाराचा सभेवर काहीही परिणाम झाला नाही. मी तडजोडीबद्दलचे मत मागितले होते. अध्यक्ष आणि इतर नेतागण आपल्या भूमिकेवर दृढ होते. पठाणांबरोबर झालेल्या माझ्या संवादानंतर अध्यक्षांनी तडजोडीच्या अटी समजावून सांगणारे आणि ही तडजोड स्वीकारण्याची आवश्यकता का आहे हे समजावून सांगणारे भाषण केले. यानंतर त्यांनी सभेचे मत घेतले. त्या वेळी सभेत हजर असलेल्या दोनचार पठाणांशिवाय इतर सर्वांनी तडजोडीचा स्वीकार केला. मी रात्री दोन वा तीन वाजता घरी पोहोचलो. झोपण्याचा प्रश्नच नव्हता कारण लवकर उठून मला इतर लोकांना तुरुंगातून सोडवण्याकरिता जायचे होते. सकाळी सात वाजता मी तिथे पोहोचलो. तुरुंगाधिकाऱ्याला फोनद्वारे निरोप मिळालेला होता, आणि तो माझी वाटच पाहत होता. एक तासाच्या आत सर्व सत्याग्रही कैद्यांना सोडण्यात आले. अध्यक्ष आणि इतर हिंदुस्तानी त्या सर्वांना घ्यायला आले होते. तुरुंगातून आमची मिरवणूक सरळ सभेच्या ठिकाणाकडे गेली. तिथे परत सभा झाली. तो दिवस आणि नंतरचे तीनचार दिवस भोजनसमारंभात आणि लोकांना तडजोडीच्या अटी समजावून सांगण्यात गेले.

जसजसा काळ लोटत गेला तसातसा समेटाचा गूढार्थ अधिकाधिक स्पष्ट होत गेला तर दुसरीकडे गैरसमजही वाढत गेले. प्रक्षोभाच्या कारणांची चर्चा आपण वर केलेलीच आहे. याशिवाय जनरल स्मट्सनी लिहिलेल्या पत्रातही गैरसमजाकरिता कारण उपस्थित होते. यामुळे

अनेक प्रकारचे आक्षेप घेण्यात येत असत. ते दूर करण्यात मला जितका त्रास झाला तितका सत्याग्रह सुरू असतानाही झाला नव्हता. हा त्रास त्यापेक्षा किती तरी मोठा होता. लढाईच्या वेळी आपण ज्याला शत्रू वा मित्र समजतो त्याच्याबरोबर व्यवहार करत असताना अडचणी निर्माण होत असतात. परंतु अशा अडचणी सहजपणे दूर करता येऊ शकतात असा माझा अनुभव आहे. त्या वेळी आपसातील भांडणे, अविश्वास, फूट इत्यादी गोष्टी बहुधा होतच नाहीत, आणि जरी झाल्या तरी तुलनात्मक दृष्टीने त्या फार लहान असतात. परंतु लढाई संपल्यानंतर आपसातील विरोध, अविश्वास, हेवा, मत्सर वा लढाईच्या वेळी ज्या गोष्टी दबलेल्या असतात त्या वर येतात आणि लढाईचा अंत जरी समेटाने झाला असेल तरी त्यात दोष काढण्याचे काम सोपे असल्यामुळे अनेक लोक ते काम आपल्या हाती घेतात. जिथे संघटनेत लोकशाही असते तिथे लहानमोठ्या सर्व लोकांच्या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागत असतात. आणि त्यांचे समाधान करावे लागत असते. हीच खरी पद्धत आहे. माणूस जितका अनुभव अशा प्रसंगी म्हणजे मित्रांबरोबर होणाऱ्या गैरसमजाच्या वा भांडणाच्या वेळी मिळवतो तितका विरोधी पक्षाबरोबर होणाऱ्या भांडणातून मिळवत नाही. विरोधकाबरोबर सुरू असलेल्या संघर्षात एक प्रकारचा नशा असतो. यामुळे ती लढाई लढणारांमध्ये उत्साह आणि उल्हास कायम राहतो. परंतु मित्रांमध्ये जेव्हा गैरसमज निर्माण होतो तेव्हा ती असामान्य घटना समजली जाते. व ती नेहमीच दु:खद असते. परंतु तरीही माणसाची परीक्षा अशाच वेळी होत असते हा माझा नेहमीचा अनुभव आहे. आणि मला नेहमी असेच वाटत असते की अशा वेळी माणूस श्रेष्ठतम आध्यात्मिक शक्ती प्राप्त करू शकतो. ज्या लोकांना लढाई सुरू असताना सत्याग्रहाचे खरे रूप कळले नव्हते त्या लोकांना समेटाच्या काळात आणि त्यानंतर त्याचे शुद्ध स्वरूप चांगल्या प्रकारे कळले. खरा आणि गंभीर विरोध पठाणांपर्यंतच शिल्लक राहिला आणि तो पुढे गेला नाही.

असे करताकरता दोनतीन महिन्यात आशियायी विभागाने नवीन परवाने देण्याची तयारी केली. परवान्यांचे रूप पूर्णपणे बदलले होते. त्याला नवीन रूप देताना सत्याग्रह मंडळाशी विचारविनिमय करण्यात आला होता.

दिनांक १० फेब्रुवारी १९०८ला सकाळी आमच्यापैकी काही लोक परवाने घेण्याकरिता आशियायी विभागात जाण्याकरिता तयार झाले. परवान्याचे काम शक्य तितक्या लवकर पूर्ण केले पाहिजे ही गोष्ट समाजातील लोकांना चांगल्या प्रकारे समजावून सांगण्यात आली होती. तसेच पहिल्या दिवशी समाजाच्या पुढाऱ्यांनीच परवाने घेण्याकरिता जावे असेही विचारविनिमयानंतर ठरले होते. लोकांचा संकोच दूर करणे, आशियायी विभागातील लोक हे काम सौजन्याने करतात की नाही हे जाणून घेणे, त्या कामातील इतर बारीकसारिक माहिती करून घेणे, सर्व कामावर देखरेख ठेवणे हा यामागील उद्देश होता. माझे कार्यालय सत्याग्रह मंडळाचेही कार्यालय होते. तिथे पोहोचताच कार्यालयाच्या भिंतीपलीकडे मीर आलम आणि त्याच्या इतर सोबत्यांना तिथे उभे असलेले मी पाहिले.

मीर आलम माझा जुना अशील होता. आपल्या प्रत्येक कामात तो माझा सल्ला घेत असे. टान्सवालमध्ये अनेक पठाण मजुरांकडून गवताच्या वा नारळाच्या काथ्याच्या गाद्या भरण्याचे काम करवून घेत असत आणि मग चांगला नफा घेऊन त्या विकून टाकत असत. मीर आलमही हाच व्यवसाय करत होता. तो सहा फुटाहून जास्त उंच होता. त्याची देहयष्टी भरदार होती आणि त्याचे हाडपेर मजबूत होते. आज पहिल्यांचा मी मीर आलमला ऑफिसच्या आत असण्याऐवजी बाहेर उभा असलेला पाहिले. आम्हा दोघांची नजरानजर झाल्यानंतरही आज त्याने पहिल्यांदाच मला सलाम केला नव्हता. परंतु मी त्याला सलाम केला आणि त्यामुळे त्यानेही मला सलाम केला. सवयीप्रमाणे मी त्याला विचारले, “कसा आहेस?” मला वाटले उत्तरात त्याने चांगला आहे असे म्हटले. परंतु त्याच्या चेहऱ्यावर नेहमीचे स्मित नव्हते. मला त्याच्या डोळ्यात राग भरलेला दिसला. या गोष्टीची मी मनात नोंद घेतली. आज काही ना काही होणार आहे असेही मला वाटले. मी ऑफिसमध्ये शिरलो. अध्यक्ष युसूफ मिया आणि इतर सदस्यही येऊन पोहोचले, आणि आशियायी विभागाकडे आम्ही जाऊ लागलो. मीर आलम आणि त्याचे सोबतीही मागेमागे चालू लागले.

आशियायी विभागाची इमारत वॉन ब्रॅन्डिस चौकात होती. माझ्या ऑफिसपासून ती एक मैलाहूनही कमी अंतरावर होती. तिथे जाण्याकरिता आम्हाला हमरस्त्यावरून जावे लागले. वॉन

ब्रॅन्डिस स्ट्रीटवरून चालचाचालता आम्ही मेसर्स ऑर्नोट आणि गिब्सनचे दुकान ओलांडले. तिथून आशिया विभागाचे कार्यालय तीनेक मिनिटांवर राहिले असावे. तेव्हा मीर आलम माझ्या बाजूला आला. त्याने मला विचारले, “कुठे चालला?” मी उत्तर दिले, “मी दहाही बोटांचे ठसे देऊन परवाना घेण्याकरिता चाललो आहे. केवळ दोन बोटांच्या ठशाने तुझा परवाना काढल्यानंतर मी माझा परवाना घेइन. ”

अखेरचे वाक्य मी मोठ्या मुश्तिलीने पूर्ण केले असेलनसेल तोच माझ्या डोक्यावर पाठीमागून एक वार झाला. मी ‘हे राम’ म्हणत बेशुद्ध होऊन जमिनीवर पडलो. नंतर काय झाले याचे मला काहीही भान नव्हते. परंतु मीर आलमने आणि त्याच्या सोबत्यांनी मला काठ्यांनी आणि लाथांनी अजून मारले. त्यातील काही वार थंबी नायडू आणि युसूफ मिया यांनी झेलले. यामुळे युसूफ मिया आणि थंबी नायडू यांनाही थोडा मार खावा लागला. एवढ्यात आरडाओरड झाली. तिथून येणारेजाणारे गोरे गोळा झाले. मीर आलम आणि त्याचे सोबती पळाले. परंतु गोऱ्यांनी त्याला पकडले. एवढ्यात पोलीसही येऊन पोहोचले. त्यांनी पठाणांना ताब्यात घेतले.

जवळच जे. सी. गिब्सन यांचे ऑफिस होते. मला उचलून तिथे नेण्यात आले. काही वेळेनंतर मी जेव्हा शुद्धीवर आलो तेव्हा माझ्या चेहऱ्यावर ओणवे झालेले रेव्हरंड डोक मला दिसले. त्यांनी मला विचारले, “कसे वाटते तुम्हाला?”

मी हसून उत्तर दिले, “आता बरा आहे.”परंतु माझ्या दातात आणि फासळ्यात वेदना होत आहेत. नंतर मी विचारले, “मीर आलम कुठे आहे?”

डोक म्हणाले, “त्याला आणि त्याच्या सोबत्यांना पकडण्यात आले आहे.”

मी म्हणालो, “त्यांची सुटका झाली पाहिजे.”

डोक - “ते सर्व होत राहील. परंतु तुम्ही इथे एका अपरिचित ऑफिसमध्ये पडलेले आहा. तुमचे ओठ कापले गेले आहेत. पोलीस तुम्हाला दवाखान्यात नेण्याकरिता तयार आहेत. परंतु तुम्ही माझ्या घरी आला तर मी आणि श्रीमती डोक तुमची यथाशक्ती शुश्रुषा करू.”

मी म्हणालो, “मला तुमच्याच घरी घेऊन चला. पोलिसांच्या प्रस्तावाकरिता त्यांना धन्यवाद द्या. परंतु त्यांना सांगा की ‘गांधीला माझ्याकडे येणे अधिक पसंत आहे.’”

एवढ्यात आशियायी विभागाचे श्री चमनी तिथे येऊन पोहोचले. एका गाडीत झोपवून मला सज्जन पाद्री श्री डोक यांच्या घरी नेण्यात आले. मला तपासण्याकरिता एका डॉक्टरला बोलावण्यात आले. इतक्यात मी चमनी यांना म्हणालो, “तुमच्या कार्यालयात येऊन दहा बोटांचे ठसे देऊन पहिला परवाना घेण्याची माझी इच्छा होती. परंतु ईश्वराला हे मान्य नव्हते. आता तुम्हाला माझी विनंती आहे की आताच्या आता तुम्ही आवश्यक कागदपत्रे आणा आणि पहिला परवाना मला द्या. माझ्याआधी तुम्ही दुसऱ्या कोणालाही परवाना देणार नाही अशी मी आशा करतो.”

ते म्हणाले, “इतकी काय काय घाई आहे? आता डॉक्टर येतील, तुम्ही आराम करा. नंतर सर्व काही होईल. इतरांना जरी परवाना दिला तरी तुमचे नाव मी सर्वात आधी ठेवीन.”

मी म्हणालो, “असे नाही. माझी प्रतिज्ञा आहे की मी जर जिवंत राहिलो आणि ईश्वराला मान्य असले तर सर्वात आधी मी परवाना घेईन. यामुळे तुम्ही कागदपत्रे आणावी असा माझा आग्रह आहे.”

यानंतर कागदपत्रे आणण्याकरिता श्री चमनी ऑफिसमध्ये गेले.

माझे दुसरे काम महाधिवक्त्याला म्हणजे सरकारी वकिलाला पुढील तार करण्याचे होते. “मीर आलम आणि त्याच्या सोबत्यांनी माझ्यावर केलेल्या हल्ल्याकरिता मी त्यांना मुळीच दोषी समजत नाही. ते काहीही असले तरी त्यांच्यावर सरकारी खटला भरला जावा अशी माझी इच्छा नाही. माझ्याकरिता तरी तुम्ही त्यांना सोडून द्याल अशी आशा आहे.” या तारेमुळे मीर आलम आणि त्याच्या सोबत्यांना सोडण्यात आले.

परंतु जोहानिसबर्ग येथील गोऱ्यांनी महाधिवक्ता यांना एक कडक पत्र लिहिले - “अपराध्याला शिक्षा करण्यासंबंधी श्री गांधींचे काहीही जरी मत असले तरी या देशात त्याची अंमलबजावणी

होऊ शकत नाही. गांधींना जी मारहाण झाली त्याबद्दल ते जरी काहीही बोलत नसतील तरी हल्लेखोरांनी श्री गांधींना एखाद्या खाजगी घरात मारलेले नाही. पठाणांनी हा हल्ला एका हमरस्त्यावर केलेला आहे. यामुळे याला सार्वजनिक अपराध म्हणावे लागेल. काही इंग्रजसुद्धा या अपराधाचे साक्षीदार आहेत. अपराध्यांना पकडायलाच पाहिजे." या आंदोलनामुळे महाधिवक्त्यांनी मीर आलम आणि त्याच्या सोबत्यांना अटक केली आणि त्यांना तीन तीन महिन्यांची शिक्षा झाली. केवळ मलाच साक्षीकरिता बोलावण्यात आले नव्हते.

परंतु आपण आधी आजाऱ्याच्या खोलीकडे वळू या. श्री चमनी कागदपत्रे आणण्याकरिता गेले तेवढ्यात डॉ. थ्वेट्स आले. त्यांनी मला तपासले. माझा वरचा ओठ कापला गेला होता. गालालाही एक जखम झाली होती. यामुळे टाके लावून डॉक्टरांनी दोन्ही जखमा शिवल्या. फासळ्या तपासून त्यांच्यावर लावण्याकरिता एक औषध दिले. तसेच टाके तोडेपर्यंत न बोलण्याकरिता सांगितले. पातळ पदार्थांशिवाय इतर काहीही खाण्याकरिता मनाई केली. माझ्या शरीराला कुठेही गंभीर इजा झाली नाही असे डॉक्टरांनी निदान केले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे एकदोन आठवड्यात अंथरूण सोडून मी सर्वसाधारण कामाला लागू शकणार होतो. परंतु दोनेक महिने शरीरावर कामाचा फारसा ताण न पडू देण्याची काळजी घ्यावी लागणार होती. या सर्व सूचना दिल्यानंतर डॉक्टर निघून गेले.

अशा प्रकारे माझे बोलणे बंद झाले, पण माझे हात चालू शकत होते. अध्यक्षाद्वारे समाजाला संबोधित करणारे गुजरातीतीतल एक पत्र छापण्याकरिता पाठवले. पत्र असे होते -

"माझी प्रकृती चांगली आहे. श्री आणि श्रीमती डोक अंतःकरणपूर्वक माझी सेवाशुश्रूषा करत आहेत. काहीच दिवसात मी माझ्या कामाला लागेन. ज्या लोकांनी मला मारले त्या लोकांबद्दल माझ्या मनात किंचितही राग नाही. कळत नसल्यामुळे त्यांनी हे काम केले आहे. त्यांच्यावर खटला भरण्याची मुळीच आवश्यकता नाही. सर्व लोक जर शांत राहिले तर या घटनेचाही आपल्याला फायदाच होईल.

"हिंदूंनी मनात किंचितही राग ठेवू नये. या घटनेमुळे हिंदू-मुसलमानांत तेढ निर्माण न होता गोडवा निर्माण व्हावा अशी माझी इच्छा आहे. खुदाला - ईश्वराला माझी हीच प्रार्थना आहे.

“मला मारहाण नक्कीच झाली आहे. परंतु याहूनही जरी जास्त मारहाण झाली असती तरी मी तुम्हाला एकच सल्ला देईन. जवळपास सर्व हिंदुस्तानींनी दहाही बोटांचे ठसे दिले पाहिजे. यावर जर कोणाचा खरोखरच धार्मिक आक्षेप असेल तर सरकार त्यांना सूट देईल. यातच समाजाचे आणि गरिबांचे हित आणि सुरक्षाही आहे.

“आपण जर खरे सत्याग्रही असू तर माराला आणि भविष्यात होणाऱ्या विश्वासघाताला आपण घाबरणार नाही. जे लोक दहा बोटांचे ठसे न देण्यावर अडलेले आहेत त्यांना कळत नााही असे मी समजतो.

“ईश्वराला माझी प्रार्थना आहे की त्याने समाजाचे रक्षण करावे. त्याला सत्याच्या मार्गावर ठेवावे आणि हिंदू-मुसलमानांची अंतःकरणे माझ्या रक्ताने जोडावी.”

श्री चमनी कागदपत्रे घेऊन आले. त्रास होत असतानाही कसे तरी करून मी माझ्या दहाही बोटांचे ठसे दिले. त्या वेळी मला त्यांच्या डोक्यात अश्रू दिसले. त्यांच्या विरोधात मला अनेकदा कठोर शब्द लिहावे लागत होते. परंतु वेळ येताच माणसाचे अंतःकरण किती भावूक होऊ शकते या गोष्टीचे प्रत्यक्ष चित्र मला त्या वेळी दिसले.

तो विधी पूर्ण करण्यात काही मिनिटांपेक्षा जास्त वेळ लागला नसेल याची वाचक सहज कल्पना करू शकतील. श्री डोक आणि त्यांच्या सौजन्यशील पत्नीला मी लवकरात लवकर बरे व्हावे असे वाटत होते. हल्ल्यात जखमी झाल्यानंतरची माझी मानसिक धडपड पाहून त्यांना दुःख होत असे. याचा दुष्परिणाम माझ्या प्रकृतीवर न होवो अशी भीती त्या दोघांनाही वाटत असे. यामुळे खुणा करून आणि इतर युक्तिप्रयुक्त्यांनी त्यांनी लोकांना माझ्या पलंगापासून दूर नेले आणि मला लिहिण्याची वा इतर काही करण्याची मनाई केली. मी त्यांना विनंती केली की (लिहून) मला तुमच्या मुलीने, ऑलिव्हने (त्या वेळी ती अगदी लहान मुलगीच होती) माझे प्रिय भजन ‘लीड काईंडली लाईट’ म्हटले तर मला लवकर आणि शांत झोप लागू शकेल.  श्री डोक यांना माझी ही विनंती फार आवडली. ही गोष्ट मला त्यांच्या गोड स्मितातून कळली. त्यांनी खुणेने ऑलिव्हला बोलावले आणि दाराबाहेर उभे राहून ते भजन हळूहळू म्हणायला सांगितले. हे लिहीत असतानाही

ते दृश्य माझ्या डोळ्यांसमोर तरळते आहे, आणि त्या दिव्य स्वराचे ध्वनी माझ्या कानात अजूनही गुंजारव करत आहेत.

या प्रकरणात मी अनेक अशा गोष्टी लिहिल्या आहेत की ज्या वाचंकांना तर काय, मला स्वतःलाही विषयाशी संबंध नसलेल्या वाटतात. परंतु तरीही अजून एक आठवण सांगितल्याशिवाय मी हे प्रकरण संपवू शकत नाही. त्या काळातील सर्वच आठवणी माझ्याकरिता इतक्या पवित्र आहेत की मी त्या सोडूच शकत नाही. डोक कुटुंबियांच्या सेवासुश्रूषेचे वर्णन मी कोणत्या शब्दात करू?

श्री जोसेफ डोक बॅप्टिस्ट संप्रदायातील धर्मगुरू (पाद्री) होते. त्या वेळी त्यांचे वय ४६ वर्ष होते. दक्षिण आफ्रिकेत येण्यापूर्वी ते न्यूझिलंडमध्ये राहत होते. माझ्यावर पठाणांनी हल्ला केला त्याच्या जवळपास सहा महिन्यांपूर्वी ते माझ्या कार्यालयात आले होते आणि त्यांनी आपल्या नावाची चिठ्ठी पाठवली होती. त्यात 'रेव्हरंड' या शब्दांचा उल्लेख करण्यात आला होता. मला ख्रिश्चन बनवण्याकरिता वा सत्याग्राहीची लढाई बंद करण्याचा सल्ला देण्याकरिता अथवा आश्रयदाता म्हणून समाजाच्या लढाईत मदत करण्याकरिता ज्याप्रमाणे अनेक पाद्री येतात तसेच डोकही आले असावे असा माझा गैरसमज झाला होता. परंतु डोक आत आल्यानंतर काही काही मिनिटांच्या गप्पागोष्टींवरूनच माझ्या लक्षात माझी चूक आली आणि मनातल्या मनात मी त्यांची क्षमा मागितली. त्या दिवसापासून आम्ही दोघे घनिष्ट मित्र झालो. समाजाच्या लढ्यासंबंधी वृत्तपत्रांमधून जे काही छापले जायचे ते सर्व त्यांना माहीत असल्याचे मला आढळले. ते म्हणाले, "या लढ्यात तुम्ही मला माझा मित्र समजा. माझ्याकडून जे काही मला करता येणे शक्य असेल ते मी माझे कर्तव्य समजून करू इच्छितो. दुःखी लोकांच्या दुःखात सहभागी होणे हीच गोष्ट मी येशू ख्रिस्ताच्या जीवनाचे चिंतन केल्यानंतर शिकलो आहे." अशा प्रकारे आमची ओळख झाली आणि आमच्यामधील प्रेम आणि घनिष्टता वाढत गेली.

या इतिहासात वाचकांना अनेक ठिकाणी श्री डोक यांचे नावही आढळून येईल. परंतु डोक कुटुंबियांनी माझी जी सेवाशुश्रुषा केली तिचे वर्णन करण्याआधी श्री डोक यांची इतकी ओळख करून देणे आवश्यक होते. कुटुंबातील कोणी ना कोणी रात्रंदिवस माझ्याजवळ असायचाच.

जितका काळ मी त्यांच्याजवळ राहिलो तितका काळ त्यांचे घर धर्मशाळाच झाले होते! हिंदुस्तानी फेरीवाले मजुरासारखे कपडे घालायचे. ते भरपूर मळलेलेही असायचे. त्यांच्या जोड्यांवर धुळीचे थर चढलेले असायचे. त्यांच्याजवळ मालाची टोपली आणि गाठोडेही असायचे. अशा हिंदुस्तानींपासून तर ट्रान्सवाल इंडियन असोशिएशनच्या अध्यक्षांपर्यंतच्या विविध लोकांची मला भेटण्याकरिता रीघ लागलेली असायची. डॉक्टरच्या परवानगीनंतर सर्व प्रकारचे लोक माझ्या प्रकृतीची चौकशी करण्याकरिता येत असत. श्री डोक सर्व लोकांना समान आदराने आणि समान प्रेमाने दिवाणखान्यात बसवायचे. जोपर्यंत मी डोक यांच्या घरी राहिलो तोपर्यंत त्यांचा सगळा वेळ माझी शुश्रूषा करण्यात जात असे. रात्रीसुद्धा ते दोनतीनदा गुपचुप माझ्या खोलीत यायचे आणि मला पाहून जायचे. हे घर माझे नाही आणि माझे सर्वात जवळचे नातलगसुद्धा माझी याहून अधिक चांगली काळजी घेऊ शकले असते असे त्यांच्या घरी राहत असताना मला एकदासुद्धा वाटले नाही.

हिंदुस्तानींच्या लढ्याचे इतक्या उघडपणे समर्थन केल्यामुळे वा मला आपल्या घरात ठेवल्यामुळे श्री डोक यांना कोणताच त्रास सहन कारावा लागला नाही असा वाचकांनी कृपाकरून समज करून घेऊ नये. बॅप्टिस्ट समुदायाच्या लोकांकरिता ते एक ट्रस्ट चालवत असत. याच संप्रदायाच्या लोकांवर त्यांची उपजिविका अवलंबून होती. त्या संप्रदायातील सर्व अनुयायी उदार मताचे होते असेही समजण्याचे कारण नाही. हिंदुस्तानींबद्दलची सामान्य अढी त्यांच्याही मनात होती. परंतु डोकनी त्यांची मुळीच फिकीर केली नाही. आमच्या ओळखीच्या सुरुवातीलाच मी त्यांच्याशी यासंबंधात चर्चा केली होती. त्यांनी दिलेले उत्तर इथे देण्यासारखे आहे. ते म्हणाले होते, “प्रिय मित्रा, येशूच्या धर्माला तू कसा ओळखतोस? मी त्या महापुरुषाचा अनुयायी आहे जो आपल्या धर्माकरिता सुळावर चढला होता. आणि त्याचे प्रेम या विश्वासारखेच विशाल होते. जे गोरे माझा त्याग करतील अशी तुला भीती वाटते त्यांच्यासमोर येशूचे प्रतिनिधित्व करण्याची मी थोडीशी जरी अभिलाषा बाळगत असेन तर मी हिंदुस्तानी समाजाच्या लढ्यात सार्वजनिक स्वरूपात भाग तर घेतलाच पाहिजे, आणि असे केल्याबद्दल माझे मंडळ जर मला काढून टाकेल तर त्याबद्दल मी दुःख करायला नको. परंतु तुला असे तर वाटत नाही ना की केवळ माझ्या आजिविकेकरिता

मी त्यांच्याशी संबंध ठेवतो वा ते माझी आजिविका पुरवणार आहेत? माझी आजिविका तर माझा ईश्वरच पुरवतो. ते केवळ निमित्तमात्र आहेत. त्यांनी माझ्या धार्मिक स्वातंत्र्याच्या आड येऊ नये या अनुच्चारित गृहीतकावर त्यांचे आणि माझे संबंध आधारलेले आहेत. यामुळे तू माझी मुळीच काळजी करू नकोस. हिंदुस्तानींवर उपकार करण्याकरिता काही मी या लढ्यात सामील झालेलो नाही. हा माझा धर्म आहे असे समजून मी यात सहभागी झालो आहे. आणि खरे सांगायचे तर हिंदुस्तानी समाजाशी माझा जो संबंध आहे तो जर तुम्हाला पसंत नसेल तर तुम्ही मला नोकरीवरून काढू शकता आणि दुसरा पाद्री ठेवू शकता असे चर्च प्रमुखांनाही मी स्पष्टपणे सांगितले आहे. परंतु चर्चप्रमुखांनी यासंबंधात मला पूर्णपणे निश्चिंत तर केले आहेच, शिवाय प्रोत्साहनही दिले आहे याशिवाय सर्व गोरे हिंदुस्तानींकडे घृणेने पाहतात असाही समज तू करू घेऊ नकोस. तुम्हा लोकांच्या दुःखाबद्दल अप्रत्यक्षपणे किती गोऱ्यांना सहानुभूती वाटते याची तुला कल्पनाच नसेल, परंतु मला याची कल्पना आहे हे तू सहजपणे मान्य करशील."

इतके स्पष्ट बोलणे झाल्यानंतर मी परत कधीही हा विषय डोकसमोर काढला नाही. आणि नंतर जेव्हा समाजाचा लढा सुरू होता तेव्हा ऱ्होडेशियात आपले धर्मकार्य करताकरता डोक स्वर्गवासी झाले. त्या वेळी त्यांच्या अनुयायांनी एक सभा घेतली होती. त्या सभेत मला, श्री काछलियांना आणि इतर काही हिंदुस्तानींनाही आमंत्रित करण्यात आले होते आणि तिथे भाषण करण्याकरिताही मला निमंत्रण मिळाले होते.

जवळपास दहा दिवसात मी हिंडण्याफिरण्यासारखा झालो. ही स्थिती आल्यानंतर या प्रेमळ कुटुंबाचा मी निरोप घेतला. आम्हा दोघांकरिताही हा वियोग दुःखद सिद्ध झाला.

# २३. गोरे सहाय्यक

समाजाच्या या लढ्यात हिंदुस्तानींची बाजू घेऊन इतक्या काही प्रतिष्ठित गोऱ्यांनी या लढ्यात भाग घेतला होता की त्या सर्वांची या ठिकाणी ओळख करून देणे अनुचित होणार नाही. यामुळे ठीकठिकाणी जेव्हा त्यांची नावे येतील तेव्हा वाचकांना ती अनोळखी वाटणार नाही आणि लढाईचे वर्णन करताकरता मलाही मध्येच अडखळावे लागणार नाही. ज्या क्रमात मी ही नावे देतो आहे तो क्रम ना तर त्यांच्या प्रतिष्ठेप्रमाणे असेल ना लढ्यात त्यांनी केलेल्या कामाच्या उपयोगितेनुसार. तसेच काही प्रमाणात हा क्रम या गोऱ्या मित्रांच्या परिचयाच्या काळाप्रमाणे आणि लढ्यातील उपविभागात त्यांच्याकडून झालेल्या मदतीप्रमाणे आहे ही गोष्ट वाचकांनी लक्षात ठेवावी.

यात सर्वात पहिले नाव अल्बर्ट वेस्टचे येते. लढा सुरू होण्यापूर्वीच त्यांचे समाजाशी संबंध जुळलेले होते आणि माझ्याशी तर त्याचे संबंध त्यापूर्वीच दृढावले होते. जोहानिसबर्गमध्ये मी जेव्हा माझे कार्यालय उघडले तेव्हा माझे कुटुंब माझ्याबरोबर नव्हते. वाचकांना आठवत असेल की १९०३ साली दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींची तार मिळाल्यामुळे मी एकाएकी दक्षिण आफ्रिकेत गेलो होतो. एका वर्षांच्या आत मी दक्षिण आफ्रिकेतून परतेन अशी आशा मला त्या वेळी वाटत होती. जोहानिसबर्गमध्ये एक शाकाहारी भोजनालय होते. तिथे मी दररोज नियमितपणे सकाळ-संध्याकाळी जेवायला जात असे. वेस्टही तिथे यायचे. तिथेच आम्हा दोघांची ओळख झाली. एका दुसऱ्या गोऱ्याच्या भागीदारीत ते छापखाना चालवत होते. १९०४ साली जोहानिसबर्ग येथील हिंदुस्तानींमध्ये प्लेगची जोरदार साथ आली होती. मी रोग्यांच्या सेवाशुश्रुषेत लागलो होतो. यामुळे त्या भोजनालयात माझे जाणे अनियमित झाले होते. आणि जेव्हा केव्हा मी जात असे तेव्हा इतर जेवणारे योण्यापूर्वीच मी जेवण करून निघून जात असे. माझ्यामुळे इतरांना प्लेगचा संसर्ग होऊ नये म्हणून मी असे करत असे. मी जेव्हा लागोपाठ काही दिवस वेस्टना भोजनालयात दिसलो नाही तेव्हा ते घाबरले. प्लेगच्या रुग्णांच्या सेवाशुश्रूषेत मी लागलो असल्याचे त्यांनी वृत्तपत्रांमधून

वाचले होते. तिसऱ्या दिवशी सायंकाळी ६ वाजता मी जेव्हा हाततोंड धूत होतो तेव्हा वेस्टनी माझ्या खोलीचे दार ठोठावले. मी दार उघडले तर वेस्टचा हसरा चेहरा समोर दिसला.

खुश होऊन ते म्हणाले, “तुम्हाला पाहून मी निश्चिंत झालो. भोजनालयात तुम्ही दिसत नव्हता म्हणून मी घाबरलो होतो. माझ्या मदतीची काही गरज असेल तर मला नक्कीच सांगा.”

मी गमतीच्या सुरात विचारले, “रोग्यांची शुश्रूषा कराल?”

“का नाही, मी एकदम तयार आहे.”

एवढासा विनोद सुरू असताना माझ्या मानत एक विचार आला  मी म्हणालो, “तुमच्याकडून मी वेगळ्या उत्तराची अपेक्षाच करू शकत नव्हतो. परंतु रोग्यांच्या सेवाशुश्रूषेत मदत करणारे अनेक लोक आहेत. तुमच्याकडून यापेक्षा कठीण काम करून घेण्याची मी अपेक्षा ठेवतो. मदनजीत इथे प्लेगच्या कामात लागलेले असल्यामुळे ‘इंडियन ओपिनियन’चा छापखाना निराधार झाला आहे. मदनजीतला तर मी प्लेगच्या कामात अडकवून ठेवले आहे. यामुळे तुम्ही जर डरबनला गेला आणि छापखान्याकडे पाहिले तर ती खरोखरच फार मोठी मदत होईल. परंतु या कामाचे आकर्षण वाटावे असे त्यात काहीही नाही. मी तुम्हाला फार कमी म्हणजे महिन्याचे १० पौंड देऊ शकेन. आणि छापखान्यात जर काही फायदा झाला तर अर्धा नफा तुमचा.”

“हे काम थोडे वेगळे नक्कीच आहे. मला माझ्या भागीदाराशी बोलावे लागेल. काही वसुलीही गोळा करावी लागेल. परंतु काळजी करू नका. आज सायंकाळपर्यंत सांगतो.”

“जरूर, सहा वाजता आपण पार्कमध्ये भेटू.”

पार्कमध्ये आम्ही भेटलो. वेस्टनी आपल्या भागीदाराची परवानगी घेतली. वसुली गोळा करण्याचे काम माझ्यावर सोपवले आणि दुसऱ्या दिवशी सायंकाळी ते डरबनकरिता रवाना झाले. एका महिन्यात त्यांच्याकडून अहवाल आला - “छापखान्यात नफा मुळीच नाही. भरपूर तोटा आहे. उधारीला काही सीमा नाही. ना वहीखात्यात हिशोब नीट ठेवण्यात आलेले आहेत, ना ग्राहकांची पूर्ण नावे आहेत, ना त्यांचे पत्ते. इतर अव्यवस्थितपणाही भरपूर आहे. हे मी तक्रार करण्याकरिता

लिहीत नाही. मी इथे नफा कमावण्याकरिता आलेलो नाही. यामुळे हाती घेतलेले काम मी सोडणार नाही याबद्दल तुम्ही निश्चिंत राहा. परंतु दीर्घ काळ तोटा भरत राहावा लागेल याची मी पूर्वसूचना देतो."

'इंडियन ओपिनियन'चे ग्राहक बनवण्याकरिता आणि मुद्रणालयासंबंधी चर्चा करण्याकरिचा मदनजीत जोहानिसबर्गला आलेले होते. मी दरमहा थोडाबहुत तोटा भरतच होतो. यामुळे असा किती तोटा भरावा लागणार आहे हे माहीत करून घेण्याची माझी इच्छा होती. वाचकांना मी सांगितलेच आहे की मुद्रणालय सुरु करतानासुद्धा मदनजीतला त्यासंबंधी काहीही अनुभव नव्हता. यामुळे त्यासंबंधी कोणी अनुभवी माणूस जर मदनजीतबरोबर ठेवला तर बरे होईल असे मला वाटत होते. इतक्यात मध्येच प्लेगचे हे संकट आले. अशा कामात मदनजीत फार कुशल आणि निर्भय समजले जात असल्यामुळे मी त्यांना जोहानिसबर्गमध्ये थांबवून घेतले होते. यामुळेच वेस्टच्या अनपेक्षित सूचनेचे मी स्वागत केले. आणि प्लेग सुरू असेपर्यंतच नाही तर नेहमीकरिता तुम्हाला डरबनला जायचे आहे असे मी त्यांना समजावून सांगितले. यामुळेच त्यांनी वरील अहवाल माझ्याकडे पाठवला होता.

वाचकांना माहीतच असेल की 'इंडियन ओपिनियन''आणि त्याचे मुद्रणालय यांना फिनिक्समध्ये स्थलांतरित करण्यात आले होते. वेस्ट १० पौंडाऐवजी ३ पौंड घेऊ लागले होते. या सर्व बदलांशी वेस्टची पूर्ण सहमती होती. आपली उपजीविका कशी चालेल याची भीती वेस्टना वाटली असे मला कधी आढळले नाही. त्यांनी धर्माचा अभ्यास केलेला नसला तरी मी त्यांना पूर्ण धार्मिक माणूस समजतो. ते अतिशय स्वतंत्र मनोवृत्तीचे होते. एखादी गोष्ट जशी आहे असे त्यांना वाटायचे तशी ते स्पष्टपणे सांगायचे. काळ्याला कृष्णवर्णीय म्हणण्याऐवजी ते काळा म्हणून टाकायचे. त्यांची राहणी अगदी साधी होती. आम्हा दोघांची ओळख झाली तेव्हा ते ब्रह्मचारी होते आणि ते ब्रह्मचर्याचे पालन करत होते हे मला माहीत आहे. त्यानंतर आईवडिलांना भेटण्याकरिता ते इंग्लंडमध्ये गेले. आणि तिथून लग्न करून परतले. माझ्या सल्ल्याप्रमाणे त्यांनी आपल्या

बायकोला, सासूला आणि आपल्या कुमारी बहिणीला सोबत आणले होते. फिनिक्समध्ये ते अगदी साधेपणाने राहत होते आणि हिंदुस्तानींमध्ये ते पूर्णपणे मिसळून गेले होते.

कुमारी एडा वेस्ट (आम्ही तिला देवीबेन म्हणत असू.) ३५ वर्षांची असावी. परंतु ती अजूनही अविवाहितच होती आणि अतिशय पवित्र जीवन व्यतीत करत होती. तिनेसुद्धा फिनिक्सवासीयांची काही कमी सेवा केली नाही. फिनिक्समध्ये राहत असलेल्या लहान मुलांना सांभाळणे, त्यांना इंग्रजी शिकवणे, सार्वजनिक स्वयंपाकघरात स्वयंपाक करणे, घरांची सफाई करणे, वहीखात्यात हिशोब ठेवणे, मुद्रणालयात खिळे जुळवणे वा इतर कोणतेही काम असो, या भगिनीने ते काम करायला कधी टाळाटाळ केली नाही. आज त्या फिनिक्समध्ये नाहीत कारण मी हिंदुस्तानात परतल्यानंतर त्यांना लागणारा किमान खर्चही मुद्रणालय सहन करू शकत नव्हते. वेस्टच्या सासूचे वय आता (१९२४-२५ साली) ८०च्या दरम्यान असावे. त्या फार सुंदर पद्धतीने शिवणकाम करायच्या. यामुळे म्हातारपणीसुद्धा त्या शिवणकामात आश्रमाला संपूर्ण मदत करायच्या. फिनिक्समध्ये सर्व त्यांना ग्रॅनी मा (आजी) म्हणत असत आणि तसेच मानायचेही. फिनिक्समधील सर्व लोक जेव्हा तुरुंगात गेले तेव्हा वेस्ट परिवाराने मगनलाल गांधींच्या मदतीने फिनिक्सच्या व्यवस्थेकडे पाहिले होते. ‘इंडियन ओपिनियन’ आणि छापखान्याशी संबंधित सर्व कामे तर वेस्ट पाहायचेच, शिवाय माझ्या आणि इतरांच्या अनुपस्थितीत डरबन येथून पाठवावयाच्या तारांच्या कामाकडेही वेस्टच पाहायचे. अखेरीस जेव्हा वेस्टनासुद्धा अटक करण्यात आली (जरी त्यांना लगेच सोडून देण्यात आले होते) तेव्हा गोखले घाबरले आणि त्यांनी हिंदुस्तानातून ॲन्ड्र्यूज आणि पिअर्सन यांना दक्षिण आफ्रिकेत पाठवले.

दुसरे सहाय्यक होते रिच. यांच्याबद्दल मी आधी लिहिले आहे. सत्याग्रह लढ्याच्या आधीपासूनच ते माझ्या कार्यालयात काम करू लागले होते. माझ्या अनुपस्थितीत माझे काम सांभाळता यावे म्हणून बॅरिस्टरी शिकण्याकरिता ते इंग्लंडमध्ये गेले होते. तिथे लंडन येथील साऊथ आफ्रिकन ब्रिटिश इंडियन कमेटीच्या सर्व कामाची जबाबदारी त्यांनी घेतली होती.

तिसरे सहाय्यक होते पोलाक. वेस्टप्रमाणेच पोलाक यांची ओळखसुद्धा भोजनालयातच झाली होती. तेसुद्धा एकाएकी 'द ट्रान्सवाल क्रिटिक'मधील उपसंपादकाचे पद सोडून 'इंडियन ओपिनियन'मध्ये आले होते. सत्याग्रहाच्या लढ्याच्या संबंधात त्यांनी इंग्लंडसह संपूर्ण हिंदुस्तानचा दौरा केला होता हे सर्वांना माहीत आहेच. रिच इंग्लंडमध्ये गेल्यामुळे मी पोलाक यांना फिनिक्सहून जोहानिसबर्ग येथील माझ्या कार्यालयात बोलावून घेतले होते. आधी त्यांना मी उमेदवार वकील म्हणून काम दिले आणि नंतर ते पूर्ण वकील झाले होते. काही दिवसांनंतर त्यांनी लग्न केले. श्रीमती पोलाक यांनाही मी ओळखतो. या महिलेने आपल्या पतीबरोबर सत्याग्रहाच्या कामात पूर्ण मदत केली, त्यात कधीही अडथळा आणला नाही. आणि आज (१९२४-२५साली) असहकाराच्या लढ्यात जरी हे दाम्पत्य आपल्याबरोबर नसले तरीही ते हिंदुस्तानची यथाशक्ती मदत करत आहेत.

यानंतर हर्मन कॅलेनबॅक. समाजाची लढाई सुरू होण्यापूर्वीच माझे त्यांच्याशी संबंध जुळले होते. ते जर्मन आहेत आणि जर्मनीशी युद्ध सुरू झाले नसते तर आज ते हिंदुस्तानात असते. त्यांचे अंतःकरण विशाल आहे. आणि त्यांच्या सरळपणाला आणि भोळेपणाला सीमा नाही. ते अतिशय भावनाशील आहेत. ते अभियंत्याचा व्यवसाय करतात. कितीही हलके काम असले तरी हे काम मी कसा करू असा प्रश्न त्यांना कधीही पडला नाही. मी जेव्हा जोहानिसबर्गचे माझे घर सोडले तेव्हा आम्ही दोघेही बरोबरच राहत होतो. यामुळे माझा खर्चही तेच करायचे. घर तर त्यांचे होतेच. परंतु मी जेव्हा माझ्या वाट्याचा खर्च देण्याची गोष्ट काढत असे तेव्हा ते म्हणायचे, "उधळपट्टी करण्यापासून मला वाचवणारेही तुम्हीच आहा." आणि त्यांचे म्हणणे खरेच होते. परंतु गोऱ्यांबरोबरच्या व्यक्तिगत संबंधांची चर्चा करण्याचे हे ठिकाण नाही. सत्याग्रहींना एका ठिकाणी ठेवण्याचा जेव्हा आम्ही विचार केला तेव्हा कॅलेनबॅकनी कोणतेही भाडे न घेता आपले ११०० बिघ्यांचे शेत भाडे न घेता आमच्या उपयोगाकरिता दिले. याचे विस्तृत वर्णन वाचक पुढे वाचतील. गोखले जेव्हा दक्षिण आफ्रिकेत आले तेव्हा समाजातर्फे त्यांना कॅलनबॅक यांच्या बंगल्यात ठेवण्यात आले होते. गोखल्यांना हा बंगला फार आवडला होता. त्यांना निरोप देण्याकरिता कॅलनबॅक झांजीबारपर्यंत माझ्याबरोबर आले होते. लढ्याच्या वेळी पोलाकबरोबर त्यांनाही अटक

करण्यात आली होती आणि त्यांनाही तुरुंगाची शिक्षा भोगावी लागली होती. अखेरीस दक्षिण आफ्रिका सोडून मी जेव्हा गोखल्यांना भेटण्याकरिता इंग्लंडमध्ये गेलो तेव्हा कॅलनबॅक माझ्याबरोबर होते. कॅलनबॅकना माझ्याबरोबर हिंदुस्तानात येण्याची परवानगी पहिल्या विश्वयुद्धामुळेच मिळू शकली नाही. इतर सर्व जर्मनांप्रमाणे त्यांनाही नजरकैदेत ठेवण्यात आले होते. युद्ध संपल्यानंतर ते परत जोहानिसबर्गला गेले आणि आपला अभियंत्याचा व्यवसाय त्यांनी परत सुरू केला.

आता मी वाचकांना एका पवित्र मुलीची ओळख करून देतो. गोखल्यांनी तिला दिलेले प्रमाणपत्र वाचकांसमोर ठेवण्याचा मोह मी आवरू शकत नाही. या मुलीचे नाव आहे सोज्ना श्लेशिन. गोखल्यांमध्ये माणूस ओळखण्याची अदभुत क्षमता होती. डेलागोआ बेपासून तर झांजिबारपर्यंत मी त्यांच्याबरोबर गेलो होतो. त्या वेळी त्यांच्याबरोबर गप्पा मारण्याची मला सुंदर संधी मिळाली होती. दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानी आणि गोऱ्या पुढाऱ्यांशीही त्यांची चांगली ओळख झाली होती. त्यातील सर्व पुढाऱ्यांच्या स्वभावाचे सूक्ष्म विश्लेषण त्यांनी माझ्याजवळ केले होते. मला चांगले आठवते की त्यांनी सर्व हिंदुस्तानी आणि गोरे यांच्यामध्ये पहिले स्थान कुमारी श्लेषिन यांना दिले होते. ते म्हणाले होते, “श्लेषिनसारखे निर्मळ अंतःकरण, कामाची एकाग्रता आणि दृढनिश्चय या गोष्टी क्वचितच कोणा माणसात आढळतील. आणि हिंदुस्तानींच्या लढाईत कोणत्याही लाभाची अपेक्षा न करता तिला इतके सर्वस्व अर्पण करताना पाहून तर मी आश्चर्यचकित झालो होतो. याशिवाय या सर्व गुणांसोबत तिचे कौशल्य आणि स्फूर्ती यांच्यामुळे तुमच्या या लढाईत ती अमूल्य सेविका बनली आहे. मी सांगण्याची आवश्यकता नाही, तरीही सांगतो की तुम्ही तिला तुमच्याजवळच ठेवा.”

‘मिस डिक’ म्हणून एक स्कॉट लघुलेखिका माझ्याजवळ काम करत असे. तिच्या प्रामाणिकपणाला आणि नैतिकतेला कोणतीही सीमा नव्हती. या जीवनात मला जरी बरेच कडू अनुभव आले असले तरी माझ्या संपर्कात उत्तम चारित्र्याचे इतके काही हिंदुस्तानी आणि इंग्रज आले आहेत की त्यामुळे मी स्वतःला भाग्यशाली समजतो. या स्कॉट कुमारीची विवाहाची वेळ आल्यानंतर ती मला सोडून गेली होती. तेव्हा श्री कॅलेनबॅक सोज्ना श्लेषिन यांना घेऊन आले

आणि मला म्हणाले, "या मुलीला हिच्या आईने मला सोपवले आहे. ही हुशार आणि प्रामाणिक आहे. परंतु ही अतिशय खोडकर आणि स्वतंत्र मनोवृत्तीची आहे. हिला कदाचित उद्धटही म्हणता येऊ शकेल. तुम्ही हिच्याकडून काम घेऊ शकत असाल तर हिला तुमच्याजवळ ठेवा. केवळ पगाराकरिता मी हिला तुमच्याजवळ ठेवून राहिलेलो नाही." मी कोणत्याही लघुलेखिकेला दरमहा २० पौंड देण्याकरिता तयार होतो. परंतु कुमारी श्लेशिनच्या पात्रतेबद्दल मला काहीही कल्पना नव्हती. श्री कॅलेनबॅक म्हणाले, "तुम्ही हिला सध्या महिन्याला ६ पौंड द्या." मी लगेच कबूल केले.

कुमारी श्लेषिनच्या खोडसाळपणाचा अनुभव मला लगेच आला. परंतु एका महिन्याच्या आत तिने मला आपलेसे करून टाकले. रात्र असो की दिवस, ती नेहमी काम करण्याकरिता तयार असायची. तिच्याकरिता कोणतेही काम कठीण वा अशक्य नव्हते. त्या वेळी तिचे वय सोळा होते. पावित्र्य, सेवा करण्याबद्दलची तत्परता आणि स्पष्टवक्तेपणा या गुणांनी तिने माझ्या अशिलांचे आणि सत्याग्रहींचे मन जिंकले होते. ती कुमारी माझ्या कार्यालयाची आणि समाजाच्या लढाईची पहारेकरी आणि रक्षक झाली होती. एखाद्या कामाच्या नैतिक औचित्याविषयी तिला जेव्हा शंका असायची तेव्हा ती हातचे काहीही राखून न ठेवता माझ्याशी वाद घालायची. आणि जोपर्यंत त्या कार्याचे नैतिक औचित्य मी तिला पटवून देऊ शकत नसे तोपर्यंत तिचे समाधान होत नसे.

सेठ काछलिया वगळता जेव्हा सर्व पुढारी तुरुंगात गेले तेव्हा कुमारी श्लेषिनने लाखो रुपयांचा हिशोब ठेवला आणि वेगवेगळ्या स्वभावाच्या लोकांकडून काम घेतले. काछलियासुद्धा तिची मदत घ्यायचे आणि तिच्या सल्ल्याप्रमाणे काम करायचे. आम्ही सर्व जेव्हा तुरुंगात गेलो तेव्हा श्री डोक यांनी 'इंडियन ओपिनियन'चे काम सांभाळले. परंतु पांढरे केस झालेला तो वृद्ध पुरुष 'इंडियन ओपिनियन'करिता लिहिण्यात आलेले लेख कुमारी श्लेषिनकडून मंजूर करून घ्यायचा. आणि एकदा तर ते मला म्हणाले होते, "श्लेषिन जर नसती तर माझ्या कामाबद्दल माझे समाधान कसे होऊ शकले असते तेच कळत नाही. तिच्या मदतीचे आणि सूचनांचे मोल करणे माझ्याकरिता तरी अशक्य आहे. तिने केलेले बदल आणि सूचना योग्य आहेत असे समजूनच मी त्यांचा स्वीकार केला होता." पठाण, पटेल, गिरमिटमुक्त हिंदुस्तानी अशा विविध वर्गांच्या आणि विविध वयाच्या

लोकांचा घोळका श्लेषिनभोवती गोळा झालेला असायचा. ते तिचा सल्ला घ्यायचे आणि त्याप्रमाणे वागायचे.

दक्षिण आफ्रिकेतील गोरे प्रवासी हिंदुस्तानी प्रवाशांबरोबर रेल्वेत सहसा एकत्र बसत नाहीत. ट्रान्सवालमध्ये तर असे करण्याकरिता गोऱ्यांना परवानगीही नाही. आणि सत्याग्रही तर नियमाने तिसऱ्या वर्गातच प्रवेश करायचे. असे असतानाही कुमारी श्लेषिन जाणूनबुजून हिंदुस्तानींच्या डब्यातच बसायची आणि तिला अडवणाऱ्या गार्डशी भांडायची. याकरिता एखाद्या दिवशी आपल्याचा अटक करण्यात येईल अशी अपेक्षा ती करत असावी असे मला वाटते. तिची पात्रता, समजाच्या लढ्याबद्दलचे तिचे संपूर्ण आकलन, आणि सत्याग्रहींच्या हृदयावरील तिचे अधिराज्य या गोष्टींची ट्रान्सवाल सरकारला कल्पना असूनही त्यांनी कुमारी श्लेषिनला कधीही अटक केली नाही.

किमारी श्लेषिनने आपल्या ६ पौंड पगारात कधीही वाढ मागितली नाही वा तशी इच्छाही केली नाही. तिच्या काही गरजांची मला जेव्हा जाणीव झाली तेव्हा मी तिला १० पौंड देऊ लागलो. तो पगारसुद्धा तिने आढेवेढे घेऊन स्वीकारला. परंतु याहून जास्त पगार घेण्याकरिता तिने साफ नकार दिला. ती म्हणाली, “यापेक्षा जास्त पगार मला मुळीच नको. आणि यापेक्षा जास्त पगार जर मी तुमच्याकडून घेतला तर ज्या निष्ठेने मी तुमच्याकडे काम करायला आले, ती निष्ठा खोटी असल्याचे सिद्ध होईल.” तिच्या या उत्तराने मला गप्प बसवले. कुमारी श्लेषिन किती शिकलेली होती हे जाणून घेण्याची कदाचित वाचकांना इच्छा असेल. ती केप विद्यापीठाची इंटरमिजिएट परीक्षा उत्तीर्ण झालेली होती. लघुलेखन, टंकलेखन इत्यादी विषयांत तिने पहिल्या श्रेणीचे प्रमाणपत्र मिळवले होते. समाजाचा लढा संपल्यानंतर ती विद्यापीठाची स्नातक झाली आणि आता ती ट्रान्सवाल येथील मुलींच्या कोणत्या तरी शाळेत मुख्याध्यापिकेचे काम करते आहे.

श्री हर्बर्ट किचन एक वृद्ध गृहस्थ होते. त्यांना विजेचे काम येत होते. बोअर युद्धात त्यांनी आमच्याबरोबर काम केले होते. काही काळ ते ‘इंडियन ओपिनियन’चे संपादक राहिले होते. त्यांनी आजीवन ब्रह्मचर्याचे पालन केले होते.

आतापर्यंत मी उल्लेखिलेल्या व्यक्ती माझ्या घनिष्ट संपर्कात आलेल्या होत्या. त्यांना ट्रान्सवालमधील प्रमुख गोऱ्यांच्या पंक्तीत बसवता येत नाही. तरीही त्यांची फार मोठी मदत समाजाच्या लढाईत झाली होती असे म्हणता येऊ शकते. प्रतिष्ठेच्या दृष्टीने श्री हॉस्किन यांचे स्थान सर्वात उच्च होते. ते दक्षिण आफ्रिकेच्या चेम्बर ऑफ कॉमर्सचे भूतपूर्व अध्यक्ष होते आणि ट्रान्सवाल विधानसभेचे सदस्य होते. त्यांची ओळख मी आधी करून दिलेली आहे. सत्याग्रह लढ्यात मदत करणाऱ्या गोऱ्यांची एक समिती त्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेली होती. या समितीने यथाशक्ती लढ्यात मदत केली. लढा खूप रंगात आल्यानंतर स्थानिक सरकारबरोबर चर्चेचा वा विचारविनिमयाचा मार्ग कसा उघडा राहिला असता? याचे कारण असहकाराचा सिद्धांत नव्हता तर कायदेभंग करणारांशी चर्चा करण्याची सरकारची स्वतःचीच इच्छा नव्हती हेच खरे आहे. अशा वेळी मदत करणाऱ्या गोऱ्यांच्या या समितीने मध्यस्थी करण्याचे काम केले.

श्री अल्बर्ट कार्टराईट यांचीही ओळख मी याआधीच करून दिलेली आहे. रेव्हरंड डोकप्रमाणेच मदत करणारे आणि आमच्याशी तसेच संबंध ठेवणारे दुसरेही एक पाद्री होते. त्यांचे नाव होते रेव्हरंड चार्ल्स फिलिप्स. ट्रान्सवालमध्ये अनेक वर्षांपासून 'कॉंग्रेसनल मिनिस्टर' होते. त्यांची सज्जन पत्नीही आम्हाला मदत करायची. एक तिसरे पाद्री होते रेव्हरंड डुडनी डू. पाद्रीचे पद सोडून त्यांनी ब्ल्युफौन्टनहून प्रकाशित होणाऱ्या 'द फ्रेंड' या दैनिकाचे संपादकपद स्वीकारले होते. गोऱ्यांची अवहेलना सहन करून आपल्या दैनिकातून त्यांनी हिंदुस्तानींच्या लढ्याचे समर्थन केले होते. दक्षिण आफ्रिकेतील प्रसिद्ध वक्त्यांमध्ये त्यांची गणना होत होती.

अशाच प्रकारे मनमोकळेपणाने आम्हाला मदत करणारे एक सज्जन होते 'प्रिटोरिया न्यूज'चे संपादक श्री वेर स्टेन्ट. एकदा प्रिटोरियाच्या टाऊन हॉलमध्ये गोऱ्यांची एक मोठी सभा झाली होती. हिंदुस्तानींच्या सत्याग्रहाची निंदा करणे आणि खुनी कायद्याचे समर्थन करणे हाच सभेचा हेतू होता. श्री वेर स्टेन्ट यांनी एकट्याने सभेचा विरोध केला होता. अध्यक्षांनी त्यांना बसायला सांगितले, परंतु त्यांनी तसे करायला स्पष्टपणे नकार दिला. गोऱ्यांनी त्यांना मारण्याची धमकी

दिली. असे असतानाही ते सिंहाप्रमाणे गर्जना करत न डगमगता त्या टाऊन हॉलमध्ये एकटे उभे राहिले. परिणामी गोऱ्यांना आपला ठराव मताला न टाकताच सभा भंग करावी लागली,

मी इतरही अशा गोऱ्यांची नावे सांगू शकतो की जे कोणत्याही समितीचे सदस्य नव्हते आणि तरीही आम्हाला मदत करण्याची ते एकही संधी सोडत नसत. परंतु अधिक विस्तार न करता मी केवळ तीन गोऱ्या महिलांची नावे सांगून हे प्रकरण संपवू इच्छितो. त्यातील एक होत्या कुमारी हॉबहाऊस. लॉर्ड हॉबहाऊस यांची ही मुलगी होती. बोअर युद्धाच्या वेळी मिल्नर यांच्या विरोधानंतरही ही महिला ट्रान्सवालमध्ये पोहोचली होती. लॉर्ड किचनरनी ट्रान्सवाल आणि फ्री स्टेटमध्ये जेव्हा सर्व जगात प्रशंसित वा निंदित 'कॉन्सेन्ट्रेशन कॅम्प' उघडून युद्ध करणाऱ्या बोअर स्त्रियांना त्यांच्यांत गोळा करून ठेवले होते (एक प्रकारची कैदच ती!) तेव्हा ही एकटी स्त्री त्या छावण्यांमधील बोअर स्त्रियांमध्ये हिंडून त्यांना धीर देऊन त्यांना दृढ राहण्याकरिता सांगायची. बोअर युद्धासंबंधीची इंग्रजांची नीती अगदी चुकीची आहे असा विश्वास असल्यामुळे स्वर्गीय स्टेडप्रमाणेच कुमारी हॉबहाऊससुद्धा युद्धात इंग्रजांचा पराभव व्हावा म्हणून प्रार्थना करत असे. बोअरांची इतकी सेवा केल्यानंतर जेव्हा त्यांना कळले की इंग्रजांच्या अन्यायाच्या विरोधात यथाशक्ती लढणारे तेच बोअर लोक आपल्या अज्ञानाने भरलेल्या पूर्वग्रहांमुळे हिंदुस्तानींवर अन्याय करत आहेत तेव्हा त्यांना गंभीर धक्का लागला. बोअर लोकांना त्यांच्याबद्दल अतिशय आदर आणि जिव्हाळा वाटत होता. त्यांचे जनरल बोथांबरोबर जवळचे संबंध होते. त्यांच्याकडे त्या थांबायच्या. खुनी कायदा रद्द केला पाहिजे हे बोअरांना समजावून सांगण्याकरिता त्यांनी शक्य ते सर्व प्रयत्न केले होते.

दुसरी महिला होती कुमारी ऑलिव्ह श्राईनर. या महिलेसंबंधी मी पाचव्या प्रकरणात लिहिले आहे. आणि दक्षिण आफ्रिकेतील श्राईनर कुटुंबात जन्मलेली ही स्त्री विदुषी होती. श्राईनरचे नाव दक्षिण आफ्रिकेत इतके प्रसिद्ध होते की त्यांचे जेव्हा लग्न झाले तेव्हा त्यांच्या पतीला श्राईनर हे नाव घ्यावे लागले. यामुळे ऑलिव्ह श्राईनरचा श्राईनर कुटुंबाशी जो संबंध होता तो दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांच्या दृष्टीने संपुष्टात आला नाही. असे करण्यामागे श्रीमती श्राईनरचा मिथ्याभिमान नव्हता

कारण त्या जशा विदुषी होत्या तशाच अतिशय साध्या आणि नम्र होत्या. माझे त्यांच्याशी फार चांगले संबंध होते असे मला वाटते. आपल्या हबशी नोकरांमध्ये आणि आपल्यात काही अंतर आहे असे त्यांना कधीही वाटले नाही. जिथे कुठे इंग्रजी भाषा बोलली जाते तिथेतिथे त्यांचे 'ड्रीम्स' हे पुस्तक अतिशय आदराने वाचले जाते. ते पुस्तक गद्यात लिहिलेले असले तरी त्याची गणना काव्यात होते. त्यांनी इतरही अनेक पुस्तके लिहिली आहेत. लेखणीवर इतके प्रभुत्व असतानाही घरातील स्वयंपाक करण्यात, घराची साफसफाई करण्यात आणि भांडी वगैरे विसळण्यात त्यांना मुळीच संकोच वा लाज वाटत नसे. अशा प्रकारच्या शारीरिक श्रमामुळे लेखनशक्ती मंद होण्याऐवजी अधिक उत्तेजित होते आणि भाषेत आणि विचारात एक प्रकारचा विवेक आणि भारदस्तपणा येतो अशी त्यांची धारणा होती. कुमारी श्राईनर यांनीही दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांवर हिंदुस्तानींच्या बाजूने आपले वजन टाकले होते.

तिसरी महिला होती कुमारी मोल्टिनो. दक्षिण आफ्रिकेतील प्राचीन मोल्टिनो कुटुंबातील ही प्रौढ महिला होती.

वाचक प्रश्न विचारू शकतात की या गोऱ्यांच्या मदतीचा अखेरीस काय फायदा झाला? हा परिणाम सांगण्याकरिता हे पुस्तक लिहिण्यात आलेले नाही असे जरी यावर माझे उत्तर असले तरी मी म्हणेन की काही मित्रांचे कामच, ज्याचे वर्णन वर करण्यात आलेले आहे, त्याच्या परिंणामांची साक्ष देत असतात. परंतु या हितेच्छूच्या सगळ्या कामाचा अखेरीस काय परिणाम झाला हा प्रश्न आपल्याला पडू शकेल. सत्याग्रहाची लढाई अशी होती की तिचे परिणाम तिच्यातच समाविष्ट होते. हा लढा आत्मनिर्भरतेचा होता, आत्मबलिदानाचा होता, ईश्वरी श्रद्धेचा होता.

दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहात त्यांनी केलेल्या मदतीचा उल्लेख केला नाही तर हा इतिहास अपूर्ण राहणार होता. यामुळे त्यांच्या नावांचा इथे उल्लेख इथे करण्यात आला आहे. मदत करणाऱ्या या सर्व गोऱ्यांची नावे मी इथे दिलेली नाहीत. परंतु ज्यांची नावे मी इथे दिली आहेत त्यांच्यातर्फे मदत करणाऱ्या सर्व गोऱ्यांबद्दल हिंदुस्तानींची कृतज्ञतेची भावना इथे व्यक्त करण्यात आली आहे. शुद्ध मनाने करण्यात आलेल्या कामाचा परिणाम शुद्धच होत असतो, मग तो परिणाम

दृश्य असो की अदृश्य असो हा हे इथे सांगण्यामागील माझा दुसरा हेतू आहे. सत्याग्रही म्हणून माझा या सिद्धांतावर विश्वास आहे. हे सांगण्यामागील माझा तिसरा महत्त्वाचा हेतू हा आहे की सत्यावर आधारित आंदोलन अशा अनेक प्रकारच्या शुद्ध आणि निःस्वार्थ मदतीला आपल्याकडे अनायास आकर्षित केल्याशिवाय राहू शकत नाही. या प्रकरणातील ही गोष्ट अजूनही वाचकांच्या लक्षात आली नसेल तर मी हे स्पष्ट करू इच्छितो की सत्याग्रहाच्या लढाईत सत्यरक्षणालाच एक प्रयत्न मानण्यात आले तर या प्रयत्नांशिवाय गोऱ्या मित्रांची मदत मिळवण्याकरिता कोणतेही विशेष प्रयत्न करण्यात आले नव्हते. आपल्या आंदोलनातील आंतरिक शक्तीमुळेच ते त्याकडे आकर्षित झाले होते.

# २४. अजून अंतर्गत अडचणी

बाविसाव्या प्रकरणात आपल्याला आपल्या अंतर्गत अडचणींची काहीशी कल्पना आली असावी. जोहानिसबर्गमध्ये माझ्यावर हल्ला झाला तेव्हा माझे कुटुंब फिनिक्समध्ये राहत होते. हल्ल्यामुळे माझ्या पत्नीला आणि मुलांना काळजी वाटणे स्वाभाविक होते. मला पाहण्याकरिता पैसे खर्च करून जोहानिसबर्गला धावत येणे त्यांच्याकरिता शक्य नव्हते. यामुळे बरा झाल्यानंतर मी त्यांना भेटायला जाणे आवश्यक होते.

कामानिमित्त डरबन आणि जोहानिसबर्गमधील माझ्या येरझारा सुरूच असायच्या. सरकारबरोबर झालेल्या समेटाबद्दल नातालमध्येसुद्धा बराचसा गैरसमज पसरलेला असल्याची मला कल्पना नव्हती असे नाही, नातालहून इतरांना जी पत्रे यायची त्यांमधून याबद्दल मला ही माहिती होत असे. आणि 'इंडियन ओपिनियन'च्या नावाने तीव्र उपहासाने भरलेली जी गाडाभर पत्रे यायची त्यांचाही ढीग माझ्याजवळ होता. आतापर्यंत जरी सत्याग्रहाची लढाई ट्रान्सवालच्या हिंदुस्तानींपर्यंतच सीमीत होती तरी नातालच्या हिंदुस्तानींची संमती मिळवणे आणि त्यांच्या भावनांची काळजी घेणे आवश्यक होते. ट्रान्सवालचे हिंदुस्तानी ट्रान्सवालच्या निमित्ताने संपूर्ण दक्षिण आफ्रिकेतील सगळ्या हिंदुस्तानींतर्फे ही लढाई लढत असल्यामुळे नातालमध्ये पसरलेला गैरसमज दूर करण्याकरिता डरबनला जाणे माझ्याकरिता आवश्यक होते. यामुळे पहिली संधी मिळताच मी डरबनला गेलो. डरबनमध्ये हिंदुस्तानींची एक सभा बोलावण्यात आली. सभेत माझ्यावर हल्ला होणार आहे आणि यामुळे एक तर मी सभेत हजर राहू नये वा माझ्या संरक्षणाची काही तरी उपाययोजना करावी असे माझ्या मित्रांनी मला आधीच सांगितले होते. परंतु या दोन्हींमधून एकही मार्ग माझ्याकरिता उघडा नव्हता. सेवकाला स्वामीने बोलावले आणि सेवक घाबरून जर स्वामीकडे गेला नाही तर सेवाधर्माचा भंग होतो. आणि जो सेवक स्वामीच्या सेवेला घाबरतो तो सेवक कसा? जनसेवा ही सेवकाकरिता असिधाराव्रतासारखी असते. जनसेवक जर प्रशंसेचा स्वीकार करत असेल तर निंदेपासून तो कसा पळ काढू शकतो? यामुळे निश्चित वेळी मी

सभेला हजर झालो. सरकारबरोबर कशा प्रकारे समेट झाला ते मी लोकांना समजावून सांगितले. लोकांच्या प्रश्नांची उत्तरेही मी दिली.

ही सभा रात्रीच्या जवळपास आठ वाजता सुरू झाली होती. सभेचे कामकाज जवळपास संपत आलेले असतानाच एक पठाण मोठी काठी घेऊन व्यासपीठावर आला. त्या वेळी सर्व दिवे विझले. माझ्या लक्षात लगेच सर्व परिस्थिती आली. सभेचे अध्यक्ष दाऊद मुहम्मद टेबलवर चढले आणि लोकांना समजावून सांगू लागले. माझे रक्षण करणारांनी मला वेढा घातला. माझ्या रक्षणाकरिता मी काहीही उपाययोजना केलेली नव्हती, परंतु ज्या लोकांना माझ्यावर हल्ला होण्याची भीती वाटत होती ते माझ्या रक्षणाकरिता संपूर्ण तयारीने आले होते हे माझ्या लक्षात आले. त्यातील एक मित्र तर खिशात पिस्तुल घेऊन आले होते. त्यांनी हवेत पिस्तुलाचा एक बारही उडवला. एवढ्यात पारसी रुस्तमजी, ज्यांनी सर्व व्यवस्था पाहिली होती, धावत पोलीस स्टेशनमध्ये गेले आणि पोलीस अधीक्षक अलेक्झॅन्डर यांना सर्व परिस्थिती सांगितली. त्यांनी पोलिसांची एक तुकडी पाठवली. गर्दीतून मार्ग काढत पोलीस मला पारसी रुस्तमजींच्या घरी घेऊन गेले.

दुसऱ्या दिवशी पारसी रुस्तमजींनी डरबनमधील सर्व पठाणांना गोळा केले आणि तुमच्याजवळ गांधींबद्दल ज्या काही तक्रारी असतील त्या सर्व गांधींसमोर ठेवा असे त्यांना सांगितले. मी त्या सर्वांना भेटलो आणि त्या सर्वांना समजावून शांत करण्याचा प्रयत्न केला. परंतु मी त्यांना शांत करू शकलो असे मला वाटत नाही. संशयाचा उपचार युक्तिवादाने वा समजावून सांगितल्याने होऊ शकत नाही हेच खरे. हिंदुस्तानींना मी धोका दिला आहे हे त्यांच्या मनात पक्के ठसले होते. जोपर्यंत त्यांच्या मनातून हे विष निघणार नव्हते तोपर्यंत माझे समजावणे व्यर्थ होते.

त्याच दिवशी मी डरबनहून फिनिक्सकरिता रवाना झालो. ज्या मित्रांनी आदल्या दिवशी माझा बचाव केला होता त्यांनी मला एकटे सोडण्याला साफ नकार दिला आणि फिनिक्समध्ये येऊन आम्ही तुमच्यावर लक्ष ठेवू असे ते म्हणू लागले. मी त्यांना म्हणालो, “माझ्या ‘नाहीची’ फिकीर न करता तुम्ही फिनिक्सला येणारच असाल तर मी तुम्हाला अडवू शकणार नाही. परंतु

तिथे अगदी जंगल आहे, आणि आम्ही लोक जर तुम्हाला खायला देऊ शकलो नाही तर तुम्ही काय कराल?" त्यांच्यातील एकाने उत्तर दिले, "आम्हाला अशी भीती दाखवण्याची गरज नाही. आमची सोय आम्ही करून घेऊ. आणि जोपर्यंत आम्ही तुमच्या शिपायाचे काम करत असू तोपर्यंत तुमचे कोठार लुटण्यापासून आम्हाला कोण अडवू शकतो?"

अशा प्रकारे विनोद करत आम्ही फिनिक्सला पोहोचलो. या रक्षकदलाचा नेता रॅक मुंडली होता आणि तो हिंदुस्तानींमध्ये प्रसिद्ध होता. तमिळ आईवडिलांपासून त्याचा जन्म नातालमध्ये झाला होता. त्याने मुक्केबाजीचे विषेष प्रशिक्षण घेतले होते. गोऱ्यामधील तसेच काळ्यांमधील कोणीही आपला पराभव करू शकत नाही असा त्याचा आणि त्याच्या मित्रांचा समज होता.

पाऊस नसेल तेव्हा दक्षिण आफ्रिकेत मला उघड्यावर झोपण्याची सवय होती. या घटनेमुळे माझ्या सवयीत कोणताही बदल करण्याची माझी इच्छा नव्हती. यामुळे स्वनिर्मित रक्षक दलाने रात्रीच्या वेळी माझ्या आजूबाजूला आळीपाळीने पहारा करण्याचा निर्णय घेतला. डरबनमध्ये मी जरी या रक्षक दलाला गमतीवर घेतले होते आणि माझ्याबरोबर येण्यापासून अडवण्याचा प्रयत्न केला होता तरी ते लोक जेव्हा पहारा करू लागले तेव्हा मला अधिक निश्चिंत वाटू लागले, आणि हे लोक नसते तर मी इतका निश्चिंतपणे झोपू शकलो नसतो असा विचार माझ्या मनात आला होता. माझा हा दुबळेपणा मी कबूल केला पाहिजे. कोणत्याही प्रकारचा जरी आवाज झाला तरी मी दचकून उठत असे हेही मी मान्य करतो.

माझा विश्वास आहे की ईश्वरावर माझी अढळ श्रद्धा आहे. मृत्यू म्हणजे माणसाच्या जीवनातील एक फार मोठे परिवर्तन आहे आणि जेव्हा मृत्यू येतो तेव्हा तो स्वागतार्ह असतो असेसुद्धा मी मानत आलो आहे. मृत्यूची आणि इतर सर्व प्रकारची भीती मनातून काढण्याकरिता मी अंतःकरणापासून प्रचंड प्रयत्न केले आहेत. असे असतानाही जीवनातील अनेक असे प्रसंग मला आठवतात की एखाद्या दीर्घकाळ मित्राला भेटण्याचा विचार करत असताना मनाला जशी प्रसन्नता जाणवते तशा प्रसन्नतेचा अनुभव मृत्यूला आलिंगन देण्याचा विचार मनात आला असताना काही मला आला नव्हता. अशा प्रकारे बलवान होण्याचा अथक प्रयत्न केल्यानंतरही

माणूस बहुधा दुबळा राहतो आणि केवळ बुद्धीपर्यंत पोहोचलेले ज्ञान आचरणाची वेळ आली असता फारसे उपयोगाचे असल्याचे सिद्ध होत नाही. यातही माणसाला जेव्हा बाहेरची मदत मिळते आणि तो तिचा स्वीकार करतो तेव्हा बरेचदा आपण आपली आंतरिक शक्ती बऱ्याच प्रमाणात गमावून बसतो. सत्याग्रहीने अशा भीतीपासून नेहमीच दूर राहायला पाहिजे.

फिनिक्समध्ये असताना मी एकच काम केले. समाजातील लोकांचा गैरसमज दूर करण्याकरिता 'इंडियन ओपिनियन'मधून भरपूर लिहिले. संपादक आणि एक शंकाशील वाचक यांच्यातील एक काल्पनिक संवाद मी लिहून काढला. समेटाबद्दल ज्या काही शंका आणि आक्षेप मी ऐकले होते त्या सर्वांचे यथाशक्ती जास्तीत जास्त सविस्तर उत्तर देण्याचा मी प्रयत्न केला. याचा चांगला परिणाम झाला असा माझा विश्वास आहे. समेट चुकीचा असल्याबद्दलचा ट्रान्सवालमधील हिंदुस्तानींचा विश्वास फार दिवस टिकला नाही. समेटाबद्दलचा त्यांचा गैरसमज जर कायम राहिला असता तर त्याचा परिणाम विनाशक झाला असता. समेट मान्य करायचा की नाही हे ठरवण्याचे काम केवळ ट्रान्सवालमधील हिंदुस्तानींचे होते. यामुळे त्यांच्या कार्यामुळे जशी त्यांची परीक्षा होणार होती तशीच त्यांचा नेता आणि सेवक म्हणून माझीही परीक्षा होणार होती. अखेरीस स्वेच्छेने परवाने न घेणारे फार कमी हिंदुस्तानी राहिले असावे. परवाने घेण्याकरिता इतके जास्त लोक आशियायी विभागात जात होते की तिथल्या कर्मचाऱ्यांना श्वास घेण्याकरिताही सवड मिळत नव्हती. समेटातील ज्या अटीचे पालन समाजाला करायचे होते त्या अटींचे समाजने फार शिघ्रतेने पालन करून दाखवले. ही गोष्ट सरकारलाही मान्य करावी लागली आणि गैरसमजाने जरी उग्र रूप धारण केले होते तरी त्याचे क्षेत्र फार आकुंचित झाल्याचे मला आढळले. काही पठाणांनी जेव्हा कायदा हातात घेतला आणि हिंसेचा मार्ग अवलंबिला तेव्हा समाजात खळबळ निर्माण झाली. परंतु अशा खळबळीचे विश्लेषण केले तर तिला काही आधार वा पाया नसल्याचे आणि ती क्षणिक असल्याचे लक्षात येते. असे असतानाही आजपर्यंत तिची ताकद कायम आहे. रक्तपात आणि हिंसा यांमुळे आपला थरकाप उडत असतो हे याचे कारण आहे! परंतु धैर्याने या प्रश्नाचा विचार केला तर हिंसेला घाबरण्याचे काहीही कारण नाही. समजा की मीर आलम आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या आक्रमणामुळे मी जखमी होण्याऐवजी माझे शरीर नष्ट झाले असते. आणि

अशीही कल्पना करा की मीर आलम आपल्या बुद्धीचा उपयोग करून केवळ हिंसकच वागू शकतो असे समजून हिंदुस्तानी समाज जाणूनबुजून त्या वेळी शांत आणि निश्चिंत राहिला असता आणि मीर आलमशी पूर्वीप्रमाणेच मैत्री भावाने वागला असता व मीर आलमला त्याने क्षमा केली असती तर समाजाचे कोणतेही नुकसान तर झालेच नसते उलट या उदात्त आणि उदार व्यवहारामुळे समाजाचा फार लाभ झाला असता. तसे केल्यामुळे समाजातील सर्व गैरसमज दूर झाले असते व तो दुप्पट उत्साहाने आणि जोमाने आपल्या श्रद्धेवर अढळ राहिला असता आणि आपल्या कर्तव्याचे पालन केले असते. आणि माझा तर केवळ लाभच लाभ झाला असता. सत्याग्रहासंबंधी सत्याचा आग्रह धरणाऱ्याला तसे करताना अनायासे जर मरण पत्करावे लागले तर त्याहून अधिक मंगलमय गोष्ट त्याच्याकरिता कोणती होऊ शकते?

वरील युक्तिवाद केवळ सत्याग्रहाच्या लढाईलाच लागू होऊ शकतो कारण त्यात वैराला वा घृणेला स्थान नसते. आत्मशक्ती वा स्वावलंबन हेच त्याचे एकमेव साधन असते. त्यात कोणीही कोणाकडेही मदतीच्या अपेक्षेने पाहत नसतो. यामुळे कोणीही सेवक वा अनुयायी नसतो. वा असेही म्हणता येऊ शकते की त्यात सर्व पुढारीही असतात आणि सेवकही असतात. यामुळे कितीही मोठ्या व्यक्तीला मरण जरी पत्करावे लागले तरी सत्याग्रहाच्या लढ्यात शैथिल्य येत नाही. उलट त्याला अधिकच वेग येतो.

सत्याग्रहाचे शुद्ध आणि मूळ स्वरूप हे असे आहे. त्याच्या या स्वरूपाचा आपल्याला अनुभव येत नाही कारण आपण सर्वांनी अजून घृणा आणि वैर यांचा पूर्णपणे त्याग केलेला नाही. प्रत्यक्ष अनुभव अथवा व्यवहार यांच्यातून सर्व लोकांना सत्याग्रहाचे रहस्य कळू शकत नाही आणि काही लोकांचे आचरण पाहून अनेक लोक त्यांचे मूढपणे अनुसरण करत असतात. याशिवाय ट्रान्सवालमध्ये करण्यात आलेला सामूहिक सत्याग्रहाचा आणि सामाजिक सत्याग्रहाचा प्रयोग टॉलस्टॉय यांच्या म्हणण्यानुसार पहिलाच गणला जाईल. मला तरी शुद्ध सत्याग्रहाचे ऐतिहासिक उदाहरण माहीत नाही. इतिहासाचे माझे ज्ञान अतिशय अल्प असल्यामुळे यासंबंधी मी कोणतेही निश्चित मत बनवू शकत नाही. परंतु खरे सांगायचे तर अशा उदाहरणांशी आपला काहीही संबंध

नाही. आपण जर सत्याग्रहाच्या मूलभूत सिद्धांताचा स्वीकार केला तर मी सांगितलेले परिणाम त्यातून निघाल्याशिवाय राहणार नाहीत. सत्याग्रहाचा प्रयोग करणे कठीण अथवा असंभव आहे असे म्हणून सत्याग्रहासारखी अमूल्य शक्ती सोडून देता येऊ शकत नाही. शस्त्रबलाचे प्रयोग तर हजारो वर्षांपासून होतच आले आहेत. त्यांची कटू फळे आपल्याला आपल्या डोळ्यांसमोर दिसत आहेत. भविष्यातही त्यांच्यापासून काही गोड फळे निघण्याची आशा बाळगता येत नाही. अंध:कारातून जर प्रकाश निर्माण होऊ शकत असेल तर वैरातून प्रेम निर्माण करता येऊ शकेल.

# दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास

## खंड २

## १. जनरल स्मट्स यांच्याकडून विश्वासघात (?)

वाचकांनी आमच्या अंतर्गत अडचणींचे थोडेबहुत दर्शन घेतले. ते वर्णन करत असताना मला जवळपास थोडीशी आत्मकथाच सांगावी लागली. परंतु ते अपरिहार्य होते कारण सत्याग्रहासंबंधित माझ्या अडचणी सत्याग्रहींच्याही अडचणी झाल्या होत्या. आता परत आपण बाहेरील अडचणी पाहू.

या प्रकरणाचे शीर्षक लिहीत असताना मला लाज वाटत होती आणि हे प्रकरण लिहितानाही मला लाज वाटते आहे. सन १९०८ सालीसुद्धा जनरल स्मट्स दक्षिण आफ्रिकेतील सगळ्यात हुशार पुढारी आहेत असे समजले जात होते आणि आजही सर्व जगात जरी नाही तरी ब्रिटिश साम्राज्यामध्ये तरी उच्च श्रेणीचे कार्यकुशल पुरुष म्हणून त्यांची गणना होते. त्यांच्या महान शक्तीबद्दल आणि पात्रतेबद्दल मला शंका नाही. ते जितके कुशल वकील आहेत तितकेच कुशल सेनापतीही आहेत आणि तितकेच कुशल शासकही आहेत. दक्षिण आफ्रिकेत इतर अनेक शासक आले आणि गेले परंतु १९०८पासून तर आजपर्यंत (१९२४-२५) हा पुरुष दक्षिण आफ्रिकेच्या शासनाची सुत्रे आपल्या हाती धरून आहे. आणि त्यांच्याशी स्पर्धा करू शकेल असा एकही पुरुष दक्षिण आफ्रिकेत आजसुद्धा नाही. हे प्रकरण लिहीत असताना दक्षिण आफ्रिका सोडून मला नऊ वर्षे झाली आहेत. जनरल स्मट्ससाठी दक्षिण आफ्रिका कोणत्या विशेषणाचा उपयोग करतो हे मला माहीत नाही. त्यांचे नाव जॅन आहे आणि दक्षिण आफ्रिकेतील लोक त्यांना 'स्लिम जॅनी' म्हणून संबोधतात. इथे स्लिमचा अर्थ आहे, निसटून जाईल, हाती धरता येणार नाही असा. निसरडा. गुजराती मारठी भाषेत याच्याशी मिळताजुळता शब्द आहे 'धूर्त', आणि चांगला शब्द वापरायचा तर 'चलाख'. अनेक इंग्रज मित्र मला म्हणाले होते, "जनरल स्मट्सपासून तुम्ही सावध राहा, तो अतिशय बनेल माणूस आहे. त्याला बदलायला वेळ लागत नाही. त्याच्या शब्दांचा अर्थ त्यालाच माहीत असतो. तो बहुधा अशा काही पद्धतीने बोलतो की दोन्ही पक्ष त्यातून स्वतःला हवा तो अर्थ काढू शकतात. आणि संधी मिळताच दोन्ही पक्षांचा अर्थ बाजूला ठेवून तो स्वतःचा तिसराच अर्थ सांगत, त्यावर अंमल करतो आणि त्याच्या समर्थनार्थ असा काही युक्तिवाद करतो

की आपणच अर्थ लावण्यात काही चूक तर केली नाही ना आणि जनरल स्मट्स आपल्या शब्दांचा जो अर्थ लावतो तोच बरोबर तर नाही ना असे दोन्ही पक्षांना थोडा वेळ वाटू लागते!" या प्रकरणात मला ज्या विषयाची चर्चा करायची आहे त्याला - ही घटना जेव्हा घडली तेव्हा - आम्ही विश्वासघात समजत होतो आणि तसेच म्हणतही होतो. आजही समाजाच्या दृष्टीने मी तो विश्वासघातच समजतो. याशिवाय शीर्षकात मी 'विश्वासघात' शब्दानंतर मी प्रश्नचिन्ह घातले आहे. याचे कारण असे आहे की जनरल स्मट्सनी केलेला विश्वासघात कदाचित जाणूनबुजून केलेला विश्वासघात नसू शकेलही. आणि जिथे घातक हेतू नसेल तिथे विश्वासघात कसा असू शकेल? १९१३मध्ये मला जनरल स्मट्सचा जो अनुभव आला होता तो कटू आहे असे मला वाटले नव्हते. आणि आज जेव्हा थोड्या तटस्थ दृष्टीने मी त्याकडे पाहतो तेव्हाही तो कटू आहे असे मला वाटत नाही. शक्य आहे की १९०८मध्ये जनरल स्मट्स यांनी हिंदुस्तानींशी जो व्यवहार केला तो जाणूनबुजून केलेला विश्वासघात नसेलही.

जमरल स्मट्स यांना न्याय देण्याकरिता आणि त्यांच्याबद्दलच्या शीर्षकात मी विश्वासघात या शब्दाचा जो उपयोग केला त्याचा, आणि या प्रकरणात मला जे काही सांगायचे आहे त्याचा बचाव करण्याकरित मी इतकी प्रस्तावना केली आहे.

मागील प्रकरणात आपण पाहिले आहे की हिंदुस्तानींनी ट्रान्सवाल सरकारकडून स्वतःहोऊन परवाने घेतले होते. आता त्या सरकारने खुनी कायदा रद्द करायला पाहिजे होता. त्यांनी जर असे केले असते तर सत्याग्रहाची लढाई बंद झाली असती. याचा अर्थ असा नाही की ट्रान्सवालमध्ये हिंदुस्तानींविरुद्ध जे कायदे होते ते सर्व रद्द झाले असते. वा हिंदुस्तानींची सर्व दुःखे दूर झाली असती. ती दूर करण्याकरिता हिंदुस्तानींना वैधानिक लढा द्यावा लागणारच होता. खुनी कायद्याच्या भयंकर काळ्या ढगांना पांगवण्यापुरताच सत्याग्रह सीमीत होता. या कायद्याचा जर स्वीकार करण्यात आला असता तर जमातीच्या नावाला पूर्णपणे बट्टा लागला असता. आणि आधी ट्रान्सवालमधील आणि नंतर सर्व दक्षिण आफ्रिकेतील सगळ्या हिंदुस्तानींचे अस्तित्वच संपुष्टात आले असते. परंतु खुनी कायदा रद्द करण्याऐवजी जनरल स्मट्सनी नवीनच पाऊल

उचलले. विधानसभेत त्यांनी जे नवीन विधेयक सादर केले त्यात खुनी कायदा तर कायम ठेवण्यात आलाच शिवाय स्वतःहोऊन घेतलेले परवाने कायदेशीर असतील असेही घोषित करण्यात आले. याचबरोबर त्या विधेयकात असेही कलम घालण्यात आले होते की ज्यांनी स्वतःहोऊन परवाने घेतले त्यांना खुनी कायदा लागू होणार नाही. याचा अर्थ असा झाला की एकच हेतू साध्य करण्याकरिता एकाच वेळी दोन कायदे सुरू राहणार होते, आणि ट्रान्सवालमध्ये नवीन येणाऱ्या आणि स्वतःहोऊन परवाने न घेणाऱ्या हिंदुस्तानींकरिता खुनी कायदा लागू होणार होता.

हे नवीन विधेयक वाचून मला तर धक्काच बसला. समाजाला मी कोणते उत्तर देणार होतो? ज्या पठाण बांधवांनी जोहानिसबर्ग येथील सभेत माझ्यावर भयानक आरोप केले होते त्यांना किती सुंदर खाद्य मिळाले? परंतु या गंभीर आघातानंतरही सत्याग्रहावरील माझा विश्वास कमी होण्याऐवजी अजूनच दृढावला होता. मी आमच्या समितीची सभा बोलावली आणि सदस्यांना नवीन परिस्थिती समजावून सांगितली. काहींनी मला टोमणा मारला, “तुम्ही फार साधेभोळे आहा. हे तर आम्ही तुम्हाला आधीच सांगत होतो. तुम्हाला कोणी काही सांगितले की तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवता. तुम्ही तुमच्या खाजगी कामात इतका भोळेपणा दाखवत असाल तर आमचे काही म्हणणे नाही. परंतु समाजाच्या कामातही तुम्ही भोळसटपणा सोडत नसल्यामुळे त्याचे फळ समाजाला भोगावे लागते. आता समाजातील लोकांमध्ये पूर्वीची हिंमत आणि उत्साह निर्माण करता येणे आम्हाला तरी कठीण वाटते. आमच्या समाजाला तर तुम्ही चांगल्या प्रकारे ओळखता. तो सोडावाटरच्या बाटली सारखा आहे, क्षणिक उत्साहाचा त्याला जो ऊत येत असतो त्याचा शक्य तितक चांगला उपयोग आपण केला पाहिजे. हा उत्साह थंड झाला की सर्व काही संपले.”

या शाब्दिक बाणांमध्ये विखार नव्हता. अशा गोष्टी मी इतर प्रसंगीही ऐकल्या होत्या. यामुळे मी हसत हसत उत्तर दिले, “तुम्ही लोक ज्याला माझा भोळेपणा समजता तो तर माझा अविभाज्य स्वभावच झाला आहे. हा भोळेपणा नसून विश्वास आहे. आणि आपल्या मानवी भावंडांवर विश्वास ठेवणे हे माझे आणि तुमचेही कर्तव्य आहे. परंतु तरीही तुम्हाला माझा हा दोष वाटत असेल आणि

माझ्या सेवेमुळे समाजाचा काही लाभ होतो असे जर तुम्हाला वाटत नसेल तर मग तुम्ही माझ्या दोषाबरोबर थोडे नुकसानही सहन केले पाहिजे. शिवाय समाजाचा उत्साह सोडावाटरच्या पाण्याप्रमाणे क्षणिक फसफसणारा आहे असेही मला वाटत नाही. समाजात तुमचा आणि माझाही समावेश होतो. माझ्या उत्साहाला तुम्ही जर असे विशेषण लावले तर तो मी माझा अपमान समजेन, आणि मला खात्री आहे की तुम्ही लोकही याला अपवाद नसाल. आणि तुम्ही जर तुमच्या फूटपट्टीने समाजाचे माप घ्याल तर तो समाजाचा अपमान कराल. अशा महान लढ्यात चढउतार तर येतच असतात. विरोधकाकडून तुम्ही कितीही जरी स्पष्टीकरण करून घेतले आणि तरीही त्याने विश्वासघात करायचे ठरवलेलेच असेल तर तुम्ही त्याला कसे काय काय अडवू शकाल? या मंडळात अनेक असे लोक आहेत की जे दावा करण्याकरिता माझ्याकडे वचनपत्र (प्रॉमिसरी नोट) घेऊन येत असतात. वचनपत्रावर सही करून आपले हात कापून घेतल्यानंतर त्या माणसाकडून माणूस अजून काय स्पष्ट करून घेणार आहे? परंतु अशा लोकांच्या विरोधातही न्यायालयात जावे लागत असते. असे लोक खटल्याचा विरोध करतात, विविध प्रकारे आपला बचाव करतात, त्यांच्या विरोधात निकाल लागतो आणि जप्ती निघते. अशा अनुचित घटना परत परत होणार नाहीत याची ग्वाही कोण देऊ शकतो? यामुळे माझा तरी तुम्हाला सल्ला आहे की जी समस्या निर्माण झाली आहे ती सोडवण्याचा आपण धैर्याने आणि आणि शांततेने प्रयत्न केला पाहिजे. आपल्याला परत लढा द्यावा लागणार असेल तर आपण काय करू शकतो? यामुळे इतर लोक काय करतील याचा विचार न करता आपण स्वतः काय करू शकतो वा केले पाहिजे याचा विचार प्रत्येक सत्याग्रहीने केला पाहिजे. मला तरी वाटते की आपण जर खरे असू तर इतर लोकही खरे राहतील आणि त्यांच्यात काही दुबळेपणा असेल तर तो आपल्या उदाहरणाने दूर होईल आणि ते परत धैर्याने उभे राहतील."

परत लढा सुरू करण्याच्या शक्यतेमुळे ज्या लोकांनी शुद्ध हेतूने मला टोमणे मारून आपली शंका व्यक्त केली होती त्यांची समजूत पटली असावी असे मला वाटते. या दिवसात सेठ काछलिया दिवसेंदिवस अधिकाधिक प्रमाणात तेजस्वीपणा आणि हिंमत दाखवू लागले होते. प्रत्येक प्रश्नावर निदान बोलून तरी ते आपला विश्वास व्यक्त करत असत आणि त्यावर अढळ राहत असत. त्यांनी

दुबळेपणा दाखवल्याचा वा परिणामाविषयी आशंका व्यक्त केल्याचा एकही प्रसंग मला आठवत नाही. एक वेळ अशी आली की जेव्हा युसूफ मियांनी वादळी सागरात कर्णधार व्हायला नकार दिला. त्या वेळी आम्ही सर्वांनी कर्णधार म्हणून काछलियांचे स्वागत केले. तेव्हापासून तर अखेरच्या घटकेपर्यंत काछलियांनी आपल्या हातातील सुकाणू कधीही सोडले नाही. आणि ज्या संकटांना क्वचितच कोणी तोंड देऊ शकेल त्या सर्वांना त्यांनी निश्चिंत होऊन आणि निर्भयपणे तोंड दिले. जेव्हा लढा पुढे गेला तेव्हा एक वेळ अशी आली की तुरुंगात जाणे सोपे होते, कारण एक प्रकारे तो आरामच होता, परंतु बाहेर राहून सर्व गोष्टींवर बारकाईने नजर ठेवणे, सर्व व्यवस्था करणे आणि विविध प्रकारच्या लोकांना समजावून सांगणे आणि त्यांच्याबरोबर व्यवहार करणे फार कठीण होते.

पुढे जाऊन गोऱ्या सावकारांनी काछलियांना आपल्या जाळ्यात अडकवले. दक्षिण आफ्रिकेत अनेक हिंदुस्तानी व्यापाऱ्यांच्या व्यापाराला गोऱ्या पेढीवाल्यांचा आधार असतो. कोणत्याही जामिनाशिवाय ते हिंदुस्तानी व्यापाऱ्यांना लाखो रुपयांचा माल उधारीवर देतात. हिंदुस्तानी व्यापारी गोऱ्या व्यापाऱ्यांचा इतका विश्वास संपादन करू शकले हा हिंदुस्तानी व्यापाऱ्यांच्या प्रामाणिकपणाचा सुंदर पुरावा आहे. काछलिया सेठवरही बऱ्याच गोऱ्या पेढीवाल्यांचे कर्ज होते. ट्रान्सवाल सरकारने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे भडकवल्यामुळे गोऱ्या व्यापाऱ्यांनी काछलिया सेठकडे आपला पैसा ताबडतोब परत करण्याची मागणी केली. काछलियांना बोलावून ते म्हणालेसुद्धा की “तुम्ही जर सत्याग्रहाच्या लढ्यातून माघार घेतली तर आम्हाला आमच्या पैशाची काहीही घाई नाही. परंतु तुम्ही जर लढाईतून माघार घेतली नाही तर सरकार तुम्हाला अटक करील अशी भीती आम्हाला वाटते. अशा अवस्थेत आमचे काय होईल? यामुळे तुम्हाला जर लढ्यातून माघार घेणे शक्य नसेल तर ताबडतोब आमचे पैसे परत करा.” वीर काछलियांनी उत्तर दिले, “हिंदुस्तानींच्या लढ्यात भाग घेणे हा माझा व्यक्तिगत प्रश्न आहे. त्याचा माझ्या व्यापाराशी कोणताही संबंध नाही. त्या लढ्यात माझ्या धर्माचा, माझ्या समाजाच्या सन्मानाचा, आणि माझ्या स्वाभिमानाचा समावेश आहे. तुम्ही मला उधारीवर माल दिला याकरिता मी तुमचा आभारी आहे. परंतु या गोष्टींना वा माझ्या व्यापाराला मी सर्वाधिक महत्त्व देत नाही. तुमचे पैसे माझ्याजवळ

सोन्याच्या मोहरीप्रमाणे सुरक्षित आहेत. मी जिवंत आहे तोपर्यंत स्वतःला विकूनही मी तुमच्या पैशाची भरपाई करीन. आणि समजा मला काही झालेच तर माझा माल आणि वसुली तुमच्याच हातात आहे हेसुद्धा तुम्हाला माहीत आहे. यामुळे मला वाटते की आजपर्यंत तुम्ही माझ्यावर जसा विश्वास ठेवला तसाच यापुढेही ठेवावा." काछलियांचे हे म्हणणे जरी उचित असले आणि त्यांचा खंबीरपणा गोऱ्या मालकांच्या विश्वासाकरिता जरी अजून एक कारण असले तरी जो माणूस जागेपणीच झोपण्याचे सोंग घेत असतो त्याला कोणी कसा काय जागा करू शकेल? गोऱ्या व्यापाऱ्यांचीसुद्धा हीच गोष्ट होती. त्यांना तर काछलियांवर दडपण आणायचे होते, शरण यायला भाग पाडायचे होते. त्यांचा पैसा तर तसाच सुरक्षित होता.

२२ जानेवारी १९०९ला माझ्या कार्यालयात गोऱ्या व्यापाऱ्यांची एक सभा झाली. त्यात मी स्पष्टपणे सांगितले की तुम्ही काछलियांवर जे दडपण आणू पाहत आहा ती व्यापारनीती नसून राजनीती आहे. राजकारणी आचार व्यापाऱ्यांना शोभत नाही. परंतु ते नाराज झाले. माझ्याजवळ काछलिया सेठच्या मालाची आणि उधारीची यादी होती. मी ती त्या लोकांना दाखवली आणि तिच्या आधारावर त्यांना त्यांची पैपै मिळू शकते हे सिद्ध केले. आणि तुम्हाला जर काछलियांचा व्यापार इतर कोणाला विकायचा असेल तर काछलिया आपला सर्व माल आणि उधारी खरेदी करणाराला सोपवायला तयार आहेत. आणि तुम्हाला जर असे करायचे नसेल आणि तुम्हा व्यापाऱ्यांना हवे असेल तर तुम्ही काछलियांचा माल मूळ भावात परत घेऊ शकता, आणि असे करूनही तुमची पूर्ण वसुली होत नसेल तर  तुम्हाला पसंत असेल त्याप्रमाणे तुम्ही उधारी वसूल करू शकता. माझ्या या प्रस्तावामुळे गोऱ्या व्यापाऱ्यांचे काहीही नुकसान होणार नव्हते हे वाचकांच्या लक्षात आलेलेच असावे (आणि माझ्या अनेक अशिलांच्या संबंधात मी अशी व्यवस्था करू शकलो होतो.) परंतु या वेळी गोऱ्या व्यापाऱ्यांना न्याय नको होता. त्यांना तर काछलियांना शरण आणण्याकरिता भाग पाडायचे होते. परंतु काछलिया शरण गेले नाही आणि यामुळे त्यांना दिवाळखोर म्हणून घोषित करण्यात आले.

काछलियांकरिता ही दिवाळखोरी कलंकासारखी नव्हती. उलट ती भूषणास्पद होती. यामुळे समाजातील त्यांची प्रतिष्ठा वाढली आणि त्यांचा खंबीरपणा आणि शौर्य यांच्याकरिता समाजातील लोक त्यांचे अभिनंदन करू लागले. अशा प्रकारचे शौर्य अलौकिकच गणले जाईल. सामान्य माणसाला हे कळूच शकत नाही. दिवाळखोरी ही दिवाळखोरी न राहता, बदनामी न राहता आदराची आणि प्रतिष्ठेची गोष्ट होऊ शकते याची कल्पनाही सामान्य माणसाला करता येऊ शकत नाही. परंतु काछलियांना हीच गोष्ट योग्य वाटली. अनेक हिंदुस्तानी व्यापारी दिवाळखोरीच्या भीतीने खुनी कायद्याला शरण गेले होते. काछलियांची इच्छा असती तर तेसुद्धा दिवाळखोरीपासून वाचू शकत होते. सत्याग्रहाच्या लढाईतून माघार घेणे हा तर दिवाळखोरीपासून वाचण्याचा मार्ग होताच. परंतु इथे मी त्यासंबंधी बोलत नाही. काछलियांचे अनेक असे हिंदुस्तानी मित्र होते की जे या संकटाच्या वेळी त्यांना पैसे देऊ शकले असते. परंतु अशी व्यवस्था करून त्यांना आपला व्यापार वाचवला असता तर त्यांच्या शौर्याला बट्टा लागला असता. तुरुंगवासाचे संकट त्यांच्यासमोर उभे होते. तसे पाहता ते सर्व सत्याग्रहींच्या डोक्यावरही लटकत होते. यामुळे इतर कोणा सत्याग्रहीकडून त्यांनी पैसे घेतले असते आणि ते त्यांनी गोऱ्यांना दिले असते तर ती गोष्ट त्यांना शोभली नसती. परंतु ज्याप्रमाणे सत्याग्रही व्यापारी त्यांचे मित्र होते त्याचप्रमाणे खुनी कायद्याला शरण जाणारे व्यापारीही त्यांचे मित्र होते. या लोकांकडून काछलियांना मदत मिळू शकली असती हे मला माहीत आहे. जोपर्यंत मला माहीत आहे अशा एकदोन व्यापाऱ्यांकडून काछलियांना निरोपही आला होता. परंतु त्यांची मदत घेणे म्हणजे खुनी कायद्याला शरण जाणे. त्यांनी जे केले त्यातच शहाणपणा आहे असाच त्याचा अर्थ झाला असता. यामुळे अशी मदत घेता येऊ शकत नाही असा निर्णय आम्ही दोघांनीही घेतला. कोणी जर दिवाळे काढले तर त्याच्या दिवाळखोरीमुळे धनकोलासुद्धा ९९ टक्के प्रकरणी काही ना काही हानी सहन करावीच लागत असते, आणि ऋणातील ५० टक्के रक्कम जरी मिळाली तरी धनको खुष होत असतो आणि ७५ टक्के रक्कम जर परत मिळाली तर आपली १०० टक्के वसुली झाली असे तो समजत असतो. दक्षिण आफ्रिकेतील व्यापारी सामान्यपणे सव्वासहा टक्के नफा घेत नसतात तर ७५ टक्के नफा घेत असतात. यामुळे ७५ टक्के रक्कम परत मिळाली तर तो घाट्याचा सौदा आहे असे ते समजत

नाहीत. दिवाळखोरीच्या प्रकरणी शंभर टक्के रक्कम क्वचितच परत मिळत असल्यामुळे कोणताही धनको ऋणकोच्या दिवाळ्याची इच्छा ठेवत नाही. यामुळे आम्ही असाच विचार केला की काछलिया सेठनी जर दिवाळे काढले तर त्यांची दिवाळखोरी इतरांकरिताही ढालीचे काम करील.

काछलिया सेठच्या दिवाळखोरीमुळे गोरे व्यापारी इतर व्यापाऱ्यांना धमकावणे बंद करण्याची शक्यता होती. आणि असेच घडलेसुद्धा. गोऱ्या व्यापाऱ्यांचा उद्देश काछलियांना लढ्यातून माघार घ्यायला लावण्याचा आणि त्यांनी तसे केले नाही तर त्यांच्याकडून १०० टक्के रक्कम वसूल करावी असा होता, परंतु या दोन्ही उद्दिष्टातून त्यांचा एकही उद्देश सफल झाला नाही, उलट यामुळे त्यांच्या अपेक्षेच्या विपरीत परिणामच झाला. एखादा प्रतिष्ठित हिंदुस्तानी व्यापाऱ्याने दिवाळे काढल्यामुळे त्याचे स्वागत झाल्याचे पहिले उदाहरण पाहून गोरे व्यापारी स्तब्ध झाले आणि नेहमीकरिता शांत झाले. एका वर्षाच्या आत गोऱ्या व्यापाऱ्यांना काछलिया सेठकडून शंभर टक्के पैसा परत मिळाला. दिवाळे काढल्यानंतरही शंभर टक्के रक्कम परत केली जाण्याचे माझ्या माहितीप्रमाणे दक्षिण आफ्रिकेतील हे पहिलेच उदाहरण होते. यामुळे सत्याग्रहाची लढाई सुरू असतानाच गोऱ्या व्यापाऱ्यांमध्ये काछलिया सेठची प्रतिष्ठा खूप वाढली आणि त्याच व्यापाऱ्यांनी लढा सुरू असतानाच काछलिया सेठना हवा तितका माल उधार देण्याची तयारी दाखवली. परंतु काछलियांची ताकद तर उत्तरोत्तर वाढतच चालली होती. सत्याग्रहाचे रहस्यसुद्धा त्यांना कळले होते. आता लढाई केव्हा संपेल हे कोणीही सांगू शकत नव्हता. यामुळे दिवाळे काढल्यानंतर लढाईच्या दरम्यान सेठ काछलियांनी कोणत्याही मोठ्या व्यापारात पडू नये असा निर्णय आम्ही घेतला. एखादा गरीब माणूस आपला खर्च भागवू शकेल इतका नफा होण्याइतकाच व्यापार करायचा आणि जास्त व्यापार करायचा नाही असा निश्चय काछलिया सेठनी केला होता. यामुळे गोऱ्या व्यापाऱ्यांनी त्यांना ज्या सवलती दिल्या होत्या त्यांचा उपयोग त्यांनी केला नाही.

काछलिया सेठच्या जीवनातील ज्या घटनांचा मी इथे उल्लेख केला आहे त्या सर्व या प्रकरणात उल्लेखिलेल्या समितीच्या बैठकीनंतर झाल्या असे नाही हे वाचकांच्या लक्षात आलेच असावे.

परंतु त्यांचे वर्णन एकाच ठिकाणी करणे योग्य होईल असे वाटल्याने मी त्यांना या प्रकरणात स्थान दिले आहे. तारखेच्या हिशोबाने पाहायचे तर सत्याग्रहाची दुसरी लढाई सुरू झाली (१० सेप्टेंबर १९०८) त्याच्या काही दिवसांनंतर काछलिया सेठ अध्यक्ष झाले होते आणि त्यानंतर जवळपास पाच महिन्यांनी त्यांना दिवाळखोर घोषित करण्यात आले होते.

परंतु आता आपण समितीतील बैठकीतील निर्णयांकडे वळू. नवीन विधेयक सरकार आणि समाज यांच्यात झालेल्या समेटाच्या विरोधी आहे असे सांगणारे पत्र त्या बैठकीनंतर जनरल स्मट्स यांना लिहिण्यात आले. समेटानंतर जनरल स्मट्स यांनी रिचमंड येथे जे भाषण दिले त्याकडेही मी त्या पत्रातून जनरल स्मट्स यांचे लक्ष वेधले. त्या भाषणात ते म्हणाले होते, “हे लोक आशियायी कायदा रद्द करा असे मला सांगत आहेत. परंतु जोपर्यंत हे लोक स्वतःहोऊन परवाने घेणार नाहीत तोपर्यंत हा कायदा रद्द करण्याला मी नकार दिला आहे.” ज्याचे उत्तर देऊन आपण अडचणीत येऊ असे राजकारणी लोकांना वाटत असते त्या गोष्टीचे ते एक तर उत्तर देत नसतात आणि जर दिलेच तर ते गुळमुळीत असते. जनरल स्मट्स यांनी या कलेत प्राविण्य मिळवले होते. तुम्ही त्यांना कितीही लिहिले, कितीही भाषणे दिली तरी जोपर्यंत त्यांची इच्छा नसेल तोपर्यंत तुम्ही त्यांच्याकडून उत्तर मिळवू शकत नाही. मिळालेल्या पत्राचे उत्तर दिलेच पाहिजे ही गोष्ट त्यांच्या सर्वसामान्य सिद्धांतात बसत नाही. यामुळे मी लिहिलेल्या पत्राचे त्यांच्याकडून कोणतेही उत्तर मिळू शकले नाही.

समेटाच्या वेळी आमच्यात आणि सरकारमध्ये मध्यस्थी करणाऱ्या श्री अल्बर्ट कार्टराईट यांना मी भेटलो. जनरल स्मट्स यांनी मांडलेल्या नवीन विधेयकामुळे त्यांनाही मोठा धक्का लागला होता. ते म्हणाले, “या माणसाला मी खरोखर ओळखू शकत नाही. आशियायी कायदा रद्द करण्याविषयी त्यांनी दिलेले अभिवचन मला चांगले आठवते. माझ्या शक्तीप्रमाणे मी सर्व काही करेन. परंतु तुम्हाला माहीतच आहे की एकदा त्या माणसाने काही ठरवले की त्यासमोर कोणीही काहीही करू शकत नाही. वृत्तपत्रांमधील लेखांची तर तो अगदीच पर्वा करत नाही. यामुळे माझ्या मदतीचा तुम्हाला काही लाभ होईल असे मला वाटत नाही.” मी श्री हॉस्किन इत्यादींनाही मी भेटलो. त्यांनी

जनरल स्मट्सना पत्र लिहिले. त्यांनाही अतिशय असमाधानकारक उत्तर मिळाले. 'विश्वासघात' या शीर्षकाखाली मी इंडियन ओपिनियनमधून लेखही लिहिले. परंतु जनरल स्मट्स त्यांची पर्वा कशाला करतील? तत्त्वज्ञानी वा क्रूर माणसाकरिता तुम्ही हवे तितके कटू शब्द वापरा त्याच्यावर त्यांचा काहीही परिणाम होत नाही. ते तर आपले उरलेले काम करण्यातच मग्न असतात. या दोन शब्दांमधून जनरल स्मट्सकरिता कोणत्या शब्दाचा उपयोग करता येतो हे मला माहीत नाही. त्यांच्या वृत्तीत एक प्रकारचा तत्त्ववेत्तेपणा आहे हे मी कबूल केलेच पाहिजे. ज्या वेळी आम्हा दोघांमध्ये पत्रव्यवहार सुरू होता आणि वृत्तपत्रांमधून माझे लेख प्रकाशित होत होते त्या वेळी मी त्यांना निष्ठूरच समजत होतो हे मला आठवते. परंतु त्या वेळी सत्याग्रहाच्या लढाईचे पहिले पर्वच सुरू होते. लढाई आठ वर्ष चालली होती आणि त्यातील हे दुसरेच वर्ष होते. मध्यंतरीच्या काळात मी जनरल स्मट्स यांना किती तरी वेळा भेटलो. नंतरच्या काळात त्यांच्याशी सुरू असलेल्या चर्चेवरून मला वाटते की दक्षिण आफ्रिकेत जनरल स्मट्स यांच्या धूर्तपणाबद्दल जो समज प्रचलित आहे त्यात परिवर्तन व्हायला पाहिजे. दोन गोष्टी मला स्पष्टपणे आठवतात - (१) त्यांनी त्यांच्या राजकाराणात काही मूलभूत तत्त्वे स्वीकारली आहेत. (२) आणि ती तत्त्वे पूर्णपणे अनैतिक नक्कीच नाही. परंतु याचबरोबर मी हेही सांगितले पाहिजे की त्यांच्या राजकारणात धूर्तपणाला आणि प्रसंगोपात सत्याचरणालाही स्थान आहे. [हे छापत असताना (१८२४-२५साली) जनरल स्मट्स यांचे दक्षिण आफ्रिकेतील नेतृत्वही संपले असल्याचे आम्हाला कळले आहे.]

# २. लढ्याची पुनरावृत्ती

एकीकडे जनरल स्मट्सना समेटाच्या अटींचे पालन करण्याकरिता आम्ही समजावत होतो तर दुसरीकडे समाजाला जागृत करण्याचे कामही जोरात सुरू होते. समाजातील लोकसुद्धा लढाई करण्याकरिता आणि तुरुंगात जाण्याकरिता तयार असल्याचा अनुभव आम्हाला आला. ठीकठिकाणी सभा घेण्यात आल्या. सरकारबरोबर सुरू असलेल्या पत्रव्यवहाराच्या गोष्टी सभांमधून आम्ही लोकांना समजावून सांगितल्या. 'इंडियन ओपिनियन'मधून तर दर आठवड्याची डायरी छापली जातच होती. यामुळे काय सुरू आहे याची समाजाला चांगल्या प्रकारे माहिती होत असे. स्वतःहोऊन घेतलेले परवाने वाया जाणार आहेत, काही करणामुळे खुनी कायदा रद्द झाला नाही तर तुम्हाला हे परवाने जाळावे लागतील तसेच समाज आपल्या निर्धारावर ठाम आहे आणि समाजातील लोकांची तुरुंगात जाण्याची तयारी आहे हे यामुळे ट्रान्सवाल सरकरला कळेल ही गोष्टसुद्धा लोकांना सांगितली जात असे. परवान्यांची होळी करण्याकरिता ठीकठिकाणाहून परवाने गोळा करण्यात आले होते.

ज्या नवीन विधेयकाबद्दल आपण मागील प्रकरणात वाचले ते मंजूर करवून घेण्याकरिता सरकारने तयारी सुरू केली. ट्रान्सवालच्या विधानसभेलाही समाजाने अर्ज पाठवला. परंतु त्यातून काहीही फलित निघाले नाही. अखेरीस सत्याग्रहींनी सरकारकडे 'अल्टिमेटम' पाठवला. 'अल्टिमेटम'चा अर्थ आहे निर्धारपत्र वा धमकीचे पत्र. ते लढाईच्या हेतूनेच पाठवण्यात येत असते. 'अल्टिमेटम' या शब्दाचा उपयोग समाजाने केला नव्हता तर समाजाचा निर्धार सांगताना समाजाने जे पत्र पाठवले होते त्याचा विधानसभेत उल्लेख करताना जनरल स्मट्स यांनी 'अल्टिमेटम' या शब्दाचा उल्लेख केला होता. त्याचबरोबर ते म्हणाले होते की "सरकारला अशी धमकी देणाऱ्या या लोकांना सकारच्या सामर्थ्याची कल्पना नाही. काही आंदोलक गरीब बिचाऱ्या हिंदुस्तानींना भडकवत आहेत. त्या गरिबांवर जर याचा प्रभाव पडला तर गरीब विनाकारण भरडले जातील." त्या प्रसंगाचे वर्णन करताना बातमीदारांनी लिहिले होते की 'अल्टिमेटम'ची गोष्ट ऐकून

विधानसभेचे सर्व सदस्य अतिशय संतापले होते. त्यांचे डोळे लाल झाले होते आणि जनरल स्मट्स यांनी सादर केलेले विधेयक त्यांनी ताबडतोब मंजूर केले.

संदर्भित 'अल्टिमेटम'मध्ये केवळ इतकेच म्हटलेले होते की "हिंदुस्तानी समाज आणि जनरल स्मट्स यांच्यात झालेल्या समेटाप्रमाणे हिंदुस्तानी लोक जर स्वतःहोऊन परवाने घेतील तर त्यांना कायदेशीर ठरवण्याकरिता एक विधेयक मांडण्यात येईल आणि आशियायी कायदा रद्द केला जाईल असे स्पष्टपणे सांगण्यात.आले होते. सरकारी अधिकाऱ्यांचे समाधान होईल अशा प्रकारे समाजातील लोकांनी स्वतःहोऊन परवाने घेतले ही गोष्ट स्पष्ट आहे. यामुळे आता आशियायी कायदा रद्द झालाच पाहिजे. याविषयी जनरल स्मट्स यांना समाजाने अनेक पत्रे लिहिली आहेत आणि न्याय मिळवण्याकरिता इतरही कायदेशीर पावले उचलली आहेत. परंतु अजूनपर्यंत तरी समाजाचे सर्व प्रयत्न अयशस्वी राहिले आहे. आता हे विधेयक विधानसभेत मंजूर होण्याच्या अवस्थेत पोहोचलेले असल्यामुळे हिंदुस्तानी समाजात पसरलेली भीती आणि आणि उत्तेजना यांची सरकारला कल्पना करून देणे समाजाच्या पुढाऱ्यांचे कर्तव्य आहे. आणि आम्हाला दुःखाने सांगावे लागते की समेटाप्रमाणे जर आशियायी कायदा रद्द केला नाही आणि तसे केल्याची सूचना विशिष्ट वेळेत जर समाजाला दिली नाही तर समाजातील लोकांनी जे परवाने घेतले ते ते स्वतःहोऊन जाळून टाकतील. आणि असे केल्यामुळे त्यांना ज्या काही अडचणी सहन कराव्या लागतील त्या ते धैर्याने सहन करतील."

या पत्राला 'अल्टिमेटम' मानण्याचे एक कारण असे होते की त्याचे उत्तर देण्याकरिता सरकारला एक मुदत देण्यात आली होती. दुसरे कारण असे होते की गोरे लोक सामान्यपणे हिंदुस्तानी लोकांना रानटी जमात समजत असत. गोऱ्यांनी जर हिंदुस्तानींना बरोबरीचे मानले असते तर त्यांना हे पत्र पूर्णपणे शिष्टाचारपूर्ण वाटले असते आणि त्याकडे त्यांनी लक्ष दिले असते. परंतु गोरे हिंदुस्तानींना रानटी समजत होते. आणि हिंदुस्तानींनी सरकारला जे पत्र लिहिले त्याकरिता हेच कारण पुरेसे होते. या दोन परिस्थितींमधून कोणत्या तरी एका परिस्थितीची निवड करणे हिंदुस्तानींना भाग होते. एक तर जंगली असल्याचे मान्य करून दबून राहणे वा जंगली असल्याची

गोष्ट अमान्य करण्याच्या दिशेने आवश्यक पाऊल उचलणे. या पत्रामागे त्यावर अंमल करण्याचा दृढनिश्चय नसता तर तो उद्धटपणा मानला गेला असता आणि समाज विचारशून्य आणि मूर्ख गणला गेला असता.

जंगलीपणा नाकारणारे पहिले पाऊल तर १९०६ साली जेव्हा प्रतिज्ञा घेण्यात आली तेव्हाच उचलण्यात आले होते आणि हे जर बरोबर असेल तर या पत्रात असे काय नवीन होते की ज्यामुळे या पत्राला मी इतके महत्त्व देतो आणि या क्षणापासून समाजाने रानटीपणा नाकारायला सुरुवात केली आहे असे मी समजतो अशी शंका कदाचित वाचकांच्या मनात निर्माण होईल. एका दृष्टीने हा युक्तिवाद बरोबर समजला जाईल. परंतु अधिक विचार केला असता लक्षात येईल की समाजाच्या नकाराची खरी सुरुवात या निर्धारपत्रासूनच झाली होती. वाचकांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की सत्याग्रहाच्या प्रतिज्ञेची घटना अकस्मात घडली होती आणि त्यानंतरचा तुरुंगवास वगैरे त्याचा अनिवार्य परिणाम होता. यामुळे नकळत समाजाची प्रतिष्ठा वाढली होती. परंतु हे पत्र लिहीत असताना समाजाला त्याच्या परिणामाची पूर्ण कल्पना होती आणि आपली प्रतिष्ठा जपण्याचा हक्क बजावण्याचा पूर्ण निर्धार होता. पूर्वीप्रमाणेच याही वेळी खुनी कायदा रद्द करायला लावणे हेच उद्दिष्ट या वेळीही होते. परंतु या वेळेच्या पत्राच्या भाषेच्या शैलीत, कार्यपद्धतीच्या निवडीत आणि इतर बाबतीत अंतर होते. एखादा गुलाम आपल्या मालकाला सलाम करतो आणि एखादा मित्र आपल्या मित्राला सलाम करतो यात दोन्ही ठिकाणी सलामच असतो. परंतु या दोन सलामांमध्ये इतके मोठे अंतर असते की त्यामुळेच एखादा तटस्थ दर्शक एका माणसाला गुलाम म्हणेल तर दुसऱ्याला मित्र म्हणून ओळखेल.

सरकारला 'अल्टिमेटम' पाठवत असतानाही आमच्यात बरीच चर्चा झाली होती. मुदत ठरवून सरकारला उत्तर मागणे ही गोष्ट उद्धटपणाची वा शिष्टाचारविरोधी तर गणली जाणार नाही? सरकारची इच्छा आपल्या मागण्या मान्य करण्याची असेल, परंतु या पत्रामुळे त्या अमान्य केल्या असे तर होणार नाही? अप्रत्यक्षपणे समाजाचा निरोप सांगून काम भागणार नाही काय? अशा सर्व प्रश्नांचा खोलवर विचार केल्यानंतर जे उचित आणि न्याय्य वाटते तेच आपण केले पाहिजे

असा सर्वांनी एकमताने निर्णय घेतला. यामुळे शिष्टाचारविरोधाचा आरोप होण्याची जरी भीती असली तरी त्याकरिता आपली तयारी असली पाहिजे, आणि सरकार जे काही देऊ इच्छिते ते खोट्या क्रोधामुळे जर देणार नसेल तर तो धोकाही आपण पत्करला पाहिजे असे आम्हाला वाटले. कोणत्याही स्वरूपात माणसाचा कमीपणा मान्य न करण्याची जर आपली इच्छा असेल आणि कितीही दु:ख कितीही काळ जरी सहन करावे लागले तरी ते सहन करण्याची आपल्यात ताकद असेल तरच हा मार्ग सरळ आणि उचित ठरेल आणि तशाच परिस्थितीत आपण तो स्वीकारता पाहिजे.

या वेळी जे पाऊल उचलण्यात आले त्यात नवीन आणि विशेष काय होते ते आता वाचकांच्या लक्षात येईल. त्याची प्रतिक्रिया विधानसभेत आणि बाहेरच्या गोऱ्यांमध्येही निर्माण झाली. काहींनी हिंदुस्तानींच्या धैर्याची प्रशंसा केली तर अनेक लोकांचा संतापसुद्धा झाला. या उद्धटपणाची हिंदुस्तानींना पूर्णपणे शिक्षा मिळायलाच पाहिजे असे उद्गारही काहींनी काढले. हिंदुस्तानींच्या या पावलातील नाविन्य दोन्ही पक्षांनी मान्य केले. ज्या वेळी सत्याग्रह सुरू झाला त्या वेळी ती अगदी नवीन गोष्ट होती. असे असूनही त्या वेळी गोऱ्यांमध्ये जी खळबळ निर्माण झाली होती त्यापेक्षा किती तरी अधिक खळबळ या पत्रामुळे निर्माण झाली. याचे एक कारण तर स्पष्ट आहे. सत्याग्रह सुरू झाला त्या वेळी कोणालाही समाजाच्या शक्तीचा अंदाज आला नव्हता. त्या वेळी असे पत्र वा अशी भाषा औचित्यपूर्ण मानली गेली नसती. परंतु आता समाजाची थोडीबहुत परिक्षा झाली होती, आणि सामुदायिक आपत्तींना तोंड देत असताना जो त्रास सहन करावा लागत असतो तो त्रास सहन करण्याची शक्ती समाजात आहे हे सर्वांच्या लक्षात आले होते. यामुळे निर्धारपत्राची भाषा स्वाभाविकपणेच विकसित झाली होती. आणि म्हणूनच ती अशोभनीय वाटली नाही.

# ३. स्वतःहोऊन घेतलेल्या परवान्यांची होळी

ज्या दिवशी नवीन आशियायी विधेयक विधानसभेत मंजूर होणार होते त्याच दिवशी ‘अल्टिमेटम’चा वा निर्धारपत्राचा अवधी संपणार होता. अवधी संपल्यानंतर दोनेक तासांनी परवाने जाळण्याकरिता सभा बोलावण्यात आली. सरकारकडून अपेक्षेपेक्षा वेगळे वा अनुकूल उत्तर जरी आले तरी सभा बोलावणे व्यर्थ ठरणार नाही असे सत्याग्रह समितीचे मत होते. तसे घडल्यास सरकारचा निर्णय समाजाला समजावून सांगण्याकरिता त्या सभेचा उपयोग होऊ शकणार होता.

परंतु सरकार निर्धारपत्राचे कोणतेही उत्तर देणार नाही असे समितीला खात्रीपूर्वक वाटत होते. आम्ही सर्व वेळेपूर्वीच सभेच्या ठिकाणी पोहोचलो होतो. सरकारचे तारेने जरी उत्तर आले तरी ते ताबडतोब सभेच्या ठिकणी पोहोचावे अशीही व्यवस्था आम्ही केली होती. सभेची वेळ चार वाजताची ठेवण्यात आली होती. नियमाप्रमाणे जोहानिसबर्ग येथील हमिदिया मशिदीच्या पटांगणात १६ ऑगस्ट १९०८ला सभा झाली. संपूर्ण मैदान हिंदुस्तानींनी गच्च भरून गेलेले होते. दक्षिण आफ्रिकेतील हबशी स्वयंपाकाकरिता ज्या प्रकारच्या कढईचा उपयोग करतात त्या प्रकारची जी मोठ्यातमोठी कढई मिळू शकली ती एका हिंदुस्तानी व्यापाऱ्याच्या दुकानातून मागवून व्यासपीठावर एका कोपऱ्यात ठेवण्यात आली होती.

सभा सुरू होणारच होती तेवढ्यात एक सायकलस्वार आला. त्याच्या हातात तार होती. तिच्यात सरकारचे उत्तर होते. हिंदुस्तानी समाजाच्या निर्धाराबद्दल तिच्यातून खेद व्यक्त करण्यात आला होता आणि सरकार आपला निर्णय बदलवण्याकरिता असमर्थ असल्याचेही त्या तारेतून कळवण्यात आले होते. सभेतील सर्वांना तार वाचून दाखवण्यात आली. सभेने तारेचे स्वागत केले. सरकारने निर्धारपत्रातील मागण्यांचा जणू काय स्वीकार केला असता तर परवान्याची होळी करण्याची जी संधी समाजाला मिळाली असती त्यापासून तो वंचित झाला असता! असा आनंद चांगला की वाईट हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. टाळ्या वाजवून सरकारी निर्णयाचे स्वागत करणाऱ्या लोकांना उद्देश कळल्याशिवाय उचितअनुचिततेचा निर्णय करता येऊ शकत नाही. परंतु

इतके तर म्हणता येऊच शकते की हा आनंद सभेच्या सुंदर उत्साहाचा निदर्शक होता. सभेतील लोकांना आपल्या शक्तीची थोडी जाणीव होऊ लागली होती.

सभेच्या कामकाजाला सुरुवात झाली. सभापतींनी लोकांना सावध केले आणि त्यांना सर्व परिस्थिती समजावून सांगितली. प्रसंगानुरूप ठराव मंजूर करण्यात आले. सरकारबरोबरच्या दीर्घ चर्चेतून जी परिस्थिती निर्माण झाली होती तिच्यावर मी स्पष्ट प्रकाश टाकला आणि म्हणालो, "ज्या लोकांनी आपले परवाने जाळण्याकरिता दिलेले आहेत त्यांच्यापैकी काहींना ते जर परत घ्यायचे असतील तर ते ते परत घेऊ शकतात. केवळ परवाने जाळणे हा काही अपराध होत नाही आणि इतके काम केल्यामुळे तुरुंगात जाण्याची इच्छा करणारांना तुरुंगात जाण्याची संधी मिळेल असेही नाही. परवाने जाळून आम्ही सरकारच्या खुनी कायद्याला विरोध करत आहोत केवळ इतका निर्धार आपण व्यक्त करत आहो. तसेच परवाने दाखवण्याची शक्तीही आपण आपल्यामध्ये ठेवू इच्छित नाही. परंतु जो माणूस आज परवाने जाळण्याच्या कामात सहभागी होतो आणि उद्या त्याने परत परवाना घेतला तर कोणीही त्याचा हात धरू शकणार नाही. असे निंदनीय काम करण्याची ज्याची इच्छा असेल वा कसोटीच्या प्रसंगी आपल्या श्रद्धेवर आपण अढळ राहू शकू असा ज्याला विश्वास वाटत नसेल त्याच्याकरिता परवाने परत घेण्याची अजूनही संधी आहे, आणि हे परवाने आताच त्यांना परत केले जाऊ शकतात. या वेळी आपला परवाना परत घेणारांनी लाजण्याचे काही कारण नाही. मी तर यालाही एक प्रकारची हिंमतच म्हणेन. परंतु नंतर परवाना परत घेण्यात लाज आणि बदनामी दोन्ही आहेत, आणि शिवाय त्यामुळे समाजाची हानीही होईल. याशिवाय या वेळी समाजाने हेही लक्षात ठेवले पाहिजे की ही लढाई लांब चालणार आहे. आपल्याला हेही माहीत आहे की आपल्यापैकी काही लोक प्रतिज्ञेवरून ढळले आहेत. यामुळे समाजाचा गाडा ओढण्याकरिता उरलेल्या लोकांना जास्त जोर लावावा लागणार आहे हेही स्पष्ट आहे. या सर्व गोष्टींचा विचार करूनच आपण आजचा हा साहसी निर्णय घेतला पाहिजे असा माझा तुम्हाला सल्ला आहे."

माझे भाषण सुरू असतानाच सभेतून असे आवाज येऊ लागले होते - "आम्हाला परवाने नको, तुम्ही ते जाळून टाका." अखेरीस मी म्हणालो की ज्याचा या प्रस्तावाला विरोध असेल त्याने

उभे राहावे. परंतु एकही माणूस उभा राहिला नाही. त्या सभेत मीर आलमही हजर होता. त्याने आपला परवाना मला जाळण्याकरिता दिला आणि माझ्यावर हल्ला करण्यात आपण चूक केली असे घोषित केले. स्वतःहोऊन तर त्याने नवीन परवाना घेतलेला नव्हता. मीर आलमचा हात मी हातात घेतला आणि तो खुश होऊन दाबला. तुझ्याबद्दल माझ्या मनात कधीच राग नव्हता असे मी मीर आलमला परत सांगितले. चूक कबूल करून मीर आलमने परवाना दिल्यामुळे लोकांच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

जाळण्याकरिता समितीजवळ दोनशेहून अधिक परवाने आले होते. परवान्यांचा ढीग कढईत टाकण्यात आला आणि त्यांच्यावर वरून घासलेट ओतण्यात आले. युसूफ मियांनी ते आगपेटीच्या काडीने पेटेवले. संपूर्ण सभा उभी झाली आणि जोपर्यंत परवाने जळत होते तोपर्यंत टाळ्यांचा कडकडाट सुरू होता. ज्या काही लोकांनी अजून आपल्याजवळ परवाने ठेवले होते त्यांच्या परवान्यांचाही आता व्यासपीठावर वर्षाव होऊ लागला. हे परवानेही कढईत टाकण्यात आले. होळी होईपर्यंत तुम्ही परवाने का दिले नव्हते असे विचारले असता काही लोक म्हणाले, “होळी पेटेल तेव्हाच परवाने दिले तर त्याचा इतरांवर चांगला प्रभाव पडेल असे आम्हाला वाटल्यामुळे आम्ही आधी परवाने दिले नव्हते.” इतर काही लोकांनी प्रामाणिकपणे आपली चूक कबूल केली आणि ते म्हणाले की “परवाने देण्याचा आम्हाला धीरच होत नव्हता. कदाचित परवाने जाळले जाणार नाहीत असे अखेरच्या क्षणापर्यंत आम्हाला वाटत होत. परंतु परवान्यांची ही होळी पाहिल्यानंतर आमच्याकडून राहवले नाही. आम्ही विचार केला की जे सर्वांचे होईल तेच आपले होईल. ”सत्याग्रहाच्या या लढाईत स्पष्टवक्तेपणाचे आणि मनमोकळेपणाचे अनेक अनुभव आम्हाला आले.

या सभेत इंग्रजी वृत्तपत्रांचे वार्ताहरही आले होते. सभेतील संपूर्ण दृश्य पाहून तेसुद्धा प्रभावित झाले. त्यांनी आपल्या वृत्तपत्रांमधून सभेचे हुबेहूब वर्णन केले होते. इंग्लंडमधील ‘डेली मेल’ या इंग्रजी दैनिकाला जोहानिसबर्ग येथील बातमीदाराने या सभेचा वृत्तांत पाठवला होता. आपल्या वृत्तात त्याने परवान्याच्या होळीच्या या सभेची तुलना इंग्रजांच्या त्या कामाशी केली होती ज्यात

इंग्लंडहून पाठवण्यात आलेल्या चहाच्या पेट्या बोस्टन बंदराच्या समुद्रात बुडवण्यात आल्या होत्या आणि इंग्लंडच्या अंकित न राहण्याचा निर्णय घोषित करण्यात आला होता. दक्षिण आफ्रिकेची स्थिती अशी होती - एकीकडे १३,००० हिंदुस्तानींचा निराधार समुदाय होता तर दुसरीकडे ट्रान्सवालचे शक्तिशाली राज्य होते. आणि अमेरिकेत होते एकीकडे सर्व प्रकारचे कुशल लाखो गोरे आणि दुसरीकडे होते शक्तिशाली ब्रिटिश साम्राज्य. या दोन परिस्थितीची तुलना करत असताना 'डेली मेल'च्या बातमीदाराने काही अतिशयोक्ती केली होती असे मला वाटत नाही. हिंदुस्तानींचे एकमेव शस्त्र होते त्यांचा सत्यावरील विश्वास आणि ईश्वरावरील श्रद्धा. श्रद्धाळू माणसाकरिता हे शस्त्र सर्वोपरी असते यात काही संशय नाही. परंतु सर्वसामान्य माणसात जोपर्यंत ही दृष्टी निर्माण होत नाही तोपर्यंत १३,००० निःशस्त्र हिंदुस्तानींना शस्त्रबळ असलेल्या अमेरिकी गोऱ्यांसमोर तुच्छच गणले जाईल. परंतु ईश्वर तर दुर्बलांची शक्ती आहे. यामुळे जगाने हिंदुस्तानींना तुच्छ आणि निर्बल समजणे उचित नाही.

## ४. नवीन मुद्दे उपस्थित करण्याचा समाजावर आरोप

ट्रान्सवाल विधानसभेच्या ज्या बैठकीत आशियायी कायदा मंजूर करण्यात आला होता त्याच बैठकीत अजून एक विधेयक मंजुरीकरिता मांडण्यात आले. त्या विधेयकाचे नाव होते, "आप्रवासी प्रतिबंधक कायदा." (इमिग्रेशन रेस्ट्रिक्शन ॲक्ट, १९०७चा पंधरावा कायदा) म्हणजेच नवीन येणारांवर अंकुश लावणारा कायदा. हा कायदा तसे पाहता सर्वांना लागू होणारा होता. परंतु नवीन येणाऱ्या हिंदुस्तानींवर अंकुश लावणे हा त्याचा खरा उद्देश होता. हा कायदा तयार करताना नातालच्या अशाच एका कायद्याचे अनुकरण करण्यात आले होते. परंतु यातील एका कलमामुळे आशियायी कायदा ज्यांना लागू होणार होता त्यांचाही निषिद्ध आगंतुकांच्या व्याख्येत समावेश झाला असता. अशा प्रकारे एकाही हिंदुस्तानीला ट्रान्सवालमध्ये प्रवेश करता येऊ नये अशी युक्ती अप्रत्यक्षपणे या कायद्यात योजिण्यात आली होती. याचा विरोध करणे समाजाकरिता नितांत आवश्यक होते. परंतु सत्याग्रहात या कायद्याचा समावेश करायचा की नाही असा प्रश्न समाजासमोर उभा राहिला. सत्याग्रह केव्हा करावा आणि कोणत्या विषयासंबंधी करावा याबाबतीत समाजावर कोणतेही बंधन नव्हते. यासंबंधात जे काही बंधन होते ते समाजाच्या विवेकातून आणि शक्तीतून निर्माण झाले होते. लहानसहान बाबतीत कोणी सत्याग्रह केला तर तो दुराग्रह होईल. अशा प्रकारे आपल्या शक्तीचा अंदाज न करता जो माणूस सत्याग्रह करतो आणि मग पराभूत होतो तो स्वतः तर कलंकित होतोच शिवाय अविवेकामुळे सत्याग्रहाच्या शस्त्रालाही दुषित करतो.

सत्याग्रहसमितीने विचार केला की हिंदुस्तानी समाजाचा सत्याग्रह केवळ खुनी कायद्याविरुद्ध आहे. खुनी कायदा जर रद्द झाला तर 'इमिग्रेशन रेस्ट्रिक्शन ॲक्ट'च्या ज्या जहराचा मी वर उल्लेख केला आहे ते आपोआप नष्ट झाले असते. असे असले तरीही खुनी कायदा रद्द करायला लावायचा असल्यामुळे 'इमिग्रेशन रेस्ट्रिक्शन ॲक्ट'ची या आंदोलनात वेगळी चर्चा करण्याची आवश्यकता नाही असा जर समाजाने विचार केला असता तर त्याचा अर्थ नवीन येणाऱ्या हिंदुस्तानींवर लावण्यात आलेले प्रतिबंध हिंदुस्तानी समाजाला मान्य आहेत असा लावला गेला असता. यामुळे

'इमिग्रेशन रेस्ट्रिक्शन ॲक्ट'चा विरोध करणे आवश्यक होते. परंतु त्याचा समावेश सत्याग्रहाच्या लढाईत करायचा की नाही याचा विचार करणे आवश्यक होते. सत्याग्रह सुरू असतानाच समाजावर होणाऱ्या इतर आक्रमणांचाही सत्याग्रहात समावेश करणे आपला धर्म आहे असे समाजाचे मत होते. परंतु समाजाच्या दौर्बल्यामुळे जर असे करता येऊ शकत नसेल तर ती गोष्ट वेगळी. शक्तीच्या अभावाचे वा उणिवेचे निमित्त करून विषारी 'इमिग्रेशन रेस्ट्रिक्शन ॲक्ट'ला तसेच सोडून देता येऊ शकत नाही असे समाजाच्या पुढाऱ्यांना वाटले आणि यामुळे 'इमिग्रेशन रेस्ट्रिक्शन ॲक्ट'चाही सत्याग्रह आंदोलनात समावेश करण्यात आला. यामुळे यासंबंधीही ट्रान्सवाल सरकारबरोबर पत्रव्यवहार करण्यात आला. परंतु तेवढ्याने कायद्यात कोणताही बदल झाला नाही. परंतु त्या निमित्ताने जनरल स्मट्स यांना समाजाची आणि खरे सांगायचे तर माझी निंदा करायची संधी मिळाली. जनरल स्मट्सना माहीत होते की जितके गोरे हिंदुस्तानी समाजाला उघडपणे मदत करत होते त्यापेक्षा किती तरी अधिक गोऱ्यांच्या मनात हिंदुस्तानी समाजाबद्दल सहानुभूती होती. यामुळे ही सहानुभूती नष्ट करता येईल असे काही करावे अशी इच्छा त्यांच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक होते. यामुळे मी नवीन मुद्दा उचलत असल्याचा त्यांनी माझ्यावर आरोप केला आणि हिंदुस्तानी समाजाबद्दल सहानुभूती बाळगणाऱ्या गोऱ्यांशी झालेल्या चर्चांमधून आणि पत्रव्यवहारामधून ते सांगू लागले की "गांधीला जितका मी ओळखतो तितके तुम्ही ओळखत नाही. तो असा माणूस आहे की त्याला एक इंच जमीन दिली तर तो एक गज जमीनीची मागणी करील. मला हे सर्व माहीत आहे. यामुळेच मी आशियायी कायदा रद्द करून राहिलेलो नाही. त्याने जेव्हा सत्याग्रह सुरू केला होता तेव्हा नवीन येणारांबद्दल काहीही चर्चा नव्हती. आता ट्रान्सवालच्या रक्षणाच्या दृष्टीने नवीन येणाऱ्या हिंदुस्तानींकरिता आपण कायदा करत आहो तर यातही हा सत्याग्रह करण्याची धमकी देऊन राहिला आहे. अशी चलाखी (कनिंगनेस) कुठपर्यंत सहन करता येऊ शकेल? त्याला जे काही करायचे असेल ते करू द्या. प्रत्येक हिंदुस्तानी जरी बरबाद झाला तरी मी आशियायी कायदा रद्द करणार नाही, आणि ट्रान्सवाल सरकारने हिंदुस्तानींबद्दल जे धोरण अवलंबिले आहे तेही मी सोडणार नाही. या न्याय्य नीतीचे समर्थन प्रत्येक गोऱ्याने केले पाहिजे."

थोडासा जरी विचार केला तरी लक्षात येते की जनरल स्मट्सचा हा युक्तिवाद अगदी अनुचित आणि अनैतिक होता. नवीन येणाऱ्या हिंदुस्तानींवर निर्बंध घालणाऱ्या कायद्याचा जेव्हा जन्मच झालेला नव्हता तेव्हा समाज त्या कायद्याला कसा काय विरोध करणार होता? त्यांनी माझ्या चलाखीसंबंधीच्या अनुभवाचा उल्लेख केला आहे. परंतु त्याचे एकसुद्धा उदाहरण ते देऊ शकले नाही. आणि दक्षिण आफ्रिकेतील इतक्या वर्षांच्या काळात मी कधीही चलाखीने भरलेले वर्तन केल्याचे आणि चलाखीने वागल्याचे मला आठवत नाही हे सांगताना मला मुळीच संकोच होत नाही. माझा विश्वास आहे की चलाखीचा उपयोग केवळ नीतीविरोधीच नाही तर राजनीतीविरुद्धही आहे. यामुळे व्यावहारिक दृष्टीनेही मला चलाखी कधीही आवडली नाही. माझा बचाव करण्याकरिता इतकेसुद्धा लिहिण्याची मला आवश्यकता वाटत नाही. ज्या वाचकांकरिता मी हा इतिहास लिहितो आहे त्यांच्यासमोर स्वतःचा बचाव करत बसण्याची मला लाज वाटते. मी चलाखीमुक्त आहे असा अनुभव आजपर्यंत जर वाचकांना आला नसेल तर स्वतःचा बचाव करूनही मला ही गोष्ट सिद्ध करता येणार नाही. कोणकोणत्या अडचणींना तोंड देत सत्याग्रहाची लढाई लढावी लागली होती आणि नैतिकतेच्या राजमार्गावरून समाज किंचित जरी ढळला तरी लढा कसा संकटात सापडतो हे सांगणे इतकाच वरील मजकूर लिहिण्यामागील माझा हेतू आहे. एखादा डोंबारी २० फूट उंचावर बांधलेल्या दोरीवरून जेव्हा चालत असतो तेव्हा त्याला आपली दृष्टी त्या दोरीवर खिळून ठेवावी लागत असते. आणि असे करण्यात तो किंचित जरी चुकला तरी त्याचा मृत्यू अटळ असतो, मग तो दोरीच्या कोणत्याही बाजूला पडो. सत्याग्रहीने डोंबाऱ्यापेक्षाही आपल्या लक्ष्यावर अधिक लक्ष केंद्रित करून चालले पाहिजे हे दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या आठ वर्षांच्या अनुभवाने मला शिकवले आहे. ज्या गोऱ्या मित्रांसमोर जनरल स्मट्स यांनी वरील आरोप केला होता ते मित्र मला चांगल्या प्रकारे ओळखत होते. त्यांच्यावर जनरल स्मट्स यांच्या अपेक्षेविरुद्ध परिणाम झाला. त्यांनी मला वा लढ्याला सोडले तर नाहीच, उलट अधिक उत्साहाने मदत केली आणि 'इमिग्रेशन रेस्ट्रिक्शन ऍक्ट'चा सत्याग्रहात समावेश करण्यात आला नसता तर समाज गंभीर अडचणीत सापडला असता हेही समाजाच्या लक्षात आले.

माझा स्वतःचा अनुभव असा आहे की प्रत्येक शुद्ध लढाईला गणितीश्रेणीचा नियम लागू होत असतो. आणि सत्याग्रहात तर ही गोष्ट सिद्धांतासारखीच असते अशी माझी मान्यता आहे. गंगा नदी जसजशी वाहत पुढे जाते तसतशा तिच्यात अनेक नद्या येऊन मिळतात आणि मुखाजवळ तर तिचे पात्र इतके विशाल होते की नावेत बसलेल्या प्रवाशाला डावीउजवीकडे, चोहोकडे पाणीचपाणी दिसते आणि समुद्रात आणि गंगेत काही अंतर असल्याचे त्याला जाणवत नाही. अशाच प्रकारे सत्याग्रहाची लढाई जसजशी पुढे जाते तसतशा त्याच्यात विविध गोष्टी येऊन मिसळतात. आणि त्यामुळे सत्याग्रहापासून निर्माण होणाऱ्या परिणामांमध्ये वृद्धी होत जाते. सत्याग्रहाचा हा अपरिहार्य परिणाम आहे असा माझा विश्वास आहे. सत्याग्रहाच्या मूळ सिद्धांतातच याचे कारण सामावलेले आहे. सत्याग्रहात किमानच कमाल असते. यामुळे किमानमधून काही कमी करण्याची गोष्टच निर्माण होत नाही. यामुळे त्यापासून मागे फिरता येत नसते आणि यामुळे सत्याग्रहाची स्वाभाविक परिणती वृद्धीतच होत असते. इतर लढाया शुद्ध असल्या तरी त्यांच्यात काही कमी करण्याकरिता आधीच वाव ठेवलेला असतो. यामुळे त्यांच्यात निरपवादपणे वृद्धी होण्यासंबंधात मी शंका व्यक्त केली आहे. परंतु किमान हेच कमालही असल्यामुळे वृद्धीचा नियम सत्याग्रहाला कसा लागू होतो हे समजून सांगण्याचे राहून गेले आहे. ज्याप्रमाणे गंगा नदी वृद्धीच्या शोधार्थ आपला मार्ग वा गती सोडत नाही त्याचप्रमाणे सत्याग्रहीसुद्धा वृद्धीच्या शोधात आपला असिधारेसारखा मार्ग सोडत नाही. परंतु गंगा नदीचा प्रवाह जसजसा पुढे जाऊ लागतो तसतसे इतर नद्यांचे प्रवाह तिच्यात आपोआप येऊन मिळू लागतात तसेच सत्याग्रहाच्यासंबंधातही हीच गोष्ट खरी आहे. 'इमिग्रेशन रेस्ट्रिक्शन ॲक्ट'चा सत्याग्रहात समावेश करण्यात आल्यानंतर सत्याग्रहाच्या सिद्धांताची कल्पना नसलेल्या हिंदुस्तानींनी मागणी केली की ट्रान्सवालमध्ये हिंदुस्तानींच्या विरोधात जे काही कायदे आहेत त्या सर्वांचा सत्याग्रहाच्या लढाईत समावेश करण्यात यावा. इतर काही असेही म्हणाले की ट्रान्सवालमधील हिंदुस्तानींची लढाई सुरू असतानाच नाताल, ऑरेंज फ्री स्टेट इत्यादी सर्व वसाहतींमधील हिंदुस्तानींना बोलावून दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्तानींच्या विरोधात करण्यात आलेल्या सर्व कायद्यांविरोधात सत्याग्रह सुरू केला पाहिजे. हे दोन्ही प्रस्ताव असे होते की

त्यांच्यामुळे सत्याग्रहाचा भंग झाला असता. मी स्पष्ट शब्दांत सांगितले की सत्याग्रहाच्या सुरुवातीला आपण ही भूमिका घेतली नव्हती. संधी सापडल्यामुळे आता ही भूमिका घेणे प्रामाणिकपणाचे होणार नाही. आपली शक्ती कितीही मोठी असली तरी ज्या मागणीकरिता आपण सत्याग्रह करत असतो तिची पूर्ती होताच सत्याग्रह बंद झालाच पाहिजे. या तत्त्वावर आम्ही दृढ राहिलो नसतो तर माझी खात्री आहे की विजयाऐवजी आमचा पराभव तर झालाच असता शिवाय जी सहानुभूती आम्हाला मिळाली होती तीसुद्धा आम्ही गमावली असती. तसेच सत्याग्रह सुरू असताना सत्याग्रहात विरोधक काही अडथळे करत असतील तर त्या अडथळा आणणाऱ्या गोष्टींचा सत्याग्रहात आपोआपच समावेश होतो. सत्याग्रही आपल्या दिशेने पुढे जात असताना मार्गात निर्माण होणाऱ्या अडथळ्यांची उपेक्षा करू शकत नाही. आणि विरोधी सत्याग्रहही असूच शकत नाही. (कारण सत्याग्रहाच्या विरोधात सत्याग्रह असू शकत नाही.) यामुळे सत्याग्रहीवर कमी वा अधिकचे बंधन असू शकत नाही. नवनवीन गोष्टी उभ्या करून विरोधक सत्याग्रहींना घाबरवण्याचा प्रयत्न करू शकतो, परंतु सत्याग्रही तर सर्व भीतीपासून मुक्त असतो. यामुळे विरोधक जेव्हा नवीन अडचणी निर्माण करतो तेव्हा त्याच्यासमोरही तो सत्याग्रहाचा मंत्रोच्चार करत असतो, आणि मनात श्रद्धा बाळगत असतो की मार्गात येणारे सर्व अडथळे दूर करण्यात त्याच्या मंत्रोच्चाराला निश्चितच यश येईल. यामुळेच सत्याग्रह जितका दीर्घ काळ चालतो, म्हणजेच विरोधक जितका तो लांबवतो तितकीच विरोधकाची विरोधकाच्या दृष्टीने हानी होते.आणि सत्याग्रहाचा लाभ होतो. या नियमाची अजून उदाहरणे आपण इतर प्रकरणांमध्ये पाहणार आहोतच.

# ५. सोराबजी शापुरजी अडाजणीया

आता 'इमिग्रेशन रेस्ट्रिक्शन ऍक्ट'चा सत्याग्रहाच्या लढाईत समावेश करण्यात आलेला असल्यामुळे शिक्षित हिंदुस्तानींचा ट्रान्सवालमध्ये प्रवेश करता येण्याच्या अधिकाराची परीक्षाही सत्याग्रहींनाच करावी लागली. कोणताही सत्याग्रही ही परीक्षा घेऊ शकत नाही असे सत्याग्रहसमितीचे मत होते. 'इमिग्रेशन रेस्ट्रिक्शन ऍक्ट'मध्ये ज्या प्रतिबंधात्मक अटी होत्या आणि ज्यांना आमचा कधीही विरोध नव्हता त्या अटींचे पालन करू शकणाऱ्या कोणत्या तरी हिंदुस्तानीला ट्रान्सवालमध्ये आणून त्याला तुरुंगात पाठवण्याचा निर्णय आम्ही घेतला. सत्याग्रह हा एक मर्यादाधर्म आहे हे यातून आम्हाला सिद्ध करायचे होते. 'इमिग्रेशन रेस्ट्रिक्शन ऍक्ट'मध्ये एक कलम असे होते - ट्रान्सवालमध्ये नवीन येणाऱ्या व्यक्तीला युरोपमधील कोणत्या तरी भाषेचे ज्ञान असले पाहिजे. यामुळे ज्याला इंग्रजी भाषेचे ज्ञान असेल आणि यापूर्वी जो ट्रान्सवालमध्ये राहिलेला नसेल अशा कोणत्या तरी माणसाला ट्रान्सवालमध्ये आणण्याची सत्याग्रहीसमितीची इच्छा होती. काही उमेदवारांनी याकरिता नावेही नोंदवली. परंतु सत्याग्रहसमितीच्या कसोटीला केवळ सोराबजी शापुरजी अडाजणियाच उतरले.

नावावरूनच वाचकांच्या लक्षात येईल की सोराबजी पारसी होते. संपूर्ण दक्षिण आफ्रिकेत पारसी लोकांची संख्या १०० पेक्षा जास्त नव्हती. पारसी लोकांबद्दल हिंदुस्तानात जे मत व्यक्त केले होते तेच माझे मत दक्षिण आफ्रिकेतही होते. संपूर्ण जगात एक लाखांपेक्षा जास्त पारसी नसावे. इतकी लहानशी जमात दीर्घ काळापासून आपल्या प्रतिष्ठेचे रक्षण करत आली आहे. आपल्या धर्मावर ती अढळ आहे आणि उदारपणात जगातील कोणतीही जमात तिची बरोबरी करणार नाही. या सगळ्या गोष्टी या जमातीच्या श्रेष्ठतेच्या द्योतक आहेत. आणि सोराबजी तर आपल्या गुणांमुळे शुद्ध रत्न सिद्ध झाले. ते लढाईत सामील झाले तेव्हा माझा आणि त्यांचा फार कमी परिचय होता. लढाईत सामील होण्याबद्दल त्यांनी जो पत्रव्यवहार केला त्याचा माझ्या मनावर फार चांगला प्रभाव पडला. ज्याप्रमाणे मी पारसी लोकांच्या गुणांचा पूजक आहे त्याचप्रमाणे त्या समाजाच्या काही दोषांबद्दलही मी अनभिज्ञ नव्हतो आणि नाही. यामुळे संकटाच्या वेळी सोराबजी टिकाव धरू

शकतील की नाही याबद्दल मी साशंक होतो. परंतु समोरचा माणूस आपल्या शंकेविरुद्ध काही सांगत असेल तर आपल्या शंकेला महत्त्व न देण्याचा माझा नियम आहे. यामुळे सोराबजींनी आपल्या पत्रामधून जो निर्धार दाखवला तो मान्य करण्यात यावा असे मला वाटले. आणि अखेरीस सोराबजी उच्च कोटीचे सत्याग्रही असल्याचे सिद्ध झाले. जास्तीतजास्त तुरुंगवास भोगणारांपैकी ते एक होते. इतकेच नाही तर त्यांनी समाजाच्या लढाईचा इतका सखोल अभ्यास केला होता की ते लढाईसंबंधी जे काही सांगायचे ते सर्वांना मान्य करावे लागायचे. त्यांच्या सल्ल्यात नेहमी निर्धार, विवेक, उदारपणा, शांती इत्यादींचे दर्शन व्हायचे. घाईत ते कोणतेही मत बनवत नसत. ज्या प्रमाणात त्यांच्यात पारसीपणा होता, आणि तो खूप मोठा होता, त्याच प्रमाणात त्यांच्यात हिंदुस्तानित्वही होते. संकुचित जातीयवादाचा त्यांना स्पर्शही झालेला नव्हता. सत्याग्रहाचा लढा संपल्यानंतर चांगल्या सत्याग्रहींपैकी कोणाला तरी बॅरिस्टरी शिकण्याकरिता इंग्लंडला पाठवण्याकरिता डॉ. मेहतांनी एक शिष्यवृत्ती दिली होती. अशा माणसाची निवड मलाच करायची होती. इंग्लंडला पाठवण्यासारखे दोनतीन तरुण होते. परंतु सर्व मित्रांना वाटले की विचारांचे गांभीर्य आणि समजूतदारपणा या बाबतीत सोराबजींची बरोबरी दुसरा कोणीही करू शकत नाही. यामुळे त्यांचीच निवड झाली. निवड झालेल्या उमेदवाराने बॅरिस्टर होऊन दक्षिण आफ्रिकेत परतल्यानंतर माझी जागा घ्यावी असा उद्देश ही शिष्यवृत्ती देण्यामागे होता. समाजाचा आशीर्वाद आणि प्रतिष्ठा सोबत घेऊन सोराबजी इंग्लंडला गेले. बॅरिस्टर झाले. गोखल्यांशी त्यांची ओळख दक्षिण आफ्रिकेतच झाली होती. सौराबजींनी त्यांचे मन जिंकले. हिंदुस्तानात परतल्यानंतर भारत सेवक समाजात सामील होण्याकरिता गोखल्यांनी त्यांना आग्रह केला होता. आपल्या सोबतच्या विद्यार्थ्यांमध्ये सोराबजी अतिशय लोकप्रिय होते. प्रत्येक विद्यार्थ्याच्या सुखदुःखात ते सहभागी होत असत. इंग्लंडमधील डामडौलाचा आणि चैनीच्या वातावरणाचा त्यांच्यावर कोणताही परिणाम झाला नव्हता. सोराबजी इंग्लंडला गेले तेव्हा त्यांचे वय तीस वर्षांपेक्षा जास्त होते. त्यांचा इंग्रजीचा अभ्यास विशेष नव्हता. व्याकरण इत्यादीच्या त्यांच्या ज्ञानाला जंग लागलेला होता. परंतु माणसाच्या चिकाटीसमोर अशा गैरसोयींचा टिकाव लागू शकत नाही. शुद्ध विद्यार्थी जीवन व्यतीत करत ते परीक्षा उत्तीर्ण होत गेले. माझ्या काळात बॅरिस्टरीची परीक्षा तुलनात्मक दृष्टीने सोपी

होती. आजच्या बॅरिस्टरांना त्या काळातील बॅरिस्टरांपेक्षा बराच जास्त अभ्यास करावा लागतो. परंतु सोराबजी डगमगले नाही. इंग्लंडमध्ये जेव्हा शुश्रुषापथक सुरू झाले तेव्हा त्याची सुरुवात करणारांमधील सोराबजी एक होते आणि अखेरपर्यंत ते त्यात राहिले. त्या पथकालाही सत्याग्रह करावा लागला होता. त्यात अनेक लोकांनी माघार घेतली होती. परंतु जे लोक टिकून राहिले त्यात सोराबजी होते. शुश्रुषापथकातील तो सत्याग्रहही यशस्वी झाला होता हेही मी इथे सांगितले पाहिजे.

इंग्लंडमध्ये बॅरिस्टर झाल्यानंतर सोराबजी जोहानिसबर्ग येथे परतले. इथे त्यांनी वकिली आणि समाजसेवा या दोन्ही गोष्टींना सुरुवात केली. दक्षिण आफ्रिकेतून मला जी पत्रे यायची त्यात सोराबजींची प्रशंसाच असायची. त्यात लिहिलेले असायचे, “ते पूर्वी जसे साधे होते तसेच आजही आहेत. डामडौलाचा त्यांना स्पर्शही झालेला नाही. लहानमोठ्या सगळ्यांशी ते मिळूनमिसळून वागतात.” परंतु देव जितका दयाळू आहे असे वाटते तितकाच तो निर्दयीही असतो असे दिसते. सोराबजींना तीव्र क्षयरोग (गॅलपिंग थायसिस) झाला आणि काही महिन्यातच समाजाचे प्रेम संपादन करून आणि त्याला दु:खात ढकलून सोराबजी निघून गेले. अशा प्रकारे ईश्वराने समाजाचे दोन रत्न थोड्याच कालात हिरावून नेले. - एक काछलिया सेठ, दुसरे सोराबजी.

निवडच करायची असली तर दोघांमधून मी कोणाला पहिले स्थान देईन? मी निवडच करू शकत नाही. दोघेही आपापल्या क्षेत्रात अद्वितीय होते. काछलिया जितके शुद्ध मुसलमान होते तितकेच ते शुद्ध हिंदुस्तानीही होते. त्याचप्रमाणे सोराबजी जितके शुद्ध पारसी होते तितकेच ते शुद्ध हिंदुस्तानीही होते.

कसोटी म्हणून आधी सरकारला सूचना देऊन सोराबजी ट्रान्सवालमध्ये आले होते. याकरिता सरकारची अगदीच तयारी नव्हती. यामुळे सोराबजीबरोबर कसा व्यवहार करावा याचा निर्णय सरकारला ताबडतोब घेता आला नाही. सोराबजींनी उघडपणे सीमा ओलांडून ट्रान्सवालमध्ये प्रवेश केला होता. परवाने तपासणारा अधिकारी त्यांना ओळखत होता. सोराबजी त्याला म्हणाले, “कसोटी म्हणून मी जाणूनबुजून ट्रान्सवालमध्ये शिरलो आहे. माझ्या इंग्रजीची परीक्षा घ्यायची

असेल तर ती तुम्ही घेऊ शकता आणि मला अटक करायची असेल तर तसेही करू शकता." अधिकाऱ्याने उत्तर दिले, "तुम्हाला इंग्रजी येते हे मला माहीत आहे. यामुळे परीक्षा घेण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. आणि तुम्हाला अटक करण्याचा आदेश मला देण्यात आलेला नाही. यामुळे तुम्ही खुशीखुशीने आत जाऊ शकता. सरकारला हवे असेल तर तुम्ही जिथे जाल तिथे ते तुम्हाला अटक करू शकेल."

अशा प्रकारे आम्हाला अपेक्षा नसतानाही सोराबजी जोहानिसबर्गला पोहोचले. आम्ही सर्वांनी आनंदाने त्यांचे स्वागत केले. ट्रान्सवालच्या सीमेवरील स्टेशन वॉकरस्टच्या पुढे सोराबजींना सरकार येऊ देईल अशी आमच्यापैकी कोणालाही आशा नव्हती. अनेकदा असे होत असते की आपण आपले पाऊल न घाबरता ताबडतोब विचारपूर्वक उचलतो तेव्हा त्याचा विरोध करण्याची सरकारची तयारी नसते. प्रत्येक शासनाचा असाच स्वभाव असतो असे म्हणता येऊ शकते. आणि कशीही आकस्मिक परिस्थिती निर्माण झाली तरी तिचा सामना करण्याकरिता ताबडतोब निर्णय घेत यावा इतका सारासार विचार प्रत्येक सरकारी अधिकाऱ्याने आधीपासून केलेला नसतो. त्याने आपल्या विभागाला तितक्या प्रमाणात आपलेसे केलेले नसते. याशिवाय अधिकाऱ्याला एक नाही तर अनेक काम असतात. त्या कामांमागे त्याचे लक्ष विभागलेले असते. अधिकाऱ्याला सत्तेचा अहंकार असतो आणि व त्यामुळे तो बेफिकीर असतो आणि कसेही आंदोलन झाले तरी त्याला तोंड देणे आपल्या डाव्या हाताचा खेळ आहे आहे असे त्याला वाटत असते. उलटपक्षी आंदोलन चालवणाऱ्या सार्वजनिक कार्यकर्त्याला आपल्या ध्येयाची पुरेशी कल्पना असेल, त्याकरिता लागणाऱ्या साधनांचे त्याला ज्ञान असेल आणि आपल्या योजनेबद्दल त्याने नीट विचार केलेला असेल तर तो पूर्णपणे तयार असतो. तसेच त्याला एकाच गोष्टीचा रात्रंदिवस विचार करायचा असल्यामुळे  त्याने जर योग्य पद्धतीने पाऊल उचलले तर त्याचे पाऊल नेहमीच सरकारच्या पुढे राहील. सरकारच्या हाती अनन्यसाधारण सत्ता असल्यामुळे अनेक आंदोलन अयशस्वी होत असतात.

संक्षेपात शासनाच्या सावधगिरीच्या अभावामुळे अथवा जाणूनबुजून ठरवलेल्या योजनेमुळे सोराबजी जोहानिसबर्गला पोहोचू शकले होते. आणि सोराबजी सारख्यांच्या प्रकरणी अधिकाऱ्यांचे काय कर्तव्य आहे याची सूचना स्थानिक अधिकाऱ्यांना देण्यात आलेली नव्हती. अशा प्रकारे सोराबजी जोहानिसबर्गला पोहोचल्यामुळे समाजाचा उत्साह द्विगुणित झाला. काही तरुणांना तर सरकार पराभूत झाले आणि लवकरच ते समेट करील असे वाटू लागले. परंतु आपली ही धारणा चुकीची असल्याचे थोड्याच दिवसांत या तरुणांच्या लक्षात आले. इतकेच नाही तर समेट होण्याआधी अनेक तरुणांना आपली आहुतीही द्यावी लागेल याचीही त्यांना जाणीव झाली.

ट्रान्सवालमध्ये राहण्याचा आपल्या अधिकार असून मी जोहानिसबर्गला चाललो आहे अशी सूचना "इमिग्रेशन रेस्ट्रिक्शन ऍक्ट"प्रमाणे सोराबजींनी जोहानिसबर्गच्या पोलीस अधिकाऱ्यांना दिली. याकरिता आपल्याला इंग्रजीचे सर्वसामान्य ज्ञान असल्याचा त्यांनी उल्लेख केला आणि अधिकाऱ्यांना परिक्षा घ्यायची असेल तर त्याकरिता आपली तयारी असल्याचे सांगितले. या पत्राचे कोणतेही उत्तर आले नाही. अथवा असेही म्हणता येईल की या पत्राचे उत्तर म्हणून की काय या पत्रानंतर काही दिवसांनी सोराबजींना एक समन्स मिळाला

८ जुलै १९०८ला न्यायालयात त्यांच्यावरील खटला सुरू झाला. हिंदुस्तानी प्रेक्षकांनी न्यायालय चिक्कार भरलेले होते. तिथे आलेल्या हिंदुस्तानींची न्यायालयाच्या प्रांगणातच एक सभा घेण्यात आली. त्या सभेत सोराबजींनी विरश्रीयुक्त भाषण केले. समाजाचा विजय होईपर्यंत किहीही वेळा जरी तुरुंगात जावे लागले तर मी जाईन आणि त्यामुळे कितीही त्रास सहन करावा लागला तर मी तो सहन करीन अशी प्रतिज्ञा सोराबजींनी त्या भाषणातून केली. मध्यंतरीच्या काळात सोराबजींशी माझा जवळून परिचय झाला होता आणि सोराबजी शुद्ध रत्न असल्याचे सिद्ध होईल याबद्दल माझी खात्री पटलेली होती. खटला सुरू झाला. वकील म्हणून मी सोराबजींचा बचाव केला. समन्समधील दोषांकडे मी न्यायाधीशांचे लक्ष वेधले, आणि सोराबजींना देण्यात आलेले समन्स रद्द करावे अशी त्या आधारावर मागणी केली. सरकारी वकिलांनी आपली बाजू मांडली. परंतु ९ जुलैला माझा युक्तिवाद मान्य करून न्यायालयाने समन्स रद्द केले. समाज आनंदाने वेडा झाला.

परंतु सोराबजींची ही सुटका टिकणारी नव्हती. दुसऱ्या दिवशी म्हणजे १० जुलै १९०८ला न्यायालयात हजर राहण्याची त्यांना सूचना मिळाली. १० जुलैला न्यायाधीशांनी त्यांना ८ दिवसात ट्रान्सवाल सोडण्याचा हुकूम दिला. ट्रान्सवाल सोडण्याची आपली इच्छा नाही असे न्यायालयाचा आदेश मिळाल्यानंतर सोराबजींनी पोलीस अधीक्षक श्री वरनॉन यांना सूचीत केले. यामुळे परत एकदा त्यांना न्यायालयात आणण्यात आले आणि न्यायाधीशांच्या आदेशाचे पालन केले नाही असा आरोप २० जुलैला त्यांच्यावर ठेवण्यात आला आणि त्यांना एक महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा झाली.

परंतु स्थानिक हिंदुस्तानींना सरकारने अटक केली नाही. जितक्या जास्त लोकांना आपण अटक करू तितकाच लोकांचा उत्साह जास्त वाढत असल्याचे आणि कायद्यातील खाचाखोचांमळे जर कोणी हिंदुस्तानी सुटला तर त्यामुळेही समाजाचा उत्साह वाढत असल्याचे सरकारच्या लक्षात आले होते. हिंदुस्तानींविरुद्ध जे काही कायदे सरकारला मंजूर करायचे होते ते त्यांनी मंजूर केले होते. हे खरे आहे की अनेक हिंदुस्तानींनी आपले परवाने जाळून टाकले होते. परंतु परवाने घेऊन त्यांनी ट्रान्सवालमध्ये राहण्याचा आपला हक्क सिद्ध केला होता. यामुळे केवळ त्यांना तुरुंगात पाठवण्याकरिता त्यांच्यावर खटला भरण्यात फारसा लाभ आहे असे सरकारला वाटत नव्हते. उलट कोणाचीही धरपकड न करता काही काळ आपण शांत राहिलो तर आंदोलकांसमोर आदोलन करण्याचा कोणताही मार्ग शिल्लक राहणार नाही आणि त्यामुळे आपोआपच आंदोलन शांत होईल असे सरकारला वाटले. परंतु सरकारचा हाही अंदाज चुकीचा ठरला. शासनाच्या धैर्याची कसोटी पाहण्याकरिता समाजाने एक नवीन पाऊल उचलायचे ठरवले. त्यामुळे शासनाच्या धीराची थोड्याच वेळात परीक्षा झाली.

## ६. सेठ दाऊद मुहम्मद इत्यादींचा लढ्यात प्रवेश

काहीही न करता सरकार आपल्याला थकवू पाहत आहे असे जेव्हा समाजाने पाहिले तेव्हा नवीन पाऊल उचलणे समाजाकरिता अपरिहार्य झाले. सत्याग्रहीत जोपर्यंत दुःख सहन करण्याची इच्छा असते तोपर्यंत तो कधीही थकत नाही. यामुळे सरकारची धारणा चुकीची ठरवण्याचे समाजात सामर्थ्य होते.

नातालमध्ये अनेक असे हिंदुस्तानी राहत होते की ज्यांना ट्रान्सवालमध्ये राहण्याचा पूर्ण अधिकार होता. व्यापाराकरिता त्यांना ट्रान्सवालमध्ये प्रवेश करण्याची आवश्यकता नव्हती. हे खरे असले तरी त्यांना ट्रान्सवालमध्ये येण्याचा अधिकार आहे अशी समाजाची मान्यता होती. याशिवाय त्यांना इंग्रजीचेही थोडेबहुत ज्ञान होते. आणि सोराबजीइतके शिक्षण घेतलेल्या हिंदुस्तानींनी ट्रान्सवालमध्ये प्रवेश केला तर त्यामुळे नियमाचा भंग होत नाही असेही हिंदुस्तानींचे मत होते. यामुळे दोन प्रकारच्या हिंदुस्तानींना ट्रान्सवालमध्ये आणण्याचा आम्ही निर्णय घेतला - एका अशा हिंदुस्तानीला जो आधी ट्रान्सवालमध्ये राहिलेला असेल आणि दुसऱ्या अशा हिंदुस्तानींना ज्यांनी इंग्रजीचे शिक्षण घेतलेले असेल आणि यामुळे ज्यांना 'शिक्षित' समजले जात होते.

यात सेठ दाऊद इब्राहिम आणि पारसी रुस्तमजी या दोन मोठ्या व्यापाऱ्यांचा समावेश होत होता. तसेच सुरेंद्रनाथ मेढ, प्रागजी खंडुभाई देसाई, हरिलाल गांधी (गांधीजींचा मुलगा) आणि रतनशी लोढा या 'शिक्षित' हिंदुस्तानींचाही समावेश होत होता. दाऊद शेठच्या पत्नीला गंभीर आजार झालेला असूनही ते या लढ्यात सामील झाले.

आता मी सेठ दाऊद मुहम्मद यांची वाचकांना ओळख करून देतो. नाताल इंडियन कॉंग्रेसचे ते अध्यक्ष होते. सर्वात आधी दक्षिण आफ्रिकेत आलेल्या हिंदुस्तानी व्यापाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश होत होता. सुरत येथील सुन्नी समाजातील ते बोहरा होते. चातुर्यात दाऊद सेठची बरोबरी करू शकतील असे फार कमी हिंदुस्तानी दक्षिण आफ्रिकेत मी पाहिले आहेत. कोणतीही गोष्ट समजून घेण्यात त्यांची अद्भुत क्षमता होती. त्यांनी फार कमी शिक्षण घेतले होते, परंतु

अनुभवाने ते इंग्रजी आणि डच भाषा चांगल्या प्रकारे बोलू शकायचे. इंग्रज व्यापाऱ्यांबरोबर ते आपला व्यवहार फार चांगला करू शकत असत. औदार्य आणि दानशूरपणाकरिता ते प्रसिद्ध होते. त्यांच्याकडे जवळपास ५० पाहुणे जेवणाकरिता असायचेच. सामाजिक कार्याकरिता देणगी देणारांमध्ये त्यांचे नाव नेहमी प्रमुख दात्यांमध्ये असायचे. त्यांना एक अमूल्य पुत्र होता. आणि चारित्र्यात तर तो सेठपेक्षाही वरचढ होता. त्याचे अंतःकरण स्फटिकासारखे स्वच्छ होते. आपल्या या मुलाच्या चारित्र्यविकासात सेठनी कधीही अडथळा आणला नव्हता. सेठ आपल्या पुत्राची पूजा करायचे असे म्हटले तर मुळीच अतिशयोक्ती होणार नाही. आपला एकही दोष आपल्या पुत्रामध्ये, हसनमध्ये उतरू नये अशी त्यांची इच्छा होती. हसनला इंग्लंडमध्ये पाठवून त्यांनी त्याला चांगले शिक्षण दिले होते. परंतु दाऊद सेठचा तो मुलगा ऐन तारुण्यात हिरावून घेतला गेला होता. हसनला क्षयरोग झाला आणि त्याने त्याचे प्राण हरण केले. हसनबरोबरच हिंदुस्तानी समाजाच्या अनेक आशा बुडाल्या. हिंदू आणि मुसलमान हसनच्या डाव्या उजव्या डोळ्यांप्रमाणे होते. त्याची सत्यनिष्ठा तेजस्वी होती. आज तर दाऊद सेठही राहिलेले नाहीत. काळ कधी कोणाला सोडतो?

मी पारसी रुस्तमजींची ओळख करून दिलेलीच आहे. शिक्षित हिंदुस्तानींमधील बहुतेक हिंदुस्तानींची वाचकांना ओळख आहे. कोणतीही साधनसामुग्री जवळ नसताना मी ही प्रकरणे लिहीत आहे. यामुळे लढाईत भाग घेणाऱ्या अनेक मित्रांची नावे लिहिण्याचे राहून गेलेले असू शकते. याकरिता त्या मित्रांनी मला क्षमा करावी. नाव अमर करणे हा ही प्रकरणे लिहिण्यामागील हेतू नसून सत्याग्रहाचा विजय कसा झाला, त्याच्या मार्गात कसकशी विघ्ने आली ती कशी दूर करण्यात आली हा ही प्रकरणे लिहिण्यामागील उद्देश आहे. जिथे कुठे मी नाव सांगून ती धारण करणाराचा मी परिचय करून देईन तिथेसुद्धा अशिक्षित समजल्या जाणाऱ्या हिंदुस्तानींनी दक्षिण आफ्रिकेत कशा प्रकारचे पराक्रम केले हे वाचकांना दाखवण्याच्या उद्देशानेच तो परिचय करून दिलेला असेल. सत्याग्रहाच्या या लढाईत हिंदू, मुसलमान, पारसी, ख्रिश्चन इत्यादी सर्व कसे एकत्र येऊ शकले आणि कशा प्रकारे हिंदुस्तानी व्यापाऱ्यांनी, शिक्षित हिंदुस्तानींनी आपले कर्तव्य पार पाडले हेसुद्धा मला दाखवायचे आहे. जिथे जिथे मी गुणगान केले आहे तिथेसुद्धा मी गुणीचे गुणगान केलेले नाही तर गुणाचेच गुणगान केलेले आहे.

अशा रीतीने दाऊद सेठ आपल्या सत्याग्रही सेनेला घेऊन जेव्हा ट्रान्सवालच्या सीमेवर पोहोचले तेव्हा त्यांचे स्वागत करण्याकरिता सरकार तयार होते. इतक्या मोठ्या दलाला जर सरकारने ट्रान्सवालमध्ये प्रवेश करू दिला असता तर त्याचे हसे झाले असते. यामुळे या लोकांना अटक होणे अपरिहार्य होते. सर्वांना अटक करण्यात आली. १८ ऑगस्ट १९०८ला त्यांना न्यायालयासमोर उभे करण्यात आले. न्यायालयाने त्यांना सात दिवसात ट्रान्सवाल सोडण्याचा हुकूम दिला. परंतु सत्याग्रहींनी या हुकुमाचे पालन केले नाही. यामुळे २८ ऑगस्टला प्रिटोरियात त्यांना परत पकडण्यात आले आणि खटला न चालवताच त्यांना ट्रान्सवालबाहेर काढले. ३१ ऑगस्टला त्यांनी ट्रान्सवालमध्ये परत प्रवेश केला अखेरीस सीमेवरील शहर वॉक्सरस्ट येथे त्यांच्यावर खटला चालवण्यात आला. त्यात त्यांना ५० पौंड दंडाची वा तीन महिन्यांच्या सक्तमजुरीची शिक्षा झाली. सत्याग्रहींनी आनंदाने तुरुंगात जाणे पसंत केले आणि ते वॉक्सरस्टच्या तुरुंगात दाखल झाले. यामुळे ट्रान्सवालमधील हिंदुस्तानींचा उत्साह खूप वाढला. नातालहून आलेल्या आमच्या मित्रांना वाटत होते की आम्ही जर आमच्या मित्रांना तुरुंगातून सोडवू शकत नसू तर त्यांच्याबरोबर आम्हीसुद्धा तुरुंगात जाण्याचा मार्ग शोधला पाहिजे आणि ते तसा मार्ग शोधू लागले. अटक करवून घेण्याकरिता त्यांच्यासमोर किती तरी मार्ग होते. ट्रान्सवालमध्ये राहणारा हिंदुस्तानी जर आपला परवाना दाखवत नसेल तर त्याला परत व्यापाराचा परवाना मिळू शकत नव्हता आणि परवाना घेतल्याशिवाय जर त्याने व्यापार केला तर तो अपराध झाला असता. याशिवाय एखाद्या हिंदुस्तानीला नातालमधून ट्रान्सवालमध्ये प्रवेश करायचा असेल तर त्याला परवाना दाखवावा लागायचा. आणि त्यांने परवाना दाखवला नाही तर त्याला अटक होणार. परंतु परवाने तर आधीच जाळण्यात आले होते. यामुळे हिंदुस्तानींचा मार्ग स्पष्ट होता. त्यांनी दोन्ही पद्धतींचा अवलंब केला. कोणी परवान्याशिवाय फेरीवाला झाला तर कोणी परवान्याशिवाय ट्रान्सवालमध्ये प्रवेश करू लागला.

आता आंदोलन पूर्ण वेगात सुरू झाले होते. प्रत्येक सत्याग्रहींची कसोटी होऊ लागली. नातालमधून इतर हिंदुस्तानीही ट्रान्सवालमध्ये आले. जोहानिसबर्गमध्येही अनेक लोकांना अटक करण्यात आली. ज्या कोणा हिंदुस्तानीला अटक करून घ्यायची असेल त्याला अटक होऊ

लागली. तुरुंग भरू लागले. नातालमधून आलेल्या लोकांनी तीनतीन महिन्याची शिक्षा होत असे. ट्रान्सवालमधील फेरीवाल्यांना चार दिवसांपासून तर तीन महिन्यापर्यंतची शिक्षा होत असे. अशा प्रकारे शिक्षा झालेल्या लोकांमध्ये आमचे इमाम साहेब, इमाम अब्दुल कादीर बावजीरही होते. परवान्याशिवाय फेरी लावताना त्यांना अटक करण्यात आली होती, आणि २५ जुलै १९०८ला त्यांना चार दिवसांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. ते इतके नाजूक होते की जेव्हा त्यांनी तुरुंगात जाण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा लोक त्यांना हसू लागले. काही लोक माझ्याकडे येऊन म्हणू लागले, “भाई, इमाम साहेबांना घेतले नाही तर बरे होईल. समाजाच्या नावाला ते बट्टा लावतील.” त्या लोकांच्या या सूचनेची मी फ़िकीर केली नाही. इमाम साहेबांच्या शक्तीचा अंदाज घेणारा मी कोण होतो? इमाम साहेब कधी अनवाणी चालले नव्हते. ते फार शौकीन होते. त्यांची बायको मलायी होती. त्यांचे घर सामानसुमानाने सजवलेले असायचे आणि घोडागाडीत बसल्याशिवाय ते कुठेही जात नसत. हे सर्व खरे होते, पण त्यांच्या मनाची माहिती कोणाला होती? असे हे इमाम साहेब चार दिवसांची शिक्षा भोगून सुटले. ते परत तुरुंगात गेले. ते आदर्श कैद्याप्रमाणे राहत असत आणि कठोर मेहनत केल्यानंतर जेवण करत असत. त्यांना दररोज नवनवीन पदार्थ खाण्याची सवय होती. परंतु तुरुंगात मक्याच्या लापशीवरच त्यांनी खुदाचे आभार मानले. तुरुंगाच्या जीवनात त्यांनी कधीही हार मानली नाही. तिथून ते साधेपणा शिकले. कैदी म्हणून त्यांनी खडी फोडली, झाडझूड केली,इतर कैद्यांच्या ओळीत उभे राहिले. अखेरीस फिनिक्स आश्रमात त्यांनी कावडीने पाणी भरले. छापखान्यात खिळे जुळवण्याचे कामही ते शिकले. फिनिक्स आश्रमात राहणाराकरिता खिळे जुळवण्याचे काम शिकणे आवश्यक होते. इमाम साहेबांनी यथाशक्ती ही कला आत्मसात केली. आज हिंदुस्तानात राहून ते सेवाकार्य करत आहेत.

परंतु असे तर अनेक लोक तुरुंगात जाऊन शुद्ध झाले होते.

जोसेफ रायप्पन बॅरिस्टर होते. कॅम्ब्रीज विद्यापीठीचे पदवीधर होते. नातालमध्ये गिरमिट्याच्या घरात त्यांचा जन्म झाला होता. परंतु पूर्ण साहेब झाले होते. घरातही ते बुटाशिवाय फिरत नसत. इमाम साहेबांना वजू करताना पाय धुवावे लागत असत. नमाज उघड्या पायांनी करावी लागायची.

परंतु बिचारे रायप्पन तर इतकेही करत नसत. अशा माणसाने बॅरिस्टरीचा त्याग करून डोक्यावर भाजीपाल्याची टोपली घेतली आणि विनापरवाना फेरी मारून ते तुरुंगात गेले व तेथील सर्व त्रास सहन केला. रायप्पननी मला एकदा विचारले होते, "पण मला तिसऱ्या वर्गाने प्रवास करावा लागेल काय?" मी म्हणालो, "तुम्ही जर पहिल्या वा दुसऱ्या वर्गाने प्रवास केला तर तिसऱ्या वर्गाने प्रवास करण्याकरिता मी कोणाला सांगू? तुरुंगात तुम्हाला बॅरिस्टर म्हणून कोण ओळखेल?" जोसेफ रायप्पनकरिता इतके उत्तर पुरेसे होते.

सोळा सोळा वर्षांचे किती तरी तरुण तुरुंगात गेले होते. मोहनलाल घेलानी हा सत्याग्रही तर केवळ चौदा वर्षांचा होता.

तुरुंगाधिकाऱ्यांनी सत्याग्रहींना त्रास देण्यात कोणतीही उणीव ठेवली नव्हती. त्यांच्याकडून संडास साफ करून घेतले. कैद्यांनी हसतहसत संडाससफाई केली. कैद्यांकडून खडी फोडून घेतली. त्यांनी खुदाचे वा रामाचे नाव घेऊ खडी फोडली. अधिकाऱ्यांनी कैद्यांना तलाव खोदायला लावले. खडकाळ जमीन खोदायला लावली. यामुळे सत्याग्रहींच्या हाताला घट्टे पडले. काही तर असह्य त्रासाने बेशुद्ध पडले. परंतु त्यांनी हार मानली नाही.

वाचकांनी असे समजू नये की तुरुंगात कैद्यांची भांडणे वगैरे होत नव्हती वा त्यांच्यात हेवेदावे नव्हते. फार मोठी भांडणे खाण्यापिण्यावरून होत असत. परंतु यातूनही आम्ही बाहेर पडलो.

मलाही दुसऱ्यांदा अटक करण्यात आली होती. वॉक्सरस्टच्या तुरुंगात एकदा आम्ही ७५ कैदी गोळा झालो होतो. आमचा स्वयंपाक आम्ही स्वतः करत असू. मी स्वयंपाकी झालो होतो कारण आमची खाण्यापिण्याची भांडणे मीच मिटवू शकत होतो. माझे सोबती माझ्या हातून तयार झालेले कच्चेपक्के विनातक्रार खायचे आणि साखर नसलेली लापशीही प्यायचे. मला जर माझ्या सोबत्यांपासून दूर केले तर माझीही थोडी परीक्षा होईल आणि इतर कैदीही हार मानतील असे सरकारला वाटले. परंतु अशी गोड संधी सरकारला मिळाली नाही. यामुळे मला प्रिटोरिया येथील तुरुंगात नेण्यात आले. तिथे मला दांडगाई करणाऱ्या कैद्यांकरिता राखून ठेवण्यात आलेल्या एकांत खोलीत ठेवण्यात आले. केवळ कसरत करण्याकरिता मला बाहेर काढण्यात येत असे.

वॉक्सरस्ट येथे जेवणात तूप देण्यात येत असे.प्रिटोरियात तूप दिले जात नसे. परंतु या तुरुंगातील लहानमोठ्या त्रासाची चर्चा मी या ठिकाणी करू इच्छित नाही. ज्यांना ती माहिती करून घ्यायची असेल त्यांनी 'मेरे जेलके अनुभव' हे पुस्तक वाचावे.

या सर्व छळानंतरही हिंदुस्तानींनी हार मानली नाही. सरकारसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाला. अखेरीस किती हिंदुस्तानींना तुरुंगात टाकण्यात यावे? त्यामुळे खर्च किती वाढेल? याकरिता सरकार नवीन साधनांचा शोध घेऊ लागले.

# ७. हद्दपारी

खुनी कायद्यात तीन प्रकारच्या शिक्षेची तरतूद होती. दंड, कैद आणि हद्दपारी. या सर्व शिक्षा एकाच वेळी करण्याचाही न्यायालयांना अधिकार होता. लहान दंडाधिकाऱ्यालासुद्धा हा अधिकार देण्यात आला होता. सुरुवातीला हद्दपारीचा अर्थ होता ट्रान्सवालच्या सीमेबाहेर नाताल अथवा ऑरेंज फ्री स्टेट अथवा डेला गोआ बे (पोर्चुगालच्या ताब्यातील पूर्व आफ्रिका) यांच्या हद्दीत नेऊन सोडून देणे. उदाहरणार्थ नातालमधून येणाऱ्या हिंदुस्तानींना वॉक्सरस्ट स्टेशनच्या सीमेपलीकडे नेऊन सोडणे. यामुळे हद्दपारीमुळे होणारी गैरसोय वगळता लोकांना कोणताही त्रास होत नसे. हा तर केवळ एक फार्स होता. यामुळे हिंदुस्तानींचा जोष अजूनच वाढला.

परंतु यामुळे हिंदुस्तानींना छळण्याचे इतर मार्ग ट्रान्सवाल सरकारला शोधावे लागले. आता तुरुंगात जागा शिल्लक राहिलेली नसल्यामुळे ट्रान्सवाल सरकारने विचार केला की हिंदुस्तानींना जर हद्दपार करून हिंदुस्तानात नेऊन सोडले तर ते घाबरून नक्कीच शरण येतील. सरकारच्या या धारणेत काही तथ्य नक्कीच होते. त्याने हिंदुस्तानींच्या एका मोठ्या समूहाला हिंदुस्तानात परत पाठवले. त्या लोकांना मार्गात बराच त्रास सहन करावा लागला. खाण्यापिण्याची मोठी गैरसोय सहन करावी लागली. सरकारने जहाजावर जी काही व्यवस्था केली होती त्याच्यावर त्यांना भागवावे लागणार होते. सर्वांना त्याने डेकच्या वर्गानेच पाठवले होते. याशिवाय काही लोकांनी दक्षिण आफ्रिकेत जमीनजुमला आणि चलअचल संपत्ती घेतली होती. त्यांचा स्वतःचा व्यवसाय होता, मुलेबाळे होती. काही लोकांच्या डोक्यावर कर्जही होते. परंतु हद्दपारीच्या अशा प्रकारामुळे त्यांच्यावर सर्वस्व गमावण्याची, दिवाळे काढण्याची वेळ आली असती. अनेकांची याकरिता तयारी नव्हती.

अशाही परिस्थितीत अनेक हिंदुस्तानी दृढ आणि खंबीर राहिले. बरेचसे ढिलेही पडले. जे ढिले पडले ते जाणूनबुजून अटक करवून घेण्याचे टाळू लागले. असे असले तरीही बहुतेक हिंदुस्तानींनी जाळलेले परवाने परत घेण्याइतका दुबळेपणा मात्र दाखवला नाही. परंतु काहींनी मात्र परवाने घेतले.

तरीही खंबीर राहणाऱ्या लोकांची संख्या लक्ष वेधले जाण्याइतकी नक्कीच होती. त्यांच्या शौर्याला सीमा नव्हती. त्यांच्यातील काही हिंदुस्तानी तर हसतहसत फासावरसुद्धा चढले असते याबद्दल मला खात्री आहे. संपत्ती वा जमीनजुमल्याची फिकीर करणे तर त्यांनी सोडूनच दिले होते.

परंतु ज्या लोकांना हिंदुस्तानात पाठवण्यात आले त्यांच्यातील अनेक लोक गरीब आणि भोळे होते. ते लोक केवळ श्रद्धेनेच सत्याग्रहाच्या लढाईत सामील झाले होते. सरकारने त्यांच्यांवर केलेला हा अन्याय आम्हाला असह्य झाला. परंतु त्यांची मदत कशी करावी हेही आम्हाला कळत नव्हते. आमच्याजवळ फार कमी पैसा होता. अशा लोकांना आर्थिक मदत करण्याचा प्रयत्न केला तर लढाई हारण्याचीच वेळ यायची. तिच्यात लोभी माणसे सामील व्हायची. पैशाचा लोभ दाखवून एका माणसालासुद्धा लढाईत सामील करून घेता येऊ शकत नाही. परंतु अशा लोकांना सहानुभूतीची मदत करणे आम्ही आमचे कर्तव्य समजत होतो.

जे काम सहानुभूती, गोड शब्द आणि गोड नजर करू शकते ते पैसा करू शकत नाही असे मला अनुभवांती आढळून आले. पैशाच्या लोभी माणसालाही पैशाबरोबर सहानुभूती मिळाली नाही तर अखेरीस तो पैसा देणाराला सोडून जातो. याउलट प्रेमाने वश झालेले लोक प्रेम करणाराकरिता कितीही त्रास सहन करायला तयार असतात.

यामुळे हद्दपारीची शिक्षा झालेल्या या हिंदुस्तानींकरिता प्रेमाच्या आणि सहानुभूतीच्या भावनेने जे काही करता येणे शक्य होते ते करायचे आम्ही ठरवले. हिंदुस्तानात तुमच्याकरिता आवश्यक व्यवस्था केली जाईल असे आश्वासन आम्ही त्यांना दिले. वाचकांनी लक्षात ठेवावे की या लोकांमध्ये काही करारमुक्त हिंदुस्तानीही होते. त्यांच्या नात्यागोत्याचे हिंदुस्तानात कोणीही नव्हते. काहींचा जन्म तर दक्षिण आफ्रिकेतच झालेला होता. या सर्वांकरिता हिंदुस्तान परदेशासारखा होता. अशा निराधार लोकांना हिंदुस्तानच्या किनाऱ्यावर निराधार लाचार अवस्थेत सोडून देणे हा ट्रान्सवाल सरकारचा अमानुष क्रूरपणा होता. यामुळे हिंदुस्तानात तुमच्याकरिता सर्व काही केले जाईल असे आश्वासन आम्ही त्यांना दिले.

हे सर्व केल्यानंतरही त्यांच्याबरोबर एखादा मदत करणारा माणूस जर पाठवला नसता तर त्यांचे समाधान झाले नसते. हद्दपारीची शिक्षा देण्यात आलेली ही पहिली तुकडी होती. त्यांचे जहाज काही तासातच रवाना होणार होते. निवड करण्याकरिता आमच्याजवळ वेळ नव्हता. आमच्या सहकाऱ्यांपैकी भाई पी. के. नायडू यांच्यावर आमची नजर गेली. मी त्यांना विचारले,

"या गरीब लोकांना तुम्ही हिंदुस्तानात घेऊन जाल?"

"का नाही?"

"पण जहाज तर काही वेळातच निघणार आहे?"

"निघत असेल तर काय झाले?"

""पण तुमच्या कपड्यालत्त्याचे काय होईल? जेवणाचे काय?"

"जे कपडे घातले आहेत ते पुरेसे आहेत. जेवणाची व्यवस्था जहाजावर होईल."

माझ्या आनंदाला आणि आश्चर्याला पारावार उरला नाही. पारसी रुस्तमजींच्या घरी हे बोलणे झाले होते. तिथेच नायडूंकरिता कपडे, कांबळे इत्यादी बोलावण्यात आले होते. आणि तिथूनच त्यांना रवाना करण्यात आले.

मी नायडूंना म्हणालो, "लक्ष ठेवा. या लोकांची नीट काळजी घ्या. आधी यांच्या आरामाची काळजी घ्या, मग स्वतःची. मी मद्रासला नटेसन यांना तार करतो. ते म्हणतील तसे करा."

"खरा शिपाई असल्याचे सिद्ध करून दाखवेन" इतके म्हणून नायडू रवाना झाले. मी मनात म्हणालो की जिथे असे वीर पुरुष असतात तिथे पराभव होऊच शकत नाही. श्री नायडू यांचा जन्म दक्षिण आफ्रिकेतच झालेला होता. त्यांनी कधीही हिंदुस्तान पाहिलेला नव्हता. नटेसनना देण्याकरिता मी श्री नायडूंना एक शिफारसपत्र दिले आणि नटेसन यांना तारही केली.

प्रवासी हिंदुस्तानींच्या दुःखाचा अभ्यास करणारे, त्यांना मदत करणारे, त्यांच्या परिस्थितीचा अभ्यास करून त्यांच्याबद्दल सहानुभूतीने लिहिणारे त्या वेळी हिंदुस्तानात एकमेव नटेसनच होते

असे म्हणता येऊ शकते. त्यांच्याबरोबर माझा नियमितपणे पत्रव्यवहार सुरू होता. हद्दपारीची शिक्षा झालेले हे हिंदुस्तानी जेव्हा मद्रासला पोहोचले तेव्हा नटेसननी त्यांची पूर्ण मदत केली. श्री नायडूंसारखा योग्य माणूस बरोबर असल्यामुळे नटेसन यांनाही मदतकार्यात मदत झाली. त्यांनी मद्रासमधील लोकांकडून निधी गोळा केला आणि दक्षिण आफ्रिकेतून आलेल्या हिंदुस्तानींना आपण हद्दपारीची शिक्षा भोगण्याकरिता हिंदुस्तानात आलो असे जाणवू दिले नाही. ट्रान्सवाल सरकारचे हे काम जितके निर्दयतापूर्ण होते तितकेच बेकायदेशीरही होते. सरकारलाही याची कल्पना होती. आपले सरकार आपल्याच नियमांचा भंग करत असल्याचे सामान्यपणे लोकांना माहीत नसते. एखादे नवीन संकट निर्माण झाले की नवीन कायदा करण्याकरिता पुरेसा वेळ नसतो. यामुळे कायद्याची पर्वा न करता सरकार मनमानी वर्तन करते. नंतर सरकार एक तर कायदा नवीन मंजूर करून घेते वा असे काही काम करते की लोकांना कायद्याचा विसर पडावा.

ट्रान्सवाल सरकारच्या या अराजकतेच्या विरोधात हिंदुस्तानींनी जोरदार आंदोलन केले. हिंदुस्तानातही त्याच्या विरोधात जोरदार आरडाओरड झाली. यामुळे बिचाऱ्या हिंदुस्तानींना अशी शिक्षा करणे सरकारकरिता कठीण झाले. शासनाच्या या कृतीच्या विऱोधात हिंदुस्तानींनी आवश्यक कायदेशीर कारवाई केली. हद्दपारीच्या विरोधात त्यांनी वरच्या न्यायालयात दाद मागितली. त्यात त्यांचा विजय झाला. अखेरीस हिंदुस्तानपर्यंत हद्दपार करण्याची प्रथा बंद झाली.

परंतु हद्दपारीच्या या शिक्षेचा सत्याग्रही हिंदुस्तानी फौजेवर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. यानंतर सत्याग्रह लढाईत खरे लढवैय्ये तेवढेच शिल्लक राहिले. “सरकारने हिंदुस्तानात पाठवले तर काय होईल?” या भीतीचा त्याग करणे सर्वांना शक्य झाले नाही.

समाजाचा तेजोभंग करण्याकरिता आणि त्याला निरुत्साहित करण्याकरिता सरकारने केवळ वरील एकच पाऊल उचलले नाही. सत्याग्रही कैद्यांना जास्तीत जास्त त्रास देण्याच्या प्रयत्नात सरकारने कोणताच कसूर शिल्लक ठेवला नव्हता हे मी मागील प्रकरणात सांगितलेलेच आहे. तुरुंगात त्यांच्याकडून खडी फोडण्याचे कामसुद्धा करवून घेण्यात आले. परंतु इतके पुरेसे आहे असे सरकारला वाटले नाही. आधी सर्व सत्याग्रही कैद्यांना सोबत ठेवले जात असे. आता सरकारने

त्यांना वेगवेगळे ठेवण्याचे धोरण अवलंबिले आणि प्रत्येक तुरुंगात त्यांना अतोनात त्रास दिला. ट्रान्सवालमध्ये कडाक्याची थंडी पडत असते. इतक्या कडाक्याच्या थंडीत सकाळी काम करत असताना कैद्यांचे हात गारठून जात असत. यामुळे हिवाळ्यातील दिवस कैद्यांकरिता अतिशय त्रासदायक ठरत असत. अशा परिस्थितीत काही कैद्यांना एका लहानशा तुरुंगात ठेवण्यात आले. तिथे त्यांना कोणी भेटायलाही येऊ शकत नव्हते. या तुरुंगात नागप्पन नावाचा १८ वर्षाचा एक तरुण सत्याग्रही होता. तो तुरुंगाच्या नियमांचे पूर्णपणे पालन करायचा आणि जे काही काम त्याला सोपवले जायचे ते तो मन लावून करायचा. अगदी सकाळी गिट्टी टाकण्याच्या कामावर त्याला नेण्यात येत असे. त्यामुळे त्याला फुफ्फुसदाहचा (डबल न्युमोनिया) विकार झाला आणि अखेरीस तुरुंगातून सुटका झाल्यानंतर ७ जुलै १९०९ला त्याचा मृत्यू झाला. नागप्पनचे सोबती सांगतात की जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत तो सत्याग्रहाचेच स्तवन करत होता. तुरुंगात जाण्याबद्दल त्याला कधीही पश्चात्ताप झाला नाही. देशाकरिता आलेल्या मृत्यूचे एखाद्या मित्राप्रमाणे त्याने स्वागत केले. आपल्या तराजूने तोलले तर नागप्पनला अशिक्षित समजले जाईल. अनुभवाने तो झुलू आणि इंग्रजी भाषा बोलू शकत होता. कदाचित मोडकेतोडके इंग्रजी तो लिहूसुद्धा शकत असावा. विद्वानांमध्ये त्याची गणना होऊ शकत नव्हती. असे असले तरी नागप्पनचे धैर्य, त्याचा शांत स्वभाव, त्याची देशभक्ती आणि मरेपर्यंत त्याने दाखवलेला निर्धार यांचा विचार केला तर त्याच्यात अजून कोणत्या श्रेष्ठ गुणाची उणीव होती? ट्रान्सवालच्या लढाईत जरी मोठमोठे विद्वान सामील झाले नव्हते तरी ट्रान्सवालची लढाई चालू शकली ती नागप्पन सारखे सैनिक मिळाले म्हणून. तसे सैनिक मिळाले नसते तर हा लढा कसा सुरू राहू शकला असता?

ज्याप्रमाणे नागप्पनचा मृत्यू तुरुंगातील छळामुळे झाला त्याचप्रमाणे हद्दपारीमुळे ज्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या त्यामुळे नारायण स्वामीचा १६ ऑक्टोबर १९१०ला मृत्यू झाला. या घटनांमुळे समाज डगमगला नाही. त्याचा निर्धार कायम राहिला. केवळ दुबळ्या लोकांनी लढाईतून माघार घेतली. परंतु या दुबळ्या लोकांनीही यथाशक्ती त्याग केला होता. यामुळे दुबळे समजून आपण त्यांची अवगणना करत कामा नये. जे लोक पुढे निघून जातात ते मागे राहिलेल्यांचा तिरस्कार करत असल्याचे आणि स्वत:ला फार शूरवीर समजत असल्याचे

सामान्यपणे दिसून येते. परंतु सत्य बहुधा याच्या अगदी उलट असते. ५० रुपये देऊ शकणारा माणूस २५ रुपये देऊन गप्प बसत असेल तर सामान्यपणे २५ रुपये देणारा माणूस पाच रुपये देणारापेक्षा आपला मोठेपणा दाखवत असतो. परंतु मोठेपणा दाखवण्यासारखे त्याने काहीही केलेले नाही हे आपल्याला कळत असते. अशाच प्रकारे दुबळेपणामुळे पुढे चालू न शकणाऱ्या माणसाने आपली सर्व शक्ती खर्च केली असेल तर वास्तवात हातचे राखून ठेवणारा माणूस जरी पुढे जात असेल तरी त्याच्यापेक्षा सर्व शक्ती खर्च करणारा माणूस अधिक श्रेष्ठ असतो. यामुळे लढाईने उग्र रूप धारण केल्यानंतर जे लोक तिच्यापासून दूर झाले त्यांनीसुद्धा देशसेवा केली होती. आता अधिक साहस आणि आणि अधिक सहनशीलता असलेल्या माणसाची गरज होती. यातही ट्रान्सवालमधील हिंदुस्तानी कमी पडले नाही. लढाई सुरू ठेवण्याकरिता जितक्या लोकांची गरज होती तितके लोक तर धैर्याने आघाडीवर उभे होतेच.

अशा प्रकारे हिंदुस्तानींची परीक्षा खडतरहून खडतर होत गेली. समाजाचे लोक जसजशी अधिक ताकद दाखवू लागले तसतसे सरकार अधिक आणि अधिक क्रूर होत गेले. दंगलखोर कैद्यांकरिता अथवा सरकार ज्यांना विशेषेकरून सरळ करू इच्छिते अशा कैद्यांकरिता प्रत्येक देशात काही तुरुंग राखून ठेवलेले असतात. ही गोष्ट ट्रान्सवाललाही लागू होत होती. अशाच एका तुरुंगाचे नाव होते 'डायक्लुफ'. तेथील तुरुंगाधिकारीही कडक होता. आणि तेथील कैद्यांकडून करवून घेतले जाणारे कामही कठीण होते. परंतु तिथे असे हिंदुस्तानी होते की ज्यांनी ते कठीण कामही करून दाखवले. कठोर मेहनत करण्याची त्यांची तयारी होती. परंतु तुरुंगाधिकाऱ्याने केलेला अपमान सहन करण्याची त्यांची तयारी नव्हती. तुरुंगाधिकाऱ्याने अपमान केल्यामुळे त्यांनी उपवास सुरू केला. "जोपर्यंत सरकार येथील तुरुंगाधिकाऱ्याला बदलवत नाही वा आम्हाला दुसऱ्या तुरुंगात पाठवत नाही तोपर्यंत आम्ही अन्न घेणार नाही" अशी त्यांची मागणी होती. हा शुद्ध उपवास होता. उपवास करणारे कैदी लपूनछपून काही खाऊ शकतील अशी परिस्थिती नव्हती. अशा प्रकारच्या परिस्थितीत हिंदुस्तानात जसे आंदोलन होऊ शकते तसे आंदोलन करण्यासारखी परिस्थिती ट्रान्सवालमध्ये नव्हती हे वाचकांनी लक्षात ठेवले पाहिजे. याशिवाय येथील नियमही कठोर होते. अशा प्रसंगीसुद्धा कैद्यांना भेटण्याची परवानगी नव्हती. एकदा तुरुंगात गेल्यानंतर

सत्याग्रहीला स्वतःच स्वतःकडे लक्ष द्यावे लागत असे. सत्याग्रहाची लढाई गरिबांची लढाई होती आणि ती गरिबी पद्धतीनेच लढवली जात होती. यामुळे कैद्यांच्या या प्रतिज्ञेत गंभीर धोका सामावलेला होता. असे असले तरी सत्याग्रहींचा निर्धार कायम होता. आजप्रमाणे अशा प्रकारच्या सत्याग्रहाची लोकांना सवय नसल्यामुळे त्या वेळचे त्यांचे कार्य अधिक प्रशंसनीय गणले जाईल. लोक अखेरपर्यंत आपल्या प्रतिज्ञेवर अढळ राहिले, आणि अखेरीस त्यांना विजय मिळाला. सात दिवसाच्या उपवासानंतर त्यांना दुसऱ्या तुरुंगात नेण्याचा हुकूम निघाला.

# ८. दुसरे प्रतिनिधीमंडळ

अशा प्रकारे सरकार हिंदुस्तानी सत्याग्रहींना तुरुंगात पाठवत राहिले आणि त्यांना हद्दपारीची शिक्षाही सुनावत राहिले. यात चढउतार येत राहायचा. दोन्ही पक्ष काही प्रमाणात सुस्तही झाले होते. आपल्या प्रतिज्ञेवर दृढ असलेल्या हिंदुस्तानींना आपण शरण यायला भाग पाडू शकत नाही आणि हद्दपारीची शिक्षा केल्यामुळे आपली बदनामी होते हे सरकारच्या लक्षात आले. न्यायालयात जाणाऱ्या काही खटल्यांमध्ये सरकारचा पराभवही व्हायचा. सरकारशी प्रखरपणे लढा देण्याची हिंदुस्तानींचीसुद्धा तयारी नव्हती. इतक्या मोठ्या प्रमाणात सत्याग्रह करणारे लोकही आता राहिले नव्हते. काही लोक घाबरले होते. काही लढतालढता थकले होते तर काहींनी अगदीच हार मानली होती आणि सत्याग्रहावर श्रद्धा असणाऱ्या लोकांना ते मूर्ख समजत होते. परंतु ते 'मूर्ख' मात्र स्वतःला बुद्धिमान समजून ईश्वरावर, लढ्यातील सत्यावर, आणि आपल्या साधनांच्या खरेपणापणावर श्रद्धा ठेवून होते. अखेरीस सत्याचाच विजय होईल असा विश्वास त्यांनी बाळगलेला होता.

मध्यंतरीच्या काळात दक्षिण आफ्रिकेचे राजकारण क्षणभराकरितासुद्धा थांबले नव्हते. त्याची गतिशीलता सतत कायम होती. दक्षिण आफ्रिकेतील सर्व वसाहती आपल्याला अधिक स्वातंत्र्य मिळेल अशी अपेक्षा बाळगून होत्या. ब्रिटनशी असलेले संबंध तोडून टाकावे अशी जनरल हार्टजोग यांची इच्छा होती तर इतर काहींना ब्रिटनशी नाममात्र संबंध ठेवण्याची इच्छा होती. आपल्याशी असलेले संबंध पूर्णपणे तोडले जाणे इंग्रज सहन करू शकत नव्हते. आणि दक्षिण आफ्रिकेतील बोअरांना आणि इंग्रजांना जे काही हवे होते ते ब्रिटिश संसदेच्या माध्यमातूनच मिळू शकत होते. यामुळे दक्षिण आफ्रिकेचे प्रकरण मंत्रिमंडळासमोर ठेवण्याकरिता एक प्रतिनिधिमंडळ पाठवण्याचे दोघांनीही ठरवले.

सर्व वसाहतींचा एक संघ तयार झाला तर आपली परिस्थिती आता आहे त्याहूनही वाईट होईल असे दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींना वाटले. हिंदुस्तानींना अधिकात अधिक दाबून ठेवण्याची इच्छा सर्वच वसाहतींना होती. हिंदुस्तानींच्या विरोधात सर्व वसाहती एकत्रित झाल्यानंतर तर

हिंदुस्तानींना अजूनच दाबून ठेवण्यात आले असते ही गोष्ट स्पष्ट होती. हिंदुस्तानींचा आवाज अरण्यरुदनासारखा होता. असे असले तरी प्रयत्नात कोणताही कसूर राहायला नको असा विचार करून परत एकदा हिंदुस्तानींचे प्रतिनिधिमंडळ इंग्लंडला पाठवण्याचा जमातीने विचार केला. या वेळी प्रतिनिधिमंडळात माझ्याबरोबर मेमन सेठ हबीब यांची नियुक्ती करण्यात आली. ट्रान्सवालमध्ये पुष्कळ दिवसांपासून त्यांचा व्यापार सुरू होता. त्यांचा अनुभव अतिशय व्यापक होता. त्यांनी इंग्रजीचे शिक्षण जरी घेतलेले नसले तरी त्यांना इंग्रजी, डच, झुलू इत्यादी भाषा सहजपणे समजू शकत असत. सत्याग्रहींबद्दल त्याना सहानुभूती वाटत असली तरी त्यांना पूर्ण सत्याग्रही म्हणता येऊ शकत नव्हते. केप टाऊन येथून २३ जून १९०९ तारखेला आम्ही दोघे ज्या जहाजाने रवाना झालो होतो त्याच जहाजाने (केनिलवर्थ कॅसल) दक्षिण आफ्रिकेतील प्रसिद्ध राजकीय पुढारी मेरिमनही इंग्लंडला चालले होते. ते दक्षिण आफ्रिकेतील वसाहतींना एक करण्याच्या उद्देशाने चालले होते. जनरल स्मट्स आणि इतर लोक आधीच इंग्लंडमध्ये पोहोचले होते. नाताल येथील हिंदुस्तानींतर्फेही या वेळी एक वेगळे प्रतिनिधिमंडळ इंग्लंडला गेले होते. ते सत्याग्रहाच्या संबंधात चालले नव्हते तर नातालमधील हिंदुस्तानींना सहन कराव्या लागत असलेल्या विविध अडचणींची चर्चा करण्याकरिता गेले होते.

त्या वेळी लॉर्ड क्रू वसाहतमंत्री होते आणि लॉर्ड मोर्ले हिंदुस्तानमंत्री. त्यांच्याशी आमची भरपूर चर्चा झाली. आम्ही दोघांनी अनेक लोकांच्या भेटी घेतल्या. असा एकही संपादक, एकही हाऊस ऑफ कॉमन्सचा वा हाऊस ऑफ लॉर्ड्सचा सदस्य नसेल की ज्याची भेट भेता येणे शक्य होते आणि आम्ही त्याची भेट घेतली नाही. लॉर्ड ॲम्टहिल यांच्या मदतीला तर सीमाच नव्हती. ते श्री मेरीमन, जनरल बोथा इत्यादींना भेटत असायचे. अखेरीस जनरल बोथांकडून त्यांनी एक निरोप आणला. ते आम्हाला म्हणाले, "जनरल बोथा तुमच्या भावना समजू शकतात. ते तुमच्या लहानसहान मागण्या मान्य करू शकतात. परंतु आशियायी कायदा आणि नवीन येणारांवरीन निर्बंधाचा कायदा रद्द करण्याची त्यांची तयारी नाही. कायद्यामध्ये गोऱ्याकाळ्यांमध्ये जो भेदभाव आहे तो दूर व्हावा असे तुम्हाला वाटते, परंतु तोदेखील दूर करण्याची त्यांची तयारी नाही. जनरल बोथांना हा भेद मूलभूत सिद्धांतासारखा वाटतो. आणि हा भेद दूर करावा असे एखादे वेळी त्यांना

जरी वाटले तरी दक्षिण आफ्रिकेतील गोरे ही गोष्ट कधीही सहन करणार नाहीत. जनरल स्मट्स यांचेही मत बोथांसारखेच आहे. हा त्यांचा अंतिम निर्णय आणि प्रस्ताव आहे. तुम्ही जर याहून अधिक मागणी कराल तर तुम्ही आणि तुमचा समाज दोघेही दुःखी व्हाल. यामुळे तुम्हाला जो काही निर्णय घ्यायचा असेल तो विचारपूर्वक घ्या. ही गोष्ट तुम्हाला सांगण्याकरिता आणि तुमच्या जबाबदारीची तुम्हाला जाणीव करून देण्याकरिता जनरल बोथांनी मला तुमच्याकडे पाठवले आहे."

हा निरोप सांगून लॉर्ड ॲम्टहिल म्हणाले, "हे पाहा, जनरल बोथा तुमच्या व्यावहारिक मागण्या पूर्ण करण्याकरिता तयार आहेत. या जगात आपल्याला काही देवघेव तर करावीच लागत असते. जे काही आपल्याला हवे असते ते सर्व आपल्याला मिळू शकत नाही. यामुळे हा प्रस्ताव तुम्ही स्वीकारावा असा माझा तुम्हाला आग्रहपूर्वक सल्ला आहे. तत्त्व म्हणून तुम्हाला सरकारशी लढाई करायची असेल तर ती तुम्ही पुढेही करू शकता. या गोष्टीबद्दल तुम्ही दोघेही विचार करा आणि नंतरच मला उत्तर द्या."

हे ऐकल्यानंतर मी हाजी हबीब यांच्याकडे पाहिले. ते म्हणाले, "माझ्यातर्फे तुम्ही यांना सांगा की समेट करू इच्छिणाऱ्या पक्षातर्फे मला तुमचा प्रस्ताव मान्य आहे. आता जर त्यांची आम्हाला इतके देण्याची तयारी असेल तर आम्ही त्यावर समाधान मानू आणि तत्त्वांकरिता लढायचे असेल तर नंतर लढू. समाजाची अधिक हानी होऊ देणे मला पसंत नाही. ज्या पक्षातर्फे मी बोलतो आहे त्या पक्षाजवळ पैसाही जास्त आहे आणि संख्येनेही तो पक्ष मोठा आहे."

सेठ हबीब यांच्या वाक्याचा शब्दशः अनुवाद करून मी तो लॉर्ड ॲम्टहिल यांना सांगितला. नंतर सत्याग्रहींतर्फे मी त्यांना म्हणालो, "तुम्ही त्रास घेतला याकरिता आम्ही तुमचे अंतःकरणपूर्वक आभारी आहो. माझे सहकारी जे म्हणाले ते अगदी खरे आहे. ते संख्येने आणि पैशाने बलवान असलेल्या पक्षातर्फे बोलत आहेत. मी ज्या लोकांतर्फे बोलतो आहे ते तुलनेने गरीब आणि संख्येने कमी आहेत. परंतु ते लोक प्राण पणाला लावणारे आहेत. त्यांची लढाई व्यवहार आणि सिद्धांत या दोन्हींकरिता आहे. या दोनपैकी एक गोष्ट सोडणे आवश्यक असेल तर ते व्यवहार सोडून

सिद्धांताकरिता लढणे पसंत करतील. जनरल बोथांच्या सत्तेची आम्हाला कल्पना आहे. परंतु आमची प्रतिज्ञा आम्हाला त्याहूनही महत्त्वाची वाटते. प्रतिज्ञेकरिता नष्ट होण्याचीही आमची तयारी आहे. आम्ही धीर धरू. माझा विश्वास आहे की आम्ही आमच्या श्रद्धेवर अढळ राहिलो तर ज्या ईश्वराच्या नावावर आम्ही प्रतिज्ञा केली आहे तोच ती पूर्ण करील.

"तुमची परिस्थिती मी चांगल्या प्रकारे समजू शकतो. आमच्याकरिता तुम्ही बरेच काही केले आहे. आणि आता आम्हा मूठभर सत्याग्रहींना तुम्ही अधिक मदत करू शकणार नसाल तर आम्ही तुमच्याबद्दल गैरसमज करून घेणार नाही आणि तेवढ्या कारणाने आम्ही तुमचे उपकारही विसरणार नाही. तुमचा सल्ला मान्य करण्याकरिता आम्ही असमर्थ आहो याकरिता तुम्ही आम्हाला क्षमा कराल अशी आम्ही आशा करतो. आम्हा दोघांचेही काय म्हणणे आहे ते आपण जनरल बोथा यांना समजावून सांगा आणि सांगा की आम्ही संख्येने जरी कमी असलो तरी कोणत्याही परिस्थितीत आम्ही प्रतिज्ञेचे पालन करू. आमच्या दु:खाची शक्ती त्यांच्या अंत:करणाला पाझर फोडील आणि अखेरीस ते आशियायी कायदा रद्द करतील असे आम्हाला वाटते."

लॉर्ड ॲम्टहिल उत्तरात म्हणाले, "तुम्ही असे समजू नका की तुम्हा लोकांना मी सोडून देईन. मीसुद्धा माझ्या सौजन्याचे रक्षण केलेच पाहिजे. इंग्रज जे काम हाती घेतात ते एकाएकी सोडत नसतात. तुमचा लढा शुद्ध आणि उचित आहे. तुम्ही शुद्ध साधनांद्वारे लढत आहा. मी तुम्हाला कसा सोडू शकतो?" त्रास तर तुम्हा लोकांना सहन करावाच लागणार आहे. यामुळे आजच्या परिस्थितीत काही तोडगा निघू शकत असेल तर त्याकरिता तुम्हाला समजावणे माझे कर्तव्य होते. परंतु तुम्ही लोक तुमच्या प्रतिज्ञेवर अढळ राहू इच्छित असाल, त्याकरिता कितीही त्रास होणार असेल तरी तो सहन करण्याची तुमची तयारी असेल तर मी तुम्हाला कसा काय अडवू शकतो? याकरिता मी तर तुमचे अभिनंदन करीन. यामुळेच मी तुमच्या समितीचा अध्यक्षही राहीन आणि यथाशक्ती मी तुम्हाला मदतही करीन. परंतु इतके मात्र लक्षात ठेवा की मी लॉर्ड सभेचा केवळ

एक कनिष्ठ सभासद आहे. माझा फारसा प्रभाव आहे असे समजता येऊ शकत नाही. असे असले तरी माझा जो काही प्रभाव आहे त्याचा उपयोग मी तुमच्याकरिता करत राहीन."

त्यांचे उत्तेजनाचे हे दोन शब्द ऐकून आम्ही दोघेही फार खुष झालो.

या संवादातील एक गोष्ट कदाचित वाचकांच्या लक्षात आली नसेल. वर सांगितल्याप्रमाणे माझ्यात आणि सेठ हाजी हबीब यांच्यात मतभेद निर्माण झाला होता. असे असले तरी आम्हा दोघांच्या संबंधात इतका गोडवा होता की आपले विरोधी मत लॉर्ड ॲम्टहिल यांना सांगण्याचे काम मला सांगताना सेठ हाजी हबीब यांनी किंचितही मागेपुढे पाहिले नाही. त्यांचे म्हणणे मी लॉर्ड ॲम्टहिल यांना बरोबर सांगेन याबद्दल त्यांचा माझ्यावर पूर्ण विश्वास होता.

वाचकांनी मी इथे एक अप्रस्तुत गोष्टही सांगून टाकतो. इंग्लंडमधील माझ्या या वास्तव्यात अनेक हिंदुस्तानी अराजकवाद्यांशीही माझी चर्चा झाली होती. त्या सर्वांच्या तर्काचे खंडन करण्याकरिता आणि अराजकावर विश्वास ठेवणाऱ्या दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींचे समाधान करण्याकरिता 'हिंद स्वराज' या माझ्या पुस्तकाचा जन्म झाला होता. १९०९ साली ते 'इंडियन ओपिनियन'मधून प्रकाशित झाले होते. या पुस्तकातील मुख्य मुद्द्यांची चर्चा मी लॉर्ड ॲम्टहिल यांच्याबरोबरही केली होती. माझे स्वतःचे विचार दडवून ठेवून दक्षिण आफ्रिकेतील माझ्या कामाकरिता त्यांच्या नावाचा आणि कामाचा मी उपयोग केला असे त्यांना वाटू नये हाच त्यामागील हेतू होता. याबद्दल त्यांच्याशी माझी जी चर्चा झाली होती ती मी कधीही विसरू शकत नाही. त्यांच्या कुटुंबात आजार असूनही ते मला भेटले होते. 'हिंद स्वराज'मधील माझ्या विचारांशी ते जरी पूर्णपणे सहमत नव्हते तरी दक्षिण आफ्रिकेतील आमच्या लढाईचे त्यांनी पूर्ण समर्थन केले आणि त्यांच्याबरोबरचे माझे संबंध अखेरपर्यंत गोड राहिले.

# ९. टॉलस्टॉय फार्म - १

इंग्लंडमधून दक्षिण आफ्रिकेत परतणाऱ्या प्रतिनिधीमंडळाने या वेळी चांगली बातमी आणली नव्हती. लॉर्ड ऍम्टहिल यांच्याशी झालेल्या चर्चेचा समाज काय अर्थ घेईल याची मला फारशी काळजी वाटत नव्हती. सत्याग्रहाच्या लढाईत अखेरपर्यंत माझ्याबरोबर कोण उभा राहील हे मला माहीत होते. सत्याग्रहाविषयीचे माझे विचार आता परिपक्व झाले होते. सत्याग्रहाची व्यापकता आणि अलौकिकता यांची मला आता अधिक चांगली ओळख झालेली असल्यामुळे मी शांत होतो. इंग्लंडमधून परतताना मी 'हिंद स्वराज' लिहिले होते. सत्याग्रहाची भव्यता दाखवणे हाच त्यात माझा हेतू होता. सत्याग्रहाच्या यशाबद्दलचे खरेखुरे मापदंड हे पुस्तक आहे. यामुळे लढाईत लढणाऱ्या सत्याग्रहींच्या संख्येला मी मुळीच महत्त्व देत नव्हतो.

लढाईसंबंधी पैशाच्या काळजीने मी चिंतित होतो. पैशाशिवाय लढा चालवणे माझ्याकरिता अतिशय काळजीचा विषय झाला होता. पैशाशिवाय शुद्ध लढाई चालवली जाऊ शकते. सत्याच्या लढाईला सामान्यपणे पैसा दुषित करतो, आणि ईश्वर सत्याग्रहीला, मुमुक्षूला, आवश्यकतेपेक्षा जास्त साधन कधीही देत नाही ही गोष्ट मला त्या वेळी जितकी कळत नव्हती तितकी आज कळते. परंतु मी आस्तिक माणूस आहे. ईश्वराने त्या वेळीही मला साथ दिली. माझ्यावरील संकटातून मला निभावून नेले. एकीकडे दक्षिण आफ्रिकेच्या किनाऱ्यावर उतरून मला समाजातील लोकांना अपयशाची बातमी सांगायची होती तर दुसरीकडे ईश्वराने माझे आर्थिक संकट दूर केले होते. केप टाऊन इथे उतरताच सर रतन टाटा यांनी सत्याग्रह फंडाकरिता २५,००० रुपये दिल्याची तार मला मिळाली. त्या वेळेच्या गरजांकरिता इतकी रक्कम पुरेशी होती. आमचे काम भागले.

परंतु इतक्या पैशाने अथवा जास्तीतजास्त पैसा मिळूनही सत्याग्रहाची, आत्मबळाची लढाई चालू शकत नाही. अशा लढ्याकरिता चारित्र्याची संपत्ती आवश्यक असते. ज्याप्रमाणे राजवाड्यात कितीही संपत्ती असली तरी राजाशिवाय तो राजवाडा ओस पडल्यासारखा वाटतो त्याचप्रमाणे हे. हा लढा किती दीर्घकाळ चालणार आहे याचा अंदाज कोणीही करू शकत नाही हे आता समाजातील सत्याग्रहींच्या लक्षात आले. कुठे जनरल बोथा आणि जनरल स्मट्स यांची एक इंचही

माघार न घेण्याची प्रतिज्ञा आणि कुठे मरेपर्यंत संघर्ष करत राहण्याची सत्याग्रहींची प्रतिज्ञा! हे तर हत्ती आणि मुंगी यांच्यातील युद्ध होते. हत्त्याच्या एका पायाखाली असंख्य मुंग्या चिरडल्या जाऊ शकतात. शिवाय सत्याग्रही आपल्या सत्याग्रहाकरिता कोणतीही कालमर्यादा ठरवू शकत नाही. एक वर्ष लागो की अनेक, त्याच्याकरिता तर सर्व सारखेच असतात. त्याच्याकरिता तर लढण्यातच विजय असतो. लढण्याचा अर्थ होता तुरुंगात जाणे वा हद्दपारीची शिक्षा भोगणे. मध्यंतरीच्या काळात कुटुंबाचे काय होईल? सतत तुरुंगात जाणाराला कोणी नोकरी तर देऊ शकत नाही. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर स्वतः काय खायचे आणि कुटुंबियांना काय खाऊ घालायचे? राहायचे कुठे? घराचे भाडे कसे द्यायचे? उपजीविकेच्या साधनाच्या अभावामुळे सत्याग्रहीलासुद्धा काही सुचेनासे होते. स्वतः उपाशी मरणारे आणि स्वकीयांना उपाशी मारणारे लोक जगात फार असू शकत नाहीत.

तुरुंगात जाणाऱ्या सत्याग्रहींचा उदरनिर्वाह त्यांना दरमहा दिलेल्या पैशाने होत होता. प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे पैसै दिला जाई. मुंगीला कण आणि हत्त्याला मण. सर्वांना सारखे पैसे तर दिले जाऊ शकत नव्हते. पाच मुले असणाऱ्या सत्याग्रहीला आणि ज्याच्यावर काहीही जबाबदारी नाही अशा ब्रह्मचाऱ्याला एकाच श्रेणीत ठेवता येत नाही. तसेच केवळ ब्रह्मचाऱ्यांनाच सत्याग्रही सेनेत भरती करता येणे शक्य नसते. मग कोणत्या सिद्धांताच्या आधारे पैसा द्यावा? प्रत्येक कुटुंबावर विश्वास ठेवून त्यांच्या मागणीप्रमाणे बहुधा त्यांना पैसा दिला जायचा. यात फसवणुकीला बरीच संधी असायची. धोकेबाज लोकांनी काही प्रमाणात या पद्धतीचा दुरुपयोगही केला. शुद्ध हृदय असलेले इतर लोकही आपले जीवनमान कायम ठेवण्याकरिता आर्थिक मदतीची अपेक्षा करत असत. अशा प्रकारे सत्याग्रहींना मदत करून हा लढा दीर्घ काळ चालवता येणे शक्य नव्हते. यामुळे पात्र व्यक्तीवर अन्याय होण्याची आणि कुपात्र व्यक्ती आपल्या पाखंडीपणात यशस्वी होण्याची शक्यता नेहमीच असते. ही अडचण एकाच मार्गाने दूर होऊ शकत होती - सर्व कुटुंबांना एकाच ठिकाणी ठेवायचे आणि तिथे सर्वांनी मिळून काम करायचे. असे केले तर कोणावरही अन्याय होण्याची भीती राहत नाही. तसेच पाखंडीपणालाही मुळीच वाव राहत नाही असेही म्हणता येऊ शकते. यामुळे सार्वजनिक पैशाची बचत होऊ शकणार होती आणि

सत्याग्रहींच्या कुटुंबियांना साध्या जीवनाचे आणि परस्परात मिळूनमिसळून वागण्याचे प्रशिक्षणही मिळू शकणार होते. अशा व्यवस्थेत अनेक प्रांतांतील व अनेक धर्मांतील हिंदुस्तानींना सोबत राहण्याची संधी मिळू शकणार होती.

परंतु राहण्याकरिता योग्य जागा कशी मिळू शकेल हा प्रश्न होता. शहरात राहण्याचा अर्थ झाला असता आगीतून निघून फुफाट्यात पडणे. जेवणाच्या मासिक खर्चाइतके पैसे तर शहरात कदाचित घरभाड्याकरिताच लागले असते. तसेच शहरात राहिल्यामुळे साधेपणाने जीवन व्यतीत करण्यात कदाचित व्यत्यय आला असता. याशिवाय सर्व कुटुंबांमधील लोक एकत्र राहून घरी बसून काही उद्योग करू शकतील अशी जागा तर शहरात मिळूच शकत नव्हती. यामुळे शहरापासून फार दूर नाही आणि जवळ नाही अशी जागा याकरिता निवडण्यात यावी असे आम्ही ठरवले. फिनिक्स आश्रम तर होताच. तिथून 'इंडियन ओपिनियन' निघत होते आणि थोडीबहुत शेतीही तिथे व्हायची. फिनिक्समध्ये इतरही किती तरी सोयी उपलब्ध होत्या. परंतु फिनिक्स जोहानिसबर्गपासून ३०० मैल दूर होते, आणि तिथपर्यंतच्या प्रवासाला ३० तास लागले असते. त्या सर्व कुटुंबांना इतक्या दूर नेण्याचे काम खर्चाचेही होते आणि कठीणही होते. याशिवाय सत्याग्रहींच्या कुटुंबातील लोकही इतक्या दूर जाण्याकरिता तयार झाले नसते. आणि ते जरी तयार झाले असते तरी त्यांना आणि तुरुंगातून सुटका झालेल्या नवीन सत्याग्रहींना फिनिक्सला पाठवण्याचे काम अशक्यप्राय कोटीतील असल्याचे मला जाणवत होते.

यामुळे सत्याग्रहींच्या कुटुंबियांना ठेवण्याचे स्थान ट्रान्सवालमध्येच असणे आवश्यक होते आणि तेही जोहानिसबर्गजवळ असले पाहिजे असे ठरले. श्री कॅलनबॅक यांची ओळख मी पूर्वीच करून दिलेली आहे. त्यांनी ११०० एकर जमीन विकत घेतली आणि एकही पैसा न घेता ती सत्याग्रहींच्या उपयोगाकरिता दिली. (३० मे १९१०ला) त्या जमिनीवर जवळपास १,००० फळझाडे होती आणि एक लहानसे घरही होते. त्यात पाचसात माणसे राहू शकत होती. पाण्याकरिता दोन विहिरी आणि एक झरा होता. तिथून सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन लॉले एक मैल अंतरावर होते. जोहानिसबर्ग तेथून २१ मैल अंतरावर होते. या जमिनीवर घरे बांधण्याचे आणि तिथे सत्याग्रहींना वसवण्याचे आम्ही ठरवले.

# १०. टॉलस्टॉय फार्म - २

फार्मच्या जमिनीवर १,१०० फळझाडे होती. त्यात बहुतेक नारिंगी, ॲप्रिकॉट, प्लम, वगैरेंची झाडे होती. हंगामात त्यांना इतकी फळे लागत असत की सत्याग्रहींनी ती पोटभर जरी खाल्ली तरी शिल्लक राहायची. तिथे पाण्याचा एक लहानसा झरा होता आणि तो राहण्याच्या ठिकाणापासून जवळपास १,५०० फूट अंतरावर होता. यामुळे पाणी कावडीत भरून आणावे लागत असे.

या ठिकाणी नोकराकडून कोणतेही घरगुती काम करवून घ्यायचे नाही आणि शक्य तोपर्यंत घरे बांधण्याच्या आणि शेतीवाडीच्या कामातही नोकरचाकर लावायचे नाही असे आम्ही ठरवले होते. यामुळे संडास साफ करण्यापासून तर स्वयंपाकापर्यंतचे सर्व काम आम्हाला स्वतःलाच करावे लागायचे. स्त्रीयांना आणि पुरुषांना वेगवेगळे ठेवावे असे आम्ही आधीपासूनच ठरवले होते. १० स्त्रिया आणि ६० पुरुष राहू शकतील इतकी घरे ताबडतोब बांधायची ठरले. श्री कॅलनबॅक यांच्याकरिता एक मोठे घर बांधायचे होते आणि शाळेकरिता एक मोठी इमारतही बांधायची होती. याशिवाय सुतारकाम आणि चांभारकाम यांकरिता एक कारखानाही तयार करायचा होता. जे लोक इथे राहण्याकरिता येणार होते त्यांत गुजरात, मद्रास, आंध्रप्रदेश आणि उत्तर हिंदुस्तानातील लोक होते. धर्माने ते हिंदु, मुसलमान, पारसी आणि ख्रिश्चन होते. त्यात जवळपास चाळीस तरुण होते, दोनतीन वृद्ध गृहस्थ होते, पाच स्त्रिया होत्या आणि वीस ते तीस मुले होती आणि या मुलांमध्ये चारपाच मुली होत्या.

स्त्रियांमध्ये ख्रिश्चन इत्यादी स्त्रियांना मांसाहाराची सवय होती. या ठिकाणी मांसाहाराचा प्रवेश झाला नाही तर बरे होईल असे कॅलनबॅक आणि मलाही वाटत होते. परंतु त्या लोकांना मांसाहार किंचितही चुकीचा वाटत नव्हता. जे इथे संकटकाळात राहण्याकरिता येणार होते, ज्यांना लहानपणापासून मांसाहाराची सवय होती त्यांना काही काळाकरिता तरी मांसाहार सोडा असे कसे म्हणावे हा प्रश्न होता. आणि असे सांगितले नाही तर खर्च किती वाढेल? आणि मग ज्यांना गोमांस खाण्याची सवय आहे त्यांना गोमांसही द्यावे काय? अखेर वेगवेगळी किती स्वयंपाकघरे

करावी? अशा परिस्थितीत माझे कर्तव्य काय? या कुटुंबियांना पैसे देण्याच्या निमित्ताने का होईना मी मांसाहार आणि गोमांसाहाराचे समर्थन करत होतोच की. मांसाहारींना आर्थिक मदत मिळणार नाही असा नियम जर मी केला असता तर सत्याग्रहाची लढाई मला केवळ शाकाहारी लोकांच्या बळावरच लढावी लागली असती. हेसुद्धा कसे शक्य होते? ही लढाई तर हिंदुस्तानींच्या सर्व वर्गांतर्फे लढली जाणारी लढाई होती. अशा परिस्थितीत माझे कर्तव्य काय आहे याची मला स्पष्टपणे जाणीव झाली. ख्रिश्चन आणि मुसलमान मित्र गोमांस जरी मागतील तरी मी ते त्यांना पुरवले पाहिजे. या ठिकाणी या गोष्टी निषिद्ध मानून मी त्यांना अडवू शकत नाही.

परंतु ईश्वर नेहमीच प्रेम करणाराचा रखवाला असतो. मी सरळ सरळ ख्रिश्चन भगिनींसमोर माझी अडचण मांडली. मुसलमान भगिनींनी तर मला शुद्ध निरामिष जेवण तयार करणारे स्वयंपाकघर तयार करण्याची परवानगी दिलेली होती. आता ज्यांचे पती वा मुले तुरुंगात होती अशा केवळ ख्रिश्चन भगनींशीच मला बोलायचे होते. ते लोकही निरामिष जेवणासंबंधीत माझ्याशी सहमत होते. त्यांच्याशी अशी चर्चा करण्याची मला अनेकदा संधी मिळाली होती. परंतु स्त्रियांबरोबर अशी चर्चा करण्याची संधी मला पहिल्यांदाच मिळाली होती. घराची गैरसोय, आर्थिक चणचण, आणि माझ्या भावना यासंबंधी मी त्यांच्याशी बोललो. त्याचबरोबर तुम्हाला हवे असेल तर मी तुम्हाला गोमांससुद्धा आणून देईन असे सांगून त्यांच्या मनातील आशंकाही मी दूर केली. भगिनींनी प्रेमाने मांसाहार न मागण्याचे मान्य केले. स्वयंपाकाची सर्व जबाबदारी त्यांच्यावरच सोपवण्यात आली होती. आमच्यामधील एकदोन माणसे त्यांच्या मदतीकरिता राहिली. त्यांतील एक तर मी स्वतःच होतो. माझ्या उपस्थितीमुळे लहानमोठी भांडणे दूर राहायची. जेवण अगदी साधे असावे असा निर्णय घेण्यात आला. जेवणाची निश्चित वेळ ठरवण्यात आली. एकच स्वयंपाकघर ठेवण्यात आले. सर्व एकाच पंक्तीत बसून जेवण करायचे. प्रत्येकाने आपापली खरकटी भांडी घासूनपुसून स्वच्छ करायचे ठरले. ट्रान्सवाल फार्म दीर्घकाळ सुरू होता. परंतु तिथे राहणाऱ्या कोणीही मांसाहाराची मागणी केली नाही हे मी सांगितलेच पाहिजे. दारू, तंबाखू वगैरे नशेच्या गोष्टी पूर्णपणे बंद होत्या.

मी आधीच लिहिले आहे की घरे बांधतानासुद्धा जितके काम हाताने करता येईल तितके हातांनीच करण्याचा आमचा आग्रह होता. आमचे स्थपती कॅलनबॅक तर होतेच. ते एक युरोपीय राज घेऊन आले. नारायणदास दामानिया नावाच्या एका गुजराती सुताराने पैसे न घेता या कामात मदत केली आणि कमी दरात काम करणारे इतर सुतारही त्याने आणून दिले. अंगमेहनतीने करायच्या साध्या कामांची जबाबदारी आम्ही आमच्याकडे घेतली. आमच्यापैकी जे चपळ होते त्यांनी तर कमालच केली. सुताराचे अर्धे काम तर बिहारी नावाच्या एका तरुणानेच उरकले होते. शहरात जाऊन तेथून सामान आणायचे काम सिंहासारख्या थंबी नायडूंनी साभाळले.

टॉलस्टॉय फार्मवर राहणारांमध्ये प्रागजी खंडूभाई देसाई एक होते. जीवनात त्यांनी कधीही त्रास सहन केला नव्हता. परंतु इथे त्यांना कडक थंडी सहन करावी लागली, रणरणते उन्ह सहन करावे लागले आणि मुसळधार पावसाचा माराही सहन करावा लागला. सुरुवातीला आम्हाला तंबूत राहावे लागत होते. घरे तयार करण्याकरिता अंदाजे दोन महिने लागले असावे. घरे टिनाची तयार केल्यामुळे ती उभारण्यात फारसा वेळ लागला नाही. लाकूडही पाहिजे त्या मापाचे मिळू शकत होते. यामुळे मापाप्रमाणे लाकडाचे तुकडे करायचे काम तेवढे शिल्लक असायचे. खिडक्या, दरवाजे जास्त ठेवायचे नव्हते. यामुळे इतक्या कमी वेळात घरे तयार होऊ शकली. परंतु कष्टाच्या या कामाने प्रागजींनी कठोर परीक्षा घेतली. जेलच्या तुलनेत फार्मचे काम अधिक कठीण होते. एकदा तर थकवा आणि उन्ह यामुळे प्रागजी बेशुद्ध होऊन खाली पडले. परंतु ते हार मानणारांपैकी नव्हते. कष्टाची सवय लावून त्यांनी आपले शरीर काटक बनवले आणि अखेरीस तर सर्वांच्या बरोबरीने काम करण्याची शक्ती त्यांनी मिळवली.

असेच दुसरे साथी होते जोसेफ रायप्पन. ते बॅरिस्टर होते. परंतु त्यांना बॅरिस्टरीचा अभिमान नव्हता. ते फार कष्टाची कामे करू शकत नसत. ट्रेनमधून सामान उतरवणे आणि चढवणे त्यांना कठीण जायचे. परंतु तरीही त्यांनी शक्य तितके हे काम केले. टॉलस्टॉय फार्ममध्ये येऊन दुबळे लोक काटक झाले आणि सर्वांकरिताच कष्ट लाभदायक असल्याचे सिद्ध झाले. फार्मवर राहणाऱ्या प्रत्येक रहिवाशाला कोणत्या ना कोणत्या कामाकरिता जोहानिसबर्गला जावे लागायचे.

मलाही कामानिमित्त जोहानिसबर्गला जावे लागायचे. मुलांना तिथे सहलीकरिता जावेसे वाटायचे. निर्णय असा घेण्यात आला की फार्मच्या सामूहिक कामाकरिता जो जाईल त्यालाच रेल्वेने जाण्याची परवानगी देण्यात यावी आणि तीही तिसऱ्या वर्गाने. सहलीकरिता जाणाऱ्यांनी पायी जावे आणि खाण्याकरिता एक पैसाही खर्च होऊ नये म्हणून त्याला सोबत फराळाचे सामान बांधून द्यावे असेसुद्धा ठरले. असे कडक नियम आम्ही तयार केले नसते तर जो पैसा वाचवण्याकरता आम्ही जंगलात राहणे पसंत केले होते तो पैसा रेल्वेच्या भाड्यात आणि शहराच्या बाजारातील फराळातच उडाला असता. फराळात घरी दळलेल्या न चाळलेल्या जाड्याभरड्या कणकेची डबलरोटी, तिच्यावर घरी तयार करण्यात आलेले शेंगदाण्याचे लोणी आणि घरीच तयार करण्यात आलेला नारिंगीच्या सालीचा मुरावळा असायचा. शेगदाणे भाजून दळले की त्याचे लोणी तयार होत असे. दुधाच्या लोण्यापेक्षा ते पाचपट कमी किंमतीत तयार व्हायचे. नारिगी तर फार्मवरच खूप होत असे. फार्मवर आम्ही गायीचे दूध क्वचितच घेत असू. सामान्यपणे आम्ही डब्याच्या दुधाचाच उपयोग करत असू.

परंतु परत आपण प्रवासाबद्दल बोलू या. ज्या लोकांना जोहानिसबर्गला जाण्याची हौस असायची ते आठवड्यातून एकदोनदा पायी जात आणि त्याच दिवशी परत येत असत. मी आधीच सांगितले आहे की हा रस्ता २१ मैलांचा होता. पायी जाण्याच्या एका नियमामुळे आम्ही शेकडो रुपये वाचवले. आणि पायी जाणारांचासुद्धा त्यामुळे फायदाच झाला. काही लोकांना चालायची सवय लागली. सामान्यपणे नियम असा होता की पायी जाणाराने रात्री दोन वाजता उठावे आणि अडीच वाजता निघावे. सहासात तासात सर्व जोहानिसबर्गला पोहोचू शकत असत. कमीतकमी वेळ घेणारे लोक जोहानिसबर्गला ४ तास १८ मिनिटात पोहोचत असत.

वाचकांनी असे समजू नये की फार्मवर राहणारांकरिता ही शिस्त जाचक होती. सर्व सदस्य प्रेमाने तिचे पालन करत असत. सक्ती केली असती तर एकाही माणसाला मी फार्मवर ठेवू शकलो नसतो. प्रवासात वा आश्रमात सोपवलेली कामे तरुण लोक हसतखेळत करत असत. मेहनतीचे काम करत असताना तरुणांना मस्ती करण्यापासून आवरणे कठीण होत असे. जितके काम ते स्वेच्छेने

आणि खुषीने करू शकायचे तितकेच करून घेण्याचा नियम ठेवण्यात आला होता. परंतु यामुळे एक दिवससुद्धा काम कमी झाल्याचे मला आढळले नाही.

साफसफाईची गोष्ट सांगण्यासारखी आहे. फार्मवर इतके लोक राहत होते आणि तरीही कुठेसुद्धा घाण, कचरा, उष्टे, खरकटे आढळत नसे. काडीकचऱ्याकरिता जी जमीन खोदण्यात आली होती तिच्यात सर्व काडीकचरा जायचा. रस्त्यावर पाणी सांडायची मनाई होती. सर्व पाणी भांड्यांमध्ये गोळा करण्यात येत असे आणि झाडांना देण्यात येत असे. खरकटे आणि भाजीपाल्याचा कचरा यापासून खत बनवण्यात येत असे. पायखान्याकरता राहण्याच्या घराशेजारी दीड फूट खोल एक खड्डा खोदण्यात आला होता. त्यात सर्व मळ पुरण्यात यायचा. तो मळ खड्ड्यातून निघालेल्या मातीने चांगल्या प्रकारे झाकून टाकला जाई. यामुळे त्याचा मुळीच वास येत नसे. ना तिथे माश्या घोंगावयाच्या ना तिथे मळ पुरलेला आहे असे कोणाला जाणवायचे. त्याचबरोबरोबर फार्मला अमूल्य खत मिळायचे. आपण जर मळाचा सदुपयोग केला तर आपल्याला लाखो रुपयांचे खत (म्हणजे १९२५ सालचे लाखो रुपयांचे - अनुवादक) मिळू शकते आणि विविध प्रकारच्या रोगराईपासून आपला बचाव होऊ शकतो. शौच्यास जाण्याच्या आपल्या चुकीच्या पद्धतीमुळे आपण नद्यांचे पात्र तर घाणेरडे करतोच शिवाय माश्यांच्या उत्पत्तीचे एक केंद्रसुद्धा निर्माण करतो. त्या माश्या आपल्या मळावर बसतात आणि मग आपल्या सुस्नात शरीरावर येऊन बसतात. एक लहानशी कुदळ आणि फावडे आपल्याला फार मोठ्या घाणीपासून वाचवू शकतात. चालण्याच्या मार्गावर घाण टाकणे, थुंकणे आणि नाक शिंकणे ईश्वरविरोधी आणि माणूसविरोधी पाप आहे. यात दयेचा अभाव आहे. दुसऱ्याच्या गैरसोयीची फिकीर न करण्याची मनोवृत्ती आहे. जो माणूस जंगलात राहूनही आपला मळ गाडत नाही तो शिक्षेकरिता पात्र असतो.

सत्याग्रही कुटुंबियांचा उद्यमीपणा टिकवून ठेवणे, पैसे वाचवणे आणि अखेरीस त्यांना स्वावलंबी करणे हे आमचे काम होते. यात यशस्वी झाल्यानंतर आम्ही हवा तितका काळ ट्रान्सवाल सरकारशी लढू शकणार होतो. जोड्यांकरिता आम्हाला पैसे खर्च करावे लागायचे. गरम वातावरणात बंद जोड्यांमुळे त्रास होतो. पाय सर्व घाम शोषून घेतात आणि ते नाजूक होतात.

आपल्या देशाप्रमाणे ट्रान्सवालमध्ये मोज्यांची तर मुळीच गरज नसते. परंतु काटे, दगड इत्यांदींपासून बचावाकरिता आम्ही जोड्यांची गरज मान्य केली होती. यामुळे आम्ही चप्पल किवा सॅन्डल बनवणे शिकायचे ठरवले. दक्षिण आफ्रिकेत पाईन टाऊनजवळ मेरियन हिलमध्ये ट्रॅपिस्ट नावाचा रोमन कॅथॉलिक पाद्र्यांचा एक मठ आहे. तिथे असे उद्योग सुरू असतात. ते जर्मन आहेत. श्री कॅलेनबॅक तिथे गेले आणि ती कला शिकून आले. मग त्यांनी ती कला मला शिकवली आणि मी ती इतर सोबत्यांना. अशा प्रकारे अनेक मित्र चप्पल बनवण्याची कला शिकले आणि आश्रमात बनवलेल्या चपला आम्ही आमच्या मित्रांना विकू लागलो. माझे अनेक मित्र या कलेत माझ्यापुढे निघून गेले हे सांगण्याची आवश्यकता नसावी. आम्ही सुतारीचा दुसरा उद्योग सुरू केला. एक प्रकारे एक गावच आम्ही वसवलेले असल्यामुळे आम्हाला पाटापासून तर पेटीपर्यंत अनेक गोष्टींची गरज असायची, आणि या सर्व गोष्टी आम्ही आमच्या हातानेच बनवत असू. वर सांगितलेल्या सुतारांनी काही महिने या कामात आम्हाला मदत केली. श्री कॅलनबॅक हे या विभागाचे प्रमुख होते. त्यांच्या रेखीवपणाचा आणि नैपुण्याचा आम्हाला नेहमीच प्रत्यय येत असे.

युवक, मुले आणि मुली यांच्याकरिता एक शाळा असणे अनिवार्य होते. हे काम आम्हाला सर्वात कठीण वाटले, आणि अखेरपर्यंत आम्हाला त्यात पूर्ण यश मिळू शकले नाही. शिकवण्याची विशेष जबाबदारी श्री कॅलनबॅक आणि माझ्यावर होती. शाळा दुपारीच सुरू असू शकत होती. सकाळच्या शारीरिक श्रमाने आम्ही दोघेही खूप थकून जात असू. विद्यार्थीसुद्धा खूप थकलेले असायचे. यामुळे अनेकदा विद्यार्थी पेंगू लागायचे. आम्ही आमच्या डोळ्यांवर पाणी शिंपडत असू. मुलांबरोबर खेळून त्यांची झोप उडवण्याचा प्रयत्न करत असू. परंतु कधीकधी आमचे प्रयत्न वाया जात. शरीराला जितका आराम आवश्यक असायचा तितका ते घेतल्याशिवाय राहत नसे. ही तर मी लहानात लहान विघ्नाची गोष्ट सांगितली, कारण डुलक्या देतादेताही आमचे वर्ग सुरूच असायचे. परंतु तमिळ, तेलगू आणि गुजराती बोलणाऱ्या विद्यार्थ्यांना काय आणि कसे शिकवावे हा मुख्य प्रश्न होता. मुलांना मातृभाषेत शिकवण्याचा मोह तर माझ्या मनात होताच. मला तमिळ थोडीबहुत कळत असे. परंतु तेलगूचा मला एक शब्दही कळत नसे. अशा परिस्थितीत बिचारा एक शिक्षक काय करू शकणार होता? आश्रमात जे तरुण होते त्यांच्यातील काहींचा उपयोग

आम्ही शिक्षक म्हणून केला. परंतु हा प्रयोग यशस्वी झाला असे म्हणता येऊ शकत नाही. भाई प्रागजी यांचा तर या कामाकरिता उपयोग केला जातच असे. युवकांमध्ये काही मस्ती करणारे आणि काही फार आळशी होते. आपल्या पुस्तकांबरोबर त्यांचे नेहमीच युद्ध सुरू असायचे. असे विद्यार्थी शिक्षकाची पर्वा कशाला करतील? याशिवाय आम्ही दोघे शिकवण्याच्या कामात नियमित राहू शकत नव्हतो. आवश्यकता पडली तर मला अथवा कॅलेनबॅकला जोहानिसबर्गला जाणे भाग पडायचे.

दुसरी अडचण धार्मिक शिक्षणाची होती. मुसलमानांना कुराण शिकवण्याचा मोह तर माझ्या मनात असायचाच. पारसी मुलांना अवेस्ता शिकवण्याची इच्छा होत असे. खोजा मुसलमानाचाही एक मुलगा होता. त्याला खोजा पंथाचे एक लहानसे पुस्तक शिकवण्याची जबाबदारी त्याच्या वडिलांनी माझ्यावर सोपवली होती. पारसी ख्रिश्चन धर्माची पुस्तके मी गोळा केली होती. हिंदू धर्माची मूलतत्त्वे माझ्या समजाप्रमाणे मी लिहून काढली होती. हे काम मी केवळ मुलांकरिता केले होते की सर्व आश्रमवासीयांकरिता हे आता मला आठवत नाही. ते लिखाण जर आता माझ्याजवळ असते तर माझी गती वा प्रगती किती झाली हे कळावे म्हणून मी ते इथे छापले असते. परंतु मी अशा अनेक गोष्टी माझ्या जीवनात फेकून दिल्या आहेत वा जाळून टाकल्या आहेत. अशा गोष्टींचा संग्रह करण्याची गरज जसजशी मला वाटेनाशी झाली आणि जसजसे माझे कार्यक्षेत्र वाढत गेले तसतशा अशा गोष्टी मी नष्ट करत गेलो. याकरिता मला मुळीच पश्चात्ताप होत नाही. अशा गोष्टींचा संग्रह माझ्याकरिता ओझ्यासारखा झाला असता आणि त्याकरिता खर्चही बराच आला असता. त्यांच्या रक्षणाकरिता मला साधनांची जुळवाजुळव करावी लागली असती. हे माझ्या अपरिग्रही आत्म्याला सहन झाले नसते.

परंतु आश्रमात करण्यात आलेला हा प्रयोग वाया गेला नाही. यामुळे मुलांमध्ये कधीही असहिष्णुता निर्माण झाली नाही. एकमेकांच्या धर्माकडे आणि एकमेकांच्या रीतिरिवाजाकडे ते उदार दृष्टीने पाहणे शिकले, परस्परांची सेवा करणे शिकले, सुसंस्कृतता शिकले, उद्यमी झाले आणि आजसुद्धा त्या मुलांची मला जी थोडीबहुत माहिती आहे त्यावरून टॉलस्टॉय फार्मवरील

त्यांचे शिक्षण वाया गेले नाही असेच मला वाटते. तो प्रयोग जरी अर्धवट असला तरी तो प्रयोग विचारपूर्ण आणि धार्मिक होता. आणि टॉलस्टॉय फार्मच्या ज्या गोड आठवणी आहेत त्यांतील शिक्षणाच्या त्या आठवणी काही कमी गोड नाहीत. परंतु या आठवणींकरिता एक नवीन प्रकरण लिहिले पाहिजे.

# ११. टॉलस्टॉय फार्म - ३

या प्रकरणात मी टॉलस्टॉय फार्मवरील अनेक आठवणी सांगू इच्छितो. परस्परांशी काहीही संबंध नसल्यासारख्या त्या आता वाटतील. याकरिता वाचकांनी मला क्षमा करावी.

शिकवण्याकरिता मला जो वर्ग मिळाला होता तसा वर्ग क्वचितच कोण्या शिक्षकाच्या नशिबी आला असावा. जवळपास सात वर्षांच्या मुलामुलींपासून तर २० वर्षांचे युवक आणि १२-१३ वर्षाच्या मुली त्या वर्गात होत्या. काही मुले तर अशी होती की ज्यांना जंगली म्हणता येईल. ते अतिशय दंगलखोर आणि दुष्ट होते. विद्यार्थ्यांच्या अशा घोळक्याला मी काय शिकवावे? सर्वांच्या स्वभावानुसार मी कसा होणार? आणि सर्वांसोबत मी कोणत्या भाषेत बोलू? असे प्रश्न माझ्यासमोर होते. तमिळ वा तेलगू मुलांना एक तर त्यांची मातृभाषा कळत होती वा इंग्रजी समजत होती. थोडी डच भाषाही त्यांना कळायची. परंतु मी त्यांच्याबरोबर इंग्रजीतच बोलू शकत असे. मी विद्यार्थ्यांचे दोन गट केले होते. गुजराती मुलांबरोबर गुजरातीत बोलायचे आणि इतर विद्यार्थ्याबरोबर इंग्रजीत. त्या मुलांना काही रसाळ गोष्टी सांगण्याची वा पुस्तकातून वाचून दाखवण्याची व्यवस्था मी केली होती. त्या सर्वांना एकमेकांसोबत बसवून शिकवणे आणि त्यांच्यातील मैत्रीभावाचा आणि सेवाभावाचा विकास करणे इतकाच उद्देश मी माझ्यासमोर ठेवला होता. इतिहासाचे आणि भूगोलाचे थोडे सामान्य ज्ञान मी त्यांना देत असे व थोडे लिहिणे शिकवत असे. काहींना अंकगणित शिकवत असे. अशा प्रकारे मी माझे काम भागवत असे. प्रार्थनेकरिता काही भजनही शिकवण्यात येत असत. ते भजन शिकण्याकरिता मी तमिळ मुलांनाही उत्तेजन देत असे.

मुलेमुली संपूर्ण मोकळेपणाने एकत्र उठतबसत असत. टॉलस्टॉय फार्मवरील सहशिक्षणाचा हा प्रयोग जास्तीतजास्त निर्भयपणे करण्यात आलेला प्रयोग होता. जे स्वातंत्र्य मी तिथे मुलामुलींना देऊ शकलो आणि शिकवू शकलो ते स्वातंत्र्य मुलामुलींना देण्याचा व शिकवण्याचा धीर आज मी करू शकत नाही. त्या वेळी माझे मन आजपेक्षा अधिक निरागस होते असे मला नेहमीच वाटत आले आहे. याचे कारण माझे अज्ञान असू शकते. परंतु यानंतर

याबाबतीत मला फार कडू अनुभव आले. आणि कधीकधी तर मला मोठे नुकसानही सहन करावे लागले आहे. ज्या विद्यार्थ्यांना मी पूर्णपणे निर्दोष समजत होतो ते दोषी असल्याचे सिद्ध झाले. माझ्यात अगदी खोलवर दडलेल्या विकारांचीही मला जाणीव झाली आहे. यामुळे या बाबतीत मी मनातून घाबरू लागलो आहे.

माझ्या या प्रयोगाबद्दल मला कोणताच पश्चात्ताप वाटत नाही. या प्रयोगामुळे कोणतेच नुकसान झाले नाही अशी साक्षसुद्धा माझे अंतःकरण देते. परंतु दुधाने तोंड पोळलेला ताकही फुंकून पितो. आज माझी परिस्थिती अशीच झाली आहे.

माणूस श्रद्धेची किंवा साहसाची दुसऱ्याकडून चोरी करू शकत नाही. 'संशयात्मा विनश्यती.' टॉलस्टॉय फार्ममध्ये मी पराकाष्ठेचा श्रद्धाळू आणि साहसी झालो होतो. तीच श्रद्धा आणि तेच साहस परत मिळावे म्हणून मी ईश्वराला प्रार्थीत असतो. परंतु तो माझी प्रार्थना ऐकेल तेव्हा ना? त्याच्यासमोर तर माझ्यासारखे असंख्य भिकारी उभे आहेत. समाधान केवळ इतकेच आहे की ज्याप्रमाणे त्याच्याकडे अनेक भिकारी जातात त्याचप्रमाणे त्याला असंख्य कानही आहेत. मला हेही माहीत आहे की मी जेव्हा योग्य बनेन तेव्हा तो माझी प्रार्थना ऐकेल.

माझा प्रयोग असा होता -

मी दंगलखोर मुलांना आणि निर्दोष मुलींना एकाच ठिकाणी आंघोळीकरिता पाठवत असे. मर्यादाधर्म अथवा आत्मसंयम यांच्याबद्दल मी त्यांना चांगले समजावून सांगितले होते. त्या सर्वांना माझ्या सत्याग्रहाची माहिती होती. त्यांच्याबद्दल माझ्या मनात आईप्रमाणे वात्सल्यभाव होता. हे मला स्वतःला तर माहीत होतेच शिवाय त्या मुलांनाही याची जाणीव होती. वाचकांना पाण्याचा तो झरा आठवत असेल. स्वयंपाकघरापासून तो दूर होता. तिथे मुलामुलींना एकत्र जाऊ द्यायचे आणि मग त्यांच्या निर्दोषत्वाची अपेक्षा करायची! परंतु एखाद्या आईचे डोळे आपल्या मुलीमागे जसे भिरभरत असतात तसेच माझेही डोळे त्या मुलींमागे भिरभरत असायचे. आंघोळीची ठराविक वेळ होती. सर्व मुलेमुली सोबत आंघोळीकरिता जात असल्यामुळे समूहात जी सुरक्षितता

असते ती तिथेही होती. तिथे त्यांना एकांत तर मिळू शकत नव्हता. सामान्यपणे मीसुद्धा त्याच वेळी झऱ्यावर पोहोचत असे.

आम्ही सर्व एकाच ओसरीत झोपत असू. मुलेमुली माझ्या आजूबाजूला झोपत. कोणत्याही दोन अंथरुणांमध्ये मुश्किलीने तीन फुटांचे अतर राहत असावे. अंथरुणाच्या क्रमात मात्र नक्कीच सावधगिरी बाळगली जात असे. परंतु ज्याचे मन दुषित असेल त्याच्याकरिता सावधगिरी काय करू शकते? त्या मुलामुलींच्या बाबतीत ईश्वरानेच माझी लाज राखली हे आज मला दिसू शकते. मुले आणि मुली निरागस अंतःकरणाने परस्परांबरोबर राहू शकतात या विश्वासाने मी हा प्रयोग केला होता, आणि त्यांच्या आईवडिलांनीही माझ्यावर असीम विश्वास टाकून मला हा प्रयोग करू दिला होता. एके दिवशी एका तरुण मुलाने दोन मुलींची चेष्टा केली आणि ती बातमी एक तर त्या मुलींनी मला सांगितली वा कोणत्या तरी मुलाने येऊन मला सांगितली. माझा थरकाप झाला. मी त्या प्रकरणाची चौकशी केली. गोष्ट खरी होती. मी त्या तरुण मुलाला समजावले. परंतु इतके पुरेसे नव्हते. मला वाटत होते की त्या तरुण मुलींच्या शरीरावर अशी काही खूण असावी की ज्यामुळे त्या तरुण मुलीकडे कुदृष्टीने पाहिलेच जाऊ शकत नाही असे प्रत्येक तरुणाला वाटावे, तसेच आपल्या पावित्र्यावर कोणी आक्रमण करण्याचे साहसच करू शकणार नाही याबद्दल त्या तरुणींना खात्री वाटावी. विकारी रावण सीतेला स्पर्शच करू शकला नव्हता. राम तर तिच्यापासून फार दूर होता. या मुलींना मी असे कोणते चिन्ह देऊ शकत होतो की ज्यामुळे त्यांना सुरक्षितता जाणवावी आणि त्यांच्याकडे पाहणारांनी निर्विकार भावनेने त्यांच्याकडे पाहावे? या प्रश्नाने मी रात्रभर झोपू शकलो नही. सकाळी मी त्या दोन्ही मुलींना समजावण्याचा प्रयत्न केला. त्यांना धक्का बसणार नाही अशा प्रकारे त्यांना समजावून सांगत मी म्हणालो की मला तुमचे सुंदर केस कापून टाकण्याची परवानगी द्या. टॉलस्टॉय फार्मवर आम्ही एकमेकांची दाढी करत असू आणि केसही कापत असू. यामुळे कैच्या आणि केस कापण्याच्या मशिना हे साहित्य आमच्याजवळ होते. आधी तर दोन्ही मुलींनी माझे ऐकले नाही. मोठ्या वयाच्या स्त्रियांना मी माझे म्हणणे समजावून सांगितले होते. केस कापण्याची माझी सूचना तर त्यांना सहन झाली नाही. परंतु केस कापण्यामागील माझा जो उद्देश होता तो त्या समजून घेऊ शकल्या. या कामात मला त्यांचा

पाठिंबा होता. दोन्ही मुली भव्य आणि सुंदर होत्या. दुःखाची गोष्ट ही आहे त्यांच्यातील एक आता राहिलेली नाही. ती मुलगी तेजस्विनी होती. दुसरी मुलगी जिवंत आहे. ती आपला संसार चालवत आहे. अखेरीस केस कापण्यामागील माझा उद्देश दोघींच्याही लक्षात आला. या क्षणी ज्या हाताने मी हे प्रकरण लिहीत आहे त्याच हाताने मी त्यांच्या केसांवर कैची चालवली. यानंतर या गोष्टीचे विश्लेषण करून मी वर्गातील मुलांना समजावून सांगितले. याचा फार चांगला परिणाम झाला. परत कोणी मुलींची चेष्टा केल्याचे मी ऐकले नाही. त्या दोन मुलींनी गमावले काहीही नाही. मिळवले काय ते देवाला माहीत. आशा आहे की त्या युवकांना आजही ती गोष्ट आठवत असेल आणि आपली दृष्टी शुद्ध ठेवण्याचा ते प्रयत्न करत असतील.

असे प्रयोग अनुकरणाकरिता केले जात नाहीत. जो शिक्षक याचे अनुकरण करील त्याला फार मोठा धोका पत्करावा लागेल. या प्रयोगाचा उल्लेख मी विशिष्ट परिस्थितीत माणूस कुठपर्यंत जाऊ शकतो हे दाखवण्याकरिता आणि सत्याग्रहाच्या लढाईची विशुद्धता सूचीत करण्याकरिता केला आहे. या विशुद्धतेतच सत्याग्रहाच्या विजयाचे रहस्य दडलेले आहे. असा प्रयोग करण्याकरिता शिक्षकाला विद्यार्थ्यांची आई आणि वडील दोन्ही होता आले पाहिजे. आणि प्राणाची बाजी लावूनच असे प्रयोग करता येऊ शकतात. अशा प्रयोगांमागे कठोर तपश्चर्येची शक्ती असली पाहिजे.

माझ्या या कामाचा प्रभाव फार्मवर राहणाऱ्या लोकांच्या राहणीवर पडल्याशिवाय राहू शकला नाही. कमीतकमी खर्चात राहण्याचे ध्येय असल्यामुळे आम्ही आमच्या पोषाखातही बदल केला. दक्षिण आफ्रिकेतील शहरात राहणाऱ्या हिंदुस्तानींचा पोषाख जवळपास युरोपीय लोकांसारखाच असायचा. सत्याग्रहींचाही तोच पोषाख होता. परंतु टॉलस्टॉय फार्मवर इतक्या कपड्यांची गरज नव्हती. आम्ही सर्व मजूर झालो होतो म्हणून मजुरांसारखेच कपडे घालू लागलो. परंतु त्याची पद्धत युरोपीय होती. म्हणजे मजुरासारखी पाटलूण आणि मजुरासारखा सदरा. यात कैद्यांच्या कपड्यांचे अनुकरण करण्यात आले होते. बाजारात जाड आकाशी रंगाच्या पाटलुणी आणि सदरे

मिळायचे. आम्ही सर्व त्यांचा वापर करत असू. बहुतेक स्त्रिया सुंदर शिवणकाम करू शकत असत. त्यांनी शिवणाची सर्व जबाबदारी स्वतःकडे घेतली.

सामान्यपणे आहारात भात, वरण, भाजी आणि पोळी असायची. आणि कधीकधी यांच्यासोबत खीर असायची. तुरुंगातील ताटलीसारख्या ताटात सर्व पदार्थ वाढण्यात येत असत. लाकडाचे चमचे हाताने बनवण्यात येत असत. दिवसातून तीनदा जेवण दिले जाई. सकाळी सहा वाजता डबलरोटी आणि गव्हाची कॉफी; ११ वाजता वरण, भात आणि भाजी; सायंकाळी साडेपाच वाजता कांजी आणि दूध अथवा डबलरोटी व गव्हाची कॉफी. रात्री ९ वाजता सर्वांनी झोपावे असा नियम होता. जेवणानंतर सायंकाळी सात वा साडेसात वाजता प्रार्थना व्हायची. प्रार्थनेत भजन म्हणण्यात येत असत. केव्हाकेव्हा रामायणातील पाठ व्हायचा. आणि केव्हाकेव्हा इस्लामच्या पुस्तकांमधील काही भाग वाचण्यात येत असे. भजनांमध्ये कधी इंग्रजी, हिंदी आणि गुजराती या तिन्ही भाषांमधील भजन असायचे तर कधी एकाच भाषेतील.

फार्मवर राहणाऱ्या लोकांमधील अनेक लोक एकादशीच्या व्रताचे पालन करत असत. श्री पी. के. कोतवालही तिथे येऊन पोहोचले होते. त्यांना उपवासाचा बराच अनुभव होता. त्यांचे पाहून आमच्यापैकी काहींनीही चातुर्मासाचे व्रत ठेवले होते. त्याच काळात मुसलमानांचे रोजेही येत असत. आमच्यात मुसलमान तरुण होते. रोजे ठेवण्याकरिता त्यांना प्रोत्साहन देणे आमचा धर्म आहे असे आम्हाला वाटले. यामुळे आम्ही सकाळच्या फराळाची आणि रात्रीच्या जेवणाची व्यवस्था केली होती. त्यांच्याकरिता रात्री खीर वगैरेही बनवली जाई. मांसाहार होत नव्हता आणि कोणीही त्याची मागणीसुद्धा केली नाही. मुसलमान मित्रांच्या धर्मभावनेला मान देण्याकरिता आम्हीसुद्धा एकदाच सायंकाळी जेवण करत असू. सूर्यास्तापूर्वी जेवण करण्याचा आमचा नेहमीकरिता नियम होता. यामुळे फरक इतकाच झाला की इतर लोक जेव्हा सूर्यास्तापूर्वी जेवण करून तयार होत तेव्हा मुसलमान मित्र जेवण सुरू करत असत. रोज्याच्या दिवसात मुसलमान तरुणही कोणाला त्रास होणार नाही इतक्या विवेकाने वागले. मुसलमानेतर मुलांनीही खाण्याच्या संयमात आपल्या मुसलमान मित्रांना जे सहकार्य दिले त्याचा आश्रमातील लोकांवर फार चांगला

प्रभाव पडला. हिंदू आणि मुसलमान मुलांमध्ये धर्मामुळे काही मतभेद झाल्याचा वा भांडण झाल्याचा मला एकही प्रसंग आठवत नाही. या उलट मला हे माहीत आहे की सर्व लोक आपापल्या धर्माचे काटेकोरपणे पालन करत असतानाही परस्परांशी संपूर्ण आदराने वागत असत आणि धार्मिक व्रतांचे पालन करण्यात एकमेकांना मदत करत असत.

शहरी जीवनापासून दूर असतानासुद्धा आजारात उपयोगी पडतील अशा सोयी आम्ही आश्रमात केल्या होत्या. त्या काळात मुलांच्या निरागसतेविषयी माझ्या मनात जितकी श्रद्धा होती तितकीच श्रद्धा निसर्गोपचाराविषयी होती. साधे आणि सरळ जीवन व्यतीत करणाराला कोणताही आजार होऊच शकत नाही आणि झालाच तर त्याचा उपचार मी करू शकेन अशी त्या काळात माझी मान्यता होती. आरोग्याविषयीचे माझे पुस्तक माझ्या प्रयोगाची आणि त्या काळातील माझ्या श्रद्धेची टिपणवहीच आहे. मी कधी आजारी पडूच शकत नाही असा अभिमान मला वाटत होता. केवळ पाणी, माती, उपवासाचे प्रयोग आणि आहारातील परिवर्तन यांनी सर्व प्रकारच्या आजाराचा उपचार करता येऊ शकतो असा माझा विश्वास होता. फार्मवरील एकाही व्यक्तीच्या आजारात मी औषधांचा वा डॉक्टरचा उपयोग केला नव्हता. उत्तर हिंदुस्तानातील सत्तर वर्षांचा एक म्हातारा तिथे होता. त्याला दम्याचा आणि खोकल्याचा विकार होता. हे रोगही आहारातील बदल आणि पाण्याच्या प्रयोगाने बरे झाले होते. परंतु आता असे प्रयोग करण्याची हिंमत मी हरवून बसलो आहे, आणि दोनदा स्वतः आजारी पडल्यामुळे असा प्रयोग करण्याचा अधिकारही मी गमावून बसलो आहे असे मला वाटते.

आमचा टॉलस्टॉय फार्म सुरू असण्याच्या काळातच गोखले दक्षिण आफ्रिकेत आले होते. त्यांच्या प्रवासाचे वर्णन करण्याकरिता एक वेगळे प्रकरण पाहिजे. परंतु एक काहीसा कटू आणि काहीसा गोड अनुभव इथे सांगतो. फार्मवर आम्ही कसे जीवन जगत होतो याची थोडीशी कल्पना आतापर्यंत वाचकांना आलीच असेल. फार्मवर खाट वा पलंगासारखी कोणतीच वस्तू नव्हती. परंतु गोखल्यांकरिता आम्ही एक पलंग मागून आणला होता. त्यांना संपूर्ण एकांत मिळावा अशी फार्मवर एकही खोली नव्हती. बसण्याकरिता शाळेतील बाकांशिवाय आमच्याजवळ इतर

कोणतीही वस्तू नव्हती. अशी परिस्थिती असतानाही नाजूक प्रकृतीच्या गोखल्यांना फार्मवर आणण्याचा मोह मी कसा आवरू शकत होतो? आणि टॉलस्टाय फार्म पाहिल्याशिवाय तेही कसे राहू शकले असते? गोखल्यांचे शरीर एका रात्रीची गैरसोय सहन करू शकेल आणि स्टेशनपासून फार्मपर्यंत ते दीड मैल चालू शकतील असे मला वाटत होते. मी त्यांना विचारले होते आणि त्यांनी आपल्या साध्यासरळ स्वभावानुसार विचार न करता माझ्यावर विश्वास ठेवून जी काही व्यवस्था असेल तिचा स्वीकार केला होता. दैव असे की त्याच दिवशी पाऊसही आला. व्यवस्थेत एकाएकी बदल करणे माझ्या आटोक्यात नव्हते. अशा प्रकारे माझ्या अडाणीपणाच्या प्रेमामुळे त्या दिवशी मी गोखलेजींना जो त्रास दिला तो मी जीवनात कधीही विसरू शकत नाही. त्यांचे शरीर इतका मोठा बदल सहन करू शकले नाही. त्यांना सर्दी झाली. जेवण्याकरिता त्यांना स्वयंपाकघरात नेता येऊ शकत नव्हते. आम्ही त्यांच्या राहण्याची व्यवस्था कॅलनबॅक यांच्या खोलीत केली. तिथपर्यंत जेवण नेले असते तर ते थंड होणे स्वाभाविक होते. त्यांच्याकरिता मी खास सूप बनवत असे. भाई कोतवाल वेगवेगळ्या कणकेपासून त्यांच्याकरिता डबलरोटी बनवायचे. परंतु या दोन्ही गोष्टी त्यांच्यापर्यंत गरमगरम कशा पोहोचवाव्या हा प्रश्न होता. कसे तरी करून आम्ही सर्व व्यवस्था केली. गोखल्यांनी त्याबद्दल चकार शब्दही काढला नाही. परंतु त्यांच्या चेहऱ्यावरून मला कळले आणि मलाही माझ्या मूर्खपणाची जाणीव झाली. आम्ही सर्व खाली जमिनीवरच झोपतो हे जेव्हा त्यांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी आपली खाट बाजूला करायला लावून आपले अंथरूण जमिनीवरच टाकायला लावले. ती रात्र मी पश्चात्तापात घालवली. गोखल्यांना एक सवय होती. मी तिला वाईट म्हणत असे. नोकरांकडून ते आपले काम करवून घेत असत. परंतु या प्रवासात त्यांच्याबरोबर एकही नोकर नव्हता. आम्हाला पाय चेपू द्यावे म्हणून मी आणि कॅलेनबॅक यांनी त्यांना बरीच विनंती केली. परंतु ते मुळीच ऐकायला तयार नव्हते. त्यांनी आम्हाला पायांना स्पर्शसुद्धा करू दिला नाही. उलट काहीशा रागात आणि काहीशा विनोदात ते म्हणाले, "तुम्हा लोकांना असे वाटते काय की केवळ तुम्ही लोकच दु:ख आणि गैरसोय सहन करण्याकरिता जन्माला आला आहा? या अतिरेकाची शिक्षा तुम्हाला भोगावीच लागेल. मी तुम्हाला मला स्पर्शसुद्धा करू देणार नाही. तुम्ही सर्व शौच्याकरिता दूर जाल आणि माझ्याकरिता खोलीत

कमोड ठेवाल? का? कितीही त्रास झाला तरी मी तो सहन करीन, परंतु तुमचा अहंकार दूर केल्याशिवाय राहणार नाही." हे शब्द आम्हाला वज्रासारखे वाटले. मी आणि कॅलेनबॅक आम्ही दोघेही दु:खी झालो. त्यातल्यात्यात समाधानाची गोष्ट इतकीच की हे सर्व बोलत असताना त्यांच्या चेहऱ्यावर स्मित होते. अर्जुनाने कृष्णाला कितीही दु:ख दिलेले असेल तरी कृष्णाने काय त्याची आठवण ठेवली असेल? गोखल्यांनी जरी आम्हाला त्यांची मुळीच सेवा करू दिली नाही हे जरी खरे असले तरी त्यांनी आमच्या सेवाभावनेची आठवण ठेवली. मोम्बासा येथून त्यांनी आम्हाला जे प्रेमळ पत्र लिहिले होते त्यातील शब्द माझ्या अंतःकरणावर कोरले गेले आहेत. आमच्या फार्मवर येऊन त्यांनी खूप त्रास सहन केला. परंतु आम्ही त्यांची जी काही सेवा करू इच्छित होतो ती त्यांनी आम्हाला मुळीच करू दिली नाही. आम्ही खाण्यापिण्याच्या ज्या गोष्टी त्यांच्याकरिता तयार केल्या होत्या त्या खाण्याशिवाय त्यांच्याजवळ दुसरा कोणता उपाय होता?

दुसऱ्या दिवशी सकाळी गोखल्यांनी ना स्वतः आराम केला ना आम्हाला आराम करू दिला. त्यांनी आपल्या त्या सर्व भाषणांमध्ये सुधारणा केली जी आम्ही पुस्तकरूपाने छापणार होतो. त्यांना जेव्हा काही लिहायचे असे तेव्हा इकडेतिकडे फेऱ्या घालत विचार करण्याची त्यांना सवय होती. त्यांना एक लहानसे पत्र लिहायचे होते. मला वाटले की ते ते पत्र ताबडतोब लिहून टाकतील. परंतु असे झाले नाही. यासंबंधी मी जेव्हा त्यांना हटकले तेव्हा मला त्यांचे एक भाषण ऐकायला मिळाले, "माझ्या जीवनपद्धतीची तुला काय कल्पना आहे? लहानात लहान गोष्टही मी घाईगडबडीत करत नाही. तिच्यावर मी विचार करतो. कोणता केंद्रबिंदू आहे ते मी ठरवतो आणि त्यानंतर मी लिहितो. सर्व लोक जर असे करतील तर किती वेळ वाचेल? आणि अर्धवट आणि अपरिपक्व विचारांचे आज जे लोकांवर आक्रमण होत आहे त्यापासून लोक वाचतील."

ज्याप्रमाणे गोखल्यांच्या भेटीच्या वर्णनाशिवाय टॉलस्टॉय फार्मच्या आठवणी अपुऱ्या समजल्या जातील त्याचप्रमाणे कॅलनबॅक यांच्या राहण्यावागण्याच्या वर्णनाशिवायही या आठवणी अपुऱ्या राहतील. या सज्जन आणि निर्मळ अंत:करणाच्या पुरुषाची ओळख मी आधीच करून दिली आहे. टॉलस्टॉय फार्मवर कॅलेनबॅक हे अगदी आमच्यासारखेच होऊन राहिले होते हीच मुळी

आश्चर्याची गोष्ट आहे. सामान्य गोष्टींनी आकर्षित होण्यासारखे गोखले गृहस्थ नव्हते. कॅलनबॅकनी कधीही थंडी वा उकाड्याचा त्रास सहन केलेला नव्हता. खरे सांगायचे तर स्वैर भोग हाच त्यांचा जीवनमार्ग झालेला होता. जगातील वैभव आणि विलास यां ंचा उपभोग घेण्यात त्यांनी कोणतीही उणीव ठेवली नव्हती. आपल्या सुखाकरिता जो काही पैसा मिळवणे आवश्यक असेल तो मिळवण्यात त्यांनी कोणताही कसूर शिल्लक ठेवला नव्हता.

अशा पुरुषाचे टॉलस्टॉय फार्ममध्ये राहणे, झोपणे, उठणेबसणे, फार्मवरील रहिवाशांच्या जीवनाशी एकरूप होणे ही काही सामान्य गोष्ट नव्हती. या गोष्टीमुळे आम्हाला आनंदही झाला होता आणि आश्चर्यही वाटले होते. दुसरीकडे काही गोरे लोक कॅलनबॅक यांना मूर्ख समजत होते. कॅलनबॅक यांची त्याग करण्याची शक्ती पाहून काही गोऱ्यांना त्यांच्याबद्दल आदर वाटू लागला होता. जितका आनंद त्यांनी आपल्या वैभवापासून मिळवला होता तितकाच आनंद त्यांनी आपल्या त्यागातून मिळवला. साधेपणाच्या सुखाचे वर्णन करता करता ते त्यात इतके तल्लीन होत असत की ऐकराणालासुद्धा ते सुख उपभोगण्याची इच्छा व्हावी. लहानमोठ्या सगळ्यांमध्ये ते इतक्या सहजपणे मिसळून जात की त्याचे थोडा वेळ दूर असणेसुद्धा लोकांना जाणवायचे. कॅलनबॅक यांना फळझाडांचा इतका नाद होता की फार्मवरील माळ्याचे काम त्यांनी आपल्याकडे घेऊन टाकले होते. फार्मवरील मुलामुलींकडून आणि मोठ्या माणसांकडून दररोज सकाळी ते बागेचे काम करवून घेत. लोकांना ते भरपूर मेहनत करायला लावायचे. आणि तरीही ते नेहमी हसतखेळत वागत असत. त्यांचा चेहरा इतका आनंदी असायचा की त्यांच्याबरोबर काम करणे सगळ्यांना आवडायचे. रात्री दोन वाजता उठून जेव्हा कोणी जोहानिसबर्गकरिता निघायचा तेव्हा त्याच्याबरोबर कॅलनबॅक नक्कीच असायचे.

त्यांच्याबरोबर माझी धर्मासंबंधी नेहमीच चर्चा होत असे. गप्पा मारण्याकरिता माझ्याजवळ अहिंसा, सत्य आणि इतर यमनियमांची चर्चा यांशिवाय इतर कोणता विषय होता? साप मारणे पाप आहे असे जेव्हा मी पहिल्यांदा म्हणालो तेव्हा इतर गोऱ्यांप्रमाणे कॅलनबॅक यांनाही धक्का बसला. परंतु अखेरीस तात्त्विक दृष्टीने त्यांनी माझा सिद्धांत मान्य केला. आम्हा दोघांच्या

संबंधाच्या सुरुवातीलाच त्यांनी मान्य केले होते की आपली बुद्धी जी गोष्ट स्वीकारते ती गोष्ट आचरणात आणणे चांगले असते, आणि तसे करणे आपले कर्तव्य असते. यामुळे किंचितही मागेपुढे न पाहता ते आपल्या जीवनात फार मोठे परिवर्तन करू शकले होते. आता कॅलनबॅकनी विचार केला की साप मारणे जर पाप असेल तर त्याच्याशी मैत्री करून आपण ती वाढवली पाहिजे. विविध जातीच्या सापांची ओळख पटावी म्हणून सगळ्यात आधी त्यांनी सापासंबंधी अनेक पुस्तके गोळा केली. त्यातून त्यांच्या लक्षात आले की काही सर्प विषारी असतात आणि काही नसतात.तसेच काही सर्प तर शेतीचे रक्षणही करत असतात. आम्हा सर्वांना त्यांनी साप कसा ओळखायचा हे शिकवले, आणि अखेरीस त्यांनी एक मोठा अजगर पाळला. तो त्यांना फार्ममध्येच सापडला होता. कॅलनबॅक नेहमी त्याला हाताने खाऊ घालत असत. सौम्यपणे मी कॅलनबॅकशी युक्तिवाद केला, "हे सर्व करण्यात तुमची भावना मैत्रीची आहे हे जरी खरे असले तरी ती या अजगराला कळू शकत नाही कारण तुमच्या प्रेमात भीती दडलेली आहे. अजगराला मोकळा सोडून त्यांच्याशी लाडाने वागण्याची तुम्हाला वा मला हिंमत होणार नाही. आणि आपण आपल्यामध्ये जी गोष्ट विकसित करू इच्छितो ती ही हिंमतच आहे. यामुळे हा साप पाळण्यामागे मला तुमची सद्भावना दिसते परंतु तिच्यात अहिंसा नाही. आपले काम आणि व्यवहार असा पाहिजे की अजगरालाही ती गोष्ट कळायला पाहिजे. प्राणिमात्र भीती आणि प्रेम ओळखू शकतात हा आपला नेहमीचा अनुभव आहे. याशिवाय हा अजगर विषारी आहे असे तर तुम्ही समजत नाही. याची रीतभात, आणि याच्या सवयी यांचा अभ्यास करण्याकरिता तुम्ही याला कोंडून ठेवले आहे. हुकूमशाही आणि स्वैराचाराचा हा प्रकार आहे. यात मैत्रीकरिता मुळीच वाव नाही."

श्री कॅलनबॅक यांना माझा युक्तिवाद कळला. परंतु तरीही त्या अजगराला ताबडतोब सोडून देण्याची त्यांना इच्छा झाली नाही. मी त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे दडपण तर मुळीच आणले नव्हते. अजगराच्या व्यवहारात मीसुद्धा रस घेत होतो. आणि मुलांच्या आनंदाला तर काहीही सीमा नव्हती. त्याला त्रास देण्याची कोणालाही परवानगी नव्हती. परंतु तो कैदी स्वतःच आपल्या मुक्तीचा मार्ग शोधत होता. एक तर पिंजऱ्याचे दार कोणाकडून तरी चुकून उघडे राहिले वा कोणत्या तरी युक्तीने त्या अजगराने स्वतःच ते उघडले असावे. दोनचार दिवसातच कॅलनबॅक

जेव्हा आपल्या मित्राला भेटायला गेले तेव्हा त्यांना पिंजरा रिकामा दिसला. ते खुश झाले आणि मीही खुश झालो. परंतु या प्रयोगामुळे साप हा आमच्यातील नेहमीकरिता चर्चेचा विषय झाला.

ऑल्ब्रेस्ट नावाच्या एका गरीब जर्मन माणसाला कॅलनबॅक यांनी फार्मवर आणले होते. तो गरीबही होता आणि अपंगही होता. त्याचे इतके कुबड निघाले होते की काडीच्या आधाराशिवाय तो चालूच शकत नव्हता. त्याच्या धैर्याला सीमा नव्हती. शिक्षित असल्यामुळे जीवनाच्या सूक्ष्म प्रश्नांमध्ये त्याला फार रुची होती. टॉलस्टॉय फार्मवर तोही हिंदुस्तानींप्रमाणे सर्वांमध्ये मिळूनमिसळून राहू लागला. न घाबरता तो सापाबरोबर खेळत असे. लहानलहान साप तो आपल्या हाताच्या तळव्यावर घेऊन यायचा आणि त्यांना खेळवायचा. दीर्घ काळ फार्म सुरू राहिला असता तर त्याच्या या प्रयोगांचा काय परिणाम झाला असता हे देवालाच माहीत.

या प्रयोगांमुळे सर्पांबद्दलची आमची भीती कमी झाली हे खरे असले तरी कोणी असे समजू नये की फार्मवर राहणारा कोणीही सापाला भीत नव्हता अथवा साप मारण्याची सर्वांना मनाई होती. एखाद्या विशिष्ट कामात हिंसा आहे असे मानणे ही वेगळी गोष्ट आहे आणि त्यानुसार वागण्याचे धैर्य आणि शक्ती असणे ही वेगळी गोष्ट आहे. ज्याच्या मनात सर्पाची भीती आहे आणि जो स्वतः मरण पत्करायला तयार नाही तो संकट उभे राहिले असता सापाला मारल्याशिवाय राहणार नाही. फार्मवर अशी एक घटना घडल्याचेही मला आठवते. फार्मवर सर्पांचा फार जास्त उपद्रव होता ही गोष्ट वाचकांच्या लक्षात आलेलीच असेल. आम्ही जेव्हा त्या फार्मवर राहायला गेलो होतो तेव्हा तिथे कोणीही राहत नव्हते, आणि काही काळ तो भाग ओसाड अवस्थेतच होता. एकदा कॅलनबॅक यांच्या खोलीत अशा ठिकाणी साप दिसला की जिथून त्याला पळवून लावणे वा पकडणे अशक्य होते. फार्मवरील एका विद्यार्थ्याने त्याला पाहिले होते. आता काय करायचे असे मला बोलावून त्या विद्यार्थ्याने विचारले. त्या विद्यार्थ्याने सापाला मारण्याची मला परवानगी मागितली. माझ्या परवानगीशिवायही तो साप मारू शकला असता. परंतु सामान्यपणे विद्यार्थी वा इतर लोक मला विचारल्याशिवाय असे पाऊल उचलत नसत. सापाला मारण्याची परवानगी देणे माझा धर्म आहे असे मला वाटले आणि मी साप मारण्याची परवानगी दिली. ती परवानगी देऊन मी काही अनुचित

काम केले असे हे लिहीत असतानाही मला वाटत नाही. साप हाताने पकडण्याची अथवा फार्मवासीयांच्या मनातील सापाबद्दलची भीती पूर्णपणे काढून टाकण्याची, त्यांना निर्भय बनवण्याची शक्ती माझ्यात नव्हती आणि आजपर्यंतही मी त्या शक्तीचा विकास करू शकलेलो नाही.

टॉलस्टॉय फार्मवर सत्याग्रहींची भरती ओहोटी सुरूच असायची इतकी कल्पना तर वाचक सहज करू शकतील. कोणते ना कोणते सत्याग्रही तुरुंगात जाणारे असत वा तुरुंगातून सुटून फार्मवर राहण्याकरिता आलेले असत. त्यात दोन सत्याग्रही असेही होते की ज्यांना दंडाधिकाऱ्याने जातमुचलक्यावर सोडले होते आणि शिक्षेकरिता दुसऱ्या दिवशी न्यायालयात हजर राहण्याकरिता सांगितले होते. ते लोक गप्पा मारण्यात गुंग झालेले होते. इतक्यात अखेरच्या ट्रेनची, जी त्यांना पकडायची होती, सुटायची वेळ झाली आणि ती पकडली जाऊ शकते की नाही असा प्रश्न निर्माण झाला. दोघेही सत्याग्रही तरुण होते आणि कसरतीच्या कलेत कुशल होते. त्या दोघांनी आणि त्यांना निरोप देणाऱ्या आम्ही काही लोकांनी स्टेशनकडे धाव घेतली. रस्त्यातच ट्रेन येण्याची शिटी आम्ही ऐकली. ट्रेन रवाना होण्याची वेळ झाली तेव्हा आम्ही स्टेशनबाहेरच्या दारापर्यंत जाऊन पोहोचलो तेव्हा दोन्ही मित्र अजूनच सुसाट वेगाने पळू लागले. मी त्यांच्या मागे राहिलो. ट्रेन रवाना झाली पण त्यांना पळताना पाहून स्टेशन मास्तरने ट्रेन थांबवली आणि त्या दोघांना ट्रेनमध्ये बसवले. स्टेशनवर पोहोचल्यानंतर मी स्टेशन मास्तरचे आभार मानले. या गोष्टीचे वर्णन करताना मी दोन गोष्टींवर प्रकाश टाकला आहे. पहिली गोष्ट म्हणजे सत्याग्रहींची तुरुंगात जाण्याबद्दलची आणि प्रतिज्ञापालनाबद्दलची उत्कंठा. आणि दुसरी गोष्ट म्हणजे स्थानिक अधिकाऱ्यांबरोबरचे सत्याग्रहींचे गोड संबंध. ते दोन्ही तरुण जर ट्रेन पकडू शकले नसते तर दुसऱ्या दिवशी ते न्यायालयात हजर राहू शकले नसते. ना त्यांना कोणी जामीन होते ना न्यायालयाने पैशाच्या स्वरूपात त्यांच्याकडून काही जामीन म्हणून काही रक्कम घेतली होती. केवळ त्यांच्या माणूसकीच्या आधारावरच त्यांना सोडले होते. तुरुंगात जाण्याकरिता सत्याग्रही नेहमी उत्कंठित असतात अशी सत्याग्रहींची ख्याती पसरलेली होती. यामुळेच न्यायालयाच्या अधिकाऱ्यांना त्यांचा जामीन मागण्याची गरज वाटत नसे. यामुळेच त्या तरुण सत्याग्रहींना ट्रेन

चुकण्याची फार भीती वाटत होती आणि म्हणूनच ट्रेन पकडण्याकरिता ते वायूवेगाने धावत गेले होते. असे म्हणता येऊ शकते की सत्याग्रहाच्या सुरुवातीच्या काळात सत्याग्रहींना थोडा त्रास दिला जात असे. असेही म्हणता येऊ शकते की काही ठिकाणी तुरुंगाधिकारी फार कठोर होते. परंतु जसजसा सत्याग्रहाचा लढा पुढे जाऊ लागला तसतसे एकूण पाहता अधिकारी लोक कमी कमी कठोर होऊ लागले आणि काहींच्या वर्तनात तर गोडवाही आला. आणि जिथे सत्याग्रहींचा त्यांच्याशी दीर्घकाळ संपर्क असायचा तिथे वरील स्टेशन मास्तरप्रमाणे ते मदतही करायचे. कोणत्या ना कोणत्या प्रकारची लाच देऊन सत्याग्रही मदत मिळवायचे असा ग्रह वाचकांनी मुळीच करून घेऊ नये. अशा प्रकारचे अनुचित वर्तन करण्याची कल्पना सत्याग्रहींच्या मनातसुद्धा येत नसे. परंतु सौजन्याने केलेल्या मदतीचा उपयोग करण्याची इच्छा कोणाला होणार नाही? आणि अशा सवलती सत्याग्रहींना अनेक ठिकाणी उपलब्ध झाल्या होत्या. स्टेशन मास्तर जर प्रतिकूल असेल तर नियमाच्या मर्यादेत राहत असूनही तो सत्याग्रहींना खूप त्रास देऊ शकतो आणि अशा त्रासाबद्दल तक्रारही करता येत नाही आणि अधिकारी जर अनुकूल असेल तर नियमानुसार वागूनही तो अनेक सवलती देऊ शकतो. अशा अनेक सवलती लॉले स्टेशनच्या स्टेशन मास्तरकडून आम्ही मिळवू शकलो होतो. याचे कारण सत्याग्रहींचे सौजन्य, त्यांचे धैर्य आणि दुःख सहन करण्याची त्यांची शक्ती हेच होत होते.

एका अप्रस्तुत गोष्टी जर इथे उल्लेख केला तर तो अनुचित होणार नाही. मला जवळपास ३५ वर्षांपासून धार्मिक, आर्थिक आणि आरोग्याच्या दृष्टीकोनातून आहारात सुधारणा करण्याचा नाद लागलेला आहे. हा नाद आजसुद्धा कमी झालेला नाही. या प्रयोगाचा प्रभाव माझ्या आजूबाजूच्या लोकांवर पडणे स्वाभाविक होते. आहारातील या प्रयोगांबरोबरच औषधांच्या मदतीशिवाय नैसर्गिक म्हणजे पाण्याच्या आणि मातीच्या उपचाराने रोग दूर करण्याचा प्रयत्नही मी करत आलो आहे. त्या काळात माझ्या अशिलांशी माझे कोटुंबिक संबंध जुळायचे. यामुळे आपल्या सुखदुःखात ते मला सहभागी करून घ्यायचे. माझ्या काही अशिलांना माझ्या आरोग्यविषयक प्रयोगांची माहिती असल्यामुळे ते या बाबतीतही माझी मदत घेत असत. अशी मदत घेणारे लोकही कधीकधी टॉलस्टॉय फार्मवर येऊन धडकायचे. यातील एक होता लुटावन नावाचा म्हातारा

अशील. तो उत्तर हिंदुस्तानातून करारबद्ध मजूर म्हणून दक्षिण आफ्रिकेत आला होता. त्याचे वय ७० पेक्षा जास्त असावे. किती तरी वर्षांपासून त्याला दम्याचा आणि खोकल्याचा त्रास होता. वैद्याच्या पुड्यांचा आणि डॉक्टरच्या बाटल्यांचा त्याने किती तरी अनुभव घेतला होता. त्या वेळी निसर्गोपचारावर माझा असीम विश्वास होता. तू जर माझ्या सर्व अटी कबूल करून फार्मवर राहण्याकरिता तयार असशील तर मी तुझ्यावर माझा प्रयोग करण्याकरिता तयार आहे असे मी त्याला सांगितले. त्याने माझा औषधोपचार मान्य केला असे मी कसा म्हणू? त्या म्हाताऱ्याने माझ्या सर्व अटी कबूल केल्या. लुटावनला तंबाखूचे मोठे व्यसन होते. अनेक अटींमध्ये तंबाखू सोडण्याचीही एक अट होती. लुटावनला मी एक दिवसाचा उपवास करायला लावला. दररोज दुपारी मी त्याला कटिस्नान करायला लावत असे. त्या वेळी उन्हात बसण्यासारखा ऋतू होता. आहारात मी त्याला थोडा भात, थोडे ऑलिव्ह तेल, मध आणि मधाबरोबर कधीकधी खीर आणि गोड नारिंगी अथवा द्राक्षे आणि गव्हाची कॉफी देत असे. मीठ आणि सर्व प्रकारचे मसाले मी बंद केले होते. ज्या घरात मी झोपत होतो त्याच इमारतीतील मागील खोलीत लुटावनचे अंथरुण असायचे. एक अंथरण्याकरिता आणि एक पांघरण्याकरिता असे अंथरूण म्हणून प्रत्येकाला दोन कांबळी दिली जात. शिवाय एक लाकडाची उशी असायची. एका आठवड्याचा काळ लोटला. लुटावनचे शरीर थोडे तेजस्वी दिसू लागले. दमा कमी झाला. खोकलासुद्धा कमी झाला. परंतु दिवसाऐवजी त्याला रात्री दम्याचा आणि खोकल्याचा जास्त त्रास होऊ लागला. तो लपूनछपून तंबाखू ओढत असावा असा संशय मला आला. मी त्याला विचारले. तो म्हणाला, "नाही बुवा, मी तंबाखू ओढत नाही." अजून एकदोन दिवस गेले. परंतु तरीही जेव्हा फरक पडला नाही तेव्हा गुप्तपणे त्याची परीक्षा घेण्याचा निर्णय मी घेतला. सर्व लोक जमिनीवर झोपायचे. साप वगैरेची भीती तर होतीच. यामुळे कॅलनबॅक यांनी मला एक विजेरी दिली होती. ते स्वतःही विजेरी जवळ ठेवत असत. एका रात्री अंथरुणावर पडल्यापडल्या मी जागे राहण्याचे ठरवले. दाराबाहेर ओसरीत माझे अंथरुण असायचे, आणि दाराच्या आत जवळच लुटावनचे अंथरुण असे. लुटावनला मध्यरात्री खोकला आला. आगपेटीची काडी उगाळून त्याने बिडी प्यायला सुरुवात केली. यामुळे मी हळूच त्याच्या अंथरुणाजवळ गेलो आणि विजेरीचे बटन दाबले. लुटावन

घाबरला. परिस्थिती त्याच्या लक्षात आली. बिडी विझवून तो झटकन उठून बसला आणि त्याने माझे पाय धरले. “मी फार मोठा गुन्हा केला, आता मी कधीही तंबाखू ओढणार नाही. मला माफ करा” असे म्हणता असताना लुटावनचा गळा दाटून आला. मी त्याचे सांत्वन करत म्हणालो की बिडी न पिण्यात तुझाच फायदा आहे. माझ्या हिशोबाने आतापर्यंत तुझा खोकला थांबायला पाहिजे होता. तो जेव्हा थांबला नाही तेव्हा तू लपूनछपून बिडी पीत असावा अशी शंका मला आली. लुटावनची बिडी सुटली  बिडी सुटल्याबरोबर त्याचा दमा आणि खोकला दोन्ही कमी होऊ लागले. लुटावन खूप तेजस्वी आणि ताकदवान झाला आणि त्याने आमचा निरोप घेतला.

स्टेशन मास्तरच्या मुलाला, जो अंदाजे दोन वर्षांचा होता, विषमज्वर झाला होता. त्यांनाही निसर्गोपचाराची माहिती होती. यामुळे त्यांनी माझा सल्ला मागितला. त्या मुलाला पहिल्या दिवशी तर खाण्याकरिता मी काहीही दिले नाही. दुसऱ्या दिवसापासून अर्धे केळे कुस्करून आणि त्यात ऑलिव्ह तेल एक चमचा आणि नारिंगीच्या रसाचे काही थेंब टाकून त्याला देऊ लागलो. त्याचे इतर सर्व खाणे मी बंद केले. रात्री त्याच्या पोटावर मातीचा लेप लावलेल्या पट्ट्या ठेवू लागलो. त्याचाही रोग दूर झाला. शक्य आहे की त्या मुलाच्या रोगासंबंधी करण्यात आलेले निदान चुकीचे असेल आणि त्याला विषमज्वर झालेलाच नसेल.

टॉलस्टॉय फार्मवर असे किती तरी प्रयोग मी केले. परंतु एकाही प्रयोगात अपयश आल्याचे मला आठवत नाही. परंतु आज हाच उपचार करण्याचा मला धीर होणार नाही. विषमज्वराच्या रोग्याला केळे आणि ऑलिव्ह तेल देण्याचा धीर मला होणार नाही. माझा हात थरथरू लागेल. १९१८साली हिंदुस्तानात मला जो भयंकर आमांश झाला होता त्याचा उपचारसुद्धा मी करू शकलो नव्हतो. आणि एके काळी दक्षिण आफ्रिकेत जे उपचार ज्या प्रमाणात यशस्वी झाले होते त्याच उपचारांना आज हिंदुस्तानात तितके यश येत नाही. याचे कारण माझ्यातील आत्मविश्वासाची उणीव आहे की येथील वातावरणाशी या उपचारपद्धतीचा मेळ बसत नाही हे आहे ही गोष्ट आजपर्यंत मला कळू शकलेली नाही. इतके मात्र मला माहीत आहे की अशा प्रकारच्या घरगुती उपचारामुळे आणि टॉलस्टॉय फार्मवर अवलंबिण्यात आलेल्या साध्या जीवनशैलीमुळे जास्त जरी नाही तरी समाजाचे

दोनतीन लाख रुपये तरी वाचले असतील. (त्या काळातील - अनुवादक) तसेच टॉलस्टॉय फार्ममुळे तिथे राहणाऱ्या लोकांमध्ये कौटुंबिक भावना निर्माण झाली. सत्याग्रहींना शुद्ध निवाऱ्याचे ठिकाण मिळाले. अप्रामाणिकपणा आणि अहंकार याकरिता कोणत्याही प्रकारचा वाव राहिला नाही आणि खरे आणि खोटे वेगवेगळे झाले.

वरील आठवणींमध्ये आहाराच्या ज्या प्रयोगाचा उल्लेख करण्यात आला आहे तो आरोग्याच्या दृष्टीने करण्यात आला आहे. परंतु टॉलस्टॉय फार्मवरच माझ्यावर मी एक महत्त्वाचा प्रयोग केला होता. तो शुद्ध आध्यात्मिक दृष्टीने करण्यात आला होता.

शाकाहारी म्हणून आपल्याला दूध घेण्याचा अधिकार आहे की नाही या प्रश्नाबद्दल मी खोलवर विचार केला होता आणि त्याबद्दल भरपूर वाचलेही होते. परंतु टॉलस्टॉय फार्मवर राहत असतानाच माझ्या हाती कोणते तरी पुस्तक वा वर्तमानपत्र पडले. त्यात मी वाचले की कलकत्त्यात गायी आणि म्हशी यांच्याबरोबर अतिशय क्रूर व्यवहार करून त्यांच्या स्तनातील दुधाचा एकेक थेंब काढून टाकला जातो. फुंके या निर्दयी आणि भयंकर प्रक्रियेचे करण्यात आलेले वर्णनही मी वाचले होते. दूध घेण्याच्या विषयावर मी कॅलेनबॅक यांच्याशी चर्चा करत होतो. त्या वेळी फुंके पद्धतीविषयी मी त्यांच्याशी चर्चा केली होती आणि दुधाचा त्याग करता आला तर बरे होईल असेही मी त्या वेळी म्हणालो होतो. श्री कॅलेनबॅक अतिशय साहसी पुरुष होते. यामुळे दुधाचा त्याग करण्याचा प्रयोग करण्याकरिता ते एकदम तयार झाले. त्यांना माझे बोलणे फार आवडले. त्याच दिवशी आम्ही दोघांनीही दूध सोडले आणि आम्ही दोघेही सुका मेवा आणि ताज्या फळांवर राहू लागलो. शिजवलेले अन्नही आम्ही सोडले. या प्रयोगाचा शैवट कसा झाला हे सांगण्याचे हे ठिकाण नसले तरी इतके मी नक्कीच सांगेन की केवळ फलाहारावर मी पाच वर्षे राहिलो. आणि तरीही ना मला कोणत्याही प्रकारचा थकवा जाणवला ना मला कोणताही आजार झाला. याशिवाय या काळात माझी कार्यक्षमता पूर्णपणे टिकून होती. ती इतकी की एका दिवसात मी ५५ मैलांचा पायी प्रवास करू शकत असे. ४० मैल चालणे तर माझ्या हातावरील मळासारखी गोष्ट होती. माझा दृढ विश्वास आहे की या प्रयोगाचे चांगले आध्यात्मिक परिणाम झाले. फलाहाराच्या

या प्रयोगाचा काही प्रमाणात मला त्याग करावा लागला याचे मला नेहमीच दु:ख होत राहिले आहे. आणि राजकीय कार्यातून मला जर थोडी मोकळीक मिळाली तर आज या वयातही शारीरिक धोका पत्करून या प्रयोगाचे आध्यात्मिक परिणाम काय होतात हे पाहण्याकरिता मी परत हे प्रयोग करीन. डॉक्टर आणि वैद्य यांच्यातील आध्यात्मिक दृष्टीच्या अभावाचा अडथळासुद्धा माझ्या मार्गात आला असल्याचे सिद्ध झाले आहे.

आता या गोड आणि महत्त्वाच्या आठवणींना पूर्णविराम दिला पाहिजे. असे कठीण प्रयोग आत्मशुद्धीच्या लढाईतच करता येतात. सत्याग्रहाच्या अखेरच्या लढ्याकरिता टॉलस्टॉय फार्म आध्यात्मिक शुद्धी आणि तपश्चर्या यांचे केंद्र झाले होते. असे ठिकाण जर मिळाले नसते वा मिळवण्यात आले नसते तर सत्याग्रहाची लढाई आठ वर्षे चालू शकली असती की नाही, अधिक पैसा मिळू शकला असता की नाही आणि अखेरीस ज्या हिंदुस्तानींनी सत्याग्रहाच्या लढाईत भाग घेतला त्यांनी भाग घेतला असता की नाही याबद्दल मी पूर्णपणे साशंक आहे. टॉलस्टॉय फार्मची जाहीरातबाजी करण्याचा आमचा नियम नव्हता. असे असले तरी जो फार्म दयेकरिता पात्र नव्हता त्याने लोकांच्या मनात दयाभाव जागृत केला. जे काम करण्याची आपली स्वत:ची तयारी नाही आणि जे आपल्याला स्वत:ला त्रासदायक आणि कठीण वाटते ते काम फार्मवासी लोक करून राहिले आहेत असे लोकांना वाटू लागले. १९१३मध्ये जेव्हा परत मोठ्या प्रमाणात लढ्याला सुरुवात झाली तेव्हा लोकांचा हा विश्वासच लढ्याकरिता मोठे भांडवल ठरले. अशा भांडवलापासून होणाऱ्या लाभाचा हिशोब करता येत नाही आणि लाभ केव्हा होतो हेही सांगता येत नाही. परंतु लाभ झाल्याशिवाय राहू शकत नाही याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे, आणि वाचकांनीसुद्धा याबद्दल खात्री बाळगायला हरकत नाही.

# १२. गोखले यांचा दौरा - १

अशा प्रकारे टॉलस्टॉय फार्मवर सत्याग्रही जीवन व्यतीत करत होते आणि नशिबी जे काही लिहिले असेल त्याकरिता तयारी करत होते. लढाई केव्हा संपेल याची त्यांना काहीही कल्पना नव्हती, आणि ना त्याबद्दल त्यांना काही फिकीर होती. त्यांची प्रतिज्ञा एकच होती - काहीही झाले तरी खुनी कायद्याला शरण जायचे नाही आणि त्याकरिता जो काही त्रास सहन करावा लागेल तो प्रसन्नतेने सहन करण्याची तयारी ठेवणे. योद्ध्याकरिता युद्ध करणे हाच विजय असतो कारण त्यातच त्याला आनंद मिळत असतो. युद्ध करणे त्याच्या हातात असल्यामुळे जयापजयाचा, सुखदु:खाचा आधार तो स्वत:च असतो. किंवा असेही म्हणता येऊ शकते की दु:ख आणि पराजयासारखी गोष्ट त्याच्या शब्दकोशातच नसते. गीतेच्या शब्दांत सागांयचे तर सुखदु:ख आणि जयपराजय त्याच्याकरिता समान असतात.

एखाददुसरा सत्याग्रही तुरुंगात जात असायचा. अशी वेळ जेव्हा नसायची तेव्हा बाहेरून फार्मवर सुरू असलेली कामे पाहून तिथे सत्याग्रही राहतात वा तिथे सत्याग्रहाच्या लढाईची तयारी सुरू आहे अशी शंका कोणालाही आली नसती. याशिवाय जेव्हा कोणी नास्तिक वा शंकेखोर माणूस फार्मवर पोहोचायचा तेव्हा तो जर आमचा मित्र असला तर त्याला आमची दया यायची आणि टीकाकार असला तर तो आमची निंदा करायचा. तो म्हणायचा, "तुम्ही लोक आळशी झाला आहा. यामुळे या जंगलात पडल्यापडल्या भाकरी मोडत आहा. तुरुंगात जाऊन तुम्ही थकला आहा. यामुळेच शहराच्या भानगडीतून मुक्त होऊन या सुंदर बागेत तुम्ही नियमित जीवन व्यतीत करून मजेत राहत आहा." सत्याग्रही कधीही अनुचित पद्धितीने नैतिक नियमांचा भंग करून तुरुंगात जात नसतो. आणि सत्याग्रहीच्या शांततेत आणि संयमातच लढाईच्या तयारीचा समावेश असतो हे अशा टीकाकारांना कसे समजावून सांगावे? कुणाकडून आपल्याला मदत मिळेल अशी अपेक्षासुद्धा सत्याग्रही सोडून देत असतो आणि तो केवळ ईश्वराचाच आधार घेत असतो. हे त्याला कोणी समजावून सांगावे? आणि असाच परिणाम झाला. कोणी कल्पनासुद्धा केली नव्हती अशी परिस्थिती निर्माण झाली किंवा ईश्वराने पाठवली असे म्हणता येईल. सत्याग्रहींची अकल्पित

परीक्षा झाली आणि जगाला कळेल असा बाह्य विजयसुद्धा सत्याग्रहींनी मिळवला. तुम्ही स्वतः दक्षिण आफ्रिकेत येऊन येथील परिस्थितीचा अभ्यास करा असे मी गोखले आणि हिंदुस्तानातील इतर नेत्यांना सारखा लिहीत होतो. परंतु कोणी येतो की नाही याबद्दल मी साशंक होतो. कोणत्या तरी हिंदुस्तानी पुढाऱ्याला दक्षिण आफ्रिकेत पाठवण्याकरिता श्री रिच प्रयत्नशील होते. परंतु सत्याग्रहाची लढाई पूर्णपणे मंदावलेली असताना इथे येण्याचे साहस कोण करणार? सन १९११मध्ये गोखले इंग्लंडमध्ये होते. दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्तानींचा हा जो लढा सुरू होता त्याचा अभ्यास त्यांनी केलेलाच होता. हिंदुस्तानच्या केंद्रीय विधिमंडळातही त्यांनी या प्रश्नाची चर्चा केली होती आणि गिरमिट्यांना दक्षिण आफ्रिकेत पाठवणे बंद करावे असा प्रस्तावही त्यांनी मांडला होता (२५ फेब्रुवारी १९१०) आणि तो प्रस्ताव मंजूरही झाला होता. गोखल्यांबरोबर माझा पत्रव्यवहार सुरूच होता. हिंदुस्तानमंत्र्यासोबत या विषयासंबंधी त्यांचा विचारविनिमयसुद्धा सुरू होता आणि दक्षिण आफ्रिकेत जाऊन स्वतः या प्रश्नाचा अभ्यास करण्यासंबंधीही ते हिंदुस्तानमंत्र्याशी बोलले होते. हिंदुस्तानमंत्र्यांना त्यांची ही गोष्ट आवडली होती. दक्षिण आफ्रिकेतील माझ्या प्रवासाचा सहा आठवड्यांचा कार्यक्रम तयार करा असे गोखल्यांनी मला लिहिले होते. आणि दक्षिण आफ्रिका सोडण्याची तारीखही मला कळवली होती. तोपर्यंत एकाही हिंदुस्तानी पुढाऱ्याने दक्षिण आफ्रिकेचा प्रवास केला नव्हता. दक्षिण आफ्रिका तर सोडाच पण हिंदुस्तानबाहेरील एकाही वसाहतीतील हिंदुस्तानींच्या परिस्थितीचा अभ्यास करण्याकरिता तोपर्यंत कोणत्याही पुढाऱ्याने वसाहतींना भेट दिली नव्हती. यामुळे गोखल्यासारख्या महान नेत्याच्या भेटीचे महत्त्व आम्हा सर्वांना कळले. कोणा राजाचाही कधी सन्मान झाला नाही असा गोखल्यांचा सन्मान करायचा असे आम्ही ठरवले. गोखल्यांना दक्षिण आफ्रिकेतील सर्व महत्त्वाच्या शहरात नेण्याचेही आम्ही ठरवले. सत्याग्रही आणि इतर सर्व हिंदुस्तानीसुद्धा प्रसन्नचित्ताने गोखल्यांच्या स्वागताच्या तयारीला लागले. या स्वागताच्या तयारीत सामील होण्याकरिता गोऱ्यांनाही निमंत्रित करण्यात आले आणि जवळपास प्रत्येक ठिकाणी गोरेही त्यात सामील झाले. जिथेजिथे आमसभा असेल तिथेतिथे शक्य असेल तर सामान्यपणे तेथील महापौराला सभेचा अध्यक्ष करायचे आणि सभा टाऊनहॉलमध्ये घ्यायची असेसुद्धा आम्ही ठरवले

होते. रेल्वे विभागाची परवानगी घेऊन प्रमुख स्टेशन सजवण्याची जबाबदारी आम्ही आमच्याकडे घेतली आणि बहुतेक स्टेशन सजवण्याची परवानगीही आम्हाला मिळाली. सामान्यपणे अशी परवानगी दिली जात नसे. परंतु स्वागताच्या आमच्या भव्य तयारीचा प्रभाव सत्ताधाऱ्यांवरही पडला आणि त्यांनी या कामाबद्दल शक्य तितकी सहानुभूती दाखवली. उदाहरणार्थ जोहानिसबर्ग रेल्वे स्टेशन सजवण्याकरिता आम्ही सुंदर चित्रांचे एक दार बनवले होते. त्या दाराचा नकाशा कॅलेनबॅक यांनी तयार केला होता. यामुळे ते रेल्वे स्टेशन सजवण्याकरिता आम्हाला जवळपास १५ दिवस लागले असावे.

दक्षिण आफ्रिका कसा देश आहे याचा अनुभव गोखल्यांना इंग्लंडमध्येच आला होता. हिंदुस्तान मंत्र्यांनी दक्षिण आफ्रिका सरकारला गोखल्यांची प्रतिष्ठा, साम्राज्यातील त्यांचे उच्च स्थान इत्यादी सर्व गोष्टी कळवल्या होत्या. परंतु जहाज कंपनीला तिकिटासंबंधीची गोष्ट वा गोखल्यांकरिता एक केबिन राखून ठेवण्याची गोष्ट कोणाला सुचावी? गोखल्यांची प्रकृती नाजूक असायची. यामुळे त्यांना आरामशीर केबिनची वा एकांताची गरज होती. परंतु अशी एकही केबिन रिकामी नसल्याचे कंपनीकडून स्पष्ट उत्तर मिळाले. इंडिया ऑफिसला यासंबंधीची माहिती स्वतः गोखल्यांनी कळवली की त्यांच्या एखाद्या मित्राने हे आता मला आठवत नाही. इंडिया ऑफिसकडून कंपनीच्या निदेशकाला (डिरेक्टर) पत्र गेले. परिणामी जिथे एकही खोली उपलब्ध नव्हती तिथे चांगल्यात चांगली केबीन उपलब्ध झाली! सुरुवातीच्या या कटू अनुभवाचे फळ अखेरीस गोड मिळाले. गोखल्यांचे सुंदर स्वागत करण्यासंबंधीही जहाजाच्या कप्तानाकडे शिफारस करण्यात आली. यामुळे गोखल्यांचे समुद्रप्रवासाचे दिवस आनंदात आणि शांततेत गेले. गोखले जितके गंभीर होते तितकेच आनंदी आणि विनोदीही होते. जहाजावरील खेळांमध्ये ते बराच भाग घ्यायचे आणि प्रवासामध्ये ते फार लोकप्रिय झाले होते. संघ सरकारने त्यांच्यासमोर आपले पाहुणे होण्याचा आणि सरकारतर्फे रेल्वे सलूनचा स्वीकार करण्यासंबंधीचा प्रस्ताव ठेवला होता. माझ्याबरोबर सल्लामसलत करून त्यांनी स्टेट सलून आणि प्रिटोरिया येथे अतिथीसत्कार स्वीकारण्याचा प्रस्ताव मान्य केला.

२२ ऑक्टोबर १९१२ला गोखले केप टाऊन बंदरात उतरले. माझ्या अपेक्षेपेक्षा त्यांची प्रकृती किती तरी नाजूक होती. ते विशिष्ट पद्धतीचाच आहार घेऊ शकत होते आणि फार परिश्रम घेण्यासारखी त्यांची प्रकृती नव्हती. मी तयार केलेला कार्यक्रम त्यांच्याकरिता शक्य नव्हता. यामुळे मी त्यात शक्य तितका बदल केला. जर बदल करणे शक्य नसेल तर प्रकृतीचा धोका पत्करूनही आहे तसा कार्यक्रम पार पाडण्याची त्यांची तयारी होती. त्यांना विचारल्याशिवाय मी जो इतका भरगच्च कार्यक्रम आखला होता त्याबद्दल मला फार पश्चात्ताप झाला. त्यात नंतर मी जरी काही परिवर्तन केले तरी बहुतांश कार्यक्रम जसाच्या तसाच ठेवावा लागला होता. गोखल्यांना पूर्ण एकांत मिळण्याची गरज आहे हे माझ्या लक्षातच आले नव्हते. असा एकांत मिळवून देण्याकरिता फार मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. परंतु सत्याकरिता नम्रपणाने मी इतके सांगितलेच पाहिजे की आजाऱ्यांची आणि गुरुजनांची सेवा करण्याचा अभ्यास आणि छंद असल्यामुळे, तसेच माझा मूर्खपणाची जाणीव झाल्यानंतर कार्यक्रमात आवश्यक सुधारणा करून मी गोखल्यांना पुरेशी शांतता आणि एकांत मिळवून देऊ शकलो होतो. संपूर्ण दौऱ्यात त्यांच्या सचिवाचे काम मीच केले होते. अर्ध्या रात्री प्रतिसाद देतील असे स्वयंसेवक तयार होते. यामुळे सेवकांच्या उणिवेमुळे गोखल्यांना काही त्रास वा गैरसोय सहन करावी लागली असेल असे मला वाटत नाही. या स्वयंसेवकांमध्ये कॅलनबॅकही एक होते.

केप टाऊनमध्ये चांगल्यात चांगली सभा व्हायला पाहिजे इतकी गोष्ट आमच्या मनात स्पष्ट होती. श्राईनर परिवारासंबंधी मी पहिल्या खंडात लिहिलेच आहे. त्या परिवारातील मुख्य पुरुष श्री डब्ल्यू. पी. श्राईनर यांना सभेचे अध्यक्षपद स्वीकारण्याची मी विनंती केली. ती त्यांनी मान्य केली. सभा विशाल झाली. सभेत फार मोठ्या संख्येत हिंदुस्तानी आणि गोरे आले होते. श्री श्राईनर यांनी गोड शब्दांत श्री गोखले यांचे स्वागत केले आणि दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींबद्दलची सहानुभूती व्यक्त केली. श्री गोखले यांचे भाषण परिपक्व, विचारांनी भरलेले, दृढ आणि विनयपूर्ण होते. यामुळे हिंदुस्तानी जनता खुश झाली. आपल्या भाषणांनी गोखल्यांनी गोऱ्यांची मने जिंकून घेतली. यामुळे असे म्हणता येऊ शकते की ज्या दिवशी गोखल्यांनी दक्षिण आफ्रिकेत प्रवेश केला त्याच दिवशी त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील विविध वर्गातील लोकांच्या हृदयातही प्रवेश केला.

केप टाऊन येथून गोखलेंना जोहानिसबर्ग येथे जायचे होते. दोन दिवसांचा रेल्वेचा प्रवास होता. सत्याग्रहाच्या लढाईचे कुरुक्षेत्र ट्रान्सवाल होते. केप टाऊनहून जोहानिसबर्गला जात असताना ट्रान्सवालच्या सीमेवर मोठे स्टेशन क्लार्क्सडॉर्प लागते. तिथे हिंदुस्तानींची संख्याही बरीच मोठी होती. क्लार्क्सडॉर्प येथे आणि जोहानिसबर्गला पोहोचण्यापूर्वी मार्गात लागणाऱ्या इतर शहरांमध्ये पोचेफस्ट्रूम,आणि क्रुगर्सडॉर्प लागतात आणि तिथे गोखलेंना थांबायचे होते आणि सभेत उपस्थित राहायचे होते. यामुळे क्लार्क्सडॉर्प येथे त्यांच्याकरिता खास रेल्वे करण्यात आली होती. सर्व शहरांमध्ये तेथील महापौर अध्यक्षपदी होते. कोणत्याही स्टेशनवर रेल्वे एका तासापेक्षा जास्त थांबली नाही. आमची ट्रेन जोहानिसबर्गला ठरलेल्या वेळी पोहोचली. एका मिनिटाचाही विलंब झाला नाही. स्टेशनवर विशिष्ट प्रकारचे गालीचे अंथरलेले होते. एक व्यासपीठही तयार करण्यात आले होते. जोहानिसबर्गचे महापौर श्री एलिस आणि नागरिकही तिथे उपस्थित होते. गोखलेंच्या मुक्कामाच्या काळात महापौरांनी आपली गाडी गोखल्यांना उपयोगाकरिता दिली होती. स्टेशनवरच गोखल्यांना मानपत्र देण्यात आले. जोहानिसबर्ग येथील मानपत्र तेथील खाणीतून निघालेल्या हृदयाच्या आकाराच्या सोन्याच्या तबकडीवर कोरलेले होते. ही तबकडी दक्षिण आफ्रिकेतील विशेष लाकडावर (ऱ्होडेशियन टीक) जडवण्यात आलेली होती. लाकडावर ताजमहालचे आणि इतर ठिकाणांचे दृश्य कोरलेले होते. सर्वांना गोखल्यांची ओळख करून देणे, मानपत्र वाचणे, आणि त्याचे उत्तर देणे ही सर्व कामे २० मिनिटात पूर्ण करण्यात येत असत. मानपत्र इतके लहान होते की ते वाचण्याकरिता पाच मिनिटांपेक्षा जास्त वेळ लागला नाही. गोखल्यांचे उत्तरही पाच मिनिटांपेक्षा जास्त लांब राहिले नसावे. स्वयंसेवकांनी इतकी चांगली व्यवस्था केली होती की फलाटावर अपेक्षेपेक्षा जास्त लोक आले नव्हते. नाममात्रही गोंगाट नव्हता. बाहेर लोकांची मोठी गर्दी गोळा झाली होती. परंतु कोणालाही जाण्यायेण्याचा त्रास झाला नाही.

गोखल्यांची राहण्याची व्यवस्था जोहानिसबर्गपासून पाच मैल अंतरावरच्या टेकडीवर कलनबॅक यांचा जो सुंदर बंगला होता त्यात करण्यात आली होती. तेथील दृश्य भव्य आणि सुंदर होते. तेथील शांतता आनंददायी होती आणि तो बंगला साधा असूनही कलापूर्ण होता. गोखल्यांना तो

फार आवडला. सर्वांना भेटण्याची व्यवस्था शहरात करण्यात आली होती. याकरिता शहरात एक विशेष कार्यालय भाड्याने घेण्यात आले होते. गोखल्यांच्या आरामाकरिता तिथे एक खास खोली राखून ठेवण्यात आली होती. दुसरी खोली भेटायला येणारांच्या भेटीकरिता होती. जोहानिसबर्ग येथील काही प्रसिद्ध आणि प्रतिष्ठित नागरिकांची वैयक्तिक भेट घेण्याकरिता आम्ही गोखल्यांना घेऊन गेलो होतो. गोखल्यांना तेथील गोऱ्यांच्या पूर्ण दृष्टिकोनाची कल्पना यावी म्हणून तेथील गोऱ्यांची एक खाजगी सभाही घेण्यात आली होती. याशिवाय जोहानिसबर्ग येथे त्यांच्या सन्मानाकरिता एक मोठा भोजनसमारंभही ठेवण्यात आला होता. त्यात ४०० लोकांना निमंत्रित करण्यात आले होते. निमंत्रितांमध्ये जवळपास दीडशे गोरे असावे. हिंदुस्तानी लोक समारंभात तिकिट घेऊनच येऊ शकत होते. एका तिकिटाची किंमत एक गिन्नी ठेवण्यात आली होती. या तिकिटांपासून मिळालेल्या पैशातूनच भोजनखर्च भरून निघाला होता. भोजन निरामिष होते, मद्यापानविरहित होते, आणि स्वयंसेवकांनी स्वतः बनवलेले होते. या सर्व गोष्टींचे इथे शब्दांत वर्णन करणे कठीण आहे. दक्षिण आफ्रिकेतील हिंदू शिवाशिव मानत नाहीत. ते एकत्र बसून जेवतात. शाकाहारी हिंदू आपला शाकाहार जपतात. हिंदुस्तानींमध्ये काही ख्रिश्चनही होते. त्याच्याशीसुद्धा इतर हिंदुस्तानींप्रमाणेच माझा गाढ परिचय होता. हे ख्रिश्चन बहुधा गिरमिट्या आईवडिलांची संतती असतात, आणि त्यांच्यातील अनेक हॉटेलमध्ये स्वयंपाक्याचे वा वाढप्याचे काम करत असतात. त्या लोकांच्या मदतीनेच इतक्या सगळ्या लोकांचा स्वयंपाक करण्यात आला होता. मेजवानीकरिता जवळपास १५ पदार्थ बनवण्यात आले असावे. दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांकरिता हा एक नवीन आणि आश्चर्यजनक अनुभव होता. इतक्या सगळ्या हिंदुस्तानींनी एका पंगतीत जेवणाकरिता एकत्रित बसणे, निरामिष जेवण करणे, मद्यपानाशिवाय भागवणे या तिन्ही गोष्टी बहुतेक गोऱ्यांकरिता अगदी नवीन होत्या. आणि अखेरचे दोन अनुभव तर सर्वांकरिता नवीन होते.

या सभेत गोखल्यांनी केलेले भाषण सर्वात लांब आणि सर्वात महत्त्वपूर्ण होते. ते पूर्ण ४५ मिनिट बोलले. त्या भाषणाकरिता गोखल्यांनी आमची चांगलीच परीक्षा घेतली होती. ते मला म्हणाले की स्थानिक लोकांच्या दृष्टिकोनाकडे दुर्लक्ष न करणे, आणि शक्य तोपर्यंत त्यांच्या दृष्टिकोनाशी

जुळवून घेणे हा माझा जन्मभराचा नियम राहिला आहे. यामुळे मी भाषणात काय सांगितले पाहिजे असे तुम्हाला वाटते ते तुम्ही मला लिहून दिले पाहिजे, आणि त्यांनी अशी अट घातली की "त्यातील एकाही वाक्याचा मी"माझ्या भाषणात जरी उपयोग केला नाही तरी तुम्हाला वाईट वाटायला नको." याशिवाय त्यांचे असेही म्हणणे होते की त्यांच्याकरिता मी तयार केलेल्या भाषणाचा मसुदा फार लांबही असायला नको आणि फार संक्षिप्तही असायला नको. या सर्व गोष्टींचे पालन करून मला गोखल्यांच्या भाषणांकरिता टिपणे लिहावी लागत असत. त्यांनी माझ्या भाषेचा मुळीच उपयोग केला नाही हे मी सांगितलेच पाहिजे. आणि इंग्रजी भाषेत पारंगत गोखले आपल्या भाषणात माझ्या भाषेचा उपयोग करतील अशी अपेक्षासुद्धा मी कसा काय करू शकत होतो? आपल्या भाषणात माझ्या विचारांचा उपयोग केला असेही मी म्हणू शकत नाही. परंतु माझ्या विचारांची उपयोगिता त्यांनी मान्य केली होती. यावरून मी असे समजतो की त्यांनी माझ्या विचारांचा कोणत्या ना कोणत्या स्वरूपात उपयोग केला असावा. परंतु त्यांची विचारसरणी अशा काही प्रकारची होती की तिच्यात त्यांनी माझ्या विचारांना कुठे स्थान दिले वा दिले नाही हे कळूच शकत नव्हते. गोखल्यांच्या सर्व भाषणांच्या वेळी मी हजर होतो. परंतु मला असा एकही प्रसंग आठवत नाही की जेव्हा त्यांनी एखादा विशिष्ट विचार व्यक्त केला नसता तर वा एखादे विशिष्ट विशेषण वापरले नसते तर बरे झाले असते असे मला वाटले असावे. त्यांच्या विचारातील स्पष्टपणा, दृढता, विनय इत्यादींचे श्रेय त्यांच्या आत्यंतिक परिश्रमाकडे आणि सत्यपरायणतेकडे जाते.

जोहानिसबर्ग येथे केवळ हिंदुस्तानींची सभा होणे आवश्यक होते. एक तर आपण मातृभाषेत बोललो पाहिजे असा माझा नेहमीच आग्रह असायचा. या आग्रहामुळे दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानी लोकांशी माझे जवळचे संबंध निर्माण झाले होते. यामुळेच हिंदुस्तानींसमोर गोखले जर हिंदुस्तानीत बोलतील तर बरे होईल असे मला वाटले. या बाबतीतील गोखल्यांचे विचार मला माहीत होते. मोडक्यातोडक्या हिंदीतून तर ते आपले काम चालवूच शकत नव्हते. यामुळे त्यांना एक तर मराठीतून बोलणे आवडले असते अथवा इंग्रजीतून. दक्षिण आफ्रिकेत मराठीत बोलणे कृत्रिमपणाचे होईल असे त्यांना वाटत होते. आणि जरी ते मराठीत बोलले असते तरी त्याचा

गुजराती लोकांकरिता वा उत्तर हिंदुस्तानींकरिता हिंदुस्तानीत अनुवाद करावाच लागला असता. सुदैवाने माझ्याजवळ एक असा युक्तिवाद होता की ज्यामुळे त्यांनी मराठीत बोलणे कबूल केले. जोहानिसबर्गमध्ये कोकणातील बरेच मुसलमान होते. थोडे महाराष्ट्रीय हिंदूही होते. त्या सर्वांना गोखल्यांचे मराठी भाषण ऐकण्याची खूप इच्छा होती. गोखल्यांना मराठीत बोलण्याची विनंती करा असे त्यांनी मला सांगून ठेवले होते. मी गोखल्यांना म्हणालो, "तुम्ही मराठीत बोलला तर ते लोक खुश होतील. तुमच्या मराठीचा मी हिंदुस्तानीत अनुवाद करीन." माझे बोलणे ऐकून ते खळखळून हसले. ते म्हणाले, "तुमच्या हिंदुस्तानीच्या ज्ञानाची मला चांगली माहिती आहे. ती हिंदुस्तानी तुम्हालाच लखलाभ होवो. आता तुम्ही माझ्या मराठीचा हिंदुस्तानीत अनुवाद करू इच्छिता. इतकी मराठी तुम्ही कुठे शिकला हे तर सांगा?" मी म्हणालो, "जे तुम्ही माझ्या हिंदुस्तानीबद्दल म्हणाला तेच मराठीबद्दलही समजा. मला एक शब्दसुद्धा मराठी बोलता येत नाही. परंतु ज्या विषयाचे मला ज्ञान आहे त्या विषयासंबंधी जर तुम्ही मराठीत बोलाल तर तुमचा भावार्थ मला नक्कीच समजेल. लोकांसमोर त्याचा अनर्थ तर मी नक्कीच करणार नाही हे तुमच्या लक्षात येईल. मराठी येणाऱ्या इतर लोकांवर मी तुमच्या भाषणाचा मराठी अनुवाद करण्याचे काम नक्कीच सोपवू शकतो. परंतु तुम्हाला तो पसंत पडणार नाही. यामुळे माझ्या अनुवादावर काम भागवा आणि मराठीतच बोला. कोकणी आणि मराठी बांधवांप्रमणेच मीसुद्धा तुमचे मराठी भाषण ऐकण्याकरिता उत्सुक आहे."

"तुम्ही नेहमी तुमच्या मनाप्रमाणेच कराल. इथे तुमच्या आश्रयाला येऊन पडलो आहे. यामुळे मराठीत बोलल्याशिवाय काही उपाय नाही" असे म्हणून त्यांनी मला खुश केले. त्यानंतर अशा सभांमध्ये थेट झांजीबारपर्यंत ते मराठीतच बोलले आणि मी त्यांचा खास नेमलेला अनुवादक झालो. शक्य तोपर्यंत मातृभाषेतच बोलणे आणि व्याकरणशुद्ध इंग्रजीत बोलण्यापेक्षा मोडक्यातोडक्या हिंदुस्तानीत बोलणे अधिक चांगले आहे ही गोष्ट मी गोखल्यांच्या गळी उतरवू शकलो की नाही मला माहीत नाही. परंतु इतके मात्र मला नक्कीच माहीत आहे की केवळ मला खुश करण्याकरिताच ते दक्षिण आफ्रिकेत मराठीत बोलले होते. बोलल्यानंतर त्याचा जो परिणाम झाला तो त्यांना आवडला हे माझ्या निदर्शनास आले. जिथे तत्त्वांचा प्रश्न नसेल तिथे सेवकाला

खुश करणे चांगली गोष्ट असते हे गोखल्यांनी मला दक्षिण आफ्रिकेत आपल्या उदाहरणाने अनेक प्रसंगी शिकवले.

# १३. गोखले यांचा दौरा - २

जोहानिसबर्गहून आम्हाला प्रिटोरिया येथे जायचे होते. प्रिटोरियात संघ सरकारतर्फे पाहुणे होण्याकरिता गोखल्यांना निमंत्रण मिळाले होते. त्यानुसार गोखल्यांना ट्रान्सवाल हॉटेलमध्ये थांबायचे होते. तिथे त्यांची भेट संघ सरकारच्या मंत्रिमंडळाशी होणार होती. त्यात जनरल बोथा आणि जनरल स्मट्स हेही होते. आधीच सांगितल्याप्रमाणे मी तयार केलेल्या दररोजच्या कार्यक्रमाची माहिती एक तर त्याच सकाळी मी गोखल्यांना देत असे वा त्यांनी विचारलेच तर आदल्या दिवशी मी ती त्यांना सांगत असे. मंत्रिंमंडळाच्या भेटीचा कार्यक्रम फार जबाबदारीचा होता. मी गोखल्यांबरोबर जाऊ नये आणि जाण्याचा प्रस्तावही ठेवू नये असे आम्हा लोकांचे आधीच ठरले होते. माझ्या उपस्थितीमुळे मंत्रिमंडळ आणि गोखले यांच्यामधील चर्चेत काही प्रमाणात अडथळा निर्माण झाला असता. मंत्रिमंडळाला जर स्थानिक हिंदुस्तानींची वा माझी चूक आहे असे वाटत अलेल तर ती चूक ते सांगू शकले नसते. तसेच आपल्या भावी धोरणाबद्दल त्यांना गोखल्यांशी काही चर्चा करायची असती तर तीही ते मोकळेपणाने करू शकले नसते. गोखल्यांकडून वस्तुस्थितीसंबंधी काही चूक झाली वा मंत्रिमंडळाने काही नवीन तथ्य गोखल्यासमोर ठेवले आणि गोखल्यांजवळ त्याचे उत्तर नसले आणि हिंदुस्तानींतर्फे त्याला उत्तर देणे आवश्यक असले तर माझ्या अथवा दक्षिण आफ्रिकेतील कोणत्याही जबाबदार नेत्याच्या अनुपस्थितीत काय करावे ही समस्या होतीच. परंतु गोखल्यांनी लगेच या समस्येवरील उपाय शोधून काढला. ते मला म्हणाले की दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींच्या सुरुवातीपासून तर आतापर्यंतच्या परिस्थितीचा एक गोषवारा तुम्ही तयार करा. हिंदुस्तानींची कोणत्या सीमेपर्यंत जाण्याची तयारी आहे हेसुद्धा त्यात तुम्ही लिहा. आणि याबाहेरील कोणतीही गोष्ट निघाली तर मी माझे अज्ञान मान्य करीन असेही ते म्हणाले. गोखल्यांनी हा निर्णय घेतला आणि तो घेतल्यानंतर ते निश्चिंत झाले. आणि आता असा गोषवारा तयार करण्याचे आणि तो वाचण्याचे एवढेच काम शिल्लक राहिले होते. मी कितीही संक्षेपात लिहिले तरी चार वसाहतींचा अठरा वर्षांचा इतिहास १०-२० पानात लिहिल्याशिवाय मी कसा देऊ शकलो असतो? आणि तो वाचल्यानंतर

गोखल्यांच्या मनात काही प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक होते. परंतु गोखल्यांची स्मरणशक्ती जितकी तीव्र होती तितकीच त्यांची मेहनत घेण्याची शक्तीही अगाध होती. ते रात्रभर जागे राहिले आणि मला आणि पोलाकलाही त्यांनी जागे ठेवले. त्यांनी एकेका मुद्द्याची संपूर्ण माहिती करून घेतली. आणि प्रत्येक गोष्टीसंबंधीचे विचार माझ्यासमोर मांडून प्रत्येक गोष्ट आपल्याला नीट कळली आहे की नाही हेसुद्धा त्यांनी पडताळून पाहिले. अखेरीस त्यांचे समाधान झाले. मीही निश्चिंत झालो.

गोखल्यांनी दोन तास वा त्याहून जास्त वेळ संघ सरकारच्या मंत्रिमंडळाशी चर्चा केली. तिथून परतल्यानंतर ते म्हणाले, "तुम्हाला एक महिन्यात हिंदुस्तानात परतायचे आहे. सर्व गोष्टींचा निर्णय झालेला आहे. खुनी कायदा रद्द होईल. आप्रवासी (इमिग्रेशन) कायद्यातील रंगभेद दूर केला जाईल. तीन पौंडांचा कर रद्द होईल." मी म्हणालो, "मला शंका आहे. मंत्रिमंडळाला मी जितका ओळखतो तितके तुम्ही ओळखत नाही. तुमचा हा आशावाद मला आवडला कारण मी स्वतःही आशावादी आहे. परंतु अनेकदा निराशा पदरी पडलेली असल्यामुळे मी तुमच्याइतका आशावादी राहू शकत नाही. परंतु मला भीती वाटत नाही. मंत्रिमंडळाकडून तुम्ही वचन आणले इतके माझ्याकरिता पुरेसे आहे. माझे कर्तव्य तर आवश्यकता निर्माण झाल्यानंतर सरकारशी लढाई करणे आणि ती लढाई न्यायाची आहे हे सिद्ध करणे आहे. या सिद्धीकरिता तुम्हाला देण्यात आलेल्या वचनाची फार मदत होईल. आणि लढावे जरी लागले तरी या वचनामुळे आमच्यात दुप्पट जोम निर्माण होईल. परंतु भरपूर हिंदुस्तानी तुरुंगात गेल्याशिवाय मला परतता येईल असे मला वाटत नाही."

यावर गोखले म्हणाले, "मी जे काही सांगतो आहे त्यात काहीही फरक पडणार नाही. खुनी कायदा रद्द करण्यात येईल आणि तीन पौंड कर रद्द केला जाईल असे जनरल बोथा यांनी मला वचन दिले.आहे. तुम्हाला बारा महिन्यांच्या आत हिंदुस्तानात परतावेच लागेल. तुमचे एकसुद्धा निमित्त मी ऐकणार नाही."

ट्रान्सवालहून गोखले डरबन, मारित्झबर्ग इत्यादी शहरात गेले. तिथेही त्यांनी अनेक गोऱ्यांच्या भेटी घेतल्या. किंबर्ली येथील हिऱ्यांच्या खाणीही त्यांनी पाहिल्या. जोहानिसबर्गप्रमाणेच किंबर्ली आणि डरबन येथील स्वागत समित्यांनीही मेजवान्यांचे आयोजन केले होते. त्यात बरेच गोरे उपस्थित होते. अशा प्रकारे हिंदुस्तानींची आणि गोऱ्यांची अंतःकरणे जिंकून गोखल्यांनी १७ नोव्हेंबर १९१२ला दक्षिण आफ्रिकेचा किनारा सोडला. त्यांच्या इच्छेप्रमाणे मी आणि कॅलेनबॅक त्यांना सोडायला झाजीबारपर्यंत गेलो होतो. त्यांच्या प्रकृतीला झेपेल अशा आहाराची जहाजात आम्ही व्यवस्था केली होती. मार्गात डेलोगआ बे, इन्हामबेन, झांजीबार वगैरे बंदरांवर त्यांचा फार मोठा सत्कार करण्यात आला होता. जहाजात हिंदुस्तान आणि हिंदुस्तानबद्दलचे आमचे कर्तव्य याबद्दलच आमचे बोलणे होत असे. गोखल्यांच्या प्रत्येक गोष्टीतून आणि शब्दातून त्यांच्या मृदू भावनेचे, सत्यपरायणतेचे आणि देशाभिमानाचे दर्शन व्हायचे. जहाजावर ते जो खेळ खेळायचे त्या खेळातूनही हिंदुस्तानच्या सेवेची भावना जास्त असल्याचे मला आढळून आले होते. खेळातसुद्धा परिपूर्णता प्राप्त करण्याचेच त्यांचे ध्येय असायचे.

शांतपणे गप्पा करण्याकरिता जहाजावर आम्हाला खूप वेळ मिळायचा. त्या गप्पांमधून गोखल्यांनी मला हिंदुस्तानकरिता तयार केले होते. हिंदुस्तानातील प्रत्येक पुढाऱ्याच्या चारित्र्याचे विश्लेषण त्यांनी माझ्याजवळ केले होते. हे विश्लेषण इतके यथार्थ होते की त्या नेत्यांबद्दल पुढे मला जे अनुभव आले त्यात आणि गोखल्यांनी केलेल्या विश्लेषण यांत क्वचितच काही अंतर मला आढळले असावे.

गोखल्यांच्या दक्षिण आफ्रिकेच्या प्रवासात त्यांच्याबरोबर असतानाच्या अशा किती तरी पवित्र आठवणी आहेत की ज्या मी इथे सांगू शकतो. परंतु सत्याग्रहाच्या इतिहासाशी त्यांचा संबंध नसल्यामुळे माझ्या लेखणीला मला अडवावे लागले आहे. झांजीबारमध्ये गोखल्यांशी आमची म्हणजे माझी आणि कॅलेनबॅकची जी ताटातूट झाली ती आम्हा दोघांकरिताही क्लेशकारक होती, परंतु देहधारीचे कितीही जवळचे संबंध असले तरी त्याचा एक दिवस अंत हा होतच असतो असे समजून आम्ही स्वतःची समजूत घातली. तसेच एक वर्षांच्या आत आम्हा दोघांनाही हिंदुस्तानात

जायला मिळेल ही गोखल्यांची भविष्यवाणी खरी ठरेल अशी आशाही आम्ही बाळगून होतो. परंतु हे शक्य झाले नाही.

असे असले तरी गोखल्यांच्या दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्याने आमचा निर्धार अजून बळकट झाला आणि समाजाचा लढा जेव्हा परत तीव्र स्वरूपात सुरू झाला त्या वेळी या दौऱ्याचे महत्त्व आणि त्याची आवश्यकता या गोष्टीचे आम्हाला अधिकाधिक आकलन होऊ लागले. गोखल्यांनी जर दक्षिण आफ्रिकेचा दौरा केला नसता आणि संघ सरकारच्या मंत्रिमंडळाची जर त्यांनी भेट घेतली नसती तर तीन पौंड कराला आम्ही लढाईचा मुद्दा बनवूच शकलो नसतो. खुनी कायदा रद्द झाल्यामुळे सत्याग्रहाची लढाई जर बंद झाली असती तरी तीन पौंड कराकरिता आम्हाला नवीन सत्याग्रह करावा लागला असता आणि परिणामी समाजाला अजून यातना सहन कराव्या लागल्या असत्या. एवढेच नाही तर याकरिता लोक परत तयार झाले असते की नाही याबद्दलही शंका आहे. तीन पौंड कर रद्द करायला लावणे हिंदुस्तानींचे कर्तव्य होते. तो रद्द करायला लावण्याकरिता अर्ज करणे, प्रतिनिधिमंडळ पाठवणे आणि सर्व कायदेशीर उपाययोजना करणे इत्यादी सर्व उपायांचा अवलंब करण्यात आलेला होता. अगदी १८८५पासून लोक हा कर देत होते. परंतु दीर्घकाळापासून लोक जर एखादा भयंकराहून भयंकर त्रास सहन करत असतील तर लोकांना त्याची सवय होऊन जाते आणि मग त्याचा विरोध करणे आपले कर्तव्य आहे ही गोष्ट समजणे लोकांकरिता कठीण होते. त्यानंतर त्याची भयानकता जगाला पटवून देणेसुद्धा कठीण होते. गोखल्यांना मंत्रिमंडळाने दिलेल्या वचनामुळे सत्याग्रहींचा मार्ग मोकळा झाला होता. आता एक तर मंत्रिमंडळाने दिलेल्या वचनाप्रमाणे तीन पौंड कर रद्द करणे आवश्यक होते आणि तो रद्द केला नाही तर सरकारचे हे शब्द फिरवणेच सत्याग्रह करण्याचे कारण होऊ शकले असते, आणि असेच झालेही. सरकारने एक वर्षाच्या आत तीन पौंड कर रद्द तर केला नाहीच उलट हा कर रद्द करता येऊच शकत नाही अशी घोषणाही केली.

अशा प्रकारे गोखल्यांच्या दौऱ्याने सत्याग्रहाद्वारे तीन पौंड रद्द करायला लावण्यात आम्हाला मदत झाली. इतकेच नाही तर या दौऱ्यामुळे दक्षिण आफ्रिकेतील प्रश्नासंबंधी गोखले तज्ज्ञ समजले

जाऊ लागले. दक्षिण आफ्रिकेसंबंधी त्यांनी उच्चारलेल्या शब्दाचे महत्त्वही वाढले. दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या हिंदुस्तानीसंबंधी काय करणे आवश्यक आहे ही गोष्ट त्यांना अधिक चांगली कळू शकली आणि ही गोष्ट हिंदुस्तानातील जनतेलाही समजावून सांगण्याची त्यांची क्षमता वाढली. समाजाचा लढा जेव्हा परत सुरू झाला तेव्हा हिंदुस्तानातून पैशाचा वर्षाव झाला आणि लॉर्ड हार्डिंग्ज यांनी सत्याग्रहींबद्दल सहानुभूती दाखवून त्यांना प्रोत्साहन दिले (डिसेंबर १९१३). श्री ॲन्ड्र्यूज आणि श्री पिअर्सन दक्षिण आफ्रिकेत आले. गोखल्यांच्या दौऱ्याशिवाय हे सगळे शक्य झाले नसते.

सरकारने कसा वचनभंग केला आणि त्यानंतर काय झाले हे पुढील प्रकरणात सांगितले जाईल.

# १४. वचनभंग

दक्षिण आफ्रिकेच्या सत्याग्रहाच्या लढाईत इतके काळजीपूर्वक काम करण्यात आले की प्रचलित नीतीविरोधी तिच्यात एकसुद्धा पाऊल उचलण्यात आले नव्हते. इतकेच नाही तर अनुचित मार्गाने सरकारला त्राससुद्धा दिला जाऊ शकत नाही या गोष्टीकडे लक्ष ठेवले जाई. उदाहरणार्थ खुनी कायदा केवळ ट्रान्सवालमधील हिंदुस्तानींना लागू होत होता. यामुळे सत्याग्रहाच्या लढाईत केवळ ट्रान्समधील हिंदुस्तानींना सामील करून घेतले जाई. नाताल, केप कॉलनी इत्यादी ठिकाणांवरून सत्याग्रहींना सामील करून घेण्याचा कोणताही प्रयत्न तर झालाच नव्हता उलटपक्षी तेथून आलेल्या प्रस्तावांचा स्वीकारही केला जात नसे. आणि लढ्याची सीमाही खुनी कायदा रद्द होण्यापर्यंतच सीमीत ठेवण्यात आली होती. ही सीमा ना तर गोरे समजू शकत होते ना हिंदुस्तानी. लढाईच्या उद्दिष्टांमध्ये खुनी कायद्यासोबतच इतर मुद्द्यांचाही समावेश सत्याग्रहात करता येऊ शकत असेल तर तसे का केले जाऊ नये असा प्रश्न लढाईच्या सुरुवातीच्या काळात हिंदुस्तानी विचारत असत. असे केल्याने सत्याचा भंग होतो असे मी त्यांना धीराने आणि शांतपणाने समजावून सांगितले. आणि ज्या लढाईत सत्याचा आग्रह असेल त्या लढाईत सत्यभंगाची कल्पना तरी कशी करता येऊ शकते? शुद्ध लढाईत योद्ध्याची शक्ती जरी वाढताना दिसली तरीही सुरुवातीला निश्चित केलेल्या उद्दिष्टांपलीकडे सत्याग्रही जाऊ शकत नाही. या उलट ज्या उद्दिष्टाने लढाईची सुरुवात करण्यात येते आणि काही वेळानंतर जेव्हा लढाई करण्याची शक्ती क्षीण होते तेव्हासुद्धा त्या उद्दिष्टाचा त्याग केला जाऊ शकत नाही. या दोन्ही सिद्धांतांचे दक्षिण आफ्रिकेत पूर्णपणे पालन करण्यात आले होते. लढाईच्या सुरुवातीला ज्या बळावर उद्दिष्टे ठरवण्यात आली होती ते बळ खोटे असल्याचे सिद्ध होऊनही शिल्लक राहिलेले सत्याग्रही आपल्या उद्दिष्टांपासून ढळले नाही. अशा पद्धतीने लढणे अपेक्षाकृत सोपे होते. परंतु बळ वाढल्यानंतरही उद्दिष्टांमध्ये वाढ न करणे अधिक कठीण होते, आणि त्याकरिता अधिक संयमाची आवश्यकता असते. अशा प्रकारचे प्रलोभन दक्षिण आफ्रिकेत आमच्यासमोर आले, परंतु एकाही प्रसंगी आम्ही त्या प्रलोभनाला बळी पडलो नाही असे मी निश्चितपणे सांगू शकतो. यामुळेच मी

अनेकदा म्हणालो आहे की सत्याग्रहीचा एकच निर्धार असू शकतो, ना त्यात काही कमी करता येऊ शकते, ना अधिक. ना त्यात वाढ करण्याला वाव असतो ना कमी करण्याची सोय असते. माणूस स्वतःकरिता जो मापदंड निर्धारित करतो त्याच मापदंडाने जग त्याला मोजू लागत असते. अशा कोणत्याही नीतीशी सरकारची जरी बांधिलकी नव्हती तरी सत्याग्रही अशा सूक्ष्म नीतीचा दावा करतात असे जेव्हा सरकारला कळले तेव्हा त्याने सत्याग्रहींना त्याच मापदंडाने मोजायला सुरुवात केली आणि दोनचार वेळा तर या नीतीभंगाचा सत्याग्रहींवर आरोपही केला. खुनी कायद्यानंतर हिंदुस्तानींच्या विरोधात जे काही नवीन कायदे तयार करण्यात आले त्यांचा समावेश लढ्याच्या उद्दिष्टांमध्ये करता येऊ शकतो ही गोष्ट लहान मुलालाही कळते. परंतु तरीही ट्रान्सवालमध्ये नव्याने प्रवेश करणाऱ्या हिंदुस्तानींवर नवीन निर्बंध लादण्यात आले आणि जेव्हा त्यांचा लढाईत समावेश करण्यात आला तेव्हा सत्याग्रहात नवीन गोष्टीचा समावेश केल्याचा आरोप सरकारने समाजावर केला. हा आक्षेप पूर्णपणे चुकीचा होता. जे प्रतिबंध पूर्वी नव्हते ते जर सरकार लावणार असेल तर त्या प्रतिबंधांचा लढाईत समावेश करण्याचा आम्हाला स्वाभाविकपणेच अधिकार होता. यामुळेच सोराबजी आणि इतरांनी ट्रान्सवालमध्ये प्रवेश केला होता. हे आपण पाहिलेलेच आहे. ही गोष्ट सरकार सहन करू शकत नव्हते. असे असले तरी निष्पक्ष लोकांना या पावलाचे औचित्य समजावून सांगण्यात मला मुळीच अडचण गेली नाही.

गोखले गेल्यानंतर परत असा प्रसंग आला. गोखल्यांचा समज होता की एका वर्षात तीन पौंड कर रद्द होईल. ते गेल्यानंतर संघराज्याच्याच्या संसदेच्या होणाऱ्या सभेत हा कर रद्द करण्याचे विधेयक सादर केले जाईल असा त्यांचा समज होता. याउलट जनरल स्मट्स यांनी संसदेत घोषणा केली की नातालच्या सर्व लोकांची तो कर रद्द करण्याची तयारी नसल्यामुळे दक्षिण आफ्रिका सरकार तो कर रद्द करण्याकरिता असमर्थ आहे. वास्तवात असे काहीही नव्हते. संघराज्याच्या संसदेत चार वसाहतींचे प्रतिनिधी होते. यामुळे केवळ नातालचे म्हणणे तिथे टिकू शकले नसते. याशिवाय मंत्रिमंडळाने सादर केलेले विधेयक फेटाळले जाईपर्यंत जनरल स्मट्स यांनी ते विधेयक पुढे रेटायला पाहिजे होते. परंतु स्मट्सनी यांतील काहीही केले नाही. यामुळे या क्रूर कराचा लढाईत समावेश करण्याची सुसंधी आम्हाला सहजपणे मिळाली. याकरिता आमच्याजवळ दोन

कारणे होती - (१) लढाई सुरू असतानाच्या काळात सरकार जर एखादे दिलेले वचन मोडत असेल तर त्या वचनभंगाचा सुरू असलेल्या सत्याग्रहात समावेश करता येतो. (२) अशा वचनभंगामुळे गोखल्यांसारख्या हिंदुस्तानच्या प्रतिनिधीचा अपमान होत असेल तर गोखल्यांचा अपमान संपूर्ण हिंदुस्तानचा अपमान समजला जाईल, आणि असा अपमान सहन करता येऊ शकत नाही. जर केवळ पहिलेच कारण असते आणि सत्याग्रहींमध्ये इतकी शक्ती नसती तर तीन पौंडांचा कर रद्द करण्याकरिता सत्याग्रहाच्या शस्त्राचा उपयोग सत्याग्रहींनी केला नसता. परंतु हिंदुस्तानचा अपमान ते कोणत्याही परिस्थितीत सहन करू शकत नव्हते. यामुळे तीन पौंड कराचा लढाईत समावेश करणे आपले कर्तव्य आहे असे सत्याग्रहींना वाटले. आणि जेव्हा तीन पौंड कराचा सत्याग्रहात समावेश झाला तेव्हा गिरमिट्या हिंदुस्तानींना सत्याग्रहात भाग घेण्याची संधी मिळाली. आजपर्यंत गिरमिट्या हिंदुस्तानींना सत्याग्रहापासून दूर ठेवण्यात आले होते ही गोष्ट वाचकांनी लक्षात ठेवली पाहिजे. अशा प्रकारे एकीकडून लढाईच्या जबाबदारीचे ओझे वाढले तर दुसरीकडे लढणारांच्या संख्येत वाढ होण्याची संधीही निर्माण झाली.

आजपर्यंत गिरमिट्या हिंदुस्तानींमध्ये सत्याग्रहाची किंचितही चर्चा करण्यात आली नव्हती. असे असताना त्यांना सत्याग्रहाचे प्रशिक्षण कसे देता येऊ शकत होते? अशिक्षित असल्यामुळे ते 'इंडियन ओपिनियन' वा इतर वृत्तपत्रेही वाचू शकत नव्हते. असे असतानाही गिरमिट्ये सत्याग्रहाचे निरीक्षण करत होते. जे काही सुरू होते ते त्यांना कळत होते आणि सत्याग्रहाच्या लढाईत सामील होता येत नसल्यामुळे काही लोकांना दु:ख होत असल्याचेही मला आढळले होते. परंतु संघराज्याच्या मंत्रिमंडळाने जेव्हा वचनभंग केला तेव्हा तीन पौड कराचाही लढाईत समावेश करण्यात आला. त्या वेळी त्यांच्यातील कोणते लोक भरती होतील याची मला काहीही कल्पना नव्हती.

सरकारच्या वचनभंगाची गोष्ट मी गोखल्यांना लिहिली. त्यांना अतिशय दु:ख झाले. मी त्यांना लिहिले की तुम्ही मुळीच काळजी करू नका. आम्ही मरेपर्यंत लढू आणि तीन पौंड कर रद्द करायला लावू. यामुळे एका वर्षाच्या आत हिंदुस्तानात परतण्याची गोष्ट लांबली आहे इतकेच.

आणि पुढेही मी केव्हा येईन हे सांगणेसुद्धा अशक्य आहे. परंतु गोखले तर अंकशास्त्री होते. त्यांनी मला जास्तीतजास्त आणि कमीतकमी सत्याग्रहींची नावे मागितली. जोपर्यंत मला आठवते मी त्यांच्याकडे जास्तीतजास्त म्हणून पासस्ट वा सहासस्ट आणि कमीतकमी सोळा नावे पाठवली होती. गोखल्यांना मी असेही लिहिले होते की इतक्या कमी लोकांकरिता मी हिदुस्तानातून आर्थिक मदतीची अपेक्षा करणार नाही. मी त्यांना असेही लिहिले होते की आमच्याबद्दल तुम्ही निश्चिंत राहा आणि शरीराला अधिक ताण न देता प्रकृतीची काळजी घ्या. वृत्तपत्रांतून आणि इतर स्रोतांकडून मला असेही कळले होते की दक्षिण आफ्रिकेतून मुंबईला परतल्यानंतर संघ सरकारबरोबरच्या चर्चेत नरमाईचे धोरण अवलंबिण्याचा गोखल्यावर आरोप करण्यात आला होता. यामुळे आम्हाला पैसा पाठवण्याकरिता गोखल्यांनी किंचितही हालचाल करू नये असे मला वाटत होते. परंतु गोखल्यांकडून मला पुढील कडक पत्र मिळाले - "ज्याप्रमाणे दक्षिण आफ्रिकेतील तुम्हा लोकांना तुमचे कर्तव्य कळते त्याचप्रमाणे हिंदुस्तानात आमचे कर्तव्य काय आहे ते आम्हा लोकांना कळतच असेल. आमच्याकरिता काय उचित आहे आणि काय अनुचित हे आम्ही तुम्हाला सांगू देणार नाही. मला तर केवळ तेथील परिस्थितीची माहिती पाहिजे होती. आमच्याकडून काय व्हायला पाहिजे याबद्दल मी तुमचा सल्ला मागितला नव्हता."

गोखल्यांच्या या शब्दांचा अर्थ मला कळला. यानंतर या विषयावर ना मी कधी बोललो ना त्यांनी कधी लिहिले. याच पत्रातून गोखल्यांनी मला धीर दिला होता आणि सावधगिरीची सूचनाही दिली होती. सरकारने जेव्हा अशा प्रकारे वचनभंग केला तेव्हा सत्याग्रहाची लढाई दीर्घ काळ चालेल अशी भीती त्यांना वाटली, आणि मूठभर सत्याग्रही सरकारसमोर कसा टिकाव धरू शकतील याबद्दल त्यांना शंका वाटू लागली. इकडे दक्षिण आफ्रिकेत आम्ही सत्याग्रहाच्या लढाईची तयारी सुरू केली होती. या लढाईत शांतपणे बसणे तर शक्यच नव्हते. सत्याग्रहींना दीर्घ काळाकरिता तुरुंगात जावे लागू शकते हेही आमच्या लक्षात आले होते. टॉलस्टॉय फार्म बंद करण्याचा आम्ही निर्णय घेतला. काही कुटुंबातील पुरुष सुटल्यानंतर त्या कुटुंबातील लोक आपापल्या घरी निघून गेले होते. जे राहिले होते त्यात प्रामुख्याने फिनिक्सवासी होते. यामुळे पुढे फिनिक्सला सत्याग्रहाचे

केंद्र बनवण्याचा निर्णय घेण्यात आला आणि तीन पौंडाच्या लढाईत जे हिंदुस्तानी गिरमिट्ये भाग घेतील त्यांच्या भेटीगीठी घेणे नातालमधील ठिकाणावरून सोपे होणार होते.

लढाई सुरू करण्याची आमची तयारी सुरू असतानाच एक नवीन विघ्न निर्माण झाले. त्यामुळे स्त्रियांनासुद्धा लढाईत भाग घेण्याची संधी मिळाली. काही वीर स्त्रियांनी लढाईत भाग घेण्याची मागणीसुद्धा केली. आणि फेरीचे परवाने न दाखवता लोक फेरीवाले बनून तुरुंगात जाऊ लागले तेव्हा फेरीवाल्यांच्या बायकांनीही तुरुंगात जाण्याची इच्छा व्यक्त केली होती. परंतु त्या वेळी विदेशात स्त्रियांना तुरुंगात पाठवणे आम्हाला अनुचित वाटले. त्या वेळी स्त्रियांना तुरुंगात पाठवण्यासारखे कारणही दिसत नव्हते. आणि खरे सांगायचे तर त्या वेळी स्त्रियांना तुरुगांत पाठवण्याचा मला धीरही होत नव्हता. त्याचबरोबर मला असेही वाटले की जो कायदा केवळ पुरुषांना लागू होतो तो रद्द करवून घेण्याकरिता स्त्रियांची आहुती देणे म्हणजे पुरुषांची बदनामी करणे आहे. परंतु आता अशी घटना घडली होती की त्यात विशेषतः स्त्रियांचा अपमान होत होता. आणि तो अपमान दूर करण्याकरिता स्त्रियांचा आहुती देणे आम्हाला अनुचित वाटले नाही.

# १५. जेव्हा विवाहाला विवाह म्हणून मान्यता राहत नाही

दक्षिण आफ्रिकेत एक अशी घटना घडली की जिची कोणत्याही हिंदुस्तानीला कल्पना नव्हती. ही अशी घटना होती की जणू काय हिच्याद्वारे ईश्वर अदृश्य रूपाने हिंदुस्तानींच्या विजयाची सामग्री तयारी करत होता आणि दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांचा अन्याय अधिक स्पष्टपणे व्यक्त करू पाहत होता. हिंदुस्तानातून अनेक विवाहित लोक दक्षिण आफ्रिकेत आले होते आणि काहींनी दक्षिण आफ्रिकेत लग्न केले होते. हिंदुस्तानात सामान्यपणे लग्नाची नोंदणी करायला लावणारा कोणताही कायदा नाही. अशा विवाहाकरिता धार्मिक विधी पुरेसा मानला जातो. दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्तानींकरिता हीच प्रथा योग्य मानली जायला पाहिजे होती. मागील चाळीस वर्षांपासून दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्तानी लोक वसत आले आहेत. परंतु हिंदुस्तानातील विविध धर्मानुसार करण्यात आलेले विवाह रद्द करण्यात आले नव्हते. परंतु या वेळी न्यायालयात एक खटला आला. केपच्या सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश श्री सर्ल यांनी १४ मार्च १९१३ला निकाल दिला की दक्षिण आफ्रिकेच्या कायद्यात केवळ ख्रिश्चन धर्माप्रमाणे झालेल्या विवाहाशिवाय किंवा विवाह अधिकाऱ्याच्या कार्यालयात नोंदणी केलेल्या विवाहाशिवाय इतर कोणत्याही विवाहाला कोणतेही स्थान नाही. याचा अर्थ असा झाला की हिंदू, मुसलमान, पारसी इत्यादी धर्मांच्या विधीप्रमाणे झालेले विवाह वरील न्यायाधीशाच्या निकालानुसार दक्षिण आफ्रिकेत रद्द समजले गेले आणि यामुळे दक्षिण आफ्रिकेतील अनेक विवाहित स्त्रियांचा दर्जा धर्मपत्नीचा न राहता रखेलीसारखा झाला आणि त्यांच्या मुलांना आपल्या वडिलांच्या संपत्तीत वारसा हक्कसुद्धा राहिला नाही. ही स्थिती ना तर स्त्रिया सहन करू शकत होत्या ना पुरुष. दक्षिण आफ्रिकेत राहत असणाऱ्या हिंदुस्तानींमध्ये यामुळे फार खळबळ निर्माण झाली. माझ्या स्वभावाप्रमाणे मी सरकारला विचारले, “तुम्ही न्यायाधीशाचा हा निर्णय मान्य करता काय आणि न्यायाधीशांनी लावलेला कायद्याचा अर्थ बरोबर असेल तर त्यामुळे अनर्थ होईल असे समजून सरकार नवीन कायदा मंजूर करून हिंदू, मुसलमान इत्यादींच्या धार्मिक विधीनुसार झालेल्या

विवाहांना मान्यता देईल काय?” त्या वेळी सरकारची मनोवृत्ती माझे म्हणणे ऐकण्याकरिता अनुकूल नव्हती. सरकारचे ‘नाही’ असे उत्तर आले.

न्यायाधीशाच्या या निर्णयाविरुद्ध अपील करावे की नाही याचा निर्णय घेण्याकरिता सत्याग्रह मंडळाची एक सभा झाली. चर्चेच्या शेवटी सर्वांचे असे म्हणणे पडले की अशा बाबतीत अपील होऊच शकत नाही. जर अपील करायचेच असेल तर ते सरकारने करावे. अथवा सरकारची जर इच्छा असेल आणि आपल्या वकिलाद्वारे ते उघडपणे हिंदुस्तानींची बाजू घेणार असेल तरच हिंदुस्तानी अपील करू शकतात. या अटी पूर्ण होत नसतील तर अपील करण्याचा अर्थ होईल हिंदू, मुसलमान इत्यादींचे विवाह रद्द होण्याची गोष्ट सहन करणे. याशिवाय असे अपील केल्यानंतरही त्यात जर हार झाली तर मग सत्याग्रह करणे अपरिहार्य होईल. अशा परिस्थितीत अशा अपमानाविरुद्ध अपील करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

आता अशी वेळ ठेपली होती की शुभ मुहूर्ताची वा शुभ तिथीची वाट पाहणेच शक्य नव्हते. स्त्रियांचा अपमान झाल्यानंतर धीर कसा धरता येऊ शकतो? कमीअधिक जितके सत्याग्रही मिळतील तितक्या सत्याग्रहींच्या बळावरच आम्ही सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय घेतला. लढाईत भाग घेण्यापासून आता स्त्रियांना अडवता येऊ शकत नव्हते. इतकेच नाही तर लढाईत भाग घेण्याकरिता स्त्रियांना निमंत्रण द्यायचे आम्ही ठरवले. सर्वात आधी आम्ही त्या भगिनींना निमंत्रण दिले ज्या टॉलस्टॉय फार्ममध्ये राहिलेल्या होत्या. त्यासुद्धा लढाईत भाग घेण्याकरिता अतिशय उत्सुक होत्या. सत्याग्रहात भाग घेण्याचे सर्व धोके मी त्यांना समजावून सांगितले. मी त्यांना सांगितले की लढाईत भाग घेतल्यानंतर तुमच्या खाण्यापिण्यावर, कपड्यालत्त्यांवर, झोपण्याउठण्यावर नियंत्रणे येतील. ते सहन करणे तुमच्याकरिता कठीण होईल. तुरुंगात तुम्हाला कठोर काम करायला लावले जाऊ शकते, तुमच्याकडून कपडे धुऊन घेतले जाऊ शकतात, तुरुंगाधिकारी तुमचा अपमानही करू शकतो. या सर्व गोष्टींची मी त्यांना जाणीव करून दिली. परंतु त्या सर्व स्त्रिया शूरवीर होत्या. मी सांगितलेल्या एकाही गोष्टीने त्या घाबरल्या नाही. एक स्त्री तर गर्भवती होती. सहा स्त्रियांच्या कडेवर लहान मुले होती. अशा स्त्रियांनीही लढाईत भाग

घेण्याचा आग्रह धरला. यातील एकाही भगिनीला अडवण्याची माझ्यात शक्ती नव्हती. त्यांची नावे खाली दिली आहेत. -

१. श्रीमिती थंबी नायडू, २. श्रीमती एन. पिल्ले, ३. श्रीमती मुरगेसा पिल्ले, ४. श्रीमती ए. पी. नायडू, ५. श्रीमती पी. के. नायडू, ६. श्रीमती चिन्नास्वामी पिल्ले, ७. श्रीमती एन. एस. पिल्ले, ८. श्रीमती आर. ए. मुदलिंगम, ९. श्रीमती भवानीदयाल, १०. कुमारी एस. पिल्ले.

एखादा गुन्हा करून तुरुंगात जाणे सोपे आहे. परंतु निर्दोष असूनही तुरुंगात जाणे कठीण असते. गुन्हेगार अटक चुकवत असल्यामुळे पोलीस त्याच्या मागावर असतात व त्याला अटक करू पाहतात. परंतु निर्दोष आणि स्वतःहोऊन तुरुंगात जाऊ इच्छिणाऱ्या लोकांना पोलीस निरुपाय झाल्यानंतरच पकडतात. या भगिनींचा पहिला प्रयत्न वाया गेला. त्यांनी ट्रान्सवालच्या वेरिनिजिंग नावाच्या ठिकाणी प्रवेश करून फेरी लावली. परंतु पोलिसांनी त्यांना पकडण्याला नकार दिला. त्यांनी फिनिक्सहून ऑरेंजियाच्या भागात विनापरवाना प्रवेश केला, परंतु तरीही त्यांना कोणीही पकडले नाही. आता अटक कशी करवून घ्यावी असा प्रश्न त्या भगिनींसमोर उभा झाला. तुरुंगात जायला तयार असलेली फारशी माणसे नव्हती. आणि जे पुरुष तुरुंगात जाण्याकरिता तयार होते त्यांच्याकरिताही अटक करवून घेणे सोपे नव्हते.

आता विचारपूर्वक ठरवलेले अखेरचे पाऊल उचलण्याचा आम्ही निर्णय घेतला. आणि ते पाऊल फार प्रभावी असल्याचे सिद्ध झाले. अखेरच्या क्षणी माझ्याबरोबर राहिलेल्या सर्व लोकांची आहुती देऊन टाकण्याचा मी विचार केला. सत्यदेवतेकरिता तो माझा अखेरचा त्याग झाला असता. फिनिक्समध्ये राहिलेले लोक माझे जवळचे सोबती आणि नातलग होते. 'इंडियन ओपिनियन' चालवण्याकरिता जितक्या किमान लोकांची गरज असेल तितक्या लोकांना आणि १६ वर्षांच्या आत वय असलेल्या मुलांना वगळून इतर सर्वांना तुरुंगात पाठवायला पाहिजे असे मला वाटले. याहून मोठा त्याग करण्याचे साधन माझ्याजवळ नव्हते. गोखल्यांना पत्र लिहिताना जे किमान सत्याग्रही माझ्या डोळ्यांसमोर होते ते याच लोकांमधील होते. सीमोल्लंघन करून या मंडळीला विनापरवाना प्रवेश केल्याबद्दल अटक करवून घ्यायची होती. आधीपासून जर सरकारला या

गोष्टीची कल्पना आली तर सरकार या लोकांना अटक करणार नाही अशी भीती मला वाटत होती. यामुळे दोनचार मित्र सोडले तर इतर कोणालाही मी ही गोष्ट सांगितली नव्हती. सीमेत प्रवेश करत असताना पोलीस नेहमी नाव आणि पत्ता विचारत असत. या वेळी आमच्या नवीन योजनेत नाव आणि पत्ते न सांण्याच्या योजनेचाही समावेश होता. पोलीस अधिकाऱ्याला नाव आणि पत्ता न सांगणे हा एक वेगळा अपराध मानला जात असतो. अटक करवून घेणारे लोक माझे नातेवाईक आहेत हे पोलिसांना कळले असते तर कदाचित पोलीस त्यांना अटक करणार नाही हे नाव आणि पत्ते न सांगण्यामागील कारण होते. फिनिक्समधील ही मंडळी जेव्हा ट्रान्सवालमध्ये प्रवेश करील तेव्हाच या भगिनी, ज्यांनी ट्रान्सवालमध्ये अटक करवून घेण्याचा विफल प्रयत्न केला होता, नातालमध्ये प्रवेश करणार होत्या. ज्याप्रमाणे नातालमधून ट्रान्सवालमध्ये विनापरवाना प्रवेश करणे अपराध होता त्याचप्रमाणे ट्रान्सवालमधून नातालमध्ये विनापरवाना प्रवेश करणे हासुद्धा अपराध होता. अशा रीतीने पोलिसांनी जर या भगिनींना अटक केली तर त्यांना नातालमध्ये अटक करवून घ्यायची होती. आणि जर त्यांनी अटक केली नाही तर त्यांना नातालमधील कोळशाच्या खाणींचे केंद्र असलेल्या न्यूकॅसलपर्यंत जाऊन तिथे काम करणाऱ्या मजुरांना बाहेर पडण्याकरिता समजूत घालायची होती. या भगिनींची भाषा तमिल होती, आणि थोडी हिंदुस्तानीसुद्धा त्यांना येत असे. आणि बहुतेक गिरमिट्ये मद्रास प्रांतातील तमिळ, तेलगू लोक होते. गिरमिट्यांमध्ये इतर हिंदुस्तानीसुद्धा बरेच जास्त होते. या भगिनींचे म्हणणे ऐकून मजुरांबरोबरच जर सरकारने यांनाही अटक केली असती तर मजुरांचा भरपूर उत्साह वाढण्याची शक्यता होती. मनातल्या मनात अशा प्रकारची व्यूहरचना करून मी ती ट्रन्सवालच्या भगिनींना चांगल्याप्रकारे समजावून सांगितली.

यानंतर मी फिनिक्सला गेलो. फिनिक्समध्ये सर्वांसोबत बसून मी माझ्या योजनेची चर्चा केली. स्त्रियांना तुरुंगात पाठवण्याचे पाऊल अतिशय धोकादायक आहे हे मला माहीत आहे. फिनिक्समध्ये राहणाऱ्या अनेक भगिनी गुजराती होत्या. यामुळे वर उल्लेख करण्यात आलेल्या ट्रान्सवालमधील भगिनीसारख्या प्रशिक्षण घेतलेल्या वा अनुभवी नव्हत्या. याशिवाय गुजराती भगिनींमधील अनेक स्त्रिया मझ्या नातेवाईक होत्या यामुळे केवळ माझ्या लाजेखातर त्यांनी तुरुंगात जाण्याचा आणि तुरुंगात पोहोचल्यानंतर नंतर ऐन कसोटीच्या वेळी घाबरून जर त्यांनी

माफी मागितली असती तर मला धक्का बसला असता आणि लढाईत ढिलाई आली असती. तुरुंगात जाण्याकरिता माझ्या पत्नीचेही मन वळवण्याचा मी निर्धार केलेला होता.(पाहा, परिशिष्ट २,"पूर्ती") तिच्याकडून 'नाही' म्हणवले गेले नसते आणि तिने जर 'हो' म्हटले असते तर त्या 'हो'ची किती किंमत करायची हे सांगता येणे माझ्याकरिता कठीण झाले असते. अशा धोक्याच्या प्रसंगी पत्नी जे पाऊल टाकील ते पत्नीने स्वीकारले पाहिजे, आणि पत्नीने कोणतेही पाऊल उचलले नाही तर पतीने त्याबद्दल कोणतेही दु:ख बाळगता कामा नये असे माझे मत होते. यामुळे यासंबंधात पत्नीशी काहीही बोलायचे नाही असा मी विचार केला होता. इतर स्त्रियांशी मी बोललो. ट्रान्सवालच्या स्त्रियांप्रमाणे त्यांनी निर्धार केलेला होता, आणि तुरुंगाची यात्रा करण्याकरिता तयार होत्या. तुरुंगात कितीही हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या तरी त्या सहन करून पूर्ण शिक्षा भोगल्यानंतरच आम्ही तुरुंगातून बाहेर पडू अशी ग्वाही त्यांनी मला दिली होती. या सर्व चर्चेचा सार माझ्या पत्नीलाही माहीत होता. ती मला म्हणाली, "ही गोष्ट तुम्ही मला सांगत नाही याबद्दल मला वाईट वाटते. माझ्यात अशी कोणती उणीव आहे की मी तुरुंगात जाऊ शकत नाही? या भगिनींना ज्या मार्गाने चालण्याचा तुम्ही सल्ला देत आहा त्याच मार्गाने मीसुद्धा जाऊ इच्छिते." मी म्हणालो, "मी तुला कधीही दु:खी करू शकत नाही. यात अविश्वासाचा कोणताही प्रश्न नाही. तू तुरुंगात गेलीस तर मला आनंदच होईल. परंतु माझ्या इच्छेखातर तू तुरुंगात गेली ही कल्पना मला सहन होणार नाही. अशी कामे सर्वांनी आपापल्या हिंमतीप्रमाणे केली पाहिजे. मी जर म्हणालो तर माझ्या म्हणण्याखातर तू सहजपणे तुरुंगात जाशील. परंतु नंतर न्यायालयात गेल्यानंतर तू जर थरथर कापू लागली आणि हारलीस अथवा तुरुंगातील यातनांनी घाबरलीस तर तो मी तुझा दोष समजणार नाही. परंतु तसे झाले तर माझी परिस्थिती कशी होईल? तशा परिस्थितीत मी तुला माझ्याबरोबर कसा ठेवू शकेन आणि जगासमोर कोणत्या तोंडाने उभा राहू शकेन? याच भीतीने मी तुझ्याशी तुरुंगात जाण्याविषयी बोललो नाही." पत्नीने उत्तर दिले, "पराभूत होऊन जर मी तुरुंगाबाहेर आले तर तुम्ही मला तुमच्याबरोबर ठेवू नका. माझी मुले यातना सहन करू शकतात, तुम्ही यातना सहन करू शकता आणि मी एकटीच यातना सहन करू शकत नाही असा माझ्याबद्दलचा समज तुम्ही कसा काय करून घेऊ शकता? या लढाईत भाग

घेतल्याशिवाय मी राहणार नाही." मी म्हणालो, "असे असेल तर मीसुद्धा तुला या लढाईत भाग घ्यायला लावीनच. माझ्या अटी तर तुला माहीतच आहेत. अजूनही विचार करायचा असेल तर विचार कर आणि खोलवर विचार केल्यानंतर जर तुला लढाईत सामील व्हावेसे वाटत असेल तर तुला माझ्याकडून पूर्ण मुभा आहे. आणि लक्षात ठेव की निश्चय बदलण्यात लाजेचे काहीही कारण नसते." उत्तरात ती म्हणाली, "मला कोणताही फेरविचार करायचा नाही. मी दृढ आहे."

फिनिक्समध्ये राहणाऱ्या इतर लोकांनाही मी म्हणालो की स्वतंत्रपणे विचार करून तुम्ही तुमचा निर्णय घ्या. सत्याग्रहाची लढाई थोडा वेळ चालो की दीर्घ काळ, फिनिक्स आश्रम टिको की जमीनदोस्त होवो, तुरुंगात जाणारे सत्याग्रही तुरुंगात आजारी पडो की चांगले असो कोणीही हार पत्करून तुरुंगाबाहेर पडणार नाही. ही अट मी वारंवार विविध प्रकारे त्यांना समजावून सांगितली. सर्व तयार झाले. त्यात फिनिक्सबाहेरील केवळ रुस्तमजी जीवणजी घोरखोदू हेच होते. आम्ही त्यांना प्रेमाने काकाजी म्हणत असू. फिनिक्सबद्दलची कोणतीही चर्चा मी त्यांच्यापासून गुप्त ठेवू शकत नव्हतो. आणि ते माघार घेणारातील माणूस नव्हते. एकदा तुरुंगाची शिक्षा त्यांनी भोगलेली होती. परंतु परत तुरुंगात जाण्याचा त्यांचा आग्रह होता. या तुकडीत सामील होणाऱ्या सत्याग्रहींची नावे अशी होती -

१. सौ. कस्तुरबाई मोहनदास गांधी, २. सौ. जयकुवर मणिलाल डॉक्टर, ३. सौ. काशी छगनलाल गांधी, ४. सौ. संतोक मगनलाल गांधी, ५. श्री पारसी रुस्तमजी घोरखोदू, ६. छगनलाल खुशालचंद गांधी, ७. श्री. रावजीभाई मणिभाई पटेल, ८. श्री मगनभाई हरिभाई पटेल, ९. श्री सोलोमन रायप्पन, १०. भाई रामदास मोहनदास गांधी, ११. भाई राजू गोविंदू, १२. भाई शिवपूजन बद्री, १३. भाई गोविंदू राजुलू, १४. कप्पुस्वामी मुदलीयार, १५. भाई गोकलदास हंसराज, १६. भाई रेवाशंकर रतनसी लोढा.

यानंतर काय झाले हे पुढील प्रकरणात सांगितले जाईल.

# १६. तुरुंगात स्त्रिया

सत्याग्रहींची ही तुकडी ट्रान्सवालच्या सीमेत विनापरवाना प्रवेश करण्याच्या अपराधाकरिता तुरुंगात जाणार होती. मागील प्रकरणात सांगितलेल्या नावांवरून वाचकांना कल्पना येईल की त्यात काही नावे अशी होती की जी उघड केली असती तर कदाचित पोलिसांनी त्यांना पकडले नसते. माझ्या बाबतीत असेच घडले होते. एकदोनदा सीमा ओलांडण्याच्या कारणाकरिता मला पकडल्यानंतर पोलिसांनी मला पकडणे सोडून दिले होते. ही तुकडी रवाना होण्याची सूचना कोणालाही देण्यात आली नव्हती. मग वृत्तपत्रांना ती कशी दिली जाऊ शकत होती? याशिवाय पोलिसांनासुद्धा तुमचे नाव आणि पत्ता सांगू नका अशी सूचना त्यांना देण्यात आली होती. आम्ही आमचे नाव न्यायालयातच सांगू इतकेच त्यांनी पोलिसांना सांगायचे होते.

पोलिसांसमोर अशी प्रकरणे अनेकदा यायची. हिंदुस्तानींना अटक करून घेण्याची सवय झाल्यानंतर अनेकदा गंमत म्हणून आणि पोलिसांना त्रास देण्याकरिता ते आपले नाव सांगत नसत. यामुळे फिनिक्स तुकडीचे वर्तन पोलिसांना विचित्र वाटले नाही. त्यांनी त्या तुकडीला अटक केली. तुकडीतील लोकांवर न्यायालयात खटला चालला. प्रत्येकाला तीनतीन महिन्यांची शिक्षा झाली (२३ सेप्टेंबर १९१३).

ज्या भगिनींना ट्रान्सवालमध्ये अटक करवून घेण्यात अपयश आले होते त्यांनी आता नातालमध्ये प्रवेश केला. परंतु पोलिसांनी त्यांना अटक केली नाही. जर त्यांना अटक करण्यात आली नाही तर न्यू कॅसल येथे छावणी टाकून कोळशाच्या खाणीतील गिरमिट्या मजुरांना आपले काम बंद करण्याकरिता समजावून सांगावे असे ठरले होते. न्यू कॅसल नातालमधील कोळशाच्या खाणीचे केंद्र आहे. या खाणीत प्रामुख्याने हिंदुस्तानी मजूर काम करत. भगिनींनी आपले काम सुरू केले. त्यांचा प्रभाव विद्युत गतीने वाढला. तीन पौंडांच्या करुण कहाणीने मजुरांचे हृदय द्रवले. त्यांनी आपले काम सोडले. ही बातमी मला तारेने कळली. मला जितका आनंद झाला तितकाच मी घाबरलोही. मजुरांच्या या अद्भुत जागृतीकरिता मी तयार नव्हतो. माझ्याजवळ पैसा नव्हता आणि माझ्याजवळ ना अशी माणसे होती की जे या मजुरांची जबाबदारी घेऊ शकले असते. परंतु माझे

कर्तव्य काय आहे हे मला कळत होते. मी न्यू कॅसलला जायला पाहिजे हे माझ्या लक्षात आले.मी लगेच रवाना झालो.

आता या शूरवीर स्त्रियांना सरकार कसे सोडणार होते? त्यांना अटक करण्यात आली. फिनिक्सच्या तुकडीला जी शिक्षा झाली तीच शिक्षा यांनाही झाली, आणि यांनाही त्याच तुरुंगात ठेवण्यात आले (२१ ऑक्टोबर १९१३). या घटनेमुळे दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींना जाग आली. त्यांची झोप उडाली. त्यांच्यात नवचैतन्य आणि नवीन उत्साह दिसू लागला. या भगिनींच्या बलिदानामुळे मातृभूमी हिंदुस्तानलाही जाग आली. सर फिरोजशहा मेहता आजपर्यंत तटस्थ होते. दक्षिण आफ्रिकेत न जाण्याबद्दल मला समजावून सांगत १९०१ साली त्यांनी माझ्यावर ठपका ठेवला होता. जोपर्यंत हिंदुस्तान स्वातंत्र्य मिळवत नाही तोपर्यंत प्रवासी हिंदुस्तानींबद्दल आपण काहीही बोलू शकत नाही असे त्यांचे म्हणणे होते. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या लढाईनेही ते फार कमी प्रभावित झाले होते. परंतु स्त्रिया तुरुंगात गेल्याचे पाहून त्यांच्यावर जादूसारखा परिणाम झाला. मुंबई येथील टाऊन हॉल येथील भाषणात ते म्हणाले की स्त्रियांना तुरुंगाची शिक्षा झालेली पाहून माझी शांतता हिरावून घेतली गेली. आता हिंदुस्तानात शांतपणे बसून राहता येणेच शक्य नाही.

स्त्रियांच्या शौर्याचे वर्णन कोणत्या शब्दांत करावे? सर्वांना नातालची राजधानी मारित्झबर्ग येथे तुरुंगात ठेवण्यात आले होते. त्यांना बराच त्रास दिला गेला. त्यांच्या अन्नाची अगदीच काळजी घेतली गेली नाही. त्यांच्याकडून धोब्याचे काम करवून घेण्यात आले. शिक्षा संपेपर्यंत बाहेरून जेवण येण्यास सरकारने जवळपास मनाई केली होती. एका भगिनीने एक विशेष प्रकारचा आहार घेण्याचे व्रत घेतलेले होते. मोठ्या मुश्किलीने तशी परवानगी मिळाली. परंतु जे जेवण दिले जाई ते इतके वाईट असायचे की ते खाणेच शक्य होत नसे. ऑलिव्ह तेलाची तिला फार गरज होती. आधी तर तिला ते देतच नव्हते आणि जेव्हा देऊ लागले तेव्हा ते जुनाट आणि उतरलेले होते. आपल्या पैशाने ते तेल मागवण्याचे जेव्हा म्हटले तेव्हा "हे काही हॉटेल नाही, जे जेवण दिले

जाईल तेच खावे लागेल" असे उत्तर तिला मिळाले. तुरुंगातून ती भगिनी जेव्हा निघाली तेव्हा ती अगदी हाडाचा पिंजरा झालेली होती. मोठ्या प्रयत्नांनी ती वाचू शकली.

दुसऱ्या एका स्त्रीची प्राणघातक आजारामुळे सुटका झाली होती. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर काही दिवसातच ती देवाघरी पोहोचली (२२ फेब्रुवारी १९१४ला). मी तिला कसा विसरू शकतो? तिचे नाव वालीअम्मा होते. ती सोळा वर्षांची मुलगी होती. मी तिला भेटायला गेलो तेव्हा ती अंथरुणावर पडून होती. ती उंच असल्यामुळे तिती कृश काया भयानक दिसत होती.

मी विचारले, "वालीअम्मा, तुरुंगात गेल्याचा तुला पश्चात्ताप तर होत नाही?"

"पश्चात्ताप का होईल? मला जर परत पकडले तर परत तुरुंगात जाण्याची माझी तयारी आहे."

"परंतु यामुळे तू मेलीस तर?"

"मेले तर काय झाले देशाकरिता मरणे कोण पसंत करणार नाही?"

आमच्या या बोलण्यानंतर काहीच दिवसांनी वालीअम्मा वारली. तिच्या शरीराचा नाश झाला, परंतु ती पोरगी आपले नाव अमर करून गेली. वालीअम्माच्या मृत्यूचा शोक व्यक्त करण्याकरिता ठीकठिकाणी शोकसभा झाल्या. आणि समाजाने तिच्या सन्मानार्थ वालीअम्मा हॉल बनवण्याचा निर्णय घेतला. हा हॉल बनवण्याचे कर्तव्य समाजाने अजून पूर्ण केलेले नाही. त्यात अनेक अडचणी आल्या. समाजात फूट पडली. एकामागून एक प्रमुख कार्यकर्ते वारले. परंतु दगडाचा आणि चुन्याचा हॉल बनवला जावो अथवा न जावो, वालीअम्माच्या सेवेचा कधीही नाश होणार नाही. या सेवेचे दालन तर ती आपल्या हातानेच बांधून गेली होती. तिची मूर्ती आजही अनेकांच्या हृदयात विराजमान आहे. आणि जोपर्यंत हिंदुस्तानचे नाव राहील तोपर्यंत दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासात वालीअम्माचे नाव अमर राहील.

या भगिनींचे बलिदान विशुद्ध होते. त्या बिचाऱ्यांना कायद्याचे बारकावे कळत नव्हते. त्यांच्यातील किती तरी भगिनींना देश म्हणजे काय हे माहीत नव्हते. त्यांचे देशप्रेम केवळ श्रद्धेवर आधारलेले होते. त्यांतील काही स्त्रिया अशिक्षित होत्या. मग त्या वर्तमानपत्र कशा वाचणार? परंतु

समाजाच्या स्वाभिमानाचे वस्त्रहरण होते आहे इतके मात्र त्यांना कळत होते. त्यांचा तुरुंगवास त्यांचा अंतर्नाद होता. शुद्ध यज्ञ होता. अशा हृदयातून निघालेली प्रार्थना परमेश्वर ऐकत असतो. यज्ञाच्या शुद्धतेतच यज्ञाचे साफल्य निहीत असते. देव भावाचा भिकारी असतो. भक्तीने म्हणजे निःस्वार्थ बुद्धीने दिलेले पत्र, पुष्प वा पाणीसुद्धा देव आनंदाने स्वीकारतो आणि त्याच्या कोटीपटीने फळ देतो. भोळा सुदामा मूठभर पोह्यांची भेट घेऊन श्रीकृष्णाकडे गेला होता. परंतु तेवढ्याने सुदाम्याचा वर्षांचा अभाव आणि भूक या दोन्ही गोष्टी नाहीशा झाल्या होत्या. अनेक लोकांच्या तुरुंगात जाण्याचे फळ कदाचित मिळणारही नाही. परंतु एकाही शुद्ध आत्म्याने केलेला त्याग कधीही वाया जात नसतो. दक्षिण आफ्रिकेत कोणाकोणाला यज्ञात यश आले हे कोणाला माहीत? परंतु इतके मात्र मला माहीत आहे की वालीअम्माचा यज्ञ नक्कीच फलदायी झाला असावा. हीच गोष्ट इतर भगिनींच्या त्यागासंबंधीही म्हणता येऊ शकते.

स्वदेशयज्ञात आणि जगतयज्ञात असंख्य आत्म्यांनी आहुती दिली होती, आणि आजही असंख्य आत्मे आहुती देत आहेत आणि भविष्यातही देत राहतील. हेच वास्तव आहे. कारण शुद्ध कोण आहे हे कोणालाही माहीत नसते. परंतु सत्याग्रहींना इतके मात्र नक्कीच कळत असते की त्यांच्यातील एक जरी शुद्ध असेल तरी त्याचा यज्ञ फलनिष्पत्तीकरिता पुरेसा असतो. पृथ्वी सत्याच्या बळावर टिकलेली आहे. असत - असत्य याचा अर्थ आहे ‘नाही’ आणि सत - सत्याचा अर्थ आहे ‘आहे’. असतचे जर कोणतेही अस्तित्व नसेल तर त्याचे फळ कसे निघू शकते? आणि त्याचा नाश कोण करू शकते? इतक्यात सत्याग्रहाचे संपूर्ण शास्त्र सामावलेले आहे..

# १७. मजुरांची रीघ

न्यू कॅसलजवळील कोळशांच्या खाणीवर काम करणाऱ्या मजुरांवर या भगिनींच्या त्यागाचा अद्भुत परिणाम झाला. त्यांनी आपली अवजारे टाकून दिली आणि शहरांकडे त्यांची रीघ लागली. हे कळताच मी फिनिक्स सोडले आणि न्यू कॅसलला पोहोचलो.अशा मजुरांची स्वतःची घरे नसतात. खाण मालकच त्यांच्याकरिता घरे बनवत असतात आणि तेच त्यांच्या रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करत असतात. तेच त्यांना पाणी देत असतात. यामुळे मजूर मालकांवर पूर्णपणे अवलंबून असतात.आणि तुलसीदासांनी म्हटल्याप्रमाणे

'पराधीन सपनेहू सुख नाही'

हरताळावर असलेले हे लोक माझ्याकडे अनेक प्रकारच्या तक्रारी घेऊन येऊ लागले. कोणी म्हणायचे, "मालक रस्त्यावरील दिवे बंद करून टाकतात", कोणी म्हणायचे , 'मालक आमचे पाणी बंद करून टाकतात'. तिसरे कोणी म्हणायचे, 'मालक आमच्या सांसारिक वस्तू कोठीबाहेर फेकून देतात.' सैय्यद इब्राहिम नावाचा एक पठाण माझ्याकडे आला, त्याने आपली पाठ मला दाखवली आणि म्हणाला, "हे पाहा मला कसे मारले आहे!" तुमच्याकरिता मी त्या बदमाशांना सोडले आहे. मी पठाण आहे, पठाण कधी मार खात नसतो, मारत असतो."

मी उत्तर दिले, "बाबारे, तू फार चांगले काम केले. यालाच मी खरे शौर्य म्हणतो. तुझ्यासारख्या लोकांच्या बळावरच आपण जिंकू."

अशा प्रकारे मी त्याचे अभिनंदनही केले. परंतु मी विचार केला की अशाच प्रकारचा व्यवहार इतर मजुरांबरोबर करण्यात आला तर संप कसा चालेल? मारहाणीचा मुद्दा सोडला तर मालकाविरुद्ध तक्रार तरी कोणती करणार? संप करणाऱ्या मजुरांचे पाणी, दिवाबत्ती अशा प्रकारच्या सोयी मालकाने बंद केल्या तर त्यात तक्रार करण्यासारखे फारसे शिल्लक राहत नाही. परत कारण असो वा नसो अशा परिस्थितीत मजूर कसा टिकाव धरू शकतील? कोणत्या तरी उपायाचा विचार करणे मला भाग होते. अगदी थकून गेल्यानंतर लोकांनी कामावर परतण्यापेक्षा आपली हार कबूल

करून लोकांनी कामावर परतणे बरे असे मला वाटले. परंतु माझ्या तोंडून असा सल्ला मजूर कधीही ऐकून घेऊ शकत नव्हते. मग एकच उपाय शिल्लक राहत होता. - मालकांनी दिलेल्या खोल्या मजुरांनी सोडून द्यायच्या. एक प्रकरे ‘हिजरत; करायची.

पण मजूर काही केवळ पाचपंचवीस नव्हते. ते शेकडो होते. आणि हजारो होण्यात काहीही वेळ लागणार नव्हता. त्या सर्वांकरिता घरे कुठून आणू? त्यांच्या खाण्याची सोय कसा करणार? हिंदुस्तानातून पैसा मागवण्याची इच्छा नव्हती. तिथून पुढे जो पैशाचा वर्षाव सुरू झाला होता तो अजून सुरू व्हायचा होता. दक्षिण आफ्रिकेतील व्यापारी इतके घाबरलेले होते की उघडपणे मला कोणत्याही प्रकारची मदत करण्याची त्यांची तयारी नव्हती. खाणमालक आणि इतर गोरे व्यापारी यांच्याबरोबर त्यांचे संबंध होते. यामुळे उघडपणे ते मला कसे भेटू शकत होते? मी जेव्हा न्यू कॅसलला जात असे तेव्हा याच व्यापाऱ्यांकडे थांबत असे. परंतु या वेळी मी स्वतःहोऊनच त्यांचा मार्ग मोकळा केला. मी दुसरीकडे थांबण्याचे ठरवले.

मी आधीच सांगितले आहे की ज्या भगिनी ट्रान्सवालहून आल्या होत्या त्या हिंदुस्तानातील द्रविड प्रदेशातील होत्या. त्यांचा मुक्काम एका ख्रिश्चन द्रविड कुटुंबाकडे होता. ते मध्यंमवर्गीय कुटुंब होते. त्यांच्याजवळ जमिनीचा एक लहानसा तुकडा होता. मी याच कुटुंबाबरोबर राहायचे ठरवले. कुटुंब प्रमुखाचे नाव डी. लाजरस होते. गरिबाला कशाची भीती असू शकते? सर्व लोक मुळातील गिरमिट्या परिवारातील होते. यामुळे त्यांना आणि त्यांच्या मालकांना तीन पौंड कर द्यावा लागायचा. गिरमिट्या हिंदुस्तानींच्या दुःखाची त्यांना चांगली जाणीव होती. या कुटुंबातील लोकांना गिरमिट्यांबद्दल पूर्ण सहानुभूती वाटत असल्यामुळे त्यांनी माझे हार्दिक स्वागत केले. माझे स्वागत करणे मित्रांकरिता कधीही सोपी गोष्ट नसायची. परंतु या वेळी माझ्या स्वागताचा अर्थ होता आर्थिक विनाशाचे स्वागत. यामुळे कुटुंबातील लोकांवर कदाचित तुरुंगाचे स्वागत करण्याचीसुद्धा वेळ आली असती. अशा परिस्थितीला तोंड देण्याचे धाडस श्रीमंत व्यापारी थोडेच करू शकणार होते. मला माझ्या आणि त्यांच्या मर्यादांची जाणीव होती. यामुळे मी त्यांना अशा अडचणीत टाकले नाही. बिचाऱ्या लाजरसला थोड्या पगाराला जरी मुकावे लागले असते तरी ते तो सहन

करू शकत होता. त्या कुटुंबाला तुरुंगात जरी नेले असते तरी तिथेही ते गेले असते. परंतु आपल्यापेक्षा गरीब गिरमिट्यांचे दु:ख ते कसे सहन करू शकले असते? आपल्याच घरी थांबलेल्या गिरमिट्या स्त्रियांना तुरुंगात जात असताना त्यांनी पाहिले होते. गिरमिट्यांबद्दल आपलेही काही कर्तव्य आहे असे लाजरस यांना वाटत होते. यामुळे त्यांनी मला आपल्या घरात ठेवून घेतले. केवळ ठेवूनच घेतले नाही तर आपले सर्व काही मला दिले. मी त्यांच्या घरी गेल्यानंतर त्यांचे घर धर्मशाळा झाले. सर्व प्रकारची शेकडो माणसे तिथे यायची. आणि त्यांच्या घराच्या आजूबाजूचे अंगण लोकांनी गच्च भरलेले असायचे. त्यांच्या घरी चोवीसही तास स्वयंपाक सुरू असे. त्यांच्या बायकोने रात्रंदिवस अपार मेहनत घेतली. असे असूनही पतिपत्नी दोघेही सदा हसतमुख असायचे. त्यांच्या चेहऱ्यावर मी कधीही नाराजी पाहिली नाही.

परंतु लाजरस शेकडो लोकांना खाऊ घालू शकत नव्हते. मजुरांना मी सांगून ठेवले होते की हा संप कायम सुरू राहणार आहे असे तुम्ही समजा. मालकांनी दिलेल्या झोपड्या तुम्ही सोडायला पाहिजे. जे सामान विकण्यासारखे असेल ते तुम्ही विकून टाकले पाहिजे. उरलेले सामान तुमच्या खोल्यांमध्येच पडून राहू द्या. मालक त्यांना स्पर्शही करणार नाहीत. परंतु अजून जास्त बदला घेण्याकरिता मालक लोक जर तुमचे सामान फेकून देणार असतील तर तो धोका पत्करण्याचीसुद्धा तुमची तयारी असली पाहिजे. तुम्ही माझ्याकडे आला होता तेव्हा तुम्ही स्वत:बरोबर नेहमीचे वापरायचे कपडे आणि पांघरूण याशिवाय काहीही आणले नव्हते. जोपर्यंत संप सुरू राहील आणि तुम्ही तुरुंगाबाहेर असाल तोपर्यंत मी तुमच्याबरोबर राहीन आणि खाईनपिईन या अटीवर जर तुम्ही झोपड्यांबाहेर पडाल तरच संपात तुमचा टिकाव लागू शकेल आणि समाजाचा विजय होऊ शकेल. असे करण्याची ज्यांच्यात हिंमत नसेल त्यांनी आपापल्या कामावर परतायला पाहिजे. जे लोक कामावर परततील त्यांचा कोणीही अपमान करता कामा नये, कोणीही त्रास देता कामा नये. एकाही मजुराने माझी ही विनंती अमान्य केल्याचे मला आठवत नाही. मी सांगितलेल्या दिवसापासूनच हिजरत करणारांची - गृहत्याग करणारांची रीघ लागली. सर्व मजूर आपल्या मुलाबाळांना सोबत घेऊन आणि डोक्यावर कपड्याचे गाठोडे घेऊन

माझ्याकडे येऊ लागले. घर म्हणून माझ्याकडे केवळ जमीन होती. भाग्य की तो ऋतू ना तर पावसाचा होता ना थंडीचा.

आमचा व्यापारी वर्ग खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यात मागे राहणार नाही असा माझा विश्वास होता. न्यू कॅसल येथील व्यापाऱ्यांनी स्वयंपाकाकरिता भांडी दिली आणि डाळीचे आणि तादुळाचे पोते पाठवले. इतर शहरांमधूनही डाळी, तांदुळ, भाज्या, मसाले इत्यादींचा वर्षाव होऊ लागला. मी अपेक्षा केली होती त्यापेक्षाही जास्त प्रमाणात या वस्तू माझ्याकडे येऊ लागल्या होत्या. सर्व लोकांची तुरुंगात जाण्याची तयारी नव्हती, परंतु समाजाच्या लढाईबद्दल सर्वांची सहानुभूती होती. समाजाच्या लढाईत यथाशक्ती मदत करण्याची सर्व लोकांची इच्छा होती. जे लोक पैशाची वा खाद्यपदार्थांची मदत करू शकत नव्हते त्यांनी स्वयंसेवक म्हणून सेवा देऊन मदत केली. त्या शेकडो अनोळखी आणि अशिक्षित मजुरांना आणि त्यांच्या कुटुंबातील लोकांना सांभाळण्याकरिता माहितीतल्या समंजस स्वयंसेवकांची गरज होती. असे स्वयंसेवक आम्हाला मिळाले. त्यांनी आम्हाला अमूल्य मदत केली. त्यातील अनेकांना अटकही करण्यात आली. अशा प्रकारे सर्वांनी आम्हाला यथाशक्ती मदत केली आणि आमचा मार्ग सोपा केला.

लोकांची मोठी गर्दी झाली. इतक्या जास्त आणि सतत वाढत जाणाऱ्या मजुरांना एकाच ठिकाणी कोणत्याही कामधामाशिवाय ठेवणे असंभव जरी नसले तरी ते भयानक कठीण काम नक्कीच होते. त्यांच्या शौच्यादींच्या सवयीसुद्धा चांगल्या नव्हत्या. या समुदायातील काही लोक अपराधाच्या कारणाकरिता तुरुंगात जाऊन आलेले होते. काही तर खुनाचा गुन्हा करणारेही होते. काही चोरीच्या गुन्ह्याची शिक्षा भोगून आलेले होते तर काही व्यभिचाराच्या कारणाकरिता. संप करणाऱ्या मजुरांत नैतिकतेच्या कारणाकरिता मी कोणताही भेदभाव करू शकत नव्हतो. आणि जर मी भेदभाव करण्याचा प्रयत्न केला असता तर आपला दोष कोणी मान्य केला असता? मी जर कोणाचा काझी झालो असतो तर मी विवेकहीन ठरलो असतो. माझे काम केवळ संपाचे संचालन करणे होते. त्यात इतर सुधारणा मिसळता येऊ शकत नव्हत्या. छावणीत नैतिक नियमांचे पालन होईल हे पाहणे माझे काम होते. तिथे येणारे भूतकाळात कसे होते हे पाहणे माझे काम

नव्हते. असे विविध प्रकारचे लोक कोणत्याही कामाशिवाय एका ठिकाणी स्थिर होऊन राहिले तर त्यांच्यात अपराध झाल्याशिवाय राहू शकले नसते. जितके दिवस आम्ही लोक इथे राहिलो होतो तितके दिवस शांततेत गेले हाच मुळी एक चमत्कार होता. सर्व लोक अशा शांततेत राहिले होते. हा आपला आपत्धर्मच आहे असे जणू काय त्यांना वाटले असावे.

मला माझ्या समस्येचे उत्तर सापडले. या समुदायाला मी ट्रान्सवालला नेले पाहिजे, आणि ज्याप्रमाणे फिनिक्सच्या १६ सत्याग्रहींना अटक झाली होती त्याप्रमाणे या समुदायालाही तुरुंगात बसवले पाहिजे. या समूहाला लहानलहान तुकड्यांमध्ये विभागून प्रत्येक तुकडीला सीमोल्लंघन करायला लावायचे हा विचार जसा मनात आला तसाच मी तो टाकून दिला. तसे केले असते तर त्यात वेळ फार गेला असता आणि सामुदायिक जेल भरोचा जो प्रभाव पडला असता तो थोडेथोडे मजूर तुरुंगात गेल्यामुळे पडू शकला नसता.

माझ्याजवळ जवळपास ५,००० माणसे गोळा झाली होती. इतक्या लोकांना आगगाडीने नेणे शक्य नव्हते. इतके पैसे मी कुठून आणणार होतो? आणि आगगाडीने गेलो असतो तर त्या सर्वांची परीक्षाही झाली नसती. न्यू कॅसलपासून ट्रान्सवालची सीमा ३६ मैल अंतरावर होती. नातालच्या सीमेवरील गाव चार्ल्सटाऊन आणि ट्रान्सवालच्या सीमेवरील गाव वॉक्सरस्ट होते. अखेरीस मी पायी प्रवास करण्याचे ठरवले. मजुरांबरोबर मी चर्चा केली. त्यांच्याबरोबर त्यांच्या बायकामुलेही होती. काही लोक का कू करू लागले. परंतु हृदय कठोर करण्याशिवाय माझ्याजवळ दुसरा कोणताही पर्याय नव्हता. मी त्यांना सांगून टाकले की ज्यांना परत खाणींवर जायचे असेल ते जाऊ शकतात. परंतु कोणीही परतायला तयार नव्हता. जे लोक अपंग होते त्यांना ट्रेनने पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. इतर सर्व चार्ल्सटाऊनला पायी जायला तयार झाले. हा टप्पा दोन दिवसात पूर्ण करायचा होता. असे केल्यामुळे सर्व लोक खुश झाले. आपल्या या पावलामुळे बिचाऱ्या लाजरसना आणि त्यांच्या कुटुंबियांना थोडी उसंत मिळेल हेही मजुरांच्या लक्षात आले. न्यू कॅसलच्या गोऱ्यांच्या मनात कॉलरा पसरण्याच्या भीतीने घर केले होते. कॉलरा पसरू नये म्हणून उपाययोजना करण्याच्या प्रयत्नात ते होते. परंतु चार्ल्सटाऊनच्या दिशेने प्रयाण करण्याच्या

आमच्या निर्णयाने त्यांची भीती दूर झाली आणि त्यांच्या उपाययोजनेच्या भीतीतून आम्हीही मुक्त झालो.

कूच करण्याची ही तयारी सुरु असतानाच खाण मालकांनी मला भेटण्याकरिता बोलावले. मी डरबनला गेलो. परंतु याकरिता नवीन प्रकरण आवश्यक आहे.

# १८. मालकांशी भेट आणि त्यानंतर

खाण मालकांच्या आमंत्रणावरून त्यांना भेटण्याकरिता मी डरबनला गेलो. मजुरांच्या संपाचा मालकांवर परिणाम झाल्याचे जरी मला आढळले तरी त्यांच्याशी झालेल्या चर्चेचा काही लाभ होईल असे मला वाटत नव्हते. परंतु सत्याग्रहींच्या नम्रपणाला काही सीमा नसते. समेटाची एकही संधी दवडण्याची त्यांची इच्छा नसते. यामुळे कोणी जर त्याना घाबरट समजत असेल तरी त्याला त्याचे काही वाटत नसते. ज्याच्या मनात विश्वास असतो आणि त्या विश्वासातून निर्माण झालेली शक्ती असते त्याला इतरांनी केलेल्या अवगणनेचे काहीही वाटत नसते. तो स्वतःच्या आंतरिक बळावर विसंबून असतो. यामुळे तो सर्वांशी नम्रपणाने वागतो. विश्वमताला शिक्षित करून ते आपल्याकडे वळवण्याचा सत्याग्रही प्रयत्न करत असतो.

यामुळेच मालकांचे निमंत्रण मला स्वागतार्ह वाटले. मी त्यांच्याकडे गेलो. तेथील वातावरण गरम असल्याचे मला आढळले. माझ्याकडून सर्व परिस्थिती समजावून घेण्याऐवजी त्यांचे प्रतिनिधी माझी उलटतपासणी घेऊ लागले. मी त्यांना योग्य उत्तर दिले.

मी त्यांना म्हणालो, “हा संप संपवणे तुमच्या हाती आहे.”

मालकांकडून उत्तर आले, “आम्ही काही अधिकारी नाही.”

मी म्हणालो, “तुम्ही अधिकारी नसूनही मजुरांकरिता बरेच काही करू शकता. तुम्ही मजुरांची बाजू मांडू शकता. तुम्ही जर सरकारकडे तीन पौंड कर रद्द व्हावा अशी मागणी केली तर सरकार तो कर रद्द करणार नाही असे मला वाटत नाही. तुम्ही इतर गोऱ्यांचे मतही तयार करू शकता.”

“परंतु सरकारने लावलेल्या या कराशी मजुरांच्या संपाचा काय संबंध आहे? खाणमालक जर मजुरांना त्रास देत असतील तर नक्कीच त्यांच्याविरुद्ध तुम्ही अर्ज करू शकता.”

“मजुरांच्या हाती संपाशिवाय दुसरा काही उपाय आहे असे मला वाटत नाही. त्यांच्यावर तीन पौंड कर मालकांकरिताच लावण्यात आला आहे. मालकांना मजुरांचे श्रम हवे आहेत, पण त्यांचे

स्वातंत्र्य नको. यामुळे हा कर रद्द व्हावा म्हणून मजूर जर संपावर जाणार असतील तर मला तरी त्यात मालकांवर काही अन्याय होतो आहे वा ही गोष्ट अनैतिक आहे असे वाटत नाही."

"मग मजुरांना कामावर जाण्याचा सल्ला तुम्ही देणार नाही काय?"

"मी लाचार आहे, असा सल्ला मी देऊ शकणार नाही."

"याचा परिणाम तुम्हाला माहीत आहे?"

"हो."

"यात तुमचे काय बिघडणार आहे? परंतु संपाची फूस देऊन गैरमार्गावर लावण्यात आलेल्या या मजुरांचे जे नुकसान होईल त्याची भरपाई तुम्ही करून देऊ शकाल?"

"समजूनउमजून आणि आपले नुकसान लक्षात घेऊन मजुरांनी हा संप केला आहे. स्वाभिमानाच्या नुकसानापेक्षा मोठ्या नुकासानाची मी कल्पना करू शकत नाही. मजुरांना ही मूलभूत गोष्ट कळली आहे हीच माझ्याकरिता फार मोठ्या समाधानाची गोष्ट आहे."

मालकांच्या प्रतिनिधींशी माझी अशा प्रकारे चर्चा झाली. संपूर्ण बोलणे या वेळी मला आठवत नाही. चर्चेचे जे मुद्दे मला आठवतात ते मी इथे मांडले आहेत. सरकारबरोबर मालकाचा आधीपासून जो विचारविमर्श सुरू होता त्यावरून त्यांना आपली बाजू दुबळी वाटते हे माझ्या लक्षात आले होते.

डरबनला जात असताना आणि तेथून परतत असताना आगगाडीच्या गार्डावर आणि इतर लोकांवर संपाचा आणि संपकऱ्यांच्या शांततेचा फार चांगला प्रभाव पडला असल्याचे मला आढळले. मी तर तिसऱ्या वर्गातूनच प्रवास करत असे. परंतु तिथेही गार्ड वगैरे अधिकारी माझ्या आजूबाजूला गोळा व्हायचे आणि आस्थापूर्वक मला सर्व हकिगत विचारायचे. संप यशस्वी व्हावा अशी त्यांची इच्छा असायची. माझ्याकरिता ते अनेक लहानमोठ्या सोयी पुरवायचे. त्यांच्याबरोबर माझे अतिशय निर्मळ संबंध होते. एकाही सोयीकरिता मी त्यांना लालूच दाखवत नसे. ते स्वतःहोऊन सौजन्याने वागत याचा मला आनंद होत असे. परंतु सौजन्य विकत घेण्याचा मी

कधीही प्रयत्न केला नाही. गरीब, अशिक्षित, अडाणी मजूर इतका निर्धार दाखवू शकतात ही गोष्ट त्यांना आश्चर्याची वाटत होती. आणि निर्धार आणि शौर्य हे गुण तर असे आहेत की ज्यांचा प्रभाव विरोधकांवरही पडल्याशिवाय राहू शकत नाही.

मी न्यू कॅसलला परतलो. अजूनही चोहोकडून मजुरांचा प्रवाह वाहत येतच होता. संपावरील लोकांना मी सर्व परिस्थिती समजावून सांगितली. तुम्हाला कामावर परतायचे असेल तर तुम्ही परतू शकता असेही त्यांना सांगितले. मालकाच्या धमकीची गोष्टही मी त्या सर्वांना सांगितली. भविष्यातील धोक्याचे चित्रही मी त्यांच्यासमोर रेखाटले. मी त्यांना सांगितले की हा लढा केव्हा संपेल हे सांगणे कठीण आहे. तुरुंगवासात होणाऱ्या त्रासाचेही वर्णन मी त्यांच्यासमोर केले. परंतु आपल्या निर्धारावर सगळे अढळ राहिले. निर्भयपणे ते उत्तरले, “जोपर्यंत तुमची लढायची तयारी असेल तोपर्यंत आम्ही हार पत्करणार नाही. आम्हाला दुःख कळते आणि म्हणूनच आम्ही तुमच्याबरोबर आहो.”

आता तर आमच्याकरिता केवळ कूच करणेच शिल्लक होते. एके दिवशी सायंकाळी मी त्या लोकांना सांगितले की उद्या सकाळी आपल्याला निघायचे आहे (२८ ऑक्टोबर १९१३). रस्त्यात चालण्याचे नियम मी त्यांना वाचून दाखवले. पाचसहा हजारांच्या समूहाला समजावून सांगणे ही काही गंमत नसते. त्यांची नक्की संख्याही मला माहीत नव्हती, आणि त्या सर्वांचे नाव, पत्तेही माझ्याजवळ नव्हते. माझ्याबरोबर राहण्याची इतके लोक इच्छा करत होते हीच माझ्याकरिता समाधानाची गोष्ट होती. प्रत्येक संपकऱ्याला दीड पौंड डबलरोटी आणि अडीच तोळे साखर याशिवाय अधिक काही खायला देणे माझ्या आवाक्यापलीकडील होते. मी त्यांना सांगितले की रस्त्यात कोणी हिंदुस्तानी व्यापारी आपल्याला काही देईल तर आपण त्याचा स्वीकार करू. परंतु काहीही मिळाले नाही तर सर्वांना डबलरोटी आणि साखर यांवरच समाधान मानावे लागेल. बोअर युद्ध आणि झुलूंच्या बंडाचा मला जो अनुभव आला होता त्याचा या वेळी मला बराच लाभ झाला. आवश्यकतेपेक्षा कोणीही जास्त कपडे घेऊ नये हीही प्रवासातील एक अट होती. रस्त्यात कोणाचीही कोणतीही गोष्ट घेता येऊ शकत नाही. अधिकारी वा एखादा इंग्रज रस्त्यात भेटला

आणि त्याने शिव्या दिल्या वा मारले तरी ते सहन केले पाहिजे, पोलिसांनी अटक केली तर करू दिली पाहिजे आणि जरी मला अटक झाली तरी कूच सुरू राहिला पाहिजे इत्यादी सर्व गोष्टी मी संपकऱ्यांना समजावून सांगितल्या. मला अटक झाल्यानंतर एकामागून एक कोण नेतृत्व करील याची नावेही मी त्या सर्वांना संगितली.

सर्वांना माझ्या सूचना कळल्या. आमचा ताफा सुरक्षितपणे चार्ल्सटाऊनला पोहोचला. चार्ल्सटाऊनमध्ये हिंदुस्तानी व्यापाऱ्यांनी खूप मदत केली. त्यांनी आपल्या घरांचा आम्हाला उपयोग करू दिला. मशिदीच्या पटांगणात स्वयंपाक करण्याची परवानगी दिली. कूच करताना जे जेवण दिले जायचे ते स्थायी छावणीत नसायचे. यामुळे तिथे स्वयंपाकाकरिता भांड्यांची गरज पडायची. ही भांडीसुद्धा व्यापारी आम्हाला खुशीने द्यायचे. तांदुळ वगैरे तर माझ्याजवळ भरपूर प्रमाणात गोळा झाले होते. त्यात या व्यापाऱ्यांचाही चांगलाच सहभाग होता.

चार्ल्सटाऊन हे एक लहानसे गाव होते, त्या वेळी त्याची लोकसंख्या मोठ्या मुश्किलीने १,००० असावी. त्यात या हजारो माणसांचा समावेश करणे कठीण होते. केवळ स्त्रिया आणि मुले यांचीच घरात राहण्याकरिता आम्ही व्यवस्था केली होती. इतर सर्वांना मैदानातच मुक्काम करावा लागला.

चार्ल्सटाऊनच्या आमच्या आठवणी फार गोड आहेत, काही कडूही आहेत. गोड आठवणी प्रामुख्याने चार्ल्सटाऊनचा आरोग्य विभाग आणि त्याचे मुख्य अधिकारी डॉ. ब्रिस्को यांच्यासंबंधी आहेत. चार्ल्सटाऊनमधील लोकांची संख्या एकाएकी वाढलेली पाहून ते घाबरले होते. परंतु कोणतेही कठोर पाऊल न उचलता ते मला भेटले आणि काही सूचना देऊन मला मदत करण्यासंबंधीही ते बोलले. युरोपमधील लोक तीन गोष्टींबद्दल फार सावधगिरी बाळगत असतात. उलट आपण हिंदुस्तानी त्यासंबंधी काळजी घेत नाही. त्या आहेत १. पाण्याची स्वच्छता, २. रस्त्याची सफाई, ३. पायखान्याची सफाई. रस्त्यावर कोणालाही पाणी फेकू देऊ नका. शक्य असेपर्यंत लोकांना रस्त्यावर लघ्वी करू देऊ नका. आणि कुठेही काडीकचरा टाकू देऊ नका असे डॉ. ब्रिस्को यांनी मला सांगितले. त्यांनी सांगितलेल्या ठिकाणीच लोकांनी थांबावे आणि त्या

ठिकाणाच्या स्वच्छतेची जबाबदारी मी माझ्या शिरावर घ्यावी असेही ते म्हणाले. त्यांचे उपकार समजून मी या सर्व गोष्टी मान्य केल्या. यामुळे मला पूर्ण शांतता मिळाली.

आपल्या लोकांकडून या गोष्टींचे पालन करवून घेणे फार कठीण काम होते.,परंतु प्रवास करणाऱ्यांनी आणि माझ्या सोबत्यांनी हे काम सोपे केले. माझा नेहमीचा अनुभव आहे की जो सेवा करत असतो तो जर लोकांवर हुकूम चालवणार नसेल तर बरेच काम होऊ शकते. सेवक शारीरिक श्रम करतील तर लोकही तसे करतील. या छावणीत आम्हाला याचा बराच अनुभव आला. झाडझूड करणे, मळ उचलणे अशा प्रकारची कामे करताना मी आणि माझे सहकारी मुळीच मागेपुढे पाहत नसू. यामुळे इतर लोकही उत्साहाने ही कामे करत असत. आम्ही जर ही कामे केली नसती तर हुकूम कुणाला दिला असता? प्रत्येकजण जर सरदार बनून इतरांना हुकूम देऊ लागला तर अखेरीस एकही काम पूर्ण होणार नाही. परंतु जिथे सरदार स्वतःच सेवक बनून काम करू लागतो तिथे इतर लोक सरदारकीचा दावा कसा करतील?

सोबत्यांपैकी कॅलेनबॅक आधीच चार्ल्सटाऊन येथे पोहोचले होते. कुमारी श्लेषिनही हजर झाली होती. या तरुणीची मेहनत, सावधगिरीआणि प्रामाणिकपणा यांची जितकी प्रशंसा करावी तितकी कमीच ठरेल. हिंदुस्तानी सहकाऱ्यांपैकी मला केवळ स्व. पी. के. नायडू आणि ख्रिस्तोफर यांचीच नावे आठवतात. इतर लोकही होते. या सर्वांनी खूप मेहनत करून या कामात मदत केली होती. जेवणात प्रत्येकाला वरण आणि भात दिला जाई. भाजीपाला खूप मिळायचा. परंतु तो वेगळा शिजवण्याची सोय नव्हती. यामुळे तो डाळीतच टाकून दिला जाई. वेगळी भाजी करण्याकरिता आमच्याजवळ ना वेळ होता, ना भांडी. उपाशीतापाशी माणसे केव्हाही चालत येत असल्यामुळे चोवीसही तास स्वयंपाक सुरू असायचा. न्यू कॅसलमध्ये तर कोणालाच राहायचे नव्हते. सर्वांना रस्ता माहीत होता. यामुळे खाणीतून निघून मजूर सरळ चार्ल्सटाऊनला पोहोचायचे.

लोकांच्या धैर्याचा आणि सहनशीलतेचा मी जेव्हा विचार करतो तेव्हा मूर्तिमंत ईश्वरी महिमेचा मला प्रत्यय येतो. स्वयंपाक प्रमुख मीच होतो. कधी डाळीत पाणी जास्त पडायचे तर कधी डाळ कच्ची राहायची. कधी भाजी चांगली शिजायची तर कधी भात कच्चा राहायचा. असे जेवण मजेत

करणारे फारसे लोक मी या जगात पाहिले नाही. उलट दक्षिण आफ्रिकेच्या तुरुंगात मला असाही अनुभव आला आहे की अन्न थोडे कमी मिळाले, उशिरा मिळाले, वा कच्चे मिळाले तर सुशिक्षित माणसांचासुद्धा संताप झाल्याशिवाय राहत नसे.

स्वयंपाक तयार करण्यापेक्षा तो वाढण्याचे काम अधिक कठीण होते, आणि हे काम केवळ माझ्याच हातात असायचे. शिजलेल्या, न शिजलेल्या अन्नाचा हिशोब अखेरीस मलाच द्यावा लागणार होता. अन्न कमी असेल आणि खाणारे एकदम वाढले तर अशा वेळी वाढताना सर्वांचे समाधान करणे माझेच काम होते. मी कमी वाढले तर स्त्रिया एकदा तरी माझ्याकडे नाराजीने पाहायच्या. परंतु नंतर माझी परिस्थिती लक्षात आल्यानंतर हसतहसत निघून जात. ही दृश्ये मी जीवनात कधीही विसरू शकत नाही. मी त्यांना म्हणत असे, “काय करू? माझा निरुपाय आहे. माझ्याजवळ तयार स्वयंपाक कमी आहे आणि खाणारे लोक जास्त आहेत. यामुळे प्रत्येकाच्या वाट्याला जितके येईल तितकेच मी देऊ शकतो.” इतक्याने त्यांच्या लक्षात परिस्थिती यायची. ‘संतोषम्’ म्हणत त्या निघून जायच्या. सर्व गोड आठवणी झाल्या. कडू आठवण ही आहे की लोकांना थोडासा जरी वेळ मिळाला तरी ते आपसात भांडू लागायचे. याहूनही वाईट गोष्ट ही आहे की छावणीत व्यभिचाराची उदाहरणे आढळून यायची. गर्दीची सीमा नसल्यामुळे स्त्रीपुरुषांना सोबत ठेवावेच लागायचे. व्यभिचाऱ्याला लाजलज्जा कुठून असणार? अशा घटना घडताच मी घटनास्थळी पोहोचत असे. व्यभिचारी शरमायचे. त्यांना वेगवेगळे ठेवण्यात आले. परंतु माझ्या लक्षात न आलेली अजून अशी किती उदाहरणे असतील कोण सांगू शकतो? या गोष्टीची अधिक चर्चा करणे निरर्थक आहे. छावणीत सर्व काही नीट सुरू होते असे काही नाही, आणि अशी उदाहरणे घडल्यानंतरही कोणीही माझ्याशी उद्धटपणे वागले नाही हे दाखवण्याकरिता मी इथे या गोष्टीची इतकी चर्चा केली आहे. या गोष्टीची अधिक चर्चा करणे व्यर्थ आहे. नीतीअनीतीतील भेद न ओळखणारे रानटी माणसासारखे लोकही अशा वातावरणात कसे सरळ आणि योग्य मार्गाने चालू लागतात हे अशा प्रसंगी मी अनेकदा अनुभवले आहे. आणि हे सत्य कळणे अधिक लाभदायक आणि आवश्यक आहे.

# १९. ट्रान्सवालमध्ये प्रवेश - १

आता आपण १९१३च्या नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला पोहोचलो आहो. पुढे जाण्यापूर्वी मी दोन घटनांचा उल्लेख करीन. न्यू कॅसलच्या तमिळ भगिनी सुरुवातीला जेव्हा तुरुंगात गेल्या तेव्हा डरबन येथील फातिमा मेहताकडून राहवले नाही. यामुळे तीसुद्धा तिची आई हनिफा बाई आणि एक सात वर्षांचा मुलगा यांना घेऊन तुरुंगात जाण्याकरिता वाक्सरस्टच्या दिशेने रवाना झाली. आणि आणि मुलीला अटक करण्यात आली परंतु मुलाला अटक करायला सरकारने साफ मनाई केली. फातिमाबाईच्या बोटांचे ठसे घेण्याचा सरकारने प्रयत्न केला, परंतु न घाबरता तिने बोटांचे ठसे द्यायला नकार दिला.

या वेळी मजुरांचा संप भरवेगात होता. त्यात पुरुष आणि स्त्रिया दोघेही भाग घेत. एका लहान मुलाला वाटेत सर्दी झाली आणि तो वारला. दुसरी एक बाई नाला ओलांडत असताना तिचा मुलगा कडेवरून नाल्यात पडला. मूल प्रवाहात ओढले गेले आणि मेले. परंतु तरीही या दोन्ही आया निराश झाल्या नव्हत्या. त्यांनी आपले चालणे सुरूच ठेवले. एक आई म्हणाली, “मेलेल्या मुलाचा शोक काय करायचा? तो परत येणार आहे का? जिवंत लोकांची सेवा करणे हाच आपला धर्म आहे.” गरिबीतही अशा शांत, वीरोचित, ईश्वरी श्रद्धेने परिपूर्ण आणि ज्ञानाने भरलेली अनेक उदाहरणे मी पाहिलेली आहेत. अशाच निर्धाराने अनेक लोक चार्ल्सटाऊनमध्ये आपल्या या कठीण धर्माचे पालन करत होते. परंतु आम्ही चार्ल्सटाऊनमध्ये शांततेकरिता आलो नव्हतो. ज्याला शांततेची अभिलाषा असते त्याने आपल्या अंतःकरणात तिचा शोध घ्यायचा असतो. बाहेर पाहणाराला मात्र, जर त्याला अंतर्दृष्टी असेल तर, चोहोकडे ‘इथे शांतता नाही’ असेच फलक लावलेले दिसले असते. परंतु अशाच अशांततेत मीराबाईसारख्या भक्ताने विषाचा पेला हातात घेऊन तो हसतहसत आपल्या तोंडाला लावला होता आणि सॉक्रेटीस आपल्या काळोख्या खोलीत बसून हातात विषाचा पेला धरून आपल्या मित्रांना गूढ ज्ञान देत होता आणि आपल्याला शिकवत होता, “ज्याला शांतता हवी असेल त्याने तिचा शोध आपल्या अंतःकरणातच घेतला पाहिजे.”

अशा शांततेत उद्या सकाळी काय होईल याची चिंता न करता सत्याग्रहींच्या या तुकडीने चार्ल्सटाऊनमध्ये आपला पडाव टाकलेला होता.

ट्रान्सवाल सरकारला मी पत्र लिहिले होते की आम्ही वास्तव्याच्या दृष्टीने ट्रान्सवालमध्ये प्रवेश करू इच्छित नाही. आमचा हा प्रवेश सरकारने केलेल्या वचनभंगाच्या विरोधात उठवण्यात आलेला प्रभावशाली आवाज आहे. तसेच आमच्या स्वाभिमानला लावण्यात आलेल्या धक्क्यामुळे आम्हाला झालेल्या वेदनांचे हे निखळ चिन्ह आहे. जर तुम्ही आम्हाला इथेच, चार्ल्सटाऊनमध्ये, अटक कराल तर आम्ही सर्व निश्चिंत होऊ. आणि जर आपण असे केले नाही आणि आमच्या तुकडीमधून कोणी लपूनछपून ट्रान्सवालमध्ये शिरला तर त्याकरिता आम्ही जबाबदार राहणार नाही. आमच्या या लढाईत गुप्त काहीही नाही. आमच्यापैकी कोणालाही व्यक्तिगत स्वार्थसिद्धी करायची नाही. आमच्यापैकी कोणालाही ट्रान्सवालमध्ये लपून प्रवेश करणे पसंत नाही. परंतु हजारो लोकांकडून जिथे काम घ्यायचे असते आणि प्रेमाशिवाय जिथे दुसरे कोणतेही बंधन नसते तिथे कोणाच्याही कामाकरिता आम्ही जबाबदार असू शकत नाही. याचबरोबर तुम्ही हेही लक्षात ठेवा की तुम्ही जर तीन पौंड कर रद्द केला तर गिरमिट्ये मजूर परत कामावर जातील आणि संप संपेल. आमची इतर दुःखे दूर करण्याकरिता या मजुरांना आम्ही सत्याग्रहात सामील करून घेणार नाही.

यामुळे आमची परिस्थिती अगदीच अनिश्चित होती. सरकार आम्हाला केव्हा अटक करील हे सांगणे कठीण होते. परंतु अशा परिस्थितीत सरकारच्या उत्तराची फार काळ वाट पाहणे शक्य नव्हते. डाक मिळण्याची एकदोन दिवस वाट पाहणे शक्य होते. यामुळे सरकारने जर अटक केली नाही तर ताबडतोब चार्ल्सटाऊन सोडून ट्रान्सवालमध्ये प्रवेश करावा असे आम्ही ठरवले. सरकारने जर ताफ्याला मार्गात अटक केली नाही तर ताफ्याला दररोज २० ते २४ मैल असा आठ दिवस प्रवास करायचा होता. आठ दिवसात टॉलस्टॉय फार्मवर पोहोचण्याचा आमचा उद्देश होता. लढाई संपत नाही तोपर्यंत सर्व सत्याग्रहींनी तिथेच थांबावे आणि शेतावर श्रम करून आपल्या उपजिविकेकरिता उत्पादन करावे असा विचार आम्ही केला होता. श्री कॅलनबॅक यांनी त्याकरिता

सर्व व्यवस्था करून ठेवली होती. फार्मवर मातीची घरे बांधायची आणि ते काम या संपकऱ्यांकडूनच करून घ्यावे असाही विचार आम्ही केला होता. जोपर्यंत ही घरे तयार होत नाहीत तोपर्यंत लहानलहान राहुट्या बांधून त्यात, म्हाताऱ्यांना, आजाऱ्यांना आणि अपंग लोकांना ठेवावे आणि शरीराने धडधाकट असलेल्या माणसांनी उघड्यावर राहावे असाही विचार आम्ही केला होता. यात एकच अडचण होती. ती म्हणजे आता पावसाळा सुरू होणार असल्यामुळे सर्वांना निवाऱ्याची गरज पडणार होती. परंतु या समस्येचा सामना करण्याचे धैर्यसुद्धा श्री कॅलनबॅकमध्ये होते.

ताफ्याला कूच करता वावे म्हणून आम्ही इतर तयारीसुद्धा केली होती. चार्ल्सटाऊनचे सज्जन डॉ. ब्रिस्को यांनी आम्हाला औषधांची एक पेटी तयार करून दिली आणि माझ्यासारख्या माणसालाही उपयोगात आणता येईल अशी काही अवजारेही दिली. ही पेटी आम्हाला स्वतःच उचलून न्यायची होती. ताफ्याबरोबर कोणतीही गाडी वगेरे नव्हती. या पेटीत कमीतकमी औषधे होती हे यावरून वाचकांच्या लक्षात आलेच असेल. एकाच वेळी शेकडो लोकांना देता येतील इतकी औषधे या पेटीत नव्हती. दररोज आम्हाला कोणत्या तरी गावात मुक्काम करायचा असल्यामुळे आणि तिथून कमी पडणारी औषधे मिळवता येत असल्यामुळे तसेच आमच्याबरोबर एकही रोगी व्यक्तीला ठेवू शकणार नसल्यामुळे असे करण्यात आले होते. अशा माणसाला मार्गातील गावातच सोडण्याची व्यवस्था आम्ही केली होती.

जेवणात डबलरोटी आणि साखर याशिवाय काहीही नव्हते. परंतु आठ दिवसांच्या प्रवासाकरिता डबलरोटी कशी मिळवावी? याशिवाय ताफ्यातील लोकांना दररोज रोटी वाटणे आवश्यक होते. यामुळे प्रत्येक मुक्कामावर आमच्याकडे डबलरोटी पोहोचवण्याची जबाबदारी कोणी तरी घेतली पाहिजे होती. पण हे करणार कोण? तिथे एकही हिंदुस्तानी भटियारा नव्हता. गावांमध्ये शहरातून डबलरोटी येत असे. कोणता तरी भटियारा आम्हाला ही डबलरोटी पुरवण्याकरिता तयार होईल आणि रेल्वेच्या ठराविक स्टेशनवर आम्हाला ती पोहोचवील तरची ही डबलरोटी आम्हाला मिळू शकली असती. वॉक्सरस्ट (चार्ल्सटाऊनजवळील ट्रान्सवालच्या

सीमेतील) चार्ल्सटाऊनपेक्षा जवळपास दुप्पट मोठे होते. तिथे एका गोऱ्या भटियाराचे मोठे दुकान होते. त्याने आमच्याबरोबर प्रत्येक ठिकाणी डबलरोटी पोहोचवण्याचा करार केला. आमच्या अडचणीचा फायदा घेऊन बाजारभावापेक्षा दुप्पट पैसे घेण्याचा त्याने प्रयत्न केला नाही, आणि त्यांने डबलरोटीसुद्धा चांगल्या कणकेची दिली. त्याने रेल्वे स्टेशनवर वेळेवर डबलरोटी पाठवली, आणि रेल्वे कर्मचाऱ्यांनी, तेही गोरेच होते, प्रामाणिकपणे ती डबलरोटी आमच्याकडे पोहोचवली. इतकेच नाही तर आमच्याकडे डबलरोटी पोहोचवण्याकरिता त्या लोकांनी विशेष काळजी घेतली आणि त्याकरिता काही खास व्यवस्थाही केली. आमचे कुणाशीही वैर नाही, आम्हाला कोणाचेही नुकसान करायचे नाही आणि केवळ दुःख सहन करूनच आम्हाला न्याय मिळवायचा आहे हे त्यांना माहीत होते. यामुळे मानवजातीमधील प्रेमभाव व्यक्त झाला. आमच्या आजूबाजूचे वातावरण शुद्ध झाले आणि शुद्ध राहिले. आम्ही सर्व - ख्रिश्चन, ज्यू, हिंदू, मुसलमान भाऊभाऊ आहो अशी अनुभूती आम्हा सर्वांना झाली.

आमच्या कूचची सर्व तयारी आता पूर्ण झाली होती. सरकारबरोबर समेट करण्याचा मी परत एकदा प्रयत्न केला. मी पत्र आणि ताराही पाठवल्या होत्या. मला जरी अपमानित करण्यात आले तरी सरकारला फोन करावा असे मी आता ठरवले. चार्ल्सटाऊनहून प्रिटोरियाला फोन करण्याची सोय होती. मी स्मट्सना फोन केला. त्यांच्या सचिवाला मी म्हणालो, “माझ्या कूचची तयारी पूर्ण झालेली आहे. वॉकरस्टचे गोरे उत्तेजित झालेले आहेत आणि आमच्या जीवालाही ते कदाचित धोका पोहोचवू शकतात. त्या लोकांनी आम्हाला तशी धमकीही दिली आहे हे तुम्ही स्मट्स यांना सांगा. असे व्हावे अशी स्मट्सचीसुद्धा इच्छा नसणार हे मला माहीत आहे. तीन पौंड कर रद्द करण्याचे वचन देण्याकरिता ते तयार असतील तर मी कूच करणार नाही. कायदेभंगाकरिता मी कायदेभंग करणार नाही. परंतु नाईलाजाने मला कायदेभंग करावा लागत आहे. जनरल स्मट्स माझे इतकेसुद्धा ऐकणार नाही काय?” अर्ध्या मिनिटात मला उत्तर मिळाले, “तुमच्याशी जनरल स्मट्स मुळीच संबंध ठेवू इच्छित नाही. तुम्हाला हवे ते तुम्ही करू शकता.” आणि फोन बंद झाला.

याच उत्तराची मी अपेक्षा केली होती. उद्धट उत्तराची मात्र मी अपेक्षा केली नव्हती. सत्याग्रहानंतर आमच्या राजकीय संबंधाला सहा वर्षे लोटलेली असल्यामुळे त्यांच्याकडून मी सौजन्यपूर्ण उत्तराची अपेक्षा केली होती. परंतु त्यांच्या सौजन्याने मी जसा फुगणार नव्हतो तसेच त्यांच्या तुसडेपणाच्या या उत्तराने मी धीरही सोडणार नव्हतो. माझ्या कर्तव्याची सरळ रेषा मला स्पष्ट दिसत होती. दुसऱ्या दिवशी ६ नोव्हेंबर १९१३ला ठरलेल्या वेळी सकाळी सहा वाजता आम्ही कूच करायला सुरुवात केली. आमच्या ताफ्यात २०३७ पुरुष, १२७ स्त्रिया आणि २७ मुले होती.

# २०. ट्रान्सवालमध्ये प्रवेश - २

अशा प्रकारे संघ म्हणा की ताफा म्हणा की प्रवाशांचा समुदाय म्हणा अगदी ठरलेल्या वेळी चार्ल्सटाऊनहून रवाना झाला. अदमासे एक मैलावर वॉकरस्टटचा एक नाला होता. तो नाला ओलांडता की वॉक्सरस्टमध्ये वा ट्रान्सवालमध्ये प्रवेश केला असे मानले जात असे. नाल्याच्या काठावर घोडेस्वार पोलिसांची एक तुकडी उभी होती. सर्वात आधी मी त्या तुकडीजवळ गेलो. मी खूण करीन तेव्हाच सीमेत प्रवेश करायचा असे पोलिसांच्या तुकडीकडे जात असताना मी ताफ्यातील लोकांना सांगितले होते. परंतु मी पोलिसांशी बोलत असतानाच लोक वेगात पुढे चालू लागले आणि त्यांनी नाला ओलांडला. ते ट्रान्सवालच्या सीमेत शिरले. घोडेस्वारांनी त्यांना घेरले. परंतु पोलिसांच्या अशा उद्धटपणामुळे अडवला जाणारा तो जमाव नव्हता. मी सर्वांना शांत केले आणि त्यांना नीट ओळीत चालायला सांगितले. पाच मिनिटात सर्व काही ठीक झाले आणि ट्रान्सवालमधील आमचा कूच सुरू झाला.

वॉक्सरस्टच्या गोऱ्यांनी दोन दिवसांपूर्वीच एक सभा घेतली होती, आणि तिच्यात आम्हाला विविध प्रकारच्या धमक्यासुद्धा देण्यात आल्या होत्या. ट्रान्सवालमध्ये हिंदुस्तानी जर प्रवेश करतील तर आम्ही त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव करू असे काही गोरे म्हणाले होते. गोऱ्यांना समजावण्याकरिता श्री कॅलनबॅक त्या सभेत गेले होते. परंतु त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता कोणीही तयार नव्हता. काही गोरे तर त्यांना मारण्याकरिता उभे राहिले. श्री कॅलेनबॅक स्वतः एक पहिलवान होते. सॅन्डोकडून त्यांनी मल्लविद्येचे धडे घेतले होते. त्यांना घाबरवणे कठीण होते. एका गोऱ्याने तर त्यांना द्वंद्वयुद्धाकरिता आव्हान दिले. श्री कॅलेनबॅक म्हणाले, "मी शांततेचा धर्म स्वीकारला आहे. यामुळे मी तुमच्याशी द्वंद्वयुद्ध करू शकत नाही. ज्याला कुणाला माझ्यावर प्रहार करायचा असेल तो तसे खुषीने करू शकतो. परंतु या सभेत मी बोलणारच. तुम्ही सर्व गोऱ्यांना या सभेकरिता निमंत्रण दिले आहे. सर्व गोरे निरपराधी माणसांना मारण्याकरिता तयार नाहीत हे सांगण्याकरिता मी इथे आलो आहे. तुम्ही हिंदुस्तानी माणसांवर जे आक्षेप घेत आहा ते खोटे आहेत हे सांगू इच्छिणारा कमीतकमी एक गोरा तरी आहे. तुम्हाला वाटते तसे काहीही करण्याची हिंदुस्तानींची

इच्छा नाही. ना त्यांना तुमचे राज्य घ्यायचे आहे ना तुमच्याशी त्यांना भांडायचे आहे आणि ना त्यांना तुमचा देश हिंदुस्तानींनी भरून टाकायचा आहे. त्यांना केवळ शुद्ध न्याय हवा आहे. जे हिंदुस्तानी ट्रान्सवालमध्ये प्रवेश करू इच्छितात ते वास्तव्याच्या उद्देशाने प्रवेश करू इच्छित नाहीत. त्यांच्यावर जो तीन पौंडांचा अन्याय्य कर लावण्यात आला आहे त्याच्या विरोधात प्रभावी आवाज उठवण्याकरिता ते ट्रान्सवालमध्ये प्रवेश करू इच्छितात. ते लोक शूर आहेत. ते धोका देणारे नाहीत. ते तुमच्याशी भांडणार नाहीत. परंतु तुमच्या गोळ्या सहन करूनही ते ट्रान्सवालमध्ये प्रवेश करतीलच. बस इतके सांगण्याकरिता मी इथे आलो आहे. हे सगळे सांगून मी तुमची सेवाच केली आहे. तुम्ही सावध व्हा आणि अन्याय करू नका." इतके बोलून कॅलेनबॅक थांबले. सभेत आलेले गोरे लाजले. द्वंद्वयुद्धाचे आव्हान देणारा तो मल्ल तर कॅलेनबॅकचा मित्र झाला.

या सभेसंबंधी आम्ही आधीच ऐकलेले असल्यामुळे वॉक्सरस्टच्या लोकांनी काही दंगल जरी केली तरी त्याकरिता आम्ही तयार होतो. सरकारने सीमेवर इतके जास्त पोलीस गोळा केले याचा अर्थ त्यांनी जर मर्यादातिक्रमण केले तर त्यांना अडवावे असाही असू शकतो. ते काहीही असले तरी आमची मिरवणूक शांततापूर्वक पुढे चालली होती. एकाही गोऱ्याने आमच्याशी खोडी केल्याचे मला आठवत नाही. हे अभूतपूर्व दृश्य पाहण्याकरिता ते बाहेर आले होते. त्यांच्यातील काहींच्या डोळ्यात मैत्रीभावही दिसत होता.

पहिल्याच दिवशी आमचा मुक्काम वॉक्सरस्टपासून आठ मैलांवरील पामफोर्ड नावाच्या स्टेशनवर होता. तिथे आम्ही पाचसहा वाजता पोहोचलो असू. लोकांनी डबलरोटी आणि साखर खाल्ली आणि मोकळ्या हवेत मैदानात सर्व आडवे झाले. कोणी भजन म्हणत होते, कोणी गोष्टी करत होते. रस्त्यात काही बाया थकल्या होत्या. मुलांना कडेवर घेऊन चालण्याचे धैर्य जरी त्यांनी दाखवले असले तरी पुढे चालण्याची त्यांच्यात शक्ती नव्हती. यामुळे मी त्यांना एका सज्जन हिंदुस्तानीच्या दुकानात सोडले आणि टॉलस्टॉय फार्मवर आम्ही पोहोचल्यानंतर तिथे यांना

पोहोचवून द्या असे त्या दुकानदाराला सांगितले. हिंदुस्तानी व्यापाऱ्याने माझी ही विनंती मान्य केली.

रात्र होत गेली तसतसा गोंगाट कमी होत गेला. मी झोपण्याच्या तयारीतच होतो. इतक्यात जोड्यांचा खडखड आवाज झाला. हातात कंदील घेऊन एका गोऱ्याला येताना मी पाहिले. मी सावध झालो. सर्व काही माझ्या लक्षात आले. तयारी तर मला काहीच करायची नव्हती. पोलीस अधिकारी मला म्हणाला, “माझ्याजवळ तुमच्याकरिता वॉरंट आहे.”

“केव्हा?” मी विचारले.

“आत्ताच.”

“तुम्ही मला कुठे न्याल?”

“या क्षणी तर जवळच्या रेल्वे स्टेशनवर. आणि गाडी येईल तेव्हा तिच्यात बसवून वॉक्सरस्टला.”

मी म्हणालो, “मग कोणालाही जागवल्याशिवाय मी तुमच्याबरोबर येतो. परंतु माझ्या एका सोबत्याला थोड्याश्या सूचना देतो.”

“अवश्य द्या.”

जवळच झोपलेल्या पी. के. नायडू यांना मी उठवले. माझ्या अटकेबद्दल मी त्यांना सांगितले, आणि सकाळ होईपर्यंत कोणालाही उठवू नका, सकाळ झाल्यानंतर नियमानुसार कूच करा. कूच सूर्योदयाच्या आधीच सुरू करा. विश्रांती घेण्याची आणि रोटी वाढण्याची वेळ आली की माझ्या अटकेची बातमी सर्वांना सांगा. त्याआधी कोणी विचारले तर त्याला ही गोष्ट सांगा. ताफ्याला जर पोलीस पकडत असतील तर पकडू द्या. आणि जर पकडले नाही तर ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे कूच सुरू ठेवा अशा सूचनाही मी नायडूंना दिल्या. नायडूंना कशाचीही भीती नव्हती. त्यांना जर अटक झाली तर काय करावे हेही मी त्यांना सांगितले.

श्री कॅलेनबॅक तर वॉक्सरस्टमध्ये आधीच हजर होते.

मी पोलीस अधिकाऱ्याबरोबर गेलो. सकाळ झाली. आम्ही दोघेही वॉक्सरस्टच्या ट्रेनमध्ये बसलो. वॉक्सरस्टच्या न्यायालयात माझ्यावर खटला चालला. आमच्याजवळ पुरेसा पुरावा नसल्यामुळे १४ नोव्हेंबर १९१३पर्यंत खटला स्थगित ठेवावा अशी विनंती सरकारी वकिलाने स्वतःच केली. खटला स्थगित झाला. माझ्याबरोबर १२२ स्त्रिया, ५० मुले आणि २,००० पुरुषांपेक्षाही अधिक लोक आहेत आणि खटल्याच्या तारखेपर्यंत मी त्यांना ठरलेल्या ठिकाणी पोहोचवून परत येऊ शकत असल्यामुळे मला जामीनवर सोडण्यात यावे असा अर्ज मी केला. सरकारी वकिलाने माझ्या अर्जाला विरोध केला. परंतु न्यायाधीश लाचार होते. माझ्यावर जो आरोप ठेवण्यात आला होता तो असा नव्हता की न्यायाधीशांना त्यावर स्वतःला हवा तसा निर्णय घेता यावा. यामुळे न्यायाधीशांनी मला ५० पौंडांच्या जामिनावर सोडून दिले. श्री कॅलेनबॅक यांनी माझ्याकरिता मोटार तयारच ठेवली होती. तिच्यात बसवून त्यांनीच मला ताफ्यापर्यंत पोहोचवले. 'द ट्रान्सवाल लिडर'च्या विशेष वार्ताहराची आमच्याबरोबर येण्याची इच्छा होती. आम्ही त्यालाही गाडीत बसण्याची परवानगी दिली. त्याने गाडीतील या प्रवासाचे, माझ्यावरील खटल्याचे आणि ताफ्याशी झालेल्या माझ्या भेटीचे सुंदर चित्रण आपल्या वर्तमानपत्रातून केले होते. लोकांनी माझे हार्दिक स्वागत केले. त्यांच्या उत्साहाला आणि आवेशाला सीमा नव्हती. यानंतर कॅलेनबॅक लगेच वॉक्सरस्टला परतले. चार्ल्सटाऊनला थांबलेल्या आणि नवीन येणाऱ्या हिंदुस्तानींची व्यवस्था करण्याच्या कामाची जबाबदारी त्यांच्यावर होती.

आम्ही आमचा कूच सुरू ठेवला. परंतु मला मोकळे ठेवणे सरकारला अनुचित वाटले. यामुळे दुसऱ्या दिवशी त्यांनी मला स्टॅन्डरटन येथे परत अटक केली. स्टॅन्डरटन तुलनेने मोठे गाव होते. तिथे मला विचित्र पद्धतीने पकडण्यात आले. ताफ्यातील लोकांना मी डबलरोटी वाटत होतो. तेथील हिंदुस्तानी व्यापाऱ्यांनी मुरब्याचे डबे भेट म्हणून दिले होते. यामुळे वाटण्याच्या कामाला जास्त वेळ लागत होता. न्यायाधीश माझ्याजवळ येऊन उभे राहिले. त्यांनी मला अन्न वाटण्याचे काम पूर्ण करू दिले. यानंतर त्यांनी मला एका बाजूला बोलावले. मी त्यांना ओळखत होतो. यामुळे त्यांना माझ्याशी काही बोलायचे आहे असे मला वाटले. परंतु हसत ते म्हणाले, "तुम्ही माझ्या कैदेत आहा."

मी म्हणालो, “माझा दर्जा वाढलेला दिसतो. पोलिसांऐवजी न्यायाधीश मला अटक करण्याकरिता आले आहेत. परंतु तुम्ही माझ्यावरील खटल्याची सुरुवात आताच करणार असाल ना?”

ते म्हणाले, “माझ्याबरोबर चला. न्यायालय सुरूच आहे.”

ताफ्यातील लोकांना कूच सुरू ठेवण्याचा सल्ला देऊन मी त्यांच्यापासून वेगळा झालो. न्यायालयात पोहोचल्यानंतर माझ्या काही सहकाऱ्यांनाही अटक करण्यात आली असल्याचे मला आढळले. ते पाच होते - पी. के. नायडू, बिहारीलाल महाराज, रामनारायण सिंह, रघू नरसू आणि रहीमखान.

मला लगेच न्यायालयासमोर उभे करण्यात आले. वॉक्सरस्ट येथे जामिनावर सुटण्याकरिता मी जी कारणे सांगितली होती त्याच कराणाकरिता मला जामिनावर सोडण्यात यावे असा मी अर्ज केला. इथेही सरकारी वकिलाने माझ्या अर्जाला विरोध केला. परंतु इथेही न्यायालयाने २१ नोव्हेंबर १९१३पर्यंत खटला स्थगित केला आणि मला ५० पौंडाच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर सोडून दिले. हिंदुस्तानी व्यापाऱ्यांनी माझ्याकरिता एक्का तयारच ठेवला होता. त्यात बसवून त्यांनी मला ताफ्यापर्यंत पोहोचवले. मी पोहोचेपर्यंत ताफ्याने तीन मैलांचेसुद्धा अंतर कापले नव्हते. आता बहुधा आम्ही टॉलस्टॉय फार्मवर पोहोचू असे मला आणि ताफ्यातील लोकांनाही वाटले. परंतु आमचा हा समज चुकीचा ठरला. असे असले तरी ताफ्यातील लोकांना माझ्या सुटकेची सवय झाली होती हाही काही कमी फायदा नव्हता. माझे सहकारीही तुरुंगातच राहिले.

# २१. सर्व लोक तुरुंगात

कूच करताकरता आता आम्ही जोहानिसबर्गपर्यंत पोहोचलो होतो. संपूर्ण प्रवास आम्ही आठ टप्प्यांमध्ये विभागला होता हे वाचकांना आठवत असेलच. आतापर्यंत आम्ही ठरवल्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने चाललो होतो. यामुळे आता आम्हाला केवळ चार टप्पे ओलांडायचे होते. परंतु जसजसा आमचा उत्साह वाढत चालला होता तसतशी सरकारची जागृतीही वाढत चालली होती. सरकारने आम्हाला पूर्ण प्रवास करू दिला असता आणि नंतर आम्हाला अटक केली असती तर त्यातून सरकारचा दुबळेपणा आणि कौशल्याचा अभाव दिसून आला असता. यामुळे सरकारला जर आम्हाला पकडायचे होते तर प्रवास पूर्ण होण्यापूर्वीच आम्हाला पकडणे आवश्यक होते.

सरकारच्या लक्षात आले की माझ्या अटकेनंतरही ना तर ताफा घाबरला, ना तो निराश झाला आणि ना त्याने कोणत्याही प्रकारची दंगल केली. त्याने दंगल केली असती तर सरकारला गोळीबार करण्याची पूर्ण संधी मिळाली असती. जनरल स्मट्स यांना तर आमचा निर्धार आणि आमची शांतता याच गोष्टी विशेषेकरून बोचत होत्या. असे ते म्हणालेसुद्धा होते. एखाद्या शांत माणसाचा कुठवर छळ केला जाऊ शकतो? स्वेच्छेने मेलेल्या माणसाला तुम्ही कुठवर मारणार? आणि मृत्यूला न घाबरणाऱ्या माणसाला मारण्यात कोणत्याही माणसाला गोडी वाटूच शकत नाही. म्हणूनच शत्रूला जिवंत पकडण्यात माणसाला मोठेपणा वाटत असतो. मांजरीला पाहून उंदिर जर पळू लागला नाही तर मांजरीला नवीन शिकारीचा शोध घ्यावा लागेल. सर्व बकऱ्या जर सिंव्हाच्या बाजूने येऊन बसल्या तर पुरुषसिंहाला त्यांची शिकार कराविशी वाटेल काय?

आमच्या शांततेत आणि निर्धारातच आमचा विजय दडलेला होता.

श्री पोलाक यांनी हिंदुस्तानात येऊन दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींची बाजू मांडावी अशी इच्छा गोखल्यांनी समुद्री तारेद्वारे व्यक्त केली होती. पोलाक जिथे कुठे जायचे तिथे उपयोगी सिद्ध व्हायचे. पोलाकचा स्वभावच असा होता. जे काम ते हाती घ्यायचे त्याच्याशी ते एकरूप व्हायचे. यामुळेच त्यांना हिंदुस्तानात पाठवण्याची तयारी सुरू होती. तुम्ही हिंदुस्तानात जाऊ शकता असे मी त्यांना पत्रातून कळवले होते. परंतु मला भेटल्याशिवाय आणि सगळ्या सूचना घेतल्याशिवाय

हिंदुस्तानात जाण्याची त्यांची इच्छा नव्हती. यामुळे आमचा कूच सुरू असतानाच मला भेटण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. अटकेचा धोका पत्करून तुम्हाला यायचे असेल तर येऊ शकता असे मी त्यांना तारेने कळवले. परंतु योद्धा कुठे धोका पत्करण्याकरिता घाबरत असतो? सरकारने सर्वांना जरी अटक केली असती तरी फिकीर नव्हती कारण अटक करवून घेण्याकरिताच ही लढाई होती. सरकार अटक करणार नसेल तर अटक व्हावी म्हणून या लढाईत सर्वांनी सरळ आणि नैतिक मार्गाने प्रयत्न करायचा होता. यामुळे अटकेचा धोका पत्करूनही श्री पोलाक यांनी मला भेटायचे ठरवले.

आम्ही हेडेलबर्गच्या जवळपास पोहोचलो होतो. तिथून जवळच्या स्टेशनवर उपरून पोलाक आम्हाला भेटण्याकरिता पायी आले. आम्ही बोलत होतो, आमचे बोलणे संपतच आले होते. त्या वेळी दुपारचे तीन वाजत आले असावे. आम्ही दोघेही ताफ्यासमोर चालत होतो. इतर प्रवासीही आमच्या गोष्टी ऐकत होते. पोलाकना डरबनला जाणारी सकाळची गाडी पकडायची होती. आता प्रभू रामचंद्रालाही ऐन राज्याभिषेकाच्या दिवशी जर वनवास मिळाला असेल तर पोलाक कुठे? आम्ही बोलत असतानाच एक घोडागाडी येऊन आमच्यासमोर उभी राहिली. तिच्यात आशियायी विभागाचे श्री चमनी आणि अजून एक पोलीस अधिकारी होते. दोघेही खाली उतरले. मला थोडे एकीकडे घेऊन त्यांच्यातील एक मला म्हणाला, “मी तुम्हाला अटक केलेली आहे.” अशा प्रकारे चार दिवसात मला तीनदा अटक झाली.

मी विचारले, “ताफ्याचे काय होईल?”

“सर्व काही ठीक होईल.”

मी काहीच बोललो नाही. पोलीस अधिकाऱ्याने मला पकडल्याची बातमीच लोकांना सांगू दिली. तुम्ही ताफ्याबरोबर जा असे मी पोलाक यांना सांगितले होते. मी जेव्हा लोकांना शांतता ठेवणे इत्यादींबद्दल सांगू लागलो तेव्हा अधिकारी महाशय म्हणू लागले, “आता तुम्ही कैदी आहा. आता तुम्ही कोणतेही भाषण देऊ शकत नाही.”

माझ्या मर्यादा माझ्या लक्षात आल्या. परंतु त्या लक्षात आणून देण्याची आवश्यकता नव्हती, कारण माझे बोलणे बंद केल्यानंतर अधिकाऱ्याने वेगात गाडी हाकण्याचा हुकूम गाडीवानाला दिला. एका क्षणात ताफा माझ्या दृष्टीआड झाला.आमच्या अहिंसेवर विश्वास ठेवून त्या निर्जन मैदैनात दोन हजार सत्याग्रहींमध्ये तो अधिकारी एकटा उभा होता. यामुळे काही वेळ तरी तिथे माझेच राज्य होते हे अधिकाऱ्याला माहीत होते असे दिसत होते. समन्स पाठवून त्याने मला अटक केली असती तरी मी त्याच्या ताब्यात गेलो असतो. अशा परिस्थितीत मी कैदी असल्याची मला जाणीव करून देण्याची आवश्यकता नव्हती. काफिल्यातील लोकांना मी जे काही सांगणार होतो ते सत्ताधिकाऱ्यांकरितासुद्धा हितकारक होते. परंतु आपले रूप दाखवल्याशिवाय ते कसे राहू शकणार होते? याचबरोबर मी हेही सांगितले पाहिजे की इतर अनेक अधिकाऱ्यांना आमच्या तुरुंगवासाचा अर्थ कळत होता. त्यांना माहीत होते की हा तुरुंगवास आमच्याकरिता अंकुशासारखा वा दुःखदायी नव्हता तर आमच्या दृष्टीने तो मुक्तिद्वार होता. यामुळे ते लोक आम्हाला सर्व प्रकारची सूट देत असत. इतकेच नाही तर आम्हाला अटक करणे सोयीस्कर व्हावे आणि वेळ वाचावा म्हणून ते आमची मदतसुद्धा मागत असत, आणि मदत मिळाल्यानंतर ते आमचे आभारसुद्धा मानत असत. वाचकांना या प्रकरणात दोन्ही प्रकारची उदाहरणे पाहायला मिळतील.

या ठिकाणावरून त्या ठिकाणी असे करत दोन्ही अधिकाऱ्यांनी अखेरीस मला हेडलबर्गच्या ठाण्यात नेले. रात्री मी तिथेच होतो.

काफिल्याला घेऊन पोलाक पुढे निघाले. सर्व ग्रेलिग्जटॅग येथे पोहोचले. तिथे बऱ्याच प्रमाणात हिंदुस्तानी व्यापारी होते. रस्त्यात अहमद मुहम्मद काछलिया आणि सेठ आमद भायात भेटले. काय होणार आहे हे त्यांना कळले होते. माझ्याबरोबर आलेल्या संपूर्ण काफिल्याला अटक करण्याची व्यवस्था करण्यात आली होती. यामुळे काफिल्याला अटक झाल्यानंतर एक दिवस उशिरा डरबनला पोहोचूनही हिंदुस्तानला जाणारे जहाज पकडता येईल असे पोलाक यांना वाटत होते. परंतु ईश्वराने काही वेगळेच योजिले होते.

१० नोव्हेंबर १९१३ला काफिला बेलफोर येथे पोहोचला. काफिल्याला पकडल्यानंतर त्यातील लोकांना नातालला पोहोचवण्याकरिता तिथे तीन रेल्वेगाड्या उभ्या होत्या. परंतु लोक थोडेसे अडून बसले. “गांधीला बोलावा, ते म्हणतील तर आम्ही अटक करून घेऊ देऊ आणि गाडीतही बसू” असा हट्ट त्यांनी धरला. परंतु त्यांचा हा हट्ट चूक होता. त्यांनी हट्ट सोडला नसता तर आम्ही चुकलो असतो आणि सत्याग्रहींचा तेजोभंग झाला असता. तुरुंगात जायचे तर त्यात गांधी कशाला? सैनिक कुठे आपल्या सेनापतीची निवड करू शकत असतात? काफिल्यातील लोकांची समजूत घालण्याकरिता चमनी यांनी पोलाक आणि काछलिया सेठ यांची मदत घेतली. काफिल्यातील लोकांना त्या दोघांनी सांगितले की तुम्हा लोकांचे ध्येयच तुरुंगात जाणे आहे. यामुळे सरकार आता तुम्हाला पकडण्याकरिता तयार असताना तुम्ही त्या निर्णयाचे स्वागत केले पाहिजे. असे करण्यातच सौजन्य आहे, आणि आपला विजयही यातच सामावलेला आहे. गांधींची दुसरी कोणतीही इच्छा असू शकत नाही हे तुम्हाला कळले पाहिजे. अखेरीस मोठ्या मुश्किलीने सर्वांची समजूत पटली आणि ते शांतपणे ट्रेनमध्ये बसले.

दुसरीकडे मला परत न्यायाधीशासमोर उभे करण्यात आले. वरील गोष्टीची मला काहीही माहिती नव्हती. मी परत एकदा खटला स्थगित करण्याची आणि मला जामिनावर सोडण्यात यावे अशी मागणी केली. आधीच्या दोन न्यायाधीशांनी मला अशी मुदत दिली असल्याचे आणि आता आम्हाला फार लहान टप्पा ओलांडायचा असल्यामुळे सरकारने एक तर संपूर्ण काफिल्याला अटक करावी अथवा त्याला टॉलस्टॉय फार्मपर्यंत पोहोचवण्याची परवानगी द्यावी असेही मी न्यायाधीशांना सांगितले. माझा अर्ज फेटाळण्यात आला परंतु माझी मागणी सरकारपर्यंत पोहोचवण्याची माझी विनंती मान्य करण्यात आली. या वेळी मला ते डंडी येथे घेऊन जाणार होते. गिरमिट्या मजुरांना नातालमधील खाणी सोडण्याकरिता भडकवल्याचा माझ्यावर मुख्य आरोप होता. हा खटला तिथेच चालणार होता. यामुळे मला त्याच दिवशी डंडीला नेण्यात आले.

इकडे श्री पोलाक यांना बेलफोरमध्ये अटक करण्यात आली नाही. उलट त्यांनी केलेल्या मदतीबद्दल अधिकाऱ्यांनी त्यांचे आभार मानले. सरकार पोलाकना अटक करू इच्छित नाही

असेसुद्धा श्री चमनी म्हणाले होते. परंतु हे विचार चमनींचे होते आणि सरकारच्या विचारांची त्यांना जितक्या प्रमाणात माहिती होती तितक्या प्रमाणात ते सरकारचे होते. परंतु सरकारचे विचार तर वारंवार बदलत असतात. पोलाकला हिंदुस्तानात जाऊ देऊ नये आणि हिंदुस्तानींकरिता अतिशय उत्साहाने काम करणाऱ्या पोलाक आणि कॅलेनबॅक यांना अटक करावी असा निर्णय अखेरीस सरकारने घेतला. यामुळे पोलाकना चार्ल्सटाऊनमध्ये अटक करण्यात आली. कॅलेनबॅक यांनाही अटक करण्यात आली. दोघांनाही वॉक्सरस्टच्या तुरुंगात ठेवण्यात आले.

माझ्यावर ११ नोव्हेंबर १९१३ला डंडी येथे खटला सुरू झाला आणि मला नऊ महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा झाली. परवाना नसलेल्या लोकांना ट्रान्सवालमध्ये मदत करण्याचा आरोपासंबंधीचा माझ्यावरील खटला अजून सुरू व्हायचाच होता. यामुळे १३ नोव्हेंबरला मला डंडीहून वॉक्सरस्टला नेण्यात आले. इथे मी श्री कॅलेनबॅक आणि श्री पोलाक यांना पाहिले. आम्हा तिघांची वाक्सरस्टच्या तुरुंगात भेट झाली. त्यामुळे आम्हाला असीम आनंद झाला.

१४ नोव्हेंबरला वॉक्सरस्टच्या न्यायालयात माझ्यावरील खटला सुरू झाला. या खटल्याचे वैशिष्ट्य असे होते की माझ्या विरोधात साक्ष देणारे साक्षीदार मलाच न्यायालयात आणायचे होते. पोलीस असे साक्षीदीर मिळवू शकले असते, परंतु फार मुश्किलीने. यामुळे या कामात पोलिसांनी माझी मदत घेतली. कैद्याने आपला अपराध कबूल केला केवळ इतक्या कारणाकरिता दक्षिण आफ्रिकेत शिक्षा होऊ शकत नाही. माझ्या बाबतीत अशी व्यवस्था झाली, परंतु बिचारे श्री कॅलेनबॅक आणि श्री पोलाक यांच्या विरोधात कोणी साक्ष द्यावी? आणि त्यांच्याविरुद्ध साक्ष मिळाली नाही तर त्यांना शिक्षा करता येऊ शकत नव्हती. या दोघांच्या विरोधात ताबडतोब साक्षीदार मिळणे कठीण होते. श्री कॅलेनबॅक यांना काफिल्याबरोबर राहायचे असल्यामुळे त्यांना आपला गुन्हा कबूल करण्याची इच्छा होती. परंतु पोलाकना हिंदुस्तानात जायचे होते. यामुळे या वेळी जाणूनबुजून तुरुंगात जाण्याची त्यांची इच्छा नव्हती. यामुळे पोलाकवर लावण्यात आलेले आरोप खरे आहेत काय असे जर आम्हाला विचारले तर त्यावर 'हो' अथवा 'नाही' असे काहीही म्हणायचे नाही असे आम्ही तिघांनी मिळून ठरवले.

या दोघांविरुद्ध मी साक्षीदार झालो. आम्हाला खटला लांबवायचा नव्हता. यामुळे एका दिवसातच खटला पूर्ण व्हावा म्हणून न्यायालयाला आम्ही पूर्ण मदत केली आणि एका दिवसातच आमचे खटले संपले. आम्हा तिघांनाही तीनतीन महिन्यांची शिक्षा झाली. कमीतकमी तीन महिने तरी आपण तिघे वॉक्सरस्ट तुरुंगात सोबत राहू असे आम्हाला वाटले होते. परंतु असे होऊ देणे सरकारला उचित वाटले नाही.

मध्यंतरीच्या काळात वॉक्सरस्ट तुरुंगात आम्ही मजेत राहिलो. तिथे दररोज नवनवीन कैदी यायचे आणि आणि बाहेरच्या बातम्या आम्हाला सांगायचे. या कैद्यात हरबतसिंग नावाचा जवळपास ७५ वर्षांचा एक म्हातारा होता. खाणींमध्ये तो नोकरीसुद्धा करत नव्हता. त्याने आपला करार वर्षांपूर्वी पूर्ण केलेला होता. यामुळे तो संपकरी नव्हता. माझ्या अटकेनंतर हिंदुस्तानींचा उत्साह द्विगुणित झाला होता आणि अनेक लोक नातालमधून ट्रान्सवालमध्ये प्रवेश करून अटक करवून घ्यायचे. हरबतसिंग असाच एक उत्साही सत्याग्रही होता.

हरबतसिंगला मी विचारले, “तुम्ही तुरुंगात का आला? तुमच्यासारख्या म्हाताऱ्यांना तुरुंगात येण्याकरिता आवाहन करण्यात आले नव्हते.”

हरबतसिंगने उत्तर दिले, “तुम्ही, तुमच्या बायकोने आणि तुमच्या मुलांनीसुद्धा आमच्याकरिता तुरुंगवास पत्करला तर मी कसा बाहेर राहू शकतो?”

“परंतु तुम्हाला तुरुंगाचा त्रास सहन होणार नाही. तुम्ही तुरुंगात राहू नका. तुमच्या सुटकेची व्यवस्था मी करू काय?”

“काहीही झाले तरी मी तुरुंगाबाहेर जाणार नाही. एक दिवस तर मला मरायचेच आहे. मला इथेच मरण येईल असा दिवस माझ्या नशिबी कुठे आहे?”

हा निर्धार मी कसा ढळवणार? मी तो ढळवण्याचा जरी प्रयत्न केला असता तरी तो ढळण्यासारखा नव्हता. या अशिक्षिताच्या ज्ञानासमोर मी नतमस्तक झालो. हरबतसिंगची जशी इच्छा होती तसेच घडले. त्याचा ५ जानेवारी १९१४ला तुरुंगातच मृत्यू झाला. वॉक्सरस्टहून डरबन

येथे त्याचा देह मागवण्यात आला. शेकडो हिंदुस्तानींच्या उपस्थितीत त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आमच्या सत्याग्रहाच्या लढाईत असे एक नाही तर अनेक हरबतसिंग होते. परंतु तुरुंगात मरण्याचे भाग्य केवळ हरबतसिंगच्याच नशिबी आले. यामुळेच दक्षिण आफ्रिकेच्या सत्याग्रहाच्या इतिहासात हरबतसिंगचा अतिशय सन्मानाने उल्लेख करण्यात आला आहे.

अशा प्रकारे तुरुंगाच्या आकर्षणाने लोकांनी तुरुंगात यावे हे सरकारला पसंत नव्हते. आणि तुरुंगातून सुटलेल्या लोकांनी माझा संदेश घेऊन बाहेर जावे हेही सरकारला पसंत नव्हते. यामुळे मला, कॅलेनबॅकना आणि पोलाक यांना वेगवेगळे ठेवण्याचा, कोणालाही वॉक्सरस्टमध्ये न ठेवण्याचा आणि एकाही हिंदुस्तानीला मी दिसू शकणार नाही अशा तुरुंगात मला ठेवण्याचा निर्णय सरकारने घेतला. ऑरेंजियाची राजधानी ब्लूमफौंटेनच्या तुरुंगात मला पाठवण्यात आले. ऑरेंजियात पन्नासपेक्षा जास्त हिंदुस्तानी नसावे. ते सर्व हॉटेलमध्ये नोकरी करत असत. अशा प्रदेशात एकही हिंदुस्तानी कैदी असूच शकत नव्हता. त्या तुरुंगात मी एकटा हिंदुस्तानी कैदी होतो. इतर सर्व कैदी गोरे वा हबशी होते. परंतु या एकाकी अवस्थेचे मला दुःख नव्हते. मी त्या सुखाचा उपभोग घेतला. मला ना काही ऐकायचे होते ना पाहायचे होते. इथे नवीन अनुभव मिळेल याचा मला आनंद होत होता. याशिवाय अभ्यास करण्याकरिता अनेक वर्षांपासून, असे समजा की १८९३पासून मला वेळ मिळाला नव्हता. आता अभ्यासाकरिता एक वर्षाचा वेळ मिळेल याचाच मला आनंद होत होता.

ब्लूमफौन्टनच्या तुरुंगात मला जो एकांत मिळाला त्याला सीमाच नव्हती. तिथे अनेक गैरसोयी होत्या, परंतु त्या सर्व सह्य होत्या. ते वर्णन वाचण्याकरिता मी वाचकांचा वेळ घेऊ शकत नाही. परंतु इतके सांगणे आवश्यक आहे की तेथील डॉक्टर माझे मित्र झाले होते. तुरुंगाधिकाऱ्याला केवळ आपले अधिकार कळत होते तर डॉक्टर कैद्यांचे अधिकार जपत होता. त्या काळात मी शुद्ध फलाहार करत असे. ना मी दूध घेत असे ना तूप खात असे. कोणतेही धान्यसुद्धा मी खात नसे. मी आहारात केळी, शेंगदाणे, निंबू आणि ऑलिव्ह ऑईल घेत असे. यातील एक जरी गोष्ट सडकी आली तर मला उपाशी मरावे लागायचे. यामुळे माझ्या आहारातील वस्तूंबद्दल ते फार

सावधगिरी बाळगायचे. त्यांनी माझ्या आहारात बदाम, अक्रोड आणि ब्राझिल नट यांची भर घातली. ते स्वतः सर्व फळे तपासून पाहायचे. तुरुंगात माझ्या कोठडीत फार कमी वारा येत असे. डॉक्टरांनी दार उघडे ठेवायला लावण्याकरिता खूप प्रयत्न केले. परंतु याच्या खोलीचे दार उघडे ठेवण्यात आले तर मी राजीनामा देईन अशी तुरुंगाधिकाऱ्याने धमकी दिली. तुरुंगाधिकारी वाईट माणूस नव्हता. त्याचा स्वभाव एकाच साच्यातून ढाळल्यासारखा होता. तो कसा बदलता येईल? दंगेखोऱ कैद्यांशी त्याचा संबंध यायचा. माझ्यासारख्या सज्जन कैद्याची आपण बाजू घेतली तर इतर कैदी आपल्या डोक्यावर बसतील ही त्याची भीती खरी होती. तुरुंगाधिकाऱ्याचा दृष्टिकोन मला चांगला कळू शकत होता. यामुळे केव्हा केव्हा डॉक्टर आणि तुरुंगाधिकाऱ्यात माझ्यावरून भांडण व्हायचे. तेव्हा माझी सहानुभूती नेहमी जेलरकडून असायची. तुरुंगाधिकारी अनुभवी आणि सरळ मार्गाने चालणारा माणूस होता, आणि त्याला त्याचा मार्ग स्पष्टपणे दिसत होता.

श्री कॅलेनबॅक यांना वाक्सरस्ट येथील तुरुंगात आणि पोलाक यांना जर्मिन्स्टन येथील तुरुंगात नेण्यात आले.

परंतु सरकारची ही सर्व खटपट व्यर्थ होती. जेव्हा आकाशच फाटते तेव्हा त्याला ठिगळ कुठवर लावणार? नातालमधील गिरमिट्ये आता पूर्णपणे जागे झाले होते. जगातील कोणतीही सत्ता आता त्यांना पुढे जाण्यापासून अडवू शकत नव्हती.

# २२. कसोटी

सोन्याची पारख करणारा जोहरी नेहमी सोने कसोटीच्या दगडावर घासून पाहतो. अधिक परीक्षा करण्याकरिता तो सोने भट्टीत टाकतो. त्याला ठोकतो, त्यातील हीण काढून टाकतो व त्याला सुंदर बनवतो. दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींची अशीच कसोटी झाली. त्यांना ठोकले, भट्टीत टाकून तापण्यात आले आणि जेव्हा ते कसाला उतरले तेव्हा त्यांची किंमत कळू शकली.

काफिल्यातील प्रवाशांना विशेष ट्रेनमध्ये बसवून सहल करण्याकरिता नाही तर आगीत तापवण्याकरिता सरकार घेऊन गेली. रस्त्यात त्यांच्या खाण्यापिण्याची कोणतीही व्यवस्था करण्यात आली नव्हती. नाताल येथे पोहोचताच त्यांच्यावर खटला भरण्यात आला आणि त्यांना तुरुंगात पाठवण्यात आले. इथपर्यंत आम्ही कल्पना केलेली होती. इतकी आमची इच्छाही होती. परंतु हजारोंना तुरुंगात ठेवण्याचा अर्थ होतो खर्च वाढवणे आणि हिंदुस्तानींना जे हवे होते तेच करणे. शिवाय कोळशाच्या खाणीचे काम बंद राहिले असते ते वेगळेच. अशी परिस्थिती दीर्घ काळ कायम राहिली असती तर सरकारला तीन पौंड कर रद्द करणे भाग पडले असते. यामुळे संघ सरकारने नवीन युक्ती शोधली. एक नवीन कायदा तयार करून ज्या ज्या ठिकाणावरून गिरमिट्ये मजूर काम सोडून आले होते त्या त्या ठिकाणांनाच सरकारने तुरुंग बनवले आणि खाणीत काम करणाऱ्या नोकरांना त्या जेलमधील वार्डर बनवले. असे करून मजुरांनी जे काम स्वतःहोऊन सोडले होते ते काम सरकार त्यांच्याकडून बळजबरीने करवून घेऊ लागले. खाणी परत सुरू झाल्या. गुलाम आणि नोकर यांच्यात अंतर हे आहे की नोकर जेव्हा नोकरी सोडतो तेव्हा त्याच्यावर केवळ दिवाणी दावाच करता येऊ शकतो. परंतु गुलामाने नोकरी सोडली तर त्याला बळजबरीने कामावर परत आणता येऊ शकते. यामुळे आता ते मजूर पूर्णपणे गुलाम झाले होते.

परंतु इतके करणे पुरेसे नव्हते. मजूर शूर होते. त्यांनी खाणीत काम करायला साफ नकार दिला. यामुळे त्यांना फटक्यांचा मार सहन करावा लागला. एका क्षणात उद्धट झालेल्या अधिकाऱ्यांनी मजुरांना लाथा मारल्या, शिव्या दिल्या आणि मजुरांवर इतरही अनेक प्रकारचा जुलूम केला. अशा गोष्टींचा लेखी उल्लेखसुद्धा कुठेही नाही. हा सर्व अन्याय आणि अत्याचार

गरीब मजुरांनी मोठ्या धैर्याने सहन केला. या संपूर्ण अत्याचारासंबंधी हिंदुस्तानात गोखल्यांना तारेने कळवण्यात आले. एखाद्या दिवशी सविस्तर तार मिळाली नाही तर ते स्वतः विचारायचे. गंभीर आजारी असतानाही गोखले या तारांच्या प्रचाराचे काम करत असत. आजारातही ते दक्षिण आफ्रिकेतील कामाकडे लक्ष ठेवायचे. हे काम करताना त्यांनी रात्र पाहिली नाही की दिवस. परिणामी संपूर्ण हिंदुस्तान प्रक्षुब्ध झाला आणि दक्षिण आफ्रिकेच्या प्रश्नाला हिंदुस्तानात प्रमुख स्थान मिळाले.

हाच तो प्रसंग होता की जेव्हा (डिसेंबर १९१३) लॉर्ड हार्डिंग्ज यांनी मद्रास येथे आपले प्रसिद्ध भाषण केले होते आणि ज्यामुळे दक्षिण आफ्रिकेत आणि इंग्लंडमध्ये खळबळ निर्माण झाली होती. इतर वसाहतींवरअथवा ब्रिटिश साम्राज्यातील देशांवर महाराज्यपाल उघडपणे टीका करू शकत नव्हते. परंतु लॉर्ड हार्डिंग्ज यांनी संघ सरकारवर टीकाच केली नाही तर दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहींची बाजूही घेतली आणि त्यांच्या सविनय कायदेभंगाचे समर्थनही केले. लॉर्ड हार्डिंग्ज यांच्या या साहसावर इंग्लंडमध्ये थोडी कटू प्रतिक्रिया निर्माण झाली. परंतु त्यांनी आपल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप व्यक्त करण्याऐवजी त्याचे औचित्य घोषित केले. त्यांच्या या दृढपणाचा फार चांगला परिणाम झाला.

अटक करण्यात आलेल्या या शूर मजुरांची रजा घेऊन एक क्षण आपण खाणीबाहेरील नातालच्या इतर भागावर नजर टाकू या.

कोळशाच्या खाणी नातालच्या उत्तर भागात होत्या. परंतु सर्वात जास्त मजूर नातालच्या नैऋत्य आणि वायव्य भागात होते. वायव्य भागात फिनिक्स, वेरुलम, टोगाट इत्यादी ठिकाणे येतात तर नैऋत्य भागात इसिपिंगो, अमजिंटो, इत्यादी ठिकाणे येतात. वायव्य भागातील हिंदुस्तानी मजुरांच्या संपर्कात मी बराच काळ आलो होतो. त्यांच्यातील अनेक मजुरांनी माझ्याबरोबर बोअर राज्यातही काम केले होते. नैऋत्येकडील मजुरांच्या संपर्कात मी इतका आलो नव्हतो. या भागात माझे सहकारीही फार कमी होते. असे असले तरी खाणींमधील मजुरांचा संप आणि त्यांना झालेली अटक यांच्या बातम्या तिथे विजेसारख्या पसरल्या. दोन्ही भागात आपापले काम सोडून मजूर

बाहेर आले. काहींनी आपले सामानसुमानही विकून टाकले. लढाई दीर्घ काळ चालेल आणि इतर कोणी आपल्याला खायला देणार नाही असे समजून त्यांनी हे पाऊल उचलले होते. तुरुंगात जात असताना जास्त मजुरांना संप करण्यापासून अडवण्याची सावधगिरीची सूचना मी माझ्या सहकाऱ्यांना दिली होती. खाणींमधील मजुरांच्या सहकार्याने लढाई जिंकता येईल अशी आशा मला वाटत होती. सर्व हिंदुस्तानी मजूर म्हणजे साठ हजार मजूर संपावर गेले असते तर त्यांना खाऊपिऊ घालणे कठीण झाले असते हे स्पष्ट आहे. इतक्या सगळ्या लोकांना कूचवर नेण्याइतकी ना आमच्याजवळ सामग्री होती ना त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याइतके म्होरके आमच्याजवळ होते आणि ना त्यांना खाऊपिऊ घालण्याइतका पैसा आमच्याजवळ होता. याशिवाय इतके सगळे लोक गोळा झाल्यानंतर दंगली वगैरेंना आळा घालणेही अशक्य झाले असते.

परंतु येणाऱ्या पुराला कोण अडवू शकतो? मजुरांनी स्वतःहोऊन सर्व ठिकाणी काम सोडले. त्यांच्यावर लक्ष ठेवण्याकरिता त्या त्या ठिकाणी आपोआप स्वयंसेवकही तयार झाले.

आता संघ सरकारने बंदुकीचे धोरण अवलंबिले. संप करण्यापासून मजुरांना बळजबरीने अडवण्यात आले. संपकऱ्यांमागे घोडेस्वार लावले गेले आणि त्यांना आपल्या कामाच्या ठिकाणावर पाठवण्यात आले. मजुरांनी थोडासाही दंगा केला तर गोळीबार केला जात असे. त्यांच्यापैकी काहींनी परत कामावर जाण्याला विरोध केला. काहींनी दगडफेकही केली. पोलिसांनी गोळीबार केला. अनेक लोक जखमी झाले. दोनचार मेलेसुद्धा. परंतु मजुरांचा उत्साह कमी झाला नाही. स्वयंसेवकांनी मोठ्या मुश्किलीने वेरुलमजवळ मजुरांचा संप थांबवला. असे असले तरी सर्व मजूर काही कामावर गेले नाही. काही मजूर भीतीने लपले, पण ते कामावर गेले नाही. इथे एक घटना उल्लेख करण्यासारखी आहे. वेरुलममधील बहुतेक मजूर काम सोडून बाहेर पडले होते. अधिकाऱ्यांच्या सर्व प्रयत्नांनंतरही ते कामावर जाण्याकरिता तयार नव्हते. जनरल ल्यूकीन आपल्या सैनिकांबरोबर त्या वेळी तिथे हजर होते. मजुरांवर गोळीबार करण्याचा हुकूम देण्याच्या ते अगदी तयारीत होते. स्व. पारसी रुस्तुमजींचा लहान मुलगा बहादूर सोराबजी, जो त्यावेळी मोठ्या मुश्किलीने १८ वर्षांचा असावा, डरबनहून तिथे पोहोचला. जनरच्या घोड्याचा लगाम धरून तो म्हणाला, “गोळीबार करण्याचा हुकूम तुम्ही देऊ शकत नाही. माझ्या लोकांना

शांततेने कामावर नेण्याची जबाबदारी मी घेतो." जनरल ल्युकीन या मुलाच्या शौर्यावर मुग्ध झाले. त्यांनी सोराबजीला अपल्या प्रेमाची शक्ती अजमावण्याची सूट दिली. सोराबजींनी मजुरांना समजावले. मजुरांना सोराबजींचे म्हणणे पटले व ते कामावर परतले. अशा रीतीने एका तरुणाच्या समयसूचकता, निर्भयता आणि प्रेम या गुणांमुळे अनेक मजुरांची हत्या टाळली गेली.

वाचकांनी लक्षात ठेवले पाहिजे की सरकारने संपकऱ्यांवर जो गोळीबार केला होता आणि त्यांच्याशी जो दुर्व्यवहार केला होता तो पूर्णपणे बेकायदेशीर होता. न्यूकॅसल येथील खाणींवरील मजुरांशी सरकारने केलेला व्यवहार वरवर कायदेशीर दिसत होता. त्या मजुरांना संप करण्याकरिता नाही तर ट्रान्सवालमध्ये विनापरवाना प्रवेश करण्याकरिता अटक झाली होती. नातालच्या नैऋत्य आणि वायव्य भागातील मजुरांचा संप बेकायदेशीर मानला गेला होता. परंतु तसे कायद्याच्या बळावर नाही तर सरकारी सत्तेच्या बळावर करण्यात आले होते. अखेर सरकारची सत्ताच कायद्याचे रूप घेत असते. ब्रिटिश कायद्यात एक म्हण आहे - "राजा कधीही चूक करू शकत नाही." सत्तेला अनुकूल वाटेल वा सोयीस्कर वाटेल तोच अखेरीस कायदा ठरत असतो. सर्व सरकारांना हा दोष सारखाच लागू होत असतो. खरे सांगायचे तर कायद्याकडे अशा प्रकारे दुर्लक्ष करणे दर वेळी दोषच असतो असेही नाही. काही वेळा तर कायदा धरून ठेवणे हाच दोष असतो. एखादी सत्ता जेव्हा लोकसंग्रह करते आणि त्या सत्तेवरील नियंत्रण त्या सरकैरकरिता विनाशक ठरतात तेव्हा त्या नियंत्रणांचा अनादर करणे त्या सत्तेच कर्तव्य ठरते आणि तसे करणे विवेकाला धरूनही असते. परंतु असे प्रसंग क्वचितच येत असतात. सत्ता जेव्हा वारंवार निरंकुश होते तेव्हा ती लोकोपकारी राहूच शकत नाही. दक्षिण आफ्रिकी सरकारकरिता निरंकुश होण्याचे काहीही कारण नव्हते. मजूर संपाचा उपयोग अनादी काळापासून करत आले आहेत. संपकऱ्यांना कोणतीही दंगल करायची नव्हती हे माहीत करून घेण्याकरिता सरकारजवळ पुरेशी साधने होती. मजुरांच्या या संपामुळे जास्तीतजास्त तीन पौंड कर रद्द झाला असता. शांतताप्रिय लोकांच्या विरोधात शांततापूर्ण उपाययोजना उचित समजली जाऊ शकते. याशिवाय दक्षिण आफ्रिकेचे सरकार लोकोपकारी नव्हते. या सत्तेचे अस्तित्व गोऱ्यांच्या हिताकरिता होते. सामान्यपणे ते हिंदुस्तानींच्या विरोधात होते. यामुळे अशा एक पक्षीय सत्तेची निरंकुशता कोणत्याही प्रकारे

औचित्यपूर्ण वा क्षम्य ठरू शकत नसते. यामुळे माझ्या मते इथे सत्तेचा पूर्ण दुरुपयोग झाला. परंतु ज्या कामाकरिता अशा प्रकारे सत्तेचा दुरुपयोग केला जातो ते काम कधीही सिद्धीला जात नाही. केव्हा केव्हा क्षणिक यश मिळाल्यासारखे वाटते, पण अशा दुरुपयोगामुळे कायम यश कधीही मिळू शकत नाही. दक्षिण आफ्रिकेत जो तीन पौंड कराच्या रक्षणाकरिता सरकारने मजुरांवर गोळीबार केला होता तो तीन पौंड कर तर सरकारला तीन महिन्यातच रद्द करावा लागला होता. अशा रीतीने अनेकदा दुःख सुखाकरिता असते. दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींचा हा आवाज चोहोकडे पोहोचला. माझा विश्वास आहे की कोणत्याही यंत्रात यंत्राच्या प्रत्येक भागाचे आपले एक स्थान असते आणि ज्याप्रमाणे जंग, घाण इत्यादींमुळे यंत्रांची गती थांबते त्याचप्रमाणे काही गोष्टींमुळे आंदोलनाची गतीही थांबते. आपण केवळ ईश्वरी इच्छेचे निमित्त असतो. यामुळे कोणती गोष्ट आपल्याला अनुकूल आहे आणि कोणती प्रतिकूल हे आपल्याला कधीही कळू शकत नाही. याचा अर्थ आपल्याला केवळ साधनांच्या माहितीचा अधिकार आहे. साधन जर शुद्ध असतील तर परिणामांबद्दल आपण निर्भय आणि निश्चिंत असू शकतो.

सत्याग्रहाच्या लढाईत मी पाहिले की जसजसे लढणारांचे दुःख वाढत गेले तसतसा लढाईचा शेवट जवळ येत गेला. याशिवाय या युद्धात मी असेही पाहिले की अशा निर्दोष, निःशस्त्र आणि अहिंसक युद्धाच्या संकटकाळात आवश्यक ती साधने आपोआप जुळून येतात. अशा अनेक स्वयंसेवकांनी, ज्यांना मी आज ओळखतही नाही, स्वतःहोऊन आम्हाला या लढाईत मदत केली. असे सेवक बहुधा निस्वार्थी असतात. इच्छा नसतानासुद्धा ते अदृश्य रूपाने मदत करत असतात. ना त्यांच्या सेवेकडे कोणी लक्ष देत असतो, ना कोणी त्यांना सेवेचे प्रमाणपत्र देत असतो. त्यांच्या अशा बहुमूल्य कामाची नोंद ईश्वराच्या पुस्तकात होत असते इतकेसुद्धा काही स्वयंसेवकांना माहीत नसते.

दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानी आपल्या या अग्निपरीक्षेत उत्तीर्ण झाले. त्यांनी अग्निप्रवेश केला आणि त्यातून ते शुद्ध होऊन बाहेर पडले. या लढाईच्या शेवटच्या प्रकरणाची सुरुवात कशी झाली याचा विचार आपण पुढील प्रकरणात करू.

# २३. शेवटाची सुरुवात

वाचकांना माहीतच असेल की हिंदुस्तानी समाजाने शक्य तितक्या आणि अपेक्षेपेक्षा किती तरी जास्त शांततेच्या शक्तीचा अवलंब केला होता. वाचकांनी हेही पाहिले असावे की या शांत शक्तीचा अवलंब करणारांमध्ये बहुसंख्य लोक अशा गरीब आणि दलित समाजातील होते की ज्यांच्याकडून तशी अपेक्षा मुळीच करता येत नव्हती. वाचकांना हेही आठवत असेल की फिनिक्सचे दोन वा तीन जबाबदार कार्यकर्ते सोडले तर इतर सर्व तुरुंगात होते. फिनिक्सबाहेरील कार्यकर्त्यांमध्ये दिवंगत अहमद महमद काछलिया हेच असे कार्यकर्ते होते की जे तुरुंगाबाहेर होते. फिनिक्समध्ये राहणारांमध्ये श्री वेस्ट, कुमारी वेस्ट आणि मगनलाल गांधी तुरुंगाबाहेर होते. काछलिया सेठ सर्वसामान्य गोष्टींकडे लक्ष ठेवायचे. कुमारी श्लेशीन ट्रान्सवालचा सर्व हिशोब ठेवायची आणि सरहद्द ओलांडणाऱ्या लोकांची देखरेख करायची. श्री वेस्टवर 'इंडियन ओपिनियन'चा इंग्रजी विभाग चालवण्याची आणि गोखल्यांबरोबर तारव्यवहार करण्याची जबाबदारी होती. क्षणोक्षणी जेव्हा परिस्थिती बदलते तेव्हा पत्रव्यवहाराने काम कसे भागणार? पत्राप्रमाणे लांबलांब ताराच पाठवाव्या लागायच्या. हे नाजूक काम वेस्टना करावे लागायचे.

आता न्यूकॅसलप्रमाणेच फिनिक्स नातालच्या वायव्य भागातील संपकऱ्यांचे केंद्र झाले होते. शेकडो मजूर तिथे सल्ला घेण्याकरिता, आश्रयाकरिता येऊ लागले होते. अशा अवस्थेत सरकारची दृष्टी फिनिक्सकडे वळल्याशिवाय कशी राहू शकत होती? आजूबाजूला राहणाऱ्या गोऱ्यांचे डोळेसुद्धा लाल झाले. असे असले तरी तेथील मुलेसुद्धा धोक्याची कामे मोठ्या जबाबदारीने करत असत. मध्यंतरी वेस्टना अटक झाली. खरे सांगायचे तर वेस्टना अटक करण्यासारखे कोणतेही कारण नव्हते. वेस्ट आणि मगनलाल गांधी यांनी अटक करवून घेण्याकरिता कोणताही प्रयत्न करू नये आणि अटकेकरिता निमित्त होईल अशा प्रसंगापासून शक्य तितके दूर राहावे असे आमच्यात ठरले होते. यामुळे वेस्टनी अटकेकरिता कोणतेही कारण होऊ दिले नव्हते. परंतु सरकार सत्याग्रहींच्या गैरसोयीचा विचार थोडाच करणार होते! आणि कोणाला अटक करण्याकरिता सरकारला कारणांचीही गरज नव्हती. सत्ताधाऱ्याला एखादे काम करण्याची इच्छा

असणे हेच त्या कामाकरिता निमित्त होत असते. वेस्टना अटक झाल्याचे कळल्याबरोबर हिंदुस्तानातून योग्य आणि हुशार माणसांना दक्षिण आफ्रिकेत पाठवण्याकरिता गोखल्यांनी पाऊल उचलले. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहींना मदत करण्याकरिता लाहोरमध्ये जेव्हा सभा झाली तेव्हा ॲन्ड्र्यूजनी आपल्याजवळील सर्व पैसे सत्याग्रहींना देऊन टाकले होते. तेव्हापासून गोखल्यांची त्यांच्यावर नजर होती. यामुळे वेस्टना अटक झाल्याचे कळताच गोखल्यांनी ॲन्ड्र्यूजना तारेने विचारले, "तुम्ही ताबडतोब दक्षिण आफ्रिकेत जाऊ शकता?" ॲन्ड्र्यूजनी "हो" असे उत्तर दिले. याचबरोबर ॲन्ड्र्यूजचे परममित्र पिअर्सनही त्यांच्याबरोबर दक्षिण आफ्रिकेत येण्याकरिता  तयार झाले.

परंतु सत्याग्रहींची लढाई आता संपत आली होती. हजारो निर्दोष लोकांना तुरुंगात ठेवण्याची शक्ती दक्षिण आफ्रिकेच्या सरकारमध्ये नव्हती. हिंदुस्तानचे व्हाईसरायही ही गोष्ट सहन करण्याच्या मनःस्थितीत नव्हते. जनरल स्मट्स आता काय करतात याकडे सर्व जगाचे लक्ष लागलेले होते. अशा प्रकारे इतर सर्वसामान्य सरकार जे करतात तेच जनरल स्मट्सनी केले. यासंबंधात काही चौकशी करण्याची गरज नव्हती. हिंदुस्तानींवर जो अन्याय झाला होता तो सर्व जगाला माहीत होता. तो अन्याय दूर करण्याची गरज सर्वांना जाणवत होती. हिंदुस्तानींवर अन्याय झाल्याचे व तो दूर करणे आवश्यक असल्याचे जनरल स्मट्स यांनाही दिसू शकत होते. परंतु त्यांची स्थिती सर्प आणि बेडकासारखी झाली होती. मी तीन पौंड करही कमी करणार नाही आणि इतर कोणत्याही सुधारणासुद्धा करणार नाही असे जनरल स्मट्सनी दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांना समजावलेले असल्यामुळे त्यांना जरी न्याय करायचा होता तरी न्याय करण्याची शक्ती त्यांनी गमावलेली होती. परंतु तीन पौंड कर रद्द करणण्याशिवाय त्यांच्यासमोर दुसरा कोणताही उपाय राहिला नाही. लोकमताला घाबरणारे सरकार अशा प्रकारे चौकशीआयोग नेमून मार्ग काढत असतात. असा आयोग केवळ नावाकरिता चौकशी करत असतो. अशा आयोगाच्या चौकशीतून काय बाहेर पडणार असते हे चौकशीच्या आधीच सर्वांना माहीत असते. आयोगाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची सामान्यपणे प्रथा असते. अशा प्रकारे अशा आयोगाच्या चौकशीचा आधार घेऊन सरकार तोच न्याय करत असते जो करण्याकरिता त्याने आधी नकार

दिलेला असतो. जनरल स्मट्स यांच्या या आयोगात तीन सदस्यांची नियुक्ती झाली होती. या आयोगासंबंधीच्या आपल्या अटींची पूर्तता जोपर्यंत केली जाणार नाही तोपर्यंत या आयोगाचा आम्ही बहिष्कार करू अशी प्रतिज्ञा हिंदुस्तानींनी केली होती. सर्व सत्याग्रहींची तुरुंगातून सुटका करावी ही त्यातील पहिली अट होती. आयोगातील किमान एक सदस्य हिंदुस्तानी समाजातर्फे असला पाहिजे ही दुसरी अट होती. पहिली अट आयोगानेच काही प्रमाणात मान्य केली होती आणि आपले काम सोपे व्हावे म्हणून श्री कॅलेनबॅकची, श्री पोलाकची आणि माझी बिनशर्त सुटका करावी अशी शिफारस आयोगाने सरकारकडे केली होती. सरकारने आयोगाचा हा सल्ला मान्य केला आणि आम्हा तिघांनाही एकाच दिवशी (१८ डिसेंबर १९१३) सोडून दिले. आम्ही फारफार तर सहा आठवड्यांची शिक्षा भोगली असावी. दुसरीकडे वेस्टना सरकारने जरी पकडले होते तरी त्यांच्यावर खटला भरण्यासारखा त्यांनी कोणताही अपराध केलेला नसल्यामुळे त्यांनाही सरकारने सोडून दिले. ऍन्ड्र्युज आणि पिअर्सन दक्षिण आफ्रिकेत पोहोचण्यापूर्वीच या घटना घडलेल्या आहेत. यामुळे मी स्वतःच डरबनला जाऊन या दोन मित्रांना घेऊन आलो होतो. या घटनेची कल्पना नसल्यामुळे मला जहाजावर पाहून त्यांना आश्चर्यही वाटले आणि आनंदही झाला. या दोघांशी माझी ही पहिली भेट होती.

तुरुंगातून सुटल्यामुळे आम्हा तिघांचीही निराशाच झाली. बाहेरच्या घटनांची आम्हाला काहीही माहिती नव्हती.आयोगाच्या नियुक्तीच्या आम्हाला आश्चर्य वाटले. परंतु आयोगाला कोणतीही मदत करणे आम्हाला शक्य नसल्याचे आमच्या लक्षात आले. आयोगामध्ये हिंदुस्तानी समाजातर्फे एक तरी सदस्य असणे आवश्यक आहे असे मात्र आम्हाला नक्कीच वाटले. यामुळे आम्ही तिघेही डरबनला गेलो आणि तिथून २१ डिसेंबर १९१३ला जनरल स्मट्स यांना आम्ही एक पत्र लिहिले. त्याचा सारांश असा होता -

“आम्ही आयोगाचे स्वागत करतो. परंतु त्यातील श्री एलिसन आणि श्री वायली या दोन सदस्यांची ज्या पद्धतीने नेमणूक झाली तिला आमचा तीव्र विरोध आहे. व्यक्तिगत रूपाने आमचा त्यांना कोणताही विरोध नाही. परंतु या दोघांनीही हिंदुस्तानींबद्दलची आपली नाराजी अनेकदा व्यक्त

केली आहे. यामुळे त्यांच्याकडून न कळत अन्याय होण्याची शक्यता आहे. माणूस आपला स्वभाव एकाएकी बदलवू शकत नाही हे दोन्ही सदस्य आपले विचार बदलतील असे मानणे अनैसर्गिक होईल. आयोगामध्ये तटस्थ सदस्यांची संख्या वाढवण्यात यावी इतकेच आमचे म्हणणे आहे. या दृष्टीने आम्ही जेम्स रोजइनिज आणि सन्माननीय डब्ल्यू. पी. श्राईनर यांची नावे सुचवतो. हे दोघेही सर्वांना परिचित आहेत आणि आपल्या न्यायबुद्धीकरिता प्रसिद्ध आहेत. सर्व सत्याग्रहींना सोडून द्यावे अशी आमची दुसरी विनंती आहे. जर असे करण्यात आले नाही तर आमच्याकरिता तुरुंगाबाहेर राहणे कठीण होईल. आता त्या सत्याग्रहींना तुरुंगात ठेवण्याचे काहीही कारण राहत नाही. दुसरी गोष्ट अशी की आयोगासमोर जर आम्हाला साक्ष द्यायचीच असेल तर आम्हाला खाणींमध्ये आणि जिथेकुठे गिरमिट्ये मजूर राहतात तिथे जाण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. सरकार जर आमची विनंती मान्य करणार नसेल तर परत तुरुंगात जाण्याचे मार्ग आम्हाला शोधावे लागतील."

आयोगातील सदस्यांची नियुक्ती कोणत्याही पक्षाकरिता करण्यात आलेली नाही, आयोग केवळ सरकारच्या समाधानाकरिता आहे असे सांगून जनरल स्मट्स यांनी आयोगाचे सदस्य वाढवण्याकरिता नकार दिला. २४ डिसेंबरला मिळालेल्या या पत्रानंतर आमच्याजवळ एकच उपाय राहिला होता. तुरुंगात जाण्याची तयारी करून १ जानेवारी १९१४ला डरबन येथून तुरुंगात जाऊ इच्छिणारे लोक कूच करतील अशी घोषणा आम्ही केली. परंतु जनरल स्मट्स यांच्या पत्रात एक वाक्य असे होते की ज्याच्या आधारावर मी त्यांना परत पत्र लिहिले. ते वाक्य असे होते - "आम्ही निष्पक्ष आणि न्याय्य आयोगाची नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती करत असताना ज्याप्रमाणे आम्ही हिंदुस्तानींबरोबर विचारविनिमय केला नाही त्याचप्रमाणे खाणमालक आणि साखरवाल्यांशीही आम्ही विचारविनिमय केला नाही." वैयक्तिक पातळीवर मी जनरल स्मट्स यांना लिहिले की सरकारला जर हिंदुस्तानींना न्यायच द्यायचा असेल तर मला तुमच्याशी भेटण्याची आणि तुमच्यासमोर काही तथ्य ठेवण्याची परवानगी द्या. याच्या उत्तरात जनरल स्मट्स यांनी माझी विनंती मान्य केली. यामुळे आमच्या कूचचा कार्यक्रम काही दिवसांकरिता स्थगित झाला.

आम्ही नवीन कूचचा कार्यक्रम आखत आहो असे जेव्हा हिंदुस्तानात गोखल्यांनी ऐकले तेव्हा त्यांनी आम्हाला एक लांब तार पाठवली. तुमच्या या पावलामुळे माझी आणि लॉर्ड हार्डिंग्ज यांची फार विचित्र परिस्थिती होईल असे त्या तारेत लिहिले होते. त्यांनी दुसरा कूच थांबवण्याचा आणि आयोगासमोर साक्ष देऊन आयोगाला पूर्ण सहकार्य करण्याचा जोरदार सल्ला आम्हाला दिला.

यामुळे आमच्यासमोर धर्मसंकट उभे राहिले. आयोगाची सदस्यसंख्या जर वाढवण्यात आली नाही तर आयोगाचा बहिष्कार करण्याची प्रतिज्ञा हिंदुस्तानी समाजाने केली होती. लॉर्ड हार्डिंग्ज नाराज झाले वा गोखले दु:खी होणार असले तरी घेतलेली प्रतिज्ञा मोडणे कसे शक्य होते? गोखल्यांच्या भावनेचा, त्यांच्या प्रकृतीचा आणि आमच्या निश्चयामुळे त्यांच्या नाजूक प्रकृतीवर होणाऱ्या परिणामांचा आम्ही विचार करावा असे ॲन्ड्र्यूजनी सुचवले. माझीही अशीच इच्छा होती. समाजाच्या नेत्यांबरोबर विचारविनिमय करून अखेरीस आम्ही असा निर्णय घेतला की आयोगाचे सदस्य वाढवले गेले नाही तर मोठ्यातमोठा धोका पत्करूनही आम्ही आयोगाचा बहिष्कार केलाच पाहिजे. याकरिता जवळपास १०० पौंड खर्च करून आम्ही गोखल्यांना एक लांबलचक तार पाठवली. याबाबतीत ॲन्ड्र्यूज आमच्याशी सहमत होते. त्या तारेचा आशय होता -

"तुमच्या वेदना आम्ही समजू शकतो. कितीही मोठा त्याग करून तुमचा सल्ला मानण्याची आमची इच्छा आहे. लॉर्ड हार्डिंग्ज यांनी आम्हाला अमूल्य मदत केली आहे. अखेरपर्यंत त्यांची आम्हाला मदत होत राहावी अशी आमचीही इच्छा आहे. परंतु तुम्ही आमची परिस्थिती समजून घ्यावी अशीही आमची इच्छा आहे. यात हजारो माणसांच्या प्रतिज्ञेचा प्रश्न सामावलेला आहे. आमची प्रतिज्ञा शुद्ध आहे. आमची संपूर्ण लढाई प्रतिज्ञेच्या पायावर उभारलेली आहे. आज जर प्रतिज्ञेचे बंधन नसते तर आमच्यापैकी अनेक लोकांचे स्खलन झाले असते. हजारो लोकांच्या प्रतिज्ञेवर एकदा पाणी फिरले तर नैतिक बंधनासारखी कोणतीही गोष्ट शिल्लक राहणार नाही. प्रतिज्ञा घेत असताना लोकांनी पूर्ण विचार केला होता. तिच्यात कोणत्याही प्रकारची अनीती तर नक्कीच नाही. बहिष्काराची प्रतिज्ञा करण्याचा समाजाला पूर्ण हक्क आहे. अशा प्रकारची प्रतिज्ञा कोणाकरिताही तोडण्यात येऊ नये आणि मोठ्यात मोठा धोका पत्करून तिचे पालन केले पाहिजे

असाच सल्ला तुम्ही आम्हाला द्याल अशी आमची अपेक्षा आहे. ही तार लॉर्ड हार्डिंग्ज यांनाही दाखवा. तुमची विचित्र परिस्थिती होऊ नये अशी आमची इच्छा आहे. ही लढाई आम्ही ईश्वराला साक्षी ठेवून आणि त्याच्या मदतीच्या आधारावर लढत आहो. वडीलधाऱ्या, मोठ्या लोकांची मदत आम्हाला मिळावी अशी आमची इच्छा आहे, तशी आमची अपेक्षाही आहे. अशा लोकांकडून आम्हाला जेव्हा मदत मिळते तेव्हा आम्हाला आनंदही होतो. परंतु त्यांची मदत मिळो वा न मिळो प्रतिज्ञेचे बंधन कोणत्याही अवस्थेत तुटायला नको असे आमचे नम्र मत आहे. आमच्या प्रतिज्ञापालनात आम्ही तुमच्या पाठिंब्याची आणि आशीर्वादाची अपेक्षा करतो."

ही तार गोखल्यांकडे पोहोचल्यानंतर त्यांच्या प्रकृतीवर वाईट परिणाम झाला. परंतु त्यांच्याकडून आम्हाला जी मदत मिळत होती तिच्यावर त्याचा काहीही परिणाम झाला नाही. आणि जर काही परिणाम झालाच असेल तर तो ती मदत वाढण्यात झाला. लॉर्ड हार्डिंग्ज यांना त्यांनी त्याबद्दल तार केली व आम्हाला त्यांनी काही वाऱ्यावर सोडले नाही. उलटपक्षी लॉर्ड हार्डिंग्जजवळ त्यांनी आमच्या भूमिकेचे समर्थनच केले. लॉर्ड हार्डिंग्जही आपल्या भूमिकेवर अढळ राहिले.

ॲन्ड्र्यूजबरोबर मी प्रिटोरियाला गेलो. याच वेळी संघ राज्याच्या रेल्वे कर्मचाऱ्यांचा फार मोठा संप झाला. या संपामुळे संघराज्य सरकारची परिस्थिती फार नाजूक झाली. अशा वेळी हिंदुस्तानींच्या कूचची सुरुवात केली पाहिजे असे मला सांगण्यात आले. परंतु मी घोषित केले की संपकरी गोऱ्यांना अशा प्रकारे मदत करू शकत नाही. आमचा हेतू सरकारला त्रास देण्याचा नाही. आमची लढाई गोऱ्यांच्या लढाईपेक्षा वेगळी आणि वेगळ्या प्रकारची आहे. आम्हाला कूच करायचाच असेल तर रेल्वे कर्मचाऱ्यांच्या गोंधळ संपल्यानंतर आम्ही केव्हा तरी कूच करू. आमच्या या निर्णयाचा चांगलाच प्रभाव पडला. रूटरने आमची सूचना तारेने लंडनला पाठवली. लॉर्ड ॲम्टहिल यांनी इंग्लंडहून आभाराचे पत्र पाठवले. दक्षिण आफ्रिकेतील इंग्रज मित्रांनीही आमचे आभार मानले. जनरल स्मट्सचे एक सचिव मला विनोदात म्हणाले, "मला तुमचे लोक अगदी आवडत नाहीत. त्यांना मदत करण्याची माझी मुळीच इच्छा नसते. परंतु आम्ही त्यांचे काय

करावे? संकटाच्या वेळी तुम्ही लोक आम्हाला मदत करता. तुम्हाला कसे मारावे? या इंग्रज संपकऱ्यांप्रमाणे तुम्ही दंगल करावी अशी माझी इच्छा असते. तशा परिस्थितीत आम्ही तुम्हाला सरळ करू शकतो. परंतु तुम्ही तर शत्रूलासुद्धा दुखवू इच्छित नाही. तुम्ही शिष्टाचाराची सीमा कधीही ओलांडत नसल्यामुळे तुमच्यासमोर आमचा निरुपाय होतो."

अशाच प्रकारचे उद्गार स्मट्स यांनीही काढले होते. वाचकांनी लक्षात ठेवले पाहिजे की सत्याग्रहींच्या सौजन्याचे आणि विनयाचे हे काही पहिलेच उदाहरण नव्हते. जेव्हा वायव्य भागातील मजुरांनी संप केला तेव्हा कापलेला ऊस जर योग्य ठिकाणी पोहोचवण्यात आला नसता तर गोऱ्या मालकांचे भरपूर नुकसान झाले असते. यामुळे १,२०० हिंदुस्तानी मजूर परत कामावर गेले होते आणि काम संपल्यानंतरच आपल्या संपकरी बांधवांबरोबर संपात सामील झाले होते. याशिवाय डरबनच्या गिरमिट्या मजुरांनी संप केला त्या वेळी तिथेही भंग्यांचे आणि दवाखान्यातील आवश्यक काम करणारे जे मजूर होते त्यांना परत खुशीने कामावर पाठवण्यात आले होते आणि तेही खुशीने परत कामावर गेले होते. भंग्यांची आणि दवाखान्यात काम करणारांची सेवा मिळाली नसती तर शहरात रोगराई पसरली असती आणि आजाऱ्यांच्या शुश्रुषेचे काम थांबले असते. अशा परिणामाची सतयाग्रही कधीही इच्छा करत नसतो. यामुळे अशा नोकरांना संपापासून दूर ठेवले होते. कोणतेही पाऊल उचलत असताना सत्याग्रहीने विरोधकाच्या परिस्थितीचा विचार केलाच पाहिजे. हिंदुस्तानींच्या अशा सौजन्यपूर्ण उहारणाचा जो अदृश्य प्रभाव चोहोकडे पडत होता तो मला दिसत होता. या प्रभावामुळे हिंदुस्तानींची प्रतिष्ठा वाढली आणि तडजोडीकरिता अनुकूल वातावरण निर्माण होऊ लागले.

# २४. तात्पुरती तडजोड

अशा प्रकारे समेटाकरिता अनुकूल वातावरण तयार होत होते. मी आणि ॲन्ड्रयूज प्रिटोरिया येथे पोहोचलो जवळपास त्याच वेळी सर बेंजामिन रॉबर्टसनही, ज्यांना लॉर्ड हार्डिंग्ज यांनी एका विशेष जहाजाने दक्षिण आफ्रिकेत पाठवले होते, तिथे पोहोचणार होते. परंतु जनरल स्मट्स यांनी दिलेल्या दिवशीच आम्हाला तिथे पोहोचायचे असल्यामुळे सर बेंजामिनची वाट न पाहताच आम्ही रवाना झालो. त्यांची वाट पाहण्याचे कोणतेही कारणसुद्धा नव्हते. समाजाच्या लढाईचा जो परिणाम होणार होता तो अखेरीस आमच्या शक्तीच्या प्रमाणातच होणार होता.

आम्ही दोघेही प्रिटोरियाला गेलो. परंतु जनरल स्मट्स मला एकट्यालाच भेटू इच्छित होते. ते रेल्वेच्या गोऱ्या मजुरांच्या कामात गुंतलेले होते. तो संप इतका भयंकर होता की संघ सरकारने सैनिकी कायदा (मार्शल लॉ) घोषित केला होता. गोऱ्या कर्मचाऱ्यांचे ध्येय केवळ पगारवाढच नव्हते तर त्यांना राज्यव्यवस्थाच आपल्या हातात घ्यायची होती. जनरल स्मट्स यांच्याशी माझी भेट फार थोड्या वेळेकरिता झाली. परंतु आधी म्हणजे म्हणजे आमच्या महान कूचच्या वेळी त्यांची जी परिस्थिती होती ती आता राहिली नसल्याचे माझ्या लक्षात आले. वाचकांना आठवतच असेल की त्या वेळी जनरल स्मट्सनी माझ्याशी बोलायलाही नकार दिला होता. सत्याग्रहाची धमकी तर जशी त्या वेळी होती तशीच आताही होती. असे असतानाही त्या वेळी त्यांनी माझ्याशी सत्याग्रहाची बोलणी करण्याकरिता नकार दिला होता. परंतु आज ते माझ्याशी बोलणी करण्याकरिता तयार होते.

हिंदुस्तानी समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कोणत्या तरी माणसाची सदस्य म्हणून आयोगात नियुक्ती झाली पाहिजे ही हिंदुस्तानी समाजाची मागणी होती. परंतु या बाबतीत जनरल स्मट्स दृढ होते. ते म्हणाले, “आयोगामध्ये ही वाढ केली तर सरकारचे महत्त्व कमी होण्याची शक्यता असल्यामुळे आणि असे केले तर मला ज्या सुधारणा करायच्या आहेत त्या करता येणार नसल्यामुळे आयोगात ही वाढ होऊच शकत नाही. श्री एलसन आमचा माणूस आहे हे तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे. सुधारणांच्या बाबतीत ते सरकारच्या विरोधात जाणार नाहीत. ते

सरकारकडून राहतील. कर्नल वायली नातालची एक प्रतिष्ठित व्यक्ती आहे. याशिवाय ते तुमचे विरोधक असल्याचाही समज आहे. यामुळे हे लोक जर तीन पौंड कर कमी करण्याकरिता सहमत झाले तर आमचे काम सोपे होईल. आमच्या स्वतःच्याच कटकटी इतक्या जास्त आहेत की आम्हाला क्षणाचीही फुरसत नाही. यामुळे तुमचा प्रश्न मिटवण्याची आमची इच्छा आहे. तुमच्या ज्या काही मागण्या आहेत त्या मान्य करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. परंतु आयोगाच्या संमतीशिवाय आम्ही तसे करू शकत नाही. तुमची स्थितीही मी समजू शकतो. जोपर्यंत आयोगात तुमच्यातर्फे कोणी नियुक्त केला जाणार नाही तोपर्यंत आयोगासमोर तुम्ही साक्ष देणार नाही अशी शपथ तुम्ही लोकांनी घेतलेली आहे. तुमची इच्छा नसेल तर साक्ष देऊ नका. परंतु जे साक्ष देण्याकरिता येतील त्यांना तुम्ही अडवू नका आणि आयोगाचे काम सुरू असेपर्यंत सत्याग्रह स्थगित करा. असे केल्यामुळे तुमचाही फायदा होईल आणि मलाही शांतता मिळेल याची मला खात्री आहे. संप करत असलेल्या हिंदुस्तानी मजुरांचा छळ होत असल्याचे तुम्ही सांगता. परंतु आयोगासमोर तुम्ही साक्ष देणार नसल्यामुळे तुम्ही लोक ही गोष्ट सिद्ध करू शकणार नाही. परंतु याचा विचार तुम्ही लोकांनी करायचा आहे."

जनरल स्मट्स असे म्हणाले होते. ते जे काही म्हणाले ते मला योग्य वाटत होते. संप करणारांचा शिपायांनी आणि वार्डर लोकांनी जो छळ केला होता त्याच्या भरपूर तक्रारी आम्ही केल्या होत्या. परंतु आयोगाचा बहिष्कार केल्यामुळे ती गोष्ट सिद्ध करण्याची संधी आम्हाला मिळणार नव्हती. हे एक धर्मसंकट होते. या बाबतीत आमच्यात मतभेद होता. शिपायांवर आणि वार्डरांवर हिंदुस्तानींनी जे आरोप केले ते सिद्ध केलेच पाहिजे आणि आयोगासमोर जर साक्ष देता येऊ शकत नसेल तर ज्या लोकांना समाज अपराधी समजतो त्या लोकांच्या विरोधात अशा प्रकारच्या तक्रारी करण्यात याव्या की त्यामुळे आरोप करणारांना न्यायालयात मानहानीचा दावा करता येऊ शकेल असे म्हणणारा एक पक्ष होता. परंतु मी या मताच्या विरोधात होतो. आयोगाचा निकाल सरकारच्या विरोधात जाण्याची फार कमी शक्यता होती. मानहानीसारख्या गोष्टी जाहीर करताना समाजाला भयंकर अडचणींना तोंड द्यावे लागले असते, आणि केवळ तक्रारी सिद्ध करण्यामुळे त्यापासून अधिक कोणताही लाभ झाला नसता. मानहानीच्या दाव्यात किती कटकटी

असतात ते एक वकील म्हणून मला माहीत होते. परंतु माझ्याजवळील सर्वात मोठा युक्तिवाद असा होता की सत्याग्रहींना दु:ख सहन करायचे असते, मृत्यूपर्यंतचे कोणतेही दु:ख सहन करावे लागले तरी त्याकरिता आपली तयारी असली पाहिजे हे सत्याग्रह सुरू करण्यापूर्वी सत्याग्रहींना माहीत होते. मग जी दु:खे त्यांना सहन करावी लागली ती सिद्ध करण्याकरिता इतका अट्टाहास कशाकरिता? बदला घेण्याची भावना तर सत्याग्रहींमध्ये असायलाच नको. यामुळे जिथे आपली दु:खे सिद्ध करण्यात विलक्षण अडचणी असतात तिथे सत्याग्रहीने शांत असणेच योग्य असते. सत्याग्रहीने मूलभूत गोष्टीकरिता लढाई केली पाहिजे, आणि इथे मूलभूत गोष्ट खुनी कायदा होती. जर तो रद्द होण्याची वा त्यात बदल होण्याची पूर्ण शक्यता असेल तर सत्याग्रहीने इतर कटकटीत पडायला नको. याशिवाय सत्याग्रहीच्या मौनाची कायद्याच्या विरोधात सुरू असलेल्या लढाईत मदतच होत असते. विरोधी पक्षातील फार मोठ्या वर्गाला हा सर्व युक्तिवाद समजावून सांगण्यात मी यशस्वी झालो होतो. यामुळे दु:खांच्या तक्रारींकरिता कायद्याची मदत घेण्याचा विचार सोडून देण्याचा निर्णय आम्ही घेतला.

# २५. पत्रांची देवघेव

तात्पुरत्या समेटाकरिता जनरल स्मट्स आणि माझ्यात पत्रव्यवहार झाला होता. २१ जानेवारी १९४४च्या माझ्या पत्राचा आशय असा होता -

"आमच्या प्रतिज्ञेमुळे आयोगासमोर साक्ष देऊन आम्ही आयोगाची मदत करू शकत नाही. आमची ही प्रतिज्ञा तुम्ही समजू शकता आणि तुम्हाला त्याबद्दल आदरही वाटतो. समाजाबरोबर विचारविनिमय करण्याचे तत्त्व तुम्ही मान्य करत असल्यामुळे साक्ष देण्याव्यतिरिक्त इतर प्रकारे आयोगाची मदत करण्याचा आणि आयोगाच्या कामात अडथळा न आणण्याचा सल्ला मी माझ्या देशबांधवांना देऊ शकतो. याशिवाय आयोगाचे कामकाज सुरू असताना आणि नवीन कायदे पारित होण्याच्या काळात सरकारची परिस्थिती विचित्र होऊ नये म्हणून सत्याग्रह स्थगित करण्याचा सल्लाही मी देऊ शकतो. तसेच महाराज्यपालांनी पाठवलेल्या सर बेजामिन रॉबर्टसन यांच्याशी सहकार्य करण्याचा सल्लासुद्धा मी माझ्या देशबांधवांना देईन.

"तुरुंगात आणि संपकाळात आम्हाला जे दुःख सहन करावे लागले होते आणि आमच्यावर जे अत्याचार झाले होते त्याबद्दल मी सांगितले पाहिजे की आमच्या प्रतिज्ञेमुळे आम्ही ती गोष्ट सिद्ध करू शकणार नाही. सत्याग्रही म्हणून आम्ही निश्चितच त्या दुःखांबद्दल आणि अत्याचारांबद्दल तक्रार करून राहिलेलो नाही, आणि त्यांचा बदला घेण्याचीही आमची इच्छा नाही. परंतु याचा अर्थ असा घेण्यात येऊ नये की या गोष्टी सिद्ध करण्याकरिता आमच्याजवळ कोणतीही साधने नाहीत. आपणसुद्धा आमची परिस्थिती समजून घ्यावी अशी आमची इच्छा आहे. याशिवाय आम्ही आता सत्याग्रह स्थगित ठेवत असल्यामुळे लढाईच्या संबंधात जे सत्याग्रही तुरुंगात बंद आहेत त्यांना सोडून दिले पाहिजे. आमच्या मागण्या काय आहेत हेसुद्धा इथे मी आपल्याला सांगू इच्छतो -

१. तीन पौंड कर रद्द करण्यात आला पाहिजे.

२. हिंदू-मुसलमान वगैरेंचे धार्मिक पद्धतीने झालेले विवाह कायद्याने वैध मानण्यात आले पाहिजे.

३. शिक्षित हिंदुस्तानींना या देशात प्रवेश करू दिला पाहिजे.

४. ऑरेंज फ्री स्टेटसंबंधी जे करार झाले आहेत त्यात सुधारणा झाली पाहिजे.

५. हिंदुस्तानींच्या स्वाभिमानाला कोणत्याही प्रकारे धक्का लागणार नाही अशा प्रकारे सध्याच्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन देण्यात आले पाहिजे.

"या मागण्यांसंबंधी तुमच्याकडून जर समाधानकारक उत्तर मिळाले तर सत्याग्रह स्थगित ठेवण्याचा सल्ला मी देईन."

या पत्राचे जनरल स्मट्स यांनी त्याच दिवशी जे उत्तर दिले त्याचा आशय असा होता -

"तुम्ही आयोगासमोर साक्ष देऊ शकत नाही याचे सरकारला दु:ख आहे. सरकारला तुमची स्थिती समजू शकते. सत्याग्रहींच्या दु:खाचा विषय सोडून देण्याची जी इच्छा तुम्ही व्यक्त केली आहे त्यामागील हेतूही सरकारला कळू शकतो. सत्याग्रहींबरोबर क्रूर व्यवहार केल्या गेल्याची गोष्ट सरकार स्पष्टपणे नाकारू इच्छिते. परंतु आयोगासमोर याबाबतीत तुम्ही कोणताही पुरावा सादर केला नाही तर सरकारकरिता करण्यासारखे काहीही शिल्लक राहत नाही. आणि सत्याग्रहींना सोडण्यासंबंधीचे आदेश तर सरकारने तुमचे पत्र मिळण्यापूर्वीच काढलेले आहेत. हिंदुस्तानी समाजाच्या दु:खासंबंधी तुम्ही जे लिहिले आहे त्या संबंधात आयोगाचा अहवाल मिळेपर्यंत सरकार कोणतेही पाऊल उचलणार नाही."

आमच्या या दोन्ही पत्रांची देवघेव होण्यापूर्वी मी आणि श्री ऍन्ड्रयूज जनरल स्मट्स यांना अनेकवेळा भेटलो होतो. मध्यंतरीच्या काळात सर बेंजामिन रॉबर्टसनही प्रिटोरिया येथे येऊन पोहोचले होते. सर बेंजामिन रॉबर्टसन जरी लोकप्रिय अधिकारी समजले जात होते आणि गोखल्यांचे शिफारसपत्रही त्यांनी आपल्या सोबत आणले होते तरी सामान्य इंग्रज अधिकाऱ्यांमध्ये जी दुर्बलता आढळते तिच्यापासून ते मुक्त नव्हते हे माझ्या लक्षात आले. आल्याबरोबर समाजात फूट पाडण्याचा आणि सत्याग्रहींना धमकावण्याला त्यांनी सुरुवात केली. प्रिटोरियात त्यांच्याशी माझी जी भेट झाली होती तिचा माझ्यावर चांगला प्रभाव पडला नाही.

सत्याग्रहींना धमकावण्यासंबंधी मला काही तारा मिळाल्या होत्या आणि त्याबद्दल मी सर बेंजामिन यांच्याशी बोललोही होतो. मला तर सर्वांबरोबर एकाच पद्धतीने म्हणजे स्पष्टपणे आणि सरळपणे वागायचे असल्यामुळे आम्ही दोघेही मित्र झालो. परंतु घाबरवणाराला अधिकारी घाबरवतच असतात आणि न घाबरणाराशी ते सरळपणे व्यवहार करत असतात असा अनुभव मला अनेकदा आला आहे.

अशा प्रकारे सरकारबरोबर आमचा तात्पुरता तह झाला आणि अखेरीस सत्याग्रह स्थगित झाला. यामुळे अनेक इंग्रज मित्र खुश झाले आणि अंतिम तह होण्याकरिता मदत करण्याचेही त्यांनी आश्वासन दिले. समाजाला हा तह मान्य करायला लावण्याचे काम काहीसे कठीण होते. समाजात निर्माण झालेल्या उत्साहाचा भंग व्हावा अशी कोणाचीही इच्छा नव्हती, आणि जनरल स्मट्सवर कोणी कसा विश्वास ठेवणार? काही लोकांनी मला १९०८च्या तडजोडीची आठवण दिली आणि सांगितले, “जनरल स्मट्सनी समाजाला एकदा धोका दिला आहे. सत्याग्रहात तुम्ही नवीन गोष्टींचा समावेश करत आहा असा आक्षेप त्यांनी अनेकदा घेतला आहे. समाजावर त्यांनी अनेक अत्याचार केले आहेत. असे असूनही तुम्ही जनरल स्मट्स यांना ओळखत नाही ही किती खेदाची गोष्ट आहे? हा माणूस तुम्हाला परत एकदा धोका देईल आणि मग तुम्ही परत सत्याग्रह करण्याकरिता सांगाल. त्या वेळी तुमच्यावर कोण विश्वास ठेवील? लोकांनी वारंवार तुरुंगात जावे आणि वारंवार नुकसान सहन करावे असे किती दिवस चालू शकेल? जनरल स्मट्सबरोबर तर एकच तडजोड होऊ शकते. समाजाची जी मागणी असेल तीच त्यांच्याकडून पूर्ण करून घेतली पाहिजे. त्यांच्याकडून वचन घेतले जाऊ शकत नाही. जो माणूस वचन देऊन वचनभंग करतो त्याच्यावर अजून कसा विश्वास ठेवता येऊ शकतो?”

काही ठिकाणी असा युक्तिवाद केला जाईल हे मला माहीतच होते. यामुळे याबद्दल मला काहीही आश्चर्य वाटले नाही. कितीही वेळा धोका देण्यात आला तरी एखाद्याच्या वचनावर अविश्वास करण्याकरिता जोपर्यंत स्पष्ट कारण नसेल तोपर्यंत सत्याग्रही त्याच्यावर विश्वास ठेवत असतो. ज्या सत्याग्रहीने दुःखाला सुख मानलेले असते तो अविश्वासाकरिता स्पष्ट कारण नसेल तर

दु:खांना घाबरून विरोधकावर अविश्वास करणार नाही. उलट आपल्या शक्तीवर विश्वास ठेवून विरोधी पक्षाद्वारे दिल्या जाणाऱ्या धोक्याबद्दल निश्चिंत राहील आणि कितीही धोका दिला गेला तरी तो विरोधकावर विश्वास ठेवत राहील. यामुळे सत्याची शक्ती वाढेल आणि विजय अजून जवळ येईल असे तो समजेल. यामुळे ठीकठिकाणी सभा घेऊन तडजोड स्वीकारण्याच्या गोष्टीबद्दल समाजातील लोकांची अखेरीस मी समजूत घालू शकलो आणि त्यांनासुद्धा सत्याग्रहाचे रहस्य अधिक चांगले उमगू शकले. या वेळेच्या तडजोडीत ऍन्ड्र्यूज मध्यस्थ आणि साक्षी होते. त्याचबरोबर व्हाईसरायचे प्रतिनिधी म्हणून सर बेंजामिन रॉबर्टसनही हजर होते. यामुळे हा समेट भंग होण्याची कमीतकमी भीती होती. मी जर समेट न करण्यावर अडून बसलो असतो तर तो समाजाचा दोष मानला गेला असता आणि सहा महिन्यांनंतर समाजाला जो विजय मिळाला तो मिळण्यात अनेक विघ्ने निर्माण झाली असती. सत्याग्रही आपल्याकडून कुणालाही बोटसुद्धा उचलण्याची संधी देत नसतो. अशाच अनुभवामुळे 'क्षमा वीरस्य भूषणम्' हे वचन लिहिण्यात आले असावे. अविश्वास हे भेकडपणाचे चिन्ह आहे. सत्याग्रहात निर्भयता सामावलेली आहे. निर्भय माणसाला भीती कशाची? आणि जिथे विरोधकाच्या विरोधावर विजय मिळवायचा असतो, विरोधकाचा नाश करायचा नसतो तिथे अविश्वास कसा?

यामुळे समाजाने तडजोड मान्य केल्यानंतर संघराज्याच्या संसदेची बैठकीची वाट पाहण्याचेच काम होते. मध्यंतरीच्या काळात आयोगाचे काम सुरू होते. हिंदुस्तानींतर्फे आयोगासमोर फारच कमी साक्षीदार गेले होते. समाजावर सत्याग्रहींचा किती प्रभाव होता हेसुद्धा यातून निर्विवादपणे दिसून आले. साक्षी देण्याकरिता सर बेंजामिन रॉबर्टसन, यांनी अनेक लोकांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु लढाईला फार जास्त विरोध असणारे तुरळक लोक सोडले तर इतर सर्व लोक अढळ राहिले. आयोगावर या घटनेचा किंचितही परिणाम झाला नाही. यामुळे आयोगाचे काम कमी झाले आणि त्याचा अहवाल लगेच प्रकाशित झाला. समाजातील लोकांकडून कोणत्याही प्रकारची मदत न मिळाल्याबद्दल आयोगाने आपल्या अहवलातून प्रखर टीका केली. शिपायांच्या दुर्वर्तनासंबंधीचा आक्षेप त्यांनी फेटाळला. परंतु समाजाच्या ज्या काही मागण्या होत्या त्या सर्व पूर्ण करण्याची सरकारकडे शिफारस केली. उदाहरणार्थ तीन पौंड कर रद्द करण्यात

आला पाहिजे, विवाहासंबंधातील हिंदुस्तानींची मागणी मान्य केली पाहिजे. इतरही काही लहानमोठ्या सुविधा पुरवण्याची आणि या सर्व गोष्टी लवकर करण्याची शिफारस आयोगाने केली. अशा प्रकारे जनरल स्मट्स यांच्या म्हणण्याप्रमाणे आयोगाचा अहवाल समाजाला अनुकुल राहिला. श्री ऍन्ड्र्यूज इंग्लंडकरिता आणि सर बेंजामिक रॉबर्टसन हिंदुस्तानकरिता रवाना झाले. आयोगाच्या अहवालानुसार कायदे केले जातील असे आम्हाला खात्रीपूर्वक सांगण्यात आले होते. हा कायदा काय होता आणि तो कशा प्रकारे करण्यात आला याची चर्चा पुढील प्रकरणात करण्यात येईल.

# २६. लढाईचा शेवट

ज्या कायद्याद्वारे तडजोड होणार होती त्या कायद्याचा मसुदा आयोगाचा अहवाल प्रकाशित झाल्यानंतर काही काळाने संघराज्याच्या राजपत्रात प्रकाशित करण्यात आला. तो मसुदा प्रकाशित होताच मला केपटाऊनला जावे लागले. संघराज्याच्या संसदेची बैठक तिथेच होणार होती. त्या विधेयकात नऊ कलम होते. ते संपूर्ण विधेयक 'नवजीवन'च्या दोन स्तंभांत छापले जाऊ शकत होते. त्यांतील एका भागाचा संबंध हिंदुस्तानींच्या विवाहाशी संबंधित होता. त्याचा आशय असा होता की जे विवाह हिंदुस्तानात कायदेशीर समजले जातील ते दक्षिण आफ्रिकेतही कायदेशीर समजले जातील. परंतु एकापेक्षा अधिक बायका कायदेशीर मानता येऊ शकत नाही. गिरमिट पूर्ण झाल्यानंतर हिंदुस्तानी मजूर दक्षिण आफ्रिकेत वास्तव्य करू इच्छित असेल तर त्याच्यावर दर वर्षी लावण्यात येणारा तीन पौंड कर रद्द करण्यासंबंधी विधेयकाचा दुसरा भाग होता. विधेयकाच्या तिसऱ्या भागात हिंदुस्तानींना देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रावर प्रकाश टाकण्यात आला होता. ज्या हिंदुस्तानींजवळ अशी प्रमाणपत्रे असतील त्या लोकांना दक्षिण आफ्रिकेत राहण्याचा किती प्रमाणात अधिकार सिद्ध होतो हे या भागात दाखवण्यात आले होते. या भागावर संघराज्याच्या संसदेत दीर्घ आणि गोड चर्चा झाली होती.

ज्या गोष्टींबद्दल  कायदा करता येणे शक्य नव्हते त्या सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण जनरल स्मट्स यांच्याशी माझा जो पत्रव्यवहार झाला होता त्यातून करण्यात आले होते. त्यात खालील गोष्टींची चर्चा करण्यात आली होती - केप कॉलनीमध्ये शिक्षित हिंदुस्तानींच्या प्रवेशाचे रक्षण, विशेष परवानगी मिळालेल्या शिक्षित हिंदुस्तानींना दक्षिण आफ्रिकेत प्रवेश करू देणे, मागील तीन वर्षांमध्ये (१९१४पूर्वी) दक्षिण आफ्रिकेत प्रवेश केलेल्या शिक्षित हिंदुस्तानींचा दर्जा ठरवणे आणि ज्या हिंदुस्तानींनी एकापेक्षा जास्त विवाह केले आहेत त्यांना आपल्या इतर बायकांना दक्षिण आफ्रिकेत आणण्याचा अधिकार देणे या सर्व प्रश्नांशी संबंध ठेवणाऱ्या जनरल स्मट्सच्या पत्रात अजून एक गोष्ट जोडण्यात आली होती. ती अशी होती -  "सध्याच्या कायद्याचा अंमल न्याय्य पद्धतीने आणि आज जे अधिकार हिंदुस्तानींना मिळालेले आहेत त्यांचे रक्षण होईल अशा

पद्धतीनेच करण्यात यावे अशी सध्याच्या कायद्याच्या अंमलबजावणीसंबंधी संघसरकारची नेहमीच इच्छा राहिली आहे." ३० जून १९१४ला मला हे पत्र लिहिण्यात आले होते. त्याच दिवशी जनरल स्मट्स यांना मी जे पत्र लिहिले त्याचा आशय असा होता -

"आजच्या तारखेचे तुमचे पत्र मला मिळाले. तुम्ही शांतपणे आणि सौजन्याने माझे बोलणे ऐकून घेतले याकरिता मी तुमचा कृतज्ञ आहे. हिंदुस्तानींच्या अडचणी दूर करणाऱ्या कायद्यामुळे आणि तुमच्यामाझ्यात झालेल्या पत्रव्यवहारामुळे सत्याग्रहाच्या लढाईचा शेवट होतो आहे. ही लढाई सप्टेंबर १९०६मध्ये सुरू झाली होती. हिच्यामुळे हिंदुस्तानी समाजाला अतिशय यातना सहन कराव्या लागल्या होत्या आणि त्याचबरोबर आर्थिक हानीही सहन करावी लागली होती. आणि यामुळे सरकारही चिंतित होते.

"तुम्हाला माहीतच आहे की माझ्या काही हिंदुस्तानी बांधवांच्या काही मागण्या फार जास्त होत्या. वेगवेगळ्या प्रांतांमधील व्यापारविषयक कायदे, उदाहरणार्थ ट्रान्सवालचा गोल्ड लॉ. ट्रान्सवाल टाऊनशिप लॉ, आणि १८८५चा ट्रान्सवालचा कायदा क्रमांक ३ मध्ये असे कोणतेही बदल झालेले नाहीत ज्यामुळे तेथील हिंदुस्तानींना तिथे वास्तव्य करण्याचा संपूर्ण अधिकार वा व्यापाराची परवानगी वा जमिनीच्या मालकीचा अधिकार मिळेल. यामुळे या समेटाबद्दल त्यांच्या मनात असमाधान आहे. हिंदुस्तानींना एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात जाण्याचे स्वातंत्र्य मिळालेले नसल्यामुळेही काही हिंदुस्तानी असमाधानी आहेत. हिंदुस्तानींच्या अडचणी दूर करणाऱ्या कायद्यात विवाहासंबंधी जी सवलत मिळाली आहे त्यापेक्षा अधिक सवलत मिळायला पाहिजे होती असे काही हिंदुस्तानींना वाटते आणि यामुळे त्यांच्या मनात असमाधानही आहे. या सर्व गोष्टींचा सत्याग्रहाच्या लढाईत समावेश करण्यात यावा अशी मागणीही त्यांनी माझ्याजवळ केली होती. परंतु मी त्यांची ही मागणी मान्य केली नव्हती. या गोष्टींचा सत्याग्रहाच्या लढाईत जरी समावेश करण्यात आला नव्हता तरी भविष्यात या मुद्द्यांवर अधिक सहानुभूतीपूर्ण विचार करून हिंदुस्तानींच्या अडचणी दूर केल्या पाहिजे ही गोष्ट स्पष्ट आहे. इथे राहणाऱ्या हिंदुस्तानींना जोपर्यंत हे संपूर्ण अधिकार मिळत नाहीत तोपर्यंत ते पूर्णपणे समाधानी असतील अशी अपेक्षा करता येत नाही.

“माझ्या देशबांधवांना मी सांगितले आहे की तुम्ही धीर धरला पाहिजे आणि सर्व उचित साधनांनी असे लोकमत तयार केले पाहिजे की त्यामुळे या पत्रव्यवहारातील अटींपेक्षाही सरकारला पुढे जाता येईल. दक्षिण आफ्रिकेत गिरमिट्ये येणे बंद झाले आहे. आप्रवासी कायद्यामुळे स्वतंत्र हिंदुस्तानींचे दक्षिण आफ्रिकेत येणे जवळपास थांबले आहे. आणि इथल्या राजकारणात हस्तक्षेप करण्याची हिंदुस्तानींच्या मनात कोणतीही महत्त्वाकांक्षा नाही हे जेव्हा गोऱ्यांच्या लक्षात येईल तेव्हा मी सांगितलेले अधिकार हिंदुस्तानींना दिलेच पाहिजे आणि तेच न्याय्य आहे असे गोऱ्यांनसुद्धा वाटू लागेल अशी आशा मी करतो. मध्यंतरीच्या काळात या प्रश्नाच्या सोडवणुकीकरिता सरकारने जी उदार भावना व्यक्त केली आहे ती उदार भावना तुम्ही सांगितल्याप्रमाणे आजच्या कायद्याच्या अंमलबजावणीत कायम राहिली तर मला खात्री आहे की संपूर्ण संघराज्यात हिंदुस्तानी समाज शांततापूर्वक राहू शकेल आणि सरकारला त्यामुळे त्रास होण्याचे कारण उरणार नाही.”

## २७. उपसंहार

अशा प्रकारे आठ वर्षांच्या शेवटी सत्याग्रहाची ही महान लढाई संपली आणि संपूर्ण दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या हिंदुस्तानींना शांतता मिळाली असे मानले जाऊ लागले. १८ जुलै १९१४ला दु:ख आणि आनंद या भावनांनी गोखल्यांना इंग्लंडमध्ये भेटून मी हिंदुस्तानकरिता रवाना झालो. ज्या दक्षिण आफ्रिकेत मी २५ वर्ष राहिलो होतो आणि असंख्य कडूगोड अनुभव मिळवले होते आणि जिथे मला माझ्या जीवनध्येयाची जाणीव झाली होती तो देश सोडणे माझ्याकरिता फार कठीण झाले. आणि मी दु:खी झालो. त्याचबरोबर अनेक वर्षांनंतर हिंदुस्तानात जाऊन गोखल्यांच्या मार्गदर्शनाखाली देशाची सेवा करण्याची संधी मिळणार असल्यामुळे मला आनंदही होत होता.

सत्याग्रहाच्या लढाईच्या इतक्या चांगल्या शेवटानंतर दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानींच्या सध्याच्या परिस्थितीचा विचार केल्यानंतर क्षणभर मनात विचार येतो की सत्याग्रहींनी इतकी मोठमोठी दु:खे कशाकरिता सहन केली? अथवा मानवजातीच्या समस्यांची सोडवणूक करण्याकरिता सत्याग्रहाची श्रेष्ठता कितपत सिद्ध झाली? या प्रश्नांचा विचार आपण या प्रकरणात विचार केला पाहिजे. सृष्टीचा असा एक नियम आहे की जी गोष्ट ज्या साधनांनी मिळते त्याच साधनांनी तिचे रक्षण केले जाऊ शकते. हिंसेने मिळवलेल्या गोष्टीचे हिंसेनेच रक्षण करता येऊ शकते. सत्याने मिळवलेल्या गोष्टीचे सत्यच रक्षण करू शकते. यामुळे दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानी जर आजही सत्याग्रहाचा उपयोग करू शकले तर तिथे सुरक्षितपणे राहू शकतील. सत्याने मिळवलेल्या गोष्टीचे रक्षण सत्याचा त्याग केल्यानंतर करता येऊ शकेल अशी विशेष शक्ती सत्याग्रहात नाही. आणि जरी अशी संभावना असली तरी ती वांछनीय आहे असे म्हणता येऊ शकत नाही. यामुळे दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानीची परिस्थिती आज जर खालावलेली असेल तर त्यांच्यात सत्याग्रहींचा अभाव आहे हे आपल्या लक्षात आले पाहिजे.माझे हे विधान तिथे असलेल्या हिंदुस्तानींकरिता नाही तर तेथील वस्तुस्थितीचे सूचक आहे. व्यक्तीत अथवा समुदायात जे गुण नसतील ते बाहेरून कसे आणता येतील? तेथील सत्याग्रह सेवक एकामागून एक देवाघरी

निघून गेले. सोराबजी. काछलिया, थंबी नायडू, पारसी रुस्तमजी इत्यादींचा स्वर्गवास झालेला असल्यामुळे फार कमी अनुभवी सत्याग्रही तिथे उरलेले आहेत. जिवंत असलेले सत्याग्रही आजही सरकारशी संघर्ष करत आहेत, आणि प्रसंग पडल्यानंतर, जर त्यांच्यातील सत्याचा आग्रह जिवंत असेल तर हिंदुस्तानी समाजाचे ते रक्षण करू शकतील याबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नाही.

ही प्रकरणे वाचणाऱ्या वाचकांच्या लक्षात आलेच असेल की सत्याग्रहाची ही महान लढाई झाली नसती आणि अनेक हिंदुस्तानींनी मोठमोठी दु:खे सहन केली नसती तर आज दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्तानी नावावाकरिताही शिल्लक नसते. इतकेच नाही तर दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्तानींना मिळालेल्या विजयामुळे ब्रिटिश साम्राज्यातील इतर वसाहतींमध्ये राहणाऱ्या हिंदुस्तानींचाही कमीअधिक प्रमाणात बचाव झाला. काही हिंदुस्तानी वाचू शकले नसतील तर तो दोष सत्याग्रहाचा नसून त्या वसाहतीत राहणाऱ्या हिंदुस्तानींमधील सत्याग्रहाच्या अभावाचा आहे आणि हिंदुस्तानात त्यांचे रक्षण करण्याची शक्ती नाही ही गोष्ट त्यातून सिद्ध होते. सत्याग्रह हे एक अमूल्य शस्त्र आहे. त्यात नैराश्याला वा पराजयाला कोणतेही स्थान नाही हे जर या इतिहासातून काही प्रमाणात जरी सिद्ध होऊ शकत असेल तर मी स्वत:ला कृतार्थ समजेन.

# परिशिष्ट १ - सत्याग्रहाच्या लढाईतील तारखा आणि घटना

(गांधीजी एप्रिल १८९३मध्ये वयाच्या २४व्या वर्षी डरबनला पोहोचले होते.)

**१९०६**

४ ऑगस्ट - श्री डंकन यांनी ट्रान्सवाल विधानसभेत “आशियाटिक अमेंडमेंट ऍक्ट”चा ठराव मांडण्याची सूचना दिली.

११ सेप्टेंबर - जोहानिसबर्ग एम्पायर थिएटरमध्ये हिंदुस्तानींची सार्वजनिक सभा झाली. सभेत उपस्थित असणारांनी खुनी कायदा मंजूर झाला तर त्याला शरण न जाता तुरुंगात जाण्याची शपथ घेतली. हिंदुस्तानींचे एक प्रतिनिधीमंडळ इंग्लंडमध्ये पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला.

१२ सेप्टेंबर - ट्रान्सवालच्या विधिमंडळात खुनी कायदा मंजूर झाला.

१ ऑक्टोबर - हिंदुस्तानी प्रतिनिधीमंडळ जोहानिसबर्गवरून रवाना झाले.

८ नोव्हेंबर - वसाहतमंत्री लॉर्ड एल्गिन यांना भेटले.

२९ नोव्हेंबर - लंडनमध्ये दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमेटीची स्थापना झाली. सर लेपेल ग्रिफिन तिचे पहिले अध्यक्ष झाले आणि श्री रिच तिचे पहिले सचिव झाले.

१ डिसेंबर - प्रतिनिधीमंडळ इंग्लंडमधून दक्षिण आफ्रिकेकरिता रवाना झाले.

३ डिसेंबर - ब्रिटिश सम्राटांनी खुनी कायदा नामंजूर केला.

**१९०७**

२२ मार्च - साम्राज्य सरकारने फेटाळलेला खुनी कायदा ट्रान्सवालच्या नवीन विधिमंडळाने २४ तासाच्या आत परत मंजूर केला.

२ मे - खुनी कायद्याला ब्रिटिश सम्राटांची संमती मिळाली.

१ जुलै - खुनी कायद्याचा अंमल सुरू झाला आणि त्यानुसार आधी प्रिटोरियात परवाने देण्याकरिता नोंदणी कार्यालय उघडण्यात आले. त्या दिवसापासून हे कार्यालय गावोगावी फिरले.

परंतु हिंदुस्तानींनी सर्व ठिकाणी त्याचा बहिष्कार केला. ८,००० लोकांमधून जवळपास केवळ ५०० लोकांनी नावे नोंदवून परवाने घेतले. यानंतर लोकांच्या अटकसत्राला सुरुवात झाली.

१८ सेप्टेंबर - माननीय गोखले यांच्याकडून असोसिएशनला तार मिळाली - "तुमच्या लढाईकडे माझे बारकाईने लक्ष आहे. काळजी वाटत आहे. तिच्यावर लक्ष केंद्रित करतो आहे. हार्दिक सहानुभूती व्यक्त करतो. ईश्वराच्या इच्छेवर पक्का विश्वास ठेवा."

२५ ऑक्टेबर - खुनी कायद्याच्या विरोधात असोसिएशनतर्फे ट्रान्सवालमधील सात ते आठ हजार हिंदुस्तांनींमधून ४५२२ लोकांच्या सह्या असलेल्या अर्ज सरकारकडे पाठवण्यात आला.

३ नोव्हेंबर - नोंदणी अर्ज घेणे बंद करण्यात आले.

११ नोव्हेंबर - सत्याग्रहींची पहिली धरपकड सुरू.

२७ डिसेंबर - न्यायालयात हजर राहण्याकरिता गांधींना समन्स मिळाले.

२८ डिसेंबर - जोहानिसबर्गमध्ये श्री जॉर्डन यांनी गांधीजींना २४ तासात ट्रान्सवाल सोडण्याचा हुकूम दिला.

**१९०८**

१० जानेवारी - जोनिसबर्गमध्ये श्री जॉर्डन यांनी गांधीजींना दोन महिन्यांची साध्या कैदेची शिक्षा केली.

३० जानेवारी - सत्याग्रही कैद्यांना तुरुंगातून सोडण्यात आले  ट्रान्सवाल सरकारने हिंदुस्तानींसमोर स्वेच्छेने परवाने घेण्याचा प्रस्ताव ठेवला आणि तसे झाले तर खुनी कायदा रद्द करण्याचे आश्वासन दिले.

१० फेब्रुवारी - गांधीजी, थंबी नायडू आणि इतर काही सहकारी परवाने घेण्याकरिता परवाने कार्यालयाकडे जात असताना गांधीजींवर हल्ला करण्यात आला.

२४ जून - सरकारने खुनी कायदा रद्द करण्याला नकार दिल्यामुळे सत्याग्रहाची लढाई सुरू झाली. सगळ्यात आधी श्री सोराबजींनी नातालमधून ट्रान्सवालमध्ये विनापरवाना प्रवेश केला आणि २० जुलैला वॉलक्रस्टच्या न्यायाधीशांनी त्यांना १ महिन्याची तुरुंगवासाची शिक्षा केली.

१२ जुलै - स्वतःहोऊन घेतलेले जवळपास २,००० परवाने जोहानिसबर्ग येथील जाहीर सभेत जाळण्यात आले.

२२ जुलै - ऱ्होडेशियात मंजूर करण्यात आलेल्या आशियायी कायद्याला सम्राटांच्या सरकारची मंजुरी मिळू शकत नाही अशी तार साम्राज्य सरकारकडून लॉर्ड सेलबोर्न यांना आली.

२२ ऑगस्ट - ऐच्छिक परवान्यांना कायदेशीर मानणारा आणि हिंदुस्तानींना परवाने देणारा कायदा ट्रान्सवालच्या दोन्ही सभागृहात मंजूर करण्यात आला.

३० ऑगस्ट - प्रिटोरियाच्या सार्वजनिक सभेत अजून २०० परवाने जाळण्यात आले.

७ सेप्टेंबर - वॉलक्रस्टमध्ये गांधीजींना अटक करण्यात आली. एका आठवड्यानंतर त्यांच्यावर खटला सुरू झाला आणि त्यांना ३ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा करण्यात आली.

९ नोव्हेंबर - या दिवसापासून पाच दिवसात २२७ हिंदुस्तानी तुरुंगात गेले. त्यात अनेक हिंदू आणि मुसलमान व्यापारी होते. यात ६४ जोहानिसबर्गचे, ९७ जर्मिन्स्टनचे आणि ६० प्रिटोरियाचे हिंदुस्तानी होते.

१७ नोव्हेंबर - ५३ हिंदुस्तानी तमिळ लोकांना फेरी लावताना अटक करण्यात आली. त्यांना सात दिवसांची तुरुंगाची शिक्षा झाली.

२२ नोव्हेंबर - कलकत्त्यात श्री अब्दुल जबर यांच्या अध्यक्षतेखाली सत्याग्रहींना सहानुभूती दाखवण्याकरिता एक मोठी सभा झाली.

१३ डिसेंबर - दोन महिन्यांची दुसरी तुरुंगवासाची शिक्षा पूर्ण करून गांधीजी सुटले.

**१९०९**

९ जानेवारी - डरबन येथे ‘मर्क्युरी’ वर्तमानपत्राच्या प्रतिनिधीने गांधीजींची मुलाखत घेतली. ट्रान्सवालमध्ये जवळपास २,००० सत्याग्रही तुरुंगात गेल्याचे गांधीजींनी सांगितले.

१५ जानेवारी - नातालहून वॉलक्रस्टला जात असताना गांधीजींना तिसऱ्यांदा अटक करण्यात आली. काही आठवड्यानंतर त्यांच्यावर खटला चालला आणि त्यात त्यांना तीन महिन्यांची शिक्षा झाली. त्याच दिवशी हमिदिया सोसायटीचे उपाध्यक्ष, ज्यांचे वय ६५ होते, श्री उमरजी साले आणि डेव्हिड अर्नेस्ट वगैरे प्रसिद्ध हिंदुस्तानींना अटक होऊन तीनतीन महिन्यांची शिक्षा झाली.

२९ जानेवारी - क्रुगर्सडॉर्प येथे खोलवड कॉन्फरन्स झाली तिच्यात कोणत्याही प्रकारचे परवाने न घेण्याचा, दुकाने बंद करून फेरी लावण्याचा आणि तुरुंगात जाण्याचा निर्णय घेण्यात आला.

६ फेब्रुवारी - ट्रान्सवालच्या नवीन हॉस्किन समितीने हिंदुस्तानींच्या अडचणी दूर करण्यासंबंधी ‘लंडन टाईम्स’ला पत्र लिहिले.

१० फेब्रुवारी - ऱ्होडेशिया सरकारने केलेला कायदा साम्राज्य सरकारने फेटाळून लावला.

१२ फेब्रुवारी - पारसी रुस्तमची आणि इतर काही हिंदुस्तानींना सहासहा महिन्यांची शिक्षा झाली.

६ मार्च - गोऱ्यांनी वॉक्सबर्ग, नॉरवुड, ब्लूमफौन्टन, बार्बरटन आणि क्रुगर्सडॉर्प येथे लोकेशन स्थापण्यासंबंधी आंदोलन केले.

१० मार्च - सत्याग्रही कैद्यांना ट्रान्सवालमधून हद्दपार करून डेलागोआ बेच्या मार्गाने हिंदुस्तानात पाठवणे सुरू केले.

१२ मार्च - प्रिटोरियात श्रीमती पिल्ले यांच्या केसमध्ये हातकड्या घालून गांधीजींना नेण्यात आले.

५ एप्रिल - १४ सेप्टेंबरपासून १७ मार्चपर्यंत लिहिण्यात आलेल्या पत्रांचे ‘ब्ल्यू बुक’ हे पुस्तक साम्राज्य सरकारने प्रकाशित केले.

३० एप्रिल - काछलिया आणि इतर १८ सत्याग्रही तुरुंगवासाची शिक्षा पूर्ण करून बाहेर आले.

४ मे - सत्याग्रही कैद्यांना तुरुंगात तूप देणे सुरू केले.

२४ मे - गांधीजींना तिसऱ्या वेळी तीन महिन्यांच्या कैदेची शिक्षा झाली.

७ जून - जर्मिन्स्टन येथे गोऱ्यांच्या 'लिटररी आणि डिबेटिंग सोसायटी'त 'सत्याग्रहाची नीती' या विषयावर गांधीजींनी उल्लेखनीय भाषण केले.

१६ जून - जोहानिसबर्ग येथील सार्वजनिक सभेत श्री ए. एम. काछलिया, श्री हाजी हबीब, श्री बी. ए. चेट्टियार आणि गांधीजी या सर्वांना इंग्लंडमध्ये पाठवण्याचा आणि श्री एम. ए. कामा, श्री एन. जी नायडू, श्री इ. एस. कुवाडिया आणि श्री एच. एस. पोलाक यांना हिंदुस्तानातपाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रतिनिधिमंडळाच्या प्रस्थानापूर्वीच श्री ए. एम. काछलिया, श्री इ. एस. कुवाडिया आणि श्री बी. ए. चेट्टियार यांना अटक करण्यात आली.

४ जुलै - जोहानिसबर्ग तुरुंगातून सुटल्यानंतर तुरुंगातील अत्याचारामुळे आणि त्रासामुळे नागप्पनचा मृत्यू.

१६ जुलै - 'मुजफरी स्टिमर'मधून १४ हिंदुस्तानींना हद्दपार करण्यात आले.

१ सप्टेंबर - मुंबईच्या शेरीफने दक्षिण आफ्रिकेतील लढाईची चर्चा करण्याकरिता एका सार्वजनिक सभेचे आयोजन केले, परंतु मुंबई सरकारने ती सभा होऊ दिली नाही.

१६ सप्टेंबर - ट्रान्सवाल येथील हिंदुस्तानी प्रतिनिधिमंडळाने इंग्लंडमध्ये लॉर्ड क्रू यांची भेट घेतली.

१३ नोव्हेंबर - इंग्लंडमध्ये गेलेले हिंदुस्तानी प्रतिनिधिमंडळ 'किल्डोनन कॅसल' नावाच्या जहाजाने दक्षिण आफ्रिकेत परतले.

१ डिसेंबर - हिंदुस्तानात श्री रतन टाटा यांनी दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहींच्या मदतीकरिता २५,००० रुपये देणगी घोषित केली.

**१९१०**

२५ फेब्रुवारी - हिंदुस्तानच्या केंद्रीय विधिमंडळात गिरमिट प्रथा बंद करण्याविषयीचा श्री गोखले यांचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

१ जून - दक्षिण आफ्रिकेचे संघराज्य झाले. त्याच दिवशी सोराबजी शापुरजी अडाजाणिया यांना सातव्यांदा अटक करण्यात आली.

४ जून - श्री कॅलेनबॅक यांनी लॉले येथील आपला फार्म सत्याग्रहींना राहण्याकरिता दिला.

१३ जून - २६ सत्याग्रही प्रेसिडेंट स्टिमरने हिंदुस्तानातून दक्षिण आफ्रिकेत परत आले.

२६ जुलै - पोर्तुगाल सरकारच्या मदतीने हिंदुस्तानींना हद्दपार करण्यात आले. या पावलाविरुद्ध लॉर्ड ऍम्टहिल यांनी लॉर्डसभेत जोरदार चर्चा केली.

३० जुलै - जी हिंदुस्तानी मुले सज्ञान झाल्यानंतर नाव नोंदवून परवाने घेऊ शकत होती त्यांना १९०८चा कायदा मंजूर झाल्यानंतर नाव नोंदवल्यानंतरही परवाना देण्याकरिता नकार देण्यात आला.

२२ ऑगस्ट - छोटाभाई यांचा प्रसिद्ध न्यायालयीन खटला जोहानिसबर्ग न्यायालयात सुरू झाला. त्यात अखेरीस छोटाभाई जिंकले.

२८ सेप्टेंबर - हद्दपारीची शिक्षा झालेल्या ८५ हिंदुस्तानी सत्याग्रहींसह श्री पोलाक डरबनला आले.

१६ ऑक्टोबर - 'गर्टरुड वुरमन' जहाजाने हिंदुस्तानात परतत असताना स्वर्गीय नारायण स्वामी यांचा डेलागोआ बे येथे मृत्यू.

**१९११**

२५ फेब्रुवारी - संघराज्याच्या राजपत्रात इमिग्रेशन (आप्रवासी प्रतिबंध कायदा) रेस्ट्रिक्शन विधेयक प्रसिद्ध झाले.

२५ एप्रिल - संसदेच्या वर्तमान अधिवेशनात ते विधेयक स्थगित ठेवण्यात आले.

(यामुळे जवळपास दोन वर्ष शांतता राहिली. १९१३मध्ये परत धक्कादायक घटना घडल्या. त्यांची माहिती पुढे दिली आहे.)

**१९१३**

२२ मार्च - हिंदुस्तानींच्या धर्मावर आक्रमण केले गेले. जस्टिस सर्ल यांनी एक निकाल दिला. त्यानुसार शरियतप्रमाणे विवाहित बाई मरियमचा तिच्या पतीशी झालेला विवाह अवैध ठरवण्यात आला.

३ एप्रिल - नवीन इमिग्रेशन विधेयक संघ सरकारच्या राजपत्रात प्रकाशित करण्यात आले.

३ मे - जोहानिसबर्गच्या एका सार्वजनिक सभेत सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याच आठवड्यात हिंदुस्तानी स्त्रियांनीही सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला आणि तो गृहविभागाकडे पाठवण्यात आला.

२४ मे - गांधीजी आणि गृह विभागाचे सचिव यांच्यात ३० एप्रिलपासून झालेला पत्रव्यवहार प्रकाशित करण्यात आला.

७ जून - वरील पत्रव्यवहाराचा उर्वरित भाग प्रकाशित करण्यात आला.

२१ जून - इमिग्रेशन ॲक्टला ब्रिटिश सरकारची स्वीकृती मिळाली.

१५ जुलै - नव्या कायद्याची कलमे संघराज्याच्या राजपत्रातून प्रकाशित करण्यात आली.

१ ऑगस्ट - नवीन कायद्याप्रमाणे तिन्ही वसाहतींमध्ये अपील बोर्डाची स्थापना करण्यात आली. या बोर्डामध्ये इमिग्रेशन अधिकारीही एक सदस्य होता.

१३ सेप्टेंबर - सत्याग्रहाची सुरुवात. सरकार आणि गांधीजी यांच्यातील सर्व महत्त्वाच्या प्रश्नावरील पत्रव्यवहार प्रकाशित करण्यात आला.

२२ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर - नाताल आणि ट्रान्सवालच्या अनेक सत्याग्रही स्त्रीपुरुषांनी फेरी लावून अथवा सीमा ओलांडून अटक करवून घेतली आणि ते तुरुंगात गेले.

१६ ऑक्टोबर - तीन पौंड कराच्या विरोधात न्यूकॅसल येथील मजुरांनी संप केला आणि हा संप चोहोकडे पसरला.

६ नोव्हेंबर - संप करणारांबरोबर गांधीजींनी ट्रान्सवालमध्ये प्रवेश केला.

११ नोव्हेंबर - गांधीजींना डंडी येथे नऊ महिन्यांची शिक्षा झाली.

२८ नोव्हेंबर - हिंदुस्तानच्या महाराज्यपालांचे भाषण.

११ डिसेंबर - आयोगाची नियुक्ती

१९ डिसेंबर गांधीजी, श्री कॅलेनबॅक आणि श्री पोलाक यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली.

**१९१४**

१६ फेब्रुवारी - समेटाप्रमाणे सर्व सत्याग्रही कैद्यांना सोडण्यात आले.

१८ मार्च - आयोगाचा अहवाल प्रकाशित झाला.

३ जून - इंडियन रिलीफ विधेयक प्रकाशित. झाले

३० जून वयाच्या ४५व्या वर्षी कस्तुरबा आणि कॅलनबॅक यांच्याबरोबर गांधीजींनी इंग्लंडला जाण्याकरिता दक्षिण आफ्रिकेचा कायमचा निरोप घेतला.

# परिशिष्ट २ - पूर्ती

या पुस्तकाच्या पृष्ठ ३१७ - १८वर छापलेल्या प्रसंगासंबंधी “गांधीजीकी साधना” या आपल्या पुस्तकात पृष्ठ १८० ते ८३वर (१९५९ची आवृत्ती) स्त्रियांना तुरुंगात पाठवण्यासंबंधीच्या निर्णयासंबंधी श्री रावजीभाई म. पटेल लिहितात -

याशिवाय या अखेरच्या लढाईत दोन प्रचंड शक्ती सामील झाल्या. आजपर्यंत एखाद्या स्त्रीची जरी लढाईत सामील होण्याची इच्छा असली तरी तिला तसे करण्यापासून अडवले जात असे. परंतु या अखेरच्या लढाईत हिंदुस्तानी स्त्रियांच्या स्त्रीत्वावर आक्रमण झाले आणि त्याचा विरोध करणे जरुरीचे होते. त्यात हिंदुस्तानी स्त्रियांच्या स्वाभिमानाचा प्रश्न होता. यामुळे लढाईत स्त्रियांनीही सामील झाले पाहिजे असा निर्णय घेण्यात आला. अशाच रीतीने गिरमिट्या मजुरांनाही लढाईत आधी सामील होण्याचा सल्ला देण्यात आला नव्हता वा तसे करण्याकरिता त्यांना प्रेरित करण्यात आले नव्हते. परंतु तीन पौंड कराच्या लढाईत सामील होणे त्यांचेही कर्तव्य झाले होते. यामुळे हजारो गिरमिट्ये मजूरही लढाईत भाग घेण्याच्या परिस्थितीत आले. या दोन शक्तींची या अखेरच्या लढाईत भर पडली.

परंतु या दोन शक्तींचा संग्रह करणाऱ्या शक्तीचीही गरज होती. अनेक हिंदुस्तानी स्त्रिया तुरुंगात जाण्याकरिता तयार होतील असा गांधीजींना विश्वास होता हे जरी खरे असले तरी स्वतः प्रयत्न केल्याशिवाय स्वर्गात कोण जाऊ शकतो? या लढाईत सामील होऊन कस्तुरबा जर लढाईत जाण्याकरिता तयार झाल्या तर संपूर्ण डावाला वेगळाच रंग येईल असे गांधीजींना वाटले. परंतु बांना तयार कसे करावे? आदेश देऊन त्यांना तयार करण्यात काहीही अर्थ नव्हता. अशा प्रकारे उभारलेल्या शक्तीवर विश्वास कसा ठेवता येईल? एकदा एक गोष्ट कळली की तिला कायम चिकटून राहण्याचा कस्तुरबांचा स्वभाव होता. परंतु ही गोष्ट बांना समजावून सांगून त्यांचा निर्धार कसा पक्का करावा हा प्रश्न होता. गांधीजी यासंबंधी विचार करत होते, आणि संधी मिळाल्यानंतर बाला समजावण्याचे आणि त्यांच्यात दृढनिश्चिय निर्माण करण्याचे काम गांधीजींनी यशस्वीपणे पूर्ण केले.

एके दिवशी नेहमीच्या नियमाप्रमाणे पायखाना वगैरे साफ केल्यानंतर आंघोळ करून अंदाजे साडेनऊ वाजता मी स्वयंपाकघरात गेलो. गांधीजीही शाळेत शिकवून त्या वेळी तिथे आले होते. कस्तुरबा तर त्या वेळी तिथे हजर होत्याच. त्यांनी पोळ्यांकरिता कणिक मळून ठेवली होती. त्या पोळ्या लाटू लागल्या आणि मी त्या शेकू लागलो. गांधीजी इतर चिल्लर काम करत होते. आपले काम करता करता एकाएकी गांधीजींनी कस्तुरबांना विचारले,

"तुला काही कळले?"

"काय?" उत्सुकतेने कस्तुरबांनी विचारले.

हसत हसत गांधीजींनी उत्तर दिले, "आजपर्यंत तू माझी विवाहित पत्नी होतीस. परंतु आता तू तशी राहिली नाहीस."

कस्तुरबा भुवया उंचावत म्हणाल्या, "अजून असे कोण म्हणाले? तुम्ही दररोज नवनवीन प्रश्न शोधून काढता."

गांधीजी परत हसत हसत म्हणाले, "मी कुठे शोधून काढतो आहे? जनरल स्मट्स म्हणत आहेत की ख्रिश्चन विवाहाप्रमाणे आपल्या विवाहाची न्यायालयात नोंदणी करण्यात आलेली नसल्यामुळे तू माझी विवाहित बायको नाही तर (उपपत्नी) रखेली समजली जाशील."

कस्तुरबा संतापून म्हणाल्या, "तुमचे डोके म्हणाले जनरल स्मट्स! त्या रिकामचोट माणसाला अशा गोष्टी कुठून सुचतात?"

गांधीजींनी विचारले, "परंतु आता तुम्ही स्त्रिया काय कराल?"

"आम्ही बिचाऱ्या काय करू शकतो?" कस्तुरबांनी विचारले.

"आम्ही पुरुष जसे सरकारशी लढत आहो तशा तुम्हीही लढा. तुला जर खरोखरीची विवाहित पत्नी व्हायचे असेल आणि उपपत्नी राहायचे नसेल आणि तुम्हा स्त्रियांची अब्रू तुला प्रिय असेल तर तुम्ही स्त्रियांनीही आमच्याप्रमाणे सरकारशी लढाई केली पाहिजे."

"तुम्ही लोक तर तुरुंगात जात असता."

"मग तुम्ही लोकही आपल्या अब्रूकरिता तुरुंगात जाण्याकरिता तयार व्हा."

गांधीजींचे हे वाक्य ऐकून कस्तुरबा आश्चर्यचकित होत म्हणाल्या, "काय म्हणता? मी तुरुंगात जाऊ! स्त्रियांकडून तुरुगात जाणे शक्य तरी असते?"

"का नाही? स्त्रिया तुरुंगात का जाऊ शकत नाहीत? पुरुष जे सुखदुःख भोगतात ते स्त्रिया का भोगू शकत नाहीत? रामामागे सीता गेली होती. हरिश्चंद्रामागे तारामती गेली होती. नळामागे दमयंती गेली आणि या सर्वांनी असीम दुःख सहन केले होते."

गांधीजींचे हे विवेचन ऐकून कस्तुरबा म्हणाल्या, "त्या सर्व देवतांसारख्या होत्या. त्यांच्या पावलावर पाऊल टाकण्याची आमच्यात शक्ती कुठे आहे?"

गांधीजी गंभीर होत म्हणाले, "यामुळे काय होते? आपण जर त्यांच्याप्रमाणे वागू लागलो तर त्यांच्यासारखे होऊ शकतो. आपणही देवता होऊ शकतो. रामाच्या कुळातील मी आहे, सीतेच्या कुळातील तू आहेस. मी राम होऊ शकतो आणि तू सीता होऊ शकतेस. कर्तव्याकरिता सीता रामामागे गेली नसती आणि राजमहालात बसून राहिली असती तर तिला कोणी सीतामाता म्हटले नसते. तारामती जर हरिश्चंद्राच्या सत्यव्रताकरिता विकली गेली नसती तर हरिश्चंद्राच्या सत्यव्रतात उणीव राहिली असती. हरिश्चंद्राला कोणी सत्यवादी म्हटले नसते आणि तारामतीला कोणी सती म्हटले नसते. नळामागे जाऊन दमयंती जर नळाच्या वनातील दुःखात सहभागी झाली नसती तर तिला कोणीही सती म्हणाले नसते. अशाच प्रकारे तुला तुझी अब्रू वाचवायची असेल आणि रखेलीपणाच्या कलंकातून मुक्त व्हायचे असेल तर तू सरकारशी संघर्ष कर आणि तुरुंगात जाण्याकरिता तयार हो."

कस्तुरबा चुप होत्या. बा याचे काय उत्तर देतात याकडे मी उत्सुकतेने पाहत होतो. दोघांचेही बोलणे ऐकण्यात मला मजा वाटत होती. इतक्यात कस्तुरबा म्हणाल्या, "म्हणजे तुम्हाला मला तुरुंगात पाठवायचे आहे. असेच ना? आता इतकेच शिल्लक राहिले होते. ठीक आहे, मी जाईन तुरुंगात. परंतु तुरुंगात मला हवे तसे जेवण मिळेल? "

“तू तुरुंगात जा असे मी म्हणत नाही. आपल्या अब्रूकरिता तुरुंगात जाण्याइतका उत्साह तुझ्यात असेल तर तू जा. आणि तुरुंगात मनाप्रमाणे आहार मिळाला नाही तर फलाहार कर.”

“सरकार तुरुंगात फलाहार देईल?”

फलाहार मिळवण्याचा उपाय सांगत गांधीजी म्हणाले, “सरकार जोपर्यंत फलाहार देणार नाही तोपर्यंत उपवास कर.”

कस्तुरबा हसत म्हणाल्या, “हा तर तुम्ही मला मरायचाच मार्ग दाखवला आहे! मला वाटते की मी तुरुंगात गेले तर नक्कीच मरेन.”

मान हलवत खळखळून हसत गांधीजी म्हणाले, “हो, माझीही अशीच इच्छा आहे. तू जर तुरुंगात मेलीस तर जगदंबेप्रमाणे मी तुझी पूजा करीन.”

“ठीक आहे, मी तुरुंगात जाण्याकरिता तयार आहे.” कस्तुरबा निर्धाराने म्हणाल्या. गांधीजी खूप हसले. त्यांना खूप आनंद झाला होता. गांधीजी मला म्हणाले, “बाचे हीच विशेषता आहे. मनात असो वा नसो ती माझ्या इच्छेप्रमाणे वागत असते.”

* * * * *